।। पणमामि वड्ढमाणं ।।

भगवत्कुंदकुंद आचार्यदेवविरचित 'प्रवचनसार' या
ग्रंथाचे सरस विवेचन

प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(भाग १ व २)

(प्रवचनसार : प्रथम अध्याय)

: लेखिका :

ब्र. (डॉ.) सुश्री. सुजाताताई रोटे

शास्त्री, जैनदर्शनाचार्य, पीएच. डी.

(वर्तमान - आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी)

: संपादक :

डॉ. नेमिनाथ शास्त्री

बाहुबली (कुंभोज)

: प्रकाशक :

अनेकांत शोधपीठ, बाहुबली

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

Visit Us on :- www.bhadrabharati.com

पुष्प ९वे

प्रथमावृत्ती – १००० प्रती

द्वितीयावृत्ती – १००० प्रती

तृतीयावृत्ती – १००० प्रती

चतुर्थावृत्ती – १००० प्रती

फाल्गुन शु. ११, मार्च २०, २०२४

मूल्य – नित्य स्वाध्याय

मुद्रक :

ममता ऑफसेट,

अहमदनगर,मो.नं. ९८२३०२४७७३

प्राप्ती स्थान :

श्री भरतेश ग्रंथ भांडार, बाहुबली

ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर – ४१६११०

फोन नं. ०२३० – २५८४४२२ / ९०४९४७३४३४

❊ मंगल आशीर्वाद ❊

वर्तमान काल में अद्वितीय ज्ञान के क्षयोपक्षम की धनी परमविदुषी आर्यिकारत्न श्री शुद्धोहंश्री माताजी ने श्रीमद् भगवत् कुन्दकुन्दाचार्य देव प्रणित ''प्रवचनसार'' परमागम की गाथाओं का मराठी भाषा में हृदयस्पर्शी एवं आत्मा का संवेदन करानेवाला अनुवाद ''जीवनस्वातंत्र्याची कला'' नामक पुस्तक में किया है।

वस्तुतः आत्मरस के पिपासुओंको आत्मरस का रसास्वादन कराने के लिए यह कृति महान सिद्ध हुई है। सभी आत्महितैषियों को इस पुस्तक का स्वाध्याय, आत्मचिंतन करना अत्यन्त उपयोगी होगा।

माताजीको उनकी इस अनुपम कृति के लिए बहुत आशीर्वाद।

सभी भव्यात्माओं को स्वाध्याय की प्रेरणा के साथ आशीर्वाद।

आचार्य सुयशसागर महाराज

प.पू. आर्यिकारत्न १०५ शुद्धोऽहंश्री माताजींचा अल्पपरिचय

पूर्वाश्रमीचे नाव - ब्रः (डॉ.) सुजाताताई रोटे

जन्म व गाव - ०७ फेब्रुवारी १९६६, कोल्हापूर.

शिक्षण लौकिक -

- वरिष्ठोपाध्याय - अजमेर बोर्ड, राजस्थान सुवर्णपदक
- शास्त्री (बी.ए.) - राजस्थान विश्वविद्यालय, जयपूर
- जैनदर्शनाचार्य (एम.ए.) - राजस्थान विश्वविद्यालय, जयपूर-सुवर्णपदक
- पीएच डी. - लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- विषय - जयसेनाचार्यस्य तात्पर्यवृत्तिग्रन्थानां समीक्षात्मकमध्ययनम्।

धार्मिक - गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज व गुरुकुलमाता गजाबेन यांच्या सान्निध्यात वयवर्षे १७ ते ५२ अखेर.

ब्रह्मचर्यव्रत - प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांचेकडून (सन १९८२)

आर्यिकादीक्षा - आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांचेकडून (दि. २८ जुलै २०२१)

संपादक - सन्मति मासिक (२००७ ते २०२१)

ग्रंथसंपदा (मौलिक कार्य)-

१) प्रवचनसार: जीवनस्वातंत्र्याची कला (भाग १)
२) प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग २)
३) प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग ३)
४) गुरुकुलमाता गजाबेन जीवनदर्शन (मराठी व हिंदी)
५) अनेक संगोष्ठीकरिता शोधनिबंधात्मक लेखनकार्य

संपादित व अनुवादित - १) लब्धिसार (प्रथम भाग) (मराठी व हिंदी)
२) क्षपणासार (द्वितीय भाग) (मराठी व हिंदी)
३) गोम्मटसार कर्मकांड (भाग १ व २) (हिंदी)
४) धवला (पुस्तक १० ते १४) (मराठी)



* पुण्यार्जक परिवार *

प.पू. गुरूदेव १०८ श्री समंतभद्र महाराजजींचे पूर्वाश्रमीचे
परममित्र श्रीमान वालचंद देवचंद शहा यांचे नातू
दानवीर भामाशाह श्री. सचिन शशिकांत शहा
सौ. तोरल सचिन शहा
आर्यन सचिन शहा अनेरी सचिन शहा
निंबर्गीकर, चेंबूर, मुंबई – ४०००७१



प्रस्तावना

आचार्य कुन्दकुन्ददेवांना कोण स्वाध्यायी साधक ओळखत नाही? त्यांचे जीवनवृत्त जनतेला अपरिचित असेल, परन्तु त्यांचे नाव व कार्य मात्र संपूर्ण जैन विश्वामध्ये परिचित आहे. भारतीय जैन श्रमण परंपरेमध्ये आचार्य कुन्दकुन्द देवांचे नाव विशेषरूपाने उल्लेखनीय आहे. कुन्दकुन्दाचार्यांनी या कलिकालामध्ये धर्मतीर्थप्रवर्तक जगद्गुरु तीर्थंकर देवांसारखे कार्य केले म्हणून श्रुतसागरसूरींनी त्यांना 'कलिकालसर्वज्ञ' या विशेषणाने सन्मानित केले आहे.

अज्ञान अंधारामध्ये भटकणाऱ्या लोकांना जेव्हा एखादा सन्मार्गदर्शक हवा असतो तेव्हाच या पृथ्वीतलावर तीर्थंकर पुरुष जन्माला येतात. ते प्रथम आत्मसाधनेच्या द्वारे स्वत:च्या अज्ञानाचा नाश करून ज्ञानाचा दिवा पेटवतात व त्या ज्ञानदिव्याच्या प्रकाशाने सन्मार्ग दाखवून इतरांचा उद्धार करतात. दोन हजार वर्षापूर्वी या भारतभूमीवर अज्ञानाचे साम्राज्य पसरले होते व कलिकालाच्या प्रभावाने जिनमतामध्ये अनेक मिथ्यामते उत्पन्न झाल्यामुळे लोक संभ्रम अवस्थेमध्ये भटकत होते. त्यांना हिताच्या मार्गाचा निर्णय होत नव्हता, अशावेळी कुंदकुंदांचा जन्म झाला. त्यांनी स्वत: आत्मसाधना करून दिव्यज्ञानाच्याद्वारे सत्यतत्त्व प्राप्त केले व जेथून अनेक रस्ते फुटले आहेत अशा चौकामध्ये उभे राहून छातिठोकपणे सांगितले की दिगम्बर निर्ग्रन्थमार्गच सत्यमार्ग आहे. याच मार्गाने इच्छित स्थानाची प्राप्ती होणार, अन्यथा नाही. म्हणून कुन्दकुन्ददेवांचे आपणावर अनंत उपकार आहेत.

प्रवासाला जात असताना आपण जर रस्ता चुकलो व एखाद्या वाटाड्याने आपल्याला खरा रस्ता दाखवला तर त्याच्याबद्दल आपल्याला किती बहुमान वाटतो, त्याचे आपण उपकार मानतो. आचार्य कुन्दकुन्ददेवांनी तर आपल्याला शाश्वत सुखाचा मार्ग दाखविला आहे, त्यांच्याविषयी आपल्या हृदयात किती बहुमान वाटला पाहिजे...? पुष्कळवेळा मनामध्ये असा विचार येतो की जर आचार्य कुन्दकुन्द झाले नसते तर या कलिकालामध्ये आपण कोठे भटकलो असतो? आपल्याला खऱ्या सुखाचा

मार्ग मिळाला असता का? अशा उपकारकर्त्या सन्मार्गदर्शक निर्ग्रन्थ दिगम्बर सन्त आचार्य कुन्दकुन्ददेवांच्या चरणी शत शत बार विनयपूर्वक श्रद्धांजली व त्रियोगपूर्वक त्रिवार नमोस्तु करून ही लेखमाला प्रारंभ करते.

जे केवली आणि श्रुतकेवलींच्या परम्परेला प्राप्त करून अङ्ग व पूर्वांचे जाणकार झाले, त्यांना श्रुतधर आचार्य म्हणतात. अन्तिम श्रुतकेवली आचार्य भद्रबाहु यांच्या परपम्परेमध्ये आचार्य गुणधर व जिनचन्द्र यांच्या नंतर आचार्य कुन्दकुन्द झाले व ते ज्ञानप्रवाद नामक पाचव्या पूर्वाच्या दहाव्या वस्तुमधील समयप्राभृताचे जाणकार होते, म्हणून त्यांना श्रुतधर आचार्य म्हणतात. त्यांनी आध्यात्मिक योगशक्तीला विकसित करून अध्यात्मविद्येची अविच्छिन्न धारा प्रवाहित केली. त्यामुळे भारतीय श्रमणपरंपरेचे धवलयश लोकामध्ये सर्वत्र विश्रुत आहे. गेल्या दोन हजार वर्षांमध्ये यांच्यासारखे प्रतिभासंपन्न आचार्य या अध्यात्मविश्वामध्ये दुसरे झाले नाहीत. या कारणानेच प्रत्येक दिगम्बर जैन साधक दररोज भगवान् महावीर व गौतम गणधरानंतर त्यांचे स्मरण करतो. तो श्लोक असा–

मंगलं भगवान् वीरो, मंगलं गौतमो गणी।
मंगलं कुन्दकुन्दाद्यो, जैनधर्मोऽस्तु मंगलम्।।४।।

कुन्दकुन्दांचे चरित्र हा एक लेखनीचा स्वतंत्र विषय होईल. आपल्याला त्यांच्या साहित्याचे मर्म जाणून घ्यायचे आहे. म्हणून त्यांच्या चरित्राबद्दल अधिक न लिहिता आपण मूळ विषयाकडे वळूया.

इन्द्रभूती गौतम गणधरांनी बारा अंगांची रचना केली. त्यातील बाराव्या अंगामध्ये १४ पूर्व रचिले आहेत. प्रत्येक पूर्व अनेक वस्तूमध्ये (अधिकारांमध्ये) विभागलेले आहे. प्रत्येक वस्तूमध्ये २०-२० प्राभृत (अन्तराधिकार) आहेत. कुन्दकुन्दाचार्यांना वर सांगितल्याप्रमाणे काही प्राभृतांचे ज्ञान होते, म्हणून त्यांनी ८४ पाहुडग्रन्थांची रचना केली. पाहुड हा प्राकृत शब्द आहे. त्याचे संस्कृतरूपांतर प्राभृत असे होते. प्राभृत शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्यापैकी अधिकार असा एक अर्थ आहे. आचार्य वीरसेन जयधवला टीकेमध्ये प्राभृतशब्दाचा अर्थ करताना लिहितात की '**प्रकृष्टेन तीर्थंकरेणाभृतं प्रस्थापितं इति प्राभृतम्**' जे प्रकृष्ट अर्थात तीर्थंकरांच्या द्वारे

स्थापित आहे ते प्राभृत होय अथवा **'प्रकृष्टैराचार्यविद्यावित्तवद्भिराभृतं धारितं व्याख्यातम् इति प्राभृतम्'** प्रकृष्ट अर्थात विद्याधन आचार्यांनी धारण करून ज्याचे व्याख्यान केले ते प्राभृत होय.

प्राभृतशब्दाचा दुसरा अर्थ 'भेट' असा होतो. स्वजीवराजाचे दर्शन करण्यास उत्सुक असणाऱ्या भव्यजीवांना आचार्यांनी हे ८४ ग्रंथ भेटस्वरूप दिले आहेत अर्थात यामध्ये आत्म्याला प्राप्त करण्याचा उपाय सांगितला आहे. प्राभृतशब्दाचा तिसरा अर्थ 'सार' असा होतो. संपूर्ण द्वादशांग जिनवाणीचा सार यामध्ये भरलेला आहे म्हणून कुन्दकुन्दप्रणीत ग्रंथांना दोन दोन नावे प्रसिद्ध झाली आहेत. जसे समयप्राभृत-समयसार, प्रवचनप्राभृत-प्रवचनसार इत्यादी. यद्यपि आचार्यकुन्दकुन्दरचित ८४ पाहुडग्रंथ आज उपलब्ध नाहीत तथापि त्यापैकी तेरा पाहुडग्रन्थ उपलब्ध आहेत. शेष सर्व काळाच्या प्रवाहात विलीन झाले आहेत. ते तेरा पाहुड- १) पंचत्थिकायपाहुड (पंचास्तिकायसंग्रह) २) पवयणपाहुड (प्रवचनसार) ३) समयपाहुड (समयसार) ४) णियमपाहुड (नियमसार) ५) दंसणपाहुड ६) सुत्तपाहुड ७) चरित्तपाहुड ८) बोधपाहुड ९) भावपाहुड १०) मोक्खपाहुड ११) लिंगपाहुड १२) सीलपाहुड १३) रयणपाहुड. पाच ते बारा पर्यंतचे पाहुड ग्रंथ 'अष्टपाहुड' या नावाने एकत्र संग्रहीत आहेत. बारसाणुवेक्खा व दशभक्ती यासुद्धा दोन रचना कुन्दकुन्दविरचित आहेत. दिगम्बर जैनसाहित्य रचनाकारांमध्ये कुन्दकुन्ददेवांचे स्थान सर्वोपरी आहे. साहित्यरत्नाकरामध्ये त्यांनी रचलेले 'समयसार, प्रवचनसार, पंचास्तिकायसंग्रह, नियमसार व अष्टपाहुड' हे ग्रंथ पंचपरमागम या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यापैकी 'समयसार, प्रवचनसार व पंचास्तिकायसंग्रह' हे तीन ग्रन्थ अमूल्य रत्नाप्रमाणे प्रकाशमान आहेत. याचे कारण टीकाकार अमृतचन्द्रदेव आहेत. त्यांनी या तीन रत्नांना चांगलेच पैलू पाडले आहेत. या तीन ग्रन्थांवर अमूल्य रहस्योद्घाटक टीका लिहिल्या आहेत. त्यामुळे या ग्रंथांची महत्ता अधिकच वाढली आहे. या तीन परमागमामध्ये हजारो शास्त्रांचे सार समाविष्ट आहे. म्हणून या तीन ग्रंथांचा उल्लेख 'कुन्दकुन्दरत्नत्रयी, ग्रन्थत्रयी, कुन्दकुन्दांची तीन रत्ने' इत्यादी नावांनी सादर करण्यात येतो. **पंचास्तिकायसंग्रह अध्यात्मामध्ये प्रवेश करण्यासाठी उत्तुंग प्रवेशद्वार आहे तर प्रवचनसार हे भव्य पटांगण आहे, समयसार हा**

अध्यात्माचा उंच प्रासाद आहे व नियमसार हा त्या प्रासादातील शान्तशीतल शयनागार आहे तर अष्टपाहुड हा या सर्वांचे संरक्षण करणारा चतुर्दिक कोट आहे. जो पंचास्तिकायसंग्रहरूपी प्रवेशद्वारातून प्रवेश करून प्रवचनसाररूपी पटांगणावरून वाटचाल करून समयसाररूपी प्रासादामध्ये नियमसाररूपी थंड शयनगृहामध्ये पहुडतो, तो आत्म–शान्तीचा अनुभव करतो. ज्याला कुन्दकुन्दसाहित्याचे अध्ययन करावयाचे आहे, त्यांनी प्रथम प्रवेशद्वारस्वरूप पंचास्तिकायसंग्रहाचे पठन करावे. याच्या अध्ययनाने मूलभूत तत्त्वांची ओळख होऊन तत्त्वज्ञानाची भूमिका तयार होते. त्यानंतर तत्त्वज्ञानामध्ये भक्कमता, गहनता व गंभीरता येण्याकरिता प्रवचनसारचे अध्ययन करावे. याद्वारे वस्तुस्वरूपाच्या ज्ञानाची इमारत ज्यांनी निर्माण केली आहे, त्याने उपादेयभूत शुद्ध आत्मतत्त्वामध्ये लीन होण्याकरिता समयसारचे रसास्वादन करावे व नंतर नियमसाररूपी थंड शयनागारामध्ये स्वस्थ बसावे. या क्रमाने गेल्यास निश्चितपणे साधकाला इष्टतत्त्वाची सिद्धी होईल. या कुन्दकुन्दप्रणीत ग्रन्थांच्या माध्यमातून परद्रव्य व परभावापासून भिन्न आत्म्याला जाणून निजशुद्ध स्वरूपाचा अनुभव करून शुद्धोपयोगामध्ये तन्मय जीव कर्मांचा क्षय करून मोक्षाला प्राप्त होतो.

प्रवचनसार हा ग्रन्थ गहन व गंभीर असल्यामुळे सामान्य वाचकांना क्लिष्ट वाटतो. ज्याप्रमाणे नारळाचे वरचे कवच कठीण असल्यामुळे सामान्यशक्तीचा कमजोर मनुष्य त्या कठीण कवचाला भेदून आतला गाभा मिळवण्यापासून व त्याच्या मधुररसास्वादनापासून वंचित राहतो, कोणी शक्तिमान पुरुष कवच हटवून आतला गाभा काढून देतो तेव्हा तो त्याच्या रसास्वादनाने संतुष्ट होतो, तृप्त होतो त्याचप्रमाणे प्रवचनसारमध्ये प्रयुक्त गंभीर व प्रौढशैलीला घाबरून कित्येक स्वाध्यायी पाठक त्यामध्ये भरलेल्या ज्ञानामृतापासून वंचित राहतात व त्यांची ज्ञानपिपासा शान्त होत नाही. त्यांना हे प्रौढ शैलीचे कठीण कवच दूर करून आतला गाभा काढून देण्याचे आमचे भाव झाले आहेत. यापूर्वीही अनेक ज्ञानी लोकांनी हे कार्य केले आहे. तरीपण विशेषत: मराठी पाठकांना हा लाभ व्हावा ही भावना आहे. यद्यपि हे कार्य करण्यास आम्ही एवढे सामर्थ्यशाली नाही याची जाणीव आहे. आपण हे काम कितपत करू शकू याबद्दल शंका व भीतीही वाटते तरीसुद्धा साहस करून

'जेवढा रसास्वाद आपल्याला करता आला तेवढा तरी इतरांना रसास्वाद करविण्यामध्ये निमित्त होऊ' या भावनेने हा प्रकल्प चालू करीत आहोत. पूर्वाचार्य व ज्ञानींनी दिलेल्या भांडवलावरच आमचा व्यापार आम्ही करणार आहोत. आचार्य अमृतचंद्र व आचार्य जयसेनांच्या टीकेचा भाव ग्रहण करून शीतलप्रसादजी, सहजानन्दजी वर्णी इ. ज्ञानींच्या विवेचनाचा आधार घेऊनच सोप्या भाषेत तत्त्व कसे उघड करता येईल याचा प्रयत्न करणार आहोत. बुद्धीची क्षमता नसतानाही स्वत:च्या परिणामांची विशुद्धी व्हावी व तत्त्वजिज्ञासू पाठकांची थोडी तरी तत्त्वज्ञानाची तहान भागवावी या दोन हेतूनेच हे कार्य प्रारंभिले आहे.

वाचकहो, आपण सर्वांनी याचे जरूर पठन करून रसास्वादन करावे व आपणास लक्षात आलेल्या त्रुटी जरूर आम्हाला कळवाव्यात, त्या सूचनांचे यथायोग्य स्वागत करून सुधारणा करण्याचा आम्ही प्रयत्न करू व यामध्ये काही शंका असतील तर त्यापण कळवाव्यात. त्याचे शक्तीनुसार योग्य समाधान केले जाईल. शक्यतो भाषा सोपी वापरून तत्त्वज्ञानाचा जीवनामध्ये कसा उपयोग करता येईल यावर जास्त भर दिला जाईल.

प्रवचन शब्दाचे तीन अर्थ आहेत- १) आप्त २) आगम व ३) पदार्थ. प्र म्हणजे उत्कृष्ट व वचन म्हणजे वाणी, कथन इ. प्रवचनशब्दाची निरुक्ती तीन प्रकारे करून तीन अर्थ निघतात- १) ज्यांचे वचन उत्कृष्ट आहे ते प्रवचन अर्थात आप्त २) उत्कृष्टांचे वचन ते प्रवचन अर्थात आगम व ३) जे उत्कृष्टरूपाने सांगितले जाते ते प्रवचन अर्थात पदार्थ. सार म्हणजे श्रेष्ठ, गाभा, रहस्य. वीतराग सर्वज्ञ भगवान या त्रैलोक्यात सर्वोत्कृष्ट आहेत. त्यांचे वचनच सर्वप्राण्यांचे हित करणारे असल्यामुळे उत्कृष्ट आहे,म्हणून जिनेन्द्र भगवंतांनी सांगितलेल्या प्रवचनाचा सार ज्यामध्ये भरलेला आहे असा हा प्रवचनसार ग्रंथराज आहे. द्वादशांग जिनवाणीचा सार शुद्धात्मा आहे,म्हणून प्रवचनसारचा आध्यात्मिक अर्थ शुद्धात्मा असा होतो. प्रमाण (ज्ञान) व प्रमेय (ज्ञेय) यांची मीमांसा करणारा दार्शनिकशैलीमध्ये लिहिलेला हा अद्वितीय ग्रन्थ आहे. समयसार श्रद्धाप्रधान आहे तर प्रवचनसार तत्त्वज्ञानप्रधान आहे. येथे प्रत्येक गोष्ट न्यायाच्या कसोटीवर कसून खरी सिद्ध केली आहे. केवळ 'बाबावाक्यं प्रमाणं' या न्यायाने अन्धश्रद्धाळू न बनता परीक्षाप्रधानी बनण्याची येथे प्रेरणा

मिळते. हा दार्शनिक ग्रन्थ असल्यामुळे सर्व विश्वविद्यालयांच्या शास्त्री, आचार्यादी परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये याला स्थान दिले आहे यावरून याची महत्ता लक्षात येते.

हा ग्रन्थ तत्त्वजिज्ञासू पाठकांची तत्त्वपिपासा शान्त करण्यामध्ये समर्थ आहे. हा पवित्र परमागम मोक्षेच्छुक भव्यजीवांना यथार्थ वस्तुस्वरूपाचे ज्ञान होण्यामध्ये महानिमित्तभूत आहे. या शास्त्रामध्ये जिनशासनाच्या मुख्य मुख्य सिद्धान्तांचे बीज विद्यमान आहे. येथे दिव्यध्वनीच्याद्वारे निघालेल्या प्रयोजनभूत तत्त्वांचे दोहन केले आहे. यामध्ये प्रत्येक पदार्थाच्या स्वतन्त्रतेची उद्घोषणा केली आहे. स्वातंत्र्य सर्वांना प्रिय व सुखद असते, म्हणून स्वातन्त्र्यसुख मिळविण्यासाठी या ग्रन्थाचे अध्ययन, मनन व आचरण आवश्यक आहे.

प्रवचनसारच्या प्रारम्भीच शास्त्रकर्त्यांनी वीतराग चारित्राची तीव्र आकांक्षा व्यक्त केली आहे. पुन:पुन्हा आपल्या स्वरूपामध्येच डुबकी मारणारे आचार्यदेव निरन्तर आपल्यामध्ये राहू इच्छितात. परंतु परिपूर्ण अवस्थेला प्राप्त होईपर्यंत आत्मानुभवातून बाहेर येतात. अशा भूमिकेमध्ये ज्या अमूल्य वचनमौक्तिकांची माळ गुंफली गेली तोच हा प्रवचनसार परमागम होय.

हे शास्त्र तीन श्रुतस्कन्धामध्ये विभक्त आहे. श्रुत म्हणजे शास्त्र व स्कन्ध म्हणजे फांद्या. श्रुतस्कन्ध म्हणजे शास्त्रांच्या फांद्या. ज्याप्रमाणे झाड अनेक फांद्यामध्ये विभागलेले असते त्याप्रमाणे हे शास्त्रसुद्धा तीन अधिकारांमध्ये विभागलेले आहे म्हणून येथे अधिकाराला श्रुतस्कन्ध हे नाव दिले आहे. प्रथम श्रुतस्कन्धाचे नाव ज्ञानतत्त्वप्रज्ञापन अथवा सम्यग्ज्ञानाधिकार असे आहे. अनादिकाळापासून हा जीव अज्ञानामुळे आपल्या ज्ञानानन्द स्वभावाला विसरला आहे. म्हणून एका कवीने भजनात म्हटले आहे–

जगमें अपना कोई नहीं है, तू तो ज्ञानानन्दमयी है।
एकबार अपने में आ जा, अपनी खबर क्यों भुला दई है।

आपल्या अद्भुत चैतन्यनिधीला विसरून पराधीन ज्ञान व सुखाच्या पाठीमागे लागून महादु:खी होऊ लागला आहे. अशा दीनदु:खी जीवांवर करुणा करून आचार्यांनी या अधिकारात जीवाच्या ज्ञानानन्द स्वभावाचे

सविस्तर वर्णन केले आहे. इन्द्रियज्ञान व इन्द्रियसुखाला हेय (सोडण्यायोग्य) दाखवून अतीन्द्रिय- ज्ञान व अतीन्द्रिय सुखाला उपादेय (ग्रहण करण्यायोग्य) सांगितले आहे. केवलींच्या ज्ञान व आनन्दाची युक्तिपूर्वक सिद्धी केली आहे. केवलज्ञानाबद्दलचा आपला अन्तरंग बहुमान 'अहो हि णाणस्स माहप्पम्' इत्यादी भावपूर्ण शब्दसुमनांनी व्यक्त केला आहे. ज्ञान व सुखाचे अनुपम निरूपण करून या अधिकारात आचार्यांनी मुमुक्षू जीवांना ज्ञान व सुखाची रुची व श्रद्धा करविली आहे. अधिकाराच्या अन्तिम टप्प्यात मोह- राग-द्वेषाला निर्मूळ नाश करण्याचा जिनोक्त अमोघ उपाय चार प्रकारांनी सांगितला आहे. तो उपाय जाणून प्रायोगिक पद्धतीने त्याचे आचरण केले असता निश्चितपणे मोहाचा नाश होऊन रत्नत्रयनिधी आपल्याला हस्तगत करता येते.

द्वितीय श्रुतस्कन्धाचे नाव ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अथवा सम्यग्दर्शन अधिकार असे आहे. अनादिकाळापासून परिभ्रमण करणाऱ्या जीवाने सर्व काही केले आहे, परंतु स्वत:ला कधी जाणले नाही. स्वपराचे भेदविज्ञान कधी केले नाही. त्याला अशी स्वानुभव श्रद्धा नाही की 'बंधमार्गामध्ये व मोक्षमार्गामध्ये जीव एकटाच आहे. त्याचा पराशी कधीही कोणताही संबंध नाही.' म्हणून हजारो उपाय करूनसुद्धा तो दु:खमुक्त होत नाही. या श्रुतस्कन्धामध्ये आचार्यदेवांनी दु:खाचे मूळ छेदण्याचा उपाय भेदविज्ञान सांगितले आहे. भेदविज्ञानाच्या सिद्धीसाठी स्वपराचे ज्ञान होणे अत्यावश्यक आहे. स्वपराचे ज्ञान होण्याकरिता वस्तुव्यवस्था समजून घेणे गरजेचे आहे. वस्तुव्यवस्था जाणून घेण्याकरिताच या अध्यायाच्या प्रारंभी द्रव्यसामान्याची सिद्धी ज्या अलौकिक पद्धतीने केली आहे ती मूलत: पठनीय आहे. प्रत्येक द्रव्य उत्पादव्ययध्रौव्य व गुणपर्यायाला सोडून अन्य काही नाही हे तर्कपूर्णशैलीमध्ये सोदाहरण प्रस्तुत केले आहे. याच्या अध्ययनाने द्रव्य म्हणजे नेमके काय आहे? व प्रत्येक द्रव्याची स्वतन्त्रता कशी आहे? याची नि:संशय प्रतीती होते. द्रव्यसामान्याची सुदृढ भूमिका रचून त्यावर द्रव्यविशेषाची अविलक्षणीय इमारत उभी केली आहे. त्यानंतर द्रव्यसामान्य व द्रव्यविशेषाच्या सिद्धीच्या मूल प्रयोजनभूत भेदविज्ञानाची भावना उत्कृष्टरूपाने भावली आहे. जीव दशप्राणापासून भिन्न आहे, जीव मन-वचन-कायेचा कर्ता, करविता, अनुमोदक नाही, जीव पुद्गलबंधाचा कर्ता नाही, निश्चयबंधाचे स्वरूप, ध्रुव शुद्धात्म्याची

उपादेयता, एकाग्रसंचेतन लक्षण ध्यान इत्यादी अनेक विषय अत्यंत स्पष्टपणे मांडले आहेत. या सर्वांमध्ये स्वपराचे भेदविज्ञान स्पष्ट प्रतिभासित होते. संपूर्ण अधिकारात द्रव्यानुयोगाचे तत्त्व ठसाठस भरलेले आहे. याचा सखोल अभ्यास करणाऱ्या मध्यस्थ सुपात्र जीवाला अशी प्रतीती झाल्याशिवाय राहत नाही की 'जिनदर्शनच खरे वस्तुदर्शन आहे.' विषयाचे प्रतिपादन इतके प्रौढ, गहन, गंभीर, मर्मस्पर्शी व चमत्कृतिमय आहे की ते अध्ययन करणाऱ्याच्या उपयोगाला तीक्ष्ण बनवून त्याला श्रुतरत्नाकराच्या तळाशी घेऊन जाते व उच्चकोटीच्या साधकाला निजस्वभावरत्नाची प्राप्ती करविते. जर सामान्य साधक, तेथपर्यंत पोहचू शकला नाही तरी त्याच्या हृदयात एवढी श्रद्धा तरी अवश्य घर करते की 'श्रुतरत्नाकर' अद्‌भुत आणि अपार आहे.

तिसऱ्या श्रुतस्कन्धाचे नाव चरणानुयोगसूचक चूलिका अथवा सम्यक्‌चारित्राधिकार आहे. शुद्धोपयोगरूप मुनि-अवस्था काय आहे? मुनींच्या अंतरंग परिणतीला अनुरूप कशाप्रकारचा शुभोपयोग असतो व त्याचबरोबर सहजपणे बाहेरच्या क्रिया कशा होतात? याचे सुंदर चित्रण यामध्ये चितारले आहे. याच्या अध्ययनाने मुनींची अंतर्बाह्य यथार्थ प्रतिमा साक्षात् ज्ञानचक्षूसमोर उभी राहते. दीक्षाग्रहण करण्याची जिनोक्तविधी, अंतरंग सहजदशानुरूप बहिरंग यथाजातरूपत्व, अठ्ठावीस मूलगुण, अंतरंग बहिरंग छेद, उपधिनिषेध, उत्सर्गमार्ग-अपवादमार्ग, युक्ताहारविहार, एकाग्रतारूप मोक्षमार्ग, मुनींचा अन्यमुनींच्या प्रतीचा व्यवहार इत्यादी अनेक विषय या अध्यायात सुन्दररीतीने रेखाटले आहेत. आचार्यदेवांनी चरणानुयोगसारख्या विषयाचे सुद्धा अध्यात्माच्या मुख्यतेने निश्चय-व्यवहाराच्या संधिपूर्वक असे चमत्कारपूर्ण वर्णन केले आहे की, जणू काय शांतरस पाझरणारे अध्यात्म संगीत गायिले जाऊ लागले आहे की काय? असे वाटते. अशा प्रकारचे प्रमाणभूत अध्यात्म प्रधान चरणानुयोगाचे वर्णन अन्यत्र दुर्लभ आहे. हृदयामध्ये भरलेल्या अनुभवामृताने ओतप्रोत होऊन निघालेल्या आचार्यदेवांच्या वाणीमध्ये असा काही चमत्कार आहे की ती ज्या ज्या विषयाला स्पर्श करते त्या त्या विषयाला परमरसमय, शीतल मधुर सुधास्यन्दी बनवते. या ग्रन्थाच्या अंतिम पाच गाथा 'पंचरत्न' या नावाने प्रसिद्ध आहेत. शास्त्ररूपी अगाध समुद्रामध्ये खोल उतरून जणूकाय आचार्यांनी

आमच्यासाठी ही पाच रत्ने वर काढली आहेत. बंध-बंधमार्ग-मोक्ष-मोक्षमार्ग या प्रयोजनभूत तत्त्वाचे सजीव वर्णन करणाऱ्या या पाच गाथांमध्ये संपूर्ण जिनगमाचे सार सामावले आहे. याचा पाठक स्वयं अनुभव करतील.

कुन्दकुन्दाचार्यांनी प्रदान केलेल्या तत्त्वविचाररूपी अमूल्य रत्नांच्या प्राप्तीने मालामाल झालेल्या साधक जीवाला सहज विकल्प येतो की इतर जीवांनासुद्धा ही अमूल्यरत्ने प्राप्त होऊन त्यांचे तत्त्वविचाराचे दारिद्र्य नष्ट होऊन त्यांना सुखमय अवस्था प्राप्त होवो. शेवटी एकच भावना आहे की –

कुन्दकुन्द के हीरे मोती मैं बिखराऊँगली गली,

ले लो रे कोई वीर का प्यारा शोर मचाऊँ गली गली।

करुणासागर आचार्य नेहमी 'स्वान्त:सुखाय सर्वजनहिताय' प्रयत्नशील असतात. निर्ग्रन्थ दिगम्बर भावलिंगी सन्त सदा आपल्या शुद्धात्म्यामध्ये रमण्याचा पुरुषार्थ करतात. शुद्धोपयोगरूपी शीतल जलाशयामध्ये जेव्हा अधिक काळपर्यंत राहू शकत नाहीत तेव्हा अशुभोपयोगरूपी संतप्त उन्हापासून वाचण्याकरिता शुभोपयोगरूपी वृक्षाच्या शीतल छायेचा आश्रय घेतात. या शुभोपयोगाच्या फलस्वरूप ग्रन्थ रचण्याचा प्रयत्न करतात. ग्रन्थ रचण्याच्या निमित्ताने पुन्हपुन्हा शुद्धात्मतत्त्वाचे चिन्तन, मनन, घोलन होते. त्यामुळे परिणामांची विशुद्धी वाढते. त्यांनी स्वान्त:सुखाय केलेल्या प्रयत्नामुळे सहजच दुसऱ्याचे हित होते. छहढालाकार दौलतरामजींनी मुनींच्या भाषासमितीचे वर्णन अत्यन्त सुंदर शब्दामध्ये केले आहे–

जग सुहितकर, सब अहितहर, श्रुतिसुखद सब संशय हरे।

भ्रमरोगहर जिनके वचन मुखचन्द्रतै अमृत झरे।।

आत्मानंदातून बाहेर आल्यावर उस्फूर्तपणे निघालेल्या त्यांच्या शीतल मधुर वचनाने दुसऱ्या दुखसंतप्त जीवांचा दु:खदाह मिटून त्यांना परमानंदाची प्राप्ती होते. म्हणून टीका लिहिण्याचे प्रयोजन सांगताना आचार्य अमृतचन्द्र लिहितात की–

परमानन्दसुधारसपिपासितानां हिताय भव्यानाम्।

क्रियते प्रकटिततत्त्वा प्रवचनसारस्य वृत्तिरियम्।।

परमानन्दरूपी अमृताचे पान करण्याची तहान असणाऱ्या भव्य

जीवांच्या हिताकरिता ही प्रवचनसारची वृत्ती रचली जाते. आचार्यांनी अट घातलेली आहे की परमानन्दाची तहान असणाऱ्या जीवांच्या हिताकरिता ही टीका लिहतो. आता स्वत:च्या अन्तर्मनाला प्रश्न विचारायचा की तुला कशाची तहान आहे? सुखाची तहान तर सर्वांनाच दिसते. पण कोणत्या सुखाची? प्रत्येकजण प्रत्येकक्षण सुख प्राप्त करण्यासाठी धडपडताना दिसतो आहे. पण खऱ्या सुखाची जात माहीत नसल्यामुळे आकुलताजन्य इन्द्रियसुखाच्या मागे धावत आहे. इन्द्रियसुखामध्ये वास्तविक आनन्द नाही पण त्या व्यतिरिक्त खऱ्या आनंदाची खाण आम्हाला माहीत नाही म्हणून त्यातच मस्त होतोय. ज्याप्रमाणे डुकराला गटारीतील घाण पाणी पिण्याची सवय लागली आहे म्हणून तेच पाणी गोड वाटते. त्याला स्वच्छ मधुर जल आवडत नाही त्याप्रमाणे अज्ञानी जीवाला दु:खमय इन्द्रियसुखरूपी अपवित्र जल सेवन करण्याची सवय लागली आहे. त्यामुळे अध्यात्मापासून प्राप्त होणारे परमानन्दरूपी अमृत त्याला आवडत नाही. आचार्य आपल्यापुढे आपल्याला पाजण्यासाठी परमानन्दरूपी अमृताचा प्याला घेऊन उभे आहेत; परंतु बाळ जसे औषध पिताना तोंड मिटून घेते तसे आम्ही पण तोंड मिटून घेतले आहे. त्याचे पान करायला तयार नाही तर आपल्याला जीवनात आनंद कोठून व कसा मिळणार?

एकदा एक भुंगा एका शेणातील किड्याला म्हणाला, 'तू दिसायला माझ्यासारखाच दिसतोस. तुला शेणाचा आहार करताना व त्यातच विहार करताना पाहून फार कष्ट होतात. तू माझ्याबरोबर बागेत चल. तेथे फुलांच्या वासाने तुझे मस्तक मस्त होऊन जाईल. परत तू ह्या दुनियेचे कधी नावसुद्धा काढणार नाहीस. या नरकाला सोड आणि चल, मी तुला आपल्या स्वर्गामध्ये घेऊन जातो.'

शेणकीडा साशंक होऊन म्हणतो, 'ना बाबा ना, या मोहन भोगापेक्षा अधिक काही कोठे दिव्यतर पदार्थ असू शकतो का? मला मूर्ख बनवू नकोस. जा आपले काम कर.' भुंगा करुणावश होऊन त्याला फार आग्रह करतो. शेवटी कसेतरी करून शेणकीडा जायला तयार होतो. तो घश्यामध्ये शेणाचा घास ठेवून घेतो आणि विचार करतो. सुगन्ध आपल्याला काय पसन्द पडणार आहे? शेवटी तर परतच यावे लागेल; भुंग्याबरोबर तो जातो. भुंगा आपल्या

पुष्पोद्यानामध्ये जाऊन रंगबिरंगे सुन्दर-सुन्दर तऱ्हतऱ्हेच्या सुगंधी फुलांची सहल करवतो. तरी देखील किड्याचा उदास चेहरा प्रसन्न झाला नाही. भुंग्याला समजायला काही वेळ लागला नाही. शेवटी तो म्हणतो भाऊ, 'तुम्ही आपल्या घश्यामध्ये जो शेणाचा घास दाबून ठेवला आहे तो पहिला थुंकून टाका तरच आपल्याला फुलांची खुशबू येऊ शकेल.'

याचप्रमाणे जोपर्यंत संसारी जीवांच्या मुखामध्ये पाच इन्द्रियांच्या विषय वासनेचा घास भरलेला आहे तोपर्यंत आत्मिक आनंदाचा सुगन्ध येऊ शकणार नाही. आचार्य आपल्याला आत्मारूपी उद्यानामध्ये घेऊन जातात. निरनिराळ्या अनंतगुणकुसुमांची सहल करवितात; पण आम्हाला त्याचा आस्वाद येत नाही. कारण आम्ही इन्द्रिय विषयांचे वमन करीत नाही. सामान्य अज्ञानी जीवांचे तर जाऊ दे, पण पूजा, स्वाध्याय, व्रत उपवासादी करणारे, धार्मिक म्हणविले जाणारे जीव कोणत्या सुखाच्या इच्छेने सर्व धार्मिक क्रिया करतात? याचा शोध घेतला पाहिजे. पूजेच्या माध्यमातून सुरेल संगीत ऐकून किंवा ऐकवून आम्हाला कर्णेन्द्रियाची तर तृप्ती करायची नाही ना? स्वाध्यायाच्या माध्यमातून स्वत:चे मन रमवून मनोरंजन तर करायचे नाही ना? अथवा चार चौघात स्वत:ला ज्ञानी पंडित म्हणवून घेण्यासाठी तर स्वाध्याय करीत नाही ना? यश, ख्याती, पूजा, लाभासाठी तर व्रत उपवासादी करीत नाही ना? या सर्व प्रश्नांची उत्तरे स्वत:च्या आत्म्यालाच विचारायची आहेत. कारण तोच खरे उत्तर देवू शकणार आहे. **स्वत: स्वत:चे संशोधन करून स्वत:ला योग्य मार्गदर्शन करणे ही आत्मसाधनेची प्रथम पायरी आहे.** आश्चर्य हे आहे की हा जीव प्रवचनादींच्या माध्यमातून सर्व जगाला मार्गदर्शन करायला तयार आहे, पण स्वत: स्वत:ला मार्गदर्शन करायला तयार नाही. **जो स्वत:ला यथार्थ मार्गदर्शन करतो त्याच्याद्वारे सहजपणे दुसऱ्याला मार्गदर्शन मिळते.**

आपली दुर्दशा आम्ही स्वत:च करून घेतली आहे, याला दुसरा कोणीही जबाबदार नाही. आम्ही स्वत:चे सोडून दुसऱ्याचे पीठ दळायला जातो आणि रडत बसतो. आपले रडगाणे कोण ऐकणार? **स्वत:ला सुखी आपण स्वयंच करू शकतो. आपल्याला सुखी करण्यास दुसरे कोणीही समर्थ नाही.** म्हणून आपण आता स्वयं ठरवायचे की मला स्वत:ला सुखी

करायचे आहे. स्वत:ला सुखी करणे हेच स्वत:चे हित आहे. इष्टोपदेशमध्ये पूज्यपाद आचार्य सांगतात की –'**परोपकृतिमुत्सृज्य स्वोपकारपरो भव**' परोपकार सोडून आता स्वत:चा उपकार करण्यामध्ये तत्पर हो. स्व म्हणजे आत्मा, स्वत:चे हित म्हणते आत्म्याचे हित, शरीराचे नव्हे; कारण शरीरसुद्धा पर आहे.

सर्व कथनाचे तात्पर्य हे आहे की प्रत्येक धार्मिक क्रिया करण्यापाठीमागचा उद्देश एकच असला पाहिजे तो म्हणजे खरा आत्मिक आनंद मिळविणे. प्रत्येक क्रियेतून आपल्याला परमानन्दाकडे जाता आले पाहिजे. किंबहुना या आत्मिक परमानन्दाच्या प्राप्तीसाठीच या सर्व क्रिया बाह्य साधनरूपाने सांगितल्या आहेत. या क्रियेतून आचार्यांना आपल्याला परमानन्दापर्यंत पोहोचवायचे आहे. पूजा करण्यापाठीमागचा हेतू हाच आहे की पूजा करीत असताना भगवंतांच्या गुणांची ओळख होते, त्यांच्या गुणांचे स्मरण होते. वीतराग स्वरूप समजते. त्यामुळे अन्तर्मुख होऊन आपल्या देहदेवालयातील भगवान आत्म्याची ओळख होते. कारण भगवानसुद्धा माझ्यासारखेच जीव आहेत म्हणून माझेसुद्धा स्वरूप त्यांच्यासमानच असले पाहिजे. हे जाणल्यामुळे परमानन्दाची प्राप्ती होते. ही फक्त कहानी आपल्याला ऐकायची नाही. तर आपल्या जीवनात याचा प्रयोग करायचा आहे. रोज आपण दर्शन पूजा करतो त्यावेळी हे प्रात्याक्षिक केले पाहिजे. प्रयोगात्मक पद्धतीने आपल्याला प्रवचनसार शिकायचा आहे ह्याचा पूर्वीच उल्लेख केला आहे. म्हणून हा प्रयोग सर्वांनी करायचा की भगवंतांचे दर्शन करायचे, त्यांचे स्वरूप जाणायचे आणि अन्तर्मुख होऊन शरीरापासून भिन्न असणारे आपले स्वरूप जाणायचे. हा प्रयोग केला असता परमानन्द निश्चित मिळतो. स्वाध्याय करीत असतानाही हा प्रयोग करायचा. शास्त्रामध्ये जे काही पदार्थांचे स्वरूप सांगितले आहे तसाच जाणण्याचा प्रयत्न करायचा. स्वाध्यायाच्या शेवटी पाच मिनिट आत्मचिन्तन करून स्वत:ला जाणण्याचा प्रयत्न करावा. शास्त्रातील प्रत्येक गोष्ट मला सांगितली आहे. याच्यामध्ये माझेच हित प्रतिभासित होते असे वाटले पाहिजे. जर स्वाध्यायातून आत्मसन्मुख झालो तर नक्की आत्मानंद मिळणार.

व्रत उपवासादी क्रिया करून अशुभापासून वाचून तेवढाच वेळ आपण

आत्मकार्यासाठी देऊ शकतो. म्हणून उपवासादी क्रिया कराव्यात. उपवास करून जास्तीत जास्त आत्म्याजवळ वास करायचा. मला कोणतीही क्रिया आत्मिक आनन्द मिळविण्यासाठीच करायची आहे. अशुभातून सुटून आत्मारूपी घरात यायचे असेल तर शुभोपयोगरूपी अंगणात येणे आवश्यक आहे. पण शुभोपयोगामध्ये न अटकता आपल्या आत्मारूपी घरात रमायचे आहे. प्रत्येक धार्मिक क्रिया करीत असताना हा प्रयोग आपल्याला करायचा आहे व त्याद्वारे आपल्याला परमानन्दरूपी फळ मिळते की नाही याचे परीक्षण करायचे आहे. जेथे यथार्थ कृती आहे तेथे इच्छित फळ अवश्य मिळते. सुरवातीला एवढा विस्तार एवढ्यासाठीच केला की प्रवचनसार ग्रन्थ संपेपर्यंत हे प्रयोजन आपल्याला विसरायचे नाही. **परनिरपेक्ष आत्मिक आनंद प्राप्त करण्यासाठीच हा ग्रंथ आचार्य लिहितात व परमानन्दाच्या प्राप्तीसाठीच आपण वाचायचा आहे. दुसरे कोणतेही प्रयोजन नको. परमानन्द प्राप्त करणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे. ही कला शिकविणारा हा परमागम आहे.**

यद्यपि सर्व रचनाकारांची कामना सर्व भव्यजीवांचे कल्याण करण्याची असते तथापि कोणत्यातरी ग्रन्थरचनेमध्ये कोणी एक भव्यजीव विशेष निमित्त बनतो. ज्याप्रमाणे गोम्मटसारच्या रचनेमध्ये निमित्त वीरमार्तंड चामुण्डराय, द्रव्यसंग्रहाच्या रचनेमध्ये निमित्त सोमश्रेष्ठी, परमात्मप्रकाशच्या रचनेमध्ये निमित्त प्रभाकर भट्ट होते त्याप्रमाणे या प्रवचनसारच्या रचनेमध्ये निमित्त शिवकुमार महाराज होते असा उल्लेख जयसेनाचार्यांनी आपल्या तात्पर्यवृत्तीमध्ये केला आहे. शिवकुमार महाराज कोण होते? कोठले होते? याबाबतीत निश्चित उल्लेख मिळत नाही. विद्वानांनी अनेक तर्क केले आहेत. काही विद्वानांचे मत आहे की शिवकुमार महाराज पुढे जाऊन तत्त्वार्थसूत्राचे रचयिता उमास्वामी झाले. कारण उमास्वामी कुन्दकुन्दाचार्यांचे साक्षात् शिष्य होते. परन्तु हा संशोधनाचा विषय आहे.

आचार्य कुन्दकुन्ददेवांच्या द्वारे प्रदत्त हा प्रवचनसार मुमुक्षूंकरिता अनुपम, अपूर्व वरदान आहे. या प्रवचनसार माळेमध्ये अनेक सैद्धान्तिक, आध्यात्मिक, दार्शनिक मोत्यांना गुंफले आहे. ज्याला परिधान करून आत्मार्थी जीव कृतकृत्यतेचा अनुभव करतो. त्याला असे वाटते जणू काय मला मोक्ष महालावर आरूढ होण्याकरिता सीढीच मिळाली आहे.

ही प्रवचनसार गंगा दुःखसंतप्तांचा ताप हरण करीत, अशान्त जीवांना

शान्ती प्रदान करीत, अज्ञानींच्या मोहरूपी पर्वताला भेदीत, ज्ञानप्रकाश पसरवीत, भव्यजीवांच्या हृदयकमळाला विकसित करीत, मोक्षार्थींच्या रत्नत्रय शेतीला सिंचित, समृद्ध करीत दोन हजार वर्षापर्यन्त वाहते आहे. आजसुद्धा ही साधकांच्या साधनेला वृद्धिंगत करीत आहे. यामध्ये अवगाहन करून आत्मार्थी जीव आपली ज्ञानपिपासा शान्त करून परमानन्दरसाने संतृप्त होतात. याद्वारे तुम्हा आम्हा सर्वांना परमानन्दाची प्राप्ती होवो ही मंगल कामना करते.

आचार्य कुन्दकुन्दांच्याद्वारे प्रसन्न व गंभीर शैलीमध्ये वर्णिलेल्या सिद्धान्तांचे विश्लेषण करण्याकरिता अनेक टीकाकारांनी लेखन केले आहे. या ग्रन्थावर संस्कृत भाषेमध्ये तीन टीका प्रकाशित झाल्या आहेत–१) आचार्य अमृतचन्द्रविरचित 'तत्त्वप्रदीपिका' २) आचार्य जयसेनांची 'तात्पर्यवृत्ती' व ३) प्रभाचन्द्र आचार्यांची 'प्रवचनसरोजभास्कर'.

१) प्रथम टीकाकार– आचार्य अमृतचन्द्र

दहाव्या शताब्दीमध्ये प्रवचनसारवर सर्वप्रथम 'तत्त्वप्रदीपिका' नावाची संस्कृत टीका आचार्य अमृतचन्द्रांनी रचली. आध्यात्मिक कविरूपाने अमृतचन्द्रांचे स्थान अद्वितीय आहे. या शास्त्राचे मूलकर्ता अलौकिक पुरुष होते त्याचप्रमाणे याचे टीकाकारसुद्धा महासमर्थ लोकोत्तर पुरुष होते. कुन्दकुन्दाचार्यांच्या नंतर जवळ जवळ १००० वर्षांनी अमृतचन्द्र आचार्य झाले. त्या दोघांची द्रव्य, क्षेत्र व कालाने कधीही भेट झाली नाही. परंतु भावाच्या अपेक्षेने दोघे अगदी निकट आहेत. काळाच्या अपेक्षेने १००० वर्षाचे अंतर असूनसुद्धा कुन्दकुन्दाचार्यांच्या हृदयातील भाव अमृतचन्द्र आचार्यांनी बरोबर उलगडला आहे. यावरूनच सिद्ध होते अनेक ज्ञानींचे मत एकच असते व एका अज्ञानीची अनेक मते असतात. आतापर्यंत अनंत तीर्थंकरांनी तत्त्वाचे स्वरूप एकच सांगितले आहे. आश्चर्य तर हे आहे की १००० वर्षापर्यंतच्या मध्यंतरच्या कालामध्ये कुन्दकुन्दांच्या साहित्यावर कोणीच लेखनी कशी काय चालविली नाही? जैन साहित्याचा इतिहास पाहिल्यानंतर हे लक्षात येते की मध्यंतरीच्या ५००–६०० वर्षांच्या कालावधीत बौद्ध, नैयायिकादि अन्य मतांचा खूप प्रचार प्रसार होता. त्यांच्या मताचे खंडन करून जैनतत्त्वज्ञान सत्य सिद्ध करण्यामध्ये अनेक आचार्यांनी

आपली शक्ती पणाला लावली. म्हणून या काळात न्यायविषयक व तत्त्वज्ञानविषयक पुष्कळ ग्रन्थ रचले गेले. अमृतचन्द्र आचार्यांनीच सर्वप्रथम कुन्दकुन्दांच्या साहित्यावर आपली लेखणी चालविली व कुन्दकुन्दसाहित्य रत्नाला अत्यन्त देदीप्यमान केले. जर अमृतचन्द्र आचार्यांनी कुन्दकुन्दग्रन्थत्रयीवर टीका लिहिल्या नसत्या तर या ग्रन्थांचे इतके महत्त्व आपल्याला वाटले नसते. त्याचे आपण मोल केले नसते. अमृतचन्द्र आचार्यांच्या हस्तकौशल्यामुळेच ग्रन्थांना नवे तेज प्राप्त होऊन त्याला चकाकी आली आहे.

अमृतचन्द्र आचार्यांनी तत्त्वार्थसार व पुरुषार्थसिद्ध्युपाय नामक अत्यंत सरळ अध्यात्मप्रधान रोचक स्वतन्त्र ग्रन्थ लिहिले तर लघुतत्त्वस्फोटसारखा अध्यात्म-भक्ति-तत्त्वज्ञानरूपी त्रिवेणी संगम साधून गहन गंभीर रहस्यमय स्तुतिग्रंथ लिहिला. अत्यंत सरळ व अत्यंत क्लिष्ट दोन्ही शैलीमध्ये ग्रंथ लिहिण्याची विलक्षणीय कला त्यांच्याजवळ होती. आज संपूर्ण भारतामध्ये त्यांच्यासारख्या आध्यात्मिक व प्रौढशैलीमध्ये लिहिलेल्या टीका दुर्मिळ आहेत. पाठकांना त्यांच्या साहित्याची अध्यात्मरसिकता, आत्मानुभव, प्रखर विद्वत्ता, वस्तुस्वरूपाला न्यायपूर्वक सिद्ध करण्याची असाधारणशक्ती, जिनशासनाचे अत्यन्त गंभीर ज्ञान, निश्चयव्यवहाराचे संधिबद्ध निरूपण करण्याची विरल शक्ती आणि उत्तमकाव्यशक्तीचा चांगला परिचय होतो. गंभीर रहस्याला अत्यंत संक्षेपामध्ये प्रगट करण्याची त्यांची शक्ती विद्वानांना आश्चर्यचकित करते. त्यांचे काव्य अध्यात्मरस व आत्मानुभवाच्या मस्तीने भरपूर आहे. समयसारचे अध्यात्मरसाने भरलेले मधुर अमृत कलश अध्यात्मरसिकांच्या हृदयाच्या तारा झणाणून सोडतात.

खरोखरच या पंचम कलिकाळात अध्यात्म अमृताचा वर्षाव केला आहे. ती वर्षा झेलण्यासाठी आपले हृदयरूपी पात्र मजबूत पाहिजे. त्यातील एक कणही वाया जाऊ न देता त्याचा पूरेपूर उपयोग करून आपले जीवन कृतार्थ केले पाहिजे. अमृतचन्द्रांच्या अमृताची गोडी कशी आहे हे स्वयं चाखल्याशिवाय कळणार नाही. अध्यात्म अमृताच्या पिपासूंनी स्वयं त्यांच्या टीकेचे अध्ययन-मनन करून रसास्वादन करावे व तृप्त व्हावे.

२) द्वितीय टीकाकार आचार्य जयसेन –

जयसेनाचार्यांनी कुन्दकुन्दांच्या प्राभृतत्रयीवर 'तात्पर्यवृत्ती' नामक खण्डान्वयात्मक टीका लिहिल्या आहेत. अमृतचन्द्र आचार्यांच्यानंतर २०० वर्षातच जयसेन आचार्य झाले. अनेक प्रमाणांनी त्यांचा समय बाराव्या शताब्दीचा उत्तरार्ध निश्चित केला आहे. या वृत्ती 'यथानाम तथागुण' उक्तीला सार्थक करतात. यांनी अत्यंत सरळ बोधगम्य शैलीमध्ये व सहजसुबोध भाषेमध्ये अल्पबुद्धी लोकांकरिता कुन्दकुन्दाचार्यांचे हार्द उद्घाटित केले आहे. केवळ टीकेच्या माध्यमातून ख्यातिप्राप्त आचार्यांमध्ये यांचे नाव अग्रणी आहे. हे आगमाचे ज्ञाते व अध्यात्मकुशल संत होते. **शब्दार्थ, नयार्थ, आगमार्थ, मतार्थ व भावार्थ या पंचार्थ शैलीमध्ये सर्व गाथांचे रहस्य उलगडले आहे.** अमृतचन्द्र आचार्यांसारख्यांनी लिहिलेल्या समर्थ टीका असतानाही यांनी आपली लेखणी चालवण्याचे साहस केले या पाठीमागे मुख्यत: दोन कारणे प्रतिभासित होतात- १) आगम व अध्यात्मामध्ये सुमेल स्थापित करणे व २) अत्यंत सरळ भाषेत कुन्दकुन्द आचार्यांचे मर्म सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे. लुप्तप्रायः झालेल्या आगमपरंपरेला सुरक्षित करून पुनरुज्जीवित करण्याचे मोठे कार्य यांनी केले आहे. यांच्या सुमेलशैलीमुळे अध्यात्मासारखे मिष्ट व गरिष्ट अन्न अजीर्ण न होता आगमरूपी तुपाबरोबर आत्मसात केल्यामुळे सुपाच्य झाले आहे. जर जयसेन आचार्यांनी प्राभृतत्रयीवर वृत्ती रचल्या नसत्या तर अल्पबुद्धी साधारणजण प्राभृतत्रयीमध्ये भरलेल्या अध्यात्म अमृतरसाच्या पानापासून वंचित होऊन तृषार्तच राहिले असते. साधारण मंदबुद्धी अमृतचन्द्रांच्या उत्तुंग शिखरावर चढू शकत नसले तरी त्यांनी जयसेन आचार्यांच्या छोट्या टेकडीवर चढून तर का होईना कुन्दकुन्दांच्या रहस्याचे अवलोकन करावे.

३) तृतीय टीकाकार प्रभाचन्द्र आचार्य-

प्रभाचंद्राचार्य यांनी सुद्धा कुन्दकुन्दांच्या प्राभृतत्रयीवर संस्कृतभाषेत टीका लिहिल्या आहेत. प्रवचनसार ग्रंथावर 'प्रवचनसरोजभास्कर' नावाची टीका रचली आहे. पदखण्डान्वयशैलीमध्ये अत्यंत सरळ व सुबोध अशी ही टीका आहे. यामध्ये प्राकृतगाथेच्या शब्दानुवादाची बहुलता आहे. सिद्धान्तज्ञ प्रभाचन्द्र आचार्य न्याय, अध्यात्म, चरणानुयोग व करणानुयोगाचे ज्ञाते होते. यांचा काळ दहाव्या शताब्दीनंतर व तेराव्या शताब्दीच्यामध्ये निश्चित केला

जातो. यांनी अनेक ग्रंथांच्या टीका लिहिल्या आहेत.

४) अन्य टीकाकार –

आध्यात्मिक बालचन्द्रांनी प्रवचनसारवर कन्नडभाषेमध्ये टीका लिहिली आहे. मल्लिषेण आचार्यांच्या प्रवचनसार संस्कृतटीकेचा उल्लेख मिळतो, परंतु अद्यापि ती उपलब्ध नाही. केशववर्णींच्या कन्नड टीकेचा सुद्धा उल्लेख मिळतो परंतु ती सुद्धा उपलब्ध नाही. मल्लिषेण नामक तमिल टीकाकाराने तमिल भाषेमध्ये कुन्दकुन्दप्राभृतत्रयीवर टीका रचल्या आहेत, त्या हस्तलिखितरूपाने प्राप्त आहेत. पाण्डे हेमराज, जोधराज गोदीका, देवीदास, वृन्दावनदास, ब्र. शीतलप्रसादजी, सहजानन्द वर्णीजी इ. हिंदी लेखकांनी हिन्दी भाषेमध्ये टीका लिहिल्या आहेत. वर्तमान काळामध्ये सुद्धा यावर विश्लेषणात्मक अनेक टीका लिहिल्या जात आहेत. त्यामुळे ग्रन्थाचा प्रभाव वृद्धिंगत होत आहे. या ग्रन्थाचे रहस्य इतके अगाध आहे की जेवढे खोलू तेवढे थोडेच आहे. याच्या रसातळात जेवढे खोल शिरू तेवढे अधिक अधिक रहस्य हाती लागते.

आचार्यदेवांनी प्रत्येक गाथेच्याद्वारे आत्मानन्द रसायनाचे पान करविले आहे. याचे सेवन केल्याने भव्य पुण्डरीक स्वानुभवरूप आत्मतेजाने प्रकाशित होतो. **प्रवचनसारच्या प्रथम अध्यायाचे आलोडन करून ज्ञान साधनाला प्राप्त करतो. त्या ज्ञानसाधनेच्याद्वारे दुसऱ्या अध्यायाचे पठन करून स्वपर भेदविज्ञानाची कला अवगत करतो व तिसऱ्या अध्यायाचे घोलन करून सर्वोत्कृष्ट चारित्ररूपी नौकेवर आरूढ होऊन भवसमुद्राचा किनारा गाठतो.** अशाप्रकारे संसारसागरातून पार करणारा हा प्रवचनसार परमागम सर्वोत्कृष्ट आहे.

श्रुतपंचमी, ज्येष्ठ शु.५, – सुजाता रोटे
शुक्रवार, दि. २२ मे २०१५

* अनुक्रमणिका *

नं.	गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक	नं.	गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
१.	मंगलाचरण	२६	२८.	गाथा – २७	१७९
२.	गाथा – १	३४	२९.	गाथा – २८	१८२
३.	गाथा – २	४१	३०.	गाथा – २९	१८६
४.	गाथा – ३	४४	३१.	गाथा – ३०	१८९
५.	गाथा – ४	४९	३२.	गाथा – ३१	१९३
६.	गाथा – ५	५१	३३.	गाथा – ३२	१९६
७.	गाथा – ६	६०	३४.	गाथा – ३३	२०६
८.	गाथा – ७	६५	३५.	गाथा – ३४	२११
९.	गाथा – ८	७०	३६.	गाथा – ३५	२१६
१०.	गाथा – ९	७६	३७.	गाथा – ३६	२२१
११.	गाथा – १०	८१	३८.	गाथा – ३७	२२७
१२.	गाथा – ११	८८	३९.	गाथा – ३८	२३२
१३.	गाथा – १२	९४	४०.	गाथा – ३९	२३३
१४.	गाथा – १३	१००	४१.	गाथा – ४०	२३६
१५.	गाथा – १४	१०६	४२.	गाथा – ४१	२३८
१६.	गाथा – १५	१२०	४३.	गाथा – ४२	२४२
१७.	गाथा – १६	१२३	४४.	गाथा – ४३	२४८
१८.	गाथा – १७	१३२	४५.	गाथा – ४४	२५४
१९.	गाथा – १८	१३७	४६.	गाथा – ४५	२५७
२०.	गाथा – १९ – १	१४०	४७.	गाथा – ४६	२६२
२१.	गाथा – १९– २	१४२	४८.	गाथा – ४७	२६७
२२.	गाथा – २०	१४७	४९.	गाथा – ४८	२७३
२३.	गाथा – २१	१५५	५०.	गाथा – ४९	२७६
२४.	गाथा – २२	१६२	५१.	गाथा – ५०	२७९
२५.	गाथा – २३	१६६	५२.	गाथा – ५१	२८३
२६.	गाथा – २४–२५	१६९	५३.	गाथा – ५२	२८६
२७.	गाथा – २६	१७५			

* अनुक्रमणिका *

नं.	गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
५४.	गाथा – ५३	२९५
५५.	गाथा – ५४	३०३
५६.	गाथा – ५५	३०९
५७.	गाथा – ५६	३१५
५८.	गाथा – ५७	३१९
५९.	गाथा – ५८	३२३
६०.	गाथा – ५९	३२४
६१.	गाथा – ६०	३३०
६२.	गाथा – ६१	३३७
६३.	गाथा – ६२	३४३
६४.	गाथा – ६३	३४७
६५.	गाथा – ६४	३५१
६६.	गाथा – ६५	३५६
६७.	गाथा – ६६	३६०
६८.	गाथा – ६७	३६३
६९.	गाथा – ६८	३६७
७०.	गाथा – ६८–१	३७१
७१.	गाथा – ६८–२	३७४
७२.	गाथा – ६९	३७७
७३.	गाथा – ७०	३८२
७४.	गाथा – ७१	३८५
७५.	गाथा – ७२	३९०
७६.	गाथा – ७३	३९३

नं.	गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
७७.	गाथा – ७४	३९५
७८.	गाथा – ७५	४००
७९.	गाथा – ७६	४०४
८०.	गाथा – ७७	४११
८१.	गाथा – ७८	४१५
८२.	गाथा – ७९	४२१
८३.	गाथा–७९–१	४२५
८४.	गाथा–७९–२	४२८
८५.	गाथा – ८०	४३१
८६.	गाथा – ८१	४४२
८७.	गाथा – ८२	४४६
८८.	गाथा – ८३	४५०
८९.	गाथा – ८४	४५५
९०.	गाथा – ८५	४५९
१००.	गाथा – ८६	४६२
१०१.	गाथा – ८७	४६७
१०२.	गाथा – ८८	४७२
१०३.	गाथा – ८९	४७७
१०४.	गाथा – ९०	४८२
१०५.	गाथा – ९१	४८७
१०६.	गाथा – ९२	४९२
१०७.	गाथा – ९२–१	४९९
१०८.	गाथा – ९२–२	५०१

।। पणमामि वड्ढमाणं ।।

भगवत्कुंदकुंद आचार्यदेवविरचित 'प्रवचनसार' या
ग्रंथाचे सरस विवेचन

प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

समर्थ टीकाकार अमृतचन्द्रदेव प्रारंभी मंगलाचरण करतात. मंगलाचरणाचा अर्थ इष्टदेवाला नमस्कार करणे असा होतो. ग्रन्थाची निर्विघ्न परिसमाप्ती, नास्तिकतेचा परिहार, शिष्टाचाराचे पालन, कृतज्ञतेचे प्रकाशन, शिष्यांना ज्ञान व्हावे इ. प्रयोजनाने ग्रंथकार ग्रन्थाच्या प्रारंभी मंगलाचरण करतात. **'मं मलं पापं गालयति इति मंगलं अथवा मंगं सुखं लाति इति मंगलं तस्य आचरणं प्रकटीकरणं कथनं तदनुकूलतया प्रवर्तनं वा मंगलाचरणम्'** जे पापाचा नाश करून सुखाला प्राप्त करविते ते मंगल होय.

कोणतीही केवळ शारीरिक क्रिया आपल्या पापाचा नाश व सुखाची प्राप्ती करून देऊ शकत नाही. वास्तविक आत्म्याचा परिणामच पापाला दूर करण्यास व सुख मिळवून देण्यास समर्थ आहे. इष्टदेवाला भावपूर्वक नमस्कार करीत असताना आपले परिणाम शुभ होतात त्यामुळे अशुभभावाचा अर्थात पापाचा सहजच अभाव होतो व पुण्याची प्राप्ती होते. शुभभावजनित शान्तिसुखाचा अनुभव होतो. त्याला निमित्त भगवान आहेत व भगवान केवलज्ञानादी मंगल पर्यायाने परिणत आहेत म्हणून त्यांना मंगल म्हटले आहे.

निश्चयाने स्वत:च्या शुद्ध आत्म्याला जाणले असता शुभाशुभभावाचा अभाव होऊन आत्मिक आनंदाची प्राप्ती होते म्हणून निजशुद्धात्मा द्रव्यनिक्षेपाने मंगल म्हटला आहे. त्या निज आत्म्याला जाणणे, अनुभव करणे, त्यामध्येच आचरण करणे निश्चय मंगलाचरण आहे. व्यवहाराच्या कथनापाठीमागे कोणते तरी रहस्य दडलेले असते. त्या रहस्यापर्यंत आपण जर पोहोचलो तर वास्तविक अर्थाने व्यवहारनयाचे प्रयोजन सिद्ध होते.

निश्चयापर्यंत जाऊन पोहोचण्यासाठीच व्यवहार नयाचा हस्तावलम्बनरूपाने आधार घ्यायचा असतो. म्हणून प्रत्येक मंगलाचरण करतेवेळी व्यवहाराबरोबर निश्चय मंगलाचरणाचा पण प्रयोग करायचा म्हणजेच आत्मानुभव घ्यायचा.

मंगलाचरण

सर्वव्याप्येकचिद्रूपस्वरूपाय परात्मने।
स्वोपलब्धिप्रसिद्धाय ज्ञानानन्दात्मने नमः ।।१।।

सर्व व्यापक एक चैतन्यरूप ज्याचे स्वरूप आहे आणि जो स्वानुभवाने प्रसिद्ध आहे. त्या ज्ञानानन्दस्वरूप उत्कृष्ट आत्म्याला नमस्कार असो. आध्यात्मिक ग्रन्थ असल्यामुळे व्यक्तिवाचक नमस्कार केला नाही तर परमात्म्याला नमस्कार केला आहे. जिनेंद्र भगवंतांच्या वीतराग शासनामध्ये व्यक्तिपूजा महत्त्वाची नाही तर गुणांची पूजा महत्त्वाची आहे. 'गुणाः पूजास्थानं' गुणामुळे व्यक्तिसुद्धा पूजिली जाते.

परमात्मा दोन प्रकारचा आहे –१) कार्यपरमात्मा २) कारणपरमात्मा. व्यक्तरूप शुद्ध सिद्ध भगवान कार्यपरमात्मा आहेत व शक्तिरूप ध्रुवशुद्ध ज्ञानानंदस्वभावी आत्मा कारणपरमात्मा आहे. सिद्धपरमात्म्याचे जे प्रकटस्वरूप आहे तेच कारणपरमात्म्याचे अव्यक्तस्वरूप आहे. प्रत्येक जीव कारणपरमात्मा आहे. श्लोकामध्ये परमात्म्याची तीन विशेषणे दिली आहेत प्रथम विशेषण **'सर्वव्याप्येकचिद्रूपस्वरूपाय'** सर्वामध्ये व्यापक म्हणजे सर्वांचा ज्ञाता द्रष्टा असे एक चैतन्य परमात्म्याचे स्वरूप सर्व द्रव्यांमध्ये, सर्व क्षेत्रांमध्ये, सर्व काळांमध्ये व सर्व भावांमध्ये व्यापक असूनही चैतन्य एकरूपच आहे. आरसा ज्याप्रमाणे पदार्थांना प्रतिबिम्बित करतो पण पदार्थाशी तन्मय होत नाही त्याप्रमाणे चैतन्य ज्ञानाच्या द्वारे सर्व द्रव्य, क्षेत्र, काल व भावाला जाणते, पण त्यांच्याशी तन्मय होत नाही, म्हणून एकरूपच आहे. ज्ञानाच्या अपेक्षेने विश्वव्यापी आहे, पण प्रदेशाच्या अपेक्षेने स्वव्यापी आहे. स्वद्रव्य, क्षेत्र, काल, भावामध्ये व्यापून आहे. आत्मा स्वद्रव्यामध्ये चैतन्यरूपच आहे. आपल्या सर्व असंख्यातप्रदेशामध्ये चैतन्यरूपच आहे, आपल्या अनादिअनंत सर्व पर्यायांमध्ये चैतन्यरूपच आहे व आपल्या सर्व भावांमध्ये चैतन्यरूपच आहे.

दूसरे विशेषण आहे '**स्वोपलब्धिप्रसिद्धाय**'–परमात्मा आपल्या अनुभवानेच प्रसिद्ध आहे. सिद्ध भगवान स्वानुभवरूपी साधनाच्या द्वारेच सिद्ध बनले. सिद्ध अवस्थेतही स्वानुभवाच्याद्वारे स्वत:साठी स्वत:ला प्रसिद्ध करीत आहेत.

निजकारणपरमात्मासुद्धा स्वानुभवानेच प्रसिद्ध होतो. परमात्मा दुसऱ्या कोणत्याही साधनाने प्राप्त होत नाही अर्थात इंद्रियज्ञान, मन, स्मृती, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान, आगम इत्यादी परोक्षज्ञानाने आत्मा उपलब्ध होत नाही. म्हणून आत्म्याला जाणण्यासाठी प्रयोगात्मक उपाय सांगताना आचार्य म्हणतात, इंद्रियांना संयमित करून मनाला एकाग्र करून आपल्या स्वसंवेदन ज्ञानाने आत्म्याला जाणा. इंद्रियाने आत्मा जाणिवेत येऊ शकत नाही. कारण इंद्रियज्ञानाचा विषय मूर्तिक पदार्थ आहे व आत्मा अमूर्तिक आहे. ज्यावेळी आपण ध्यानाला बसतो त्यावेळी आत्म्याला डोळ्यांनी पाहण्याचा प्रयत्न करतो. डोळे बंद असले तरी आत काहीतरी दिसावे असे वाटते. कितीही प्रयत्न केला तरी आत्मा डोळ्यांनी दिसू शकणार नाही. मनसुद्धा सविकल्प भूमिकेमध्ये चिंतन करण्यासाठी बाह्य आलंबन आहे पण निर्विकल्प ध्यानाचे ते साधन नाही. म्हणून डोळे बंद करून, मनाच्याद्वारे विकल्प न करता प्रत्यक्षज्ञानाने चैतन्याचा अनुभव करण्याचा प्रयत्न केला तर चैतन्य अनुभवात येते. **चैतन्याच्या अस्तित्वाची जाणीव होणे हाच स्वानुभव आहे.**

स्वात्मानुभव प्रक्रिया सोपी आहे. कारण ज्या कार्यासाठी साधने कमी लागतात व ज्याची साधने स्वाधीन असतात ते काम आपल्याला सोपे वाटते. लोकातील सोप्यातले सोपे काम करण्यासाठी सुद्धा अनेक साधनांची गरज लागते व ती साधने अत्यंत पराधीन आहेत. परंतु स्वात्मानुभवासाठी जास्त साधनांची गरज नाही. त्यासाठी ज्ञान हे एकच साधन पाहिजे व ते आपल्या पूर्ण स्वाधीन आहे. ज्याचा अनुभव करायचा तो आत्मा आपण स्वयं आहोत व ज्याच्याद्वारे अनुभव करायचा ते साधनसुद्धा आपल्या जवळच आहे. हे आत्मानुभवाचे एकच साधकतम साधन (स्वसंवेदन मति व श्रुतज्ञान) आहे.

परमात्म्याचे तिसरे विशेषण आहे '**ज्ञानानन्दात्मने**'–परमात्मा ज्ञान व आनन्दस्वरूप आहे. कोणत्याही वस्तूला आपण त्याच्या स्वरूपाने जाणतो. ज्याप्रमाणे साखरेला गोडरूपाने, अग्नीला उष्णरूपाने, बर्फाला थंडरूपाने

जाणतो. त्याचप्रमाणे परमात्म्याला ज्ञान व आनन्दरूपाने जाणले पाहिजे.

परमात्मा आपल्यामध्येच असताना अज्ञानी व्यर्थ बाहेर शोधतो. निजतत्त्व अत्यंत जवळ असून दूर झाले आहे. ज्यावेळी ज्ञानी होऊन आपल्यामध्ये परमात्मतत्त्व पाहतो त्यावेळी त्याला लक्षात येते की, ओहो! हेच तर ज्ञानानन्दमय तत्त्व आहे. एवढ्याजवळ असूनही मी विनाकारण अनंतकाळ भटकलो. संपूर्ण जिनवाणी या निजज्ञानानंद स्वभावाला दाखविण्यासाठीच रचली गेली आहे.

एकदा एका व्यक्तीला तत्त्व समजून घेण्याची जिज्ञासा झाली. तो जंगलामध्ये एका साधुजवळ गेला व त्याने त्यांना तत्त्वाचे स्वरूप विचारले. साधूने त्याला थोडक्यात तत्त्व सांगितले, 'एक आत्म तत्त्व सर्वश्रेष्ठ आहे, तेच शाश्वततत्त्व आहे, अन्य सर्व मायाजाल आहे. अस्थिर आहे, साधूचा उपदेश त्याला रुचला. त्याने पुन्हा पुढे जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. साधूंनी सांगितले 'अधिक विशेष जाणून घेण्याची इच्छा असेल तर कोण्या पंडितजीजवळ जाऊन शिक.' तो एका पंडितजीकडे जाऊन शिकू लागला. पूर्वीच्याकाळी शिकण्याच्या मोबदल्यात गुरूंना सेवा द्यावी लागत असे. याला गोठ्यामध्ये शेण काढून शेणी थापण्याचे काम दिले. रोज शेणी थापून पंडितजीकडे १२ वर्षेपर्यंत शिकला. शेवटी सर्व ग्रंथांचा सार विचारला तर उत्तर मिळाले 'एक आत्मतत्त्वच उपादेय आहे, शेष सर्व अध्रुव आहे.' त्याला खेद झाला की हे तत्त्व तर साधुकडूनच समजले होते. मी व्यर्थच १२ वर्षे शेण्या थापल्या.

परमात्मा बाहेर नाही. मीच स्वयं स्वभावाने ज्ञानानन्दस्वरूप परमात्मा आहे. त्या ज्ञानानन्दमय चैतन्यस्वरूप निजआत्म्याची भावना करणे अर्थात अनुभव करणे हाच अद्वैत भावनमस्कार आहे.

'सर्वव्याप्येकचिद्रूपस्वरूपाय' व 'ज्ञानानन्दात्मने' या दोन विशेषणांच्याद्वारे परमात्म्याचे स्वरूप सांगितले आहे व 'स्वोपलब्धिप्रसिद्धाय' या विशेषणाच्याद्वारे परमात्म्याच्या प्राप्तीचा उपाय सांगितला आहे अर्थात जीवनस्वातन्त्र्याची कलाच शिकविली आहे. परमात्म्याचे स्वरूप व उपाय दाखविणारा हा मंगलश्लोक आत्महितकारी आहे.

परमात्म्याला नमस्कार करून अमृतचंद्रदेव अनेकान्तमय तेजाला

अर्थात ज्ञानदात्री सरस्वतीला जयवादरूप नमस्कार करतात.–

हेलोल्लुप्तमहामोहतमस्तोमं जयत्यदः।

प्रकाशयज्जगत्तत्त्वमनेकान्तमयं महः ।।२।।

लीलामात्राने अर्थात सहजपणे नष्ट केले आहे महा मोहरूपी अंधाराच्या समूहाला ज्याने व जगाच्या स्वरूपाला प्रकाशित करणारे हे अनेकान्तमय तेज जयवंत आहे अर्थात सर्वोत्कृष्टरूपाने विराजमान आहे.

या श्लोकात अनेकान्ताचा महिमा गायिला आहे. अनेक अन्त म्हणजे धर्म, ज्यामध्ये परस्परविरोधी अनेक धर्म आहेत त्यास अनेकान्त म्हणतात. सर्व वस्तू अनेकान्तात्मक आहेत. जी वस्तू तत् आहे तीच अतत् आहे, जी एक आहे तीच अनेक आहे, जी सत् आहे तीच असत् आहे, जी नित्य आहे तीच अनित्य आहे. अशाप्रकारे एका वस्तूमध्ये वस्तुत्वाला उत्पन्न करणाऱ्या विरोधी दोन शक्तीचे प्रकाशित होणे अनेकान्त आहे. आत्मा सुद्धा एक वस्तू आहे म्हणून तो सुद्धा अनेकान्तस्वरूपी आहे. अनेकान्तात्मक वस्तूला जाणणारे सम्यग्ज्ञानच वास्तविक अनेकान्तमय तेज आहे. त्यामध्ये सुद्धा संपूर्ण पदार्थांना प्रत्यक्ष प्रतिभासित करणारे केवलज्ञान सर्वोत्कृष्ट तेज आहे. कारण ते अनन्त धर्मसहित आत्मतत्त्वाला प्रत्यक्ष पाहते. भावश्रुतज्ञानसुद्धा अनेकान्तमय तेज आहे. कारण ते सुद्धा अनन्तधर्मस्वरूप आत्मतत्त्वाला स्वसंवेदनप्रत्यक्षाने पाहते. अनेकान्तमय आत्मवस्तूला सांगणारे द्रव्यश्रुतरूप वचनसुद्धा अनेकान्तमय तेज आहे. सारांश रूपाने अनेकान्तस्वरूप ज्ञान व अनेकान्तमय जिनवाणीला येथे नमस्कार केला आहे.

अनेकान्त प्रत्येक वस्तूचा स्वभाव आहे, जे अनेकान्ताचे खंडन करतात ते सुद्धा अनेकान्तमय आहेत आणि ज्यांना अनेकांताचे स्मरणच नाही ते सुद्धा अनेकान्तमय आहेत. प्रत्येक आत्मा स्वद्रव्याने आहे, परद्रव्याने (शरीरादिरूपाने) नाही. स्वक्षेत्राने आहे, परक्षेत्राने नाही. स्वकालाने आहे, परकालाने नाही. स्वभावाने आहे, परभावाने नाही. अर्थात जीव आपल्या द्रव्य, क्षेत्र, काल व भावामध्ये आहे. शरीरादी परद्रव्याच्या द्रव्य, क्षेत्र, काल भावामध्ये नाही. द्रव्य अपेक्षेने एक आहे, नित्य आहे, पर्याय अपेक्षेने अनेक आहे, अनित्य आहे इत्यादी अनंत गुणांनी युक्त आहे. काही ठिकाणी आत्म्याला चैतन्यमात्र, ज्ञानदर्शन मात्र, ज्ञानमात्र म्हटले आहे. कारण हा

ज्ञानभावच सर्व अनंत गुणांचा अभिन्न प्रतिनिधी आहे. सर्व गुणांचा अनुभव ज्ञानामध्ये प्रतिभासित होऊन ज्ञानाद्वारे होतो. म्हणून अनुभवाच्या प्रधानतेने आत्म्याला ज्ञानमात्र म्हटले आहे. याचा अर्थ आत्म्यामध्ये केवळ ज्ञानच आहे असा नाही.

श्लोकामध्ये अनेकान्तमय तेजाची दोन विशेषणे आहेत–'लीलामात्राने, महामोहरूपी अंधाराच्या समूहाला नष्ट करणारे' असे अनेकांत तेज आहे. समर्थ व्यक्तीला कोणतेही कार्य करण्यामध्ये विशेष परिश्रम करावे लागत नाहीत. सर्व काही त्याला सहज वाटते. हे अर्थात लीलामात्राने या शब्दाचा हा अर्थ आहे. अनेकान्तमय चैतन्यतत्त्वाकडे दृष्टी केन्द्रित होताच घनदाट असा मोहान्धकार पूर्णरूपाने विलीन होतो. अनेकान्त हे दृष्टिविकाराला दूर करणारे अंजन आहे. ते ज्ञाननेत्रामध्ये घातले असता दृष्टी निर्मल होऊन वस्तूचे जसे स्वरूप आहे तसे स्पष्ट दिसू लागते. अनेकान्तमय वस्तू दृष्टिक्षेपात येताच मिथ्यात्वरूपी अंधार तत्काल पळून जातो. अनेकान्त हे मिथ्यात्वरूपी विषाचे वमन करविण्याकरिता तीव्र विरेचन आहे. अनेकान्तदृष्टी ही एक संजीवनी आहे की जी या चतुर्गतिरूप अनंतसंसारामध्ये गतप्राण जीवाला जीवनदान देते. जोपर्यंत जीवाची पर्यायबुद्धी असते तोपर्यंत अनादि–अनंत अखण्ड प्रतिभासमय चैतन्यस्वरूप निजतत्त्वाकडे दृष्टी जात नाही. पर्यायाच्या आड लपलेल्या ध्रुवत्वावर अज्ञानीची नजर पडत नाही. ज्या पर्यायामध्ये जातो त्याच पर्यायाशी व तेथील समागमामध्ये तल्लीन होऊन जातो व त्यालाच आपले सर्वस्व मानतो. जेव्हा हा जीव आगम अभ्यासाच्याद्वारे द्रव्यगुणपर्यायात्मक वस्तूला जाणतो तेव्हा पर्यायातील एकत्वबुद्धी सुटून अनेकान्तमय निजशुद्ध चैतन्यतत्त्वाचा अनुभव होतो. अनुभवाचा विषय अनेकान्तमय एकत्वविभक्त निजशुद्धज्ञानानंदस्वभावी आत्मा आहे. जेव्हा अनुभव होतो तेव्हा स्वची अस्ति व पराची नास्ति युगपत प्रतिभासित होते. आत्मानुभव हेच वास्तविक अनेकांतमय तेज आहे. अनेकांतमय सूर्य संशय, विपर्यय व अनध्यवसायरूप गहन अंधकाराला नष्ट करूनच प्रकट होतो. या सूर्याचा उदय झाला असता आनंदगुणरूपी कमळ सहजच विकसित होते अर्थात अतीन्द्रिय आनंदाची प्राप्ती होते. आपल्या जीवनातील अज्ञान अंधकाराला नष्ट करायचे असेल तर नित्य अनेकांतमय सूर्याची उपासना

करावी लागेल. दूसरा तरणोपाय नाही.

अनेकांतमय तेजाचे दूसरे विशेषण आहे '**जगत्तत्त्वं प्रकाशयत्**' अर्थात संसारातील संपूर्ण तत्त्वांना प्रकाशित करते. जगामध्ये जाती अपेक्षेने द्रव्य सहा आहेत. संख्या-अपेक्षेने अनंत आहेत. प्रत्येक द्रव्याचे गुण अनंत आहेत. प्रत्येक गुणाचे पर्याय अनंत आहेत. त्या सर्व द्रव्यगुणपर्यायांना केवलज्ञानरूपी अनेकांतमय तेज प्रत्यक्ष प्रकाशित करते, भाव श्रुतज्ञान परोक्षरूपाने प्रकाशित करते व द्रव्यश्रुत वचनाच्या माध्यमातून प्रकाशित करते.

सर्व वस्तूंना जाणून घेण्याची जिज्ञासा असेल तर द्रव्यश्रुताचा (शास्त्राचा) अभ्यास हा प्राथमिक उपाय आहे. द्रव्यश्रुताच्याद्वारे सर्व वस्तूंचे स्वरूप जाणले असता भावश्रुतज्ञानाच्याद्वारे सर्ववस्तूंना परोक्षरूपाने पाहतो. भावश्रुतज्ञानाने जाणले असता केवलज्ञान प्रगट होऊन समस्त पदार्थांना प्रत्यक्ष पाहतो. '**तम्हा सत्थं समधिदव्वं**' म्हणून शास्त्रांचे सम्यक्रीतीने अध्ययन करावे असे कुन्दकुन्दाचार्य पुढे स्वयं सांगणार आहेत. आगमचक्षूच्याद्वारेच स्वपराचा विभाग करून महामोहाचा नाश करून जीव सर्वत:चक्षू (सर्वज्ञ) होतो. म्हणून आगमाभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या जीवनात शास्त्राभ्यासाला प्राथमिक स्थान दिले पाहिजे. जसे शरीरासाठी रोज भोजन आवश्यक आहे तद्वत् आत्म्यासाठी रोज शास्त्राभ्यासरूपी भोजन आवश्यक आहे. प्रत्येकांनी आपल्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करण्यासाठी शास्त्राच्या अभ्यासाचा संकल्प करावा की दररोज मी शास्त्रस्वाध्याय करीन. त्यामुळे आपलेच जीवन उजळून निघणार आहे. यामध्ये पूर्ण फायदा आपलाच आहे. हे अनेकांतमय तेज अधिकात अधिक प्राप्त होण्यासाठी प्रयत्नशील राहूया.

श्री जयसेनाचार्य मंगलश्लोकामध्ये सिद्धपरमेष्ठींना नमस्कार करतात-

नम: परमचैतन्यस्वात्मोत्थसुखसम्पदे।
परमागमसाराय सिद्धाय परमेष्ठिने।।

उत्कृष्ट चैतन्यस्वरूप आपल्या आत्म्यापासून उत्पन्न झालेले सुख हीच ज्यांची संपदा आहे व जे परमागमाचे सारभूत आहेत अशा सिद्ध परमेष्ठींना नमस्कार असो.

येथे सिद्धपरमेष्ठींची दोन विशेषणे आहेत.- प्रथम विशेषण आहे

'परमचैतन्यस्वात्मोत्थसुखसम्पदे।' आपल्या परमचैतन्यमय आत्म्यापासून उत्पन्न सुखरूपी संपत्तीवाले सिद्ध भगवान आहेत. जेव्हा हा जीव स्वत:ची अकिंचनस्वरूपाने भावना करतो की या जगामध्ये माझे काहीही नाही व मी कुणाचाही नाही तेव्हा तो खरा श्रीमंत होतो अशी ही विलक्षण किमया आहे. जेव्हा हा जीव निजसंपत्तीवर आपला पूर्ण अधिकार दाखवतो व पराच्या अर्थात कर्माने दिलेल्या संपत्तीची थोडीही इच्छा ठेवत नाही तेव्हा या जीवाला आपले पूर्ण वैभव प्राप्त होते. अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुख, अनंतवीर्य हेच जीवाचे निजवैभव आहे. हे वैभव इतके पुरेसे आहे की अनंतकाळापर्यंत याचा भोग घेतला तरी ते संपणार नाही. यामध्येही 'सुख' ही सर्वात मोठी संपदा आहे.

अज्ञानी जीवाला वाटते की स्त्री, पुत्र, मित्र, सोनं, चांदी, रत्न, हीरे, माणिक, गाडी, बंगला ही आपली संपत्ती आहे. ही संपत्ती ज्याच्याजवळ जास्त तो स्वत:ला तितका मोठा श्रीमंत मानतो, म्हणून रात्रंदिवस त्याचा संग्रह करण्यामध्ये आपली पूर्ण शक्ती पणाला लावतो. परंतु जे या संपत्तीच्या पाठीमागे लागले आहेत त्यांना एकच प्रश्न विचारावा की तुम्ही या संपत्तीच्या मागे का लागला आहात अर्थात ही संपत्ती कशासाठी पाहिजे. सर्वांचे अखेर एकच उत्तर मिळेल 'सुखासाठी'– सुखसंपत्ती प्राप्त करण्यासाठीच ह्या बाह्य संपत्तीच्यामागे सर्वजण वेडे झाले आहेत. परंतु जगातील सर्व संपदा प्राप्त झाली तरी आजपर्यंत कोणी सुखी झालेला दिसत नाही. कारण सुखसंपत्ती प्राप्त करण्याचे ते स्थान नाही. चिरमुऱ्याच्या दुकानात जाऊन रत्ने कशी प्राप्त होतील? सुखाची व बाह्यवैभवाची व्याप्ती नाही. ज्याच्याजवळ जास्त वैभव आहे तो जास्त सुखी, कमी वैभव आहे तो कमी सुखी. ज्याच्याजवळ काहीच नाही तो पूर्ण दु:खी अशी व्याप्ती दिसून येत नाही. उलट ज्यांच्याजवळ काही नाही असे निर्ग्रन्थ दिगम्बर सन्त परमसुखी दिसून येतात व एखादा विश्वविजेता सम्राटसुद्धा दु:खी दिसून येतो. सुखाची खान आहे सुखरसाने परिपूर्ण ओथंबलेला 'निजचैतन्यरत्नाकर' या चैतन्यसागरामध्ये आकण्ठ निमग्न झाल्यामुळेच सिद्धांना सुखसंपदा प्राप्त झाली आहे. म्हणून आपल्याला पण सुख हवे असेल तर आपल्या अन्तस्तत्त्वामध्येच डुबकी मारावी लागेल.

सिद्धांचे दूसरे विशेषण आहे 'परमागमसाराय' सिद्ध परमेष्ठी हे

परमागमाचे सार आहेत. द्वादशांग जिनवाणीचा विस्तार एक परमात्मपदाच्या प्राप्तीसाठीच झाला आहे. या जीवाला संसारदु:खातून सोडवून परमपदामध्ये पोहोचविणे हेच परमागमाचे प्रयोजन आहे.

ज्याप्रमाणे दूधाचा सार तूप आहे, वृक्षाचे सार फळ आहे, त्याप्रमाणे परमागमाचा सार सिद्ध अवस्था आहे. महिला दूधातून तूप प्राप्त करण्यासाठी किती प्रयत्नशील असतात. दूधाला प्रथम मंद आचेवर तापवून त्याला चांगली साय येऊ देतात. आलेली साय सावधानपणे दुसऱ्या भांड्यात काढून विरजन लावून जमवितात. जमल्यानंतर त्याला रवीने घुसळून घुसळून त्यातून लोणी काढून तूप बनवितात. तद्वत् आपल्याला सुद्धा परमागमातून सारभूत सिद्ध अवस्था प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील व्हावे लागेल. प्रथम प्रयत्नपूर्वक परमागमाचा अभ्यास करावा. त्यातील सारभाग पात्रामध्ये (जीवादि ७ प्रयोजनभूत तत्त्वे) सावधानपणे बाजूला काढावा. आपल्या हृदयरूपी पात्रामध्ये तर्कबुद्धीचे विरजन सोडून जमवावे. जमल्यानंतर वारंवार त्याचे मंथन करून त्यातून रत्नत्रयरूपी लोणी प्राप्त करावे. त्या रत्नत्रयरूपी लोण्याला तापवले की पुढे सिद्ध अवस्थारूपी तुपामध्ये त्याचे रूपांतर होईल. तुम्हा आम्हा सर्वांना परमागमाची सारभूत सिद्ध अवस्था प्राप्त होवो हीच मंगलभावना आहे.

श्री कुन्दकुन्द आचार्यदेव ग्रन्थाच्या प्रारंभी ५ गाथांद्वारे पंचपरमेष्ठींना नमस्कारपूर्वक मंगलाचरण करून साम्यभावाला प्राप्त होण्याची प्रतिज्ञा करतात. सर्वप्रथम परम भट्टारक, महादेवाधिदेव, परमेश्वर, प. पू. वर्तमान शासननायक श्री वर्धमान तीर्थंकरांना नमस्कार करतात. श्री महावीर प्रभूंचे या काळातील भव्य जीवांवर अनंतानंत उपकार आहेत. जर प्रभूंनी दिव्यध्वनीद्वारे दु:खहर, हितकर व सुखकर असे धर्मामृत पाजले नसते तर आमच्यासारखे अज्ञानी जीव धर्ममय जीवन कसे जगू शकले असते? म्हणून जिनवाणी स्तुतीमध्ये म्हटले आहे–

श्री जिनकी धुनि दीपशिखा सम ज्यों नहीं होत प्रकाशनहारी ।
तो किस भांति, पदारथ पांति, कहां लहते रहते अविचारी ।।

दीपशिखेप्रमाणे प्रकाश देणारी श्री जिनेंद्र भगवंतांची दिव्यध्वनी जर खिरली नसती तर आम्ही पदार्थांच्या यथार्थस्वरूपाला कसे प्राप्त झालो

असतो? अविचारीच राहिलो असतो. या उपकाराची जाणीव ठेवूनच येथे वर्धमान तीर्थंकरांना प्रथम नमस्कार केला आहे. प्रवासाला जाताना आपण रस्ता चुकलो असता एखाद्या वाटसरूने योग्य रस्ता दाखविला तर त्याचे आपण किती उपकार मानतो, त्याला धन्यवाद देतो. त्याबद्दल अंतरंगामध्ये सहज बहुमान येतो. अनादी काळापासून संसाराचा प्रवास करताना आपण रस्ता चुकलोच आहोत. मोक्षमार्गावर आरूढ असणाऱ्या वीरप्रभूंनी आपल्याला योग्य हिताचा मार्ग दाखविला आहे तर त्यांच्याबद्दल अंतरंगामध्ये किती बहुमान आला पाहिजे!

ज्याप्रमाणे नारळाचे झाड लहानपणी मालकानी दिलेल्या थोड्याशा पाण्याची आठवण ठेवून आपल्या मस्तकावर शेकडो नारळांचे ओझे सहन करून आयुष्यभर मालकाला अमृताप्रमाणे मधुर पाणी देते. त्याप्रमाणे साधू पुरुष केलेल्या उपकाराला कधीही विसरत नाहीत. **'न हि कृतमुपकारं साधवो विस्मरन्ति'।**

ज्याप्रमाणे निगोदादी अवस्थांमधून मनुष्य पर्याय प्राप्त होणे दुर्लभ आहे त्याप्रमाणे सर्व गुणांमध्ये 'कृतज्ञता' हा गुण अत्यन्त दुर्लभ आहे, असे सर्वार्थसिद्धिकार श्रीपूज्यपाद आचार्य म्हणतात.

कृतज्ञतेला प्रकाशित करणारा तो मंगलश्लोक पुढीलप्रमाणे आहे.-

एस सुरासुरमणुसिंदवंदिदं धोदघाइकम्ममलं।
पणमामि वड्ढमाणं तित्थं धम्मस्स कत्तारं।।१।।

अन्वयार्थ – (एस) हा मी **(सुरासुरमणुसिंदवंदिदं)** सुरेन्द्र, असुरेन्द्र व नरेन्द्रांकडून वंदित तसेच **(धोदघाइकम्ममलं)** ज्यांनी घातिकर्मरूपी मल धुऊन टाकला आहे अशा **(तित्थं)** तीर्थरूप आणि **(धम्मस्स कत्तारं)** धर्माचे कर्ते असणाऱ्या **(वड्ढमाणं)** श्री वर्द्धमान स्वामींना **(पणमामि)** नमस्कार करतो.

श्लोकार्थ – हा मी, सुरेन्द्र, असुरेन्द्र व नरेन्द्रांकडून वन्दित, घाती कर्मरूपी मळाला धुऊन टाकलेल्या, धर्माचे कर्ते व तीर्थरूप श्री वर्धमान तीर्थंकरांना नमस्कार करतो.

'हा' हे सर्वनाम समोर असलेल्या प्रत्यक्ष वस्तूसाठी वापरले जाते. जसे-हे घर, हा पेन, हे मंदिर इ. गाथेमध्ये आचार्यांनी प्रथम शब्द 'एस'

ठेवलेला आहे. 'एस' म्हणजे हा. हा मी आत्मा. हा या शब्दावरून आचार्यांना सांगायचे आहे की ज्ञानदर्शनस्वरूपी आत्मा स्वसंवेदनप्रत्यक्ष आहे. आपण आपल्या प्रत्यक्षज्ञानाने आपल्या आत्म्याला जाणू शकतो. 'हा' शब्द येथे मनुष्यादी पर्यायांचा वाचक नाही तर ध्रुव आत्म्याचा वाचक आहे. जेव्हा आचार्य आत्मानुभवातून बाहेर आले तेव्हा म्हणतात की जो आता अनुभवात आला होता तो हा मी आत्मा विकल्पभूमिकेमध्ये वर्धमानांना नमस्कार करतो. कुन्दकुन्दाचार्य स्वत:ला कुन्दकुन्दमुनी मानत नाहीत तर स्वत:चा परिचय देताना ते म्हणतात 'अहमेक्को खलु सुद्धो'..मी एक शुद्ध ज्ञानदर्शनस्वरूपी, अमूर्तिक, चेतन, जीवद्रव्य आहे. हा म्हणजे स्वानुभवप्रत्यक्षाने अंतरंगामध्ये जाणीवेत येणारा ध्रुवशुद्ध आत्मा. या गाथेत अत्यंत मौलिक अशा चार विशेषणांच्या माध्यमातून आचार्य वर्धमान तीर्थंकरांविषयीची आंतरिक भक्ती व्यक्त करतात. त्यातील पहिले विशेषण आहे–

१) **'सुरासुरमणुसिंदवंदिदं'** सुरेन्द्र, असुरेन्द्र व मनुष्येंद्राकडून वंदित. सुरेंद्र ऊर्ध्वलोकाचे स्वामी, असुरेन्द्र अधोलोकाचे स्वामी व मनुष्येंद्र अर्थात चक्रवर्ती मध्यलोकाचे स्वामी आहेत, अशाप्रकारे तिन्ही लोकांचे इन्द्र ज्यांना नमस्कार करतात असे हे महान व्यक्तित्वशाली महापुरुष आहेत.

एखादा व्यक्ती अतिसज्जन असूनसुद्धा जोपर्यंत चार चौघे प्रतिष्ठित मंडळी त्याला मान देत नाहीत, त्याचा आदर सत्कार करीत नाहीत तोपर्यंत सामान्य जनतेला त्याची किंमत कळत नाही. ज्यांच्याजवळ मोठमोठे धनी व्यक्ती येतात त्यांची किंमत जगाला वाटते. या पंचम काळात वीतराग भगवान व त्यांच्या चरणावर झुकलेले तिन्ही लोकाचे इन्द्र प्रत्यक्ष पाहायला मिळत नाहीत, म्हणून सामान्य लोकांना प्रतीती येण्यासाठी हे विशेषण आचार्यांनी दिले आहे. विचार तर करा ज्यांच्याजवळ दमडीसुद्धा नाही अशा अकिंचनस्वरूपी नग्न दिगम्बर साधूंच्या चरणावर बाह्यवैभवाने सर्वश्रेष्ठ असणारा स्वर्गातील इन्द्रसुद्धा नतमस्तक होतो हे कशाचे प्रतीक आहे? यावरून आपल्या लक्षात येते की बाह्यवैभवामुळे जीवाचे मोठेपण नाही तर आत्मवैभवामुळेच जीवाचे मोठेपण आहे. **जोडण्यामध्ये पुरुषार्थ नाही तर सोडण्यामध्येच महान पुरुषार्थ आहे. जो सोडत जातो तो मोठा होतो व जो जोडत जातो तो छोटा होतो. भोगात आनन्द नाही तर त्यागात आनन्द आहे.**

जो परिग्रह रहित होतो तो हलका होऊन वर स्वर्गमोक्षामध्ये जातो व जो परिग्रह सहित आहे तो भारी होऊन खाली नरक निगोदामध्ये जातो. जी काही विश्वव्यवस्था आहे ती सर्व न्यायोचित आहे. जो जसा आहे, त्याला तशाप्रकारचे स्थान आपोआप प्राप्त होते. षट्खंडाचा अधिपती चक्रवर्ती परिग्रहाचा त्याग न करता परिग्रहामध्ये आसक्त होऊन प्राण सोडतो तर नियमाने नरकात जातो. हा कायदासुद्धा आपल्याला हेच शिकवितो की **परिग्रह पापाचे घर आहे. परिग्रहामुळे हानी आहे. लाभ नाही. जो अंतर्बाह्य सर्व परिग्रहाचा त्याग करतो तो जगत्पूज्य होतो.** आत्मानुशासन ग्रंथामध्ये गुणभद्र आचार्यांनी त्रिलोकाधिपती होण्याचे रहस्य सांगितले आहे. ते असे –

अकिंचनोऽहमित्यास्व त्रैलोक्याधिपतिर्भव।
योगिगम्यं तव प्रोक्तं रहस्यं परमात्मनः।।

आचार्य म्हणतात, मी अकिंचन आहे या भावनेमध्ये तू रहा म्हणजे त्रिलोकाचा स्वामी होशील. या रहस्याला जाणूनच वर्धमान त्रिलोकपूज्य झाले.

२) वर्धमान तीर्थंकरांचे दूसरे विशेषण आहे– '**धोदघाइकम्ममलं**' अर्थात त्यांनी घातिकर्मरूपी मळाला धुऊन टाकले आहे. त्यांचा आत्मा मलरहित पवित्र झाला आहे. ज्याप्रमाणे शरीराला किंवा कपड्याला मळ लागलेला असेल तर आपण बेचैन होतो. कधी एकदा मळ काढून टाकू असे होते. मळ दूर झाला की स्वस्थतेचा व आनंदाचा अनुभव करतो. त्याचप्रमाणे जोपर्यंत आपल्या आत्म्याला कर्मरूपी मळ चिकटलेला आहे तोपर्यंत आपला आत्मा बेचैन व अस्वस्थ राहणार. जेव्हा आपण हा कर्मरूपी मळ दूर करू त्याचवेळी स्वस्थ व आनंदी होणार. मळ हळूहळू क्रमाने दूर होतो. कपड्याशी एकरूप झालेला ग्रीस व वंगणादिकाचा लागलेला मळ एका दिवसांत निघून जात नाही. त्याला दररोज घासून दूर करण्याचा आपला पुरुषार्थ कपडा फाटेपर्यंत चालू असतो. त्याचप्रमाणे आत्म्याला लागलेला हा भावकर्मरूपी मळ एकदम जाणार नाही; परंतु त्यासाठी नित्य पुरुषार्थ करीत राहिलो तर क्रमशः मिथ्यात्व, अनंतानुबंधी, अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान व संज्वलन कषायरूपी मळ थोडा थोडा दूर होऊन एक दिवस मलरहित निर्मल परमात्मा बनू.

गुणस्थाने म्हणजे आत्मारूपी वस्त्राला धुण्याची प्रक्रियाच आहे. आत्मारूपी वस्त्र ध्यानरूपी पाणी व भेदविज्ञानरूपी साबणानेच स्वच्छ होते. 'वीरप्रभूंनी' हे मळ दूर करण्याचे कार्य सिंहपर्यायापासून ते महावीर होईपर्यंत १० भवांमध्ये केले. आपण या भवात तरी हे काम सुरू करू तर ते एकदिवस पूर्णत्वाला प्राप्त होईल. कार्याची सुरवातच नसेल तर समाप्ती कशी होणार. **जेथे सुरवात आहे तेथे पूर्णता आहे**. आत्महितासाठी सर्व सामग्री प्राप्त झाली असतानासुद्धा जर आपण आत्महित करणार नाही तर कोणत्या भवात करणार?

घातिकर्म दोन प्रकारचे आहे – १) भावघातिकर्म व २) द्रव्यघातिकर्म अज्ञान, मिथ्यात्व, कषायभाव हे भावघातिकर्म आहेत व ज्ञानावरणादिरूपाने परिणमलेले कर्मपरमाणू द्रव्यघातिकर्म आहेत. आपला घात करणारा खरा शत्रू भावघातिकर्म आहे. द्रव्यघातिकर्म तर बिचारे जड अचेतन आहेत. ते आपला घात करण्यास समर्थ नाहीत. भावघातिकर्मेच आपल्या हितामध्ये बाधक आहेत. त्यांना आपल्या वश केले तर कर्मावर विजय प्राप्त करणे सुलभ आहे; परंतु या भावकर्मावर विजय प्राप्त करणेच अत्यंत दुर्लभ आहे. उपाय सोपा आहे. आपण आपल्या संपत्तीवर हक्क साबित केला की हे परकीय शत्रू आपोआप पळून जातात. हा भावकर्मरूपी शत्रू जगातील सर्व जीवांना अधीन करून सम्राट होऊ इच्छितो. बहुभाग जीव या कषाय शत्रूच्या अधीन आहेत म्हणून त्याला गर्व झाला आहे. परंतु असा एखादा पुरुषार्थी शूरवीर उत्पन्न होतो की तो या कर्मशत्रूंचे हनन करून विजय प्राप्त करतो. ज्या शत्रूचा नाश करणे आपल्याला अद्यापि जमले नाही त्या शत्रूचा नाश जर इतरांनी केला तर आपल्याला सहजच आनंद होतो व त्या शत्रूविजेत्याबद्दल सहजच बहुमान येतो. ज्या भावघातिकर्मांचा नाश आपण करू शकलो नाही त्यांचा नाश वर्धमान तीर्थंकरांनी केला आहे म्हणून ते महावीर आहेत, पूज्य व आदरणीय आहेत.

३) वर्धमान भगवान **तीर्थरूप** आहेत. '**तीर्यतेऽनेनेति तीर्थम्**' – ज्याद्वारे जीव तरून जातो त्यास तीर्थ म्हणतात. जी वस्तू स्वयं तरते तीच दुसऱ्याला तारू शकते. ज्याप्रमाणे फुटलेली नाव किंवा दगडाची नाव स्वयं तरत नाही म्हणून दुसऱ्यांना सुद्धा तारू शकत नाही. ती स्वयं समुद्रामध्ये बुडते व दुसऱ्या आश्रितांनाही बुडविते. त्याचप्रमाणे जे स्वयं संसारसमुद्रातून तरून गेले तेच

दुसऱ्यांना तारू शकतात. आपण पत्राच्या सुरवातीला तीर्थरूप आईस किंवा तीर्थरूप बाबास, मामास, काकास इत्यादी लिहितो. तीर्थरूप या शब्दाचा अर्थ न समजताच रूढीने लिहित असतो. जे स्वयं संसारसमुद्रामध्ये बुडलेले आहेत व आपल्यालासुद्धा संसारामध्ये बुडण्याचाच उपदेश देतात ते तीर्थरूप कसे असू शकतील? पिता आदिनाथ हे खऱ्या अर्थाने तीर्थरूप बाबा होते. ते स्वयं संसारसागरातून पार झाले व आपल्या सर्व अपत्यांनाही (मुलामुलींनाही) संसारातून पार केले. तीर्थरूप या शब्दामध्ये खूप रहस्य भरलेले आहे.

वीतराग प्रभूंचे जीवनच स्वयं तीर्थरूप आहे. त्यांना उपदेश देण्याची पण गरज नाही. त्यांच्या जीवनाचा आदर्श दृष्टीसमोर ठेवून भव्यजीव सहजपणे तरून जातात. ज्याप्रमाणे नदीवर पूल बांधलेला असेल तर आपल्याला हायसे वाटते. धैर्य येते की आता आपण नदी सहज पार करू शकतो त्याप्रमाणे निर्दोष प्रभूंना पाहिल्यावर धैर्य वाटले पाहिजे की आता मला भवाभवामध्ये गोते खावे लागणार नाहीत. मला तरण्याचा उपाय प्राप्त झाला आहे. ज्याप्रमाणे पूल किंवा नावेला पाहिल्यावर ही तारणारी वस्तू आहे असे त्याचे स्वरूप भासित होते त्याप्रमाणे अरिहंत प्रभूंना पाहिल्यावर ही तारणारी वस्तू आहे असे आपणास भासित झाले पाहिजे. भगवान स्वयं मुक्त झाले व त्यांच्या सदुपदेशाने अनेक भव्य जीव मोक्षमार्गावर आरूढ झाले अशी ही 'तरणतारण भवाब्धिनौका' आहे.

'आप तरे पर तारहि ऐसे श्री ऋषिराज।' या असार संसारात वीतराग सर्वज्ञदेव, वीतरागप्रणीत जिनवाणी व निर्ग्रन्थगुरूच तीर्थरूप आहेत; दुसरे कोणीही नाही.

४) भगवान **धर्माचे कर्ता** आहेत. धर्म म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपामध्ये वृत्ती. त्यांनी प्रथम स्वत: शुद्धस्वरूपामध्ये विश्रान्ती केली, त्यामुळे स्वयं स्वत:च्या धर्माचे कर्ता आहेत. ते स्वयं धर्मरूप परिणमले व संसारीजीवांना या खऱ्या धर्माचा, सन्मार्गाचा, कल्याणाचा मार्ग दाखविला. प्रथम स्वत:च्या गुणांचा विकास केला व नंतर त्याचा उपदेश केला, म्हणून ते धर्माचे कर्ते आहेत. अशा पूर्वोक्त विशेषणांनी विशिष्ट भगवान वर्धमान तीर्थंकरांना नमस्कार असो.

प्रवचनसार ग्रन्थाच्या प्रत्येक गाथेतून आपल्याला स्वतन्त्र जीवन जगण्याची कला शिकायला मिळते. स्वतन्त्रता सर्व जीवांना प्रिय आहे.

प्रत्येक जीवाच्या हालचालीचे सूक्ष्म निरीक्षण केले असता आपल्या लक्षात येईल की प्रत्येक जीव स्वतन्त्र होण्यासाठी धडपडत आहे. मुलाला वाटते वडिलांच्या जीवावर न जगता स्वावलंबी बनावे. सुनेला वाटते सासूच्या आधीन न राहता स्वतंत्रपणे संसार थाटावा. पत्नीला वाटते पतीहून स्वतंत्र नोकरी करून आपल्या पायावर उभे राहावे. नोकराला वाटते मालकाची अधीनता सोडून स्वतंत्र धंदा करावा. शिष्याला वाटते गरूचा आधार न घेता स्वत:ला ज्ञान व्हावे. पक्षी पिंजऱ्यात राहू इच्छित नाहीत व पशु गोट्यात बंधनात राहू इच्छित नाहीत. कारण पराधीनतेसारखे दुसरे दु:ख या जगात नाही व स्वाधीनतेसारखे दुसरे सुख नाही.

बंधनातून सुटण्यासाठी प्रतिक्षण धडपडत असतानाही बंधनातून का सुटत नाही? हा प्रश्न आहे. बंधनाचे कारण शोधत नाही. नुसते मनमानेल तसे प्रयत्न करीत राहतो. स्त्री स्वातन्त्र्य, देशस्वातन्त्र्य पाहिजे म्हणून संप करतो. रॅली काढतो. स्वतन्त्रता, स्वतन्त्रता म्हणून घोषणा देतो. पोपटासारखे फक्त स्वतन्त्रता शब्द उच्चारायला तेवढे आपण शिकलो; परन्तु स्वतन्त्रता शब्दाचे भावभासन कधीही करून घेतले नाही.

एका धनाढ्य शेटजींनी पोपट पाळले होते. त्यांच्याकडे येणाऱ्या पुरोहिताने त्या पोपटाला 'स्वतन्त्रता' हा शब्द बोलायला शिकविला होता. कोणीही बंगल्यात शिरले की तो पोपट 'स्वतंत्रता' हा शब्द म्हणून दाखवत असे. त्याची शीळ ऐकून सर्वच येणारे त्याला प्रतिसाद देत. पुढे पुढे पोपट स्वतंत्रता हा शब्द इतक्या आर्ततेने म्हणे की, ऐकणाऱ्याला त्याची कीव येई. एकदा तर पोपट तो शब्द म्हणत नाचू लागला. बागडू लागला. त्याची देखभाल करणाऱ्या नोकराला त्याची दया आली. त्याच्या मनात आले, पोपटाला आपण मुक्त करावे.

दुसऱ्या दिवशी सकाळी शेटजी उठायच्या आधी नोकराने पिंजऱ्याचे दार उघडले आणि पोपटाला जाण्यास सांगितले, पण पोपट बाहेरच यायला तयार होत नव्हता. शेवटी नोकराने बळजबरीने पोपटाला बाहेर काढले. पोपट तिथेच घुटमळत राहिला. तो गांगरला होता. कोठे जावे त्याला कळेना. शेवटी नोकराने त्याला हाकलले. पण पोपट उडाला आणि पिंजऱ्यात येऊन त्याने दार लावून घेतले. आत येताच तो परत 'स्वतंत्रता', 'स्वतंत्रता' म्हणत बागडू

लागला.

अशीच आपली पण कथा आहे. पोपटाच्या मूर्खतेचे आपल्याला हसू येते, पण त्या पोपटापेक्षासुद्धा आपण महामूर्ख आहोत, याची संसारी जीवांना जाणीव नाही. सासू, स्त्रीपुत्र, मालक इत्यादींचे बंधनच आपल्याला बंधन वाटते पण शरीराचे बंधन हे बंधन वाटत नाही. वास्तविक ही बाहेरची बंधने शरीरामुळेच तर आहेत. शरीरच नसते तर या अमूर्तिक आत्म्यावर कोण बंधन घालू शकले असते. शरीरापेक्षासुद्धा द्रव्यकर्माचे बंधन बलवान आहे. कारण कर्मच नसते तर या शरीराची उत्पत्तीच झाली नसती. औदारिकादी शरीर नामकर्माच्या उदयाने शरीर प्राप्त होते म्हणून शरीर कर्माधीन आहे. द्रव्यकर्मापेक्षासुद्धा मोठे बंधन भावकर्माचे अर्थात मोह रागद्वेषाचे बंधन आहे. कारण जीवाला मोह राग द्वेष झाले नसते तर द्रव्यकर्माचा बंध झालाच नसता. जीवाच्या मोह, राग, द्वेष, अज्ञानरूप परिणामांना निमित्त करूनच कार्मण वर्गणा ज्ञानावरणादी कर्मरूपाने परिणमतात. यावरून हे सिद्ध होते की **सर्व बंधनाचे मूळ मिथ्यात्व, अज्ञान व कषायभाव आहे.** जीव स्वत:च्या अपराधामुळेच बंधनामध्ये जखडला गेला आहे. या जीवाने मिथ्यात्व, अज्ञान व **कषायभावरूपी अपराध केला म्हणून कर्मरूपी पोलिसांनी त्याला शरीररूपी कारागृहामध्ये बंदिस्त करून स्त्रीपुत्रादिरूप बेड्या घातल्या आहेत.**

संसारी जीवांना बंधनाचे व स्वतन्त्रतेचे स्वरूपच यथार्थ भासित होत नाही म्हणून बंधनातून सुटत नाही. वर्धमान तीर्थंकरांनी भावकर्म, द्रव्यकर्म व नोकर्मापासून भिन्न असणाऱ्या आपल्या स्वतन्त्र स्वभावाला ओळखले म्हणून सर्व कर्मबंधनाचा समूळ नाश करून स्वतन्त्र झाले. तीर्थंकरांसारखे सातिशय पुण्य या लोकात दुसऱ्या कोणालाही प्राप्त होत नाही. त्या सातिशय पुण्याच्या योगाने प्राप्त झालेल्या सर्वधन वैभवामध्ये त्यांनी परतंत्रतेचा अनुभव केला. पुण्याने प्राप्त झालेली जड संपत्ती माझी नाही, मी तर अनंतगुणांच्या वैभवाने संपन्न सम्राट आहे, या जड वैभवाच्या अधीन होण्याची मला गरज नाही हे त्यांनी जाणले म्हणूनच महापुरुषार्थ करून कर्मबंधनाचा नाश केला व महावीर झाले.

स्व व तन्त्र या दोन शब्दांचा समास होऊन स्वतन्त्र शब्द बनला आहे. स्व म्हणजे आपला आत्मा, तन्त्र म्हणजे अधीन. आत्मा स्वभावाने स्वाधीन

आहे, पण आपल्या स्वतन्त्रस्वभावाला विसरून कषायादी परभावाच्या अधीन झाला आहे. अज्ञानी जीव सर्व बाह्य बंधनातून सुटून स्वतन्त्र महालामध्ये एकटा राहिला तरी स्वतन्त्रतेचा अनुभव करू शकत नाही. कारण तो सदैव विषयकषायाच्या अधीन आहे. याउलट ज्ञानी बाह्य सर्व बंधनामध्ये बद्ध दिसत असला तरीही परिपूर्ण स्वतन्त्रतेचा अनुभव करतो. कारण त्याला आपल्या स्वतन्त्र-स्वभावाची प्रतीती झाली आहे.

हा मी अनादी अनन्त एक अखण्ड ज्ञानानन्द स्वभावी आहे. मी कषायरूप, कर्मरूप किंवा शरीररूप नाही असे अनुभवणे म्हणजेच स्वतन्त्र जीवन जगणे होय. म्हणून आता देशस्वातन्त्र्य, स्त्रीस्वातन्त्र्य मिळविण्यासाठी संप न करता कषाय, कर्म व शरीरापासून स्वतन्त्र होण्यासाठी संप करूया. आत्मस्वातन्त्र्य प्राप्त करण्यासाठी कटिबद्ध होऊया.

'हूँ स्वतन्त्र निश्चल निष्काम ज्ञाता द्रष्टा आतमराम' अशा घोषणा देऊन कर्मपारतन्त्र्यातून मुक्त होऊया. भावकर्म, द्रव्यकर्म व नोकर्मरूपी बंधनापासून भिन्न स्वतन्त्रस्वभावी स्वत:ला जाणणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आपल्याला या गाथेतून शिकायला मिळते. या कलेचा प्रयोग आपल्या जीवनरूपी प्रयोगशाळेत सतत करीत राहिले पाहिजे. मी ज्ञानरूप आहे. क्रोधादिरूप नाही. मी चैतन्यरूप आहे. मी जड कर्मरूप नाही. मी चैतन्यधातुमय ज्ञानशरीरी आहे, मी सप्तधातुमय शरीर नाही अशाप्रकारे आपल्या स्वचैतन्यसत्तेमध्ये स्वतन्त्रतेचा हक्क साबित करून परकीय मालाची होळी केली तर पर्यायामध्ये नक्कीच स्वतन्त्रता मिळवू.

वर्तमान तीर्थनायक श्री महावीर प्रभूंना भावनमस्कार करून आता कुन्दकुन्दाचार्य शेष तीर्थंकरांना, सिद्धांना व श्रमणांना नमस्कार करतात.-

सेसे पुण तित्थयरे ससव्वसिद्धे विसुद्धसब्भावे।
समणे य णाणदंसणचरित्ततवीरियायारे ।।२ ।।

अन्वयार्थ - (पुण) पुन्हा **(विसुद्धसब्भावे)** विशुद्ध अस्तित्वाने संपन्न **(ससव्वसिद्धे)** सर्व सिद्धांनी सहित **(सेसे तित्थयरे)** शेष तीर्थंकरांना **(य)** आणि **(णाणदंसण चरित्ततवीरियायारे)** ज्ञानाचार, दर्शनाचार, चारित्राचार, तपाचार व वीर्याचाराने युक्त **(समणे)** श्रमणांना (आचार्य, उपाध्याय, साधूंना)

नमस्कार करतो.

मी सर्वसिद्धसहित विशुद्ध सत्तारूप शेष तीर्थंकरांना आणि ज्ञान, दर्शन, चारित्र, तप व वीर्यरूप पंचाचाराने युक्त श्रमणांना नमस्कार करतो.

'प्रणमामि' हे पद पहिल्या गाथेतून अध्याहत घ्यावे. शेष तीर्थंकर या पदाने वृषभदेवापासून ते पार्श्वनाथापर्यंतचे २३ तीर्थंकर विवक्षित आहेत. कारण पहिल्या गाथेमध्ये वर्तमान २४ वे तीर्थंकर श्री महावीर भगवंतांची वन्दना केली आहे. ज्यांना आपण वर्तमान २४ तीर्थंकर म्हणतो ते सध्या सिद्ध अवस्थेला प्राप्त आहेत. तरी सुद्धा त्यांची तीर्थंकर अरिहंतरूपाने उपासना केली आहे. कारण त्यांच्या उपदेश परंपरेचा आमच्यावर महान उपकार आहे. प्रत्येक तीर्थंकरांनी आपापल्या काळात जर धर्मतीर्थाचा उपदेश दिला नसता तर ही धर्माची परंपरा जीवंत राहिली नसती. सर्व तीर्थंकरांनी अनादि जिनशासनाची परंपरा टिकवून ठेवली आहे.

सर्व तीर्थंकर विशुद्ध सद्भावयुक्त आहेत. सद्भाव म्हणजे अस्तित्व. सर्व तीर्थंकरांचे अस्तित्व परमशुद्ध आहे. कोणतीही वस्तू आपल्या स्वभावरूप असेल तर शुद्धच असते. ज्याप्रमाणे पाणी आपल्या स्वभावरूपाने शुद्धच असते. ज्यावेळी त्यामध्ये मातीचे अथवा मळाचे मिश्रण होते तेव्हा ते अशुद्ध म्हटले जाते. त्याप्रमाणे प्रत्येक जीव सत् स्वभावाने शुद्धच आहे. पर्यायापेक्षेने वर्तमानात परद्रव्याचा संयोग झाल्यामुळे त्याचे अस्तित्व अशुद्ध म्हटले जाते. संसार अवस्थेत जीवाच्या अस्तित्वाबरोबर कर्माचे अस्तित्व व शरीराचे अस्तित्व संबद्ध झाले आहे. संसारी जीव अशुद्ध अस्तित्ववाला म्हटला जातो. अरिहंत अवस्थेमध्ये भावकर्माचे व ४ घातिकर्माचे अस्तित्व पृथक झाले आहे, म्हणून अरिहंतांचे शुद्ध अस्तित्व प्रगट झाले आहे. सिद्ध अवस्थेमध्ये आठही कर्मांचे व शरीररूप नोकर्माचे अस्तित्व सर्वथा भिन्न झाले आहे. त्यांचे परिपूर्ण शुद्ध अस्तित्व व्यक्त झाले आहे. सिद्ध भगवंतांचे अस्तित्व म्हणजे शुद्ध आत्म्याची 'ट्रू कॉपी' आहे. ज्याप्रमाणे बीचे मूळस्वरूप वृक्ष अवस्थेत प्रगट होते त्याचप्रमाणे शुद्ध आत्म्याचे मूळस्वरूप सिद्ध अवस्थेत प्रगट होते. जसा सिद्ध तसा मी. कुन्दकुन्दाचार्य नियमसार गा.४७ मध्ये म्हणतात,**जारिसिया सिद्धप्पा भवमल्लिय जीव तारिसा होंति।** आपण सिद्धसमान आहोत ही गोष्ट विसरल्यामुळेच पर्यायात अशुद्धता आहे.

पर्यायातील अशुद्धतेचे कारण स्वत:ला सिद्ध समान स्वीकारले नाही हेच आहे.

ज्याप्रमाणे खाणीतून सुवर्णपाषाण आणले. त्या सुवर्णपाषाणामध्ये जेवढे सोन्याचे कण आहेत ते शुद्ध सुवर्णरूप आहेत; पण त्यामध्ये किट्टिमा व कालिमा मिसळल्यामुळे ते सोने अशुद्ध झाले आहे. सोनार सोने शुद्ध करतो म्हणजे त्याला अग्निमध्ये तापवून त्यातील किट्टिमा व कालिमा बाजूला करतो. जेवढ्या जेवढ्या अंशाने किट्टिमा व कालिमारूपी मळ दूर होतो तेवढ्या तेवढ्या अंशाने सोने शुद्ध होत जाते. एका तावात सोने पूर्ण शुद्ध होत नाही. त्यासाठी सोळा ताव द्यावे लागतात. अन्तिम तावाद्वारे सर्व किट्टिमा व कालिमा दूर होऊन सोने पूर्ण शुद्ध होते. अर्थात केवळ सोने राहते त्यामध्ये मळाचा एक कणसुद्धा शिल्लक राहत नाही. त्याचप्रमाणे हा संसारी जीव स्वभावाने शुद्ध आहे; परंतु त्यामध्ये भावकर्मरूपी अंतर्मल व द्रव्यकर्म, नोकर्मरूपी बाह्यमल मिसळला आहे, म्हणून अशुद्ध म्हटला जातो. विवेकी ज्ञानी जीव त्याला ध्यानरूपी अग्निमध्ये तापवून त्यातील भावकर्म व द्रव्यकर्म बाजूला करतो. चतुर्थादी गुणस्थान क्रमाने जेवढ्या जेवढ्या अंशाने भावकर्म व द्रव्यकर्मरूपी मळ दूर होतो तेवढ्या तेवढ्या अंशाने जीव शुद्ध होत जातो. चवथ्या गुणस्थानापासून ते १४ व्या गुणस्थानापर्यंतची गुणस्थाने आत्म्याला शुद्ध करण्यासाठी अग्नितावाप्रमाणे आहेत. जेव्हा अन्तिम शुक्लध्यानरूपी तावाद्वारे समस्त भावकर्म व द्रव्यकर्मरूपी मळ दूर होतो. तेव्हा आत्मा परिपूर्ण शुद्ध प्रगट होतो. तेथे केवळ आत्मा शिल्लक राहतो. त्यामध्ये पराचा लवलेशही शिल्लक राहत नाही. पाणी पाणीरूप राहणे हीच पाण्याची शुद्धता आहे. तद्वत् आत्मा आत्मरूप राहणे हीच शुद्धता आहे.

आपल्या निर्मल ज्ञानदर्शनस्वभावी आत्म्याच्या अनुभवाच्या बलानेच पर्यायामध्ये शुद्धता प्रगट होते. अशुद्धतेच्या आश्रयाने अशुद्धता दूर होऊन शुद्धता होऊ शकत नाही. व्यवहारामध्येसुद्धा मलिनतेला दूर करण्यासाठी शुद्ध वस्तूचा आश्रय घेतो. चिखल चिखलाने धुतला जात नाही तर स्वच्छ पाण्याने चिखल नष्ट होतो.

शुद्ध ज्ञायकभावाच्या प्राप्तीची इच्छा असेल तर आत्मपरिणतीला मलीन करणाऱ्या विषय कषायांचा त्याग केला पाहिजे व सदैव आपल्यामध्ये

प्रकाशमान ध्रुव ज्ञायक प्रभूचे दर्शन घेतले पाहिजे. स्वत:च्या आत्मस्वरूपाची ओळख हाच सुखाचा मार्ग आहे व स्वत:संबंधी अज्ञानता हाच दुखाचा मार्ग आहे.

आचार्य, उपाध्याय व साधू हे तिघेही श्रमण आहेत. हे तिघेही विशुद्धसद्भावाचे साधक परमेष्ठी आहेत. श्रमण अवस्था म्हणजे आत्म्याला शुद्ध करण्याची फॅक्टरी आहे. आठ प्रकारचा ज्ञानाचार, आठ प्रकारचा दर्शनाचार, तेरा प्रकारचा चारित्राचार, बारा प्रकारचा तपाचार आणि पाच प्रकारच्या वीर्याचाराचे पालन करीत असतानासुद्धा त्यांची दृष्टी सदा स्वज्ञायकभावाकडेच असते. मुनिराज शुद्धोपयोगाला प्राप्त करेपर्यंतच व्यवहार पंचाचाराचे पालन करतात. ज्याप्रमाणे वरच्या पायरीवर चढल्यावर खालची पायरी आपोआप सुटते त्याचप्रमाणे शुद्धोपयोगरूप वरच्या भूमिकेवर आरूढ झाल्यावर शुभप्रवृत्ती आपोआप सुटते. निर्ग्रन्थ दिगम्बर अवस्था ही शुद्धात्म्याची साधक दशा आहे.

मोक्षमार्गावरून वाटचाल करण्यासाठी गुरूंची नितान्त आवश्यकता आहे. 'गुरु बिन कौन बतावे वाट' गुरु मोक्षाची वाट दाखवितात. अज्ञात स्थानाला पोहोचविण्यासाठी वाटाड्याची गरज असते. संसारी जीवांना मोक्ष हे अपरिचित स्थान आहे. त्याचा मार्ग ही एकदम अज्ञात आहे. ज्यांनी स्वयं मार्ग पाहिला आहे तोच इतरांना मार्ग दाखवू शकतो. श्रमण मोक्षमार्गावर आरूढ आहेत म्हणून तेच आपल्याला मार्ग दाखवू शकतात, अन्य नाही. अशा शुद्धस्वभाव साधक श्रमण व विशुद्ध स्वभावी अरिहंत व सिद्धांना भावसहित नमस्कार असो.

कलिकालसर्वज्ञ श्री कुन्दकुन्दाचार्य प्रथम दोन गाथांद्वारे अंतिम तीर्थंकर महावीर प्रभूंना व श्री पंचपरमेष्ठींना भावनमस्कार करून तिसऱ्या गाथेमध्ये मनुष्यक्षेत्रामध्ये विद्यमान असणाऱ्या अरिहंतांची भाववन्दना करतात.–

ते ते सव्वे समगं समगं पत्तेगमेव पत्तेगं।
वंदामि य वट्टंते अरहंते माणुसे खेत्ते ।।३।।

अन्वयार्थ – (ते ते सव्वे) त्या त्या सर्वांना **(य)** आणि **(माणुसे खेत्ते वट्टंते)** मनुष्य क्षेत्रामध्ये विद्यमान **(अरहंते)** अरिहंतांना **(समगं समगं)** एकाच

वेळेस सर्वांना समुदाय रूपाने व **(पत्तेगमेव पत्तेगं)** प्रत्येकाला व्यक्तिगतरूपाने **(वंदामि)** मी वंदना करतो.

त्या त्या सर्वांची आणि मनुष्यक्षेत्रामध्ये वर्तमान असणाऱ्या सर्व अरिहंतांची एकाचवेळेस तसेच प्रत्येकांची पृथक् पृथक् वन्दना करतो.

त्या त्या सर्वांना म्हणजे पूर्वगाथेत सांगितलेल्या पंचपरमेष्ठी पदामध्ये जेवढ्या व्यक्ती विद्यमान आहेत त्या सर्वांना अर्थात अडीच द्वीपात अरिहंतपदामध्ये स्थित असणाऱ्या सर्वांना, सिद्धपदामध्ये स्थित असणाऱ्या सर्वांना, आचार्य, उपाध्याय व साधुपदामध्ये स्थित असणाऱ्या सर्वांना सामूहिक नमस्कार करतात. त्याचप्रमाणे प्रत्येकांना वेगवेगळासुद्धा नमस्कार करतात. अभेदनयाने सर्व परमेष्ठी रत्नत्रयाच्या अपेक्षेने एकरूप आहेत. एकाचवेळेस सामूहिक वंदन करताना एक सामान्यरूप रत्नत्रयासंबंधी आदर व्यक्त होतो. रत्नत्रय पूज्य आहे, कारण रत्नत्रयच सुख प्राप्त करून देते. व्यापार-धंदा आपल्याला पैसा मिळवून देतो म्हणून त्यासंबंधी आपल्याला ओढ असते. आम्ही त्यासाठी प्रयत्नशील राहतो. ज्या व्यापार-धंद्यामध्ये आपल्याला फायदा होत नाही तो व्यापार-धंदा आपण करीत नाही. रत्नत्रयाचा व्यापार आपल्याला विपुल संपत्ती मिळवून देणारा आहे. आपल्या अनंतगुणांचे वैभव रत्नत्रयामुळेच प्राप्त होते. अनंतसुख देणारे हे रत्नत्रय आपले प्रेय व श्रेय आहे. या रत्नत्रयाचा व्यापार ज्यांचा उच्चकोटीला पोहोचला आहे अशा व्यक्तीसंबंधी सहजच आदरभाव व्यक्त होतो.

भेदनयाने सर्व रत्नत्रयधारी व्यक्तिरूपाने भिन्न भिन्न आहेत. अनंतसिद्ध स्वभाव-अपेक्षेने एक आहेत; परंतु आपापल्या ज्ञान, दर्शन, सुख, वीर्यादी गुणांनी भिन्न भिन्न आहेत. तसेच सर्व अरिहंत, आचार्य, उपाध्याय व साधू आपापल्या स्वरूपसत्तेच्या अपेक्षेने भिन्न भिन्न आहेत. समुदायरूप युगपत नमस्कार करतांना त्या पदाला नमस्कार आहे. भिन्न भिन्न नमस्कार करतांना व्यक्ती अपेक्षेने नमस्कार आहे. लौकिकामध्ये सुद्धा हीच नीती वापरली जाते. जसे एखाद्या सभेमध्ये सुरवातीला सर्व अभ्यागतांचे सामूहिक रूपाने स्वागत केले जाते. त्यानंतर सभेतील अध्यक्ष, मुख्य अतिथी, विशिष्ट पाहुणेमंडळी, विद्वद्गण या प्रत्येकांचा परिचय देऊन स्वागत केले जाते. व्यक्तिगत सन्मान करीत असताना त्या व्यक्तीच्या विशिष्ट गुणांचा प्रभाव आपल्यावर होतो व

आपले परिणाम तदनुरूप होतात. त्यांचा आदर्श आत्मसात करता येतो. हा व्यक्तिगत नमस्काराचा लाभ आहे. जे काही करायचे ते आपल्या लाभासाठीच. कारण आपले हित-अहित आपल्या हातात आहे.

या गाथेत मनुष्यक्षेत्रातील अरिहंतांना नमस्कार केला आहे. महाविदेह क्षेत्रामध्ये कमीत कमी २० तीर्थंकर व जास्तीत जास्त १६० तीर्थंकर एका वेळेस होऊ शकतात. अडीच द्वीपात्मक संपूर्ण मनुष्यक्षेत्रामध्ये एकूण ५ विदेहक्षेत्र आहेत. जम्बूद्वीपामध्ये एक मेरू, धातकी खंडामध्ये २ व पुष्करार्ध द्वीपामध्ये दोन मेरू असे एकूण ५ मेरू पर्वत आहेत. या मेरू पर्वतांच्या पूर्व व पश्चिम दिशेला विदेह क्षेत्र आहेत. मेरू पर्वतामुळे एका विदेहाचे पूर्व विदेह व पश्चिम विदेह असे दोन भेद झाले आहेत. पूर्व व पश्चिम विदेहातून सीता व सीतोदा नदी वाहत असल्यामुळे त्याचे पुन्हा उत्तरविदेह व दक्षिणविदेह असे दोन विभाग झाले आहेत अर्थात प्रत्येक विदेहाचे चार विभाग आहेत. त्यातील पुन्हा एकेका विभागात ३-३ विभंगा नदी व ४-४ वक्षार पर्वतांमुळे ८-८ विभाग झाले आहेत. अशाप्रकारे एका मेरूसंबंधी विदेहाचे एकूण ३२ देश आहेत. ५ मेरूंचे मिळून १६० देश होतात. या प्रत्येक देशामध्ये एकावेळेस एक-एक तीर्थंकर असू शकतात. एका क्षेत्रात एकावेळेस एकच तीर्थंकर असतात, अधिक नाही. दोन तीर्थंकरांची भेट कधीही होत नाही. त्यामधून एक-एक कमी करीत जावे त्या सर्व तीर्थंकरांच्या मध्यम संख्या होतात. सर्वात कमी २० तीर्थंकर नियमाने असतात.

एकेका मेरूच्या चार कोपऱ्यांपैकी एकेका कोपऱ्यामधील ८ क्षेत्रांपैकी कोणत्याही एका क्षेत्रात एक तीर्थंकर नियमाने असतात. जम्बूद्वीपातील ईशान कोणस्थ आठ क्षेत्रांपैकी एका क्षेत्रात सीमंधर नामक एक तीर्थंकर सदाकाळ विद्यमान असतात. याचप्रमाणे शेष तीन भागांमध्ये क्रमश: युग्मन्धर, बाहू आणि सुबाहू तीर्थंकर विहार करतात. तसेच धातकी खण्डातील दोन मेरूसंबंधी आठ विभागांमध्ये संजातकादी तीर्थंकर सदाकाळ विराजमान असतात. पुष्करार्धद्वीपातील दोन मेरूसंबंधी आठ विदेहांमध्ये अन्तिम आठ तीर्थंकर विद्यमान असतात. अशाप्रकारे अडीच द्वीपात २० तीर्थंकर नेहमी वर्तमान असतात. याचा अर्थ असा की यामधून एका तीर्थंकरांना मोक्ष झाला की त्याच समयात ८ पैकी कोणत्याही देशात त्या नामधारी दुसरे तीर्थंकर

केवलज्ञान प्राप्त करतात. समवशरणाचा तेथे अभाव नसतो.

चतुर्थ काळामध्ये ५ भरत व ५ ऐरावत क्षेत्रात तीर्थंकर असतील तर ते १० तीर्थंकर व १६० विदेहांमध्ये १६० तीर्थंकर असे सर्व मिळून १७० तीर्थंकर मनुष्य क्षेत्रामध्ये एकावेळेस असू शकतात. तीर्थंकर २४ असतात असे आपण नेहमी ऐकले आहे, म्हणून १७० तीर्थंकर असतात असे कोणी म्हटले की ते चुकीचे वाटते, परंतु ते चुकीचे नाही. चतुर्थ काळात भरत व ऐरावत क्षेत्रामध्ये कालक्रमाने २४ तीर्थंकर होतात म्हणून तीर्थंकर चोवीस असतात असे सांगितले जाते. विद्यमान तीर्थंकरांबरोबर विदेहक्षेत्रात विद्यमान सर्व सामान्य अरिहंतांनाही नमस्कार केला आहे. सामान्य अरिहंत अनेक असू शकतात. आचार्यांची दृष्टी कधी सामान्यावर पडते तर कधी विशेषावर, कधी व्यक्तीवर तर कधी समष्टीवर.

'वर्तमान काळ' हे पद दोन्हीकडे लागते. वर्तमान अरिहंत किंवा वर्तमानकाळात असा अर्थ होतो. वर्तमानकाळात त्या सर्वांना प्रत्यक्ष करून स्मरण करतात. सर्वांचे स्मरण करीत असताना ज्ञानामध्ये सर्व अरिहंत प्रत्यक्ष आहेत. भगवंतांचे स्मरणसुद्धा अनुपम बल प्रदान करते. भगवंतांची मूर्ती समोर नसतानाही त्यांचे स्मरण जरी झाले तरी आपले मन पवित्र होते. **जे देवदर्शन आत्मदर्शन करविते तेच खरे देवदर्शन आहे.** भगवंतांच्या स्वरूपाचे दर्शन करून आपल्यामध्ये त्या स्वरूपाचे चिन्तन करावे.

वाडवडिलांचे चित्र पाहून जशी आमची दृष्टी त्यांच्या चरित्रावर जाते त्याचप्रमाणे वीतराग प्रभूंच्या मूर्तीला पाहून त्यांच्या चरित्रावर दृष्टी ठेवली पाहिजे.

भगवंतांच्या प्रतिमेचे दर्शन करीत असताना आपण दुसऱ्या कवींनी रचलेली स्तुती व पूजा म्हणतो. स्तुती कंठस्थ झाल्यामुळे ती मुखातून निघत जाते व आमचे मन दुसरीकडेच भटकत राहते. म्हणून कधी कधी दुसऱ्यांनी रचलेली स्तुती सोडून स्वत:च्या बोलीभाषेमध्ये भगवंतांची स्तुती करावी–

हे प्रभो ! आपण वीतराग सर्वज्ञ आहात, महान आहात. निष्कलंक आहात. आजपर्यंत अज्ञानामुळे आपले स्वरूप मी ओळखलेच नाही. आज माझे परम भाग्य आहे. आपले दर्शन करून माझा जन्म सफल झाला. तुला पाहून मला माझ्या स्वरूपाची ओळख झाली इत्यादी, अशाप्रकारे आपल्या

शब्दांमध्ये स्तुती करण्याचा प्रयोग करून पहा, किती लाभ होतो ते! जेव्हा आपण दुसऱ्यांनी रचलेली स्तुती म्हणतो तेव्हा आपले भाव कसे असतात व स्वत:च्या भाषेत स्तुती म्हणतो तेव्हा आपले भाव कसे होतात? स्वत: अनुभव करून पाहिल्यावरच अंतर लक्षात येईल. प्रत्येक कार्यामध्ये आपला लाभ पाहिला पाहिजे की हे केल्यामुळे मला काय मिळणार? जिनेन्द्र भगवंतांची स्तुती भगवंतांना उपयोगी नाही तर आपल्या स्वत:साठी उपयोगी आहे, त्यामुळे आपल्या परिणामांची विशुद्धी होते. त्यांचे स्वरूप जाणून तसा स्वानुभव होतो.

पंडित दौलतरामजींनी देव स्तुतीमध्ये म्हटलेच आहे की,-

तुम परमशांत मुद्रा समेत भविजनको निज अनुभूति देत।

नमस्कार दोन प्रकारचा आहे. द्रव्यनमस्कार व भावनमस्कार. वचनाने स्तुती करणे व शरीराने नमणे हा द्रव्यनमस्कार आहे. अंतरंग श्रद्धासहित आत्म्याच्या गुणांमध्ये लीन होणे हा भावनमस्कार आहे. हा भावनमस्कार टीकाकारांनी सिद्धभक्ती व योगिभक्तिपूर्वक संपन्न केला आहे. जेव्हा तीर्थंकर दीक्षा घेतात. तेव्हा सिद्धभक्ती करतात. म्हणून टीकाकारांनी या भक्तीला दीक्षोत्सवाचे मंगलाचरण म्हटले आहे व दीक्षेच्या उत्सवाला मोक्षरूप लक्ष्मीचे स्वयंवर मंडप म्हटले आहे. ज्याप्रमाणे पूर्वी स्वयंवर होत होते. अनेक राजपुत्र साजश्रृंगार करून मंडपात जात होते. जेव्हा कन्या वरण करण्याकरिता स्वयंवर मंडपातून फिरत होती, तेव्हा अनेक राजपुत्र कोणी ऐटीने, कोणी प्रसन्नमुख करून, कोणी आपली भुजा स्फुरायमान करून अनेक प्रकारची चेष्टा करीत होते. परंतु विवेकशील कन्या कोणाच्या गळ्यात माळ घालेल हे सांगता येत नव्हते. कधी कधी सुसज्जितांवर दृष्टी न जाता साध्या वेषामध्ये असलेल्या धूलधूसरित वराला ती वरायची. इतिहास पाहिला असता लक्षात येईल की, कित्येक वेळा असे घडले आहे. त्याप्रमाणे दीक्षा हे मुक्तिलक्ष्मीचे स्वयंवर मंडप आहे. मुक्तिरूपी वधू त्यालाच वरणार जो अंतरंगामध्ये गुणपूर्ण आहे व अनादी अनन्त शुद्ध चैतन्यभाव ज्याच्या उपयोगात आहे. कोणी यती आवश्यक क्रिया काटेकोर पाळत असेल, मोठे उपसर्ग सहन करीत असेल, कोणी अनेक प्रकारच्या ध्यानमुद्रा धारण करीत असेल, परंतु जर तो लक्ष्यापासून दूर असेल तर त्याला ती वरणार नाही आणि जो बाह्यतपामध्ये

अग्रणी नाही, परंतु रत्नत्रयाने संपन्न आहे त्याला निश्चितपणे वरते.

मोक्षलक्ष्मीच्या स्वयंवर मंडपामध्ये सिद्ध-भक्ती करणे म्हणजे मोक्षलक्ष्मीची कंठामध्ये वरमाळा घालून घेणे आहे. सिद्ध अनन्तदर्शन, ज्ञान, सुख, वीर्यादी गुणांचे धारी आहेत तसाच निश्चयाने मी आहे अशी भावना करणे म्हणजे सिद्धभक्ती आहे. निर्मल रत्नत्रयाच्या एकतारूप समाधीमध्ये परिणत होऊन परमयोगींच्या वैराग्य चारित्रादी गुणांची स्तुती करीत त्या गुणानुरागामध्ये स्वत:ला जोडणे ही योगिभक्ती आहे. नमस्कार करताना भावांची विशुद्धी पाहिजे. जेव्हा नमस्कार करण्यायोग्य पूज्य पुरुषांच्या गुणांमध्ये परिणाम जोडले जातात तेव्हा परिणामांची विशुद्धी होते. या विशुद्ध भावामुळे पाप कर्मांचा रस घटून पुण्यकर्माचा रस वाढतो. त्यामुळे प्रारंभ केलेल्या कार्यामध्ये विघ्न बाधा येत नाहीत. अशाप्रकारे पंच परमेष्ठींना व विदेहक्षेत्रस्थ वर्तमान तीर्थंकरांना भावविशुद्धिपूर्वक कोटी कोटी वंदन.

आता पुढील गाथेमध्ये पूर्वोक्त पंचपरमेष्ठींच्या नमस्कार भावाचा उपसंहार करतात.-

किच्चा अरहंताणं सिद्धाणं तह णमो गणहराणं।
अज्झावयवग्गाणं साहूणं चेव सव्वेसिं।।४।।

अन्वयार्थ – अशाप्रकारे **(अरहंताणं)** अरिहंतांना **(सिद्धाणं)** सिद्धांना **(तह गणहराणं)** तसेच गणधर आचार्यांना **(अज्झावयवग्गाणं)** अध्यापक अर्थात उपाध्याय वर्गाला **(च)** आणि **(सव्वेसिं साहूणं)** सर्व साधूंना **(णमो किच्चा)** नमस्कार करून.

सर्व अरिहंतांना, सिद्धांना, गणधरांना (आचार्यांना), उपाध्यायवर्गाला आणि सर्व साधूंना नमस्कार करून (मी समता भावाला प्राप्त करतो हे पुढील गाथेत सांगतात.)

नमस्कार दोन प्रकारचा- १) द्वैत नमस्कार व २) अद्वैत नमस्कार. मी आराधक आहे व हे अरहंतादी आराध्य देव आहेत अशाप्रकारे आराध्य-आराधकाच्या विकल्पाने विनयादी करणे द्वैत नमस्कार आहे. रागादी सर्व विकल्पाने रहित परमसमाधीच्या बलाने आत्म्यामध्येच आराध्य-आराधक भावाची परिणती होणे अद्वैत नमस्कार आहे. तेथे आचार्य द्वैत

नमस्काराच्याद्वारे अद्वैत नमस्कार करतात. भक्ताला भगवंतांची भक्ती करीत असताना इतके तल्लीन झाले पाहिजे की, ते भगवान आहेत व मी भक्त आहे हे विसरून जावे. सोऽहम् जाप करीत सो (तो) चा विकल्पसुद्धा नष्ट होऊन केवळ अहंचा अनुभव राहवा. तीच परमसमाधी आहे. तीच निर्विकल्प परिणती आहे, तोच स्वानुभव आहे व तोच अद्वैत नमस्कार आहे. ज्याप्रमाणे दीपकाहून वेगळी असणारी वात दीपकाच्या सान्निध्याने स्वयं दीपमय अर्थात प्रकाशमय बनते त्याप्रमाणे परमात्म्याहून भिन्न असणारा आत्मा परमात्म्याची उपासना करून स्वत: परमात्मा बनतो. अद्वैत नमस्काररूप फळाशिवाय द्वैत नमस्कार प्रयोजन सिद्ध करणारा नाही. तो केवळ शुभोपयोग आहे. द्वैत नमस्कार मिथ्यादृष्टी किंवा सम्यग्दृष्टीला सुद्धा होतो, परंतु अद्वैत नमस्कार सम्यग्दृष्टीलाच होतो. सम्यग्दृष्टी अरिहंत व सिद्धांच्या वास्तविक स्वरूपाला जाणतो म्हणून त्यांना नमस्कार करताना त्यांच्या स्वरूपाचा विचार असतो. त्यांच्या स्वरूपाचा विचार करताना तत्सदृश आपल्या स्वरूपाचा अनुभव सहज होतो. ज्याप्रमाणे दुसऱ्याच्या घरी एखादी वस्तू पाहत असताना त्यासारखी असणारी आपल्या घरातील वस्तू आपल्याला सहज आठवते त्याचप्रमाणे अरिहंतांच्या घरातील अनंतचतुष्टयरूप लक्ष्मी पाहत असता ज्ञानीला निज चैतन्य घरातील अनंतज्ञानादी लक्ष्मीचे स्मरण होते व त्या संपत्तीचा अनुभव केल्यामुळे त्याचे जिनदर्शन सफल होते. अद्वैत नमस्काररूपी फल प्राप्तीसाठीच द्वैतनमस्काररूपी बीज रोवले जाते. जर फळ मिळाले नाही तर बीजारोपण व्यर्थ आहे. त्याचप्रमाणे द्वैतनमस्कारास अद्वैत नमस्कारातून प्राप्त झालो नाही तर द्वैतनमस्कार व्यर्थ होईल.

वास्तविक आपण आपलाच विनय करत असतो. निश्चयाने आम्ही अरिहंतादिकांचा विनय करू शकत नाही. कारण विनय आमच्या मार्दवगुणाची अवस्था आहे. अवस्था ही अवस्थावान् पदार्थामध्येच व्याप्य आहे. विनय भाव आमचा परिणाम आहे. विनयभाव ज्याच्या निमित्ताने प्रगट झाला त्याचा विनय केला असे व्यवहाराने म्हटले जाते. अरिहंतांचा विनय हा आमचा परिणाम आहे. अरिहंतांचा नाही. आपला परिणाम आपल्यापासून अभिन्न असतो. सांगण्याचा भाव हा आहे की अरिहंतादिकांचा विनय केल्यामुळे अरिहंतादिकांना लाभ नाही तर आपल्यालाच त्याचा लाभ आहे.

आपल्या विनय परिणामामुळे आपला आत्मा निर्मळ व पवित्र होतो. प्रत्येकवेळी नमस्कार करताना हा प्रयोग करावा. केवळ आपले शरीर वाकविणे म्हणजे नमस्कार नव्हे, केवळ तोंडाने स्तुती म्हणणे म्हणजे नमस्कार नव्हे तर नमस्कार हा आत्म्याचा परिणाम आहे. त्या पूज्य पुरुषांच्या गुणांमध्ये आपला परिणाम भिजला पाहिजे. त्यांच्या गुणांचे स्मरण करून आपले परिणाम अत्यंत विशुद्ध करून त्यांच्या समान गुणवान असणाऱ्या आपल्या आत्म्यापर्यंत पोहोचले पाहिजे. हाच आपला खरा पुरुषार्थ आहे. हा पुरुषार्थ आपल्याकडून घडविण्यासाठीच देववन्दना, पूजा भक्ती इत्यादी क्रियेचा उपदेश केला आहे. परन्तु आपण क्रियेचे प्रयोजन विसरून जातो व क्रिया तेवढी पार पाडून आम्ही आपले मानसिक समाधान मानून घेतो. व्यवहार भक्तीबरोबर निश्चय भक्ती करायला आपण शिकलो तर हा संसारसमुद्र शीघ्रातिशीघ्र सहज तरून जाऊ. कारण भक्ती मुक्तीचे द्वार आहे.

चार गाथांद्वारे मंगलाचरण केल्यानंतर आता पुढील गाथेमध्ये आचार्य समताभावरूप चारित्राला धारण करण्याची प्रतिज्ञा करतात.–

तेसिं विसुद्धदंसणणाणपहाणासमं समासेज्ज ।
उवसंपयामि सम्मं जत्तो णिव्वाणसंपत्ती ।।५।।

अन्वयार्थ– (तेसिं) त्यांच्या अर्थात पंच परमेष्ठींच्या **(विसुद्धदंसणणाणपहाणासमं)** विशुद्ध दर्शन ज्ञान प्रधान आश्रमाला **(समासाद्य)** प्राप्त करून **(सम्मं उवसंपयामि)** मी समता भावाला प्राप्त करतो. **(जत्तो)** ज्यामुळे **(णिव्वाणसंपत्ती)** निर्वाणाची प्राप्ती होते.

त्या पंच परमेष्ठींच्या विशुद्ध–दर्शनज्ञानमयी मुख्य आश्रमाला प्राप्त होऊन मी साम्यभावाला धारण करतो की ज्यामुळे निर्वाणाची प्राप्ती होते.

या गाथेमध्ये मुख्यरूपाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत– १) मोक्षाचे कारण साम्यभाव आहे व २) साम्यभाव–सम्यग्दर्शनज्ञानपूर्वकच प्राप्त होतो.

सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान हेच खरे आश्रम –

आश्रम शब्द ऐकल्यावर आपल्या डोळ्यासमोर दगडी इमारती उभ्या राहतात. कारण आपण नेहमी आश्रमाला बाहेरूनच पाहिले आहे. त्याचे अंतरंग स्वरूप अज्ञात आहे. शाळा म्हणजे तरी काय? इमारतीकडे बोट करून

दाखवतो व म्हणतो की ही पहा शाळा आहे. शाळा म्हणजे दगडी बिल्डिंग नसून गुरुशिष्यामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होय. गुरू शिष्यांना शिकवतात ते शिक्षण म्हणजे शाळा. पूर्वीच्या काळी गुरू जंगलामध्ये झाडाखाली बसून शिष्यांना शिकवायचे तीच त्यांची शाळा असे.

पंचपरमेष्ठींचे आश्रम दगड, माती, वीटा, वाळू, सिमेंटानी बनलेले नाही तर सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान हेच त्यांचे आश्रम आहे. पंच परमेष्ठींच्या जवळ गेल्यावर सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान प्राप्त होते, म्हणून तेच त्यांचे मुख्य भावाश्रम म्हटले आहे. 'आ' उपसर्गपूर्वक श्रम धातूपासून 'आश्रम' शब्द बनला आहे. आ म्हणजे चोहो बाजूंनी 'श्रम' म्हणजे श्रम करणे, तप करणे. जेथे सर्व प्रकारांनी आत्म्यामध्ये श्रम केले जाते, तप केले जाते तेच आश्रम होय. साधू चालते फिरते आश्रम असतात. साधू एकाठिकाणी आश्रम बांधून वास्तव्य करीत नसतात. या जंगलातून त्या जंगलात दररोज विहार करतात. जंगलामधील संघाचे वास्तव्यच त्यांचा आश्रम.

सर्वार्थसिद्धीच्या प्रारंभी पूज्यपाद आचार्यांनी आश्रमाचे सुंदर वर्णन केले आहे- **'विविक्ते परमरम्ये भव्यसत्त्व-विश्रामास्पदे क्वचिदाश्रमपदे मुनिपरिषन्मध्ये संनिषण्णं।**' परमरमणीय, भव्यजीवांना विश्रांतीचे स्थान असणाऱ्या, एकान्तस्वरूप, कोणत्या तरी आश्रमस्थानामध्ये मुनींच्या सभेमध्ये बसलेल्या आचार्यांजवळ कोणी एक भव्य जीव गेला. मुनी एकान्तस्थानी राहतात. ते स्थान रत्नत्रयसंपन्न मुनिराजांच्या वास्तव्यामुळे अत्यंत रमणीय होते व भव्यजीवांना तेथे गेले असता शांतीचा अनुभव होतो. संसारतापात होरपळून निघालेले भव्यजीव शांतीकरिता अशा स्थानाचा आश्रय घेतात. मुनिराज जेथे राहतात ते स्थानच आश्रम बनते.

सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान पंच परमेष्ठींचा प्रसाद-

हे आश्रम सहजशुद्धदर्शनज्ञानस्वभावी आत्मतत्त्वाचे श्रद्धानरूप सम्यग्दर्शनाला आणि बोधरूप सम्यग्ज्ञानाला प्राप्त करून देते. पंचपरमेष्ठींच्या सान्निध्यात गेल्यानंतर सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानरूपी वस्तू भेटस्वरूप मिळतात. सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाची प्राप्ती होणे हाच खरा पंचेपरमेष्ठींचा प्रसाद आहे. **ज्यांच्याजवळ जी वस्तू आहे ती तो दुसऱ्याला देतो.** पंच परमेष्ठींजवळ सम्यग्दर्शनज्ञानचारित्ररूपी रत्नत्रयनिधी आहे, म्हणून त्यांच्याजवळ गेल्यावर

ही निधी आपल्याला प्राप्त होते. त्यासाठी एक अट आहे की संसाराचे सान्निध्य सोडून पूर्णपणे त्यांच्या सान्निध्यात गेले पाहिजे. आम्ही त्यांच्याजवळ संसार सोबत घेऊन गेलो तर ही निधी मिळणे शक्य नाही.

संसार म्हणजे संकटांची मालिका आहे. एक संकट सुटले की अन्य शेकडो संकटे दत्त म्हणून उभी राहतात. आम्ही संसार करतो म्हणजे समस्या सोडवत राहतो. संकटातून सदैव मुक्त होण्यासाठी साधूंच्या आश्रमाचा आश्रय घेतला पाहिजे. **साधूंचे आश्रम विपदारहित समतासुधाचा वर्षाव करणारे शांतिस्थळ आहे.** तेथे जाऊन सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाचा अभ्यास करावा. कारण हेच आपले खरे संकटविमोचक, आत्मरक्षक भाव-आश्रम आहेत.

जीवनातील सर्वप्रथम कर्तव्य, गमन दिशा निश्चित करणे – आचार्य प्रतिज्ञा करतात की मी निजस्वभावाश्रयाने सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाने संपन्न होऊन साम्यभावाला प्राप्त होतो. प्रत्येक कार्य करीत असताना त्याचे प्रयोजन काय? याचा विचार असणे आवश्यक आहे. लक्ष्य निश्चित नसताना केलेले प्रयत्न निष्फळ आहेत. ज्याचे ध्येय निश्चित नसते त्याचे जीवन, दिशा निश्चित नसलेल्या समुद्रामध्ये फिरणाऱ्या नावेप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे कोणी समुद्रामध्ये नाव फिरवू लागला. परंतु त्याचे गन्तव्य स्थान निश्चित नसेल तर तो कधी नाव पूर्वेकडे घेऊन जातो तर कधी पश्चिमेकडे तो कोणत्याही किनाऱ्याला पोहचू शकत नाही. त्याचप्रमाणे जोपर्यंत या जीवाचेसुद्धा गन्तव्य स्थान निश्चित नसेल तोपर्यंत कधी कोठे राग करतो, कधी कोठे द्वेष करतो तर कधी मोह करतो. त्याची जीवननौका हेलकावे खाते. म्हणून सर्वप्रथम आपले लक्ष्य निश्चित केले पाहिजे. **सर्वात उत्तम लक्ष्य आहे–सिद्ध बनणे.**

प्रतिज्ञा : कार्यसिद्धीची प्रथम पायरी –

सिद्ध बनण्यासाठी समताभावाची प्रतिज्ञा करावी लागेल. समता भावाला प्राप्त होणे म्हणजे मुक्तिलक्ष्मीशी संबंध निश्चित होणे. समताभावानेच निर्वाणाची प्राप्ती होते. आम्हाला प्रतिज्ञा बंधनरूप वाटते म्हणून दु:खरूप वाटते. परंतु प्रतिज्ञा बंधन नाही. प्रतिज्ञा दु:खाचे कारण नाही. प्रतिज्ञा कार्यसिद्धीची जनक आहे. प्रतिज्ञा केल्याशिवाय कार्याला प्रारंभ होत नाही. प्रतिज्ञाच केली नाही तर निर्वहन कशाचे करणार? **प्रतिज्ञा करणे हे पहिले शहाणपणाचे लक्षण आहे व प्रतिज्ञेचे निर्वहन करणे हे दुसरे शहाणपणाचे**

लक्षण आहे. जो प्रतिज्ञाच करीत नाही किंवा प्रतिज्ञा करूनसुद्धा ती पूर्ण करीत नाही तो जीवनात काहीही मिळवू शकत नाही. आपणसुद्धा स्वाध्याय, देवपूजा, सामायिक इत्यादी धार्मिक कार्य करीत असताना प्रतिज्ञा केली पाहिजे की मी समताभावाला प्राप्त होईन. किंबहुना समता भावाला प्राप्त होण्यासाठी मी स्वाध्यायादी क्रिया करतो आहे, असे जाणावे. समताभावरूप फळ प्राप्त झाले तर सर्व क्रिया सार्थक आहेत. प्रत्येक वेळी तपासून पाहायचे की मला साम्यभावरूप फळ मिळाले काय? तसे फळ मिळाले नाही तर समजावे की साधनेमध्ये कोठेतरी दोष आहे.

समताभावाची सामग्री–

सर्व विज्ञानाचे फळ, सर्व व्रताचे सार व सर्व तपाचे रहस्य परम साम्यभाव आहे. सर्व भावात उत्कृष्ट भाव समता भाव आहे. रागद्वेषाचे लेशमात्र मालिन्य नसणे साम्यभाव आहे. मंदकषाय समता नाही. पुढे ७ नंबरच्या गाथेत आचार्य स्वयं साम्यभावाचे लक्षण सांगणार आहेत. कोणतेही कार्य करायचे असेल तर त्या कार्याची सामग्री माहीत असणे आवश्यक आहे. साम्यभाव हे एक कार्य आहे. ते आपल्याला करायचे आहे तर त्याच्या सामग्रीचे ज्ञान करून घेतले पाहिजे. साम्यभाव कोणत्या द्रव्याचे परिणमन आहे हे प्रथम जाणून घेतले पाहिजे. त्यासाठी वस्तूस्वरूपाचे ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी खालील गोष्टी समजून घ्याव्यात.–

१) द्रव्य, गुण, पर्यायाचे लक्षण, भेद व स्वरूप २) प्रतीतीरूपाने सहा द्रव्यांचे भिन्न भिन्न अस्तित्व ३) सात तत्त्वांचे यथार्थ स्वरूप ४) सात तत्त्वांचे हेय–उपादेयरूपाने ज्ञान ५) स्व–पराचा निर्णय ६) पराचा त्याग व स्वचे ग्रहण करणे. स्वलक्ष्यानेच समताभाव प्राप्त होतो. **समताभाव प्राप्त करण्याचे साधन शुद्धात्मप्रवृत्ती आहे.** पराचा आश्रय घेऊन समताभावाचे स्वरूप सांगितले जाते. जसे शत्रू, मित्र, महाल–स्मशान, कंचन–कांच, निंदा–स्तुती यामध्ये राग द्वेष न करणे म्हणजे समताभाव. हे समताभावाचे बाह्यचिह्न आहे. समताभाव धारण करण्यासाठी शत्रू–मित्र, निंदा–स्तुती इत्यादी गोष्टींचा प्रसंग यायला पाहिजे असा नियम नाही. एखादे मुनिराज ध्यानाला बसले त्यांना कोणत्याही अनुकूल–प्रतिकूलतेचा संयोग झालाच नाही. ध्यानामध्ये लीन होऊन मोक्षाला गेले तर त्यांना समताभाव नव्हता काय? जो आपल्या

समतासागरामध्ये डुबकी मारतो तो समतामय होतो. हा चैतन्यमयी आत्मा स्वयं समतास्वरूपी आहे. **समतारूप उपयोगच सर्वात सुन्दर आहे व विषमभावरूप उपयोग असुन्दर आहे. अर्थात समता हेच खरे सौन्दर्य आणि ममता हीच कुरूपता.** आज मनुष्य करोडो मैल दूर असणाऱ्या चंद्रापर्यंत जाऊन पोहोचला आहे; पण अत्यन्त निकट असलेल्या आत्म्यापर्यंत पोहोचला नाही हेच मोठे आश्चर्य आहे. आत्म्याजवळ जाण्यासाठी बाह्य पुरुषार्थ करावा लागत नाही. फक्त डोळे बंद करून अंतर्मुख उपयोग करून आत पहावे तर चैतन्याची प्रतीती होते. **'पर का प्यार संसार है, आत्मा का प्यार उद्धार है।'**

विलक्षण प्रतिज्ञा –

कुन्दकुन्द आचार्यांनी रचलेल्या सर्व परमागमांचे अवलोकन केल्यावर एक गोष्ट लक्षात येते की प्रत्येक ग्रंथाच्या प्रारंभी आचार्यांनी तो ग्रंथ सांगण्याची प्रतिज्ञा केली आहे. जसे 'वोच्छामि समयपाहुडमिणमो'– 'वोच्छामि णियमसारं' मी समयप्राभृत सांगतो, मी नियमसार सांगतो इत्यादी; परंतु प्रवचनसार ग्रंथाच्या प्रारंभी आचार्यांनी मी प्रवचनप्राभृत सांगतो अशी प्रतिज्ञा न करता 'मी साम्यभावाला प्राप्त करतो' अशी प्रतिज्ञा केली आहे. यावरून हे लक्षात येते की **प्रवचनसार हा ग्रन्थ प्रयोगात्मकपद्धतीने लिहिला आहे.** दुसऱ्यांना अमुक गोष्ट करा असे न सांगता ती गोष्ट मी स्वत:च करतो असे म्हणणाऱ्याचा प्रभाव समोरच्या व्यक्तीवर अधिक पडतो. व्यवहारामध्ये सुद्धा आपण पहातो समोरच्या व्यक्तीला हे काम करा असे म्हटल्यावर तो करेल की नाही हे सांगता येत नाही. पण आपण स्वयं करू लागलो की समोरच्या व्यक्तीला न सांगतासुद्धा करण्याचे भाव होतात. आचार्य म्हणतात, 'मी पंचपरमेष्ठींच्या विशुद्ध ज्ञानदर्शन प्रधान आश्रमाचा आश्रय घेऊन साम्यभावाला प्राप्त होतो की ज्यामुळे निर्वाणाची प्राप्ती होते.' हे ऐकून किंवा पाहून श्रोतृवृन्दाला किंवा भक्तगणांना हा सहज भाव उत्पन्न होतो की मलासुद्धा साम्यभावाला प्राप्त झाले पाहिजे. शिष्य गुरूंचा आदर्श घेत असतात. गुरूंच्या चारित्राचा शिष्यांवर सहज प्रभाव पडत असतो व ते त्यांचे अनुकरण करीत असतात ही मानसिकता आहे. साम्यभावाला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा सर्व प्रतिज्ञांमध्ये सर्वोत्कृष्ट अलौकिक प्रतिज्ञा आहे. ही प्रतिज्ञा

आत्म्याला सर्वोच्च स्थानावर नेऊन बसविणार आहे. ज्याप्रमाणे भीष्माने 'मी ब्रह्मचारी राहीन' अशी प्रतिज्ञा केली व ती पूर्णत्वास नेली म्हणून लाखो वर्षानंतर सुद्धा ती 'भीष्मप्रतिज्ञा' या नावाने प्रसिद्ध आहे. तशी ही समताभावाला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा मी पूर्णत्वास नेणारच असे आपण प्रतिज्ञेचा निर्वाह करण्यास कटिबद्ध झाले पाहिजे.

समता हेच निरामयतेचे औषध–

जीवाच्या दोन अवस्था आहेत. एक संसार व दुसरी मोक्ष. संसार ही जीवाची रोगयुक्त अवस्था आहे व मोक्ष ही निरोगी अवस्था आहे. रोगी मनुष्याचे लक्ष्य निरोगी होण्याकडे असते. येन केन प्रकारेण तो रोगमुक्त होऊ इच्छितो. त्यासाठी तो प्रथम चांगला वैद्य शोधतो त्यांनी केलेल्या रोगचिकित्सेमुळे त्यांनी दिलेल्या औषधावर रोग्याचे दृढ श्रद्धान होते व अत्यंत भक्तीने त्याचे सेवन करतो. त्यामुळे रोगी रोगमुक्त होऊन निरामय अवस्थेला प्राप्त होतो. आपणसुद्धा संसाररोगाने पीडित रोगी आहोत, म्हणून प्रथम चांगला वैद्य शोधला पाहिजे. खरे देव–शास्त्र–गुरू हेच वैद्य आहेत. त्यांनी या संसार रोगावर 'समतारूपी' औषध सांगितले आहे. ते जर आपण श्रद्धेपूर्वक सेवन करू तर खात्रीने रोगमुक्त होऊन निरामय मोक्ष अवस्थेला प्राप्त होणार. औषध नेहमी रोगाच्या विरोधी असते. ममता हे संसाररोगाचे कारण आहे. म्हणून त्याच्याविरोधी समता हेच रोग दूर करण्याचे कारण होऊ शकते. म्हणून आचार्य म्हणतात की 'उवसंपयामि सम्मं जत्तो णिव्वाणसंपत्ती' समता हे मोक्षरूपी निरामय दशा प्राप्त करण्याचे रामबाण औषध आहे. म्हणून ज्याला संसार– रोगातून मुक्त होण्याची इच्छा असेल त्यांनी जरूर या औषधाचे सेवन करावे.

समता : आत्मश्रीमंतीचे उत्कृष्ट साधन–

संसार ही गरीबी आहे व मोक्ष ही श्रीमंती आहे. कारण संसारामध्ये या जीवाचे सर्व आत्मवैभव, आत्मिक गुणसंपत्ती लुटली गेली आहे व मोक्षामध्ये सर्वच्या सर्व अनंत गुणसंपत्ती प्राप्त होते. गरीब व्यक्ती सतत श्रीमंत बनण्याचा प्रयत्न करीत असतो. तो असा एखादा व्यापार धंदा शोधत असतो की कमीत कमी भांडवल घालून जास्तीत जास्त नफा मिळेल. थोडे भांडवल घालून तो छोटासा धंदा चालू करतो व हळूहळू भांडवल वाढवीत व्यापार वाढवू लागतो

व एक दिवस मोठा व्यापारी होऊन सेठ सावकार बनतो. त्याचप्रमाणे संसारदरिद्रतेने दरिद्री भव्य जीव संपन्न होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. **मोक्षरूपी श्रीमंती प्राप्त करण्यासाठी 'समता' हा कमी भांडवलामध्ये चालणारा व अधिकात अधिक कर्मनिर्जरारूपी नफा मिळवून देणारा उत्कृष्ट व्यापार आहे.**

'समतारूपी' व्यापारासाठी दोनच भांडवल पाहिजे. १) आपला आत्मा व २) अन्तर्मुख उपयोग. हे भांडवल घालून जो भव्य जीव 'समतारूपी' व्यापार चालू करून हळूहळू वाढवत जातो तो थोड्याच काळात मोक्षरूपी संपत्ती प्राप्त करतो व खरा श्रीमंत होतो. ज्यांनी ज्यांनी आजपर्यंत निर्वाणसंपत्ती प्राप्त केली त्यांनी समतारूपी व्यापारानेच प्राप्त केली आहे, म्हणून ज्याला संसार दरिद्रता हटवून अनंतगुणरूपी वैभवाने संपन्न मोक्षश्रीमंती मिळवायची असेल त्याने समतारूपी व्यापार सुरू करावा. त्याला लागणारे भांडवल प्रत्येकाजवळ सहज उपलब्ध आहे.

अशाप्रकारे समताभावाच्या माध्यमातून प्रवचनसारग्रंथाच्या प्रारंभीच आचार्य जीवनस्वातंत्र्याचा मूलमंत्र आपल्याला देतात. **जीवनस्वातंत्र्याच्या प्राप्तीचा मूलभूत उपाय समता भाव आहे.**

सरागचारित्र : एक पडाव –

साम्यभाव म्हणजेच वीतरागचारित्र. तेच कषायमलकलंकाने रहित असल्यामुळे निर्वाणप्राप्तीचे कारण आहे. परंतु त्या वीतरागचारित्राला प्राप्त करीत असताना सरागचारित्र हे नियमाने प्राप्त होते. कोणताही जीव मिथ्यात्वातून एकदम वीतरागचारित्राचा आश्रय करून मोक्षाला प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून आचार्यांनी सरागचारित्राचे 'क्रमादापतितमपि' (क्रमाने प्राप्त झाले तरी) असे विशेषण ठेवले आहे. सरागचारित्र हे मोक्षमार्गामध्ये नियमाने प्राप्त होते, पण ज्ञानी जीव त्याला हेय मानतो. त्यासाठी टीकेत शब्द ठेवला आहे. 'दूरमुत्क्रम्य' (दुरूनच उल्लंघन करून) टीकेतील हे दोन शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

ज्याप्रमाणे आपण एखाद्या ठिकाणी जाण्याचा निर्णय करतो. त्यानंतर त्या स्थानाकडे जाणाऱ्या मार्गाची चौकशी करून त्याप्रमाणे त्या मार्गावरून जाण्यास प्रारंभ करतो. त्या स्थानाकडे जात असताना मार्गामध्ये अन्य अनेक

स्थाने लागतात. जसे रेल्वेतून कोल्हापूरहून मुंबईकडे प्रवास करताना मध्ये क्रमाने मिरज, सातारा, पुणे इत्यादी अनेक स्टेशन येतात. आपल्याला मुंबईलाच जायचे हे निश्चित आहे; परंतु ही मधली स्टेशने पार केल्याशिवाय मुंबई येणार नाही हे ही निश्चित आहे. मधल्या स्टेशनावर गाडी काही वेळ थांबते. त्यावेळी आपण गाडीतून खाली उतरतो. इकडे तिकडे फिरतो. काही आवश्यक वस्तू विकत घेतो. परंतु हे सर्व करीत असताना प्रत्येक क्षणी आपल्याला जाणीव असते की हे स्टेशन सोडून आपल्याला पुढे जायचे आहे. म्हणून तेथे रमत नाही. सतत गाडीच्या सिग्नलकडे लक्ष असते. मला मुंबईला पोहचायचे आहे हे विसरत नाही.

त्याप्रमाणे मोक्ष हे आपले अन्तिम गन्तव्य स्थान आहे. याचा जर निर्णय झाला असेल तर मोक्षापर्यंत पोहचण्याचा जो मार्ग आहे त्याचे ज्ञान करून त्यावरून भव्य जीव गमन प्रारंभ करतो. जात असताना मार्गामध्ये चतुर्थ गुणस्थानादी अनेक स्थाने लागतात. त्या स्थानांमध्ये थांबून ज्ञानी जीव आहार, विहार, निहारादी सर्व क्रिया करतो; परंतु त्याला सतत अंतरंगात जाणीव असते की आपल्याला येथे जास्त काळ थांबायचे नाही. हे सोडून पुढे जायचे आहे. आपले गन्तव्य स्थान मोक्ष आहे. शुभोपयोगरूप सरागचारित्राचे सुद्धा अवलंबन घेतो; पण त्यासंबंधी हेयबुद्धी असते अर्थात हे मला सोडायचे आहे याची सतत जाणीव असते. ज्याप्रमाणे म्हातारा काठीच्या आधाराशिवाय चालू शकत नाही त्याप्रमाणे ज्ञानी सरागचारित्राचे अवलंबन घेतल्याशिवाय मोक्षमार्गावरून चालू शकत नाही.

मोक्षप्राप्तीच्या पद्धती–

ज्याप्रमाणे दिल्लीला जाणाऱ्या काही रेलगाड्या सुपरफास्ट आहेत, काही थोड्या फास्ट व काही पॅसेंजर आहेत. सुपरफास्ट गाड्या सर्व स्टेशनांवर थांबत नाहीत. मुख्य जंक्शनवर थांबतात, थोड्या फास्ट गाड्या त्यापेक्षा जास्त स्टेशनांवर थांबतात व पॅसेंजर गाड्या प्रत्येक स्टेशनावर थांबतात. त्याचप्रमाणे मोक्षाला जाणाऱ्या पण तीन प्रकारच्या गाड्या आहेत. कोणी जीव पहिल्या गुणस्थानातून एकदम सातव्या गुणस्थानात जातो तेथून सहाव्या गुणस्थानात येऊन पुन्हा सातव्या गुणस्थानात जाऊन क्षपकश्रेणीवर आरोहण करून मोक्षाला प्राप्त होतो. तो चौथे, पाचवे गुणस्थान व उपशमश्रेणीवर

थांबत नाही. कोणी जीव सरळ पहिल्यातून पाचव्या गुणस्थानाला प्राप्त होऊन तेथून सातव्या-सहाव्या गुणस्थानाला प्राप्त होतो व क्षपकश्रेणी मांडून मोक्षाला जातो. कोणी जीव क्रमाने पहिल्यातून चौथ्या, नंतर पाचव्या नंतर सातव्या-सहाव्या गुणस्थानाला प्राप्त होतो पुन्हा सातव्यातून उपशम श्रेणीवर चढून खाली उतरून पुन्हा क्षपक श्रेणी चढून मोक्षाला प्राप्त होतो. परंतु तिन्ही गाड्यांना सातव्या-सहाव्या गुणस्थानांत नियमाने थांबावे लागते. म्हणून सरागचारित्र हे क्रमाने प्राप्त होणारच; परंतु तेथे रममाण न होता वीतराग चारित्राचा आश्रय घेण्याची आचार्य प्रतिज्ञा करतात.

अट्ठावीस मूलगुण पालन करणे, शास्त्रस्वाध्याय, धर्मोपदेश, शास्त्र लिहिणे, पंचपरमेष्ठींची भक्तिरूप परिणाम हे सराग चारित्र आहे व आपल्या शुद्धात्मस्वरूपामध्ये रममाण होणे हे वीतराग चारित्र आहे.

मोक्षयात्रेतील आनंद-

प्रवासाला जाताना इच्छित स्थानाला पोहचेपर्यंत वाटेत कोणकोणती स्थाने लागतात याची आपण माहिती करून घेतो. त्यापैकी पहिल्या स्थानाला पोहचेपर्यंत प्रथम त्याचा रस्ता विचारतो. ते स्थान आले की आपल्याला आनंद होतो. थोडे हायसे वाटते व विश्वास येतो की आपण योग्य मार्गावर आहोत. तेथे पोहचताच पुढचा रस्ता विचारतो व तेथे पोहचण्याची ओढ लागते. तेथे पोहचल्यावर पूर्वीपेक्षा आनंद अधिक मिळतो. अशाप्रकारे अन्तिम स्थान प्राप्त होईपर्यंत पुढच्या पुढच्या स्थानाला प्राप्त करण्याची ओढ व तेथे पोहचल्यावर अधिक-अधिक आनंद व उत्साह वाढत जातो. अन्तिम स्थानाला पोहचल्यावर पूर्ण निराकुल व परिपूर्ण आनंदी होतो. हा आपला प्रत्यक्ष अनुभव आहे. मोक्षरूपी प्रवासाचे सुद्धा असेच आहे. मोक्षाला पोहचेपर्यंत वाटेत कोणकोणती स्थाने आहेत याचे आपण ज्ञान करून घेतो. त्यापैकी प्रथम स्थानाला अर्थात चतुर्थ गुणस्थानाला प्राप्त कसे करायचे याचा रस्ता विचारतो. त्या मार्गानुसार गेल्यावर चतुर्थ गुणस्थान प्राप्त होते तेव्हा या जीवाला अभूतपूर्व आत्मिक आनंद मिळतो. या संसाररूपी जंगलामध्ये थोडे हायसे वाटते व आपण मोक्षमार्गावर आहोत याचा विश्वास येतो. परंतु तेथे पोहचताच पुढच्या व्रतरूप स्थानाला प्राप्त करण्याची ओढ लागते. तेथे पोहचल्यावर पूर्वीपेक्षा अधिक आनंदाचा अनुभव होतो. तेथून तो सकल

संयमरूपी स्थानाला प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. या सकलसंयमाला प्राप्त होताच पूर्वीपेक्षा अधिक आनंदाचा भोग घेतो. अशाप्रकारे मोक्षरूपी स्थान प्राप्त होईपर्यंत पुढच्या पुढच्या गुणस्थानाला प्राप्त होत अधिकाधिक आनंद मिळवत जातो. मोक्षरूपी स्थानाला पोहचल्यावर पूर्ण निराकुल व परिपूर्ण अनंतसुखाचा अनुभव करतो.

पाचव्या गाथेमध्ये समताभावाला अर्थात वीतरागचारित्राला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा केल्यानंतर लगेच सहाव्या गाथेमध्ये त्या वीतरागचारित्राच्या फळाचे वर्णन करतात. वीतरागचारित्र इष्ट फळ देणारे असल्यामुळे ग्रहण करण्यायोग्य आहे व सरागचारित्र अनिष्ट फळ देणारे असल्यामुळे सोडण्यायोग्य आहे.

एखाद्या दुकानामध्ये आपण माल खरेदी करायला गेलो की दुकानदार आपल्यासमोर हलक्या- भारी, अनेक प्रकारच्या वस्तू समोर ठेवतो व त्याचे गुणधर्म सांगत असतो. त्या वस्तूच्या वापरामुळे किती फायदे होतात हे तो सांगत असतो. त्याचबरोबर जी हलकी वस्तू आहे त्याचे तोटेपण सांगतो. ते ऐकल्यावर ग्राहकाच्या मनावर त्याचा प्रभाव होतो व तो ती भारी वस्तू खरेदी करायला प्रवृत्त होतो. आचार्यसुद्धा आपले दुकान मांडून बसले आहेत. वीतरागचारित्र व सरागचारित्र हा दोन प्रकारचा माल आहे. त्यातील वीतरागचारित्ररूप मालाचे फायदे सांगून त्याला ग्रहण करण्यासाठी प्रवृत्त करतात व सराग चारित्ररूपी मालाचा हलकेपणा सांगून त्यापासून परावृत्त करतात. सरागचारित्र व वीतराग-चारित्राचे फळ सांगून त्यांच्या हेय-उपादेयतेचे विश्लेषण करतात.-

संपज्जदि णिव्वाणं देवासुरमणुयरायविहवेहिं।
जीवस्स चरित्तादो दंसणणाणप्पहाणादो ।।६।।

अन्वयार्थ - (जीवस्स) जीवाला **(दंसणणाणप्पहाणादो)** दर्शनज्ञान प्रधान **(चरित्तादो)** चारित्राने **(देवासुरमणुयरायविहवेहिं)** देवेन्द्र, असुरेन्द्र व मनुष्येंद्राच्या वैभवाबरोबर **(निव्वाणं)** निर्वाण **(संपज्जदि)** प्राप्त होतो.

या जीवाला सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाच्या प्रधानतेपूर्वक सम्यक्चारित्राचे पालन केल्यामुळे देव, असुर, चक्रवर्ती आदींच्या विभूतिसहित निर्वाण प्राप्त

होते. अर्थात वीतराग चारित्रामुळे निर्वाण प्राप्त होते आणि सरागचारित्रामुळे देवेन्द्रादी लौकिक विभूती प्राप्त होते, म्हणून सरागचारित्र हेय आहे व वीतरागचारित्र उपादेय आहे.

चारित्राचे मूळ : सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान –

ज्याप्रमाणे बीशिवाय वृक्षाची उत्पत्ती होत नाही त्याप्रमाणे सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानरूपी बीशिवाय चारित्ररूपी वृक्ष उत्पन्न होत नाही. वीतरागचारित्र असो की सरागचारित्र असो, ते सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानपूर्वकच होते. त्याने रहित चारित्र मिथ्याचारित्रच आहे. ते सम्यक्पणाला प्राप्त होत नाही म्हणून चारित्रापूर्वी जो सम्यक् शब्द लावला आहे तो अज्ञानपूर्वक चारित्राचा निषेध करण्यासाठीच. अज्ञान व अश्रद्धापूर्वक सेवन केलेले औषध लाभदायक नसते. प्रथम औषधाचे गुणधर्म जाणले पाहिजेत की अमुक औषध अमुक रोगाला दूर करणारे आहे. त्यानंतर श्रद्धान पाहिजे की 'हे औषध माझा रोग नियमाने दूर करणारे आहे.' तत्पूर्वक औषधाचे सेवन केले तर निश्चितपणे रोग दूर होतो.

एकदा एक रोगी वैद्याजवळ गेला. त्याने वैद्याला सांगितले माझ्या पोटात खूप दुखते. वैद्यांनी उपाय सांगितला की, 'तू कंटकारिचूर्ण पाण्याबरोबर तीन वेळा घे व लंघन कर.' बरं म्हणून रोगी निघून गेला. त्याने औषधाचा अर्थ लावला कंटक म्हणजे काटा व अरि म्हणजे शत्रू. काट्याचा शत्रू कोण? असा विचार केला असता त्याला लक्षात आले की चप्पल. कारण चप्पल घातले असता काटा टोचत नाही. त्याने चप्पल घेतले व त्याचे चूर्ण करून तीन वेळा घेतले. वैद्यांनी लंघन करण्यास सांगितले आहे. लंघन म्हणजे उल्लंघन. म्हणून तो एका ओढ्यावरून इकडून तिकडे व तिकडून इकडे उड्या मारून त्याला उल्लंघू लागला. त्याची पोटदुखी अधिकच वाढली. त्याने पुन्हा वैद्याजवळ जाऊन तक्रार सांगितली. वैद्यांनी विचारले कोणते औषध घेतले ते दाखव. त्यांनी आपण केलेली सर्व प्रक्रिया सांगितली. वैद्यांनी डोक्याला हात लावला. 'अरे मूर्खा, कंटकारि नावाचे चूर्ण मिळते ते घेऊन ये व त्याचे सेवन कर व लंघन म्हणजे जेवण न घेता पोट मोकळे ठेवणे'. अशाप्रकारे केल्यावर त्याची पोटदुखी थांबली. सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, ज्याप्रमाणे ज्ञान व श्रद्धानाने रहित सेवन केलेले औषध लाभदायक नसते. त्याप्रमाणे ज्ञान व

श्रद्धानरहित चारित्र सम्यक्चारित्र नाही. कितीही कठोर, घोर चारित्राचे पालन केले तरी निरोगतारूप अर्थात कर्मनिर्जरारूप फळाची प्राप्ती होणार नाही. म्हणून सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाला मोक्षाचा पाया म्हटले आहे.

सरागचारित्राची हेयता व वीतरागचारित्राची उपादेयता –

आत्मस्वरूपाचे ज्ञान व आत्मस्वरूपाचे श्रद्धानपूर्वक आत्मस्वरूपामध्ये स्थिरता हेच निश्चयचारित्र आहे, यालाच वीतरागचारित्र म्हणतात. वीत म्हणजे निघून गेलेला आहे राग ज्यातून ते वीतरागचारित्र होय. अर्थात जेथे शुभ व अशुभ रागाचा सद्भाव नाही. आपल्या शुद्ध आत्म्यामध्ये लीनता आहे तो शुद्धोपयोगच वीतरागचारित्र आहे. या निश्चय चारित्राच्या प्राप्तीसाठी जे महाव्रत, समिती–गुप्तिरूप व्यवहारचारित्र पाळले जाते त्यामध्ये सरागता असते. हे आत्म्यामध्ये स्थितिरूप चारित्र नाही. कारण जीवांच्या कल्याणासाठी धर्मोपदेश देणे, शास्त्र लिहिणे, भूमी पाहून गमन करणे, प्रतिक्रमण म्हणणे इत्यादी जितकी कार्ये इच्छापूर्वक केली जातात त्यामध्ये मंदकषायरूप संज्वलन रागाचा उदय आहे. म्हणून यास सराग चारित्र म्हणतात. या सराग चारित्रामध्ये जेवढा राग अंश आहे तेवढ्या अंशाने पुण्यकर्माचा बंध होतो आणि पुण्यकर्माच्या उदयाने देवगती व मनुष्यगती प्राप्त होते. जेवढे विशेष पुण्य असते तेवढे विशेष पद अहमिंद्र, इन्द्र, चक्रवर्ती आदी प्राप्त होते. ते पद प्राप्त झाल्यावरसुद्धा सम्यग्दृष्टी ज्ञानी जीव त्यामध्ये आसक्त होत नाही. उदयात आलेल्या पुण्यफळाला सुद्धा समताभावाने भोगतो व निरन्तर भावना करतो की मी कधी वीतरागचारित्राला प्राप्त करून निर्वाणसुखाला प्राप्त होईन? म्हणून सरागचारित्राला परंपरेने मोक्षाचे कारण म्हटले आहे.

रागप्रमाण बंध व चारित्रप्रमाण संवर– निर्जरा–

सरागचारित्रामध्ये जो राग आहे तोच हेय आहे, चारित्र हेय नाही. राग आणि चारित्र दोन्ही एकाच गुणाचे पर्याय आहेत. चारित्र स्वभाव पर्याय आहे व राग विभाव पर्याय आहे. एकावेळी एकच पर्याय असतो. परन्तु खालच्या गुणस्थानांमध्ये मिश्र परिणमन आहे. जेवढा अनन्तानुबन्धी आदी कषाय अंश दूर झाला आहे तेवढ्या अंशाने चारित्र आहे व जेवढ्या अंशाने कषाय अंश शिल्लक आहे तेवढ्या अंशाने राग आहे. जेवढा चारित्राचा अंश आहे तो

संवर-निर्जरेला कारण आहे. जेवढा रागांश आहे, तेवढा आस्रवबंध आहे.

हेच पुरुषार्थसिद्ध्युपायामध्ये सांगितले आहे.-

येनांशेन सुवृत्तं तेनांशेनास्य बन्धनं नास्ति।

येनांशेन तु रागस्तेनांशेनास्य बन्धनं भवति।।

विभाव पर्याय बंधाचे कारण आहे. स्वभाव पर्याय बंधाचे कारण नाही. स्वभाव पर्याय बंधाचे कारण होऊ लागले तर कधीही मुक्ती होणार नाही. ज्या गुणस्थानापर्यंत राग व्यक्त आहे तेथपर्यंत सरागचारित्र आहे आणि त्याच्यावर वीतरागचारित्र आहे. सरागचारित्र हेय आहे. याचा अर्थ चारित्राबरोबर असणारा राग भाव हेय आहे. चारित्र हेय नाही. '**रागद्वेषनिवृत्त्यै चरणं प्रतिपद्यते साधुः।**' साधू रागद्वेषाला दूर करण्याकरिताच चारित्राचा अंगीकार करतात.

प्रश्न- गाथेमध्ये चारित्राबरोबर असणाऱ्या रागाचे फळ देवेन्द्र, असुरेन्द्र व चक्रवर्तीची संपत्ती सांगितली आहे मग प्रश्न पडतो की सम्यग्दृष्टी भवनत्रिकामध्ये उत्पन्न होत नाही तर त्याला असुरेन्द्राचे वैभव प्राप्त होते असे कसे सांगितले?

उत्तर- हो, बरोबर आहे की सम्यग्दृष्टी असुरेन्द्रांमध्ये उत्पन्न होत नाही. परन्तु ज्यांनी पूर्वी सम्यक्त्व अवस्थेमध्ये देवायूचा बन्ध केलेला आहे तो नंतर निदानबंध करून सम्यक्त्वाची विराधना करतो. तो मिथ्यात्व दशेमध्ये मरून असुरेन्द्रांमध्ये उत्पन्न होऊ शकतो. पुन्हा तेथे जाऊन सम्यक्त्वाला प्राप्त करू शकतो. सम्यक्त्वरूपी अंगरक्षक जोपर्यंत बरोबर आहे तोपर्यंत कशाचीही भीती नाही, कोणीही लुटू शकत नाही, वार करू शकत नाही; परंतु जर सम्यक्त्वरूपी अंगरक्षक दूर गेला की हा जीव मिथ्यात्वरूपी लुटेरूच्या आधीन होतो. तो सर्वस्व लुटतो,आपली कोणतीही अवस्था करू शकतो.

ज्ञानीचे लक्ष्य साम्यभाव-

ज्ञानीची दृष्टी सरागचारित्रावर नसते तर साम्यभावरूप वीतरागचारित्राकडे असते. ज्ञानी विचारतो की जर मला स्वर्गादींची संपदा मिळाली तरी काय झाले? ही तर आकुलतेची जननी आहे. जोपर्यंत ही संपत्ती राहणार तोपर्यंत सदैव नवीन नवीन आकुलता उत्पन्न होत राहणार आणि जेव्हा या संपत्तीचा नाश होईल तेव्हा अत्यन्त संक्लेश उत्पन्न होईल. म्हणून मला

कोणताही परपदार्थ नको. मला फक्त माझा शुद्ध आत्मा पाहिजे. '**आत्माऽयमेकोस्तु नः**' ही भावना तो सतत करतो.

ज्ञानीजन संपदेची इच्छा करत नाहीत तर ती संपदाच ज्ञानींच्या मागे जाते. परंतु ज्ञानी तिच्यापासून अलिप्तच राहतो व तिला तुच्छ मानून तिचा त्याग करतो.

चक्रवर्तीकी सम्पदा, इन्द्रसारिखे भोग ।
कागवीट सम गिनत है वीतरागिया लोग ।।

ज्ञानीजन कर्मांच्या उदयवश भूमिकानुसार सर्व कार्ये करत असतानासुद्धा स्वभावामध्ये जागरूक असतात. त्यांची दृष्टी सदा आपल्या ज्ञातृत्व द्रष्टृत्व स्वभावावरच असते. सर्वांची दृष्टी आपापल्या कामावर असते. ज्याप्रमाणे बिल्डींग बांधणाऱ्याची दृष्टी सतत इमारतीवरच असते. २४ तास तो त्याचीच साधने गोळा करण्यामध्ये व्यस्त राहतो. त्याचप्रमाणे ज्ञानीची दृष्टी सदैव आपल्या स्वरूप प्राप्तीवर असते. तो सदैव त्याच्या प्राप्तीची साधने गोळा करण्यामध्ये व्यस्त असतो. त्यालाच साधना-आराधना म्हणतात. सामायिक, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, स्वाध्याय, ध्यान ही स्वभाव प्राप्तीची साधने आहेत.

लक्ष्मीचा हा स्वभाव आहे की जसजशी हिची इच्छा करतो तसतशी ही दूर पळते. राग, द्वेष, मोह हे बाण आहेत. ज्याप्रमाणे शरीरामध्ये घुसलेला बाण सदा टोचत राहतो, बाण काढल्यानंतर जीव निःशल्य होऊन सुखाचा अनुभव करतो, त्याचप्रमाणे जोपर्यंत राग, द्वेष मोहादिक राहणार तोपर्यंत जीव दुःखाचा अनुभव करतो; जेव्हा हे बाण निघून जातात तेव्हा निर्वाणाला प्राप्त होतो.

निश्चय चारित्राचे स्वरूप-

आता सातव्या गाथेमध्ये निश्चय चारित्राचे स्वरूप सांगतात. आचार्यांनी समताभावाला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्या प्रतिज्ञेशी ते एकनिष्ठ आहेत. आजकाल सभा होतात. त्यामध्ये एखाद्या कार्याचा ठराव केला जातो. पुन्हा काही दिवसांनी दुसरा ठराव पास केला जातो. पहिला ठराव कार्यरूपाने परिणत झाला की नाही हे पाहिले जात नाही. प्रत्येक मीटिंगमध्ये ठरावावर ठराव पास केले जातात; परंतु कार्य केले जात नाही. आचार्य मात्र समताभावाला प्राप्त करण्याचा ठराव करून लगेच त्याला अंमलात आणतात.

प्रस्ताव करा अथवा करू नका, केवळ कार्य प्रारंभ करा. कथनीपेक्षा करणी महत्त्वाची आहे.

चारित्तं खलु धम्मो धम्मो जो सो समोत्ति णिद्दिट्ठो ।
मोहक्खोहविहीणो परिणामो अप्पणो हु समो ।।७।।

अन्वयार्थ – (चारित्तं) चारित्र **(खलु)** वास्तविक **(धम्मो)** धर्म आहे. **(जो धम्मो)** जो धर्म आहे **(समो)** तो समताभाव आहे. **(त्तिणिद्दिट्ठो)** असे सांगितले आहे. **(समो हु)** साम्यभाव हा **(मोहक्खोहविहीणो)** मोह व क्षोभाने रहित **(अप्पणो परिणामो)** आत्म्याचा परिणाम आहे.

खरोखर चारित्र धर्म आहे. जो धर्म आहे तो साम्यभाव आहे असे सांगितले आहे. आत्म्याचा मोह आणि क्षोभाने रहित परिणाम निश्चयाने साम्यभाव आहे.

धर्म अंगरक्षक –

शुद्ध चैतन्य स्वरूपामध्ये आचरण करणे चारित्र आहे. चारित्र धर्म आहे. कारण चारित्र वस्तूचा (आत्म्याचा) स्वभाव आहे. वस्तुस्वभावाला धर्म म्हणतात. 'धृ' धारण करणे या धातुपासून धर्म शब्द निष्पन्न झाला आहे. 'धरति इति धर्मः' जो मिथ्यात्वादिक भाव संसारामध्ये पडणाऱ्या प्राण्यांना तेथून उचलून शुद्ध चैतन्यस्वभावामध्ये ठेवतो तोच खरा धर्म होय. अर्थात दुःखातून काढून जीवाला सुखामध्ये ठेवतो तो धर्म. या जगामध्ये धर्म सोडून दुसरी कोणतीही वस्तू या प्राण्याला दुःखातून वर काढू शकत नाही. परंतु भ्रमामुळे हा प्राणी दुःखातून सुटण्यासाठी धर्माचा आश्रय न घेता दुःखाला कारणभूत असणाऱ्या अन्य पदार्थांचाच आश्रय घेतो. त्यामुळे दुःख दूर व्हायचे बाजूलाच राहिले उलट अधिक दुःखी होतो. 'धर्म बिन कोई नहीं अपना' ही गोष्ट सतत लक्षात ठेवावी व धर्म म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपलाच आत्मलीन परिणाम आहे. म्हणून धर्म स्वतःच्या आश्रयानेच होतो. तो धर्म म्हणजेच समतारूप परिणाम आहे.

सर्व दुःखाचे मूळ : मोह –

समताभाव म्हणजे सर्व परद्रव्यासंबंधी राग, द्वेष, मोहरहित परिणाम. मोह म्हणजे दर्शनमोह व क्षोभ म्हणजे चारित्रमोह अर्थात राग व द्वेष. सर्व

दु:खांची मूळजननी 'मोह' आहे. मोह म्हणजे मिथ्या मान्यता. मोहामुळेच हा प्राणी परवस्तूला आपल्या सुखदु:खाचे कारण मानतो. त्यामुळे पराधीन होऊन दु:खी होतो. मोहच दु:खाचे कारण आहे. परवस्तू दु:खाचे कारण नाही.

एक शेठजी एकदा आपल्या पत्नीला व लहान मुलाला सोडून परदेशामध्ये व्यापार करण्यासाठी गेले. १२ वर्षे पूर्ण झाले तरी शेठजी परत आले नाहीत. पत्नीला चिन्ता झाली म्हणून तिने मुलाला सांगितले की 'बाळ १२ वर्षे झाले तरी तुझे वडील अजून परत आले नाहीत. तू जाऊन त्यांचा शोध घे' नाव व पत्ता सांगून मुलाला पाठविले. तो मुलगा गावोगावी पत्ता विचारत पुढे गेला. तिकडून शेठजीसुद्धा गावी जाण्यासाठी निघाले होते. ते वाटेत ज्या धर्मशाळेत थांबले होते. भाग्यवश मुलगासुद्धा त्याच धर्मशाळेत जाऊन थांबला. अर्ध्या रात्री मुलाला पोटात जोरात दु:खू लागले. प्रवासातील श्रमामुळे खूप ताप चढला होता. वेदना सहन न झाल्यामुळे तो जोरजोरात ओरडू लागला. त्या आवाजाने शेठजींची झोप उडाली. मॅनेजरला बोलावून त्यांनी विचारले हे कोण ओरडतय? आम्हाला झोप लागत नाही. कित्येक रात्री आम्ही जागलेलो आहोत. याला येथून बाजूला काढा. बिचारा वेदनेने तडफडत होता. त्याची सेवा शुश्रूषा करायचे तर लांबच त्याला विचारलेसुद्धा नाही व त्याला धर्मशाळेच्या बाहेर काढले. दुसऱ्या दिवशी शेठजींनी आपल्या गावाचा रस्ता पकडला. काही दिवसातच शेठजी घरी पोहोचले. घरी पोहचताच त्यांनी मुलाची चौकशी केली. पत्नीने सांगितले तो तुम्हाला शोधायलाच बाहेर गेला आहे. काय रस्त्यात तुमची त्याची भेट झाली नाही? त्याला जाऊन कित्येक दिवस झाले. शेठजी घाबरून त्याला शोधायला निघाले.

वाटेत सर्व धर्मशाळेत विचारत गेले. शेवटी त्याच धर्मशाळेत आले की शेठजी त्या रात्री ज्या धर्मशाळेत उतरले होते. मॅनेजरला आपल्या मुलाचे नाव सांगून विचारले की या नावाचा मुलगा तुमच्या धर्मशाळेत आला आहे का? त्यांनी रजिस्टर पाहून सांगितले,'अहो! शेठजी, ज्या रात्री आपण येथे राहिला होता त्याच रात्री या नावाचा मुलगा येथे राहिला होता.' शेठजींना थोडे लक्षात येऊ लागले आणि त्यांचे हातपाय कापू लागले. पुन्हा विचारले,' मग तो कोठे गेला?' मॅनेजरनी सांगितले,'रात्री त्याच्या पोटात जोरात शूळ उठला.

तो वेदनेमुळे ओरडू लागला. तुमची झोप उडाली म्हणून तुम्ही रागाने त्याला बाहेर काढायला लावले. दुसऱ्या दिवशी तुम्ही निघून गेला परंतु तो बिचारा तडफडत मरण पावला.' हे ऐकताच शेठजी बेशुद्ध होऊन पडले. जेव्हा शुद्धीवर आले तेव्हा आक्रोश करू लागले. कपाळ बडवून घेऊ लागले. आता तुम्हीच सांगा. ह्या शेठजींना दु:ख कशामुळे झाले? तर मोहामुळे. जोपर्यंत त्या मुलाशी मोह नव्हता, तो माझा आहे हे माहीत नव्हते तोपर्यंत त्याला तडफडत असताना पाहून साधी दया सुद्धा आली नाही. उलट निर्दयी होऊन धर्मशाळेतून काढून टाकायला लावले आणि जेव्हा तो माझा मुलगा आहे हे कळताच त्याची वाईट बातमी ऐकून मूर्च्छित झाले. यावरून लक्षात येते की **सर्व दु:ख मोहाचे आहे. जर मोह आहे तर मनुष्य दु:खी आहे व मोह नाही तर तो सुखी आहे.**

ज्या ज्ञानीला जगातील अनन्त पदार्थांसंबंधी हा भाव जागृत झाला की या जगातील कोणताही पदार्थ माझा नाही, चांगला नाही किंवा वाईट नाही, त्याचे सर्वात मोठे दु:ख नष्ट झाले. आम्हालासुद्धा सर्व परपदार्थासंबंधी मोह दूर केला पाहिजे तरच आमचे दु:ख संपेल आणि समभाव प्राप्त होईल. या समताभावाला प्राप्त करण्यासाठीच सर्व धार्मिक आयोजन आहे. म्हणून प्रत्येक धर्मकार्य करीत असताना समताभावाला लक्ष्य करावे. समताभाव प्राप्त करण्यासाठीच मी ही धार्मिक क्रिया करीत आहे हे विसरू नये. समताभावरूपी फळ मिळाले तर पूजा, स्वाध्याय, ध्यान इत्यादी क्रिया सफल आहेत. समताभावरूपी फळ मिळाले नाही तर विचार करावा की माझ्या आराधनेमध्ये काही तरी चुकते आहे. स्वत:चे परीक्षण स्वत:च करायला शिकले पाहिजे. **आपण स्वत: सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानरूपी बी पेरून चारित्ररूपी वृक्षाचे संगोपन व संवर्धन केल्याशिवाय आपल्याला समताभावरूपी गोड फळ चाखायला मिळणार नाही हे लक्षात ठेवावे.**

चारित्राचे खरे स्वरूप –

चारित्रावर जोर देत असताना 'चारित्तं खलु धम्मो' या सूत्राचा पुरावा सर्वजण देतात. परंतु चारित्र शब्दाचे वाच्य जाणणारे लोक विरळ आहेत. ज्या ज्या वेळी चारित्राची चर्चा येते त्यावेळी बाह्य क्रियाच आम्हाला चारित्ररूप भासित होते. चारित्र धारण करायचे म्हणजे अमुक क्रिया पार पाडायच्या असे

मानून बसलो आहोत. त्यामुळे चारित्र कठीण वाटते. ज्याला चारित्र समजून घ्यायचे असेल त्यांनी प्रथम इन्द्रिये बंद केली पाहिजेत. इन्द्रियांच्याद्वारे जर मुनींच्या चारित्राकडे पाहू लागलो तर चारित्र निष्फळ वाटते व दुःखरूप भासित होते. डोळ्यांनी आम्ही पाहतो की थंडीच्या दिवसात भयानक थंडी आहे. मुनींच्या अंगावर कपडे नाहीत. पांघरूण नाही. त्यांना किती सहन करावे लागते. थंडी सहन करणे म्हणजे मुनिपणा असे मानून बसतो. थंडी, ऊन, पाऊस सहन करणे, कपडे न नेसणे, दात न घासणे, परीषह सहन करणे म्हणजे मुनिपणा अशी व्याप्ती केली तर तिर्यंचांना देखील मुनी मानावे लागेल.

इंद्रियज्ञानाने पाहतो की मुनी झाल्यावर सर्व लोक त्यांना मोठे मानतात. पूजा, वंदना, सत्कारादी करतात म्हणून मान कषायाच्या पूर्तीसाठी मुनिपद धारण करण्याचा प्रयत्न करतो. म्हणून इंद्रिये बंद ठेवून चारित्राकडे पहावे. चारित्र अतीन्द्रिय आहे. चारित्र आत्माश्रित आहे. म्हणून आचार्यांनी चारित्राची व्याख्या '**स्वस्वरूपे चरणं चारित्रं स्वसमयप्रवृत्तिरित्यर्थः**' अशी केली आहे. आपल्या स्वरूपामध्ये विचरण करणे, शुद्ध चैतन्यस्वरूपामध्ये राहणे चारित्र होय. स्वसमयप्रवृत्ती म्हणजे आपल्या शुद्ध आत्म्यामध्ये आपला उपयोग राहणे. ज्ञानाचे ज्ञानरूपाने परिणमन हेच चारित्र आहे. चारित्र आत्म्याचा गुण आहे म्हणून तो आत्म्यातच सापडणार, बाहेर नाही. चैतन्यरत्नाकरामध्ये डुबकी मारून खोल उतरले असता चारित्ररत्न प्राप्त होते.

जेथली वस्तू तेथेच ठेवावी. जी वस्तू जेथे आहे तेथेच ठेवतो तो श्रमण आहे. आम्ही जीवाच्या ठिकाणी पुद्गलाला ठेवतो व पुद्गलाच्या ठिकाणी जीवाला ठेवतो. सर्व इकडचे तिकडे व तिकडचे इकडे करून उथलपुथल करून टाकले आहे. आपले चारित्र आपल्या जागी ठेवतो तो श्रमण आहे. जीवाच्या आश्रयाने मुनी बनू शकतो शरीराच्या आश्रयाने नाही. शरीर अनंत वेळा मुनी झाले. पण जीव कधी मुनी झाला नाही म्हणून संसार संपला नाही. त्यासाठी चारित्राचे स्वरूप यथार्थ समजणे आवश्यक आहे. ज्ञानामध्ये चारित्राचा विचार करू तर पर्यायामध्ये चारित्र येईल. याचा अर्थ बाह्य चारित्राचा निषेध नाही. जेथे अंतरंग चारित्र असते तेथे बहिरंग चारित्र असते. परंतु अंतरंग चारित्राशिवाय बाह्यचारित्र धर्म नाही. अंतरंग चारित्राबरोबर बाह्यचारित्र असते म्हणून त्यालाही उपचाराने चारित्र म्हटले आहे. परंतु

अज्ञानी अंतरंग चारित्र न जाणता बाह्यचारित्राचे अनुकरण करून मी चारित्र अंगीकारले असे मानतो. ज्याप्रमाणे एक बाई तांदुळासाठी भातकूट कुटत होती. तिचे अनुकरण करून कोणी केवळ फोलपट कुटत बसला तर त्याला तांदुळाची प्राप्ती होणार नाही. त्याप्रमाणे अंतरंग चारित्रसहित बहिरंग चारित्राचे पालन करणाऱ्या मुनींना पाहून वरकरणी दिसणाऱ्या बाह्यचारित्राचे अनुकरण केले तर खऱ्या चारित्राची प्राप्ती होणार नाही.

सच्चारित्र हेच स्वातंत्र्य–

चारित्रच आत्मवस्तूचा स्वभाव असल्यामुळे धर्म आहे. **शुद्ध चैतन्याचे प्रकाशन होणे धर्म आहे. स्वत:ला स्वत:चा शुद्ध आत्मा प्रसिद्ध होणे म्हणजे धर्माची प्राप्ती आहे. हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे.** जेव्हा आत्मा आपल्या स्वरूपामध्ये मग्न होतो तेव्हा तो परिपूर्ण स्वतन्त्रतेचा अनुभव करतो. ज्याप्रमाणे कुणा पुरुषाच्या हातामध्ये सोने ठेवले आहे; परंतु जोपर्यंत हे भान नाही की 'हे सोने आहे' तोपर्यंत तो त्याची किंमत करत नाही. परंतु जेव्हा त्याला हे ज्ञान होते की हे सोने आहे, बहुमूल्य पदार्थ आहे तर तो त्याच समयापासून स्वयंच त्यामध्ये आदर आणि उपादेयबुद्धी करतो. त्याचप्रमाणे आपल्यामध्ये शुद्ध आत्मा आहे; परंतु जोपर्यंत त्याचे भान नाही तोपर्यंत त्याची महिमा येत नाही. जेव्हा स्वबोध जागृत होतो की मी निश्चयाने एक शुद्ध अखंड पदार्थ आहे, दर्शन ज्ञानमयी सदा अरूपी आहे. जगातील परमाणूमात्र परद्रव्य माझ्यामध्ये नाही. तेव्हा तो स्वचा आदर करतो. त्याच समयात दर्शनमोहाचा अभाव झाल्यामुळे त्याचा अज्ञान व मिथ्यात्वरूपी अंधकार दूर होतो व चिन्मय प्रकाश प्रगट होतो. त्याचबरोबर चारित्र मोहनीयाच्या अनंतानुबंधी कषायाचा अभाव झाल्यामुळे नाना प्रकारचा क्षोभ दूर होतो व परिणामामध्ये शमभाव अथवा साम्यभाव प्रगट होतो. अशाप्रकारे मोह आणि राग-द्वेषरूपी क्षोभ दूर झाल्यामुळे जो प्रकाश, जो समताभाव आत्म्यामध्ये उत्पन्न होतो त्यालाच धर्म म्हणतात. त्याचेच नाव चारित्र आहे. आत्मस्वरूपासंबंधी अज्ञानच अधर्म आहे व आत्मस्वरूपाचे ज्ञानच धर्म आहे.

आत्माच धर्म आहे –

आता पुढच्या गाथेमध्ये हे निश्चित करतात की आत्माच धर्म आहे.

धर्म बाजारात किंवा दुकानात विकत मिळणारी वस्तू नाही. दानाच्या मोबदल्यात मिळणारी वस्तू नाही, तीर्थयात्रा करून तीर्थक्षेत्रावरून प्राप्त होत नाही. गुरूंची सेवा, वैय्यावृत्त्य केल्यामुळे प्रसादरूपाने प्राप्त होत नाही. धर्म आपल्यापासून वेगळी वस्तू नाही. जेव्हा आत्मा परभावामध्ये परिणमन न करता आपल्या स्वभाव भावामध्ये परिणमन करतो तेव्हा आत्माच धर्मरूप होतो. धर्म हे एक वरदान आहे; परंतु अन्य कोणी दिलेले वरदान नाही तर आत्म्यानी आत्म्याला दिलेले वरदान आहे.

परिणमदि जेण दव्वं तक्कालं तम्मय त्ति पण्णत्तं।
तम्हा धम्मपरिणदो आदा धम्मो मुणेयव्वो।।८।।

अन्वयार्थ – (दव्वं) द्रव्य (ज्यावेळी) **(जेण)** ज्या भावरूपाने **(परिणमदि)** परिणमते **(तक्कालं)** त्यावेळी **(तम्मय)** त्याच्याशी तन्मय होते **(त्तिपण्णतं)** असे सर्वज्ञ भगवंतांनी सांगितले आहे. **(तम्हा)** म्हणून **(धम्मपरिणदो)** धर्मपरिणत **(आदा)** आत्मा **(धम्मो)** धर्म आहे असे **(मुणेयव्वो)** जाणावे.

द्रव्य ज्या समयी ज्या अवस्था किंवा भावरूपाने परिणमते त्या समयी ते द्रव्य त्या भावाशी तन्मय होते असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे. म्हणून धर्म भावाने परिणत आत्मा धर्मरूप जाणावा.

ज्याप्रमाणे उष्णत्वरूपाने परिणत लोखंडाचा गोळा उष्णरूप होतो त्याप्रमाणे धर्मरूपाने परिणत आत्माच धर्ममय होतो. कारण वस्तुतत्त्वाची अशी व्यवस्था आहे की ज्यावेळी जे द्रव्य ज्या भावरूपाने परिणमते त्यावेळी ते द्रव्य त्या भावाशी तन्मय होते. उष्णरूपाने परिणत लोखंडाच्या गोळ्याला सर्व लोक उष्णच मानतात. कारण त्यावेळी लोखंडाचे जितके शीत परमाणू होते ते आता शीत पर्यायाला सोडून उष्णरूपाने परिणमले आहेत. ज्याप्रमाणे व्यवहारामध्ये पिवळ्या रंगरूपाने परिणत आंब्याला पिवळा म्हणतात. गोडरस रूपाने परिणत आंब्याला गोड, सुगंधरूपाने परिणत आंब्याला सुगंधी, मऊरूपाने परिणत आंब्याला मऊ म्हटले जाते; कारण आंबा पिवळा वर्ण, गोडरस, सुगंध व मऊ स्पर्शरूपाने परिणमला आहे. त्याप्रमाणे क्रोधभावाने परिणत आत्म्याला क्रोधी, मानरूपाने परिणत आत्म्याला मानी, धर्मभावाने परिणत आत्म्याला धर्म म्हटले आहे. हे उपर्युक्त कथन पर्यायार्थिकनयाच्या

मुख्यतेने आहे व अभेदोपचार आहे. पर्यायार्थिक नयाने पाहिले असता ज्यावेळी जी पर्याय असेल त्यावेळी ते द्रव्य त्या पर्यायरूपच भासित होते.

उपर्युक्त सिद्धान्तामध्ये तीन नियम दडले आहेत **१) जे द्रव्य ज्या पर्यायरूपाने परिणमते तेच द्रव्य त्या पर्यायाशी तन्मय होते, अन्य द्रव्य नाही. २) ज्या काळामध्ये परिणमते त्याच काळामध्ये तन्मय होते, इतर काळी नाही. ३) ज्या भावरूपाने परिणमते त्याच भावाशी तन्मय होते, अन्यभावाशी नाही.**

अज्ञानी जीव मात्र या तीन नियमांना यथार्थ न जाणता विपरीत रूपाने ग्रहण करतो. त्याचा खुलासा–

१) प्रथम सिद्धान्ताबद्दल विपरीत ग्रह–

जे द्रव्य ज्या भावरूपाने परिणमते त्या द्रव्याला त्या भावाशी तन्मय न मानता अन्य द्रव्याला त्याच्याशी तन्मय मानतो. शरीरातील पुद्गलपरमाणू उष्णरूपाने परिणमतात; परंतु अज्ञानी त्या पुद्गलपरमाणूंना उष्णमय न मानता जीवद्रव्यालाच उष्ण मानतो. शरीर तापले असता 'मला ताप आला' असेच मानतो. शरीरातील पुद्गलपरमाणू काळा, पांढरा, निळा इत्यादी वर्णरूपाने परिणमतात. हा जीव स्वत:लाच काळा, गोरा, निळा इत्यादी रूपाने मानतो. पुद्गल व जीव हे दोन स्वतंत्र द्रव्य आहेत. या दोघांचे परिणमन स्वतंत्र आहे हे न जाणल्यामुळे अशाप्रकारची चूक होते. बालक, वृद्ध, तरुण अवस्थारूपाने शरीर परिणमते, परंतु हा जीव स्वत:लाच बालक, वृद्ध, तरुण मानतो आणि दु:खी होतो. स्वत:ला वृद्ध मानल्यामुळे वृद्धावस्थेत होणाऱ्या सर्व कमजोरी स्वत:च्या मानतो. माझे गुडघे दुखतात. मला ऐकू येत नाही. मला चावता येत नाही. मी शिथिल झालो आहे इत्यादी दु:खाचे अनुभव करतो. ज्याचे त्याचे परिणमन न स्वीकारल्यामुळे सर्व दु:ख आहे. **सर्व दु:खाचे मूळ स्वतन्त्रतेचा अस्वीकार आहे.**

भगवंतांची स्तुती करताना स्तुतीच्या वचनरूपाने भाषावर्गणा परिणमतात. परंतु ते न स्वीकारता स्वत:ला स्तुतिरूपाने परिणत मानतो. त्यामुळे मानकषाय उत्पन्न होतो. 'मी किती छान स्तुती करतो' किंवा कोणी स्तुती चांगली म्हटली नाही की क्रोध उत्पन्न होतो. वन्दना, पूजा इत्यादी क्रियारूपाने शरीर परिणमते त्या क्रियारूप स्वत:ला मानतो. ज्ञानीसुद्धा स्तुती, वन्दनादी करतो परंतु ते करीत असताना त्याला भेदविज्ञान असते की

स्तुतिरूपाने भाषावर्गणा परिणमतात, नमस्कारादी क्रिया शरीराच्या आहेत. मी स्तुती वन्दनादी करण्याच्या शुभभावरूपाने परिणमतो म्हणून त्यांचे स्वत:च्या परिणामाकडे अधिक लक्ष असते. क्रिया ह्या परिणामाच्या शुद्धीकरिता बाह्य अवलंबनमात्र आहेत. मनोवर्गणा मनरूपाने परिणमतात परंतु अज्ञानी स्वत:ला मनरूप मानतो. म्हणून तो मन-वचन-कायेचा स्वामी बनतो. कर्ता, भोक्ता होतो. अशाप्रकारे अज्ञानी बहिरात्मा एका द्रव्याच्या परिणमनाला दुसऱ्या द्रव्याचे परिणमन स्वीकारतो हेच संसार परिभ्रमणाचे मूळ कारण आहे.

२) दुसऱ्या सिद्धान्ताबद्दल विपरीत मान्यता-

द्रव्य ज्या काळामध्ये ज्या भावरूपाने परिणमते त्या काळात त्यारूप न मानता अन्य काळामध्ये त्यारूप मानतो अर्थात अन्यकाळातील परिणमन अन्य काळामध्ये स्वीकारतो. एखाद्या जीवाने भूतकाळात खूप पाप केले असेल व तो आता वर्तमानकाळात पापाचा त्याग करून धर्ममार्गाला लागला असेल तरी त्याची ही वर्तमान परिणती न स्वीकारता भूतकाळातील त्याचे परिणमन आठवून त्याची निंदा करतो. 'करून करून भागला देवपूजेला लागला' असे व्यंग्य करतो. किंवा कोणी पूर्वी आपल्याला शिवी दिली असेल, वाईट बोलले असेल ते लक्षात ठेवून वर्तमानात त्याचा द्वेष करतो, वैर धारण करतो. अशाप्रकारे दुसऱ्याचे भूतकाळातील परिणमन वर्तमानकाळात स्वीकारून हा जीव रागी द्वेषी होतो. त्यावेळी 'तक्कालं तम्मय त्ति पण्णत्तं' हा सिद्धांत विसरतो. परिणाम हे निरंतर बदलत असतात. आजचा अत्यंत पापी पुढच्या क्षणी पुण्यात्मा व त्यानंतर धर्मात्मा होऊ शकतो. महावीरांच्या पूर्वभवांची कथा पाहिली तर आपल्याला हे लक्षात येईल. सिंहपर्यायात हरिणाला फाडून खाणारा क्रूर सिंह एका क्षणात मुनींचा उपदेश ऐकून मंदकषायी होतो व सम्यग्दर्शन प्राप्त करतो. विद्युच्चरसारखा अट्टल चोर चोरी सोडून मुनी होतो.

मधुराजा मथुरेचे राज्य करीत होता. त्याला चमरेंद्रांनी त्रिशूलरत्न दिले होते, त्यामुळे त्याला जिंकणे कठीण होते. तरीसुद्धा शत्रुघ्नने रामाला मथुरेचे राज्य मागितले. शत्रुघ्नने मथुरेचे राज्य मिळविण्यासाठी सैन्यसहित तिकडे प्रयाण केले. तो मथुरेजवळ येऊन पोहोचला. गुप्तचरांनी बातमी आणली की राजा मधू आठ दिवसापासून कामासक्त होऊन उपवनामध्ये राण्यांच्याबरोबर

क्रीडा करीत आहे. तो त्रिशूलरत्नाने रहित आहे. ही संधी पाहून शत्रुघ्नने मथुरेला वेडा घातला व आयुधशाळेवर अधिकार जमविला. शत्रुघ्नने मथुरेमध्ये प्रवेश केला आहे हे ऐकून मधुराजा अत्यंत क्रोधाने उपवनातून नगराकडे आला. शत्रुघ्नाच्या सैन्यांनी त्याला नगरात प्रवेश करू दिला नाही. महा अभिमानी व कामान्ध मधूने त्रिशूलरहित असतानाही शत्रुघ्नाबरोबर युद्ध केले. युद्धामध्ये राजा मधूचा पुत्र लवणसागर मरण पावला. मुलाचा मृत्यू पाहून मधू अत्यन्त क्रुद्ध होऊन हत्तीवर चढून घोर युद्ध करू लागला. शत्रुघ्नाने त्याचे कवच बाणांनी तोडले.

राजा मधूने शत्रुघ्नाला अजेय समजून मुलाला प्राणरहित व स्वत:ला त्रिशूलरत्नाने रहित जाणून व आपले आयुष्य अल्प समजून हत्तीवर बसला असता तेथेच संसारापासून विरक्त झाला. चार प्रकारच्या आहाराचा त्याग करून दोन्ही प्रकारच्या परिग्रहाचा भावपूर्वक त्याग केला. हत्तीवर बसूनच केशलोच करू लागला. वीररस सोडून शांतरसामध्ये परिणत झाला. महा धैर्यपूर्वक अध्यात्म योगामध्ये आरूढ झाला. शत्रुघ्नने मधूची ही परमशांत अवस्था पाहून नमस्कार करून म्हणाला, 'हे साधो, माझा अपराध माफ करा, धन्य आहे आपले वैराग्य!' धीरवीर मधू क्षणमात्रामध्ये समाधिमरण करून तिसऱ्या स्वर्गामध्ये उत्कृष्ट देव झाला. अशाप्रकारे श्रृंगाररसातून वीररसामध्ये व वीररसातून शांतरसामध्ये किती शीघ्र परिणमन झाले हे मधुराजाच्या घटनेवरून लक्षात येते.

हा जीव स्वत:चे सुद्धा भूतकाळातील परिणाम आठवून त्याचा शोक करीत बसतो व भविष्यकाळातील परिणामाची चिन्ता करीत झुरतो. पर्यायार्थिकनयाने स्वत:ला व दुसऱ्याला वर्तमान काळातील परिणामरूपाने पहावे. कारण 'तक्कालं तम्मयं त्ति पण्णत्तं' 'भूतकाल सपना है, भविष्यकाल कल्पना है, वर्तमानकाल अपना है।' वर्तमानकाळात जगायला शिकले पाहिजे. संस्कृत सुभाषितकारसुद्धा म्हणतात.–

गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिन्तयेत् ।
वर्तमानेन कालेन वर्तयन्ति विचक्षणा: ।।

भूतकाळ निघून गेला आहे म्हणून त्याचा शोक करून उपयोग नाही. भविष्यकाळातील परिणाम अजून उत्पन्नच झाला नाही. तो कोणता परिणाम

उत्पन्न होणार हे आपल्याला माहीत नाही. काही वेळा 'असे पुढे होईल' म्हणून आपण चिन्ता करीत बसतो. परन्तु घडते मात्र वेगळेच, म्हणून भविष्यकाळाची चिंता करू नये. ज्ञानीपुरुष वर्तमान काळरूपाने वर्तन करतात. प्रत्येक समयात जे आपले परिणाम उत्पन्न होतात त्याच्याशी आपण तन्मय असतो म्हणून प्रत्येक क्षणात निजध्रुवज्ञानानंदस्वभावी आत्म्याला जाणण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे.

३) तृतीय सिद्धान्ताबद्दल भ्रम–

ज्या द्रव्याचा जो भाव (पर्याय) आहे त्याला त्या भावरूप न जाणता अन्य भावरूप जाणतो. जीव खाणे-पिणे इत्यादीच्या रागरूप अशुभ भावरूपाने परिणमतो. ते न समजता अज्ञानी, जीवाला खाणे पिणेरूप मानतो. 'मी जेवतो. मी जिलेबी खातो, मी दूध पीतो' इत्यादीरूपाने परद्रव्याच्या परिणामाशी तन्मय मानतो. जीव भगवंतांच्या भक्तीरूप शुभभावाने परिणमतो. परंतु अज्ञानी पूजा इत्यादी शरीराच्या क्रियारूप परिणामांशी तन्मय होतो. जीव धर्मध्यानरूप शुद्धभावरूपाने परिणमतो. अज्ञानी त्याला बाह्य पद्मासन, नासाग्रदृष्टी इत्यादी क्रियेशी तन्मय मानतो.

आपल्या शुद्ध आत्मस्वभावामध्ये परिणमनरूप जो भाव होतो तो निश्चयधर्म आहे व पंच परमेष्ठींचा भक्तिरूप परिणाम व्यवहार धर्म आहे. निश्चयधर्म आणि व्यवहारधर्मरूपाने परिणमन करणारा आत्मा स्वयंच धर्मरूप आहे. द्रव्याचे अनंत गुण प्रत्येक समयात आपल्या अनंत पर्यायांना प्रगट करतात. प्रत्येक गुण द्रव्यामध्ये सर्वांग व्यापक आहे म्हणून अनंत गुणांचे अनंत पर्याय द्रव्यामध्ये सर्वांग व्यापून राहतात. यापैकी विचार करणारा किंवा कथन करणारा ज्या पर्यायावर दृष्टी ठेवतो ती त्यावेळी त्याच्याकरिता मुख्य होते, शेष पर्याय गौण होतात. आत्म्यामध्ये ज्ञानोपयोग मुख्य आहे. कारण याच्याद्वारेच आत्मा स्वत:ला व पराला जाणतो. जेव्हा आत्मा बुद्धिपूर्वक सर्व परपदार्थापासून उदासीन होऊन आपल्या आत्म्याला जाणण्यामध्ये तन्मय होतो. अर्थात स्वयं ज्ञाता व स्वयंच ज्ञेय होतो तेव्हा आत्मा आपल्या शुद्ध आत्मस्वभावामध्ये लीन आहे असे म्हटले जाते. त्यावेळी अनंत गुणांचे युगपत् परिणमन होत असले तरी मोक्षमार्गामध्ये तीन गुण मुख्य आहेत. श्रद्धागुणाची आत्मरूचिरूप परिणती आहे, ज्ञान स्व आत्म्याला जाणते ती

ज्ञानाची परिणती व परपदार्थापासून उदासीनता व स्वत:मध्ये स्थिरता ही चारित्राची परिणती आहे. भेदनयाने सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्ररूप तीन प्रकारच्या परिणती आहेत. निश्चयरूप अभेदनयाने तीन भावमयी एका आत्म्याचीच परिणती आहे. म्हणून रत्नत्रयाने परिणमन करणारा आत्माच साक्षात धर्मरूप आहे. याच धर्माला वीतराग चारित्र म्हणतात. म्हणून रत्नत्रयमयी वीतराग चारित्रामध्ये परिणमन करणारा आत्माच वीतराग चारित्र आहे. वीतराग चारित्रमयी आत्माच उपादेय आहे. कारण या स्वात्मानुभवरूप वीतराग चारित्रामुळे वर्तमानात अतीन्द्रिय सुखाची प्राप्ती होते व भविष्यकाळात मोक्षसुखाची प्राप्ती होते.

मुख करे जैसा लखै तैसा –

जेव्हा आपला चेहरा पाहण्यासाठी आपण आरशामध्ये पहातो तेव्हा आपला चेहरा जसा असेल तसाच तो आरशात दिसतो. चेहरा विकृत असेल तर तो विकृतच दिसतो. चेहरा साफ, स्वच्छ असेल तर तो स्वच्छ दिसतो. सुन्दर असेल तर सुन्दर दिसतो. कुरूप असेल तर कुरूप दिसतो. पुष्कळ वेळा फोटो काढताना लोक फोटोग्राफरला सूचना देतात की आमचा फोटो चांगला काढावा. कुरूप व्यक्तीसुद्धा मी फोटोमध्ये चांगली दिसावी अशी इच्छा करते. काळी व्यक्ती सुद्धा मी गोरी दिसावी अशी इच्छा करते; परंतु जसा आपला चेहरा असेल तसाच फोटो निघणार. त्यामध्ये फोटोग्राफरची काय चूक ? फोटो पाहत असताना त्यात आपण आपला फोटो कोठे आहे व तो कसा निघाला आहे हे प्रथम पाहतो.

परिणाम हाच आत्म्याचा चेहरा आहे. जसे आपण परिणाम करू तसा आपला आत्मा ज्ञानरूपी आरशात दिसणार. अज्ञानी मूढ जीव अंतरंगामध्ये पापयुक्त परिणाम करतो, कषायकलंकरूपी चिखलाने लिप्त होतो व बाहेरून दान, पूजा इत्यादी शुभ क्रिया करून स्वत:ला धर्मात्मा आहोत असे अन्य लोकांना भासविण्याचा प्रयत्न करतो. भले ही बाहेरची क्रिया पाहून लोक आपल्याला धर्मात्मा म्हणतील, 'धर्म शिरोमणी' इत्यादी उपाधीसुद्धा देतील, परंतु आपल्यावर नजर असणारा ज्ञानप्रहरी हे मान्य करू शकणार नाही व कर्मरूपी फोटोग्राफर जसे आपले परिणाम असतील तसाच फोटो काढणार. '**हम कैसे ? जैसे हमारे परिणाम**' जसे आम्ही आमचे परिणाम ठेवू तसे आम्ही

दिसू. आपण बाह्यजगाला चांगले दिसावे असे वाटत असेल तर प्रथम आपले परिणाम सुधारले पाहिजेत. परिणाम सुधारले तर बाहेर कुणालाही म्हणावे लागणार नाही की मला चांगले माना. आपले परिणाम सुधारले की त्याचा आनंद प्रथम आपल्याला अनुभवायला मिळतो व त्याचा प्रभाव बाह्य जगावर सुद्धा पडल्याशिवाय राहत नाही. वाईट परिणामांचा वाईट प्रभाव व चांगल्या परिणामाचा चांगला प्रभाव आपोआप पडतो.

परिणामाचा प्रभाव –

समतेची मूर्ती असणाऱ्या मुनिराजांच्या सान्निध्यात विरोधी हिंसक प्राणी सुद्धा आपला वैरभाव विसरून जातात व क्रूरता सोडून शांत होतात. म्हणून बाह्य जगाला बदलविण्याचा प्रयत्न न करता आपले परिणाम बदलण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे. कारण आपण आपल्या परिणामामुळेच दु:खी आहोत व आपल्या परिणामामुळेच सुखी होऊ शकतो. सुख-दु:खांचे कारण आपले परिणाम आहेत, परद्रव्य नाही.

आता प्रश्न हा आहे की चांगले परिणाम कोणते व वाईट परिणाम कोणते? हे कसे ओळखायचे ? जो परिणाम स्वत:ला शांती मिळवून देतो तो परिणाम चांगला व ज्या परिणामामुळे स्वयं आकुल-व्याकुल होतो, आपले मन अशांत होते तो परिणाम वाईट. धर्मरूप परिणाम अर्थात स्वत:ला स्वरूपाने जाणणारा समतामय परिणाम शांती मिळवून देतो म्हणून तोच सर्वात सुंदर आहे. त्याच परिणामामुळे स्व-पराचे कल्याण आहे. आत्म्याच्या या परिणामतन्मयतेचे उदाहरण तीन प्रकारच्या परिणामाद्वारे आचार्य पुढील गाथेत सांगतात. –

जीवो परिणमदि जदा सुहेण असुहेण वा सुहो असुहो।
सुद्धेण तदा सुद्धो हवदि हि परिणामसब्भावो ।।९।।

अन्वयार्थ – (जीवो) जीव **(जदा)** जेव्हा **(सुहेण असुहेण)** शुभ किंवा अशुभ भावरूपाने **(परिणमदि)** परिणमतो तेव्हा **(सुहो असुहो)** शुभ किंवा अशुभ होतो. **(सुद्धेण)** आणि जेव्हा शुद्धभावरूपाने परिणमतो **(तदा सुद्धो हवदि)** तेव्हा शुद्ध होतो. **(हि)** कारण **(परिणामसब्भावो)** जीव परिणमस्वभावी आहे.

जेव्हा जीव शुभरूपाने परिणमतो तेव्हा तो शुभ होतो, जेव्हा अशुभरूपाने परिणमतो तेव्हा अशुभ होतो व जेव्हा शुद्धरूपाने परिणमतो तेव्हा शुद्ध होतो. कारण आत्मा परिणामस्वभावी आहे.

आत्मा सर्वथा नित्य नाही; परंतु ज्याप्रमाणे कुंभाराचे चाक स्थिर असूनही फिरत असते त्याप्रमाणे आत्मा नित्य असूनही परिणमनशील आहे. परिणमन करणे हा वस्तुमात्राचा स्वभाव आहे. आत्मा सुद्धा एक चैतन्य वस्तू आहे. म्हणून प्रत्येक समयाला त्याचा कोणता तरी एक परिणाम असतो.

ज्या ज्या भावरूपाने आत्मा परिणमतो त्या त्या भावरूपाने स्वयं होतो. ज्याप्रमाणे स्फटिकमणी स्वभावाने निर्मळ आहे तरी सुद्धा ज्यावेळी तो लाल किंवा निळ्या फुलाच्या संयोगाच्या निमित्ताने परिणमित होतो त्यावेळी तो लाल किंवा निळा स्वयंच होतो. त्याचप्रमाणे आत्मा स्वभावाने शुद्ध बुद्ध एकस्वरूपी आहे; परंतु जेव्हा तो पंच परमेष्ठींच्या निमित्ताने शुभरूप परिणमतो तेव्हा स्वयं शुभ होतो जेव्हा पंचेंद्रिय विषय व कषायांच्या निमित्ताने अशुभरूप परिणमतो तेव्हा स्वयंच अशुभ होतो. ज्याप्रमाणे स्फटिकमणी जेव्हा आपल्या स्वाभाविक निर्मळ रंगरूपाने परिणमित होतो तेव्हा तो स्वयंच शुद्ध होतो त्याचप्रमाणे आत्मा सुद्धा जेव्हा शुद्ध अरागस्वभावरूपाने परिणमतो तेव्हा स्वयंच शुद्ध होतो.

आत्मा उपयोगस्वरूपी आहे. कारण उपयोग हा चैतन्याला अनुसरून होणारा परिणाम आहे. उपयोग दोन प्रकारचा आहे. १) अशुद्ध उपयोग व २) शुद्ध उपयोग. रागसहित उपयोग तो अशुद्ध उपयोग होय व रागरहित उपयोग शुद्ध उपयोग आहे. राग म्हणजे प्रेम. राग दोन प्रकारचा आहे– शुभ व अशुभ. अशुद्ध उपयोग दोन प्रकारचा आहे – शुभ उपयोग व अशुभ उपयोग. द्वेष व मोहरूप परिणाम तर अशुभ उपयोगरूपच आहेत.

पुढे गाथा ६९ व गाथा १५७ मध्ये आचार्य स्वयं शुभोपयोगाचे स्वरूप सांगणार आहेत. देव, गुरू, व त्यांच्या प्रतिमेच्या पूजेमध्ये, आहार–औषध–अभय–ज्ञान या चार प्रकारच्या दानामध्ये, शील व व्रतांमध्ये, उपवासादिक तपामध्ये प्रीतिरूप परिणाम होणे शुभोपयोग आहे. जो उपयोग अरिहंत, सिद्ध व साधूंची श्रद्धा करण्यामध्ये प्रवृत्त आहे तो शुभोपयोग आहे. गृहस्थदशेमध्ये सम्यक्त्वपूर्वक दान देणे, देवशास्त्रगुरूची पूजा करणे, स्वाध्याय करणे,

व्रतादिकांचे पालन करणे इत्यादी शुभोपयोग असतो. फक्त बाह्य क्रिया करणे म्हणजे शुभोपयोग नाही, तर तदनुरूप जीवाचा परिणामच शुभोपयोग आहे. त्याचबरोबर असणाऱ्या क्रियेला शुभयोग म्हणतात. पाच इन्द्रियांच्या विषयामध्ये, क्रोधादी कषायामध्ये, मिथ्याशास्त्र ऐकण्यामध्ये, कुविचार व कुसंगतीमध्ये लागलेला उपयोग अशुभोपयोग होय.

शुभ व अशुभ दोन्ही रागाने रहित शुद्ध आत्म्यामध्ये प्रवृत्त उपयोग शुद्धोपयोग आहे. हे तिन्ही परिणाम जीवाचेच आहेत. परन्तु प्रथम दोन अर्थात शुभ व अशुभ परिणाम पराश्रित आहेत, विभावरूप आहेत म्हणून कर्म बंधाला कारण आहेत. शुद्धोपयोग स्वाश्रित आहे, स्वभावरूप आहे म्हणून कर्मबंधाला कारण नाही. बाह्य व अंतरंग कारणवश ज्ञानीला सुद्धा शुभोपयोग होतो. परन्तु ज्ञानी आपल्या आत्मस्वभावामध्ये शुभोपयोगाची प्रतिष्ठा होऊ देत नाही. ज्ञानीचा सतत प्रयत्न शुद्धोपयोगाकरिता आहे; परंतु जो प्रयत्न आहे तो शुभोपयोग आहे. शुभोपयोगाशिवाय काम होत नाही व त्याला पकडून ठेवून सुद्धा काम होत नाही.

ज्याप्रमाणे घरात प्रवेश करण्यासाठी अंगणात जाणे आवश्यक आहे; परंतु अंगणातच राहिला तर घरात प्रवेश करू शकत नाही. घरात प्रवेश करण्यासाठी अंगणात यावे पण लागेल व अंगण सोडावे पण लागेल. त्याचप्रमाणे आपल्या शुद्धात्म्यामध्ये प्रवेश करण्यासाठी शुभोपयोगामध्ये यावे लागेल; परंतु शुभोपयोगातच आसक्त झाला तर शुद्धात्मारूपी घरामध्ये प्रवेश करू शकत नाही. शुद्धोपयोगरूप भूमिका प्राप्त करण्यासाठी शुभोपयोगात यावे पण लागेल व शुभोपयोग सोडावा पण लागेल. जीव अशुभोपयोगाचा त्याग करून शुभोपयोगात प्रवेश करतो. शुद्धोपयोग हाच स्वतन्त्र स्वाधीन उपयोग आहे. **ज्याला आपले जीवन स्वतन्त्र बनवायचे आहे त्याने शुद्धोपयोगाचा आश्रय करावा.**

कोणत्या गुणस्थानात कोणकोणते उपयोग असतात या संदर्भात विभिन्न विवक्षा आहेत. जयसेनाचार्यांनी या गाथेच्या वृत्तीमध्ये एक विवक्षा सांगितली आहे. ती याप्रमाणे – जीवाचे असंख्यात लोकप्रमाण परिणाम आहेत. एका लोकाकाशाचे प्रदेश असंख्यात आहेत. एवढ्याच प्रदेशवाले असंख्यात लोक कल्पिले तर त्या सर्व असंख्यात लोकांचे जे एकूण प्रदेश होतील तेवढे

जीवांच्या परिणामांचे भेद आहेत. कारण एका जीवाचे अनेक समयात भिन्न भिन्न परिणाम होतात व अनेक जीवांचे एका समयात भिन्न-भिन्न परिणाम असतात. त्या सर्व परिणामांचे प्रकार असंख्यात लोकप्रमाण आहेत. जर त्यांना मध्यममार्गाने सांगायचे झाले तर ते सर्व परिणाम चौदा गुणस्थानात अन्तर्भूत होतात. त्यांचा अजून संक्षेप केला तर ते तीन प्रकारात मोडतात. अशुभ, शुभ व शुद्ध. एक ते तीन गुणस्थानांमध्ये तरतमरूप (घटता) अशुभोपयोग आहे. चार ते सहा गुणस्थानांमध्ये तरतमरूप (वाढता) शुभोपयोग आहे व सात ते बारा गुणस्थानांमध्ये तरतमरूप (वाढता) शुद्धोपयोग आहे. तेरा व चौदाव्या गुणस्थानामध्ये शुद्धोपयोगाचे फळ आहे. ही एक विवक्षा आहे. याचा खुलासा-मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषाय स्वयं अशुभ आहेत म्हणून त्यांनी सहित सर्व उपयोगांना अशुभच म्हटले आहे. मिथ्यात्वाच्या सद्भावात जीव हिंसा करो अथवा जीवदया पाळो, खोटे बोलो अथवा खरे बोलो तो मिथ्यादृष्टीच आहे. प्रथम गुणस्थानात मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांचा सद्भाव आहे त्यामुळे अशुभाची मात्रा अधिक आहे. दुसऱ्या गुणस्थानात मिथ्यात्व नाही; परंतु अनंतानुबंधी कषाय आहेत म्हणून पहिल्यापेक्षा दुसऱ्या गुणस्थानात अशुभपणा कमी आहे. तिसऱ्या गुणस्थानात मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषाय नाहीत पण सम्यक्त्वाचा घात करणारा सम्यग्मिथ्यात्वरूप परिणाम आहे म्हणून अशुभपणा आहे. चार ते सहा गुणस्थानात मिथ्यात्वाचा अभाव असून बुद्धिपूर्वक कषायभावाचा सद्भाव आहे म्हणून शुभोपयोग सांगितला आहे. चौथ्यापेक्षा पाचव्यामध्ये व पाचव्यापेक्षा सहाव्यामध्ये परिणामांची विशुद्धी वाढती आहे म्हणून वाढता शुभोपयोग मानला आहे व सातव्या गुणस्थानापासून बुद्धिपूर्वक कषायांचा अभाव झाला म्हणून तेथून शुद्धोपयोग सांगितला आहे. उत्तरोत्तर परिणामांची विशुद्धी वाढत असल्यामुळे शुद्धोपयोग वर्धमान आहे. ही एक विवक्षा आहे; परंतु सर्वथा असेच मानले तर अनेक आपत्ती येतील. कारण प्रथम गुणस्थानात कथंचित् शुभोपयोग सुद्धा आहे. द्रव्यलिंगी मुनी शुभोपयोगाच्या द्वारेच नव ग्रैवेयिकामध्ये जाण्यायोग्य पुण्यबंध करतो. ज्यावेळी हा जीव सम्यक्त्वसन्मुख होतो तेव्हा करण परिणाम करतो. ते करण परिणाम शुभरूप आहेत असे जर नाही मानले तर पहिल्या अशुभोपयोगातून एकदम शुद्धोपयोगात गेला असे

मानावे लागेल. ते तर आगम विरुद्ध आहे. शुभोपयोगपूर्वक शुद्धोपयोग होतो हे शास्त्रसम्मत आहे. म्हणून प्रथम गुणस्थानात कथंचित् शुभोपयोग मानला पाहिजे.

चतुर्थ, पंचम गुणस्थानात सर्वथा शुभोपयोगच मानला तर तेथे विषय कषायरूप अशुभोपयोग परिणामांचा व शुद्धात्माभिमुखरूप शुद्धोपयोग परिणामाचा अभाव मानावा लागेल. चौथ्या व पाचव्या गुणस्थानात जीव विषय कषायरूप परिणाम करताना प्रत्यक्ष दिसतो. अशुभापासून वाचण्यासाठी तो दान-पूजादी शुभानुष्ठान करतो व शुभोपयोगातून शुद्धोपयोगात जाण्याचा प्रयत्न करतो. समयसार गा. ३४१ तात्पर्यवृत्तीमध्ये जयसेनाचार्य स्पष्टपणे म्हणतात की, जेव्हा कालादी लब्धिवश भव्यत्वशक्तीची व्यक्ती (प्रगटता) होते तेव्हा दर्शनमोहनीयाचा उपशम, क्षयोपशम व क्षय झाल्यामुळे सम्यक्त्वाची प्राप्ती होते. त्यालाच अध्यात्म भाषेमध्ये शुद्धात्मभावना म्हणतात व तोच शुद्धोपयोग आहे. जेथे निज शुद्धात्म्याचे भान झाले व निजशुद्धात्मा प्रत्यक्ष प्रामाण्यसहित अनुभवात आला तेथे सम्यक्त्वाची उत्पत्ती झाली. ८० नंबर गाथेच्या तात्पर्यवृत्तीमध्ये सुद्धा जयसेनाचार्य स्पष्ट सांगतात, अध:प्रवृत्तादी करण परिणाम म्हणजे सविकल्प चिंतन आहे व सम्यक्त्वाच्या प्राप्तीचा क्षण तो निर्विकल्प आत्मानुभूतीचा आहे. चौथ्या व पाचव्या गुणस्थानात शुद्धोपयोगाची दृढता व स्थिरता कमी आहे व शुभोपयोगाची बहुलता आहे, म्हणून शुद्धोपयोग गौण केला जातो.

सातव्या गुणस्थानापासून बुद्धिपूर्वक कषायांचा अभाव झाल्यामुळे उपयोगामध्ये विशेष निर्मलता येते व बुद्धिपूर्वक उपयोग आत्म्यामध्ये लावलेला आहे, म्हणून तेथे शुद्धोपयोगाची मुख्यता आहे. परंतु तेथेही अबुद्धिपूर्वक कषायांचा सद्भाव असल्यामुळे गौणरूपाने शुभोपयोग आहे. अन्यथा दहाव्या गुणस्थानापर्यंत बंध झाला नसता.

अकराव्या गुणस्थानात उपयोगामध्ये कषायांचा पूर्णपणे अभाव झाल्यामुळे शुद्धोपयोग आहे. जेथे कषायांचा पूर्ण अभाव होऊन पूर्ण कलुषता निघून जाते तेथे पूर्ण ज्ञानोपयोग निश्चल समुद्राप्रमाणे स्वस्वरूपामध्ये तन्मय होतो व तेथेच पूर्ण शुद्धोपयोग होतो.

जिनवाणीमध्ये अनेक विवक्षा आहेत. त्या समजून घेऊन तत्त्वाचा

निर्णय केला तर कोठे ही वादविवादाला जागा राहत नाही. वादविवाद करणे आपले प्रयोजन नाही तर तत्त्वाचा निर्णय करून आपले जीवन बदलणे हे आपले प्रयोजन आहे. आपली पूर्व मिथ्या मान्यता सोडून सम्यक् वस्तुस्वरूप समजून घेऊन त्यामध्ये लीन होण्यातच आपले हित आहे. संपूर्ण जिनवाणीचा सार हा आहे की अशुभाचा त्याग करून शुभोपयोगाचे अवलंबन घेऊन शुद्धोपयोगामध्ये लीन व्हावे. **शुभोपयोग ही ढाल आहे तर शुद्धोपयोग तलवार आहे. शुभोपयोगाची ढाल पुढे करून शुद्धोपयोगरूपी तलवारीचे वार घातले तर सर्व कर्मांचा नाश सहजच होऊन जाईल.**

सर्व दु:खाचे मूळ कारण वस्तुस्वरूपासंबंधीचे अज्ञान आहे. वस्तुस्वरूपाच्या प्रतिकूल इच्छा करणे ही दु:खाची जननी आहे. आम्ही आजपर्यंत वस्तुस्वभावाला बदलण्याचा निरर्थक प्रयत्न केला; पण वस्तुस्वरूपाच्या अनुरूप आमचे ज्ञान-श्रद्धान व चारित्र बदलले नाही. वस्तू तर जशी आहे तशी आहे व राहणार. आमचा वस्तूस्वरूपासंबंधीचा विपरीत ग्रह काढून समीचीन करण्याची आवश्यकता आहे. बदल ज्ञान-श्रद्धानामध्ये करायचा आहे, वस्तूमध्ये नाही. त्यासाठी वस्तुस्वरूपाचे ज्ञान करून घेऊ या. परिणाम वस्तूचा स्वभाव आहे, हे या पुढील गाथेत निश्चित करतात. -

णत्थि विणा परिणामं अत्थो अत्थं विणेह परिणामो।
दव्वगुणपज्जयत्थो अत्थो अत्थित्तणिव्वत्तो।। १०।।

अन्वयार्थ - (इह) या लोकामध्ये **(परिणामं विना)** परिणामाशिवाय **(अत्थो)** पदार्थ **(णत्थि)** नाही व **(अत्थं विणा)** पदार्थाशिवाय **(परिणामो णत्थि)** परिणाम नाही. **(दव्वगुणपज्जयत्थो)** द्रव्य गुण पर्यायामध्ये स्थित **(अत्थो)** पदार्थ **(अत्थित्तणिव्वत्तो)** अस्तित्वाने रचलेला आहे.

या गाथेमध्ये आचार्यांनी चार महान् सिद्धान्त सांगितले आहेत.

१) परिणामाशिवाय पदार्थ नाही.

२) पदार्थाशिवाय परिणाम नाही.

३) प्रत्येक पदार्थ द्रव्यगुणपर्यायामध्ये स्थित आहे.

४) प्रत्येक पदार्थ अस्तित्वाने बनलेला आहे.

हे चार सिद्धान्त म्हणजे सुखाच्या चार गुरुकिल्ल्या आहेत, आनंदाचे

स्रोत आहेत व शान्तीचे शयनकक्ष आहेत. या सिद्धान्ताच्या सम्यग्ज्ञानाद्वारे जीव सुखाचा दरवाजा उघडून आनंदाच्या झऱ्यामध्ये स्नात होऊन शान्तीच्या शयनकक्षामध्ये शान्त पहडू शकतो. तरी या सुखाच्या किल्ल्या प्राप्त करण्यासाठी सावधानचित्त होऊन वाचा.

१) परिणामाशिवाय पदार्थ नाही –

परिणाम, पर्याय, अवस्था, दशा, विशेष इत्यादी एकार्थक शब्द आहेत. वस्तु, अर्थ व पदार्थ एकार्थवाची आहेत. या विश्वामध्ये कोणताही पदार्थ परिणामाशिवाय राहूच शकत नाही. पदार्थाला कोणत्या ना कोणत्या अवस्थेतच आपण प्राप्त करू शकतो. वस्तू परिणामाहून भिन्न पाहण्यात, अनुभवात येत नाहीच. परिणामरहित वस्तू गाढवाच्या शिंगाप्रमाणे आहे. जर कोणी म्हणेल मला गोरसाचे सेवन करावयाचे आहे; परंतु मला दूध, ताक, लोणी, तूप काहीही नको. तर सांगा, त्याला गोरस प्राप्त होऊ शकेल काय ? गोरसाचे सेवन करून तो तृप्त होऊ शकेल काय ? दूध, दही इत्यादींच्या माध्यमातूनच गोरसाचा अनुभव येणार. जीवाला शोधायचे असेल तर तो मनुष्य देव, नारक, तिर्यंच, अरिहंत, सिद्ध इत्यादी पर्यायांमध्येच सापडणार. कोणी तरी म्हणेल की, अशा मनुष्याला घेऊन या की जो बालक नाही, तरूण नाही, प्रौढ नाही, म्हातारा नाही. त्याला आपण मूर्ख म्हणू. वेडा आहेस काय ? कोणत्याही अवस्था विशेषाशिवाय मनुष्य कसा काय आणू शकणार ? जेव्हा व जेथे कोठेही मनुष्य मिळेल तर तो कोणत्या तरी अवस्थेतच मिळणार.

सोनाराच्या दुकानात गेलो व म्हणालो, आम्हाला एक तोळा सोने पाहिजे; परंतु आम्हाला, अंगठी नको, रिंगा नको, चेन नको, कोणतेही दागिने नको किंवा बिस्कीट नको किंवा नाणे नको तर सोनार म्हणेल, मानसिक रुग्णालयामध्ये भरती व्हा. तुमचे डोके तरी बिघडले नाही ना ? असले सोने आमच्या दुकानात नाही. तुम्हाला कोणत्या ना कोणत्या दागिना किंवा नाणे इत्यादी अवस्थेतूनच सोने खरेदी करावे लागेल.

याचप्रमाणे कोणताही पदार्थ पर्यायशून्य प्राप्त होऊ शकत नाही. जेव्हा व जेथे कोठेही पदार्थ मिळेल तर तो पर्यायसहितच मिळणार. ज्याची कोणतीही पर्याय उपलब्ध नाही त्याची सत्ता कोणत्या रूपाने आहे ? जी वस्तू ज्या क्षणी ज्यारूपाने राहते त्याचेच नाव पर्याय आहे. वास्तविक गोरस,

मनुष्य, सोने हे सुद्धा पर्याय आहेत; परंतु येथे दृष्टान्तामध्ये त्याला पदार्थ मानून कथन केले आहे.

पर्याय प्रत्येक समयात नवीन नवीन उत्पन्न होते. परंतु प्रतिसमयाचे परिणमन इतके सूक्ष्म असते की ते आपल्यासारख्या छद्मस्थ जीवांचा विषयच होऊ शकत नाही. समय ही सुद्धा कालद्रव्याची सूक्ष्मपर्याय आहे. त्याचे ज्ञान आपल्याला होऊ शकत नाही तर तेवढ्या काळात होणाऱ्या इतर द्रव्यांच्या पर्यायांचेसुद्धा ज्ञान होऊ शकत नाही. ज्ञान झाले नाही तरी वस्तूचे परिणमन अवश्यंभावी आहे. स्थूल परिणमन तर्काने आपण जाणू शकतो. मुलाची उंची एक वर्षाने एक इंच वाढली तर ती एकदम वाढू शकत नाही. प्रत्येक क्षणाला हळूहळू वाढते. एक वर्षाने आपल्याला ती लक्षात येते.

परिणामाशिवाय पदार्थ नाही व परिणाम बदलत असतो, हा सिद्धान्त समजल्यामुळे जीवनात अनेक लाभ होतात. अज्ञानामुळे हा जीव वस्तूच्या एखाद्या पर्यायाला टिकविण्याचा व्यर्थ पुरुषार्थ करीत राहतो. परिणमन स्वभाव न स्वीकारता वस्तूमध्ये काही बदल घडू नये अशी इच्छा करतो. उदा. शरीर जसे आहे तसेच टिकविण्याचा प्रयत्न करतो. शरीराचे सौन्दर्य नष्ट होऊ नये, तारुण्य रहावे, म्हातारपण येऊ नये म्हणून कलप इत्यादी साधनांचा उपयोग करतो. आरशामध्ये पहाताना एखादा पांढरा केस दिसला की लगेच उपडून काढतो. केस काळेच रहावेत असे याला वाटते. स्त्री, पुत्र, घर, मालमत्ता कायम जसे आहेत तसेच राहावेत. घर नेहमी नवीनच दिसावे. कपडे जुने होऊ नयेत इत्यादींसाठी सतत प्रयत्नशील असतो. लाखो प्रयत्न करूनही जे व्हायचे ते होतेच म्हणून हा सिद्धान्त समजला तर जीवनातील हे निरर्थक प्रयत्न बंद होऊन घडणाऱ्या परिणामाला निराकुल चित्ताने स्वीकारून सुखाचे जीवन जगता येईल. कोणत्याही पदार्थाची कोणतीही पर्याय स्थायी नाही. जर पर्याय स्थायी झाली तर त्याचा परिणामस्वभाव नष्ट होईल. म्हणून बदलणाऱ्या पर्यायामध्येसुद्धा आपण शांती ठेवू शकू.

दुसरा हा फायदा होतो की दुसऱ्या वस्तूचे परिणमन आम्ही आमच्या हातात आहे असे मानतो व आपल्या इच्छेनुसार बदलविण्याचा प्रयत्न करतो. जर प्रत्येक वस्तू परिणामस्वभावी आहे तर ती तिच्या स्वभावानुसारच परिणमते, मी त्यामध्ये काय बदल करू शकतो ? आज आम्ही बेचैन आहोत

की मुलगा माझं ऐकत नाही. सून मी म्हणेल तशी वागत नाही. पतीला वाटते पत्नी माझ्या आधीन राहावी. जर हा सिद्धान्त समजला तर अन्य वस्तूला बदलविण्याचा जो आमचा व्यर्थ प्रयास आहे तो थांबून शांती मिळू शकते. आमच्या जीवनातील बेचैनी नष्ट होऊन चैन मिळते.

तिसरा फायदा असा की आपल्याला जीव प्राप्त करावयाचा आहे. पर्यायापासून भिन्न, गुणभेदापासून भिन्न अखंड आत्म्याची अनुभूती करा असे शास्त्रातले वचन ऐकून पर्यायापासून भिन्न आत्मा शोधायला लागतो व आमची दृष्टी अन्तराळात फिरत राहते व आत्मा शेवटी हाती लागत नाही. जीव जरी पर्यायापासून भिन्न अनुभवायचा असला तरी तो जीव पर्यायाच्या माध्यमातूनच सापडू शकतो. जेथे मनुष्यादी पर्याय आहेत अथवा जेथे शुभ, अशुभ, शुद्ध परिणमन दिसून येते अथवा गृहस्थ, साधू, अरिहंतादी पर्याय आहेत तेथेच जीव आहे. त्याच्या बाहेर नाही. या सर्व पर्यायांमध्ये जो 'तोच तोच' रूपाने अन्वयरूपाने आहे अशी मी अखंड वस्तू आहे असे आपण पर्यायापासून त्याला वेगळे जाणू शकतो. परंतु त्या पर्यायापासून त्याला वेगळे करू शकत नाही. अर्थात द्रव्य पर्यायापासून वेगळे होऊ शकत नाही. दृष्टीमध्ये पर्यायाला गौण करून द्रव्याला मुख्य करतो.

२) पदार्थाशिवाय परिणाम असू शकत नाही. –

वस्तूशिवाय परिणामसुद्धा आपले अस्तित्व धारण करू शकत नाही. परिणाम आश्रयाशिवाय राहूच शकत नाही. परिणाम आधेय आहे व वस्तू आधार आहे. आपल्याला जिलेबी बनवायची आहे तर ती कशाच्या आश्रयाने बनवणार. पीठ, साखर, तूपाचा आश्रय घेऊनच जिलेबीरूप अवस्था बनू शकते, अन्यथा नाही. आपल्याला दागिने पाहिजेत तर ते सोन्याच्या आधारानेच बनू शकतात. आम्हाला रत्नत्रय प्राप्त करावयाचे आहे तर ते कोणाच्या आधाराने अर्थात कोठे प्राप्त होणार? निराधार रत्नत्रय राहू शकत नाही. जीवाच्या आश्रयाने जीवामध्येच रत्नत्रय प्रगट होणार. अरिहंत, सिद्ध, साधू या अवस्था जीव प्रदेशामध्येच व्यक्त होणार. दुसरीकडे नाही. जशी वस्तू पर्यायापासून भिन्न नाही. तशी पर्यायसुद्धा वस्तूपासून भिन्न नाही. दोघांचे प्रदेश अभिन्न आहेत व संज्ञा लक्षणादिकांद्वारे दोघांमध्ये भेद आहे.

एकदा एका म्हातारीच्या हातातून चांदीचा तांब्या खाली पडला.

तांब्या चेपला. ती चेप काढून घेण्यासाठी सोनाराकडे गेली. सोनाराने हातोड्याने ठोकून तांब्याचा चेप काढला. चेप काढल्याची १० रुपये मजूरी मागितली. तेव्हा म्हातारी म्हणाली आमच्या तांब्याचा चेप काढलेला परत दे म्हणजे मी तुझी मजूरी देतो. सोनार बिचारा हे उत्तर ऐकून चक्रावला. तांब्याचा चेप काढून परत देणार कसा ? चेप तांब्यातच होता तो त्यातच विलीन झाला. चेप तर एक अवस्था होती. तांब्या सरळ होताच ती पर्याय निघून गेली. पर्याय वस्तूपासून भिन्न करता येत नाही.

पदार्थाशिवाय परिणाम नाही हे समजल्यामुळे जीवनात उपयोग –

अज्ञानामुळे हा जीव अन्य पदार्थाच्या परिणामाचा आधार स्वयं बनतो. मुलाचा सुख परिणाम आपल्या आधाराने व आपला सुख परिणाम मुलाच्या आधाराने मानतो. त्यामुळे दु:खी होतो. आपल्या सुख परिणामाचा आधार आपण स्वयं आहोत. मुलाच्या सुखाचा आधार स्वयं मुलगा आहे. पर्याय आपल्याच द्रव्याच्या आश्रयाने राहते. शरीराच्या परिणामाचा आधार शरीररूप बनलेले पुद्गल परमाणू आहेत, मी नाही म्हणून वृद्धादी अवस्था पुद्गलामध्ये आहे. माझ्यामध्ये नाही, इत्यादी विचाराने शांती मिळते. या सिद्धान्ताचा प्रयोग आपण जीवनात करू लागलो तर त्याचे फायदे स्वत:लाच अनुभवात येतात.

३) प्रत्येक वस्तू द्रव्यगुणपर्यायामध्ये स्थित आहे. –

येथे द्रव्यशब्दाचा अर्थ वस्तू न घेता सामान्य अंश घ्यावा. वस्तू सामान्य विशेषात्मक आहे. सामान्य दोन प्रकारचे आहे. १) ऊर्ध्वतासामान्य व २) तिर्यक् सामान्य. नाना काळामध्ये होणाऱ्या एका व्यक्तिगत सर्व पर्यायांमध्ये जे व्यापून असते ते ऊर्ध्वता सामान्य होय. जसे एका जीवाच्या नारक, तिर्यंच, मनुष्य, देवादी पर्यायांमध्ये अन्वयरूप जीवत्व आहे. ते ऊर्ध्वतासामान्य होय. उदा. दूध, दही, ताक इत्यादींमध्ये गोरसपणाचा अन्वय ऊर्ध्वतासामान्य आहे.

तिर्यक् सामान्य म्हणजे एका काळामध्ये नाना व्यक्तींमध्ये असणारा अन्वय जसे–खण्डी, मुण्डी, चितकबरी इत्यादी गायींमध्ये गोत्व सामान्य. अनेक मनुष्यामध्ये मनुष्यत्व सामान्य. तसेच एका काळामध्ये अनेक गुणांमध्ये जो अन्वय असतो त्यालासुद्धा तिर्यक सामान्य म्हणतात. जीवाच्या एका काळामध्ये असणाऱ्या ज्ञान, दर्शन, सुख, वीर्यादी गुणांमध्ये जीवत्व सामान्य

आहे. या ऊर्ध्वता सामान्य व तिर्यक् सामान्याला येथे द्रव्य म्हटले आहे.

सहभाविविशेषाला गुण म्हणतात. सर्व गुणांचे अस्तित्व एकावेळी आहे म्हणून त्यास सहभावी म्हणतात, ते द्रव्याचे एक एक घटक आहेत. प्रत्येक गुण आपापल्या स्वरूपाने भिन्न भिन्न आहेत म्हणून त्यास विशेष म्हणतात. त्याला तिर्यक् विशेषसुद्धा म्हणतात. जसे जीवाचे ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य. पुद्गलाचे स्पर्श, रस, गंध, वर्ण. गुण ध्रुव असतात, त्रैकालिक सर्व अवस्थांमध्ये एकरूप असतात म्हणून गुणांनासुद्धा काही ठिकाणी सामान्य म्हटले आहे. परंतु ते भेदरूप आहेत म्हणून त्यांना सहभाविविशेष म्हटले आहे.

क्रमभाविविशेषांना पर्याय म्हणतात. पर्याय क्रमाक्रमाने होतात. जसे जीवामध्ये संसारी, साधु, अरिहंत, सिद्ध इत्यादी. आंब्यामध्ये हिरवा, पोपटी, पिवळा इत्यादी पर्याय क्रमाने होतात.

या द्रव्यगुणपर्यायांमध्ये जो व्यवस्थित आहे तो अर्थ (पदार्थ, वस्तू) आहे. संपूर्ण अनुभवनीय जी वस्तू आहे तो अर्थ होय. अर्थ अंशी आहे आणि द्रव्य, गुण, पर्याय हे त्याचे अंश आहेत. द्रव्य सामान्य अंश आहे व गुण, पर्याय विशेष अंश आहेत व पदार्थ सामान्यविशेषात्मक प्रमाणाचा विषय आहे. पदार्थ अनेकान्तात्मक आहे.

उपर्युक्त सिद्धान्त समजल्यामुळे जीवनात उपयोग –

प्रत्येक वस्तूला त्याच्या त्याच्या द्रव्यगुणपर्याय रूपामध्ये पाहू लागलो तर वस्तुस्वातंत्र्याची प्रतीती होते. प्रत्येक वस्तू स्वतंत्र आहे. मी पण एक जीव नावाची वस्तू आहे. मी माझ्या सामान्य द्रव्यामध्ये, ज्ञानदर्शनादी स्वगुणांमध्ये व सम्यग्दर्शनादी पर्यायांमध्ये अथवा शुभाशुभशुद्धपर्यायांमध्ये, मनुष्यादी पर्यायांमध्ये आहे. मी शरीररूप पुद्गलद्रव्यामध्ये, त्याच्या स्पर्शरसादी गुणांमध्ये, काळा, गोरा, जाड, बारीक इत्यादी पर्यायांमध्ये नाही. माझे निवासस्थान माझे द्रव्यगुणपर्याय आहेत. मी माझ्या द्रव्यगुणपर्यायाच्या सीमेच्या बाहेर नाही. मुलगा, मुलगी, पती इत्यादी आपापल्या द्रव्यगुणपर्यायामध्ये स्थित आहेत. त्यांची प्रगती झाली, त्यांचा परीक्षेत प्रथम क्रमांक आला तर त्यामध्ये माझे काय? अशाप्रकारे सर्व परद्रव्यासंबंधी भेदज्ञान उत्पन्न होते व भेदभावना दृढ होते. भेदज्ञानाने आत्मशांती प्राप्त होते.

४) पदार्थ अस्तित्वाने रचित आहे –

प्रत्येक पदार्थ अस्तित्वमय आहे. वस्तूचे अस्तित्व उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. नवीन अवस्था उत्पन्न होणे म्हणजे उत्पाद, पूर्वीची अवस्था नष्ट होणे म्हणजे व्यय व कायम राहणे म्हणजे ध्रौव्य. पूर्व पर्यायाचा व्यय आणि नवीन पर्यायाचा उत्पाद होत असतानासुद्धा जे अन्वयरूपाने विद्यमान आहे तेच सत् आहे. जो या तिन्हींनी रचलेला आहे, रचला जात आहे व पुढेही रचला जाईल तोच अर्थ होय. वस्तूमध्ये असे कधीही होत नाही की एकदा तिन्हीने वस्तू रचली की आता पुढे काही करणे शिल्लक नाही. प्रत्येक समयाला वस्तू या तिन्हीनी रचली जात आहे. अर्थात वस्तू प्रतिसमय उत्पादव्ययध्रौव्यमय आहे. यावरून वस्तूचा परिणमनस्वभाव सिद्ध होतो. ज्याक्षणी वस्तूचे परिणमन बंद पडेल त्याच क्षणी त्याचे अस्तित्व समाप्त होईल. हे जाणल्यामुळे जीवनात उपयोग –

मरणभय संपून जाते, स्वत:च्या स्वतन्त्र अस्तित्वाची जाणीव होते. मी एक स्वतंत्र पदार्थ आहे तर मी माझ्या अस्तित्वाने बनलो आहे. शरीराच्या अस्तित्वाने माझे अस्तित्व नाही, शरीराचा नाश झाला तरी माझा नाश होत नाही. स्त्री, पुत्र, घर, परिवार, गाडी, बंगला, पैसा यांच्यामुळे माझे अस्तित्व नाही. माझी सत्ता माझ्यामध्ये आहे. मी स्वयं सत्ताधीश आहे. सत्ताधारी आहे. राज्याची सत्ता, परिवाराची सत्ता, गावाची सत्ता म्हणजे माझी सत्ता नाहीच. लौकिक सत्ता नाशवंत आहे. पण ही पारमार्थिक सत्ता शाश्वत आहे. दुसऱ्यांवर अंमल चालवण्यामध्ये खरी सत्ता नाही तर स्वत:ची रचना करण्यामध्येच आपले सत्त्व आहे. आपण स्वत:च्या सत्तेच्या थाटामध्ये जगू शकतो. अज्ञानी लोक समजतात, जेवढ्या जास्त पदार्थांवर ज्याचा मालकी हक्क आहे ती व्यक्ती सर्वात मोठी आहे. तो सत्ताधीश आहे. परंतु ही चुकीची समजूत आहे. एका वस्तूची दुसऱ्या वस्तूवर सत्ता चालू शकत नाही. परद्रव्यावर आपला हक्क गाजवत असल्यामुळे हा जीव दु:खी आहे. आपले अस्तित्व आपल्यामध्येच आहे हे लक्षात आले तर हा जीव सुखी होतो. म्हणूनच सुरवातीला सांगितले की हे चार सिद्धान्त म्हणजे सुखाच्या गुरुकिल्ल्या आहेत.

वस्तुस्वरूपाचा विचार केला तर काय फायदा होतो व जर

वस्तुस्वरूपाचा विचार नाही केला तर काय तोटा होतो हे स्वयं प्रयोग केला तरच आपल्या लक्षात येईल. दोन अवस्थेमध्ये स्वत:ला फरक जाणवेल. **वस्तूस्वरूपाच्या विचारापासून दूर हटणे म्हणजे स्वत:ला दु:खाच्या खाईत लोटणे आहे व वस्तुस्वरूपाचा विचार करणे म्हणजे सुखसागरामध्ये मग्न होणे आहे ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.**

आत्मा धर्मरूप आहे –

धर्म ही बाहेर कोठेही प्राप्त होणारी वस्तू नाही. धर्म बाजारात किंवा दुकानात विकत मिळत नाही. धर्म दानामध्ये प्राप्त होणारी वस्तू नाही किंवा दान दिल्यानेही धर्म मिळत नाही. धर्म कोणत्याही तीर्थक्षेत्रावर, पहाडावर, आश्रमामध्ये किंवा मठामध्ये ठेवलेला नाही की तेथे जाऊन आपण प्राप्त करू शकू. कोणी म्हणेल की धर्म मंदिरात मिळतो की नाही ? जर मंदिरात धर्म मिळत नसेल तर मंदिरात जाण्याचा आग्रह का धरला जातो ? धर्म मंदिरात मिळत नाही; परंतु धर्म कोठे मिळतो याचा पत्ता मंदिरात मिळतो. म्हणून धर्माचा पत्ता जाणून घेण्यासाठी मंदिरात जायला सांगितले आहे. मंदिरात विराजमान असलेले भगवान सांगतात, धर्म तुझ्या जवळच आहे. किंबहुना तूच धर्मरूप आहेस. कारण धर्म हा आत्म्याचाच परिणाम आहे. परिणाम परिणामीपासून भिन्न असत नाही. प्रत्येक पदार्थ परिणामस्वभावी आहे. आत्मासुद्धा पदार्थ आहे म्हणून तोसुद्धा परिणाम स्वभावी आहे. धर्म हा आत्म्याचाच समताभावरूप परिणाम आहे. समताभाव म्हणजेच चारित्र. या चारित्राने परिणत आत्म्याला दोन प्रकारचे परिणाम संभवतात, एक शुद्ध व दुसरा शुभ. या दोन परिणामांपैकी कोणता परिणाम ग्राह्य आहे व कोणता परिणाम त्याज्य आहे, हे सांगण्यासाठी शुद्ध व शुभ परिणामाचे फळ सांगतात.–

धम्मेण परिणदप्पा अप्पा जदि सुद्धसंपओगजुदो।
पावदि णिव्वाणसुहं सुहोवजुत्तो य सग्गसुहं ।।११।।

अन्वयार्थ – (धम्मेण परिणदप्पा अप्पा) धर्माने परिणतस्वरूप आत्मा **(जदि)** जर **(सुद्धसंपओगजुदो)** शुद्धोपयोगाने युक्त होतो तर **(णिव्वाणसुहं)** निर्वाण सुखाला **(पावदि)** प्राप्त करतो **(य)** आणि जर **(सुहोवजुत्तो)**

शुभोपयोगाने युक्त होतो तर **(सग्गसुहं)** स्वर्गसुखाला प्राप्त करतो.

जेव्हा हा आत्मा धर्माने परिणत होऊन शुद्धोपयोग परिणतीला धारण करतो तेव्हा विरोधी शक्तीने रहित असल्यामुळे आपले कार्य करण्यासाठी समर्थ अशा चारित्राने युक्त होऊन साक्षात मोक्षाला प्राप्त करतो आणि जेव्हा तोच आत्मा धर्मपरिणत असूनसुद्धा शुभोपयोग परिणतीला धारण करतो तेव्हा विरोधी शक्तीने सहित असल्यामुळे आपले कार्य करण्यास असमर्थ व कथंचित् विरुद्ध कार्य करणाऱ्या चारित्राने युक्त होतो. म्हणून स्वर्गसुखाच्या बन्धाला प्राप्त होतो.

विरोधी शक्तीचा अभाव : कार्याची जननी –

धर्माचे स्वकार्य म्हणजे मोक्ष. विरुद्ध कार्य म्हणजे बंध. धर्माची अविरोधी शक्ती वीतरागता व विरोधी शक्ती म्हणजे सरागता. कोणतेही कार्य सफल होण्यासाठी विरोधी शक्तीचा अभाव आवश्यक आहे. विरोधी शक्तीने युक्त असणेच कार्यपूर्तीमध्ये बाधक आहे. केवळ बाधकच आहे असे नाही तर विरुद्ध कार्य उत्पन्न करणारे आहे.

ज्याप्रमाणे तूप व लोणी स्वभावत: शीतल आहे व शीतलता उत्पन्न करणे त्याचे कार्य आहे. अंगात उष्णता वाढली तर तळपायाला व डोक्याला थंड तूप चोळतात. जर ते तूप अग्नीच्या संयोगाने रहित असेल तर ते आपले कार्य करण्यामध्ये समर्थ होते अर्थात शीतलता उत्पन्न करते; परंतु तेच तूप जर अग्नीच्या संयोगाने गरम होते तर शीतलतारूप आपले कार्य तर उत्पन्न करीत नाहीच, उलट जाळणे रूप विरुद्ध कार्य करते. गरम तूप मनुष्याच्या अंगावर ओतले तर शीतलतेऐवजी शरीरामध्ये दाह उत्पन्न करते. त्याचप्रमाणे धर्माचे फळ निर्वाणाची प्राप्ती आहे. तो धर्म जर रागाची संगती सोडून निर्विकल्प समाधिरूप शुद्धोपयोगामध्ये स्थित राहिला तर त्याचे फळ निर्वाण आहे; परंतु जर धर्माने शुभोपयोगरूप रागाची संगती केली तर निर्वाण तर प्राप्त होत नाहीच, उलट संसाररूप बन्धन प्राप्त होऊन जीव दु:खाला प्राप्त होतो.

सज्जन पुरुषाचे कार्य परोपकार करणे हे आहे. तो नेहमी परोपकार, दया करण्यामध्ये तत्पर असतो, परंतु जर तो दुर्जनाच्या संगतीमध्ये सापडला तर परोपकार करणे तर दूरच, उलट दुसऱ्याचा अपकार करायला मागे पुढे पाहत नाही. यावरून विरोधी शक्तीने युक्त होणे किती घातक आहे हे लक्षात येते.

शुद्धोपयोग मोक्षप्रदाता –

ज्ञानी धर्मात्मा सतत शुद्धोपयोगामध्ये राहण्याची इच्छा करतो व त्यासाठी निरन्तर प्रयत्नशील असतो. परंतु खालच्या भूमिकेमध्ये शुद्धोपयोगामध्ये राहण्यास असमर्थ होतो तेव्हा शुभोपयोगाचा आश्रय घेतो. परंतु अंतरंगातून अर्थात श्रद्धेतून त्याला हेय अर्थात सोडण्यायोग्य मानतो. म्हणून तर मुनिराज अंतर्मुहूर्त-अंतर्मुहूर्तामध्ये शुभोपयोगातून शुद्धोपयोगात व पुन्हा शुभोपयोगात झुलत असतात. जर त्यांनी शुभोपयोगला उपादेय मानले असते तर शुद्धात्म्यामध्ये जाण्याचा पुरुषार्थच केला नसता. ते शुद्धात्म्यामध्ये राहण्याचा प्रयत्न करतात याचाच अर्थ ते शुभोपयोगाला सोडू इच्छितात. आपण एखाद्या दुसऱ्या चांगल्या स्थानामध्ये जाण्याचा प्रयत्न करतो. याचाच अर्थ आपण पहिले स्थान सोडू इच्छितो.

निश्चयाने शुद्धोपयोगच धर्म आहे. परंतु खालच्या भूमिकेमध्ये शुद्धोपयोगाबरोबर शुभोपयोग असतो. म्हणून व्यवहाराने शुभोपयोगालासुद्धा धर्म म्हटले आहे. परंतु वस्तुस्वरूपाचा विचार केल्यावर शुभोपयोग बंधाचे कारण आहे. म्हणून मोक्षाचा घातक आहे. समयसार गा. १४७ मध्ये कुंदकुंद आचार्य पुण्याला कुशील म्हणतात. कुशीलाच्या संसर्गाने स्वाधीनतेचा नाश होतो म्हणून तू कुशीलाची संगती करू नकोस असे सांगतात. जे संसारामध्ये प्रवेश करायला लावते त्यास सुशील कसे म्हणावे.

शुद्धोपयोगामुळे निर्वाणसुखाची प्राप्ती होते व शुभोपयोगामुळे स्वर्गसुखाची प्राप्ती होते याचे ज्वलंत उदाहरण पाच पांडव आहेत.

श्री नेमिनाथ भगवंतांच्या समवशरणामध्ये आपल्या पूर्वभवाचा वृत्तान्त ऐकून पाच पांडवांना वैराग्य झाले व त्यांनी विशुद्ध परिणामपूर्वक प्रभूंच्या सन्मुख जिनदीक्षा धारण केली. त्यानंतर ते विहार करीत शत्रुंजय सिद्धक्षेत्रावर येऊन निष्कंप रूपाने आत्मध्यानामध्ये मग्न होते. आत्मस्वरूपामध्ये आपला उपयोग एकाग्र करीत होते. शत्रू-मित्राच्या प्रती त्यांना समभाव होता. त्याचवेळी दुर्योधनाच्या दुष्ट भाच्याने त्यांना पाहिले. 'या लोकांनीच माझ्या मामाला मारले' असा विचार करून वैरबुद्धीने त्यांचा बदला घेण्याचे ठरविले. त्या दुष्ट जीवाने लोखंडाचे मुकुट, बाजूबंद, हार इत्यादी दागिने बनवून अग्नीमध्ये तापविले व क्रोधाच्या आवेशात मुनिवरांच्या मस्तकावर

तापविलेला मुकुट घातला. हातामध्ये बाजूबंद, कडे, गळ्यामध्ये हार व पायामध्ये कडे घातले व जोरजोराने हसून म्हणू लागला, 'तुम्हाला राज्यपद पाहिजे होते ना, घ्या हे राजाचे आभूषण व करा मनसोक्त राज्य. अशाप्रकारे मुनिराजांच्यावर घोर उपसर्ग केला. धधकणाऱ्या लोखंडाच्या मुकुटांनी मुनिवरांचे मस्तक जळू लागले, हातपाय जळू लागले अशा घोर उपसर्गामध्येसुद्धा आपल्या स्वरूपापासून ते च्युत झाले नाहीत. युधिष्ठिर, भीम व अर्जुन या तीन मुनिवरांनी त्याचसमयी निर्विकल्प शुद्धोपयोगपूर्वक क्षपकश्रेणी मांडून केवलज्ञान प्रकट करून मोक्ष प्राप्त केला; परंतु नकुल व सहदेव या दोन मुनिराजांना आपल्या साधर्मी बंधूसंबंधी विकल्प उत्पन्न झाले अर्थात ते शुभोपयोगात आले. त्यांना विचार आला की 'पहा', तीन मुनी शान्तमूर्ती बनून ध्यान करू लागले आहेत आणि हे लोक उपसर्ग करीत आहेत. त्यांच्या ध्यानामध्ये व्यत्यय येऊ नये, असा साधर्मीसंबंधी शुभराग उत्पन्न झाला. या शुभोपयोगामुळे त्या दोघांना केवलज्ञानाची प्राप्ती झाली नाही. तो शुभोपयोग निर्वाणामध्ये बाधक बनला व त्यांना स्वर्गाचा बंध झाला. ३३ सागराची जेल त्यांना मिळाली. ते सर्वार्थसिद्धी विमानामध्ये देव झाले. त्यांना ही उपसर्ग झाला होता. त्यांचेही शरीर जळत होते. परंतु त्यांनी स्वत:ची काळजी केली नाही. हा जीव अनादिकाळापासून पराचीच चिन्ता करीत आला आहे. त्यामुळेच संसाररूपी चक्रामध्ये फिरत आहे. बाहेरून तर ते ध्यानामध्येच स्थित दिसत होते; परंतु अंतरंगामध्ये त्यांची परिणती शुभोपयोगाने रंगली होती म्हणूनच ते बंधनामध्ये अडकले, मुक्त झाले नाहीत. यावरून शुद्धोपयोग ग्रहण करण्यायोग्य व शुभोपयोग त्याग करण्यायोग्य आहे, ही गोष्ट सिद्ध होते. कोणत्या वस्तूचे ग्रहण करायचे व कोणत्या वस्तूचा त्याग करायचा हे आपण त्याच्या फळावरूनच ठरवतो. ज्यामुळे आपला फायदा होतो ती वस्तू आपण ग्रहण करतो व ज्यामुळे नुकसान होते त्या वस्तूचा त्याग सहजच होतो. नकुल व सहदेवाला जरी शुभोपयोग झाला तरी त्यांचा शुभोपयोगामध्ये आदर नव्हता. जर त्यांचा शुभोपयोगामध्ये आदर असता तर ते सर्वार्थसिद्धीमध्ये सुद्धा जाऊ शकले नसते. सम्यक्त्वी शुभोपयोगात राहतो; परंतु त्याची श्रद्धा शुभोपयोगामध्ये नसते. जगाचे सर्व काम करताना सुद्धा त्याच्या अंतरंगामध्ये शुद्ध लक्ष्याची निर्मलधारा सतत वाहत राहते.

शुद्ध आत्म्याची अरुची हा अक्षम्य अपराध –

प्रत्येक कार्य करताना आपली दृष्टी सहज शुद्ध ज्ञानदर्शन स्वभावावर असली पाहिजे. जी उपयोगरूप परिणती शुद्ध आत्म्याचा स्वीकार करते, त्याच्या गळ्यातच वरमाला घालते, त्यालाच आपले सर्वस्व अर्पण करते ती शुद्ध होय. जी उपयोगरूप परिणती शुद्ध आत्मा सोडून परपदार्थाचा स्वीकार करते, पराच्या गळ्यात वरमाला घालते, त्यालाच आपले सर्वस्व अर्पण करते ती अशुद्ध होय. शुभ व अशुभ उपयोग पराला स्वीकारतात म्हणून अशुद्ध आहेत. आत्मा शुद्ध चिदानन्दमय अखण्ड एकत्वस्वरूपी वस्तू आहे. त्याच्यावर ज्याचे प्रेम नाही, रुची नाही त्याला आत्म्याच्या प्रती अनन्तक्रोध आहे. पुण्यपापादी परपदार्थांमध्ये अहंबुद्धी हाच अनन्तानुबन्धी मान आहे. पुण्यपापादी परपदार्थांच्या प्रेमापोटी चैतन्यस्वभावमय आत्म्याची अस्वीकृती हीच अनन्तानुबंधी माया आहे. स्वभावाला विसरून पुण्यपापादी परपदार्थांची अभिलाषा हाच अनन्तानुबंधी लोभ आहे. राग रोग आहे आणि राग माझा आहे अशी मिथ्या मान्यता महारोग आहे. ज्ञानीला शुभराग सहज होतो. अशुभापासून वाचण्यासाठी व शुद्धामध्ये जाण्यासाठी प्रयत्नपूर्वक शुभोपयोग करतो तरीसुद्धा शुभरागासंबंधी त्याची हेयबुद्धी असते. शुभोपयोगामध्ये वर्तन करतानासुद्धा अंतरंग भावना शुद्धोपयोगाच्या लाभाचीच असते. असा शुभोपयोग शुद्धोपयोगामध्ये जाण्यासाठी निमित्तभूत आहे म्हणून या शुभोपयोगाला परंपरेने मोक्षाचे कारण म्हटले आहे.

शुभोपयोगाचे लक्ष्य शुद्धोपयोग –

ज्या शुभोपयोगामध्ये बाहेर पंचपरमेष्ठीचा आश्रय आहे व आत स्वभावाचे लक्ष्य आहे तो सर्वात उच्च शुभोपयोग आहे. आपल्या दैनंदिन जीवनामध्येही याचा प्रयोग करावा. पूजन करताना असे भाव झाले पहिजेत की आम्ही ज्या पंच परमेष्ठींचे पूजन करीत आहोत तेच स्वरूप आमचे लक्ष्य आहे, त्याच स्वरूपाला मला प्राप्त करावयाचे आहे. आमचे इष्ट साध्य प्राप्त करण्यासाठी हे पंच परमेष्ठी आश्रयभूत आहेत. प्रत्येक छंद म्हणताना, प्रत्येक ओळीचे उच्चारण करताना आमचा उपयोग बाहेरून आत गेला पाहिजे. देवाच्या ज्या वीतरागस्वरूपाचे गुणगान केले तसेच स्वरूप माझेसुद्धा आहे. जल, गंध अक्षतादी आठ द्रव्येसुद्धा आपल्या स्वरूपाचे प्रतीक आहेत. जल

निर्मलस्वभावाचे, चंदन शांत स्वभावाचे, अक्षत अखंड अविनाशी स्वभावाचे, पुष्प कोमल आर्जव स्वभावाचे, नेवैद्य चैतन्यरसामृताचे, दीप प्रकाशस्वभावाचे, धूप ऊर्ध्वगामी स्वभावाचे व फल परिपूर्ण स्वभावाचे प्रतीक आहे. हे द्रव्य चढवताना त्या आपल्या स्वभावाचे स्मरण करून प्रत्यक्ष जाणण्याचा प्रयत्न करावा. पूजा म्हणजे आश्रयाच्या आधाराने स्वरूप प्राप्त करण्याचा उद्यम आहे. याचप्रमाणे इतर स्वाध्यायादी क्रिया करतानाही प्रयोग करावा. प्रत्येक शुभोपयोगाचे अवलंबन मी शुद्धोपयोगाला प्राप्त करण्यासाठी करीत आहे, याचे भान ठेवावे व तसा पुरुषार्थ करावा. शुभक्रियेचे अवलंबन शुभोपयोगासाठी व शुभोपयोगाचे अवलंबन शुद्धोपयोगासाठी व शुद्धोपयोगाचे अवलंबन मोक्षासाठी आहे.

कोणी म्हणेल पंचमकाळात तर मोक्ष मिळत नाही मग शुद्धोपयोगाचे अवलंबन करून काय उपयोग ? असे म्हणणे योग्य नाही. कारण साक्षात् मोक्ष पुढे जेव्हा मिळायचा तेव्हा मिळेल; परंतु ज्या क्षणी जीव शुद्ध आत्म्याचे अवलंबन घेतो त्याक्षणी मोक्षसुखाचा अर्थात अतीन्द्रिय आनंदाचा अनुभव करतो. समयसार तात्पर्यवृत्तीमध्ये गा. २३ मध्ये आचार्य सांगतात.-

जीवे व अजीवे वा संपदि समयम्हि जत्थ उवजुत्तो।
तत्थेव बंध मोक्खो हवदि समासेण णिदिट्ठो ।।२३।।

वर्तमान काळामध्ये जीवामध्ये अथवा अजीवामध्ये जेथे उपयोग उपयुक्त आहे तेथेच बंध अथवा मोक्ष आहे असे संक्षेपाने सर्वज्ञांनी सांगितले आहे अर्थात वर्तमान समयात शुद्ध आत्म्यामध्ये उपयोग लीन आहे तर येथेच मोक्ष आहे व अजीवामध्ये उपयोग लीन आहे तर येथेच बंध आहे. हे जाणून सहजानंद एकस्वभावरूप निजात्म्यामध्ये रती करावी व परद्रव्यापासून विरती करावी, असा अभिप्राय आहे. जो आपल्या शुद्धात्म्याचा अनुभव करतो तो सिद्धांच्या सुखाचा अनुभव घेतो त्याला सिद्धांच्या निराकुल स्वभावाची प्रतीती होते व तो सिद्धसुख प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहतो.

पूर्व गाथेमध्ये शुद्धोपयोग ग्रहण करण्यायोग्य व शुभोपयोग सोडण्यायोग्य सांगितला आहे. हा उपदेश अन्यथा ग्रहण करून कोणी जीव शुभोपयोगाला सोडून अशुभोपयोगाचा आश्रय घेईल. कारण या कलिकाळात वक्रबुद्धिवाले जीव अधिक आहेत म्हणून या गाथेमध्ये अशुभोपयोग अत्यन्त हेय आहे हे

सांगण्यासाठी त्याच्या फळाचा विचार करतात –

असुहोदयेण आदा कुणरो तिरियो भवीय णेरइयो।
दुक्खसहस्सेहिं सदा अभिंधुदो भमदि अच्चंतं ।।१२।।

अन्वयार्थ – (असुहोदयेण) अशुभ कर्माच्या उदयामुळे **(आदा)** आत्मा **(कुणरो)** कुमनुष्य **(तिरियो)** तिर्यंच व **(णेरइयो)** नारकी **(भवीय)** होऊन **(दुक्खसहस्सेहिं)** हजारो दु:खांनी **(सदा)** नेहमी **(अभिंधुदो)** पीडित होऊन **(अच्चंतं)** अत्यंत **(भमइ)** भटकतो.

जेव्हा हा जीव किंचितसुद्धा धर्म परिणतीला प्राप्त न करता अशुभोपयोग परिणतीचे अवलम्बन करतो अर्थात हिंसा, असत्य, चोरी, कुशील, तृष्णा, जुगार, पराची हानी, विषयभोगामध्ये लोलुपता इत्यादी अशुभोपयोगाने परिणमतो तेव्हा पाप बांधून त्या पापाच्या उदयाने दु:खी दरिद्री मनुष्य होऊन व तिर्यंच पशू व नारकी होऊन हजारो दु:खाने पीडित या संसारामध्ये अधिक परिभ्रमण करतो.

अशुभोपयोगाच्या निमित्ताने ज्या पाप कर्माचे उपार्जन करतो त्याच्या उदयाने हा जीव जर मनुष्यांमध्ये उत्पन्न होतो तर नीच कुळामध्ये वा तेथे सुद्धा पूर्ण वैभव संपन्न नाही; तर महादरिद्रींमध्ये उत्पन्न होतो. दरिद्रींमध्ये सुद्धा परिपूर्ण अवयवयुक्त होत नाही तर विकलांग होतो. विकलांगयुक्त होऊन कुटुम्बयुक्त नाही तर कुटुम्बरहितांमध्ये उत्पन्न होतो. तेथे कोणी त्याला पाणी पाजणारासुद्धा मिळत नाही. तेथे जन्म घेऊन सदा रोगी, शोकयुक्त, कोडी बनून जीवनभर दु:खाचा भार वहन करतो. रात्रंदिवस वेदना, भूख तहानेच्या ज्वालेने जळत राहतो. कधी लब्ध्यपर्याप्त सम्मूर्च्छिम मनुष्यांमध्ये, म्लेच्छ खंडाच्या मनुष्यांमध्ये व कुभोगभूमीच्या मनुष्यांमध्ये उत्पन्न होतो तेथे न धर्म आहे, न आचार. 'जैसी करणी वैसी भरणी' चा नियम अकाट्य आहे. जसे परिणाम करतो तसे फळ भोगावेच लागते.

अशुभोपयोगाच्या फळस्वरूप तिर्यंचांमध्ये उत्पन्न होतो. तिर्यंचगतीचे दु:ख सर्वांना प्रत्यक्षच पहायला मिळते. लोक पशूंना पाळतात. त्यांना रात्रंदिवस गाडीला जुंपून ओझे लादून जर्जरित करतात. वेळेवर खायला, प्यायला देत नाहीत. ज्या पशूंचे दूध पितात त्यांना दूध देणे बंद झाल्यावर

खाटीकांना विकतात. शिकारी बिचाऱ्या शाकाहारी हरिणांनासुद्धा गोळी घालून ठार मारतात. कित्येकजण कोमल चमडे प्राप्त करण्यासाठी गर्भिणी मेंढ्यांना इकडेतिकडे पळवून गर्भ पाडतात. कत्तल खान्यामध्ये दररोज लाखो करोडो पशू मारले जातात. पशुगतीचे दु:ख कोठपर्यंत सांगावे ? स्वयं माताच आपल्या बाळांना खाऊन टाकते, सर्पिणी एकाच वेळेस अनेक पिल्लांना जन्म देते आणि त्यांना आपल्या घेऱ्यामध्ये घेरून ठेवते आणि क्रमाक्रमाने त्यांना खाऊन टाकते. एखादेच पिल्लू त्यातून निसटते ते तेवढे वाचते. भुकेलेली कुत्रीण आपल्या नवजात पिलाला खाते. याहून अधिक दु:ख काय असू शकते ?

त्या विकलांग दीन-हीन रोगी दरिद्री मनुष्यांना पाहून किंवा असहाय्य पशूंना पाहून आज आम्हाला दया येते. बिचारे विनाकारण मारले जात आहेत असे वाटते. परंतु ते दु:ख पाहून आपण हा विचार करीत नाही की त्यांना असे दु:ख का झाले ? याचा जर विचार केला तर लक्षात येईल या जीवांनी पूर्वी अशा प्रकारची प्रतिकूलता दुसऱ्यांना उत्पन्न केली होती त्याचेच हे फळ आहे. दुसऱ्यांना लुबाडणे, दुसऱ्यांना फसवून त्यांचे धन लुटणे, काळाबाजार करणे, दरोडा घालणे इत्यादी कुकृत्यामुळेच दरिद्रता इत्यादींचे दु:ख प्राप्त होते. सर्वात मोठे पाप मिथ्यात्व आहे. संज्ञी पंचेन्द्रिय पर्याप्त होऊनसुद्धा जर स्वत:ला ओळखले नाही तर आपल्यालासुद्धा अशी अवस्था प्राप्त होणार म्हणून प्रत्येक क्षण परिणामामध्ये सावध राहिले पाहिजे. प्रत्येक अशुभ कार्य करताना भविष्य काळातील त्याच्या फळाकडे लक्ष दिले पाहिजे. **मी जे परिणाम करतो त्याचे फळ मला काय मिळेल याचे भान सतत ठेवावे.**

अशुभोपयोगाचे फळस्वरूप नरकगतीचे जे महादु:ख आहे त्याचे वर्णन अनेक शास्त्रांमध्ये केले आहे. असंख्यात वर्षापर्यंत मारकाट इत्यादीचे महाभयानक दु:ख आहे त्याचे वर्णन ऐकून हृदय कापते. जे जीव पुष्कळ आरंभ, पुष्कळ परिग्रहामध्ये आसक्त असतात निरन्तर अशुभोपयोगी संक्लिष्ट परिणामी असतात, रौद्रध्यानी असतात, ज्यांना भांडणतंट्यामध्ये आनंद येतो ते जीव नरकायू बांधून नरकात उत्पन्न होतात. तेथे उंट, वाघ, मगर इत्यादी बीभत्स आकारवाल्या उपपाद शय्येमध्ये उत्पन्न होऊन अंतर्मुहूर्तात शरीर प्राप्त करून पूर्ण युवा नारकी होतो. उपपाद शय्या बिळाच्या वरच्या भागामध्ये

असतात व त्यांची तोंडे खाली असतात. नारकी जीव खाली तोंड करून जमिनीवर आपटतात. तेथील भूमी एवढी विषारी असते की त्याचा स्पर्श करताच नारकींना हजारो विंचू एकावेळी चावल्यापेक्षा अधिक वेदना होतात. तो आपटून पुन्हा वर उडतो. सातव्या नरकातील नारकी जमिनीचा स्पर्श करून दु:खाने अतिसंतप्त होऊन ५०० योजन वर उसळतो. सहाव्या नरकातील नारकी २५० योजन वर उसळतो. त्यावरील नरकामध्ये त्याच्या अर्धे-अर्धे योजन कमी वर उसळतो. नारकी वर उसळून लगेचच फुटबॉलप्रमाणे खाली पडतो. पुन्हा वर उसळतो. याक्रमाने शेकडो वेळा वर खाली करून अर्धमेला होऊन जमिनीवर पडतो. तेव्हा जुने नारकी त्याला पहाताच शिकारी कुत्र्याप्रमाणे त्याच्यावर तुटून पडतात. नारकी अत्यन्त निष्ठुर कठोर वचनाचा घाव करीत त्याला मारतात. त्याच्या जखमेवर खारट गरम पाणी ओतात. तो महावेदनेने ओरडत पळत सुटतो. दुसरे नारकी शिकाऱ्याप्रमाणे त्याचा पाठलाग करतात. त्यातून वाचण्यासाठी तो पहाडावर चढतो तर वरून मोठमोठे दगड त्याच्या डोक्यावर पडतात. त्यामुळे त्याचे मस्तक चक्काचूर होते. तेथून पळून वनामध्ये प्रवेश करतो तर तेथील वृक्षांची पाने तलवारीच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण असतात. ती पाने त्याच्या अंगावर तटातट तुटून पडतात. त्यामुळे त्याचे सर्व शरीर छिन्न-भिन्न होते. त्याचवेळी नारकी जीव वाघ, सिंह, गिधड, कावळा इत्यादी पशुपक्ष्यांचे रूप धारण करून त्याला खाण्यासाठी धावतात. तेव्हा तो आपले प्राण वाचविण्यासाठी इकडे तिकडे फिरतो. जेव्हा कोठे काही शरण दिसत नाही तेव्हा तो वैतरणी नदीमध्ये उडी मारतो की चला येथे तरी शान्ती मिळेल. परंतु त्यामध्ये प्रवेश करताच तो अधिक दु:खाचा अनुभव करतो.

तेथील खारट व गरम पाण्यामुळे त्याचे शरीर जळू लागते. नारकी जीव मगर-मत्स्य इ. वेष धारण करून चारी बाजूने त्याला खाण्याकरिता धावतात. तो तेथेही महादु:खाचा अनुभव करून बाहेर पडतो तर दुसरे नारकी त्याला उकळणाऱ्या तेलाच्या कढईमध्ये टाकून पुरी, कचोरीप्रमाणे उलट पुलट करून तळून काढतात, त्रिशूलाने छेदतात. नारकी परस्पर सदैव भांडत राहतात. तो जीव जेथे जातो तेथे महाकष्ट भोगतो. एक क्षणसुद्धा सुखाचा श्वास घेऊ शकत नाही. त्या नरकातील पृथ्वी इतकी दुर्गन्धित असते की जर पहिल्या नरकातील

थोडी माती येथे मध्यलोकामध्ये आणली तर अर्ध्या कोसापर्यंतचे जीव त्याच्या दुर्गंधाने मरून जातील. त्या पुढच्या पृथ्वीच्या गंधाने क्रमश: एक कोस, दीड कोस, अडीच कोस, तीन कोस व साडे तीन कोसापर्यंतचे जीव मरण पावतात. अशाप्रकारे ते नारकी नरकामध्ये क्षेत्रजनित शारीरिक व मानसिक दु:ख असंख्यात वर्षांपर्यंत सहन करतात. तिसऱ्या नरकापर्यंत असुरकुमार देवसुद्धा जाऊन त्यांना पूर्वभवाचे वैर आठवून देऊन परस्परामध्ये भांडणे लावतात.

तेथे भूक एवढी लागते की तिन्ही लोकातील सर्व अन्न खाल्ले तरी भूक मिटणार नाही; परंतु खायला एक दानासुद्धा मिळत नाही. तहान एवढी लागते की सर्व समुद्राचे पाणी प्याला तरी तहान भागणार नाही; परंतु पाण्याचा एक थेंबसुद्धा मिळत नाही. अशाप्रकारचे दु:ख पुष्कळ सागरापर्यंत निरन्तर सहन करतो. त्यांचे अकालमरण होत नाही. शरीराचे तुकडे तुकडे झाले तरी पाऱ्याप्रमाणे लगेचच परस्परामध्ये मिळून जातात. नारकींना मारण्याकरिता दुसऱ्या हत्यारांची आवश्यकता नाही. त्यांचे हातच तलवार, भाला, कुऱ्हाड इत्यादी विविधरूपाने परिणत होतात. ही गोष्ट नारकींना आणखीन कष्टदायक होते. कारण जर हत्यार घेण्याचे काम पडले तर ते घेऊपर्यंत काही क्षणाकरिता तरी दुसरा नारकी त्याच्या प्रहारापासून वाचू शकला असता. परंतु नारकींचे शरीर वैक्रियिक असते. ज्याक्षणी जसा विचार करतात त्याक्षणी त्यांचे शरीर त्यारूपाने परिणमते. त्यामुळे नारकींचे दु:ख अधिक वाढते. नरकाच्या स्वरूपाचे चिंतनसुद्धा धर्मध्यानाचे एक अंग आहे. हे संस्थान विचय नावाचे धर्मध्यान आहे.

सांगण्याचा सारांश हा आहे की संसारामध्ये जेवढे दु:ख आहे ते सर्व अशुभोपयोगाचेच फळ आहे. विकलत्रयाच्या असंख्य पर्यायांमध्ये, एकेन्द्रियांच्या असंख्य जातींमध्ये हा जीव अशुभोपयोगाचेच फळ भोगतो. एकेन्द्रियांचे दु:ख तर ते स्वत:च भोगतात व केवली भगवानच जाणू शकतात. छद्मस्थांच्या ज्ञानाचा तो विषयच नाही. हे सर्व दु:ख दुसऱ्याचे नसून आपलेच आहे. मीच अशाप्रकारचे दु:ख पूर्वी भोगले आहे व अशुभोपयोग सोडला नाहीतर मला पुढे असेच दु:ख भोगावे लागेल असे जाणून जर चिंतन केले तर पापासंबंधी भय उत्पन्न होऊन त्यापासून निवृत्त होऊन अशुभोपयोगाला

दूरूनच सोडून देईल.

आता दुर्गुणांना माफी मागूया, हे दोषराज, आतापर्यंत अज्ञानाच्या कृपेने आपल्या आज्ञेमध्ये अनाथ राहिलो, आता मी माझ्या नाथाला ओळखले आहे. आता कृपा करून तू येथून निघून जा. माझे जगात कोणीही नाही. मी एकटा आहे. शुद्ध आहे, ज्ञानदर्शनमय अरूपी आहे. एक परमाणुमात्रसुद्धा माझे काहीही नाही. मी कुणासाठी पाप करू?

ज्ञान प्रकट झाल्यावर दोषांची डाळ शिजत नाही. ते रामराम करून निघून जातात. म्हणून तत्त्वज्ञानाचा सतत अभ्यास केला पाहिजे. ज्ञानीच्या व्यवहारामध्ये सर्व सुखद नीती आपोआप येतात.

मिथ्यादृष्टीला मुख्यरूपाने अशुभोपयोग असतो. सम्यग्दृष्टी अभिप्रायामध्ये स्वपर हितच इच्छितो. शत्रूंच्यासुद्धा आत्म्याचे कल्याण इच्छितो. म्हणून त्याला मुख्यरूपाने शुभोपयोग असतो; परंतु चारित्राच्या अपेक्षेने त्यालासुद्धा अशुभोपयोग होतो. कारण संक्लेशपरिणामांनी युक्त होऊन गृहारंभ करतो. जोपर्यंत सम्यग्दृष्टी जीव प्रवृत्तिमार्गामध्ये आहे तोपर्यंत त्याला अशुभोपयोग व शुभोपयोग दोन्ही होतात व निवृत्तिकाळामध्ये अर्थात सामायिकादी काळामध्ये शुद्धोपयोगसुद्धा होतो. चारित्राच्या अपेक्षेने जेव्हा सम्यक्त्वी जीव तीव्र कषायवान होऊन गृहारंभ करतो, इष्ट वियोगज, अनिष्ट संयोगज, रोग-पीडाजनित आर्तध्यान करतो तेव्हा त्याला अशुभोपयोग होतो व जेव्हा देवपूजा, गुरूपास्ती, स्वाध्याय, संयमादी व्यवहार चारित्राचे आचरण करतो तेव्हा त्याला शुभोपयोग होतो. शुभोपयोगामध्ये धर्मध्यान व अशुभोपयोगामध्ये आर्तरौद्रध्यान असते. पाचव्या गुणस्थानापर्यंत रौद्रध्यान व सहाव्या गुणस्थानापर्यंत आर्तध्यान असते. सम्यग्दृष्टीचा अशुभोपयोग मिथ्यादृष्टीच्या अशुभोपयोगाहून विलक्षण असतो. मिथ्यादृष्टीचा अशुभोपयोग जसे पापकर्म बांधतो तसे पापकर्म सम्यग्दृष्टीचा अशुभोपयोग बांधत नाही. मिथ्यात्व, अनंतानुबंधी कषाय, एकेंद्रिय, विकलेन्द्रिय व नरकासंबंधी प्रकृतींचा सम्यग्दृष्टी जीव बंधच करीत नाही म्हणून तो नरक व तिर्यंच आयू बांधत नाही, स्त्री व नपुंसक होत नाही, न तो दीन दुःखी दरिद्री मनुष्य होतो, न तो हीन देव होतो.

अशुभोपयोगाचे फळस्वरूप नरकादी गतीचे दुःख जाणून हा जीव

पापापासून विरक्त होतो. नरकादी चारी गतीचे दु:ख या जीवाने अनेक वेळा ऐकले आहे, पाहिले आहे व स्वत: अनुभवलेले आहे; परंतु त्या दु:खाच्या कारणांचा कधीही विचार केला नाही म्हणून दु:खातून सुटू शकला नाही. आता या दु:खातून मुक्त होण्यासाठी स्वत:च स्वत:च्या आत्म्याला संबोधन करावे. –

'हे आत्मन्, आता बस कर, ज्याचे केवळ वर्णन ऐकून सुद्धा हृदय कापते असे नरकाचे अनंत दु:ख अनंतकाळामध्ये तू अनंतवेळा सहन केले आहेस; परंतु आतापर्यंत एक क्षणसुद्धा सुख किंवा शांतीचा अनुभव केला नाहीस. कारण तू एक क्षणसुद्धा आपल्या स्वरूपाचा अनुभव केला नाहीस. अज्ञानाचे पुन्हा पुन्हा सेवन करून आपल्या आत्म्याला दु:खामध्येच ढकललेस. हे जीवा, आता बस कर, बस कर. या उत्कृष्ट मनुष्य भवामध्ये अनंतकाळाचे अनंत दु:ख टाळण्याची व खरे सुख प्राप्त करण्याची संधी तुला प्राप्त झाली आहे. जर आता आपल्या स्वरूपाला जाणण्याचा खरा उपाय केला नाहीस तर पुन्हा चौऱ्याऐंशीच्या चक्रामध्ये भ्रमण करावे लागेल. यावेळी जर आपल्या आत्म्याला संसारचक्रामधून सोडवले नाहीस तर पुन्हा कधी सोडवणार ? म्हणून भो आत्मन्, आता तू जागा हो आणि आपले हित करण्यामध्ये सावधान हो. आत्मार्थ साधण्याकरिता अशी तुझी तत्परता असेल तर जगामध्ये कोणाचीही शक्ती नाही की तुला आत्मकार्यामध्ये विघ्न करू शकेल. जेथे आत्महिताची तत्परता असते तेथे संपूर्ण जग त्या आत्महिताच्या प्राप्तीमध्ये अनुकूल परिणमित होते.

अकराव्या व बाराव्या गाथेमध्ये शुभोपयोग व अशुभोपयोग यांचे फळ दाखवून त्यांची हेयता स्पष्ट केली आहे. अशुभोपयोगाचे फळ नारकादी दु:खरूप विपदाच आहे व शुभोपयोगाचे फळसुद्धा स्वर्गादी सुखरूप विपदाच आहे. दोन्ही संसाररूपी तुरूंगात अडकविणारे पाशच आहेत. ज्यांनी आपल्या आत्मस्वरूपाला ओळखले त्यालाच तीर्थंकर, चक्रवर्ती, बलभद्र, नारायण, इन्द्र अहमन्द्रादींच्या अवास्तविक सुखापासून अंतरंगामध्ये विरक्ती होते. जीव कोणत्या ना कोणत्या वस्तूमध्ये लीन राहू इच्छितो. चारित्रगुणाचे हेच काम आहे. जर याला स्वबोध झाला नाही, आत्मज्ञान प्रगट झाले नाही तर जी वस्तू जवळ असेल, अनुकूल असेल त्यामध्येच लीन होऊन जातो. चारित्राचे काम

लीन होणे हे आहे. ते चारित्र मिथ्यात्व दशेमध्ये असेल तर ते विषय-कषायांमध्ये लीन राहते आणि सम्यक्त्व झाल्यावर निजस्वरूपामध्ये लीन राहू लागते.

आता येथून पुढे आचार्य शुद्धोपयोग अधिकाराला प्रारंभ करतात - तत्पूर्वी सर्व जीवांना व स्वत:ला शुद्धोपयोगामध्ये प्रोत्साहित करण्याकरिता शुद्धोपयोगाच्या फळाची प्रशंसा करतात. कोणतेही एखादे कार्य कोणाकडून तर करवून घ्यायचे असेल तर प्रथम आपण त्याला त्या कार्याचे फायदे सांगतो. जसे योगासनामध्ये लोकांना प्रवृत्त करण्यासाठी योगासनामुळे होणारे फायदे प्रथम सांगितले जातात. योगासनामुळे शरीर स्वस्थ राहते, मधुमेह, ब्लडप्रेशर, हृदयविकार इत्यादी रोगसुद्धा बरे होतात, शरीर बलवान होते, उत्साह वाढतो इत्यादी फायदे ऐकून योगासने करण्याकरिता लोक सहज प्रवृत्त होतात. म्हणून येथेसुद्धा आचार्य शुद्धोपयोगामध्ये प्रेरित करण्यासाठी प्रथम शुद्धोपयोगाच्या फळाचे वर्णन करतात -

अइसयमादसमुत्थं विसयातीदं अणोवममणंतं।
अव्वुच्छिण्णं च सुहं सुद्धुवओगप्पसिद्धाणं ।।१३।।

अन्वयार्थ - (सुद्धुवओगप्पसिद्धाणं) शुद्धोपयोगाने प्रसिद्ध झालेल्या जीवांना अर्थात अरिहंत व सिद्धांना **(अइसयं)** अतिशयस्वरूप **(आदसमुत्थं)** आत्म्यापासून उत्पन्न **(विसयातीदं)** विषयातीत **(अणोवमं)** अनुपम **(अणंतं)** अनंत **(च)** व **(अव्वुच्छिण्णं)** विच्छेदरहित अर्थात निरंतर **(सुहं)** सुख असते.

शुद्धोपयोगाचे फळ घातिकर्मांचा नाश होऊन आत्मगुणांचा विकास हे आहे. अनंतज्ञान, अनंत दर्शन, अनंतवीर्य, अनंतसुख, सम्यक्त्व, चारित्र इत्यादी आत्म्याच्या अनंत गुणांची प्राप्ती हे शुद्धोपयोगाचे फळ आहे. परंतु या गाथेमध्ये अनंतसुख हे एकच फळ सांगितले आहे. कारण हा जीव अनादिकाळापासून एक सुखाचाच शोध घेत आहे. एका सुखासाठीच धडपडत आहे. सर्व संसारी जीवांना अंतरंगामध्ये एक सुख प्राप्त करण्याचीच इच्छा आहे. सर्वजण निराकुल व सुखी होऊ इच्छितात. परंतु इंद्रियसुखाच्या कल्पनेने हा जीव कधीही न निराकुल होतो, न सुखी होतो. सुख आत्म्याचा स्वभाव आहे. ते सुख कर्मांचे आवरण हटल्याने प्रकट होते. त्या खऱ्या सुखाचे स्वरूप येथे सांगतात - या सुखाची ६ विशेषणे या गाथेत सांगितली

आहेत.

शुद्धोपयोगाने प्राप्त सुख अतिशयवान आहे. –

संसारातील जितके मोठमोठे देवेन्द्र, अहमिन्द्रादिकांचे सुख आहे त्यापेक्षासुद्धा अपूर्व, अद्‌भुत, आल्हादस्वरूप असे हे सुख आहे. संसारी जीव या सुखाची कल्पनाच करू शकत नाही असे अचिन्त्यस्वरूप आहे. इन्द्रियसुख आकुलतास्वरूप आहे व अतीन्द्रियसुख निराकुलतारूप आहे म्हणूनच अतिशय स्वरूप आहे.

ज्याप्रमाणे एखाद्या भुकेल्या भिकाऱ्याला मागितल्यानंतर कोठेतरी शिळ्या भाकरीचे २-४ तुकडे मिळतात. त्याला कोणीतरी दयाळू म्हणाला की हे बाबा, हे शिळे भाकरीचे तुकडे टाकून दे, माझ्याबरोबर चल, मी तुला ताजे रसगुल्ले देतो तर त्याचा विश्वास बसत नाही की या तुकड्यांपेक्षा सुद्धा उत्कृष्ट भोजन असू शकते किंवा ते आपल्याला प्राप्त होऊ शकते. जन्मापासून ज्यांने शिळ्या तुकड्याशिवाय दुसरे काही पाहिलेच नाही, तो त्या रसगुल्ल्याची कल्पना कशी करू शकतो. त्याप्रमाणे ज्या संसारी जीवाने अनादिकाळापासून आत्मीय सुख पाहिलेच नाही आणि जो या पाच इन्द्रियांच्या क्षणिक सुखाभासांनाच सुख मानत आला आहे त्याला दयाळू श्रीगुरू समजावतात की हे वत्स, या इन्द्रियसुखरूपी तुकड्यांना फेकून दे व आमच्याबरोबर चल, आम्ही तुला उत्तम आत्मिक सुख प्राप्त करून देतो. तेव्हा त्याला श्रीगुरूंच्या वचनावर विश्वास होत नाही की ह्या इन्द्रियसुखापेक्षा दुसरे उत्कृष्ट सुख असू शकते ? ज्या गरीब किंवा जंगली भिल्ल लोकांनी राजे महाराजांचे भोजन पाहिले नाही, ऐकले नाही, ते राजाच्या भोजनाची काय कल्पना करू शकतात ? काहीही नाही. एकदा जंगली लोकांच्यामध्ये चर्चा चालू झाली की राजा काय खात असेल ? कोणी काही सांगितले तर कोणी काही. तेव्हा एकजण म्हणाला, अरे, राजाला काय कमी आहे ? तो पाहिजे तर गुळच गुळ खात असेल. ज्या लोकांनी गुळापेक्षा श्रेष्ठ कोणतीही गोड वस्तू पाहिली नाही, ऐकली नाही, ज्यांना गुळाचा एक तुकडासुद्धा मोठ्या नशिबाने मिळतो, तो गुळापेक्षा उत्तम वस्तूची कल्पना काय करू शकतो? त्याचप्रमाणे विषय-लोलुपी जीवसुद्धा सिद्धांच्या सुखाची काय कल्पना करू शकतात. सिद्धांचे सुख अत्यन्त विलक्षण आहे. ज्यांनी आत्मिक सुखाचा आस्वाद घेतला आहे

तोच इन्द्रियसुखाला सोडू शकतो.

शुद्धोपयोगींचे सुख स्वाधीन आहे –

शुद्धोपयोगींचे सुख आत्म्याच्या आश्रयानेच उत्पन्न होते. इन्द्रिय सुख पराधीन आहे. कारण ते आपले शरीर व अन्य चेतन-अचेतन वस्तूंच्या अनुकूल परिणमनाच्या अधीन आहे. परंतु आत्मिक सुख स्वाधीन आहे. कारण सुख आत्म्याचा स्वभाव असल्यामुळे ते आत्म्याच्या द्वारेच प्रकट होते. जे सुख पराधीन आहे ते सुख सुख नाही तर दु:खच आहे. कारण पराधीनता म्हणजे दु:खच आहे. म्हणूनच ही म्हण प्रसिद्ध आहे- 'पराधीन सपनेहुँ सुख नाहीं' आपल्या घरची मीठ भाकरी बरी; परंतु दुसऱ्यांच्या घरची पुरी बासुंदी नको. उत्कृष्ट भोजन करणारा लोकांना सुखी वाटतो; परंतु स्वयं त्या खाणाऱ्याला किती आकुलता आहे याचा अनुभव तो स्वतःच करतो. आपण सुद्धा बाहेरून त्याच्या आकुलतेचे निरीक्षण करू शकतो. जेव्हा तो लाडू खातो तेव्हा त्याला तिखट शेव पापडी खाण्याची आकुलता उत्पन्न होते, त्यामुळे तो तोंडातील लाडूच्या स्वादाचा सुद्धा (सुखाचा) अनुभव करू शकत नाही. खाणाऱ्याला एक वस्तू खाताना त्याचा आनंद अनुभवणे बाजूलाच राहते, दुसरी नवीन वस्तू खाण्याची आकुलता त्याला पीडित करते. हीच गोष्ट पाच इन्द्रियांच्या सुखाबाबतीत समजावी. एक गाणे ऐकत असताना दुसरे गाणे ऐकण्याची आकुलता होते, एक चित्र पाहताना दुसरे चित्र पाहण्याची आकुलता होते. सुख कोणत्याही बाह्य पदार्थातून मिळत नाही. सुख तर आत्म्याचा स्वभाव आहे म्हणून ते तेथूनच प्रगट होते. आत्माच सुखाची खान आहे. **ज्याप्रमाणे रत्नाच्या खाणीतूनच रत्न मिळते त्याप्रमाणे सुखाच्या खानस्वरूप आत्म्यातून सुख मिळते.**

शुद्धोपयोगींचे विषयातीत सुख –

इन्द्रियसुख इन्द्रियांच्याद्वारे योग्य विषयांचे ग्रहण केल्यामुळे प्राप्त होते; परंतु आत्मिक सुखामध्ये विषयांच्या ग्रहणाचा किंवा भोगाचा कोणताही विकल्प नाही. सुखरूप कार्य आपल्या उपादानानेच होते. विषय, धन, वैभव, भोजन, परिवार आदी माझ्या सुखगुणाच्या पर्यायरूपाने परिणमू शकत नाहीत. सुखासाठी अन्य कोणत्याही परद्रव्याची गरज नाही. सूर्याला अन्य प्रकाशाची काय गरज ? इन्द्रिय भोगाच्या काळामध्येसुद्धा जीव कल्पनेनेच

सुख मानतो, विषयामुळे नाही. संध्याकाळच्यावेळी कोणी आपल्या दरवाजात शान्तचित्त बसला आहे आणि मित्र येऊन विचारतो की काय मित्रा ! आनंदात आहेस का ? तेव्हा तो म्हणतो, खूप आनंद आहे. तो स्पर्श करीत नाही, काही खात नाही, वास घेत नाही, पहात नाही, गाणे ऐकत नाही, मनामध्ये संकल्प नाही तर मग तो कशाचा आनंद सांगत आहे ? जो तो विश्रामपूर्वक रागद्वेषाच्या मंदतेपूर्वक बसला आहे त्याचे तो सुख प्राप्त करीत आहे. सिद्धांच्याजवळ कोणतेही परद्रव्य नाही, परद्रव्याचा ते आश्रय करीत नाहीत, त्यांच्याजवळ केवळ सुखाचा भण्डार आत्मा आहे, त्याच्याच आश्रयाने अनंत सुख भोगतात म्हणून हे सुख विषयातीत आहे.

आत्मीय आनन्दाची अनुपमता –

आत्मीय सुखासमान या लोकामध्ये कोणतेही दुसरे सुख नाही लौकिक सुखाला उपमा देता येते; परंतु आत्मिक सुख उपमारहित अनुपम आहे. ज्याप्रमाणे रामरावणाचे युद्ध रामरावणाच्या युद्धाप्रमाणेच आहे. सिद्धांच्या सुखाहून संसारसुखाची जात भिन्नच आहे. त्यामुळे सांसारिक सुखाशी त्याची तुलना करता येत नाही. सिद्धांच्या सुखाला जाणण्याचा उपाय काय आहे? स्वयं आत्म्याचा अनुभव करून त्यांच्या सुखाची कल्पना करू शकतो. शुद्धोपयोगाच्या आंशिक विकासामध्ये आत्मानुभवकाळामध्ये शुद्धोपयोगाने निष्पन्न सिद्धांच्या सुखाच्या जातिसमान सुख अनुभवायला मिळते. येथे अनुभवकाळामध्ये अल्पसुख आहे तेथे भरपूर सुख आहे. ज्याप्रमाणे कोणी १०० रूपयाचे गुलाबजामून खाल्ले, कोणी १० रूपयाचे गुलाबजामून घेऊन खाल्ले. स्वादाच्याअपेक्षेने दोघांनाही एकाच जातीचे सुख मिळाले. याचप्रमाणे ज्यांनी एक क्षण शुद्धात्म्याच्या लक्ष्याने आत्मसुख पाहिले त्यांनी शुद्धोपयोगाने प्रसिद्ध जीवांच्या सुखाच्या जातीची प्रतीती केली. शुद्धात्म्याच्या सुखाच्या जातीचा अनुभव केला जाऊ शकतो; परंतु त्याला उपमा दिली जाऊ शकत नाही. सिद्धांच्या सुखाची महिमा सांगण्यासाठी असे सांगितले जाते की नरेन्द्र, सुरेन्द्र, असुरेन्द्र सर्वांचे मिळून जे सुख आहे त्याहून अनन्तपट सुख सिद्धांना आहे; परंतु जेथे सुखाची जातच भिन्न आहे तेथे हे त्रैराशिक होऊच शकत नाही. एका रूपयाला दोन लिंबू येतात तर दहा रूपयाला किती आंबे येतील या त्रैराशिकाचे उत्तर काय असे विचारले तर हे

त्रैराशिकच चुकीचे आहे. तसेच देवेन्द्राला एवढे सुख तर सिद्धांना किती सुख हे त्रैराशिक होऊ शकत नाही. संसारातील सर्व सुखाभासाहून सिद्धांचे सुख विलक्षण आहे, अपूर्व आहे. लौकिकामध्ये एखाद्याची महिमा सांगताना आपण म्हणतो त्याच्यासारखा दुसरा कोणी नाही, तो त्याच्यासारखाच आहे त्याप्रमाणे आत्मसुख हे आत्मसुखासारखेच आहे.

आत्मीय सुखाची अनन्तता –

समस्त्यायति–निरपायित्वादनन्तम्। ते सुख सर्व भविष्यकाळामध्ये नाशाने रहित आहे, त्याचा कधीही अन्त होत नाही म्हणून अनन्त आहे. अनन्तशब्दाचा दुसरा अर्थ आहे अपरिमित सिद्धांचे सुख अल्प नाही भरपूर आहे. त्याचे मोजमाप करू शकत नाही. अनन्तकाळापर्यंत अनंत सुख भोगले तरी ते संपत नाही किंवा त्या सुखापासून ऊब येत नाही, कारण ते वास्तविक सुख आहे. शुद्धोपयोगजनित सुख स्वतन्त्र, स्वाधीन आहे, अनैमित्तिक आहे म्हणून अविनाशी आहे. जी वस्तू कोणत्या तरी निमित्ताने प्राप्त होते ती सदैव राहत नाही, त्याचा संयोग सदा राहत नाही. आत्म्याचे जे पर्याय कर्माच्या क्षयोपशमादीने उत्पन्न होतात ते सुद्धा विनाशिक असतात; परंतु कर्मक्षयजनित अवस्था स्थायी असतात. केवलज्ञानादींच्या उत्पत्तीकरिता ज्ञानावरणादी कर्मांचा क्षय निमित्त आहे; परंतु पुढे अनन्तकाळापर्यंत राहण्यामध्ये काहीही निमित्त नाही म्हणून त्यांना अनैमित्तिक म्हटले आहे. व ते स्थायी आहेत.

आत्मिक सुखाची निरंतरता –

शुद्धोपयोगींचे सुख अव्युच्छिन्न आहे. त्याचा कधीही विच्छेद होत नाही. ते निरन्तर प्रवृत्त असते. कधीही मध्ये मध्ये खंडित होत नाही, हीनाधिक होत नाही.

प्रश्न – अनन्त व अव्युच्छिन्नामध्ये काय फरक आहे ?

उत्तर – जे आगामी काळामध्ये सदैव राहते, ज्याचा कधी अंत होत नाही त्यास अनन्त म्हणतात व ज्याचा प्रवाह निरन्तर एकसारखा प्रवाहित राहतो. मध्ये–मध्ये कमी जास्त होत नाही. असाताच्या उदयाने प्रवाहामध्ये विच्छेद पडत नाही त्याला अव्युच्छिन्न म्हणतात. हा दोन्हीमध्ये फरक आहे. दोघांचा मिळून असा अर्थ आहे की ते आत्मसुख निरंतर अनन्तकाळापर्यंत असते. इन्द्रियसुख असाताच्या उदयामुळे पुन्हापुन्हा खंडित होते. काही

क्षणापर्यंतच असते. परंतु सिद्धांचे सुख असातादीच्या बाधेने रहित आहे म्हणून ते निराबाध आहे. अखंडित आहे.

हे सिद्धांचे सुख ऐकून आपल्या तोंडाला पाणी सुटले पाहिजे. ज्याप्रमाणे एखाद्या श्रीमंत मनुष्याचे ऐश्वर्य, त्याचा ऐशआराम, त्याचे सुख ऐकून किंवा पाहून आपण लालायित होतो व असे सुख मला कधी प्राप्त होईल अशी अंतरंगामध्ये एक कुतूहलता किंवा लिप्सा प्रज्वलित होते तशी ही गाथा वाचून अंतरंगामध्ये सिद्धांच्या सुखाला प्राप्त करण्याची भावना उफाळून आली का? नाही. कारण आम्हाला हा विश्वासच नाही की मलासुद्धा अशा सुखाची प्राप्ती होऊ शकते. मी सुद्धा सिद्ध बनू शकतो.

वरील गाथेमध्ये जशा प्रकारच्या सुखाचे वर्णन केले आहे तशा प्रकारचे सुखच आपण लौकिकामध्ये प्राप्त करू इच्छितो. सुखाच्या प्राप्तीचा प्रयत्न करीत असताना आपण हे इच्छित असतो की दुसऱ्यापेक्षा आपल्याला वरचढ सुख मिळावे. दुसऱ्यांच्या जवळ ज्या सुखसुविधा नाहीत त्या मला मिळाव्यात अर्थात अद्वितीय अद्‌भुत सुख आपण इच्छितो. आपल्याला असे सुख पाहिजे असते की ज्याच्यासाठी दुसऱ्यांवर विसबूंन राहावे लागणार नाही, अर्थात स्वाधीन असावे. ज्यासाठी जास्त सामग्रीची आवश्यकता राहू नये. अनुपम असावे. जे इष्ट संयोगजनित सुख आपल्याला मिळाले ते कधीही नष्ट होऊ नये व निरन्तर राहावे असेच आपण इच्छितो. परंतु संसारामध्ये असे सुख कोठेही कधीही मिळत नाही. म्हणून आमची इच्छा अपूर्णच राहते व आम्ही निरन्तर त्याच्या प्राप्तीसाठी आकुल व्याकुल होतो. उपर्युक्त इच्छेने आम्ही जे सुख मिळवितो ते बरोबर या विपरीत आहे. म्हणून सुखासाठी लाखो करोडो प्रयत्न करून सुद्धा दुःखीच राहतो. जसे सुख आपण इच्छितो ते मोक्षामध्येच आहे व मोक्षसुखाची प्राप्ती शुद्धोपयोगानेच होते. म्हणून सुख प्राप्तीसाठी लाख प्रयत्न सोडून एकच पुरुषार्थ करण्यायोग्य आहे तो म्हणजे शुद्धोपयोग अर्थात शुद्धात्म्याचा अनुभव. यद्यपि या सुखाची पूर्ण प्रगटता अरिहंत व सिद्धांना होते तथापि चवथ्या गुणस्थानापासून या सुखाच्या अनुभवाचा प्रारंभ होतो. ज्यावेळी मिथ्यात्व व अनन्तानुबन्धी कषायांचा उपशम होऊन उपशम सम्यग्दर्शन प्राप्त होते, त्यावेळी स्वात्मानुभव होतो व या आत्मिक आनन्दाचा स्वाद येतो. या सुखाच्या स्वादाने सम्यक्त्वाचे अनुमान

होते. तेथून पुढे श्रावक किंवा मुनी अवस्थेमध्ये वारंवार आत्मानुभव होऊन या आत्मिक सुखाचा लाभ होतो. शुद्धोपयोगाद्वारे संपूर्ण घाती कर्मांचा नाश करून हा जीव पूर्णपणे स्वत:मध्ये लीन होतो तेव्हा हे सुख शाश्वत व निरन्तर राहते.

तात्पर्य हे आहे की ज्या शुद्धोपयोग अर्थात् समताभावामुळे आत्मिक आनन्दाची प्राप्ती होते त्या समताभावाच्या प्राप्तीसाठी कंबर कसून प्रयत्न केला पाहिजे. तोच आतासुद्धा सुख देतो व भविष्य काळामध्ये सुद्धा सुख प्रदान करतो. म्हणूनच म्हटले आहे की, –

लाख बातकी बात यह, कोटी ग्रन्थका सार ।
जो सुख चाहे भ्रात तो, आतम अनुभव करो ।।

ज्याप्रमाणे लौकिकामध्ये एखाद्या श्रीमंत माणसाच्या वैभवाचे वर्णन ऐकले किंवा ते वैभव डोळ्याने पाहिले तर सहज कुतूहलता उत्पन्न होते की एवढ्या विशाल संपत्तीचा मालक कोण आहे? तो कसा असेल? हे वैभव कुणाला प्राप्त झाले आहे? इत्यादी प्रश्न उद्भवतात व त्याला पाहण्याची ओढ लागते. त्याप्रमाणे शुद्धोपयोगाने प्रसिद्ध जीवांना स्वाधीन अविनाशी अनुपम अतीन्द्रिय सुखाची प्राप्ती होते याचे वर्णन तेराव्या गाथेमध्ये ऐकल्यानंतर शिष्यांना मनामध्ये सहज कुतूहलता उत्पन्न होते की एवढे उत्कृष्ट फळ ज्याला प्राप्त झाले तो शुद्धोपयोगी जीव कसा असेल? त्याचे स्वरूप काय आहे? त्याला ओळखण्याचे चिन्ह काय आहे? अशाप्रकारे त्याला पाहण्याची व त्याचे स्वरूप जाणून घेण्याची जिज्ञासा स्वयमेव उत्पन्न होते. एखादे मधुर गायन कानावर पडले तर तत्काल इच्छा होते की एवढे मधुर गायन कोण म्हणत आहे, त्याला डोळ्याने जरा पाहू तरी! जेव्हा एखाद्या राष्ट्रीय नेत्याची मोठमोठी कामे पाहतो किंवा ऐकतो तेव्हा त्याला पाहण्याची सहज जिज्ञासा होते. चला पाहू तरी खरे. अमुक कोण आहे? त्याचप्रमाणे येथे शुद्धोपयोगाचे उत्कृष्ट फळ जाणल्यामुळे शुद्धोपयोगाने परिणत पुरुषाचे स्वरूप जाणण्याची इच्छा होते म्हणून आचार्य पुढील गाथेमध्ये शुद्धोपयोग परिणत पुरुषाचे स्वरूप नि:शेषरूपाने दाखवतात.–

सुविदिदपयत्थसुत्तो संजमतवसंजुदो विगदरागो ।
समणो समसुहदुक्खो भणिदो सुद्धोवओगो त्ति ।।१४।।

अन्वयार्थ– (सुविदिदपयत्थसुत्तो) ज्यांनी पदार्थ व सूत्राला चांगल्या रीतीने जाणले आहे. **(संजमतवसंजुदो)** जो संयम व तपाने युक्त आहे, **(विगदरागो)** रागरहित आहे. **(समसुहदुक्खो)** सुखदु:खामध्ये समान आहे असा **(समणो)** श्रमण **(सुद्धोवओगोत्ति)** शुद्धोपयोगी आहे असे **(भणिदो)** सांगितले आहे.

येथे शुद्धोपयोगी श्रमणांचे वर्णन करताना चार विशेषणे दिली आहेत.– १) पदार्थ व सूत्राचा यथार्थ जाणकार २) संयमतपसंयुक्त ३) वीतराग ४) समतास्वरूपी. या विशेषणांमध्ये परस्पर कार्यकारणभाव आहे. अर्थात् पूर्व–पूर्व विशेषण कारणरूप आहे व उत्तर उत्तर विशेषण कार्यरूप आहे. जो जीवादी पदार्थांना व आगमसूत्राच्या रहस्याला जाणतो तोच संयम व तपाने संपन्न होतो, अन्य नाही. जो यथार्थ संयम व तपाने संपन्न होतो तोच रागद्वेषरहित होऊन वीतरागी बनतो. जो रागद्वेषरहित होतो तोच श्रमण सुखदु:खामध्ये समान राहू शकतो आणि जो सुखदु:खामध्ये सम असतो तोच खरा श्रमण आहे व तोच शुद्धोपयोगाला प्राप्त करतो.

सूत्रार्थाच्या ज्ञानबलाने स्वपर भेदविज्ञानाचे सामर्थ्य–

अनादिकाळापासून हा जीव स्वयं अज्ञानी आहे. त्याला मी कोण आहे? पर काय आहे? याचे वास्तविक ज्ञान नाही, म्हणून शरीरादी परद्रव्यालाच स्व व स्वकीय मानतो. स्वपरामधील विभागच नष्ट होऊन जातो. जेव्हा हा जीव महद्भाग्याने आगमाचे अध्ययन करू लागतो तेव्हा त्याला जीवपुद्गलादी सहा द्रव्ये व जीव अजीवादी सात तत्त्वांची ओळख होते. जेव्हा वस्तूमध्ये स्वद्रव्य व परद्रव्य असा विभाग जाणतो तेव्हा शास्त्राचे भावात्मक ज्ञान होऊ लागते. जर जीवाचे लक्षण ज्ञानदर्शन आहे तर मी जीव आहे. कारण माझ्यामध्ये ज्ञान दर्शन आहे. पुद्गलाचे लक्षण स्पर्शरसगंधवर्ण आहेत, म्हणून हे शरीर पुद्गल आहे. कारण त्यामध्ये स्पर्शरसगंधवर्ण आहेत असे तर्क व अनुमानाने जाणू लागतो. आगम व तर्काने वारंवार जाणल्यावर असा एक क्षण येतो की तो स्वसंवेदन प्रत्यक्षाच्याद्वारे स्वला जाणतो अर्थात अनुभवतो. त्याचक्षणी यथार्थ स्वपरभेदविज्ञानी होऊन तो सम्यग्ज्ञानी बनतो व स्वद्रव्याचे यथार्थ श्रद्धान झाल्यामुळे सम्यग्दृष्टी होतो. जोपर्यंत सूत्र व अर्थाचे यथार्थ ज्ञान होत नाही तोपर्यंत शुद्धोपयोगाची सिद्धी होत नाही.

भेदविज्ञानाचा प्राथमिक उपाय आगमाभ्यास आहे. जीवनामध्ये प्रगतीचा प्रारंभ शास्त्राच्या अध्ययनानेच होतो. आगमाचा अभ्यास करून त्यातील प्रयोजनभूत तत्त्व जाणल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. जो जीव आगमाभ्यास न करताच स्वत:ची प्रगती मानतो तो अधोगतीच्या मार्गावर आहे असे जाणावे. येथे आचार्यांनी महत्त्वाचे दोन शब्द ठेवले आहेत. १) पदार्थ व २) सूत्राला यथार्थ जाणले आहे. **सूत्राला जाणणे हे द्रव्यश्रुतज्ञान आहे व पदार्थाला जाणणे हे भावश्रुतज्ञान आहे.** भावश्रुतज्ञानासाठी द्रव्यश्रुतज्ञान निमित्त आहे. शास्त्र वाचून केवळ तोतारटन्त ज्ञान उपयोगाचे नाही. जिनवाणीचे रहस्य जाणण्यायोग्य आहे. प्रत्येक शब्दाचे वाच्य आपल्या ज्ञानात आले तर खरे प्रयोजन सिद्ध होते. संपूर्ण जिनवाणीच्या पठनाचे एकच प्रयोजन आहे की परापासून भिन्न निज शुद्ध आत्म्याला जाणणे. ते जर सिद्ध झाले तर जिनवाणीच्या अध्ययनाचे फळ प्राप्त झाले असे समजावे.

ज्ञानीची स्वपरविवेक पद्धती –

ज्याला शास्त्राचे मर्म समजले असा ज्ञानी जाणतो की माझा आत्मा स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल व स्वभावरूपाने आहे, परद्रव्य-क्षेत्र-काल-भावरूपाने नाही. मी एक अखंड ज्ञानानन्द स्वरूपी चैतन्यपिंड आहे. शरीरादी परपदार्थ माझ्यापासून भिन्न आहेत. मी परद्रव्याच्या आश्रित नाही, कोणतेही परद्रव्य माझ्या आश्रित नाही. माझे परिणमन पराच्या अधीन नाही व पराचे परिणमन माझ्या अधीन नाही. साधू बनण्यासाठी सर्वप्रथम आगम व पदार्थांचा योग्यरीतीने अभ्यास केला पाहिजे. तेच ज्ञान खरे आहे जे स्वपरामध्ये भेदविज्ञान करते. **संसारसागरातून तरण्यासाठी भेदविज्ञानच आधारभूत आहे. स्वपराचे भेदविज्ञान कल्याणमंदिराची प्रथम पायरी आहे.** जगामध्ये कोणालाही **भेदविज्ञानाशिवाय स्वात्मानुभव व शुद्धोपयोग होऊ शकत नाही.** पदार्थाचा विचार करावा; परन्तु त्याच्या खऱ्या स्वरूपाचा विचार करावा. गाडी चालविताना गाडी थांबविण्यासाठी ब्रेकला न पकडता त्याच्या चाकाला पकडून गाडी थांबत नाही. त्याप्रमाणे मोह दूर करण्यासाठी भेदविज्ञानाला न पकडता व्रत तपादिरूप चाकाला पकडून मोह दूर होणार नाही. मोहनाशाचा सफल उपाय भेदविज्ञान आहे.

स्वपराचा विवेक असल्याशिवाय साधू स्वत:ला संयम व तपामध्ये स्थिर ठेऊ शकत नाही.

शुद्धोपयोगी श्रमणाची संयमतपसंपन्नता –

सं म्हणजे सम्यक् प्रकाराने, यम म्हणजे स्वरूपामध्ये नियमित राहणे, स्थिर होणे संयम आहे. संयम दोन प्रकारचा आहे. प्राणिसंयम व इंद्रियसंयम पाच स्थावर व त्रस या षट्काय जीवांच्या हिंसेच्या विकल्पापासून दूर होऊन शुद्ध स्वरूपामध्ये स्थिर होणे हा प्राणिसंयम आहे. त्याचप्रमाणे पाच इन्द्रियांच्या विषयांच्या इच्छारूप विकल्पापासून दूर हटून शुद्धात्मस्वरूपामध्ये संयमित होणे इन्द्रियसंयम आहे. संयम व तपाशिवाय शुद्धोपयोगामध्ये स्थिरता येऊ शकत नाही. ज्ञानी गृहस्थावस्थेमध्ये शुद्धोपयोगामध्ये स्थिर राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्यामध्ये सतत असंयमामुळे बाधा उत्पन्न होते म्हणून शुद्धोपयोगासाठीच तो संयम धारण करतो व तपश्चरण करतो.

शिवकोटी आचार्य भगवती आराधना ग्रंथामध्ये सांगतात की, इंद्रिये व मन चंचल दुर्दम्य घोड्याप्रमाणे आहेत. त्यांना वश करणे फार कठीण आहे. वैराग्यरूपी लगामानेच ते वश होतात. लगाम ढीला पडला असता ते पुरुषाला पापरूपी विषम स्थानामध्ये नेऊन टाकतात. इन्द्रियरूपी सापांनी डसलेला मनुष्य अत्यंत दु:खाने पीडित होऊन उत्तम ध्यानरूपी सुखापासून भ्रष्ट होतो व संयमरूपी जीवनाचा त्याग करतो. परन्तु **इन्द्रियरूपी साप सम्यग्ज्ञानरूपी सिद्ध औषध व वैराग्यरूपी मंत्रांनी वश झाल्यावर साधूच्या संयमरूपी जीवनाला नष्ट करीत नाहीत. ध्यानरूपी श्रेष्ठ शक्तीने युक्त श्रमणरूपी योद्धा सम्यग्ज्ञानरूपी नेत्राने पाहून धैर्यरूप फलकाच्याद्वारे इन्द्रियरूपी बाणांचे निवारण करतो.**

संतोषरूपी कवच, शान्तभावरूपी बाण आणि ज्ञानरूपी शस्त्रांनी सुसज्ज साधू, इन्द्रिय व कषायरूपी शत्रूंवर विजय प्राप्त करतो. इन्द्रिये व मन ध्यानसाधनेमध्ये बाधक आहेत म्हणून ध्यानाच्या सिद्धीचा उपाय सांगताना पूज्यपाद आचार्य इष्टोपदेश ग्रंथामध्ये लिहितात–

संयम्य करणग्राममेकाग्रत्वेन चेतसा ।
आत्मानमात्मवान् ध्यायेदात्मनैवात्मनि स्थितम् ।।२२।।

इंद्रियांच्या समूहाला संयमित करून एकाग्र मनाने आत्मा आत्म्यामध्ये स्थित असणाऱ्या आत्म्याला आत्म्याच्याद्वारे ध्यातो.

बाह्य व अंतरंग तप शुद्धोपयोगासाठी साहाय्यभूत आहेत म्हणून स्वशक्तीनुसार बारा प्रकारचे तप करणे इष्ट आहे. उपवास, अवमौदर्यादी तप केले असता वारंवार शुद्धोपयोगाचा अवसर प्राप्त होतो.

ज्याप्रमाणे पगार घेणाऱ्या सेवकाला कार्यामध्ये नियुक्त करताना त्याच्यावर दया केली जात नाही. जेवढा आपण त्याला पगार देतो तेवढे त्याच्याकडून काम करून घेतो. त्याप्रमाणे शरीर हे नोकर आहे त्याला जर भोजनरूपी पगार दिला जातो तर त्याच्यावर दया न करता त्याला तपरूपी कामामध्ये लावावे. मुनी जेवढा शरीराला आहार देतात तेवढे त्याच्याकडून तप करून घेतात. बाह्य व अंतरंग बारा प्रकारच्या तपाच्या बलाने स्वरूपामध्ये विश्राम करणे व सर्व प्रकारच्या रागद्वेषरूप विकल्प तरंगांना दूर करून निस्तरंग चैतन्य प्रकाशाने तपणे दैदीप्यमान होणे हे तप आहे. ज्याप्रमाणे समुद्राचे तरंग समुद्रामध्ये लीन होतात त्याप्रमाणे आत्म्याचे विकल्पतरंग आत्म्यामध्येच विलीन होतात. केवळ बाह्य कष्ट सहन करणे म्हणजे तप नव्हे. कारण एक गाढवसुद्धा कष्ट सहन करते, संसारातील सर्वच प्राणी कष्ट सहन करतात, परंतु त्याद्वारे इष्टसिद्धी होत नाही. वस्तुत: रागद्वेषरहित चैतन्यवृत्तीच तप आहे. ज्ञानज्योती प्रज्वलित होणे, प्रकाशमान होणे यालाच अध्यात्मामध्ये तप मानले आहे.

जर उपवासादी परमार्थाने तप नाही तर ते कशासाठी करायचे? याचे उत्तर पूज्यपाद आचार्यांनी समाधितंत्र ग्रंथामध्ये सांगितले आहे –

अदु:खभावितं ज्ञानं क्षीयते दु:खसन्निधौ।
तस्माद्यथाबलं दु:खैरात्मानं भावयेद्मुनि: ।।१०२।।

जे ज्ञान अदु:खभावित आहे अर्थात् कष्ट सहन न करताच सुखासुखी उत्पन्न होते ते दु:ख प्राप्त झाल्यावर तत्काल नष्ट होते. परंतु जे ज्ञान कष्टाने मिळविले जाते ते महासंकट आल्यावर सुद्धा नष्ट न होता सदा प्रकाशमान राहते. म्हणून मुनिराज स्वेच्छेने कठोर कायक्लेशादी तप करतात. उपवासादी केल्यावर ज्ञान व ध्यानामध्ये प्रमादरहित होऊन प्रवृत्त होतो म्हणून उपवासादी

बाह्य तप करून स्वाध्याय-ध्यानरूप अंतरंग तप केले पाहिजे. मुनिराज एक शुद्धोपयोगाच्या वृद्धीसाठीच उपवासादी तप करतात. जो तपसंयुक्त आहे त्याला शुद्धोपयोग जागृत होण्याची शक्ती प्राप्त होते. ज्याचे मन तपाद्वारे वश झाले आहे तो कठीण-कठीण उपसर्ग आल्यावर सुद्धा स्वरूपापासून चलायमान होत नाही. ज्याचे आपल्या शरीरावर ममत्त्व नाही त्यालाच आपल्या स्वरूपामध्ये दृढता येऊ शकते. अशाप्रकारे जो बाह्याभ्यन्तर संयम व तपाने संपन्न आहे तो शुद्धोपयोगाला पात्र बनतो.

शुद्धोपयोगीची विरागता –

शुद्धोपयोगपरिणत आत्मा, रागरहित असतो. राग उपलक्षणस्वरूप आहे यावरून मोह व द्वेषानेसुद्धा रहित असतो हा अर्थ होतो. या विशेषणामध्ये अंतरंग भावांच्या शुद्धतेचा विचार आहे. रागद्वेषरूप परिणती शुद्धोपयोगामध्ये बाधक आहे. म्हणून साधू शुद्धोपयोगासाठी रागद्वेषपरिणतीवर विजय प्राप्त करतात. वास्तविक मोहरागद्वेषभावांची उत्पत्तीच जीवावर ओढवलेले सर्वात मोठे संकट आहे, कष्ट आहे, दु:ख आहे. या जीवावर दुसरे कोणतेही संकट नाही. जी बाहेर संकटे दिसतात त्यांना या मोहरागद्वेष परिणतीनेच आमंत्रण दिले आहे. संकटे न बोलवता स्वत:हून आलेली नाहीत. जर रागद्वेषाची उत्पत्तीच झाली नाही तर बाहेर कोणतेही संकट राहू शकत नाही. **ज्यांनी या मोहरागद्वेषरूपी सेनेवर विजय मिळविला त्यांनी आपले स्वराज्य प्राप्त केले व तो आपल्या स्वराज्याचा एकाधिपती सम्राट झाला.**

अंतरंग संयम व तपाच्या सामर्थ्याने विराग अवस्था प्रकट होते. वीतराग शुद्ध आत्म्याच्या भावनेच्या बलाने संपूर्ण दोषांनी रहित होऊन आत्मा विगतराग होतो. रागरहित ज्ञानाद्वारे रागरहित शुद्ध आत्म्याचे ध्यान करणे हा रागरहित होण्याचा उपाय आहे. मोह राग द्वेषरूप औपाधिक अपवित्र क्षणिक भावांपासून सहज पवित्र स्थायी निज ज्ञायकभावाला भिन्न जाणून निज ज्ञायक भावाची स्थिरतापूर्वक भावना केली असता आत्म्याचे निर्विकार सहजस्वरूप प्रकट होते व तो आत्मा विगतराग होतो.

शुद्धोपयोगीची समसुखदु:खता –

ज्यांनी आत्मस्वरूपामध्ये लीन होऊन रागद्वेष परिणतीला दूर सारले

आहे ते वास्तविक सुखदु:खाच्या कल्पनेपासून दूरच असतात. ते सत्पुरुष साता वेदनीयाच्या उदयाने ऐहिक सुखाची सर्व सामग्री प्राप्त झाली असताना सुद्धा त्यामध्ये सुखाची कल्पना करीत नाहीत व असाताच्या तीव्र उदयामध्ये दु:खाची सामग्री प्राप्त झाल्यावर सुद्धा दु:खाची कल्पना करीत नाहीत. क्षणिक सुख व अनंतदु:ख तर तेव्हा होते जेव्हा परपदार्थांना आपले मानतो त्यांच्या संयोगामध्ये स्वत:ला सुखी व वियोगामध्ये अतिशय दु:ख मानतो. ज्ञानीची परद्रव्य व पर्यायामध्ये अहंबुद्धी नसते म्हणून सुखदु:खामध्ये हर्षविषाद करीत नाही. सांसारिक सुखामध्ये हर्षित होणे व दु:खामध्ये विषण्ण होणे हे अज्ञानीचे लक्षण आहे.

जो शत्रू व मित्रसमुदायामध्ये समानबुद्धी ठेवतो, सुखदु:खामध्ये समान भाव ठेवतो, आपल्या प्रशंसा व निंदेमध्ये समताभाव धारण करतो, माती व सुवर्ण यांना समान मानतो, जीवन व मरणाला एक समान समजतो तोच समतास्वरूपी श्रमण आहे. प्रतिकूल व अनुकूल प्रसंगामध्ये हर्षविषाद न करणे समताभाव ओळखण्याचे बाह्य चिन्ह आहे. वास्तविक समताभाव प्राप्त होण्यासाठी परद्रव्याची अपेक्षा नाही. अविकार सहजसिद्ध आत्मस्वरूपाचे संचेतन ही परमकला आहे त्याच्या प्रसादाने परम समताभाव प्राप्त होतो. ज्यांच्यावर अनुकूल किंवा प्रतिकूल प्रसंग आलेले दिसत नाहीत असे आत्मानुभवी साधू काय समताभावाचे धारक नाहीत? वास्तविक आपल्या स्वरूपामध्ये लीन होण्याचे फळच समताभाव आहे. जे जे स्वरूपगुप्त साधू आहेत ते ते समतासंपन्न आहेत. अज्ञानी जीव आत्मानुभवाच्या अभावात भलेही बाहेर कोणत्याही प्रसंगात शांत दिसतो, परंतु त्याच्याठिकाणी समताभाव नाही हे निश्चित आहे. स्वसंवेदन प्रत्यक्षज्ञान साधनाने निजध्रुवशुद्ध ज्ञानानन्दस्वभावी आत्म्याला जाणले असता समताभावरूपी फळ मिळते. जेव्हा बाहेर उपसर्ग व परिषहाची चाहूल लागते तेव्हा साधू प्रचुररूपाने ध्रुवाचा आश्रय घेऊन स्वरूपरूपी किल्ल्यामध्ये गुप्त राहतात. त्यांच्यावर परीषह उपसर्गरूपी शत्रू वार करू शकत नाहीत. सर्वाचा सारांश हा आहे की शुद्धोपयोग परिणत साधू समतास्वरूपी असतो.

उपर्युक्त विशेषणांनी विशिष्ट साधू जेव्हा ध्यानाचा अभ्यास करतो तेव्हा सविकल्प अवस्था सोडून निर्विकल्प अवस्थेला प्राप्त होतो. जोपर्यंत त्यामध्ये

स्थिर राहतो तोपर्यंत या साधूला शुद्धोपयोगी म्हटले आहे. आगमामध्ये मुख्यतेच्या अपेक्षेने शुद्धोपयोग सातव्या अप्रमत्त गुणस्थानापासून सांगितला आहे. परंतु गौणरूपाने चौथ्यादी गुणस्थानवर्तींनासुद्धा शुद्धोपयोग होतो असे स्वीकारले आहे. परंतु तेथे शुभोपयोगाची अधिकता असल्यामुळे शुद्धोपयोग न सांगता शुभोपयोग सांगितला आहे.

निर्वाणाच्या अनुपमसुखाचे कारण शुद्धोपयोग आहे म्हणून परमसुखाच्या इच्छुक जीवांनी अशुभोपयोग व शुभोपयोगामध्ये न रंगता मात्र शुद्धोपयोगाच्या प्राप्तीचा उद्यम करावा. जर संयम धारण करण्याची शक्ती असेल तर त्यांनी मुनिपदामध्ये स्थित होऊन विशेष उद्यम करणे उत्कृष्ट आहे. मुनिपदाच्या बाह्य आचरणाला निमित्तकारण मानून अंतरंग स्वरूपाचरणाचा अभ्यास करावा. केवळ बाह्य आचरणाच्या विकल्पामध्ये आपला वेळ घालवू नये. जे मुनिव्रत धारण करू शकत नाहीत ते एकदेश संयमाचे पालन करूनसुद्धा शुद्धोपयोगाची भावना करतात व अनुभवदशेमध्ये स्वात्मानुभवरूप शुद्धोपयोगाचे वेदन करून सुखी राहतात व शुद्धोपयोगरूप साधना करण्यासाठी सकलसंयम धारण करण्याची सतत भावना करतात.

संपूर्ण गाथेचा सार–

आगमाचा अभ्यास केल्यामुळे पदार्थांच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान होते. पदार्थांना यथार्थ जाणणारा जीव स्वपरामध्ये भेदविज्ञान करतो. स्वपराचा विभाग जाणणारा स्वरूपाचे श्रद्धान करतो. जो स्वरूपश्रद्धानी होतो तो स्वभावानुरूप उपयोग ठेवण्याचा प्रयत्न करतो. उपयोग स्वभावानुरूप होऊ लागला की आपोआप असंयमापासून उपयोग हटवून शुद्धात्मसंवेदनाच्या बलाने स्वरूपामध्ये स्थिर होऊ लागतो. जेव्हा आत्मा शुद्धस्वरूपामध्ये संयत होतो. तेव्हा स्वरूपस्थिरतेमुळे विकल्परहित होऊन चैतन्य स्वरूपामध्ये प्रतापवंत होतो. चैतन्य स्वरूपामध्ये प्रताप प्राप्त करणारा आत्मा रागद्वेषादी विकारांनी रहित होतो. स्वसंचेतनामध्ये तृप्त होऊन सुखदु:खादी परिस्थितीमध्ये समान राहतो. सुखदु:खामध्ये समान विगतराग शुद्धात्मतत्त्वामध्ये उपयुक्त श्रमण स्वयं शुद्धोपयोग आहे.

या गाथेमध्ये शुद्धोपयोगपरिणत आत्म्याचे स्वरूप श्रमणांच्या मुख्यतेने

सांगितले आहे. कारण श्रमण ही साक्षात् शुद्धोपयोगाची मूर्ती आहे. शुद्धोपयोग हे श्रमणांचे लक्षण आहे. ते अंतर्मुहूर्त अंतमुहूर्तात शुद्धोपयोगामध्ये आरोहन करतात. श्रमण अवस्थेमध्येच शुद्धोपयोगरूपी शिडीच्याद्वारे क्षपकश्रेणीवर चढून परिपूर्ण शुद्धोपयोगी होऊन अनंतसुखरूप फल प्राप्त करू शकतो म्हणून आगमामध्ये बहुलतेने श्रमणांना शुद्धोपयोग सांगितला आहे. परंतु अविरत सम्यग्दृष्टी व देशविरत श्रावकाला शुद्धोपयोगाचा निषेध केलेला नाही. स्वयं श्री कुंदकुंद आचार्यांनी पुढे १९४ नंबरच्या गाथेमध्ये गृहस्थ शुद्ध आत्म्याचे ध्यान करून दर्शनमोहाचा नाश करतो हे सांगितले आहे. ती गाथा याप्रमाणे –

जो एवं जाणित्ता झादि परं अप्पगं विसुद्धप्पा ।
सागारोऽणागारो खवेदि सो मोहदुग्गंठिं ।।१९४।।

जो अशाप्रकारे जाणून विशुद्धात्मा होऊन परम आत्म्याचे ध्यान करतो तो सागार (गृहस्थ) अथवा अनगार (मुनी) मोहदुर्ग्रंथीचा नाश करतो.

'सागारो अणागारो' या शब्दाचे जयसेनाचार्यांनी मुख्य दोन अर्थ केले आहेत १) सागार अर्थात घरसहित गृहस्थ व अनागार म्हणजे घररहित मुनी. २) दुसरा अर्थ साकार व अनाकार असा केला आहे. त्याचे तीन अर्थ केले आहेत –१) साकार–ज्ञानोपयोग व अनाकार दर्शनोपयोग २) साकार–सविकल्प गृहस्थ व अनाकार–निर्विकल्प तपोधन ३) साकार–लिंग अर्थात चिन्हाने सहित यती व अनाकार–चिन्हाने रहित गृहस्थ.

उपर्युक्त कथनाचा सार हाच आहे की गृहस्थ अथवा मुनी दोघेही शुद्धात्म्याच्या ध्यानबलाने दर्शनमोहावर विजय मिळवितात. ज्याने स्वत:ला शुद्धात्मस्वरूपाने जाणले, श्रद्धान केले व शुद्धात्म– स्वरूपाने अनुभवले तोच मोहग्रन्थीचा नाश करण्यास समर्थ होतो.

मुनींना आरंभ व परिग्रहादिकांचा भार नसल्यामुळे ते निर्विकल्प होऊन वारंवार शुद्धात्म्यामध्ये डुबकी मारतात. गृहस्थाला आरंभ व परिग्रहादिकांचा विकल्प असल्यामुळे वारंवार शुद्धात्म्यामध्ये लीन होण्याचा अवसर प्राप्त होत नाही म्हणून तो काही काळ गृहकार्यापासून निवृत्त होऊन देवपूजा, स्वाध्याय, सामायिक, तत्त्वचिंतनादिक शुभानुष्ठाचा आश्रय घेतो व त्या काळामध्ये शुभोपयोगातून शुद्धोपयोगाला प्राप्त होण्याचा अवसर प्राप्त करतो. अर्थात

शुभोपयोगातून शुद्धोपयोगाला प्राप्त होतो. किंबहुना श्रावकांचे देवपूजा, गुरूपास्ती, स्वाध्याय, संयम, तप व दान ही सहा आवश्यके अशुभोपयोगातून सोडवून शुद्धोपयोगापर्यंत नेऊन पोहचविण्याची माध्यमे आहेत. गा. २४८ च्या तात्पर्यवृत्तीमध्ये जयसेनाचार्य लिहितात. 'श्रावकाणामपि सामायिकादिकाले शुद्धभावना दृश्यते' जयसेनाचार्यांनी अनेक ठिकाणी शुद्धात्मभावना व शुद्धोपयोग हे दोन्ही एकार्थवाची शब्द वापरले आहेत. उदा. समयसार गा. ३४१ (आत्मख्याती अपेक्षेने ३२०) गाथेनंतरच्या तात्पर्यवृत्तीमध्ये सांगितले आहे की 'अध्यात्मभाषया पुनः शुद्धात्माभिमुखपरिणामः शुद्धोपयोगः इत्यादि पर्यायसंज्ञां लभते। स च पर्यायः शुद्धपारिणामिकभावलक्षणशुद्धात्मद्रव्यात्कथञ्चिद्भिन्नः। कस्मात्? भावनारूपत्वात्। अध्यात्मभाषेच्या अपेक्षेने शुद्धात्माभिमुख परिणाम शुद्धोपयोग इत्यादी पर्यायवाची नावांनी सांगितला जातो. तो शुद्धोपयोगरूप पर्याय शुद्धपारिणामिक भावरूप शुद्धात्मद्रव्यापासून कथंचिद् भिन्न आहे. कारण तो भावनारूप आहे.

पञ्चास्तिकायसंग्रह तात्पर्यवृत्ति गा.११४ (अमृतचंद्रांच्या अपेक्षेने १०६ नंतरची ज्यादा गाथा) मध्ये लिहितात की 'दार्शनिकोऽयं पुरुषः क्वापि निर्विकल्पसमाधिकाले निर्विकारशुद्धात्मरूचिरूपं निश्चयसम्यक्त्वं स्पृशति' सम्यग्दृष्टी पुरुष कधी निर्विकल्पसमाधीच्या काळामध्ये निर्विकार शुद्धात्म्याची रूचिरूप निश्चयसम्यक्त्वाला स्पर्श करतो.

या गाथेमध्ये शुद्धोपयोगपरिणत आत्म्याची चार विशेषणे सांगितली आहेत. ती असंयत व देशसंयत श्रावकालासुद्धा आंशिकरूपाने घटित होतात. प्रथम विशेषण सूत्र व पदार्थाला यथार्थरूपाने जाणणारा–चतुर्थ व पंचम गुणस्थानवर्ती सम्यग्दृष्टीसुद्धा ६ द्रव्ये, ७ तत्त्वे, ९ पदार्थांना यथार्थरूपाने जाणतो व आगमसूत्रांना सुद्धा जाणतो. दुसरे विशेषण–संयम व तपाने संयुक्त–चतुर्थ व पंचम गुणस्थानवर्ती शुद्धात्मस्वरूपामध्ये संयमित होत असल्यामुळे निश्चयसंयमाने संपन्न असतो व चैतन्य स्वरूपामध्ये प्रतापवंत होत असल्यामुळे निश्चयतपाने संयुक्त असतो. तिसरे विशेषण–विगतराग चतुर्थ गुणस्थानवर्तीला अनंतानुबंधी कषायांचा अभाव असल्यामुळे तेवढ्या अंशाने विगतराग आहे व देशसंयत अनंतानुबंधी व अप्रत्याख्यानावरण कषायांचा

अभाव असल्यामुळे तेवढ्या अंशाने विगतराग आहे. चौथे विशेषण–सुख दु:खामध्ये समान–ज्याप्रमाणे मिथ्यादृष्टी मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायाच्या अधीन होऊन इष्टानिष्टविषयामध्ये तन्मय होऊन रागद्वेष करतो, आकुलित होतो त्याप्रमाणे सम्यग्दृष्टी करीत नाही. सम्यग्दृष्टी अप्रत्याख्यानावरणादी कषायांच्या उदयवश इष्टानिष्टविषयामध्ये रागद्वेष करताना दिसतो; परंतु मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांचा अभाव असल्यामुळे त्यामध्ये तन्मय न होता हेयबुद्धीने करतो. तो पाण्यामध्ये निर्लिप्त कमळाप्रमाणे अंतरंगामध्ये विषयापासून अलिप्त राहतो. त्याच्या जीवनातसुद्धा आंशिक समताभाव प्रगट होतो.

सम्यग्दर्शन, ज्ञान चारित्राची एकता मोक्षमार्ग –

आत्मा एक पदार्थ आहे, एक द्रव्य आहे, एक गुणी आहे. प्रत्येक द्रव्य अनंत गुणांचा निधी आहे. आत्मासुद्धा अनंतगुणांचा पुंज आहे. त्या अनंत गुणांपैकी चारित्र हा आत्म्याचा एक गुण आहे. ज्याप्रमाणे द्रव्य अनादी अनंत आहे त्याचप्रमाणे गुणसुद्धा अनादी अनंत आहेत. ज्याप्रमाणे साखरेपासून गोडी कधी वेगळी होत नाही त्याप्रमाणे द्रव्यापासून गुण कधीही वेगळे होत नाहीत. मिथ्यात्व अवस्थेमध्ये सुद्धा गुण नष्ट होत नाहीत, परंतु त्या गुणांचे परिणमन विभावरूप होते. जसे श्रद्धागुणाचे मिथ्यादर्शनरूप, ज्ञानगुणाचे मिथ्याज्ञानरूप विभाव परिणमन आहे तसे चारित्रगुणाचे मिथ्याचारित्ररूप विभाव परिणमन आहे. ज्याप्रमाणे श्रद्धागुणाला स्वभावरूपाने परिणमित न होण्यामध्ये दर्शनमोह कर्म निमित्त आहे त्याप्रमाणे चारित्रगुणाला सम्यक्चारित्ररूपाने परिणमित न होण्यामध्ये चारित्रमोह कर्म निमित्त आहे. अनंतानुबंधी, अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण, संज्वलन क्रोध, मान, माया, लोभ हे सोळा कषाय व हास्यादी नऊ नोकषाय ही चारित्रमोह राजाची सेना आहे. ते सर्व मिळून चारित्रगुणाचे हनन करतात. जीवाची चारित्रसंपत्ती लुटतात. जीव निजशक्तीला न ओळखता त्या लुटारूंच्या अधीन होतो. कोणी एखादा भव्यशार्दूल निज शक्तीला ओळखून जागृत होतो व निज वीर्य गुणाला स्फुरायमान करून त्यांच्यावर हल्ला करतो तेव्हा प्रथम अनंतानुबंधी कषायरूपी सेनापती घायाळ होऊन सेनेतून बाहेर पडतो. पुन्हपुन्हा निज वीर्य

गुणाला उत्तेजित करून अप्रत्याख्यानावरणादी कषायांना पराजित करतो. जसजसा कषायांचा पराभव होतो तसतसा चारित्र गुण वृद्धिंगत होऊन निर्मल होतो.

सर्वप्रथम मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांना दूर हकलल्यावर सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान प्रगट होते व मिथ्याचारित्राचा अभाव होऊन स्वरूपाचरण चारित्राची प्राप्ती होते. ज्यांनी स्वघराला ओळखले आहे, पाहिले आहे, तो त्या घरामध्ये राहतो यामध्ये काय आश्चर्य? तो स्वकमजोरीवश संयम धारण करू शकत नाही म्हणून त्याला असंयमी म्हटले आहे. आगमामध्ये संयम व चारित्रगुणामध्ये कथंचित् अभेद करून जेथे संयमाचा अभाव आहे तेथे चारित्राचा अभाव सांगितला जातो; परंतु सर्वथा चारित्राचा अभाव नाही. जेवढ्या अंशाने चारित्रगुणाचे आवरण हटले तेवढ्या अंशाने चारित्रगुण प्रगट होतो असे मानने उचित आहे.

तत्त्वार्थश्लोकवार्तिक प्रथम अध्याय सू.१ च्या टीकेत श्री विद्यानन्दी आचार्य म्हणतात- पहिल्या गुणस्थानातील मिथ्याचारित्राहून चतुर्थ गुणस्थानातील चारित्र भिन्न आहे. चतुर्थ गुणस्थानात देशचारित्र व सकलचारित्राचा अभाव आहे त्या अपेक्षेने चारित्र नाही असे म्हटले आहे. परंतु तेथे चारित्रगुणाचा अभाव नाही. त्याचे आंशिक निर्मल परिणमन तेथे आहे. जेथे श्रद्धा व ज्ञान सम्यक् झाले तेथे चारित्र मिथ्या कसे असू शकेल. 'स्वरूपे चरणं चारित्रं' हे चारित्र गुणाचे लक्षण आहे. जेथे जेथे लक्षण आहे तेथे तेथे लक्ष्य नियमाने असते म्हणून चतुर्थ गुणस्थानामध्ये अनंतानुबंधी चौकडीच्या अभावामध्ये आंशिक चारित्र मानण्यामध्ये बाधा नाही.

सर्व ऊहापोहाचे प्रयोजन कोणाचेही खंडन मंडन नसून वस्तुस्वरूपाचा निर्णय करून मोक्षमार्गाला प्राप्त करणे हे आहे. चर्चा ही वस्तुस्वरूपाच्या निर्णयासाठी असावी. वादविवादासाठी नको. मोक्षमार्ग प्राप्त करण्यासाठी जो प्रयत्न करणे आवश्यक आहे त्याचे ज्ञान नसल्यामुळे जीव मोक्षमार्गापासून वंचित राहतात. शुद्धात्मानुभव हा मोक्षमार्गाचा पुरुषार्थ आहे. मुनिव्रत धारण करून निर्भार होऊन प्रचुर स्वसंवेदनज्ञानाद्वारे शुद्धात्म्याचा अनुभव घेत मोक्षमार्गामध्ये अग्रेसर होणे अत्युत्तम आहे. परंतु जर मुनी होण्याची इच्छा

असूनही काही कारणवश संयम धारण करू शकलो नाही तर संसार मार्गामध्येच राहणे योग्य नाही. गृहस्थ अवस्थेमध्ये राहूनसुद्धा पुरुषार्थ करून मोक्षमार्गामध्ये स्थित होणे श्रेयस्कर आहे. शुद्धोपयोग हाच मोक्षमार्ग आहे. शुद्धोपयोगाशिवाय सम्यग्दर्शनाची प्राप्ती सुद्धा असंभव आहे. जो स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाद्वारे निज आत्म्याचा अनुभव करतो तोच निश्चय सम्यक्त्वाला प्राप्त होतो.

प्रथम चौदा गाथा पीठिकास्वरूप –

या प्रवचनसार ग्रंथामध्ये जे आचार्यांना सांगावयाचे आहे ते या चौदा गाथांमध्ये सांगून संपले आहे म्हणून या १४ गाथा प्रवचनसारची पीठिकास्वरूप आहेत. प्रवचनसार तीन महाधिकारामध्ये विभक्त आहे. १) ज्ञानाधिकार २) ज्ञेयाधिकार अथवा दर्शनाधिकार ३) चारित्राधिकार. वास्तविक प्रवचनसारचे मूळ प्रतिपाद्य चारित्र आहे. कारण ग्रंथाच्या प्रारंभीच आचार्यांनी समताभावाला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्या साम्यभावाचे स्वरूप व त्याच्या प्राप्तीचा उपाय सांगणे हे या ग्रन्थाचे प्रयोजन आहे. समताभाव म्हणजेच चारित्र. मंगलाचरणस्वरूप पाच गाथा झाल्यावर ३ गाथांमध्ये चारित्राचे स्वरूप स्पष्ट केले. शुद्धोपयोगाची ओळख होण्यासाठी त्याच्या विरोधी शुभाशुभ उपयोगाचेही अस्तित्व सांगितले. त्यानंतर शुभाशुभ उपयोगापासून निवृत्ती व शुद्धोपयोगामध्ये प्रवृत्ती होण्यासाठी दोन गाथांद्वारे तिन्ही उपयोगांचे फल दाखविले. त्यानंतर जीवांना शुद्धोपयोगामध्ये प्रोत्साहित करण्यासाठी शुद्धोपयोगाने सिद्ध, अतिशय, निराबाध, अनुपम, अनंत अतीन्द्रिय सुखाचे वर्णन केले. त्यानंतर आत्मा शुद्धोपयोगाला कसा पात्र होतो अथवा शुद्धोपयोगाचा अधिकारी कोण आहे हे व्यक्त करण्यासाठी शुद्धोपयोग परिणत आत्म्याचे स्वरूप वर्णिले. याप्रमाणे १४ गाथांमध्ये मुख्यरूपाने शुद्धोपयोग, शुद्धोपयोगाचे फळ व शुद्धोपयोगी जीवाचे निरूपण केले. एवढाच या ग्रंथाचा गाभा आहे. कोणी संक्षेप रूचिवाला, उग्र, पुरुषार्थी, विचक्षण भव्य जीव या १४ गाथांचे पठन, मनन, रसास्वादन करून साम्यभावरूप साध्याची सिद्धी करू शकतो. परंतु जे विस्तारूचिवाले, मंद पुरुषार्थी, मंदबुद्धी जीव आहेत ते एवढ्यावरून प्रबुद्ध होऊ शकत नाहीत, म्हणून श्री गुरू

करुणा करून त्यांच्यासाठी पुढे ग्रंथाचा विस्तार करतात.

अंतरंग चारित्राचे स्वरूप समजण्यासाठी ज्ञान व ज्ञेयाचे यथार्थ स्वरूप समजणे नितान्त आवश्यक आहे. स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानरूपी साधनाद्वारे ज्ञानदर्शनस्वरूप निज ज्ञेयामध्ये लीन होणे हेच चारित्र आहे. चारित्राच्या प्राप्तीचा प्रयोग ज्ञानामध्येच आहे. प्रत्यक्ष, परोक्ष, इंद्रियज, अतीन्द्रियज इत्यादी ज्ञानसाधनाचे अनेक भेद आहेत. त्यापैकी स्वसाध्यसिद्धीचे कोणते ज्ञान साधन आहे? व ज्ञेयसुद्धा अनेक आहेत- सहा द्रव्ये, सात तत्त्वे इ. त्यापैकी आपले साध्य सिद्ध करण्यासाठी कोणत्या ज्ञेयाला विषय बनवावे? यातील भेद जाणण्यासाठी ज्ञान व ज्ञेयाचे स्वरूप दोन अधिकारांमध्ये विस्ताराने सांगितले आहे.

मनुष्यभवाची सफलता –

या निकृष्ट पंचमकाळात जन्माला येऊन सुद्धा आपण अत्यंत भाग्यशाली आहोत. कारण श्रीकुन्दकुन्द आचार्यप्रणीत सारभूत तत्त्वांचे पठन, मनन व पालन करण्याची पात्रता आपल्याला प्राप्त झाली आहे. आमचा हा मनुष्यभव अनादि-अनंतकाळापुढे किती छोटासा आहे? अनन्तकाळ परिभ्रमण करीत आज या छोट्याशा मनुष्य भवामध्ये तत्त्वचिंतन व यथाशक्ती संयम धारण करण्याची सहजसंधी प्राप्त झाली आहे तर विचार करा की हा किती अमूल्य अवसर आहे! ३४३ घनराजू लोकक्षेत्रामध्ये प्रत्येक प्रदेशावर अनन्तवेळा जन्म धारण करून अनन्त दुःख भोगले. आज भगवान महावीरांच्या तीर्थकाळात भावलिंगी संतांच्या पवित्र देशनेचे श्रवण, मनन, धारण करून अनंत दुःख दूर करण्याची अपूर्व संधी प्राप्त झाली आहे. ती हातची संधी व्यर्थ दवडणे मूर्खपणाचे ठरेल. आपले आत्मकल्याण करण्याचा सुअवसर व्यर्थ न गमावता नित्य आचार्यप्रणीत ग्रंथांचे पठन, मनन, चिंतन व आचरण करून मनुष्यभव सफल करूया.

शुद्धात्मस्वभाव लाभ अभिनंदनीय–

आता शुद्धोपयोगाच्या लाभानंतर प्राप्त होणाऱ्या शुद्ध आत्मस्वभावाच्या लाभाचे अभिनंदन करतात. ज्याला ज्या गुणासंबंधी अनुराग असतो तो ते गुण ज्यांना प्राप्त झाले आहेत अशा गुणी जीवांची

सहजच प्रशंसा करतो. आजकाल आपण पाहतो की साध्या साध्या गोष्टीला अभिनंदन करण्याची फॅशनच आली आहे. एखाद्या परीक्षेत पास झाला, एखाद्याला नोकरीमध्ये बढती मिळाली, राजकारणामध्ये उच्च पद मिळाले, कोणत्याही कलेमध्ये यश प्राप्त झाले की लगेच त्याला इंग्रजीभाषेत 'कॉन्ग्रॅच्युलेशन' किंवा हिंदीभाषेत 'बधाई' मराठीमध्ये 'हार्दिक अभिनंदन' म्हणून त्याचे कौतुक करतो. परंतु संसारामध्ये कोणतेही पद अभिनंदनीय नाही. कारण संसारातील सर्व पदे नाशवंत आहेत. अपदभूत आहेत. एक शुद्धात्मस्वभावाची प्राप्तीच अभिनंदनीय आहे. कारण हे पद शाश्वत अविनाशी आहे. शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती म्हणजेच स्वतंत्रता. स्वतंत्रता प्राप्तीचा उपाय शुद्धोपयोग आहे. हे या पुढील गाथेत सांगतात अर्थात जीवन स्वातंत्र्याची कलाच शिकवितात. ज्यांना शुद्धोपयोगाची महिमा आहे व शुद्धोपयोगाच्या फलभूत शुद्धात्म-स्वभावलाभाची लालसा आहे असे कुन्दकुन्द आचार्य शुद्धात्मस्वभावलाभाची प्रशंसा करतात –

उवओगविसुद्धो जो विगदावरणंतरायमोहरओ।
भूदो सयमेवादा जादि परं णेयभूदाणं।।१५।।

अन्वयार्थ– (जो) जो **(उवओगविसुद्धो)** उपयोगाने विशुद्ध आहे **(आदा)** तो आत्मा **(विगदावरणंतरायमोहरओ)** ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय व मोहरूपी धूलीने रहित **(सयमेव भूदो)** स्वयमेव होऊन **(णेयभूदाणं परं)** ज्ञेयभूत पदार्थांच्या अंताला **(जादि)** प्राप्त होतो.

शुद्धोपयोगाने आत्मा निर्मल व सर्वज्ञ होतो हे या गाथेचे तात्पर्य आहे.

निर्मोह शुद्धात्मतत्त्वाचे परिणमन म्हणजे शुद्धोपयोग–

उपयोग हा चैतन्याचा परिणाम आहे. जेव्हा तो उपयोग परद्रव्याच्या लक्षाने मोहयुक्त होतो तेव्हा तो अशुद्ध म्हटला जातो. तोच उपयोग अनादि अनन्त अखंड निर्मल शुद्ध चैतन्याच्या लक्ष्याने यथाशक्ती विशुद्ध होतो. यथाशक्ती अर्थात ज्याची जशी स्थिरता व एकाग्रता असेल त्यानुसार शुद्ध होतो. गुणस्थान परिपाटीनुसार वरवरच्या गुणस्थानांमध्ये स्थिरता वाढत जाते म्हणून उपयोग अधिकाधिक शुद्ध होत जातो. तदनुसार मोहकलीचा सुद्धा नाश होत जातो. ज्याप्रमाणे सुवर्णपाषाण उत्तरोत्तर अग्नीच्या तावांद्वारे अधिकाधिक

विशुद्ध होऊन चमकते त्याप्रमाणे आत्मासुद्धा उत्तरोत्तर ध्यानाग्नीमध्ये तप्त होऊन अधिकाधिक विशुद्ध होऊन चमकतो.

शुद्धोपयोगाच्या प्रसादाने मोहग्रन्थीचे उद्‌भेदन –

अनादिकाळापासून ही मोहग्रन्थी दृढतर बांधलेली आहे. जीव प्रत्येक पर्यायामध्ये प्राप्त झालेल्या शरीर, धन, पुत्र, मित्रादी संयोगामध्ये ममत्वभाव करतो. पर्याय तर अध्रुव आहे. नाशवंत आहे. पर्याय सुटताच तेथील सर्व संयोगसुद्धा स्वयमेव विघटित होतो. परंतु दृढ मोहग्रन्थी मात्र सुटत नाही. ती मात्र बरोबरच घेऊन जातो. म्हणून ही मोहरूपी गाठ अनादिकालीन आहे. ही मोहगाठ उकलण्याचे सामर्थ्य केवळ एका शुद्धोपयोगामध्येच आहे. आम्ही एक मोह उत्पन्न करून दुसरा मोह सोडविण्याचा प्रयत्न करतो. मोहाने मोह दूर होऊ शकत नाही. मुनी झाल्यावर सुद्धा मोह ग्रंथी सुटेल याची गॅरंटी नाही. ज्याप्रमाणे वारिषेण मुनींच्या आग्रहाने मित्र पुष्पडालने नवविवाहित पत्नीला सोडून मुनिदीक्षा धारण केली; परंतु त्यांच्या मनातील मोह सुटला नाही. त्यांच्या मनामध्ये मोहाचे सतत विकल्प येत होते. 'मी माझ्या पत्नीला सांगून आलो नाही. ती बिचारी माझ्याशिवाय कशी राहत असेल? काय करीत असेल? असे नाना विकल्प सतावत होते. वारिषेण मुनींना हे लक्षात आले की हे अजून मोहजाळ्यात फसले आहेत. ते त्यांना मोहजाळ्यातून सोडविण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यांनी आपल्या मातेला निरोप पाठविला की 'मी येत आहे. तुम्ही ३२ राण्यांना उत्तमोत्तम वस्त्र आभूषण साजश्रृंगार करून सज्ज ठेवा. माता दुविधेत पडली, माझा मुलगा मोह सोडून मुनी झाला आहे, आता त्याला या मोहाने कसे काय पकडले? मातेने पुन्हा विचार केला,' नाही, माझा मुलगा मोहात फसू शकत नाही. त्याचा दुसरा काहीतरी हेतू असला पाहिजे. तिने राण्यांना खूप छान सजवले. तिने मुनींना बसण्यासाठी दोन आसने ठेवली. एक सोन्याचे व दुसरे लाकडाचे. जेव्हा दोन मुनी राजवाड्यात आले तेव्हा त्यांचे स्वागत झाले. वारिषेण स्वत: लाकडाच्या आसनावर बसले व पुष्पडाल मुनींना सोन्याच्या आसनावर बसवले. ३२ राण्या त्यांच्यासमोर येऊन बसल्या. पुष्पडाल मुनींना त्यांना पाहिल्यावर आश्चर्य वाटले की वारिषेण मुनींच्या बत्तीस राण्या आहेत. त्यासुद्धा एकापेक्षा

एक अप्सरेपेक्षा सुंदर तरीसुद्धा यांना जरापण मोह नाही आणि मी आपल्या एका काण्या स्त्रीवर इतका मोह करतो? धिक्कार आहे माझा. त्यांना स्वत:ची खूप लाज वाटली. तत्काळ मोहपाश सोडून प्रबुद्ध होऊन स्वरूपामध्ये स्थिर झाले. मोहजाळ्यातून बाहेर पडल्याशिवाय खरी साधना होऊ शकत नाही.

चतुर्थादी चार गुणस्थानांपैकी कोणत्यातरी एका गुणस्थानात धर्मध्यानरूपी शुद्धोपयोगाद्वारे दर्शनमोह समूळ नष्ट होतो. शुद्धोपयोगानेच हा आत्मा स्वयं दुसऱ्या कोणाच्याही सहाय्याशिवाय क्षपकश्रेणी चढतो. सातव्या गुणस्थानातच बुद्धिपूर्वक कषायाचा अभाव होऊन बुद्धीमध्ये स्वात्मरसच अनुभवात येतो. या स्वात्मानुभवरूपी उत्कृष्ट धर्मध्यानाद्वारे जसजसा कषायाचा उदय निर्बल होत जातो तसतशी अनन्तगुणी विशुद्धता वाढत जाते. तेथेच अध:करण परिणामांना प्राप्त होतो. अनन्तपट विशुद्धता वाढत अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण परिणामाला प्राप्त होऊन पृथक्त्व वितर्क विचार नामक शुक्लध्यानरूपी शुद्धोपयोगाद्वारे शेष चारित्रमोहाला समूळ उखडून काढतो. केवळ सूक्ष्मलोभाचा उदय शिल्लक राहतो. पृथक्त्ववितर्क विचार शुक्लध्यानामध्ये शब्द, अर्थ व योगाचे परिवर्तन होते. परंतु हे परिवर्तन ध्यात्याच्या बुद्धीचा विषय नाही. ध्यान करणाऱ्याचा उपयोग तर आत्मस्थच असतो. आत्मिकरसामध्ये मग्न राहतो. या स्वरूप-मग्नतेमुळे आत्मा दहाव्या गुणस्थानात सूक्ष्मलोभाचा नाश करून सर्व मोहधूळीपासून सुटून निर्मोही वीतराग होतो. त्याला क्षीणमोह गुणस्थानवर्ती म्हणतात.

शुद्धोपयोगाने शेष घातिकर्मांचा अभाव-

मोह निघून गेल्यामुळे बाराव्या गुणस्थानात अशी निश्चलता व वीतरागता प्रगट होते की हा आत्मा बिलकुल ध्यानामध्ये तन्मय होतो. येथे शब्द, अर्थ योगपरिवर्तन बंद होते. म्हणून येथे एकत्व वितर्क अवीचार नावाचे दूसरे शुक्लध्यान होते. येथे परमनिर्मल शुद्धोपयोगाद्वारे हा आत्मा अंतर्मुहूर्तामध्ये ज्ञानावरण, दर्शनावरण व अन्तराय या तीन घातिकर्मांचे बल क्षीण करीत अंतसमयात यांचा सर्वथा नाश करून शुद्ध अरहंत परमात्मा होतो. आत्म्याचे स्वाभाविक ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य, वीतरागता आदी गुण प्रगट होतात. पूर्ण निराकुलता उत्पन्न होते. कारण परिणामामध्ये आकुलतेचे कारण

ज्ञानदर्शनाची कमी, आत्मबलाची हीनता व रागद्वेष कषायांचे बल आहे. येथे अनंतज्ञान, दर्शन, वीर्य, वीतराग भाव प्रगट झाल्यामुळे आकुलतेची सर्व कारणे दूर होतात.

शुद्धोपयोगाने सर्वज्ञतेची प्राप्ती–

नि:शेष घातिकर्मरूपी मेघपटल दूर झाल्यावर केवलज्ञानरूपी सूर्य उदित होऊन निर्बाधरूपाने स्वरूपात सहज प्रकाशमान होतो. शुद्धात्म्याची शक्ती अप्रतिघातरूपाने विकसित होऊन सर्वज्ञता प्रकट होते. सर्वाला जाणत असतानाही आपल्या आत्मिक आनन्दाच्या स्वादामध्ये मग्न राहतात. विशुद्ध ज्ञानाला कोणतीही सीमा राहिली नाही.आत्मा सर्व ज्ञेयपदार्थांच्या अंताला प्राप्त होतो. आत्मा ज्ञानस्वभावी आहे. ज्ञानाचा स्वभाव जाणणे. जाणणे हे पदार्थविषयक असते. म्हणून जेवढे ज्ञेय तेवढा ज्ञानाचा विस्तार आहे. संपूर्ण ज्ञेय ज्यामध्ये प्रतिबिंबित आहेत अशा ज्ञानस्वभावी आत्म्याला आत्मा शुद्धोपयोगाच्या प्रसादानेच प्राप्त करतो अर्थात शुद्धोपयोगानेच शुद्धात्मस्वभावाचा लाभ होतो. हे जाणून विकल्परहित धर्मध्यानामध्ये चित्त एकाग्र करून आत्मानंद रसामध्ये तन्मय होऊन शुद्धोपयोगाचा विलास भोगला पाहिजे. मला एक शुद्ध आत्माच शरण आहे. माझे कल्याण दूसरा कोणीही करणारा नाही. कोणी तारणहार नाही हे जाणून त्यामध्येच आपला उपयोग रमवणे योग्य आहे.

शुद्धोपयोगाने शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती होते हे मागील गाथेमध्ये सांगितले आहे, आता हे सांगतात की शुद्धोपयोगाने प्रसिद्ध शुद्धात्मस्वभावाच्या प्राप्तीसाठी अन्य भिन्न कारकांची अपेक्षा नाही. हे कार्य स्वाधीन आहे. प्रत्येक जीवामध्ये शुद्ध आत्मस्वभाव प्रकट होण्याची योग्यता आहे आणि हे कार्य करण्यासाठी त्याला दुसऱ्यावर विसंबून राहण्याची गरज नाही. स्वयं, स्वत:द्वारे, स्वत:पासून, स्वत:मध्येच, स्वत:साठी स्व ची प्राप्ती होते. असे हे कार्य अत्यंत सोपे व सरळ आहे अर्थात परिपूर्ण सुखी होण्यासाठी आत्मा स्वतंत्र आहे, स्वयंभू आहे हे प्रकाशित करतात–

तह सो लद्धसहावो सव्वण्हू सव्वलोगपदिमहिदो।
भूदो सयमेवादा हवदि सयंभु त्ति णिद्दिट्ठो।।१६।।

अन्वयार्थ– (तह) तसेच **(सो आदा)** तो आत्मा **(सयमेव)** स्वयंच

(लद्धसहावो) स्वभावाला प्राप्त **(सव्वण्हू)** सर्वज्ञ व **(सव्वलोगपदिमहिदो)** सर्व लोकपतींकडून पूजित **(भूदो)** झाला म्हणून **(सयंभु)** स्वयंभू **(हवदि)** आहे **(त्ति णिदिट्ठी)** असे जिनेन्द्रदेवांनी सांगितले आहे.

स्वभावाला प्राप्त सर्वज्ञ देव स्वयं प्रभू असल्यामुळे स्वयंभू आहेत. स्वयं भवति इति स्वयंभू, जो स्वयं होतो त्यास स्वयंभू म्हणतात. शुद्धात्मस्वभावलाभाच्या पूर्ण निरपेक्षतेचे व स्वाधीनतेचे येथे वर्णन केले आहे.

कारकव्यवस्था–

कोणतेही कार्य करण्यासाठी कारकांची अपेक्षा असते. जे कार्य करण्यासाठी उपयोगी आहेत त्यांना कारक म्हणतात. कारक सहा (६) आहेत– कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण. जो स्वतन्त्ररूपाने कार्य करतो तो कर्ता होय. कर्ता ज्याला प्राप्त करतो ते कर्म होय. जे कार्याच्या प्रति साधकतम अर्थात उत्कृष्ट साधन आहे त्यास करण म्हणतात. कर्म ज्याला दिले जाते अथवा ज्याच्याकरिता केले जाते त्यास संप्रदान म्हणतात. ज्याच्यातून कर्म केले जाते ती ध्रुववस्तू अपादान आहे. ज्यामध्ये कर्म केले जाते ते अधिकरण होय. हे सहाच कारक आहेत. संबंधषष्ठी कारक नाही. कारण ज्याचा क्रियेशी साक्षात् संबंध असतो त्यास कारक म्हणतात. षष्ठीचा संबंध क्रियेशी असत नाही दुसऱ्या नामाशी त्याचा संबंध असतो. जसे राजाचा पुत्र, देवदत्ताचे पुस्तक इत्यादी. ही सहा कारके व्यवहार व निश्चयाच्या भेदाने दोन प्रकारची आहेत. जेथे पराच्या निमित्ताने कार्याची सिद्धी दाखविली जाते तेथे व्यवहार कारकांचा प्रयोग होतो. जेथे स्वत:च्या उपादानकारणाने कार्याची सिद्धी सांगितली जाते तेथे निश्चयकारकांचा प्रयोग होतो. अर्थात जेथे प्रयोजनवश भिन्न द्रव्यामध्ये कार्यकारण संबंध सांगितला जातो ते व्यवहार कारक व जेथे एकाच द्रव्यामध्ये कार्यकारणसंबंध असतो ते निश्चयकारक होय.

व्यवहार षट्कारक–

स्वयंपाकी अग्नीद्वारे भुकेलेल्यांसाठी डब्यातून तांदूळ घेऊन भांड्यामध्ये भात शिजवितो. येथे स्वयंपाकी शिजविण्याचे कार्य करतो म्हणून तो कर्ता आहे. भात कर्म आहे. कारण भातावर शिजण्याची क्रिया होते किंवा

कर्त्याकडून भात प्राप्त केला जातो. अग्नीद्वारे शिजण्याची क्रिया होते म्हणून अग्नी साधन आहे. भुकेलेल्यांसाठी भात शिजविला जातो म्हणून भुकेलेले जीव संप्रदान आहेत. डब्यातून तांदूळ बाजूला केले म्हणून डबा अपादान आहे. कोणत्या तरी वस्तूचा विनाश अथवा वियोग होतो व कोणती तरी वस्तू ध्रुव राहते. त्यातील ध्रुव राहणाऱ्या वस्तूला अपादान म्हणतात. झाडावरून पान पडले येथे पानाचा वियोग झाला व झाड ध्रुव राहिले म्हणून झाड अपादान आहे.

उपर्युक्त उदाहरणामध्ये तांदूळ बाजूला झाल्यामुळे त्याचा वियोग झाला व डबा ध्रुव राहिला म्हणूत तो अपादान आहे. भांड्यामध्ये भात शिजवितो म्हणून भांडे अधिकरण आहे. येथे सर्व कारके भिन्न-भिन्न आहेत. स्वयंपाकी कर्ता भिन्न आहे, भातरूप कर्म अन्य आहे, अग्नीरूप साधन वेगळे आहे, भुकेलेले जीवरूप संप्रदान पृथक् आहेत, डबारूप अपादान अन्य आहे व भांडेरूप अधिकरण भिन्न आहे. म्हणून उपचरित असद्भूत व्यवहारनयाने लोक व्यवहार चालण्यासाठी ही व्यवहार षट्कारके सांगितली आहेत.

निश्चय षट्कारक-

वास्तविक एका द्रव्याचा दुसऱ्या द्रव्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. प्रत्येक द्रव्य आपल्याद्वारे, आपल्यासाठी, आपल्यापासून, आपल्यामध्ये, आपल्यारूपाने आपण स्वंय परिणमते म्हणून स्वयंच स्वत:चा कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण आहे. द्रव्य स्वयं परिणमनशील आहे. येथे उदाहरणामध्ये तांदूळ स्वतंत्रपणे भातरूपाने परिणमते म्हणून तांदूळ कर्ता आहे. स्वयंपाकी भातरूपाने परिणमत नाही. म्हणून निश्चयाने तो कर्ता नाही. भात हे कर्म आहे. भात बनण्यासाठी तांदूळ साधकतम साधन आहे. कारण तांदळामध्येच भातरूपाने परिणमण्याचे सामर्थ्य आहे. अग्नीमध्ये नाही. तांदळाने भातरूप कर्म स्वत:लाच दिले म्हणून तांदूळ स्वंय संप्रदान आहे. तांदळाने स्वत:पासून कच्चा अवस्थेला नष्ट करून पक्करूप अवस्था केली म्हणून तांदूळच अपादान आहे. तांदळांनी आपल्यामध्येच भातरूप कर्म केले म्हणून तांदूळ स्वयं अधिकरण आहे. अशाप्रकारे निश्चयनयाने एका द्रव्यामध्येच षट्कारकरूप शक्ती आहे. म्हणून एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण

नाही. प्रत्येक द्रव्य स्वयं आपल्या अनन्त शक्तिरूप संपदेने संपन्न आहे म्हणून स्वयंच षट्कारकरूप होऊन आपले कार्य करण्यासाठी समर्थ आहे. त्याला बाह्य सामग्रीची आवश्यकता नाही. व्यवहारनयाने निमित्तनैमित्तिकसंबंधाच्या अपेक्षेने भिन्न द्रव्यामध्ये कर्ता-कर्म संबंध दाखविला जातो. परंतु निश्चयाने प्रत्येक द्रव्य आपापल्यामध्येच परिणमते. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला परिणमवित नाही. निश्चयनयाने प्रत्येक वस्तूच्या परिणमनामध्ये जो परिणाम उत्पन्न होतो त्यामध्येच अभिन्नकारक सिद्ध होतात. उदा. स्वयंपाकी आपल्या इच्छारूप परिणामाने परिणमतो भातरूपाने परिणमत नाही, अग्नी अग्नीरूपाने (उष्णरूपाने) परिणमते. भुकेलेले आपल्या भोगण्याच्या इच्छारूप परिणामाने परिणमतो. डबा, डबारूपाने परिणमतो, भांडे भांडेरूपाने परिणमते. म्हणून निश्चयाने भिन्न द्रव्यामध्ये कर्ता-कर्म संबंध नाही.

ज्याप्रमाणे सोन्याच्या तुकड्यापासून कानातील कुंडल बनविले. येथे कुंडलरूप पर्यायाचे उपादान कारण सोने आहे. येथे अभिन्न सहा कारक अशाप्रकारे घटित होतात की सुवर्ण कर्त्याने कुंडलरूप (सोनेरूप) कर्माला, सुवर्णपणाच्याद्वारे, स्वत:च्या कुंडलरूप शोभेसाठी, आपल्याच सुवर्ण धातूपासून, आपल्याच सुवर्णामध्ये उत्पन्न केले. त्याप्रमाणे आत्मा आपल्या परिणतीचा स्वयं कर्ता आहे. आपली जी परिणती उत्पन्न झाली तेच आत्म्याचे कर्म आहे. आपल्याच उपादानकारणाने आपली परिणती झाली म्हणून आत्मा स्वयं करण आहे. आपली परिणती उत्पन्न करून स्वयं आपल्यालाच दिली म्हणून स्वयंच संप्रदान आहे. आपली परिणती आपल्यापासूनच झाली, म्हणून स्वयं अपादान आहे. आपल्या परिणतीला आपल्यामध्येच धारण करतो, म्हणून आत्मा स्वयं अधिकरण आहे. अशाप्रकारे अभेद षट्कारकांचा विकल्प करीत ज्ञानी जीव आपल्या आत्मस्वरूपाची भावना करतो ही भावना करता-करता जेव्हा स्वत: स्वत:मध्ये स्थिर होतो तेव्हा अभेद षट्कारकांचा विकल्पसुद्धा मिटतो. या निर्विकल्परूप शुद्धभावाच्या प्रतापाने हा आत्मा स्वयं चार घातिकर्मापासून पृथक् होऊन अरहंत परमात्मा होतो म्हणून त्यांना स्वयंभू म्हटले आहे.

प्रकृत गाथेमध्ये शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती हे कार्य आहे. या कार्यासाठी अन्य कारकांची अपेक्षा नाही. स्वभावाची समुपलब्धी स्वयं होते- सम् म्हणजे

सम्यक् प्रकाराने उप म्हणजे जवळ (स्वत:मध्ये) लब्धी=प्राप्ती अशाप्रकारे स्वभावाची सम्यक्प्रकारे आपल्यामध्येच प्राप्ती होते. शुद्धोपयोगामध्ये लीन आत्मा स्वयंच सहा कारकरूप होऊन शुद्धात्मस्वभावाला प्राप्त होतो.

कर्तृत्वशक्ती–

'स्वतंत्र: कर्ता' – कर्ता हा स्वतंत्र, निरपेक्ष असतो, तो परावलंबी असत नाही. जो शुद्ध परमात्म्याच्या भावनेच्या प्रभावाने घातिकर्मांचा नाश झाल्यामुळे निज शुद्ध चैतन्य स्वभावाला स्वपरिणतीने प्राप्त करतो तो आत्मा शुद्ध अनन्त शक्तिमय ज्ञायक स्वभावाने स्वतन्त्ररूपाने परिणमतो म्हणून स्वयंच कर्तृत्वाच्या अधिकाराला ग्रहण करतो. शुद्ध ज्ञायक स्वभावरूपाने परिणमणारा आत्मा दुसऱ्याच्या परिणतीची अपेक्षा न करता स्वतन्त्रच परिणमतो म्हणून आत्माच कर्ता आहे. **य: परिणमति स कर्ता–** विवक्षित पर्यायरूपाने जो परिणमतो तोच त्याचा कर्ता होय. आत्म्याच्या शुद्ध पर्यायरूपाने आत्मा स्वयं परिणमतो म्हणून तोच कर्ता आहे. यावरून हे लक्षात येते की आपले कार्य करण्यासाठी आपण स्वतंत्र आहोत. आपले कार्य दुसरा कोणीही करणार नाही. म्हणून आपले कार्य सिद्ध करण्यासाठी दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहत बसण्यात अर्थ नाही. देव, शास्त्र, गुरु मला मोक्ष देतील म्हणून त्यांच्यावर आपले कार्य सोपवून स्वत: पुरुषार्थहीन निठल्ला होऊन आपले कार्य सिद्ध होणार नाही. ते फक्त आपल्याला स्वभाव प्राप्तीचा मार्ग दाखवण्याचे काम करतील, परंतु त्या मार्गावर आपण स्वयं गमन केले तरच स्वभावोपलब्धी होईल. स्वकार्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून न राहता आपण स्वयं पुरुषार्थ केला पाहिजे. कारण आपणच स्वपरिणतीला जबाबदार आहोत. स्वत:चे काम स्वत:च करावे लागेल. अनन्त सिद्धांनी स्वत: स्वपुरुषार्थाने अनन्त चतुष्टयरूप मोक्षलक्ष्मी प्राप्त केली आहे. शुद्ध स्वभावाच्या लक्ष्याने आत्मा स्वयं शुद्धस्वभावरूपाने परिणमतो म्हणून आत्माच कर्ता आहे.

कर्मशक्ती–

शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती दुसऱ्या कोणाचेही काम नाही. शुद्ध ज्ञानादिरूपाने परिणमित होण्याचा आत्म्याचा स्वभाव असल्यामुळे स्वयंच प्राप्त करण्यायोग्य कर्म आहे. आत्मा आत्म्यालाच प्राप्त करतो म्हणून आत्मा कर्म आहे. संपूर्ण कर्माचा अभाव झाल्यावर आत्म्याला बाहेरून दुसरी

कोणतीही वस्तू प्राप्त झाली नाही. स्वला स्वच प्राप्त झाले आहे. या विश्वामध्ये कोणताही एक पदार्थ अन्य वस्तूला प्राप्त करू शकतच नाही. ज्ञान, आनन्द, सुख हे बाह्य वस्तूतून प्राप्त होत नाही. ज्ञान, आनन्द आत्म्याचा स्वभाव आहे. म्हणून आत्मा स्वयंच ज्ञान आनन्दाला प्राप्त करतो. लौकिकामध्ये अज्ञानी जीवाला वाटते,' मी गाडी, बंगला, पैसा, टी.व्ही., फ्रीज प्राप्त केला'. परंतु आत्मा यांना प्राप्त होऊ शकत नाही. यांना प्राप्त करण्याचे सामर्थ्य जीवामध्ये नाही. यांना निमित्त करून आत्मा ज्ञान व आनंद प्राप्त करतो. परंतु भ्रमाने अज्ञानीला वाटते की मी लाखमोलाच्या वस्तू प्राप्त केल्या. शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती म्हणजे खरी आत्म्याची उपलब्धी आहे. स्वात्मोपलब्धी म्हणजेच मोक्ष आहे. यावरून हे लक्षात घ्यायचे की मला दुसरे काहीही प्राप्त करणे योग्य नाही. मी प्राप्त करायला गेलो तरी ते प्राप्त होणार नाही. त्यामुळे दु:खच माझ्या पदरी येणार. स्त्री, पुत्र, मित्रादींचे पालन पोषण करणे, त्यांना रिझवणे हे माझे काम नाही. स्वभावाला प्राप्त करणे हेच माझे काम आहे. जगाची उठाठेव करणे माझे कार्य नाही. स्वत:मध्ये लीन होऊन स्वला जाणणे हेच कर्तव्य कर्म आहे.

साधकतमत्वमयी करण शक्ती–

शुद्धात्मस्वभावाचा लाभ अन्य कोणत्याही साधनाने होत नाही, शुद्ध अनंतज्ञानादिरूपाने परिणमित होण्याचा आत्म्याचा स्वभाव असल्यामुळे स्वयंच साधकतम साधन आहे. शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती दहा हजार दान दिल्यामुळे होत नाही, गुरूंची सेवा केल्यामुळे होत नाही, तीर्थयात्रा केल्याने होत नाही, पूजा–प्रतिष्ठा केल्याने अथवा व्रत–उपवास केल्याने होत नाही.केवलज्ञानाची उत्पत्ती शास्त्र, गुरु, उपदेशक, वचन, दिव्यध्वनी इत्यादींमुळे होत नाही. ही सर्व प्राथमिक अवस्थेमध्ये निमित्तरूप बाह्य साधने आहेत. या साधनांचा आश्रय घेऊन जो स्वभावाला जाणतो, स्वभावामध्ये राहतो तो शुद्ध स्वभावाला प्राप्त करतो. उपर्युक्त सर्व साधनांचा ज्याने संग्रह केला आहे, परंतु शुद्ध आत्म्याचा अनुभव करीत नाही तो शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती तर दूर, सम्यग्दर्शनाला सुद्धा प्राप्त करीत नाही. म्हणून शुद्धात्मस्वभावाच्या प्राप्तीसाठी शुद्ध आत्म्याची साधना, आराधना करण्यायोग्य आहे. स्वत:चा विकास स्वत:द्वारेच होतो. अन्य कोणीही

आपला विकास करू शकत नाही. माझ्यामध्ये साधकतम करणशक्ती असल्यामुळे मला बाह्य साधनांवर अवलंबून राहण्याची काय गरज ?

संप्रदान शक्ती–

शुद्धात्मस्वभावाचा जो लाभ झाला तो दुसऱ्याला दिला जात नाही. तो आत्म्याला स्वत:लाच समर्पित केला जातो म्हणून आत्माच स्वयं संप्रदान आहे. शुद्धात्मस्वभावरूप धन आत्म्यालाच मिळते, आत्म्याकरिताच शुद्धात्म–स्वभावाची प्राप्ती केली जाते म्हणून आत्माच संप्रदानकारक आहे. स्वत:ची वस्तू दुसऱ्याला दिली जाऊ शकत नाही व दुसऱ्याची वस्तू आपण घेऊ शकत नाही. कारण प्रत्येक वस्तू आपापल्या पर्यायाने स्वयं संप्रदान आहे. एखादी कष्टाने मिळविलेली वस्तू जर दुसऱ्याला प्राप्त झाली तर आम्ही आपले श्रम व्यर्थ मानतो. 'मी एवढ्या कष्टाने मिळविली व दुसरा त्याचा लाभ घेतो हे मी कसे काय सहन करू शकणार? दुसऱ्याची वस्तू दुसऱ्याला लखलाभ, माझी वस्तू माझ्यासाठी आहे. मी मिळविलेल्या वस्तूचा उपभोक्ता मी स्वयंच आहे. जे काही मिळवायचे ते स्वत:साठी. आत्मसाधना स्वत:च्या कल्याणासाठीच केली जाते. ख्याती, पूजा, लाभ, प्रतिष्ठेसाठी नाही. ज्ञान व आनंद आत्मा स्वत:लाच देऊ शकतो. आपले ज्ञान व आनंद दुसऱ्याला देऊ शकत नाही. गुरु शिष्याला ज्ञानदान करीत नाहीत तर स्वत:च्या आत्म्यालाच ज्ञानदान करतात. कारण जर गुरूंनी शिष्याला ज्ञान दिले असते तर त्यांचे ज्ञान कमी व्हायला पाहिजे. परंतु उलट ज्ञान वाढते याचा अर्थ त्यांनी दुसऱ्याला ज्ञान देण्याऐवजी स्वत:लाच ते ज्ञान दिले. आपण दुसऱ्याला आनंद देऊ शकत नाही. स्वत:लाच आनंद देऊ शकतो. स्वत: स्वत:द्वारे स्वत:साठी आनंदीत होतो. मी कोणाकरिता नाही, मी माझ्यासाठी आहे.

अपादानत्व शक्ती–

शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती दुसऱ्यापासून होत नाही, परन्तु ध्रुव सहज चैतन्य स्वभावमय आत्म्यापासून होते म्हणून आत्माच स्वयं अपादान आहे. विभावाचा नाश होऊन ध्रुव स्वभावातून शुद्ध स्वभाव प्रकट झाला. एखाद्या वस्तूचा नाश झाला असता जी ध्रुववस्तू असते ती अपादानकारक होते. विभावपरिणामाचा नाश झाल्यावरसुद्धा आत्मा ध्रुव असतो म्हणून तो अपादान आहे. ज्याप्रमाणे रत्नाच्या खाणीतूनच रत्न निघते, सोन्याच्या खाणीतूनच

सोने निघते त्याप्रमाणे ज्ञान व आनन्दाची ध्रुव खाणस्वरूप भगवान आत्म्यातूनच ज्ञान व आनन्द स्वभाव प्राप्त होतो. ज्याप्रमाणे रत्नाच्या प्राप्तीसाठी रत्नाची खाण खोदणे आवश्यक आहे त्याप्रमाणे ज्ञान व आनन्दासाठी ज्ञानानन्दस्वरूप आत्म्याला खोदणे अर्थात आत्म्यात खोल उतरण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे पाण्याला घुसळल्याने लोणी मिळत नाही, वाळूला पिळल्याने तेल निघत नाही त्याप्रमाणे परवस्तूतून ज्ञान व आनन्द प्राप्त होत नाही. ज्ञान व आनन्दाची ध्रुवखाण भगवान् आत्मा आहे.

अधिकरणत्व शक्ती–

शुद्धात्मस्वभावाचा लाभ अन्य कोणामध्ये होत नाही. स्वयं आत्म्यामध्येच शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती होते. कारण स्वभावप्राप्तीचा आधार स्वयं आत्मा आहे. शुद्धात्मस्वभावाच्या प्राप्तीचा आश्रय आत्माच आहे म्हणून आत्मा अधिकरण कारक आहे. समवशरणामध्ये बसलेल्या एखाद्या भव्य जीवाला केवलज्ञानाची प्राप्ती झाली तरी ती स्वत:च्या आश्रयाने स्वत:मध्येच होते. त्याच्या त्या परिणामाचा आश्रय समवशरण नाही किंवा भगवंतांची पर्याय त्याचा आश्रय नाही किंवा गणधर देवसुद्धा त्या परिणतीचा आश्रय नाही. तो जीव उपदेश ऐकूण त्याचा विचार करतो व त्याप्रमाणे स्वत: स्वत:मध्ये पुरुषार्थ करतो तेव्हा शुद्ध पर्याय त्या जीवामध्येच उत्पन्न होते.

शंका – क्षायिक सम्यग्दर्शनाची प्राप्ती केवली व श्रुतकेवलींच्या पादमूलामध्येच होते असा शास्त्रामध्ये नियम सांगितला आहे तर मग केवली व श्रुतकेवली क्षायिक सम्यग्दर्शनाचा आश्रय नाहीत का?

समाधान – बरोबर आहे, परंतु हा नियम निमित्ताच्या अपेक्षेने सांगितला आहे. केवलींच्या पादमूलामध्ये लाखो, करोडो जीव असतात, सर्वांना क्षायिक सम्यग्दर्शन झाले पाहिजे; परंतु काही थोड्या जीवांनाच क्षायिक सम्यग्दर्शन प्राप्त होते असे का? क्षायिक सम्यग्दर्शन प्राप्त करण्यासाठी योग्य विशुद्धी केवलींच्या सान्निध्यातच होते. म्हणून केवलींचे सान्निध्य बाह्य अधिकरण आहे. परंतु केवळ केवलींच्या सान्निध्यात जाऊन सम्यग्दर्शन होत नाही. तेथे जाऊनही स्वत: निज ध्रुवशुद्ध आत्म्यामध्ये राहण्याचा पुरुषार्थ केला तर सम्यग्दर्शन प्राप्त होते. आपले काम आपल्यामध्येच होते, दुसऱ्यामध्ये नाही.

शुद्धात्मस्वभावाच्या प्राप्तीची स्वाधीनता–

शुद्धात्मस्वभावाचा लाभ स्वत: स्वत:मध्ये, स्वत:पासून स्वत:करिता स्वत:द्वारे होतो म्हणून हा लाभ अत्यन्त स्वाधीन आहे. त्यासाठी अन्य सामग्री शोधण्यामध्ये व्यग्र होण्याची आवश्यकता नाही. अभिन्न षट्कारक सांगण्याचे प्रयोजन हे आहे की धर्म प्राप्त करण्यासाठी परपदार्थाच्या मागे लागू नका. तो आपल्याद्वारे, आपल्यामध्येच मिळणार आहे. आचार्य सांगतात, जर तुम्हाला स्वाधीन, सुखी व शुद्ध होण्याची इच्छा असेल तर स्वत: पुरुषार्थ करा. कोणी दुसरा तुम्हाला शुद्ध बनवू शकत नाही. मुक्ती देणारा दुसरा कोणी नाही. मोक्ष अर्थात शुद्ध अवस्था मागून मिळत नाही.धर्माची प्राप्ती न होण्यामध्ये आम्ही बाह्य कारणांना दोष देतो. 'काय करणार? मला योग्य मार्गदर्शक गुरुच मिळाले नाहीत, मला अमुक पुस्तकच नाही, माझ्याजवळ धर्म करण्यासाठी पैसेच नाहीत, माझी तीर्थयात्राच झाली नाही या कोणत्याही बाह्य कारणामुळे धर्मरूप कार्य तटलेले नाही.' आमचा पुरुषार्थच तेथे कमी पडतो. मोही जीव बाह्य पदार्थामध्येच दृष्टी ठेवतो. आपले कार्य करण्यासाठी बाह्य सामग्रीचा शोध घेतो. परंतु आपला उपयोग आपल्यामध्ये रमवत नाही म्हणून धर्म प्राप्त होत नाही.

ज्याला स्वत:मध्ये धर्माचे श्रद्धान होते तो मंदिरात, तीर्थक्षेत्रावर, गुरूंच्या सान्निध्यात जाऊन आपल्या स्वरूपामध्ये राहून आपल्यातून आपला विकास करतो. भगवान सुद्धा हेच सांगतात, जोपर्यंत तुला माझासुद्धा सूक्ष्म विकल्प राहील तोपर्यंत स्वानुभवरूप सम्यग्दर्शन होणार नाही. तू माझासुद्धा विचार सोडून स्वत:मध्ये लीन हो तर तुला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल. शुद्धात्मस्वभावाच्या प्राप्तीसाठी अन्य सामग्री शोधणारा परतन्त्र अर्थात पराधीन आहे. परतन्त्र जीव शुद्धोपयोगाला प्राप्त करू शकत नाही तर शुद्धोपयोगाच्या फळाला कसे प्राप्त करू शकेल. ज्याप्रमाणे दूधामध्येच तूप आहे. म्हणून तूप दूधातूनच प्राप्त होणार तेथे फक्त विवेकाची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे आत्म्यामध्येच शुद्ध स्वभावी परमात्मा वास करतो, तो शुद्ध स्वभावी परमात्मा आत्म्यामध्ये आत्म्यामधूनच प्राप्त होणार. तेथे केवळ भेदविज्ञानाची कला पाहिजे. ज्ञानावरणादी द्रव्यकर्म, शरीरादी नोकर्म व रागादी भावकर्मापासून शुद्ध आत्मा भिन्न आहे. मी शुद्ध आत्मा आहे, द्रव्यकर्म नोकर्म भावकर्म मी नाही हा अंतरंग स्वीकारच शुद्ध स्वभाव प्राप्त

करून देणारा आहे.

प्रकृत गाथेमध्ये शुद्ध स्वभावाच्या प्राप्तीमध्ये परकारकांची निरपेक्षता दाखवून आचार्यांनी जणू स्वतन्त्र जीवन जगण्याची गुरुकिल्लीच आपल्या हातात सोपविली आहे. जीवनस्वातन्त्र्याची कला शिकविणारा हा प्रवचनसार ग्रंथ अलौकिक अद्‌भुत व बेजोड आहे.

शुद्धोपयोगापासून उत्पन्न शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती अन्य कारणांशिवाय स्वत: होते म्हणून केवली भगवान स्वयंभू आहेत हे गाथा नं. १६ मध्ये सिद्ध केले आहे. आता पुढील गाथेत हे स्पष्ट करतात की शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती अविनाशी आहे. लौकिकामध्ये आपण पाहतो की कोणतीही इष्ट वस्तू प्राप्त झाली की तिचा नाश होऊ नये असे भय असते. कारण संयोगी वस्तूचा वियोग होताना दिसतो. अन्य वस्तूप्रमाणे शुद्धात्मस्वभावाच्या लाभाचासुद्धा विनाश होतो का ? अशी शंका शिष्याच्या मनात आली असता आचार्य शिष्याला धैर्य देतात की 'शुद्धात्म स्वभावाचा लाभ अविनाशी आहे. त्यामुळे त्याच्या विनाशाचे भय बाळगण्याचे कारण नाही. तसेच शुद्धात्मस्वभावाचा लाभ अविनाशी असूनही उत्पादव्ययसहित आहे असा विरोधाभास दाखवून तो दूर करतात.–

भंगविहीणो य भवो संभवपरिवज्जिदो विणासो हि।
विज्जदि तस्सेव पुणो ठिदिसंभवणाससमवाओ ।।१७।।

अन्वयार्थ – (भंगविहीणो भवो) शुद्धात्मस्वभावाला प्राप्त आत्म्यामध्ये विनाशरहित उत्पाद आहे **(य)** आणि **(संभवपरिवज्जिदो विणासो)** उत्पादरहित विनाश आहे. **(पुणो तस्सेव)** पुन्हा त्याच सिद्ध आत्म्यामध्ये **(ठिदिसंभवणाससमवाओ विज्जदि)** ध्रौव्य, उत्पाद व व्ययाचा समूह विद्यमान आहे.

शुद्धात्मस्वभावाला प्राप्त आत्म्यामध्ये शुद्धोपयोगाच्या अवलंबनाने शुद्धात्म स्वभावाचा जो उत्पाद झाला आहे त्याचा त्यारूपाने पुन्हा नाश होत नसल्यामुळे तो उत्पाद भंगरहित आहे व अशुद्धात्मस्वभावाचा जो नाश झाला आहे तो पुन्हा उत्पन्न होत नसल्यामुळे व्यय–उत्पादरहित आहे. शुद्ध झालेल्या आत्म्याचे शुद्धत्व कधी नष्ट होत नाही व अशुद्धत्व पुन्हा उत्पन्न होत नाही व आत्मपणा सदैव आहे हा या गाथेचा सारांश आहे.

शुद्धोपयोगाच्या प्रसादाने शुद्धात्मस्वभावाचा लाभ व अशुद्धभावाचा अभाव–

शुद्धात्मस्वभावाचा लाभ म्हणजेच मोक्षप्राप्ती, स्वात्मोपलब्धी, शाश्वत आनंदाची प्राप्ती. मोक्षप्राप्तीचे वास्तविक साधन शुद्धोपयोग अर्थात जीवाचा ज्ञानोपयोग निजशुद्ध आत्म्यामध्ये लीन होणे हे आहे. परंतु हे न समजता अज्ञानी जीव मोक्षासाठी अनेक प्रकारचे कठोर तपश्चरण, व्रतादिकांचे पालन, शास्त्रांचे पठनपाठन इत्यादी विविध अनुष्ठान करतो. हे सर्व शुद्धोपयोगाच्या प्राप्तीसाठी बाह्य आलंबनमात्र आहेत. त्यांनाच आपल्या सिद्धीचे खरे साधन समजून त्यामध्ये तत्पर राहतो व केवळ त्यांच्या आचरणामध्ये संतुष्ट होतो; परंतु शुद्धोपयोगाचा पुरुषार्थ करीत नाही. त्यामुळे सर्व बाह्यक्रिया केवळ भारभूत वाटतात. त्याद्वारे शरीर क्षीण होते, पण कर्म क्षीण होत नाही, कार्यसिद्धी होत नाही म्हणून खेदखिन्न होतो. कोणतेही कार्य आरंभ करण्यापूर्वी त्या कार्यसिद्धीचे साधन काय आहे हे समजून घेऊन कार्य आरंभिले तर ते सिद्धीस जाते. अन्यथा ते कार्य मध्येच सोडून द्यावे लागते. मोक्ष हे सुद्धा एक कार्य आहे ते आरंभ करण्यापूर्वी त्याच्या सिद्धीचे साधन समजून घेणे परम आवश्यक आहे. शुद्धोपयोगाच्या द्वारेच संवर, निर्जरा व मोक्ष प्राप्त होतो. शुद्धोपयोगाच्या एक–एक पायऱ्या वर चढून मोक्षमहलात प्रवेश करू शकतो. शुद्धोपयोगानेच अशुद्ध भावाचा नाश होऊन शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती होते. अशुद्धात्म नाश व शुद्धात्मलाभ या दोन्ही कार्याची सिद्धी एकाच साधनाने होते. त्यासाठी भिन्न भिन्न साधनांची गरज नाही. ज्याप्रमाणे स्वच्छ पाण्याने वस्त्र धुतल्यावर वस्त्राचा मळ नष्ट होऊन वस्त्र शुद्ध होते. वस्त्राचा मळ काढण्यासाठी व वस्त्र स्वच्छ होण्यासाठी वेगवेगळा पुरुषार्थ करावा लागत नाही त्याप्रमाणे अशुद्धतेचा नाश होण्यासाठी व शुद्धता प्राप्त होण्यासाठी वेगवेगळा पुरुषार्थ करण्याची गरज नाही. शुद्धोपयोगरूपी निर्मल पुरुषार्थाने दोन्ही कार्ये सिद्ध होतात. म्हणून शुद्धोपयोग हे मोक्षाचे वरदान आहे.

शुद्धात्मस्वभावाचा लाभ अमर आहे –

संसारामध्ये कोणतेही इष्ट पद असो, इष्ट अवस्था असो अथवा इष्ट संयोग असो तो प्राप्त झाल्यावर पुन्हा नाश होऊ नये, त्याचा संयोग सतत

राहावा असे वाटत असते. उदा. एखाद्याला रोग झाल्यावर औषध घेऊन जेव्हा रोग बरा होतो व निरोगी अवस्था प्राप्त होते तेव्हा असे वाटते की ही निरोगी अवस्था कायम राहावी, पुन्हा रोग उत्पन्न होऊ नये. एखाद्या गरीब पुरुषाने काबाड कष्ट करून धन मिळविले व तो श्रीमंत झाला तर असे वाटते की ही माझी श्रीमंती कायम राहावी. पुन्हा गरीबी येऊ नये. एखादा जीव झोपडी सोडून स्वत:च्या बंगल्यात राहायला गेला की पुन्हा बंगला सोडण्याची इच्छा होत नाही. एखादे पद मिळाले तर ते कायम टिकावे म्हणून प्रयत्न करतो. एखादा मंदबुद्धी अभ्यास करून हुशार झाला तर त्याला वाटते 'माझी बुद्धी सदैव अशीच तल्लख राहावी. पुन्हा त्यामध्ये मंदता येऊ नये.' परंतु जीवाच्या उपर्युक्त सर्व इच्छा बैलाच्या स्तनाप्रमाणे निष्फळ आहेत. कारण संसारातील कोणतीही अवस्था, पद व संयोग स्थायी नाही, नाशवंत आहे. म्हणून तर सतत नाशाचे भय असते. जर शाश्वत अविनाशी स्थायी पद प्राप्त करण्याची इच्छा असेल तर एक सिद्धपदच प्राप्त केले पाहिजे. कारण एक सिद्धपदच असे आहे की जे प्राप्त झाल्यावर कधीही नष्ट होत नाही. सिद्धपद म्हणजेच शुद्धस्वभावाचा लाभ. शुद्धात्मस्वभावाच्या लाभाला मरण नाही म्हणून तो अमर आहे.

अशुद्धभावांचा नाश उत्पादरहित –

शुद्धोपयोगाच्या अवलंबनाने एकदा सर्व अशुद्धभावांचा नाश झाला तर संसारवृक्ष समूळ नष्ट होतो. पुन्हा त्याची उत्पत्ती होत नाही. यावरून भगवान या पृथ्वीवर पुन्हा अवतार घेतात या मिथ्यामान्यतेचे खंडन होते. व्यास ऋषिरचित महाभारतामध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतो. –

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य संभवामि युगे युगे।।

हे अर्जुन, जेव्हा जेव्हा पृथ्वीतलावर धर्माचा ऱ्हास व अधर्माचा उत्कर्ष होतो तेव्हा तेव्हा मी अधर्माचा नाश करण्यासाठी या पृथ्वीवर जन्म घेतो. परंतु हा भ्रम आहे. मुक्तिपुरीमध्ये विराजमान सिद्धराजे आपल्या ज्ञानमहालामध्ये पूर्ण विश्रांती घेतात. त्यांना दुनियेशी काही कर्तव्य नाही. त्या वीतराग प्रभूंना पूर्ण रागद्वेषाचा अभाव झाल्यामुळे धर्मात्मा जीवांवर प्रेम व अधर्मात्मा जीवांवर द्वेषभाव होत नाही. ते परम समताभावामध्ये स्थित

आहेत. कोणी काहीही करो, स्वरूपामध्ये फिट्ट बसलेला त्यांचा उपयोग विचलित होत नाही. कारण त्यांना ध्रुव, अचल, अनुपम असा सर्वोत्कृष्ट शुद्धात्मा प्राप्त झाला आहे. त्यामुळे त्यांची सिद्ध अवस्थाही ध्रुव, अचल, अनुपम आहे. संपूर्ण विश्वात हाहाकार माजला, सर्वत्र विध्वंस झाला, तरी ते संसारामध्ये पुन्हा अवतार घेत नाहीत. 'सर्व वस्तू स्वयं परिणमनशील आहेत, उत्पादव्ययध्रौव्यस्वरूपी आहेत' हे वस्तु स्वरूप जाणून विश्वाचे केवळ सहज ज्ञाता द्रष्टा होतात. कर्ता, धर्ता व हर्ता होत नाहीत.

अशुद्धभावाचा अभाव व शुद्धभावाचा आविर्भाव म्हणजेच सिद्धत्व –

सिद्ध म्हणजे तयार झालेली पूर्ण वस्तू. जोपर्यंत वस्तू पर्यायामध्ये अपूर्ण असते तोपर्यंत ती असिद्ध म्हटली जाते. जेव्हा योग्य साधनसामग्रीच्या साहाय्याने वस्तू परिपूर्ण तयार होते तेव्हा ती सिद्ध म्हटली जाते. ज्याप्रमाणे खाणीमधून आणलेले सुवर्णपाषाण अशुद्ध व असिद्ध असते. त्याला अग्नीमध्ये तापवून शुद्ध केले जाते. जोपर्यंत सुवर्ण पाषाणाला अग्नीचे एक, दोन, तीन असे पंधरा ताव दिले जातात तोपर्यंत सोने असिद्धच असते. कारण अद्यापि त्यातून किट्टिमा व कालिमेचा पूर्णत: अभाव झाला नाही. जेव्हा सोळावा ताव देऊन किट्टिमा व कालिमा पूर्णत: नष्ट होते तेव्हा सोने शुद्ध होऊन सिद्ध होते. त्याप्रमाणे अनादिकाळापासून कर्म नोकर्मरूपी किट्टिमा व भावकर्मरूपी कालिमेने हा जीव अशुद्ध असून पर्यायात असिद्ध आहे. जेव्हा धर्मध्यानरूपी अग्नीमध्ये हा जीव तप्त होतो तेव्हा मिथ्यात्वादी आंशिक भावकर्म व द्रव्यकर्माचा संबंध दूर होऊन सम्यक्त्वादिक आंशिक शुद्धता येते. जसजसा ध्यानरूपी अग्नीमध्ये तप्त होत शुद्ध होत जातो तसतसा द्रव्यभाव कर्मरूपी मल दूर होत जातो, जेव्हा प्रथम दोन शुक्लध्यानरूपी अग्नीमध्ये चार द्रव्य व भाव घातिकर्मांना भस्मसात करतो, तेव्हा भावमुक्त होऊन अनंतचतुष्टयरूपाने शोभून दिसतो. पुन्हा तृतीय व चतुर्थ शुक्लध्यानाद्वारे शेष चार अघातिकर्मांचा नाश करतो तेव्हा संपूर्ण द्रव्यकर्म, भावकर्म व नोकर्मरूपी मल जळून गेल्यामुळे शुद्ध होऊन सिद्ध होतो. म्हणूनच म्हटले 'अशुद्धतेचा प्रध्वंस व शुद्धतेचा उत्पाद म्हणजेच सिद्धत्व आहे, म्हणून शुद्ध होण्यासाठी शुद्ध आत्म्याचे ध्यान करावे.

सिद्धांमध्ये उत्पाद–व्यय–ध्रौव्यत्वाची सिद्धी –

शुद्धस्वभाव प्रकट झाल्यावर त्याचा कधीही नाश होत नसल्यामुळे सिद्ध भगवान नित्य अविनाशी आहेत तथापि त्यांच्यामध्ये उत्पादव्यय ध्रौव्यपणा घटित होतो. ज्या समयात सिद्धपर्यायाचा उत्पाद झाला त्याच समयात संसारपर्यायाचा व्यय झाला आणि जीवत्व दोन्हीमध्ये कायम असल्यामुळे ध्रौव्यपणा आहे. अशाप्रकारे सिद्धपर्यायाच्या उत्पत्तीक्षणी उत्पादव्ययध्रौव्य तिन्ही सिद्ध होतात. सिद्ध अवस्थेमध्येसुद्धा प्रत्येक समयात उत्पादव्ययध्रौव्य अबाधित आहेत. अल्पज्ञानी जीवांना विभाव पर्यायाचाच अनुभव आहे. स्वभावपर्यायाचा अनुभव नाही म्हणून शुद्ध जीवादी द्रव्यांमध्ये स्वभाव पर्याय होतात हे समजणे कठिण जाते. आगमामध्ये अगुरुलघुगुणाच्या षड्गुणहानिवृद्धिरूप परिणमनाला स्वभावपर्याय म्हटले आहे. ज्याप्रमाणे समुद्रामध्ये लाटा उठतात त्यामुळे काही ठिकाणी पाण्याची वृद्धी व काही ठिकाणी हानी झाालेली दिसते, परंतु समुद्राचे पाणी जसेच्या तसेच नियत असते. केवळ कोठे पाणी उंचावलेले व कोठे नीचावलेले दिसते. त्याचप्रमाणे अगुरुलघुगुणाच्या अंशामध्ये कधी वृद्धी व कधी हानी स्वभावरूपाने होते, परंतु अगुरुलघुगुण तसाच व्यवस्थित राहतो. तसेच अगुरुलघुगुणाच्या निमित्ताने सर्वच गुणांमध्ये षड्गुणवृद्धिहानिरूप स्वभाव परिणमन होते. द्रव्यामध्ये परिणमन होणे हा जर द्रव्याचा स्वभाव आहे तर शुद्ध वा अशुद्ध दोन्ही अवस्थांमध्ये परिणमन झालेच पाहिजे. अन्यथा द्रव्य कूटस्थ नित्य होईल. जर शुद्ध अवस्थेमध्ये परिणमन मानले नाही तर अशुद्ध अवस्थेमध्ये सुद्धा परिणमन मानता येणार नाही. ज्याअर्थी अशुद्ध अवस्थेत परिणमन होते त्याअर्थी शुद्ध अवस्थेमध्येसुद्धा परिणमन झाले पाहिजे. या अनुमानाने सिद्धांमध्ये सुद्धा सदैव उत्पादव्ययध्रौव्य आहे हे सिद्ध होते. परिणमन स्वभाव असल्यामुळेच सिद्ध स्वात्मानन्दाचा भोग घेतात. परिणमन स्वभाव नसता तर सिद्ध अतीन्द्रिय आनंदाचा आस्वाद उपभोगू शकले नसते. सिद्ध भगवंतांना कर्मबंधाचा अभाव आहे म्हणून तेथे विभाव परिणाम होत नाहीत. केवळ शुद्ध स्वभाव परिणमन होते.

सिद्धांमध्ये सुद्धा उत्पादव्ययध्रौव्यपणा आहे याची सिद्धी पुढील गाथेद्वारे तर्काने करतात. प्रत्येक द्रव्यामध्ये प्रतिसमय उत्पादव्ययध्रौव्यत्व आहे तर सिद्धसुद्धा एक द्रव्य आहेत म्हणून त्यांच्यामध्येसुद्धा प्रतिसमय

उत्पादव्ययध्रौव्य आहे हे सिद्ध होते –

उप्पादो य विणासो विज्जदि सव्वस्स अट्ठजादस्स।

पज्जाएण दु केणवि अट्ठो खलु होदि सब्भूदो।। १८।।

अन्वयार्थ – (सव्वस्स अट्ठजादस्स) सर्व पदार्थांचा **(उप्पादो)** कोणत्यातरी पर्यायाने उत्पाद **(विणासो य)** व कोणत्यातरी पर्यायाने विनाश **(विज्जदि)** होतो, **(दु)** परन्तु **(केणवि पज्जाएण)** कोणत्यातरी पर्यायाने **(अट्ठो)** पदार्थ **(खलु)** वास्तविक **(सब्भूदो)** सद्भूत अर्थात ध्रुव **(होदि)** आहे.

जगामध्ये जितक्या म्हणून वस्तू आहेत त्यांचा कोणत्या तरी पर्यायरूपाने उत्पाद होतो, कोणत्या तरी पर्यायरूपाने व्यय (नाश) होतो व कोणत्यातरी पर्यायरूपाने ध्रौव्य असते. अर्थात प्रत्येक पदार्थ उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहे. सिद्धसुद्धा एक जीव नावाचा पदार्थ आहेत म्हणून त्यांच्यामध्ये सुद्धा उत्पादव्ययध्रौव्यत्व विद्यमान आहे.

वस्तूची त्रैरूप्यमयता –

द्रव्याचे लक्षण सत् आहे. सत् म्हणजेच अस्तित्व. प्रत्येक द्रव्य अस्तित्ववान आहे व ते अस्तित्व उत्पाद व्यय ध्रौव्यरूप आहे. हे लक्षण प्रत्येक द्रव्यांमध्ये प्रत्येक समयात असले पाहिजे, अन्यथा द्रव्याचा अभाव होईल. कोणी मनुष्य मरून देव होतो, तेव्हा मनुष्यपर्यायाचा व्यय होतो, त्याचसमयी देवपर्यायाचा उत्पाद होतो व दोन्ही अवस्थेमध्ये जीवत्वरूपाने ध्रौव्य आहे. अर्थात मनुष्यपर्यायामध्येही जीवत्व आहे व देवपर्यायामध्येही जीवत्व आहे.

ज्वारीच्या पिठापासून भाकरी झाली तेथे पीठाचा नाश झाला, त्याच समयात भाकरी उत्पन्न झाली व ज्वारीपणा दोन्ही अवस्थेत आहे. हे स्थूल परिणमन आपण पाहिले. सूक्ष्मरूपाने प्रत्येक समयात उत्पादव्ययध्रौव्य आहे. डब्यामध्ये पीठ ठेवलेले आहे त्याचेसुद्धा प्रत्येक समयात उत्पाद व्यय ध्रौव्यत्व चालू आहे. प्रत्येक समयात पीठाची पूर्व पर्याय नष्ट होते, नवीन पीठपर्याय उत्पन्न होते व प्रत्येक समयात त्यामध्ये पुद्गलपणा कायम आहे. जर पिठामध्ये प्रत्येक समयात उत्पादव्यय नसता तर पिठाची मर्यादा कधी संपलीच नसती व पीठ कधीही खराब झालेच नसते.

सोन्याच्या अंगठ्या मोडून बाजूबंद तयार केले. तेथे पूर्व अंगठी पर्यायाचा नाश झाला, बाजूबंद पर्यायाचा उत्पाद झाला व पिवळेपणा, सुवर्णत्व इत्यादीरूपाने ध्रुवत्व आहे. तसेच सूक्ष्मरूपाने पाहिले तर एका बाजूबंद पर्यायामध्येसुद्धा नित्य परिणमन सुरू आहे. पूर्व बाजूबंदपर्याय नष्ट होते, उत्तर बाजूबंद पर्याय उत्पन्न होते व सुवर्णत्वरूपाने ध्रुवत्व आहे. दहा वर्षांनी बाजूबंद मोडायला जातो तेव्हा यामध्ये झीज झालेली दिसते. यावरून त्यामध्ये प्रतिसमय बदल होत गेला आहे हे लक्षात येते.

प्रत्येक द्रव्य परिणामी आहे. कारण द्रव्यत्व नावाचा सामान्यगुण सर्व द्रव्यांमध्ये व्यापक आहे. द्रव्यत्व गुणामुळे द्रव्य कधीही कूटस्थ न राहता परिणमन करत राहते. या परिणमन स्वभावामुळेच जगामध्ये आपल्या इंद्रियगोचर पदार्थांमध्ये कार्य दिसून येते. सुवर्ण परिणमनशील आहे. म्हणूनच त्याचे कुंडल, बिल्वर, पाटल्या, बाजूबंद, चेन, लफा इत्यादी नाना अलंकार बनू शकतात. दूधापासून दही, ताक, लोणी, तूप, खवा इत्यादी पदार्थ तयार करता येतात. अन्यथा नाना पदार्थांचा आस्वाद घेता आला नसता.

जर बदलण्याची शक्ती पुद्गलामध्ये नसती तर माती, खत, पानी व बीपासून फल, फूल वनस्पती झाली नसती आणि वनस्पतीपासून लाकूड, लाकूडापासून कपाट, टेबल, खुर्ची, पलंग आदी तयार झाले नसते. या जगामध्ये परिणमनशील पदार्थांमुळेच नाना विचित्र दृश्य दिसत आहेत.

या लोकामध्ये मूळ द्रव्य जाती अपेक्षेने सहा आहेत. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल. त्यापैकी धर्म, अधर्म, आकाश व काल या चार द्रव्यांमध्ये सदैव स्वभावरूप शुद्ध परिणमनच होते. अशुद्ध परिणमन होत नाही. जीव व पुद्गलामध्ये स्वभाव व विभावरूप परिणमन होते. संसारी जीवांमध्ये विभावरूप अशुद्ध परिणमन होते व सिद्धांमध्ये स्वभावरूप शुद्ध परिणमन होते.

सिद्धांमध्ये तीन प्रकाराने उत्पादव्ययध्रुवत्व –

सिद्धांमध्ये उत्पादव्ययध्रौव्यत्वाची सिद्धी जयसेनाचार्यांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तीन प्रकारांनी केली आहे.

१) परमात्म्याचा सिद्धपर्यायरूपाने उत्पाद, संसारपर्यायरूपाने विनाश व शुद्धात्मद्रव्यरूपाने ध्रौव्य आहे. हा उत्पादव्ययध्रौव्यत्वाचा प्रथम प्रकार आहे.

कारण समयसार दोन प्रकारचा आहे १) द्रव्य कारण समयसार २) पर्याय कारण समयसार, द्रव्य कारण समयसार अनादी अनन्त आहे. रत्नत्रय परिणत आत्मा पर्याय कारण समयसार आहे. अरिहंत सिद्ध अवस्था कार्य समयसार आहेत. जेव्हा सिद्धपर्याय उत्पन्न झाली तेव्हा चौदाव्या गुणस्थानातील शेवटच्या समयात असणाऱ्या परिपूर्ण रत्नत्रयस्वरूप कारण समयसार पर्यायाचा नाश झाला व सिद्धरूप कार्यसमयसार पर्यायाचा उत्पाद झाला व दोन्ही पर्यायरूपाने परिणत आत्मद्रव्यत्वरूपाने ध्रौव्यत्व आहे. अरिहंतदेव विवक्षावश कारण समयसार व कार्यसमयसार आहेत. अरिहंत अवस्थेत पूर्व बाराव्या गुणस्थानातील अंतिम समयवर्ती कारण समयसार पर्यायाचा नाश झाला व केवलज्ञानादी व्यक्तिरूप कार्यसमयसार पर्यायाचा उत्पाद झाला म्हणून अरिहंत कार्यसमयार आहेत व ते सिद्धरूप कार्यसमयसाराच्या उत्पत्तीला कारण असल्यामुळे कारण समयसार सुद्धा आहेत.

ज्या समयात मोक्ष होतो त्या समयात मोक्षपर्याय प्रकट होते व मोक्षमार्ग पर्याय नष्ट होते. कारण ज्या स्थानी जायचे आहे तेथे पोहोचल्यावर रस्ता संपतो. चौथ्या गुणस्थानापासून चौदाव्या गुणस्थानापर्यंत मोक्षमार्ग आहे. चौदावे गुणस्थान सोडले की त्याला मोक्ष म्हणतात. अशाप्रकारे स्थूलरूपाने सिद्धांमध्ये उत्पादव्ययध्रुवत्व सिद्ध होते.

२) ज्ञेयाच्या अपेक्षेने ज्ञानामध्ये उत्पादव्यय ध्रौव्यत्व-मुक्त आत्म्याचे ज्ञान ज्ञेय पदार्थांच्या आकाररूप होते म्हणून ज्याप्रमाणे ज्ञेयपदार्थ प्रत्येक समयात उत्पादव्ययध्रौव्यरूपाने परिणमतात त्याप्रमाणे ज्ञानसुद्धा जाणण्याच्या अपेक्षेने उत्पादव्ययध्रौव्यत्वरूपाने परिणमते.

प्रत्येक समयवर्ती केवलज्ञान पर्यायामध्ये सर्व द्रव्य, सर्व गुण व सर्व अनादी अनन्त पर्याय प्रत्यक्ष झळकतात. परंतु प्रत्येक समयातील वर्तमानरूपाने सूक्ष्म परिवर्तनसुद्धा प्रत्यक्ष जाणले जाते. जसे नवव्या समयात केवलज्ञानपर्यायामध्ये सर्व द्रव्यांचे नवव्या समयातील पर्याय वर्तमानरूपाने जाणले जातात. दहाव्या समयात सर्व द्रव्यांचे दहाव्या समयातील पर्याय वर्तमानरूपाने व नवव्या समयातील पर्याय भूतरूपाने जाणले जातात. अशाप्रकारे ज्ञेयाच्या अपेक्षेने मुक्त आत्म्यामध्ये उत्पादव्ययध्रौव्यत्व सिद्ध होते.

३) अधिक सूक्ष्मरूपाने पाहिले तर अगुरुलघुगुणामध्ये होणाऱ्या षड्गुणित हानी व वृद्धीमुळे प्रत्येक समयात मुक्त आत्म्यामध्ये उत्पादव्ययध्रौव्यत्व सिद्ध होते. हे वास्तविक स्वाश्रित स्वभाव पर्यायाच्या अपेक्षेने उत्पादादिकांचे कथन आहे.

प्रत्येक वस्तू स्थिर असून परिणमनशील आहे. म्हणून जगामध्ये सुव्यवस्थितपणा आहे. **उत्पादव्ययध्रुवत्व हे वस्तूला मिळालेले एक वरदान आहे, एक देणगी आहे, त्यामुळे वस्तु टिकून आहे.**

शुद्धोपयोगाने प्रसिद्ध स्वयंभू परमात्म्याचे वर्णन चार गाथांद्वारे केले. ते वर्णन केवळ वाचून समाधान मानल्याने कार्यसिद्धी होणार नाही. शास्त्र वाचून तशाप्रकारे श्रद्धान झाले तर आपण वाचू अर्थात दु:खापासून मुक्त होऊ. हीच गोष्ट पुढील गाथेत सांगतात. –

तं सव्वट्ठवरिट्ठं इट्ठं अमरासुरप्पहाणेहिं।
ये सद्दहंति जीवा तेसिं दुक्खाणि खीयंति ।।१९–१।।

अन्वयार्थ– (ये जीवा) जे जीव **(अमरासुरप्पहाणेहिं)** देवेन्द्र व असुरेन्द्रांकडून **(इट्ठं)** अभिमत **(तं सव्वट्ठवरिट्ठं)** सर्व पदार्थांमध्ये श्रेष्ठ अशा त्या परमात्म्याचे **(सद्दहंति)** श्रद्धान करतात. **(तेसिं)** त्यांची **(दुक्खाणि)** सर्व दु:खे **(खीयंति)** नष्ट होतात.

अमृतचन्द्र आचार्यांची या गाथेवर टीका उपलब्ध नाही, परंतु जयसेनाचार्यांची टीका उपलब्ध आहे. सुरेन्द्र व असुरेन्द्राकडून पूजित सर्वोत्कृष्ट परमात्म्याचे जे जीव श्रद्धान करतात ते दु:खमुक्त होतात.

वाचायचे कशासाठी? स्मरणात ठेवण्यासाठी,
स्मरण कशासाठी? चिन्तन करण्यासाठी,
चिन्तन कशासाठी? परीक्षा करण्यासाठी,
परीक्षा कशासाठी? श्रद्धान करण्यासाठी,

म्हणून शास्त्रातील प्रत्येक गोष्ट वाचून स्मरणात ठेवावी व त्याच्या चिन्तनाने परीक्षा करून श्रद्धान करावे तरच स्वाध्यायाचे फळ प्राप्त होते. शास्त्रामध्ये वाचतो की परमात्मा आहे, परंतु खरोखर त्या परमात्म्याचे व्यक्तिरूपाने अस्तित्व आम्ही स्वीकारतो का? भगवंतांना नमस्कार करताना त्यांच्यामध्ये

परमात्मपणा पाहतो का की रूढी म्हणून, नियम म्हणून त्यांना नमस्कार करतो याचे आपणच आपले परीक्षण करावे. जर आमची परमात्म्यावर वीतराग व सर्वज्ञस्वरूपाने श्रद्धा असेल तर सम्यग्दर्शनाचा लाभ झाल्याशिवाय राहणार नाही. भगवंतांचे दर्शन घेताना त्यांच्यातील वीतरागता व सर्वज्ञता दिसली अर्थात प्रतीतीला आली तर ते खरे देवदर्शन. जो त्यांच्यामध्ये देवत्व पाहतो तोच आपल्यामध्येही देवत्व पाहतो.

प्रत्येक जीव परिपूर्ण ज्ञान-दर्शन व परिपूर्ण सुखाची इच्छा करतो. जो ज्याचा अर्थी(इच्छुक) असतो तो ती वस्तू ज्याच्याजवळ आहे, त्याचे श्रद्धान, त्याची उपासना करतो. त्याला आपला आर्दश मानतो. म्हणून ज्यांना परिपूर्ण ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य प्राप्त झाले आहे त्यांचे श्रद्धान व त्यांचीच उपासना केली पाहिजे. जे अल्पज्ञ आहेत व मोही, रागी, द्वेषी असल्यामुळे स्वत:चे दु:ख दूर करण्यास असमर्थ आहेत त्यांचे श्रद्धान व उपासना करून आपल्याला खरे ज्ञान व सुख प्राप्त होणार नाही. गरीब माणसाचा आश्रय घेऊन कोणी श्रीमंत होऊ शकत नाही. रोगी माणसाचा आश्रय घेऊन कोणी निरोगी होऊ शकत नाही, आंधळ्याचा हात पकडून कोणी रस्ता पार करू शकत नाही. त्याचप्रमाणे स्त्री, धन, अलंकारामध्ये आसक्त दु:खी व्यक्तीचा आश्रय घेऊन कोणीही दु:खमुक्त होऊ शकत नाही.

मोक्षमार्गामध्ये सर्वप्रथम खऱ्या देवाचे श्रद्धान होणे आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शक असेल तर योग्य मार्ग मिळतो. म्हणून रागी, द्वेषी, मोही छद्मस्थ देवी-देवतांना देव न मानता वीतराग, सर्वज्ञ परमात्म्यालाच देव मानावे. आचार्य १००% ग्यारंटी देतात की जो सर्वज्ञ परमात्म्याचे श्रद्धान करतो, त्याच्या दु:खाचा नियमाने नाश होतो.

सर्वज्ञ परमात्म्यांना इन्द्रिये नाहीत तर त्यांना ज्ञान व आनन्द कसा काय प्राप्त होतो? असा इन्द्रियज्ञानधारी जीवांना प्रश्न पडतो. कारण आम्ही स्वत:वरून दुसऱ्याची परीक्षा करतो.

एकदा एक हंस विहिरीच्या काठावर बसला होता. विहिरीमध्ये राहणाऱ्या एका बेडकाने त्याला विचारले. 'हे बंधो, आपण कोठे राहता? त्यांने सांगितले,'मानस सरोवरामध्ये'. पुन्हा बेडकाने विचारले, 'मानस सरोवर कोठे आहे? हंसाने सांगितले, 'फार दूर हिमालय पर्वतावर आहे;

त्यांनी पुन्हा विचारले 'मानस सरोवर किती मोठा आहे?' हंस म्हणाला, 'खूप मोठा आहे.' बेडकाने एक पाय पसरून विचारले –'एवढा मोठा.' हंस म्हणाला, 'याहूनही मोठा .' पुन्हा बेडकाने दूसरा पाय पसरून विचारले, 'एवढा मोठा.' हंस म्हणाला, 'नाही, याहूनही मोठा.' पुन्हा तीसरा चौथा पाय पसरून विचारले 'एवढा मोठा.' त्यावर हंस म्हणाला, 'यापेक्षाही मोठा.' तेव्हा बेडूक म्हणाला. 'तर मग तू खोटा आहेस. याहून मोठी दुनियाच नाही. जेवढे माझे शरीर आहे त्याहून मोठी दुनियाच नाही तर तो सरोवर कसा मोठा असेल?'

ज्याची बुद्धी इन्द्रियांमध्ये अडकली आहे त्याला ही कल्पना होऊ शकत नाही की इन्द्रियांशिवायसुद्धा ज्ञान व आनन्द असू शकतो. आम्हाला इन्द्रियांशिवाय ज्ञान झालेले दिसत नाही व इन्द्रियांद्वारे विषयाचा भोग घेतल्याशिवाय सुख प्राप्त होत नाही तर भगवंतांना इन्द्रियांशिवाय ज्ञान व आनन्द कसा काय प्राप्त होणार? कारण त्यांना सर्व इन्द्रियांचा अभाव झाला आहे. या शंकेचे निरसन करण्यासाठी पुढील गाथेमध्ये इन्द्रिय–निरपेक्ष ज्ञान व आनन्दाचे वर्णन करतात–

पक्खीणघादिकम्मो अणंतवरवीरिओ अहियतेजो।
जादो अदिंदिओ सो णाणं सोक्खं च परिणमदि ।।१९–२।।

अन्वयार्थ– (पक्खीणघादिकम्मो) ज्याची घातिकर्मे नष्ट झाली आहेत, **(अदिंदिओ जादो)** जो अतीन्द्रिय झाला आहे, **(अणंतवरवीरिओ)** अनन्त ज्याचे उत्कृष्ट वीर्य आहे आणि **(अहियतेजो)** अधिक ज्याचे तेज (केवलज्ञान व केवलदर्शन) आहे, असा **(सो)** तो स्वयंभू परमात्मा **(णाणं सोक्खं च)** ज्ञान आणि सुखरूप **(परिणमदि)** परिणमतो.

घातिकर्मांचा नाश झाल्यामुळे सर्वज्ञ परमात्मा अतीन्द्रिय होऊन अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंतसुख व अनंत वीर्यरूपाने परिणमतात.

शुद्धोपयोगाच्या सामर्थ्याने घातिकर्मांचा नाश–

कर्मांचा नाश करण्याची एक अनोखी पद्धती आहे. कर्मांचा नाश करण्यासाठी कर्मांमध्ये काही करण्याची गरज नाही. कर्मबंधाचा विचारसुद्धा कर्ममुक्तीचे कारण नाही. ज्याप्रमाणे साखळदंड, बेड्या इत्यादी बंधनाने

जखडलेला पुरुष केवळ बंधनाचा विचार करून बंधनातून सुटत नाही, त्याप्रमाणे केवळ कर्मबंधाचा विचार करणारा जीव मोक्षास प्राप्त होत नाही. ज्याप्रमाणे बंधनाने जखडलेला पुरुष बंधनाचा छेद करूनच बंधनातून सुटतो त्याचप्रमाणे जीव कर्मबंधाचा छेद करूनच मोक्षास प्राप्त होतो. वीतराग निर्विकल्प स्वसंवेदनज्ञानरूपी छन्नीच्या द्वारे बंधाच्या स्वभावाला व आत्म्याच्या स्वभावाला भिन्न करून (जाणून) जो जीव बंधापासून विरक्त होतो व शुद्ध आत्म्याला ग्रहण करतो तो कर्मबंधनापासून सुटतो. म्हणून शुद्ध स्वात्मानुभूतीच कर्मनाशाचा उपाय आहे. स्वत:ला लक्ष्य केले असता कर्म आपोआप निघून जातात व नवीन कर्म येत नाहीत अशी कर्माचा नाश करण्याची अपूर्व रीत आहे.

ज्ञान व आनन्दामध्ये इन्द्रियांची बाधकता–

क्षायोपशमिक ज्ञान दर्शनाचा अभाव झाल्यामुळे परमात्मा अतीन्द्रिय होतो. संसारी जीवांमध्ये जोपर्यंत केवलज्ञान होत नाही तोपर्यंत क्षायोपशमिक मतिज्ञान व श्रुतज्ञान प्रवृत्त होते. परंतु ही ज्ञाने परोक्ष असल्यामुळे इन्द्रिय व मनाच्या सहायतेशिवाय होत नाहीत. त्यामुळे या जीवाला असा भ्रम झाला आहे की इन्द्रियांशिवाय ज्ञान होत नाही. वास्तविक ज्ञान व आनन्द तर आत्म्याचा स्वभाव आहे. उलट इन्द्रिये ज्ञान व आनंदामध्ये साधक नाहीत, बाधक आहेत. कारण इन्द्रियांमुळे ज्ञान व आनन्दाला मर्यादा येतात, पराधीनता येते. ज्याप्रमाणे तुरुंगामध्ये एक कैदी बंधनामध्ये बद्ध आहे. त्याला ज्या खोलीत बांधून ठेवले आहे त्या खोलीच्या बाहेर पडता येत नाही. त्या खोलीला पाच खिडक्या आहेत. त्याला पाहायचे असेल तर तो या खिडकी मधूनच पाहतो. बंधनामध्ये बद्ध नसता तर त्याला सर्व बाजूंनी पाहता आले असते. त्याचप्रमाणे हा आत्मा शरीररूपी तुरुंगात बद्ध आहे. त्याला इन्द्रियरूपी पाच खिडक्या आहेत. आत्मा या पाच इन्द्रियरूपी खिडक्यांतून जाणतो. जर तो या शरीरात बद्ध नसता तर त्याला सर्व आत्मप्रदेशातून जाणण्याचे सामर्थ्य होते; परंतु बंधनामध्ये बद्ध असल्यामुळे इन्द्रियरूपी खिडकीतूनच पाहावे लागते. जेव्हा हा आत्मा, शुद्धोपयोगाच्या सामर्थ्याने घातिकर्मांचा अभाव करतो तेव्हा बंधनातून मुक्त होऊन अतीन्द्रिय होतो. आता त्याला इन्द्रियांच्या साहाय्याची आवश्यकता नाही. इन्द्रिये नष्ट झाली

म्हणून ज्ञान व आनंद नष्ट होत नाही, उलट ज्ञान व आनंदाचा पूर्ण विकास होतो. पूर्वी त्याला शरीरामध्ये कर्माने बद्ध असल्यामुळे इन्द्रियरूपी खिडक्यातूनच पाहण्याची मोकळीक होती. शेष सर्व आत्मप्रदेशावर आवरण होते. आता सर्व आत्मप्रदेश निरावरण झाल्यामुळे सर्व आत्मप्रदेशांतून ज्ञान व आनंद व्यक्त होतो. पूर्वी केवळ स्पर्शनेन्द्रियाच्या माध्यमातून स्पर्श करीत होता, जीभेनेच रस जाणता येत होता, नाकानेच वास घेत होता व डोळ्यानेच पाहू शकत होता. आता सर्व आत्मप्रदेश सर्व इन्द्रियांच्या गुणांनी समृद्ध आहेत अर्थात सर्व आत्मप्रदेशांतून रूप, रस, गंध, स्पर्शाचे ज्ञान होते.

इन्द्रिये ज्ञानविकासामध्ये बाधक आहेत, परंतु हा अज्ञानी जीव बाधकालाच साधक मानून बसला आहे. हा मोठा भ्रम आहे. या भ्रमरूपी रोगावर भेदविज्ञान हेच उत्कृष्ट औषध आहे. भेदविज्ञानाशिवाय व आपल्या अनुपम वैभवाच्या परिचयाशिवाय आम्ही कर्मांचे व इन्द्रियांचे गुण गातो.

ज्याप्रमाणे एका बालकाचे माता-पिता लहानपणीच मरून जातात. वडील मोठे सावकार असतात. त्यांची ५० लाखाची प्रॉपर्टी मुलगा लहान व अपात्र असल्यामुळे सरकार कोर्टात जमा करून घेते. त्याच्या मोबदल्यात सरकार त्याला मासिक खर्चासाठी ५०० रूपये देते. मोठा झाल्यावर मुलगा आपल्या मनात सरकारला धन्यवाद देतो व सर्व लोकांपुढे सरकारचे गीत गातो, सरकार किती चांगले आहे, मला मोफत मासिक ५०० रू. देते. माझ्यावर सरकारचे महान उपकार आहेत इ. तेव्हा आजूबाजूचे लोक त्याला समजावतात -'तुझी ५० लाखाची संपत्ती सरकारजवळ जमा आहे. त्याच्या मोबदल्यात सरकार तुला ५०० रूपये महिन्याला देते, तुझ्यावर काही उपकार करत नाही.' प्रथम तर त्याला विश्वास बसत नाही. कारण मी दरिद्री आहे असे संस्कार दृढ होते. परंतु जेव्हा अनेकांकडून अनेक वेळा त्याला ही गोष्ट ऐकायला मिळते तेव्हा त्याचा विश्वास बसतो. त्याची सरकारावरची श्रद्धा उडून जाते व तो कोर्टात दावा करतो की 'मला माझी मूळ संपत्ती परत मिळावी. मला सरकारचा एक पैसासुद्धा नको.' खटपट करून आपली सर्व संपत्ती मिळवून सुखी होतो. त्याचप्रमाणे या आत्म्याची अनंत ज्ञान व सुखरूपी संपत्ती कर्मरूपी सरकारने याच्या अपात्रतेमुळे आपल्या कब्जामध्ये घेतली आहे व त्याच्या मोबदल्यात याला इन्द्रियज्ञान व इन्द्रियसुखरूपी पोटगी देते.

हा अज्ञानी जीव कर्मरूपी सरकारचे गीत गातो, 'माझ्या महान पुण्यकर्माचा उदय आहे की ज्यामुळे मला अनायास इन्द्रियसुख मिळते, कर्माच्या क्षयोपशमामध्ये मी ज्ञानवान आहे, हुशार आहे.' असे कर्माला सदा धन्यवाद देतो. जेव्हा या आत्म्याला सद्गुरूनी समजावले की, 'हे जीवा, तू अमूल्य अनंत गुणरूपी संपत्तीचा मालक आहेस. हे पुण्यरूपी सरकार, तुला तुझ्या संपत्तीचा विसर पाडते. तुला माहीत आहे का की हे कर्म तुझे अनंतज्ञान व सुख लुटून त्याच्या मोबदल्यात जरासे इन्द्रिय ज्ञान व सुख देते. या पुण्याच्या उदयाने प्राप्त होणारे इन्द्रियसुख व इन्द्रियज्ञान तुझे खरे वैभव नाही. बस, एवढे ज्ञान होताच हा आत्मा कर्मरूपी सरकारवर दावा करतो की आता मला कर्मजनित सुख व ज्ञान नको. मला माझी अनंतज्ञान, अनंतसुख इत्यादी अनंतगुणरूपी संपत्ती परत मिळाली पाहिजे. आता मी माझ्या संपत्तीचा स्वामी होण्यास लायक आहे.'

कर्माच्या उदयाने प्राप्त वस्तू जेव्हा इच्छिणार नाही तेव्हा आत्मा सुखी होणार. कर्मावर दावा असाच असतो की न पुण्य इच्छा व न परमाणूमात्र कोणताही परपदार्थ, आपली संपत्ती आपल्या हातात येईल.

आत्मशक्तीचा विकास –

वास्तविक आत्मा अनंतशक्तियुक्त आहे. विश्वातील सर्व अनंत पदार्थांना युगपत जाणण्याची व पाहण्याची शक्ती आत्म्यामध्ये स्वाभाविकरूपाने आहे. परंतु त्या अनंतशक्तीवर अंतराय कर्माने आपला अधिकार प्रस्थापित केला आहे. त्यामुळे संसार अवस्थेत आत्म्याच्या शक्तीला मर्यादा येतात. अंतराय कर्माचा अभाव झाल्यामुळे स्वयंभू परमात्म्यामध्ये अनंत वीर्य प्रगट झाले आहे. अनन्तज्ञान व अनन्तदर्शनाला धारण करण्याचे सामर्थ्य तेच अनन्त वीर्य होय. अनंत काळापर्यंत अनन्तपदार्थांना जाणले तरी हा आत्मा थकत नाही, खेदखिन्न होत नाही. आपल्या स्वरूपामध्ये स्थिर राहतो. शरीराची शक्ती हे खरे आपले वीर्य नव्हे. शरीरातील शक्ती क्षीण झाली तर आत्मा अशक्त होत नाही. आत्मा जेवढा आत्मसन्मुख होतो तेवढा त्याच्या शक्तीचा विकास होतो. आपल्या द्रव्यगुणपर्यायाला रचण्याचे सामर्थ्य वीर्यत्वशक्ती–मध्येच आहे.

परमात्मा ज्ञान व दर्शन तेजाने प्रतापवंत –

ज्ञानावरण व दर्शनावरणाचा क्षय झाल्यामुळे स्वयंभू आत्मा अनंत ज्ञान व अनंत दर्शनतेजाने संपन्न होतो. अज्ञानी जीव शरीराच्या तेजाला आपले तेज मानतो. त्यामुळे शरीराचे तेज वाढविण्यासाठी नाना उपाय करतो. परंतु शरीराचे तेज व कांती नाशवंत आहे. आत्मिक तेज अविनाशी आहे. इतर कोणत्याही द्रव्यामध्ये न आढळणाऱ्या ज्ञान व दर्शनरूपी तेजाने हा आत्मा विलक्षण आहे. ज्ञानाच्या तेजापुढे हजारो सूर्य व चन्द्रांचे तेज फीके आहे. सूर्य व चन्द्र आपल्या तेजाने मर्यादित क्षेत्रातील पदार्थांना प्रकाशित करतात; परंतु ज्ञानरूपी तेज सर्व लोकातील सर्व पदार्थांना प्रकाशित करते.

ज्यावेळी हा आत्मा वस्तूस्वरूपाच्या परिज्ञानाने तशाप्रकारच्या दृष्टीचा अभ्यास करतो व अविकार स्वभावी निज सहजज्ञानदर्शनात्मक आत्मस्वरूपाचा अनुभव करतो तेव्हा निर्विकार शुद्ध चैतन्य स्वभावाची प्राप्ती होते. निज स्वरूपाच्या अनुभवामध्ये मोहनीय कर्म बाधक आहे. स्वोन्मुख पुरुषार्थाने मोहनीय कर्माचा अभाव झाल्यावर निर्विकार शुद्ध चैतन्य स्वभाव व्यक्त होतो. केवलज्ञानी परमात्मा परिपूर्ण ज्ञानरूप व परिपूर्ण आनंदमय होऊन स्वयं परिणमतात. स्वयंभू परमात्म्यामध्ये इन्द्रियांशिवायच असीम ज्ञान व आनंद प्रवृत्त आहे. कारण **स्वभावाला पराची अपेक्षा असत नाही.**

यावरून हे तात्पर्य ग्रहण करावे की ज्ञान व सुखाच्या विकासासाठी इन्द्रियांची पुष्टी न करता व बाह्य पदार्थांचा संग्रह न करता निज स्वरूपाचा आश्रय घ्यावा. जेवढे आपण परपदार्थापासून पराङ्मुख होऊन स्वरूपसन्मुख होत जाऊ तेवढा ज्ञानाचा व सुखाचा विकास अधिक होत जाईल. उपाय सोपा आहे पण आपण स्वयं त्याचा प्रयोग केला पाहिजे.

सर्वज्ञ परमात्मा इन्द्रियांच्या आश्रयाशिवायच स्वभावाने ज्ञान व आनन्दरूपाने परिणमतात हे मागील गाथेमध्ये स्पष्ट केले. आता या गाथेमध्ये 'अतीन्द्रियपणा असल्यामुळे परमात्म्याला शारीरिक सुखदुःख नाही' हे सांगतात. परमात्मा दोन प्रकारचा आहे. १) सकल परमात्मा व २) निकल परमात्मा. कल म्हणजे शरीर. जे शरीरसहित आहेत ते अरिहंत सकल परमात्मा आहेत व जे शरीररहित झाले ते सिद्ध निकल परमात्मा आहेत. सिद्ध भगवान शरीररहित असल्यामुळे त्यांना शरीराश्रित द्रव्येन्द्रियांचा अभाव आहे. जेथे द्रव्येन्द्रियांचाच अभाव आहे तेथे सुखदुःखाला कारणभूत भावेन्द्रियांचा

सुद्धा अभाव आहे. म्हणून सिद्धांना द्रव्येन्द्रिय, भावेन्द्रिय व शरीर या तिन्हींच्या अभावामध्ये शारीरिक सुखदु:खाचा अभाव आहे.

अरिहंतांना छद्मस्थाप्रमाणे शरीर व शरीराश्रित द्रव्येन्द्रियांचा सद्भाव आहे; परंतु घातिकर्मांचा अभाव झाल्यामुळे क्षायोपशमिक भावेन्द्रिये नाहीत. त्यामुळे त्यांनासुद्धा शारीरिक सुखदु:ख नाही. शरीर व द्रव्येन्द्रिये जड अचेतन आहेत त्यांना सुखदु:ख होत नाही. भावेन्द्रियेच आपापल्या विषयांना ग्रहण करताना त्यामध्ये इष्टानिष्ट कल्पना करून सुखदु:खाचे वेदन करतात. भावेन्द्रियांचा अभाव झाल्यामुळे शुद्धात्म्याला सुखदु:ख होत नाही हे पुढील गाथेत सांगतात. –

सोक्खं वा पुण दुक्खं केवलणाणिस्स णत्थि देहगदं।
जह्मा अदिंदियत्तं जादं तह्मा दु तं णेयं ।।२०।।

अन्वयार्थ – (केवलणाणिस्स) केवलज्ञानीला **(देहगदं)** शरीरासंबंधी **(सोक्खं वा पुण दुक्खं)** सुख अथवा दु:ख **(णत्थि)** होत नाही. **(जह्मा)** ज्याअर्थी त्यांना **(अदिंदियत्तं)** अतीन्द्रियपणा **(जादं)** उत्पन्न झाला आहे **(तह्मा)** त्याअर्थी **(तं णेयं)** तसे जाणावे अर्थात त्यांच्याठिकाणी शारीरिक सुख:दुखाचा अभाव जाणावा.

केवलींना इंद्रियांचा अभाव आहे म्हणून त्यांना क्षुधादी जनित शारीरिक दु:ख व भोजनादिकाने उत्पन्न शारीरिक सुख नाही.

केवली परमात्म्यांना ज्ञान व आनंद स्वाभाविक, अतीन्द्रिय व परिपूर्ण –

या देहदेवालयामध्ये विराजमान चैतन्यप्रभूला अंतरंगामध्ये या शरीरापासून भिन्न जाणले असता असा अनुभव होतो की, मी शरीरापासून भिन्न चैतन्य स्वभाववान आहे. मी स्वयं ज्ञान व अनाकुल सुखस्वरूप आहे. माझे ज्ञान, माझे सुख बाह्य पदार्थापासून जसजसा उपयोग हटत जातो तसतशी अनाकुलता वाढत जाते. तसेच ज्ञान व सुखाचा विकास होतो. केवलीभगवान सर्व परपदार्थापासून पूर्ण निवृत्त आहेत व स्वस्वरूपामध्ये लीन आहेत. सर्व विश्वाला जाणत असतांनाही त्याच्याशी तन्मय न होता, निजानन्द–रसलीन आहेत. म्हणूनच त्यांना स्वाभाविक ज्ञान व आनंद आहे.

छद्मस्थ जीव इन्द्रियांच्या माध्यमातून परपदार्थांना जाणून इष्टानिष्ट

विकल्प करतो त्यामुळे सुखी, दु:खी होता. केवलींना इन्द्रियांचा अभाव झाला आहे म्हणून त्यांचे ज्ञान व सुख अतीन्द्रिय आहे. केवलींच्या ठिकाणी शरीर, इन्द्रिये व द्रव्यकर्म राहिले नाहीत. केवळ एक चैतन्यच राहिले आहे. तेथे ज्ञान व सुखाचे शुद्ध तरंग स्वत: उत्पन्न होतात. त्या ज्ञान व सुख तरंगांना उत्पन्न करणारे कोणतेही निमित्त कारण नाही. कारण ती त्यांची स्वाभाविक अवस्था आहे. स्वाभाविक अवस्थेने जर अन्य निमित्ताची अपेक्षा ठेवली तर ती स्वाभाविक राहत नाही.

कुसंगतीचा दृष्टपरिणाम –

ज्याअर्थी शुद्ध आत्म्याला इन्द्रियग्राम नाही त्याअर्थी इन्द्रियजनित सुखदु:खसुद्धा नाही. ज्याप्रमाणे अग्नीने लोखंडाची संगती केली तर त्या अग्नीला घनाचे घाव सोसावे लागतात त्याप्रमाणे जीवाने दुष्ट इन्द्रियांची संगती केली तर त्याला दु:खाचे घाव सोसावे लागतात. केवळ लोखंडाला घनाने कितीही बडविले तरी लोखंड पसरत नाही. जेव्हा लोहार त्या लोखंडाला अग्नीमध्ये तापवून घनाने बडवितो तेव्हा ते पातळ होऊन पसरते. लोखंडाबरोबर अग्नीलाही घनाचा मार बसतो. जर अग्नी लोखंडाची संगती करीत नाही तर त्याला घनाचा मार बसत नाही. त्याचप्रमाणे जर आत्मा इन्द्रियांची संगती करीत नाही तर त्याला चतुर्गतीचे दु:ख सहन करावे लागत नाही. हा अज्ञानी जीव जन्मापासून मरेपर्यंत प्रत्येक भवात इन्द्रियांच्या संगतीतच राहतो. याला इन्द्रियांच्या माध्यमातून विषय जाणल्याशिवाय व त्यामध्ये चांगले वाईट मानल्याशिवाय चैन पडत नाही.

लहान मूलसुद्धा तोंडामध्ये चविष्ट पदार्थ घातले तर मचमच करीत खाते व आनंद मानते. रडत असता मधुर संगीत ऐकले तर शांत होते. मऊ गादीवर झोपविल्यावर शांत सुखाने झोपते. सुंदर चित्र किंवा खेळणे पाहिले की ते ओढण्यासाठी पुढे धावते. सुगंधित अत्तर वगैरे मारले की सुखी होते. याउलट कडू औषध पाजले तर थुंकून बाहेर काढते. कोणी मोठ्याने रागावले की रडते, कठोर जमिनीवर घातले तर झोपत नाही. आक्राळविक्राळ रूप पाहिले तर त्यापासून दूर पळते. यावरून लक्षात येते की या जीवाची इन्द्रियांशी मैत्री जन्मजातच आहे आयुष्यभर इन्द्रियांची संगती करून पुढील भवातही तेच संस्कार घेऊन जातो, म्हणून इन्द्रिये या जीवाचे अनादी कालीन

मित्र आहेत. हे मित्रच आपले घातक आहेत यासंबंधीच या जीवाला अजून अज्ञान आहे.

सहजाजन्द वर्णी म्हणतात – इन्द्रिये कपटी मित्र आहेत. ज्याप्रमाणे कपटी मित्र खोट्या फायद्याची गोष्ट सांगून खूप मोठे नुकसान करतो त्याप्रमाणे इन्द्रिये थोड्याशा सुखाचे लालच दाखवून जीवाच्या अनन्त ज्ञान व सुखाचा घात करून खूप मोठे नुकसान करतात. परंतु अज्ञानामुळे या जीवाला ते कळत नाही. श्रीगुरूच्या उपदेशाद्वारे जीवाला इन्द्रियांची करतूती लक्षात येते तेव्हा त्याचा विवेक जागृत होतो व तो या इन्द्रियरूपी कपटी मित्रांच्या चंगुलामध्ये फसत नाही. तो आता इन्द्रियांशी तक्रार करतो, 'तुम्ही मला काय दास बनविता? मी तुमचा दास होणार नाही. तुम्ही माझ्यापासून सर्वथा भिन्न आहात. तुमचा व माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.' अशाप्रकारे इन्द्रियापासून भिन्नता जाणून ज्ञानी जीव इन्द्रियांवर विजय प्राप्त करून भावेन्द्रियांचा अर्थात इन्द्रियजनित ज्ञानाचा अभाव करतो. त्या शुद्ध आत्म्याला इष्टविषयजनित भोजनादी शारीरिक सुख व अनिष्टविषयजनित क्षुधादी दु:ख होऊ शकत नाही.

केवलिभुक्ती निषेध –

स्वत:ला जैन म्हणविणारे काही मतवादी केवलींना कवलाहार मानतात. जयसेनाचार्यांनी आपल्या तात्पर्यवृत्तीमध्ये सयुक्तिक आगम सापेक्ष त्याचे निराकरण केले आहे त्याचाच सार पुढे देत आहोत –

पूर्वपक्ष – केवलज्ञानींना भोजन आहे. कारण त्यांना आमच्याप्रमाणेच औदारिक शरीर आहे व असाता कर्माचा उदय आहे. ज्याप्रमाणे आम्हाला असाता कर्माच्या उदयात भूक लागते, त्यामुळे आम्ही भोजन करतो त्याप्रमाणे केवली भगवंतांना असाता कर्माचा उदय असल्यामुळे भूक लागते त्यामुळे ते भोजन करतात.

उत्तरपक्ष – वरील पूर्वपक्षाचे निराकरण पाच प्रकाराने करतात.

१) केवली भगवंतांचे आमच्यासारखे औदारिक शरीर नाही तर परम औदारिक शरीर आहे. त्या परम औदारिक शरीराचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. –

शुद्धस्फटिकसंकाशं तेजो मूर्तिमयं वपुः।
जायते क्षीणदोषस्य सप्तधातुविवर्जितम्।।

दोषरहित केवलज्ञानीचे शरीर शुद्धस्फटिक मण्याप्रमाणे परम तेजस्वी, सात धातूंनी रहित असते. त्या परम औदारिक शरीरासाठी अन्नपाण्याची गरज नाही.

२) केवलींना जरी असाता कर्माचा उदय असला तरी तो सहकारी कारणभूत मोहाचा अभाव झाल्यामुळे भूक उत्पन्न करण्यास समर्थ नाही. ज्याप्रमाणे साळी आदीचे बी पाणीरूप सहकारी कारण असेल तरच अंकुरादी कार्य उत्पन्न करू शकते त्याप्रमाणे असाता वेदनीय कर्म मोहनीय कर्मरूप सहकारी कारण असेल तरच भूक इत्यादी कार्य उत्पन्न करू शकते. त्याचप्रमाणे आगमवचन आहे की 'मोहस्स बलेण घाददे जीवं' वेदनीय कर्म मोहाच्या बलानेच जीवाचा घात करते. जर मोहाच्या अभावामध्ये सुद्धा असाता वेदनीय कर्म भूक, तहान इत्यादी परीषहांना उत्पन्न करते असे मानले तर वेदनीय कर्म केवलींना वध, रोग इत्यादी परीषहांना सुद्धा उत्पन्न करेल; परंतु तसे नाही, कारण 'केवलींना भोजन व उपसर्गाचा अभाव आहे' असे शास्त्राचे वचन आहे.

३) जर केवलींना भूकेची बाधा आहे असे मानले तर अन्य अनेक दूषणे येतात.

अ) भूकेमुळे त्यांची शक्ती क्षीण झाल्यामुळे त्यांना अनन्त वीर्य संभवणार नाही.

ब) भूकेने दुःखित असणाऱ्याला अनन्तसुख सुद्धा मानता येणार नाही.

क) जिह्वेन्द्रियाद्वारे जाणणेरूप मतिज्ञानाने परिणत झालेल्या जीवाला केवलज्ञान सुद्धा होणार नाही.

४) केवलींना असाता वेदनीयाच्या उदयापेक्षा साता वेदनीयाचा उदय अनन्तपट आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे साखरेच्या ढीगामध्ये निंबाचा कण आपला असर दाखवू शकत नाही त्याप्रमाणे अनन्तपट साता वेदनीयाच्या उदयामध्ये असाता वेदनीयाचा असर व्यक्त होत नाही.

५) ज्याप्रमाणे प्रमत्तसंयतादी अखंड ब्रह्मचारी तपोधनांना वेदाचा उदय

असतानासुद्धा मोहाचा मन्द उदय असल्यामुळे स्त्री परीषहाची बाधा होत नाही. तसेच नव ग्रैवेयक आदिपासूनच्या अहमिन्द्र देवांना स्त्री सेवनासंबंधी बाधा होत नाही, त्याचप्रमाणे श्री अरिहंत केवलींना असाता वेदनीयाचा उदय असताना सुद्धा संपूर्ण मोहाचा अभाव झाल्यामुळे त्यांना क्षुधा बाधा होत नाही.

पूर्वपक्ष – मिथ्यादृष्टीपासून सयोगकेवलीपर्यंत तेरा गुणस्थानवर्ती जीव आहारक आहेत असे आहारक मार्गणेच्या वर्णनामध्ये सांगितले आहे त्यामुळे केवलींना आहार मानावा लागेल ?

उत्तरपक्ष – असे मानणे योग्य नाही. कारण आहार सहा प्रकारचा आहे – तो याप्रमाणे –

णोकम्मकम्महारो कवलाहारो य लेप्पमाहारो।
ओजमणो वि य कमसो आहारो छव्विहो णेयो।।

आहार सहा प्रकारचा आहे –

१) नोकर्माचा आहार २) कर्माचा आहार ३) कवलाहार (घासरूप आहार) ४) लेप आहार ५) ओज आहार ६) मानसिक आहार.

ज्यामुळे शरीराची स्थिती राहते अशा परमाणूंना ग्रहण करणे आहार होय.

i) आहार वर्गणेच्या परमाणूंचा शरीरामध्ये प्रवेश होणे तो नोकर्म आहार आहे. ज्या परमाणूंच्या समूहाने देव व नारकींचे वैक्रियिक शरीर, मनुष्य व तिर्यंचांचे औदारिक शरीर व मुनींचे आहारक शरीर बनते त्यास आहारवर्गणा म्हणतात.

ii) कार्मण वर्गणेच्या परमाणूंना ग्रहण करणे तो कर्म-आहार आहे. याच वर्गणांपासून कार्मण शरीर बनते.

iii) अन्न, पाणी आदी पदार्थांना घासरूपाने तोंडाने चावून खाणे व पिणे यास कवलाहार म्हणतात. मनुष्यांना व द्वीन्द्रियापासून पंचेन्द्रियापर्यंतच्या तिर्यंचांना कवलाहार असतो.

iv) स्पर्शाने शरीराला पुष्टिकारक पदार्थांना ग्रहण करणे तो लेप आहार होय. हा आहार पृथ्वी, जल, अग्नी, वायू व वनस्पतिकायिक एकेन्द्रिय

जीवांना असतो.

v) माता अंडे देते. त्या अंड्यांना आपल्या अंगाची ऊब देऊन मोठे करते तो ओज आहार आहे. अंडज प्राण्यांचा ओजाहार असतो.

vi) चारी प्रकारच्या देवांना मानसिक आहार असतो. यांचे वैक्रियिक शरीर सप्त धातुरहित असते म्हणून यांना कवलाहार नाही. ते मांस किंवा अन्न खात नाहीत, देवांना जेव्हा भूकेची बाधा होते तेव्हा त्यांच्या कंठातून अमृत झरते. त्यानेच त्यांची भूकबाधा मिटते.

नारकींना कर्मांचा उदय भोगणे हाच आहार आहे.

या सहा प्रकारच्या आहारांपैकी केवलींना नोकर्माचा आहार आहे त्या अपेक्षेने त्यांना आहारकत्व सांगितले आहे. कवलाहाराच्या अपेक्षेने आहारकपणा नाही. सात धातूंनी रहित परम औदारिक शरीररूप नोकर्माहाराला योग्य आहारवर्गणांचे पुद्गलपरमाणू लाभान्तराय कर्माचा पूर्ण क्षय झाल्यामुळे केवलींच्या शरीरामध्ये प्रत्येक समयात येतात. ते परमाणू अत्यंत सूक्ष्म, सुरस, सुगन्धरूप असतात. अन्य मनुष्यांमध्ये अशाप्रकारचे परमाणू येत नाहीत. त्या परमाणूंवर केवलींचे परम औदारिक शरीर कवलाहाराशिवाय काही कमी एक पूर्व कोटी वर्षेपर्यंत टिकून राहते. हाच केवलींचा आहार आहे हे नवकेवललब्धीच्या व्याख्यानाप्रसंगी सांगितले आहे. या नोकर्म आहाराच्या अपेक्षेने केवलींना आहारकपणा आहे.

पूर्वपक्ष – आहारकपणा व अनाहारकपणा नोकर्मआहाराच्या अपेक्षेने आहे. कवलाहाराच्या अपेक्षेने नाही ही आपली कल्पना आहे, जर असा सिद्धांत आहे तर तो कोठे सांगितला आहे?

उत्तरपक्ष – उमास्वामी आचार्यांनी तत्त्वार्थसूत्रामध्ये 'एकं द्वौ त्रीन्वानाहारकः' हे सूत्र सांगितले आहे. या सूत्राचा भावार्थ असा आहे की – तीन शरीर व सहा पर्याप्तींना योग्य पुद्गलपिण्डाला ग्रहण करणे यास नोकर्म-आहार म्हणतात. असा नोकर्म-आहार विग्रहगतीमध्ये, एक, दोन किंवा जास्तीत जास्त तीन समयापर्यंत नसतो. तेथे कर्माचा आहार असला तरी नोकर्माचा आहार नाही म्हणून तेथे जीव अनाहारक म्हटला जातो. यावरून जाणले जाते की आगमामध्ये नोकर्म-आहाराच्या अपेक्षेने आहारक अनाहारकपणा सांगितला आहे.

जर हठाग्रहाने कवलाहाराच्या अपेक्षेने आहारक-अनाहारकपणा आहे असे मानाल तर घासरूप भोजनकाळ सोडून सदैव अनाहारकपणा प्राप्त होईल. तीन समय अनाहारक असतो हा नियम राहणार नाही.

पूर्वपक्ष – केवलींना कवलाहार आहे, कारण त्यांच्यामध्ये मनुष्यपणा आहे, वर्तमान मनुष्याप्रमाणे. ज्याप्रमाणे वर्तमान मनुष्य कवलाहार करताना दिसतो त्याप्रमाणे केवली सुद्धा मनुष्य असल्यामुळे कवलाहार करतात ?

उत्तरपक्ष – जर वर्तमान मनुष्याप्रमाणे सर्व गोष्टी केवलींना मानल्या तर वर्तमान मनुष्याप्रमाणे पूर्वकालीन पुरुषांना सर्वज्ञपणा संभवणार नाही. राम रावण आदी पुरुषांमध्ये विशेष सामर्थ्य मानता येणार नाही, परंतु तसे नाही. विशेष हे की प्रमत्तसंयत गुणस्थानापर्यंत आहारसंज्ञा आहे असे आगमवचन असल्यामुळे सातव्यादी गुणस्थानवर्ती तपोधनांना सप्त धातुरहित परम औदारिक शरीराचा अभाव असताना सुद्धा आहार नाही तर केवलींना कसा असणार ?

प्रमत्तसंयत गुणस्थानवर्ती मुनीसुद्धा ज्ञान, संयम व ध्यानाच्या सिद्धीसाठी आहार घेतात शरीराच्या ममत्वाने आहार घेत नाहीत.

तेच सांगितले आहे –

कायस्थित्यर्थमाहार: कायो ज्ञानार्थमिष्यते।

ज्ञानं कर्मविनाशाय तन्नाशे परमं सुखम्।।

मुनींचा आहार शरीर टिकण्यासाठी असतो. शरीर ज्ञानाकरिता टिकवितात. कर्माच्या नाशाकरिता ज्ञानाचे सेवन करतात. कर्माचा नाश झाल्यावर परम सुख होते. म्हणून सुखासाठी कर्माचा नाश, कर्माच्या नाशासाठी ज्ञान, ज्ञानासाठी शरीर व शरीरासाठी आहार कारण आहे.

ण बलाउसाहणट्ठं ण सरीरस्स य चयट्ठ तेजट्ठं।

णाणट्ठं संजमट्ठं झाणट्ठं चेव भुंजंति।।

मुनी शरीराचे बल, आयू, वृद्धी व तेजासाठी भोजन करीत नाहीत; परंतु ज्ञान, संयम व ध्यानाकरिता भोजन करतात.

केवली भगवंतांना ज्ञान, संयम, ध्यान आदी गुण स्वभावानेच आहेत, आहाराच्या बलाने नाही. त्यांना संयमादीकरिता आहाराची आवश्यकता

नाही. कारण कर्मांचे आवरण नसल्यामुळे संयमादी गुण प्रगट आहेत. जर म्हणाल की शरीराच्या ममत्वाने आहार करतात तर ते केवली छद्मस्थ मुनींपेक्षासुद्धा हीन होतील.

जर तुम्ही म्हणाल की त्यांच्या अतिशयाच्या विशेषतेमुळे प्रगटरूपाने भोजन नाही, गुप्त भोजन आहे तर परम औदारिक शरीर असल्यामुळे भोजनच नाही हाच अतिशय का मानत नाही. कारण गुप्त भोजनामध्ये अनेक दोष येतात १) मायाचार होतो. २) दीनतेची वृत्ती होते. ३) पिंडशुद्धीमध्ये सांगितलेले पुष्कळ दोष लागतात. ते दोष दुसऱ्या ग्रंथांमधून अथवा तर्कशास्त्रातून जाणून घ्यावेत. हा अध्यात्म ग्रंथ असल्यामुळे येथे त्याचा विस्तार केला नाही.

भावार्थ हा आहे की वस्तूचे स्वरूप असेच आहे हे जाणून घ्यावे. त्यामध्ये हट्ट करू नये. दुराग्रह किंवा हट्ट केल्यामुळे रागद्वेषाची उत्पत्ती होते व त्यामुळे निर्विकार चिदानंदमय एक स्वभावरूप परमात्म्याच्या भावनेचा विघात होतो.

गाथेचे तात्पर्य हे आहे की केवलींचा उपयोग पाच इंन्द्रिये व मनाद्वारे परिणमन करीत नाही. त्यांना परोक्षज्ञानाचा अभाव होऊन प्रत्यक्ष ज्ञान व्यक्त झाले आहे म्हणून त्यांना इन्द्रियांद्वारे पदार्थाचा भोग नाही व इन्द्रियसुखाची पीडा नाही, विषयांची इच्छा नाही व इन्द्रियसुख नाही. केवली मन्द सुगन्ध पवन, समवसरणादी लक्ष्मी इत्यादी कोणत्याही पदार्थांचा भोग करीत नाहीत, म्हणून या पदार्थांद्वारे केवलींना सुख नाही. तसेच शरीराच्या अवस्थेच्या अपेक्षेने कधी कोणतेही दु:ख होऊ शकत नाही, न त्यांना भूक तहानेची वेदना आहे, न रोगाची आकुलता आहे, न कधी थकवा येतो, न खेद होतो. शरीरासंबंधी सुखदु:खाचे वेदन केवलींना नाही म्हणून ते परम सुखी, परमसंतोषी आहेत. अशी केवलींची अवस्था मस्त मस्त आहे हे जाणून परमज्ञानमय परमानंदस्वरूप केवली अवस्थेला उपादेय मानून त्याच्या प्राप्तीकरिता सतत प्रयत्न करावा अर्थात शुद्धोपयोगाची भावना करावी.

प्रवचनसार परमागमातील प्रथम अध्यायाचे नाव ज्ञानतत्त्वप्रज्ञापन आहे अर्थात या अध्यायामध्ये ज्ञानतत्त्वाची प्रसिद्धी केली आहे. प्रथम चौदा गाथांमध्ये प्रवचनसारची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यानंतर ६ गाथांमध्ये

(तात्पर्यवृत्तीनुसार ७ गाथांमध्ये) सामान्यरूपाने सर्वज्ञसिद्धी प्रस्तुत आहे. त्याचा सार पुढीलप्रमाणे– शुद्धोपयोगाने शुद्धात्मस्वभावरूप केवलज्ञानाची प्राप्ती होते. ती शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती अन्य कारकांहून निरपेक्ष होत असल्यामुळे पूर्णत: स्वाधीन आहे, किंचितमात्रदेखील पराधीन नाही. शुद्धोपयोगामध्ये लीन आत्मा स्वयंच कर्ताकर्मादी सहा कारकरूप होऊन केवलज्ञान प्राप्त करतो म्हणून तो स्वयंभू आहे. शुद्धात्मस्वभाव एकदा प्राप्त झाला की पुन्हा कधीही नाश पावत नाही म्हणून शुद्धात्मस्वभावाची प्राप्ती अविनाशी आहे. अविनाशी असूनही मुक्तात्म्यामध्ये उत्पाद, व्यय, ध्रौव्य अवश्य होतात, कारण प्रत्येक द्रव्य उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. शुद्धात्म्याला ज्ञान व सुखरूप परिणमित होण्यामध्ये इन्द्रियादिक परनिमित्तांची आवश्यकता नाही. कारण ज्ञान व सुख आत्म्याचा स्वभावच आहे. स्वभावाला पराची अपेक्षा असत नाही. म्हणून इन्द्रियाशिवायच आत्मा ज्ञान व आनंदरूप परिणमतो. अतीन्द्रियपणामुळेच केवलींना शारीरिक सुखदु:ख होत नाही. अशाप्रकारे सामान्यरूपाने सर्वज्ञाची सिद्धी केली आहे. सर्वज्ञस्वभावाची सिद्धी म्हणजेच जीवन स्वातन्त्र्याची कला आहे. आत्मा एक स्वतंत्र पदार्थ असतानाही कर्मवश, देहवश व इंद्रियवश होऊन परतन्त्ररूप जीवन जगतो. जेव्हा त्याला आपल्या स्वाधीन सर्वज्ञस्वभावाचे ज्ञान होते, श्रद्धान होते तेव्हा तो स्वतंत्र जीवन जगण्यास प्रारंभ करतो. पुन:पुन्हा स्वभावलीनतेच्या अभ्यासाने पर्यायामध्ये सर्वज्ञस्वभाव व्यक्त करून पूर्णत: स्वतंत्र जीवनाचा उपभोग घेतो.

आता यानंतर ३२ गाथांद्वारे (तात्पर्यवृत्तीनुसार ३३ गाथांद्वारे) याच ज्ञान स्वभावाचे विस्ताराने वर्णन करतात. त्यापैकी प्रथम गाथेमध्ये 'अतीन्द्रिय ज्ञानरूपाने परिणत झाल्यामुळे केवलींच्या ज्ञानामध्ये सर्व पदार्थ प्रत्यक्ष प्रतिभासित होतात.' असे सांगतात–

परिणमदो खलु णाणं पच्चक्खा सव्वदव्वपज्जाया।
सो णेव ते विजाणदि उग्गहपुव्वाहिं किरियाहिं ।।२१।।

अन्वयार्थ– (खलु) वास्तविक **(णाणं परिणमदो)** ज्ञानरूपाने परिणमित केवलींना **(सव्वदव्वपज्जाया)** सर्व द्रव्य व त्यांचे सर्व पर्याय **(पच्चक्खा)** प्रत्यक्ष आहेत. **(सो)** ते केवली भगवान **(ते)** त्या सर्व

द्रव्यपर्यायांना **(उग्गहपुव्वाहीं किरियाहिं)** अवग्रह पूर्वक क्रियांद्वारे **(णेव विजाणदि)** जाणत नाहीत.

गाथेचा सार हा आहे की ज्याअर्थी केवली भगवान इंद्रियांचे अवलंबन घेऊन अवग्रह, ईहा, अवायपूर्वक क्रमाने जाणत नाहीत. आपल्या अनादिअनंत अहेतुक ज्ञानस्वभावाचा आश्रय घेऊन अतीन्द्रियज्ञानरूपाने सहज परिणमतात त्याअर्थी त्यांना सर्व द्रव्य व त्यांचे सर्व पर्याय एकाच समयात प्रत्यक्ष प्रतिभासित होतात.

इंद्रियांची निरालंबता ज्ञानाच्या सहज प्रसारामध्ये साधक–

प्रत्येक जीवामध्ये सर्व द्रव्य, क्षेत्र, काल व भावांना एकाच वेळेस जाणण्याची शक्ती आहे अर्थात प्रत्येक जीव सर्वज्ञस्वभावी आहे. सर्व जीवांमध्ये सर्व द्रव्यांना जाणण्याची इच्छा उत्पन्न होते हे सर्वज्ञत्वशक्तीचे द्योतक आहे. परंतु त्यांच्या या सहज ज्ञानस्वभावाच्या प्रसारामध्ये आवरण कर्म व इन्द्रिये अडथळा करतात.

ज्ञानावरण कर्माचा उदय असल्यामुळे याची सर्व आत्मप्रदेशांतून सर्वांना जाणण्याची शक्ती कुंठित होते. ज्याप्रमाणे आंधळा व्यक्ती डोळ्याने दिसत नसल्यामुळे काठीचा आधार घेतो. त्याप्रमाणे हा जीव संपूर्ण आत्मप्रदेशांतून ज्ञान होण्याचा अभाव झाल्यामुळे इन्द्रियांचा आधार घेऊन जाणतो. त्यामुळे या जीवाला असा भ्रम झाला आहे की मी इन्दियांद्वारेच जाणतो. इन्द्रिये नसतील तर मी जाणू शकणार नाही. म्हणून इन्द्रियांना टिकविण्याचा प्रयत्न करतो. इन्द्रियांचे अवलंबन सोडायला तयार होत नाही. इन्द्रियांच्या सान्निध्यात राहून त्यांना आपले स्वरूपच मानून बसला आहे.

ज्याप्रमाणे एकदा एका राजाला ज्योतिषाने सांगितले की कृत्तिका नक्षत्रामध्ये जन्मलेल्या मुलामुळे आपला घात होणार आहे. राजाला खूप राग आला. राजाने आज्ञा केली 'कृत्तिका' नक्षत्रामध्ये जन्मलेल्या सर्व मुलांना कैद करा व त्यांना अंधार कोठडीत टाका. राजाची आज्ञा म्हटल्यावर त्यापुढे कोणीच काही बोलू शकत नाही. असे का? असे विचारण्याचे साहस कोणीही करू शकत नव्हते. पूर्वी राजाची आज्ञा अनुल्लंघनीय मानली जायची. सर्व मुलांना पकडून अंधार कोठडीत ठेवण्यात आले. त्यांच्या हातापायात लोखंडाच्या बेड्या घालण्यात आल्या. हळूहळू ती मुले अंधार कोठडीतच

मोठी झाली. एकदा त्यातील एका माणसाने थोडे पाठीमागे वळून झरोक्यातून पाहिले तर त्याला प्रकाश दिसला. त्याने सर्वांना सांगितले. पहा, थोडे वळून पहा. तिकडे प्रकाश दिसतो आहे. सर्वांनी त्याला वेड्यात काढले, तू काय सांगतोस, आम्हास पटत नाही. ही अंधार कोठडीच आपले जग आहे. याहून भिन्न जग असूच शकत नाही. हातापायातील बेड्या म्हणजे त्यांना आपले दागिने वाटायचे. ते परिधान करून स्वत:ला भाग्यशाली मानायचे. बंधन हेच त्यांचे जीवन झाले होते. तशीच अवस्था आपली झाली आहे. इन्द्रियरूपी बंधन हेच आमचे जीवन बनले आहे. इन्द्रिये नष्ट झाली तर माझाच नाश होईल अशी भीती वाटते. कारण हा जीव आपल्या परनिरपेक्ष स्वतंत्र ज्ञान स्वभावाला विसरला आहे.

वास्तविक हा जीव जसजसे इन्द्रियांचे अवलंबन सोडून अतीन्द्रिय स्वसंवेदन ज्ञानाद्वारे जाणण्याचा अभ्यास करतो तसतसे आवरणकर्म दूर होते व ज्ञानाचा सहज विकास होतो. केवली भगवंतांनी पूर्णपणे इन्द्रियांचा आश्रय सोडून ज्ञानस्वभावाचा आश्रय घेतला आहे म्हणून त्यांच्या ज्ञानाचा संपूर्ण विकास झाला आहे

इन्द्रियाधीनता ज्ञानाच्या क्रमिकतेचे कारण–

निश्चयाने सर्वद्रव्यांना एकाचवेळी स्पष्ट जाणण्याचा जीवाचा स्वभाव आहे; परंतु इन्द्रियांचे साहाय्य घेऊन जाणतो त्यामुळे त्याच्या ज्ञानामध्ये क्रम येतो. एकानंतर एका विषयाला क्रमाने ग्रहण करतो. एका वस्तूलासुद्धा क्रमाने जाणतो. एकावेळी एका इन्द्रियाच्या विषयाला जाणतो. एका इन्द्रियाच्यासुद्धा कोणत्यातरी एका विषयाला जाणतो. एका विषयालासुद्धा अवग्रह–ईहा–अवाय धारणा या क्रमाने जाणतो. जसे डोळ्याने समोर पाहिले की पांढरा वर्ण दिसला हे प्रथम अवग्रह ज्ञान झाले. त्यानंतर जिज्ञासा झाली की हा पांढरा बदकांचा समूह आहे की पताका आहेत. हे दुसरे ईहाज्ञान उत्पन्न झाले. त्यानंतर पंख फडफडणे इत्यादी विशेष लक्षणाद्वारे निर्णय केला की 'हा बदकांचा समूह आहे. पताका नाहीत'. हे तिसरे अवायज्ञान झाले. त्यानंतर कालांतरामध्येसुद्धा स्मरणज्ञानाला कारणभूत धारणाज्ञान उत्पन्न होते अर्थात अवायज्ञानामध्ये ज्याचा निर्णय केला त्याला बुद्धीमध्ये दृढ धारण करतो. अशाप्रकारे इन्द्रिये आमच्या ज्ञानामध्ये क्रम उत्पन्न करतात. परंतु ज्यांना

इन्द्रियांचा व आवरण कर्माचा अभाव झाला आहे अशा परमात्म्यामध्ये एकाच समयात सर्व द्रव्यपर्यायांना प्रत्यक्ष करणारे अक्रमिक केवलज्ञान प्रकट होते. क्रमाने जाणणाऱ्या छद्मस्थ जीवांना अन्य-अन्य पदार्थांना जाणण्याची इच्छा उत्पन्न होते आणि जोपर्यंत ती इच्छा पूर्ण होत नाही तोपर्यंत आकुलता होते. सर्व पदार्थांना एकाच वेळेस जाणल्यामुळे केवली भगवंतांना कोणत्याही पदार्थांना जाणण्याची इच्छा, चिंता किंवा आकुलता होत नाही.

कल्याणपरंपरेचे मूळ स्रोत अनादिअनंत निज शुद्धात्मा –

अमृतचन्द्र आचार्यांनी टीकेमध्ये केवलज्ञानाच्या प्राप्तीचा उपायसुद्धा सांगितला आहे. तो म्हणजे अनादिअनंत अहेतुक असाधारण ज्ञानस्वभावाला ग्रहण करणे. ज्याला सुरवात नाही व शेवट नाही, जो कोणत्याही कारणाने उत्पन्न झालेला नाही व जो सर्वाहून विलक्षण आहे असा ज्ञानस्वभाव प्रत्येक जीवाजवळ आहे अर्थात प्रत्येकजण अनादिअनंत अहेतुक ज्ञानस्वभावी आहे. या ज्ञानस्वभावाचा आश्रय घेतला तर निर्मल पर्याय प्रकट होते. हा अनादिअनंत ज्ञानस्वभावी आत्मा कसा ग्रहण होतो? याला हाताने ग्रहण करता येत नाही. कोणत्याही बाह्य पूजादी क्रियांद्वारे ग्रहण होत नाही, कायक्लेशादी बाह्य तपाद्वारे ग्रहण होत नाही, रागादी विभाव भावांद्वारे ग्रहण होत नाही, इंद्रियज्ञानाद्वारे ग्रहण करता येत नाही. तर एकमात्र अतीन्द्रिय प्रत्यक्ष ज्ञानाद्वारेच ग्रहण करता येते. 'हा मी अनादी अनंत अहेतुक ज्ञानस्वभावी आत्मा आहे' असे स्वानुभव प्रत्यक्षाने जाणणे म्हणजेच ग्रहण करणे होय.

हा अनादी अनंत कारण परमात्मा अत्यंत उदार आहे. ज्याप्रमाणे धनार्थी पुरुष उदार राजाचा आश्रय घेतो. त्याची भक्तिभावाने सेवा शुश्रूषा करतो, त्याची उपासना करतो तर राजा त्याच्यावर खूष होऊन त्याला यथायोग्य पारितोषिक देतो, वरदान देतो, त्याच्या अत्यधिक सेवेने खूष होऊन राज्यसुद्धा प्रदान करतो. त्याप्रमाणे जो आत्म सुखार्थी पुरुष या जीवराजाची सेवा करतो अर्थात त्याचा ध्यानामध्ये आश्रय घेतो त्याला जीवराजा सर्वप्रथम सम्यग्दर्शनरूप पारितोषिक प्रदान करतो. हे पारितोषिक प्राप्त करून जीव अत्यंत संतुष्ट होऊन अत्यानंदाचा अनुभव करतो व अशी पारितोषिके प्राप्त करण्यासाठी वारंवार जीवराजाची उपासना करतो तेव्हा जीवराजा त्याला

देशसंयम रूपी वरदान देतो. या वरदानामुळे परमतृप्त होऊन हा जीव पुन्हा जीवराजाशी एकरूप तन्मय होऊन उपासना करतो तेव्हा जीवराजा त्याला संकलसंयम रूपी युवराज पदावर अभिषिक्त करतो. या संकलसंयमरूपी युवराज पदावर आरूढ होऊन तो निरंतर जीवराजाच्या सान्निध्यात राहतो. एक क्षणही त्याच्यापासून भिन्न न होता त्याचेच अनुसरण करतो तर जीवराजा त्याला यथाख्यात चारित्ररूपी राज्य देऊन स्वतंत्र राजा बनवतो. यथाख्यात चारित्ररूपी राज्याच्या सिंहासनावर विराजमान होऊनही हा जीवराजाचे आधिपत्य स्वीकारतो. त्यालाच शरण जातो तर त्याला केवलज्ञानरूपी (अनंतचतुष्टयस्वरूपी) साम्राज्य देऊन सर्वस्व अर्पण करतो.

अनंतचतुष्टयस्वरूप साम्राज्य प्राप्त झाल्यावर मुक्तिवधू सहर्ष त्याच्या कंठात वरमाळा घालते व हा मुक्तिवधूबरोबर क्रीडा करीत अनंतकाळपर्यंत निरंतर अनंत सुखाचा भोग घेतो. म्हणून **अनादी अनन्त अहेतुक ज्ञानस्वभावाचे अवलंबनच सर्व कल्याणाचे मूळ आहे.**

हा परम पारिणामिक भाव एकच अपूर्व शिक्षक आहे, गुरु आहे, देव आहे, जो आम्हाला सम्यग्दर्शनापासून ते सम्यक्चारित्रापर्यंत व अत्यंत शुद्ध पर्यायापर्यन्त घेऊन जातो. या निज ज्ञानस्वभावाचीच चर्चा करणे, त्याला जाणणे, त्याचेच श्रद्धान करणे, त्याची भावना करणे, ध्यान करणे, अनुभवन करणे आमचे कर्तव्य आहे. यामध्ये बिल्कुल परिश्रम नाहीत, प्रत्युत अपूर्व आराम आहे, विश्राम आहे. एक वेळ सर्व विषय-कषायापासून दूर होऊन आपल्यामध्ये प्रवेश करून तरी पहा, किती अपूर्व आनंद येतो. एक वेळ सहज सुखामृताचा स्वाद चाखून तरी पाहा, यामध्ये किती गोडी आहे.

निज चैतन्य स्वभाव हेच आपले राहण्याचे स्थान आहे. आपले शाश्वत पद आहे. याला जाणणे हेच आपले संरक्षण आहे. जगातील कोणताही अन्य पदार्थ आपले रक्षण करू शकत नाही. कोट्यवधी संपत्ती, पुत्र, पिता, स्त्री, मित्र हे कोणीही रक्षक नाहीत, सुखाचे कारण नाहीत. माझ्या अनुपम सहज सुखाचे कारण निज चैतन्यप्रभूचे दर्शनच आहे.

प्रभूंच्या ज्ञानामध्ये सर्व विश्वाचे युगपत समाक्रमण–

संपूर्ण आवरणकर्माचा क्षय होता क्षणीच केवली भगवान केवलज्ञान-उपयोगरूप होऊन परिणमतात. क्षायिकज्ञान होताच क्षायोपशमिक चारही ज्ञाने

गायब होतात. वास्तविक ज्ञान एकच आहे. आवरणाच्या तरतमतेच्या अपेक्षेने मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान व मन:पर्ययज्ञान असे ज्ञानामध्ये भेद पडतात. जेव्हा आवरणाचा पूर्ण पडदा बाजूला होतो तेव्हा ज्ञानाचे भेदसुद्धा दूर होतात. जसा आत्म्याचा स्वभाव होता तसा ज्ञानस्वभाव प्रकट होतो. ज्यावेळी क्षीणमोह नामक बाराव्या गुणस्थानामध्ये अंतर्मुहूर्त स्थित राहून हा जीव आत्मानुभव करतो तेव्हा आत्मानुभवरूप द्वितीय शुक्लध्यानाच्या बलाने सर्व ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय रूपी मेघपटल दूर होऊन ज्ञानसूर्य प्रकट होतो, त्यावेळी सर्व चराचर लोक हातावर ठेवलेल्या आवळ्याप्रमाणे स्पष्ट प्रकाशमान होतो.

सम्+ आक्रमण=समाक्रमण. केवलींच्या ज्ञानामध्ये जगातील सर्व पदार्थांनी एकाच वेळेस सम् अर्थात विनयाने आक्रमण केले आहे. अर्थात ते सर्वच्या सर्व केवलींच्या ज्ञानामध्ये प्रतिबिंबित झाले आहेत. (जाणले गेले आहेत). तरी सुद्धा त्यांनी ज्ञानामध्ये गोंधळ केला नाही. हाच 'सम्' शब्दाचा भाव आहे. ज्ञातासुद्धा आपल्या अस्तित्वाने सुरक्षित आहे व सर्व पदार्थसुद्धा स्वत:मध्ये सुरक्षित आहेत. ज्ञान ज्ञेयरूप (पदार्थरूप) न होताच पदार्थांना प्रकाशित करते व ज्ञेय ज्ञानरूप न होताच ज्ञानामध्ये ज्ञात होतात. केवलींच्या ज्ञानामध्ये तिन्ही लोकातील पदार्थांचे द्रव्य, संपूर्ण क्षेत्र, भूत-वर्तमान-भविष्यकालीन पर्याय, संपूर्ण भावसुद्धा झळकत आहेत. जणू अलोकसहित त्रिलोकातील सर्व पदार्थांनी भगवंतांच्या ज्ञानामध्ये आपल्या द्रव्य, क्षेत्र, काल व भावसहित एकाच वेळेस आक्रमण केले आहे. पणं ही काही लढाई नाही, हे प्रभूंचे प्रभुत्व आहे, वैभव आहे.

द्रव्यदृष्टीने केवलज्ञान देहाकार असंख्यात आत्मप्रदेशामध्येच विराजमान आहे. परंतु भावदृष्टीने सर्वव्यापक आहे. ते ज्ञान फक्त लोकामध्येच व्यापक आहे असे नाही. अलोकामध्येसुद्धा व्यापक आहे. केवळ वर्तमान पर्यायामध्येच हे ज्ञान व्यापक नाही तर याची व्यापकता अतीत काळाच्या सर्व अनंत पर्यायांमध्ये व भविष्यकालीन सर्व अनंत पर्यायांमध्ये आहे. कारण जे सत् आहे त्याला ज्ञान जाणतेच. भलेही ते सत् वर्तमानरूप असेल, भूतरूप असेल किंवा भविष्यरूप असेल, असे आहे अद्भुत महिमाशाली केवलज्ञान.

ही अद्‌भुत सहज महिमा प्राप्त करण्याचा उपाय काय आहे? धैर्य ठेवा. जगातील पदार्थांना समजण्याकरिता उतावीळ होऊ नका. स्वत:ला समजून घ्या व माझ्यापासून शरीरादी सर्व पदार्थ भिन्न आहेत हे जाणा. या स्वपर भेदविज्ञानामध्ये सर्व जगाचे प्रयोजनभूत ज्ञान सामावले आहे. प्रत्येक पदार्थाचे निरीक्षण करण्यासाठी उतावीळ होऊ नये. धैर्य धरावे. धैर्याचे फळ गोड असते. कोणत्याही परपदार्थाला जाणण्याची इच्छा न करता, परपदार्थाचा संबंध वाढवण्याची इच्छा न करता, कोणालाही प्रसन्न करण्याची इच्छा न करता, केवळ आपल्या टंकोत्कीर्ण ज्ञायक स्वभावी भगवान आत्म्याला प्रसन्न करावे. या खंड ज्ञानरूप उपयोगामध्ये अखंड ज्ञानस्वभावी आत्म्याला विराजमान करून निरंतर शुद्धात्म भावना भावावी. स्वत:ला सहज विकसित करण्याकरिता सहज ज्ञानस्वभावामध्ये अपनत्व स्थापित करून त्यातच तल्लीन व्हावे. हाच महिमावंत केवलज्ञानप्राप्तीचा उपाय आहे.

सर्वच जण म्हणतात- धर्म करा, धर्म करा, धर्मामुळेच सुख मिळते. परंतु धर्म म्हणजे नेमके काय करायचे हेच या अज्ञानी जीवाला लक्षात येत नाही. कुणाच्या तरी उपदेशाने किंवा देखादेखी बाह्य क्रिया करून मी धर्म केला असे समजतो. पण त्याला धर्माचे फळ सुखशांती मिळत नाही. धर्म ही बाहेरून दिसणारी वस्तू नाही. तो तर आपला स्वभाव आहे. तो स्वत:ला स्वत:द्वारे, स्वत:मध्ये स्वत:पासूनच प्राप्त होतो. रागद्वेषादी भाव करून सुद्धा धर्म प्राप्त होत नाही. धर्म आहे निर्विकार शुद्ध ज्ञाता द्रष्टारूप अंतरंग परिणमन. प्रथम चैतन्यभावाचे लक्ष्य करणे धर्माची सुरवात आहे. चैतन्यभावरूपच राहणे धर्माची पूर्णता आहे. भगवंतांच्या मूर्तिसमोर त्यांची पूजा करून, त्यांच्या गुणांचे स्मरण करूनसुद्धा जर आम्ही अनादी अनन्त निज चैतन्यप्रभूचे दर्शन केले नाही तर आम्ही तोट्यात राहू. पूजादी बाह्य क्रियेचे अवलंबन घेऊन निश्चयस्वरूपाची दृष्टी ठेवण्याचा अभ्यास करावा. हाच अद्‌भुत महिमावंत केवलज्ञान प्राप्त करण्याचा सहज उपाय आहे.

केवली भगवंतांना अतीन्द्रिय ज्ञान असल्यामुळे सर्व पदार्थ प्रत्यक्ष आहेत ही गोष्ट विधिरूपाने पूर्व गाथेमध्ये सांगितली. आता या गाथेमध्ये तीच गोष्ट निषेधरूपाने सांगतात की केवलींना अतीन्द्रिय ज्ञान असल्यामुळे काहीही परोक्ष नाही. कोणतीही गोष्ट विधी (अस्ति) व निषेध (नास्ति) दोन्ही पद्धतीने

सांगितली असता दृढ होते. जसे आपण मुलांना म्हणतो, शांत बसा, दंगा करू नका. अभ्यास करा, गप्पा मारू नका. खरे बोला, खोटे बोलू नका. 'मी एकटा आहे. माझे कोणी नाही.' इत्यादी. दोन्हीं वाक्याचा अर्थ एकच असला तरी ही कथनशैली आहे. त्याचप्रमाणे येथेसुद्धा सांगतात की केवलींना सर्व प्रत्यक्ष आहे, काहीही परोक्ष नाही. दोन्हीचा अर्थ एकच आहे –

णत्थि परोक्खं किंचि वि समंत सव्वक्खगुणसमिद्धस्स।
अक्खातीदस्स सदा सयमेव हि णाणजादस्स।।२२।।

अन्वयार्थ– (सदा अक्खातीदस्स) सदैव इन्द्रियातीत **(समंत सव्वक्खगुण–समिद्धस्स)** सर्व आत्मप्रदेशांमध्ये सर्व इन्द्रियगुणांनी समृद्ध, **(सयमेव हि णाणजादस्स)** स्वयमेव ज्ञानरूप झालेल्या केवलींना **(किंचि वि)** काहीही **(परोक्खं)** परोक्ष **(णत्थि)** नाही.

इन्द्रियातीत स्वयं ज्ञानरूप झालेल्या केवली प्रभूंना कोणताही पदार्थ परोक्ष नाही हे या गाथेचे तात्पर्य आहे. या गाथेमध्ये केवलींची तीन विशेषणे महत्त्वपूर्ण आहेत– १) सदा इन्द्रियातीत २)सर्व इन्द्रियगुणांनी परिपूर्ण ३) स्वयमेव ज्ञानरूप.

सदा इन्द्रियातीत–

केवली भगवंतांना संपूर्ण आवरण कर्माचा क्षय झाल्यामुळे ते सांसारिक ज्ञानाच्या उत्पत्तीला निमित्तभूत असणाऱ्या इन्द्रियांच्या अतीत झाले आहेत. त्यामुळे त्यांना सर्व पदार्थ युगपत प्रत्यक्ष होतात. इन्द्रिये आपापल्या परिमित विषयांनाच ग्रहण करतात. इन्द्रिये ज्ञानाची एक प्रकारे आपत्तीच आहेत या इन्द्रियरूप आपत्तीने मुक्त अतीन्द्रिय ज्ञान ज्यांना प्रकट झाले, त्यांना काहीही परोक्ष नाही. इन्द्रियज्ञानामध्येच सर्व बंधने आहेत. ज्याप्रमाणे एक व्यक्ती एके दिवशी ४–५ गावांना जाणार होता, परंतु विशिष्ट अधिकाऱ्याने आज्ञा केली की तुम्ही एका दिवसात एकच गावाला जावा व या पाच प्रतिष्ठित लोकांच्या बरोबरच जाऊ शकता. पहा, त्याला आपले काम करण्यामध्ये किती पराधीनता आली. त्याच्या स्वतंत्रपणे काम करण्याच्या सामर्थ्यामध्ये प्रतिबंध झाला. त्याचप्रमाणे हा आत्मासुद्धा एकावेळी अनेक पदार्थांना स्वभावत: जाणणारा आहे. परंतु कर्मरूपी अधिकाऱ्याने त्याला आज्ञा केली की तू

एकावेळी एकाच विषयाला जाणू शकतोस व अंतरंग-बहिरंग अनेक प्रकारच्या साधन सामग्रींना बरोबर घेऊन जाणू शकतोस. पहा, सर्वज्ञ प्रभूला किती बंधनांनी जखडले आहे. त्याच्या स्वतंत्र स्वभावावर हा आघात आहे. तीन लोक व तीन काळातील सर्व पदार्थांना युगपत जाणण्याचा याचा स्वभाव; परंतु इन्द्रियांच्या बंधनामुळे एकावेळी एकाच इन्द्रियाने जाणतो. त्यामध्ये सुद्धा एका इन्द्रियाच्या एका विषयालाच जाणतो. काही वेळा असा भ्रम होतो की आम्ही पाचही इन्द्रियांनी एकाचवेळी जाणत आहोत. उदाहरणार्थ कडक पूरी खातांना सर्व इन्द्रिये एकाचवेळी ज्ञान करताना प्रतिभासित होतात. स्पर्शनेन्द्रियाने पुरीचा कडकपणा जाणिवेत येतो. त्याचवेळी जीभेने त्याचा स्वादसुद्धा घेत आहे. त्याचवेळी नाकाने पुरीचा वासपण येत आहे. डोळ्याने पुरी दिसतेसुद्धा व कानाने त्याचा कुरकुर आवाजसुद्धा येत आहे. यद्यपि हे सर्व एकावेळी होते असे वाटते, परंतु हा भ्रम आहे. इन्द्रियांचा विषय (उपयोग) इतक्या लवकर क्रमाने बदलत आहे की त्याचा क्रम आपल्या ज्ञानाच्या पकडीत येत नाही. पाचही इन्द्रियांच्या विषयांचे ज्ञान क्रमानेच होते. इन्द्रिय विषयविकाराच्या स्वादाने आमची स्वतंत्रता लुटली गेली आहे. त्रिलोकाधिपती असताना भिकारी बनलो आहोत. परंतु ज्यांनी कर्मांशी लढाई करून आपली स्वतंत्रता हस्तगत केली तो भगवान आत्मा इन्द्रियातीत झाला. त्याच्या उपयोगामध्ये या सर्व विपत्ती समाप्त झाल्या.

सर्व आत्मप्रदेशांमध्ये इन्द्रियगुणांनी समृद्ध-

इन्द्रियांच्या जे अतीत झाले त्यांचे जाणणे बंद झाले नाही. उलट इन्द्रियाधीन अवस्थेमध्ये जे जाणत होते त्याहून अनन्तपट जाणतात. इन्द्रिये तर मूर्तिक पुद्गलमय आहेत. त्यांचे गुणसुद्धा मूर्तिक आहेत. अमूर्तिक चैतन्यमय केवली भगवान इन्द्रियातीत असताना इन्द्रियगुणांनी परिपूर्ण कसे असतील अशी शंका सहजच उत्पन्न होते. याचे समाधान असे आहे की येथे इन्द्रियगुण या शब्दाचा अर्थ इन्द्रियांच्या विषयाचे ज्ञान असा आहे.

इन्द्रियाचा गुण स्पर्शादिक एक-एक विषयाला जाणणे आहे. स्पर्शनेन्द्रिय स्पर्शगुणालाच जाणते. रस, गंध, वर्णाला जाणत नाही. रसनेन्द्रिय (जीभ) एका रसालाच जाणते, इतर विषयांना जाणत नाही. अशाप्रकारे एक

एक इंद्रिय एक एक विषयालाच जाणण्यामध्ये बाह्यनिमित्त आहे; परंतु केवली भगवान इन्द्रियांच्या निमित्ताशिवाय संपूर्ण आत्मप्रदेशातून सर्व विषयांना जाणतात. केवलज्ञानींच्या आत्म्यामध्ये सर्व ज्ञानावरणीय कर्माचा नाश झाल्यामुळे अशी शक्ती उत्पन्न होते की आत्म्याच्या असंख्यात प्रदेशांपैकी प्रत्येक प्रदेशामध्ये सर्वच इन्द्रियांच्या विषयांना एकाचवेळी जाणण्याचे सामर्थ्य प्रगट झाले आहे. म्हणून केवली भगवान सर्व आत्मप्रदेशामध्ये इन्द्रियगुणांनी परिपूर्ण आहेत असे म्हटले आहे.

सर्वाला जाणत असतानाही केवलींना तो अनुभव नाही जो इन्द्रियांच्या भोगामध्ये अज्ञानी जीवाला होतो. केवली भगवान सर्व इन्द्रिय विषयांना जाणताना विषयजनित सुख दु:खाचा अनुभव करीत नाहीत. निर्विकल्परूपाने सर्वांना प्रत्यक्ष जाणतात

छद्मस्थ जीवाला इन्द्रियरूपी खिडक्या सोडून इतर जाणण्याचे दरवाजे बंद असतात. त्यामुळे इतर आत्मप्रदेशातून जाणण्याचे कार्य होत नाही. इन्द्रियविशिष्ट आत्मप्रदेशातून ज्ञान प्रगट होते. केवली भगवंतांना सर्व दरवाजे खुले झाले आहेत. त्यामुळे सर्वच आत्मप्रदेशांतून सर्वांना जाणण्याचे कार्य होते.

ज्याप्रमाणे एका अपराधी मनुष्याला तुरुंगामध्ये एका खोलीत बंदिस्त ठेवल्यावर तो बाहेरच्या काही पदार्थांना खिडकीतूनच पाहू शकतो. सर्व बाजूंनी सर्व पदार्थांना पाहू शकत नाही. जेव्हा तो तुरुंगातून सुटतो तेव्हा बाहेर पडून सर्व बाजूंनी सर्व पदार्थांना पाहू शकतो. त्याप्रमाणे छद्मस्थ जीव कर्मरूपी तुरुंगामध्ये बद्ध असताना सर्व आत्मप्रदेशातून सर्व पदार्थांना जाणू शकत नाही. इन्द्रियरूपी खिडकीतून काहीच पदार्थांना जाणू शकतो. जेव्हा तो कर्मापासून मुक्त होतो तेव्हा सर्व आत्मप्रदेशातून तीन लोक व तीन काळातील सर्व पर्यायांना जाणू शकतो. केवलज्ञानाचे सामर्थ्य अपरिमित आहे.

केवलींची स्वयं ज्ञानमयता –

जीवाला कोणी केवलज्ञानाची शक्ती भेट म्हणून देत नाही, न हा आत्मा कोण्या अन्य पदार्थापासून या ज्ञानाची शक्ती प्राप्त करतो. केवलज्ञान आत्म्याचा स्वभावच आहे. हजार शास्त्र वाचून केवलज्ञान उत्पन्न होते असे

नाही किंवा संपूर्ण श्रुताची आराधना करून केवलज्ञान उत्पन्न होते असे नाही. गुरु प्रसादरूपाने केवलज्ञान देतात असे नाही तर हे केवलज्ञान आत्म्यामधून आत्म्यामध्येच प्रकट होते. आवरण दूर झाल्यावर आपल्याद्वारेच स्वयं प्रकाशित होते.

आत्मा स्वयं स्वत:द्वारे स्वत:पासून स्वत:मध्ये स्वत:ला जाणून केवलज्ञानरूप परिणमतो. केवली भगवान स्वयं केवलज्ञानरूप झालेले आहेत. म्हणून केवलज्ञान पराधीन नाही, स्वाधीन आहे.

ज्याप्रमाणे आंब्याची कोय स्वयं आंबारूप परिणमते. कच्चा आंबा पिकल्यावर त्यामध्ये स्वयं गोडी उत्पन्न होते. त्यामध्ये कोणी गोडी उत्पन्न करीत नाही. आंबा स्वयं गोडरूप परिणमतो त्याप्रमाणे केवलज्ञानाचे बीज ज्यामध्ये आहे असा आत्मा स्वयं केवलज्ञानरूप परिणमतो

केवलज्ञानामध्ये संपूर्ण ज्ञेय सदाकाळ प्रत्यक्ष आहेत. कारण ज्ञान स्वच्छ आहे. स्वभावामध्ये नेहमी परिणमन होत राहते. आरसा पेटीत ठेवला तरी त्यामध्ये जे पदार्थ समोर असतील ते झळकणारच व पेटीतून बाहेर काढला तर जितके पदार्थ त्याच्यासमोर असतील ते सर्व एकदम झळकणार याचप्रमाणे ज्ञानामध्ये सुद्धा आहे. ज्ञानावर आवरण असले तरी हे ज्ञान काही पदार्थांना जाणतेच. जेव्हा निरावरण होते तेव्हा तेथे संपूर्ण द्रव्य-क्षेत्र-काल-भावरूप विश्व जाणले जाते. जगातील कोणताही पदार्थ कोठेही कधीही परोक्ष रहात नाही. जो पदार्थ ज्ञानामध्ये आला नाही त्याचे अस्तित्वच नाही अर्थात तो असत् आहे. कसे आहे ज्ञानाचे ऐश्वर्य? जणू असे सांगत आहे की जो या ज्ञानाच्या दरबारामध्ये येणार नाही, त्याची सत्ता राहणार नाही. ज्याप्रमाणे जो राजदरबारामध्ये येणार नाही त्याचे घरदार सर्व नष्ट-भ्रष्ट केले जाणार असा राजाचा हुकूम आहे. त्याप्रमाणे येथे सुद्धा स्वाभाविक हुकुम आहे की जो सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये येणार नाही त्याची सत्ता रहाणार नाही. ज्यांना आपली सत्ता टिकवायची असेल त्यांनी ज्ञानदरबारात पोहचावे.

केवलींचे वैभव दाखवून केवलींची स्तुती करणे हे या कथनाचे प्रयोजन नाही तर आचार्य आपल्याला प्रोत्साहन देत आहेत की तुझ्यामध्ये अशाप्रकारे वैभव प्रकट करण्याचे सामर्थ्य आहे, तू पुरुषार्थ कर. ज्याप्रमाणे पिता आपल्या मुलासमोर शेजारच्या हुशार मुलाची स्तुती करतो. बघ तो किती अभ्यास

करतो, त्याचा पहिला नंबर आला. त्याला किती बक्षिसे मिळाली. पित्याचे प्रयोजन शेजारच्या मुलाची स्तुती करणे नाही. आपला मुलगा सुद्धा त्याच्यासारखा हुशार व्हावा, अभ्यास करून त्याने पहिला नंबर मिळवावा म्हणून त्याला प्रोत्साहित करणे हे त्यांचे प्रयोजन आहे. त्याप्रमाणे आचार्य आमच्यासमोर केवलींची स्तुती करून त्यांच्यासमान बनण्यासाठी आम्हाला प्रोत्साहित करीत आहेत. केवलींना जे वैभव प्रकट झाले आहे, ते शुद्ध आत्म्याचेच वैभव आहे. मी सुद्धा शुद्ध आत्मा आहे. माझ्यामध्ये सुद्धा हे वैभव प्राप्त करण्याचे सामर्थ्य आहे. तेथे पुरुषार्थ आवश्यक आहे. अशी अपूर्व शक्ती शुद्धोपयोगाच्याद्वारेच प्राप्त होते. म्हणून आत्मार्थी जीवांनी मोह-रागद्वेषाचा त्याग करून एक मात्र निज आत्म्याला जाणून त्यामध्ये रमण्याचा प्रयत्न करावा.

आता आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता ज्ञानमुखाने आत्म्याचे वर्णन करतात. ज्ञानाद्वारे आत्म्याला ज्ञानरूपाने जाणले असता आत्म्याचे वास्तविक स्वरूप जाणिवेत येते. ज्ञानाच्या दृष्टीने आत्म्याला पाहिल्यावर निर्विकल्पतेचा मार्ग मिळतो. अन्य गुणांच्याद्वारे नाही. जेथे ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय एकरूप होतात तेथेच निर्विकल्प ध्यान संभवते. ज्ञान हेच जाणण्याचे साधकतम साधन आहे. ज्ञानाचा अनुभव हाच आत्म्याचा अनुभव आहे. अन्य गुण ज्ञानाद्वारेच जाणले जातात. म्हणून आत्म्यामध्ये अनन्त गुण असताना सुद्धा शास्त्रामध्ये ज्ञानाचे वर्णन अधिक केले आहे. आत्मा ज्ञानप्रमाण आहे व ज्ञान सर्वगत आहे हे आता सिद्ध करतात.-

आदा णाणपमाणं, णाणं णेयप्पमाणमुद्दिट्ठं।
णेयं लोयालोयं तह्मा णाणं तु सव्वगयं।।२३।।

अन्वयार्थ- (आदा) आत्मा **(णाणपमाणं)** ज्ञानप्रमाण आहे, **(णाणं)** ज्ञान **(णेयप्पमाणं)** ज्ञेयप्रमाण **(उद्दिट्ठं)** सांगितले आहे. **(णेयं लोयालोयं)** ज्ञेय लोक व अलोक आहे **(तह्मा)** म्हणून **(णाणं तु)** ज्ञान **(सव्वगयं)** सर्वगत आहे.

द्रव्याची समगुणपर्यायता-

आत्मा ज्ञानप्रमाण आहे अर्थात ज्ञानाहून आत्मा कमी जास्त नाही.

म्हणून जेवढे ज्ञान आहे तेवढा आत्मा आहे. द्रव्याची व्याख्या करताना सांगितले आहे की 'समगुणपर्यायं द्रव्यं भवति' अर्थात द्रव्य आपल्या गुण व पर्यायासमान असते. जितके गुण आहेत व जितके पर्याय आहेत त्या सर्वांचा समूह द्रव्य आहे. गुण व गुणी एक क्षेत्रावग्राही असतात. तसेच प्रत्येक गुण आपल्या आधारभूत द्रव्यामध्ये सर्वत्र व्यापक असतो. ज्याप्रमाणे गोडी संपूर्ण साखरेमध्ये व्यापून आहे. पांढरेपणा साखरेमध्ये व्यापून आहे. त्याप्रमाणे ज्ञान संपूर्ण आत्मप्रदेशांमध्ये व्यापून आहे. दर्शन, सुख, वीर्य सर्व आत्मप्रदेशांमध्ये व्यापून आहेत. जेवढे प्रदेश द्रव्याचे असतात तेवढेच प्रदेश गुणांचे असतात. असे असून सुद्धा प्रत्येक गुण स्वतंत्ररूपाने आपापले कार्य करतो. गुण व गुणीचा नित्य तादात्म्य संबंध आहे. ते कधीही वेगळे होत नाहीत. यद्यपि अनन्तगुण द्रव्यामध्ये एकाच वेळेस आहेत; परंतु ज्यावेळी ज्या गुणरूपाने त्याला पहातो त्यावेळी संपूर्ण द्रव्य त्यारूपच प्रतिभासित होते. जसे दुसऱ्या माणसाला आंबा खाताना कोणी विचारले, आंबा कसा आहे? तो म्हणतो, गोड आहे. आंब्यामध्ये स्पर्श, रस, गंध, रूप चारही गुण आहेत; परंतु ज्यावेळी रसगुणाच्या मुख्यतेने त्याला जाणतो तेव्हा पूर्ण आंबा गोड प्रतिभासित होतो. रूपगुणाच्या मुख्यतेने पाहिले तेव्हा आंबा पिवळा जाणला जातो. गंधगुणाच्या मुख्यतेने जाणतो तर आंबा सुगंधी वाटतो. त्याचप्रमाणे आत्मा अनंत गुणमय आहे. येथे आत्मा ज्ञानगुणाच्या दृष्टीने पाहिला जात आहे म्हणून आत्मा ज्ञानप्रमाण प्रतिभासित होतो.

यद्यपि आत्मा अन्य गुणांच्या मुख्यतेने अन्यरूपसुद्धा भासित होतो. आत्म्यामध्ये राहणाऱ्या अन्य कोणत्याही गुणाच्या मुख्यतेने जाणले तर तो आत्मा केवळ त्या गुणमयच जाणला जातो. जसे सुखरूपाने जाणले तर आत्मा केवळ सुखरूपच झळकतो, परंतु ज्ञानामध्ये आत्म्याचे सर्व गुण प्रतिबिंबित होतात. ज्याप्रमाणे ज्ञानामध्ये विश्व प्रतिबिंबित होते त्याचप्रमाणे ज्ञानामध्ये आत्म्याच्या अनंतगुणांचे प्रतिबिंब आहे. ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणल्यावर सर्व गुणमय आत्मा जाणला जातो. म्हणून ज्ञानगुणाला जाणण्याचा उपदेश आहे. ज्ञानगुणाला सोडून आत्म्यामध्ये राहणारे अन्य गुण अचेतन आहेत. ते स्वत:ला व पराला जाणण्यासाठी समर्थ नाहीत, म्हणून ते दीन होऊन ज्ञानाला प्रार्थना करीत आहेत, हे ज्ञान, तू आम्हाला जाण,

प्रकाशित कर, आम्हाला सुद्धा अनुभवात घे. ज्ञानराजाला सर्व गुण निवेदन करतात की, हे राजन, तू आमच्याकडे लक्ष दे. तू जर आम्हाला जाणले नाहीस तर आमची सत्ता असून नसल्यासारखी होईल. ज्ञान स्वयं स्वत:ला ज्ञानस्वरूपाने ज्ञानामध्ये अनुभव करते आणि अनन्त गुणसुद्धा ज्ञानामध्येच अनुभवात येतात. ज्ञानाची ही विशेषता, हा विस्तार आहे, म्हणून आत्म्याला जाणण्यासाठी ज्ञानस्वरूपाची प्रधानता आहे. ज्याप्रमाणे अग्नीमध्ये अन्य गुण विद्यमान असतानाही उष्णगुणाची मुख्यता आहे म्हणून, अभेदनयाने अग्नीला उष्ण, दहन अशी संज्ञा आहे त्याप्रमाणे आत्म्यामध्ये ज्ञानगुणाची मुख्यता आहे म्हणून अभेदनयाने आत्म्याला ज्ञान असे नाव आहे. कुंदकुंदाचार्यांनी समयसारमध्ये आत्म्याला ज्ञानच म्हटले आहे.

ज्ञानामध्ये ज्ञेयप्रमाणतेची सिद्धी–

आत्मा केवढा? तर जेवढे ज्ञान तेवढा आत्मा. आता प्रश्न आहे की ज्ञान केवढे? तर जेवढे ज्ञेय (जाणण्यायोग्य पदार्थ) तेवढे ज्ञान. जसे विचारले की अग्नी केवढी आहे? तर त्याचे उत्तर असे की जेवढे इंधन तेवढी अग्नी. अग्नी जेवढ्या इंधनाला जाळते तत्प्रमाण होते. चार फूटाच्या लाकडाला पूर्ण आग लागली आहे तर अग्नीसुद्धा चार फूटाची म्हटली जाते. त्याचप्रमाणे ज्ञान जेवढ्या पदार्थांना जाणते तेवढे आहे. ज्ञानगुण सर्व जाणण्यायोग्य पदार्थांना जाणते. कोणतेही ज्ञेय त्याच्या बाहेर राहत नाहीत, म्हणून विषयाच्या अपेक्षेने ज्ञान ज्ञेयप्रमाण सांगितले आहे.

आता प्रश्न आहे की ज्ञेय किती आहेत? तर उत्तर देतात की ज्ञेय लोकालोक प्रमाण आहेत. संपूर्ण अलोकसहित जेवढे द्रव्य, गुण व तीन कालवर्ती पर्याय आहेत ते सर्व जाणण्याचे विषय आहेत. ज्ञान त्या सर्वांना जाणते म्हणून ज्ञान सर्वगत किंवा सर्व व्यापक म्हटले जाते. ज्याप्रमाणे डोळ्यातील बाहुली आपल्या स्थानामध्येच राहून पदार्थाला स्पर्श न करतासुद्धा दुरूनच पदार्थांना जाणते त्याचप्रमाणे ज्ञान आत्मप्रदेशामध्ये राहूनच सर्व लोकालोकाला जाणते. विषयाच्या अपेक्षेने ज्ञानाला सर्व व्यापक म्हणतात. काहीजण याचा एकांत करून ज्ञानाला प्रदेश अपेक्षेने आकाशप्रमाण व्यापक मानतात. त्यांचे ते म्हणणे बरोबर नाही. ज्ञान आत्मद्रव्याला सोडून

बाहेर जात नाही. ते लोकालोकाला जाणते तथापि आत्म्यामध्येच राहते. काहीजण आत्म्याला सुद्धा सर्व व्यापक मानतात. ते सुद्धा योग्य नाही. कारण जर सर्व आत्मे भिन्न भिन्न मानले नाहीत तर एकाला सुख – दु:ख झाले तर दुसऱ्याला पण झाले असते. जेव्हा एकटा सुखी होतो तेव्हा सर्व सुखी झाले पाहिजेत. जेव्हा एकटा दु:खी होतो तेव्हा सर्वजण दु:खी झाले पाहिजेत; परंतु तसे तर दिसत नाही. प्रत्यक्षाने विरोध येतो. प्रत्येक जीव स्वतंत्रपणे जगतो– मरतो, सुखी– दु:खी होतो.

ज्याप्रमाणे ज्ञान विषयाच्या अपेक्षेने सर्वव्यापक आहे त्याप्रमाणे त्या ज्ञानाचा स्वामी आत्मासुद्धा ज्ञानविषयाच्या अपेक्षेने सर्वव्यापक आहे. प्रदेशांच्या अपेक्षेने आत्मा असंख्यात प्रदेशी असून शरीरप्रमाण आहे. शरीराच्या बाहेर नाही.मोक्ष अवस्थेमध्ये अंतिम शरीराहून काही कमी आकारयुक्त सदा स्थिर राहतो.

या गाथेमध्ये आत्म्याला ज्ञानप्रमाण व ज्ञानाला सर्वगत सिद्ध करून आत्म्याचा सर्वज्ञस्वभावच सिद्ध केला आहे. एखाद्याने आपली स्तुती केली की 'तू हुशार आहेस, बुद्धीमान आहेस' तर आपल्याला किती हर्ष होतो, चेहरा आनंदाने फुलतो. येथे तर आचार्य आपल्याला सर्वज्ञ म्हणतात तर हे ऐकून आपल्याला किती आनंद झाला पाहिजे. हा जीव स्वत:च्या सर्वज्ञस्वभावाचा विश्वास करीत नाही म्हणून स्वत:ला दीन हीन मानून दु:खी होतो. आता सर्वज्ञतेच्या थाटात जगायला शिकले पाहिजे. ज्याप्रमाणे राजाचा पुत्र 'मी राजा आहे' या थाटात जगतो. तो जाणतो की मी सामान्य जनता नाही, राजा आहे त्याप्रमाणे आपणसुद्धा हे जाणले पाहिजे की मी सर्वज्ञ आहे, मी अल्पज्ञानी मन्दबुद्धी नाही. जो सर्वज्ञस्वभावाचे श्रद्धान करतो तो पर्यायात सर्वज्ञ होतो.

आत्मा ज्ञानप्रमाण आहे ही गोष्ट मागच्या गाथेमध्ये सिद्ध केली आहे. आता जे आत्म्याला ज्ञानप्रमाण न मानता ज्ञानाहून कमी किंवा अधिक मानतात त्यांना त्या मान्यतेमध्ये दोष दाखवितात –

णाणप्पमाणमादा ण हवदि जस्सेह तस्स सो आदा।
हीणो वा अहिओ वा णाणादो हवदि धुवमेव।।२४।।

हीणो जदि सो आदा तण्णाणमचेदणं ण जाणादि।
अहिओ वा णाणादो णाणेण विणा कहं णादि।।२५।।

अन्वयार्थ – (इह) या लोकात **(जस्स)** ज्याच्या मतामध्ये **(आदा)** आत्मा **(णाणप्पमाणं)** ज्ञानप्रमाण **(ण हवदि)** नाही **(तस्स)** त्याच्या मतामध्ये **(सो आदा)** तो आत्मा **(धुवमेव)** निश्चितपणे **(णाणादो)** ज्ञानाहून **(हीणो वा)** कमी **(अहिओ वा)** अथवा अधिक **(हवदि)** होतो.

(जदि) जर **(सो आदा)** तो आत्मा (ज्ञानाहून) **(हीणो)** कमी आहे तर **(तण्णाणं)** ते ज्ञान **(अचेदणं)** अचेतन होऊन **(ण जाणादि)** जाणणार नाही **(वा)** आणि जर **(णाणादो अहिओ)** ज्ञानाहून अधिक असेल तर तो अधिक आत्मा **(णाणेण विणा)** ज्ञानाशिवाय **(कहं णादि)** कसा जाणेल ?

आत्म्याला ज्ञानाहून हीनाधिक मानले तर आपत्ती –

उपर्युक्त दोन गाथांद्वारे आत्म्याला व त्याच्या ज्ञानगुणाला समप्रमाण सिद्ध केले आहे. ज्या वादीच्या मतामध्ये आत्मा ज्ञानप्रमाण नाही त्याच्या मतामध्ये आत्मा एकतर ज्ञानाहून कमी होईल किंवा अधिक होईल. दोन्हीपैकी एक निश्चितच आहे.

प्रथम पक्षामध्ये दोष –

जर आत्मा ज्ञानाहून कमी आहे असे मानले तर आत्मा झाला लहान व ज्ञान झाले मोठे. अशा परिस्थितीत आत्म्याहून अधिक असणारे ज्ञान आपल्या आधारभूत द्रव्याशिवाय कसे राहू शकणार ? कदाचित राहते असे मानले तर चेतन द्रव्याबरोबर, त्याचा संबंध नसल्यामुळे ज्ञान अचेतन होईल आणि जे अचेतन आहे ते जाणणार कसे ? ज्याप्रमाणे वर्ण, गंध, रस, स्पर्श इत्यादी अचेतन गुण जाणण्याचे काम करीत नाहीत त्याप्रमाणे ज्ञानगुणसुद्धा जाणण्याचे काम करू शकणार नाही; परंतु असे होऊ शकत नाही. कारण जे जाणत नाही ते ज्ञानच नाही. ज्याप्रमाणे अग्नी उष्ण गुणापेक्षा छोटी आहे असे मानले तर अग्नीपेक्षा उष्णगुण मोठा झाला व अग्नी छोटी झाली. जेवढा उष्णगुण अग्नीपेक्षा मोठा आहे तेवढा उष्णगुण अग्नीच्या संबंधाने रहित असल्यामुळे थंड होऊन जाईल आणि शीतलगुण जाळण्याचे कार्य करू शकणार नाही. परंतु असे दिसत नाही. कारण जो जाळतो त्यालाच उष्णगुण

म्हणतात. त्याचप्रमाणे ज्ञानगुण आत्म्याहून मोठा मानला तर तो निराधार, शून्य व अचेतन होऊन जाणण्याचे कार्य करू शकणार नाही.

दुसऱ्या पक्षामध्ये दोष –

जर आत्मा ज्ञानाहून अधिक आहे असे मानले अर्थात ज्ञान छोटे आहे व आत्मा मोठा आहे असे मानले तर जेवढा आत्मा ज्ञानाहून मोठा आहे तेवढा आत्मा ज्ञानरहित अचेतन होईल. ज्ञानाहून अधिक असणारा आत्मा ज्ञानाशिवाय जाणू शकणार नाही. ज्याप्रमाणे ज्ञानशून्य घट, पट इत्यादी पदार्थ जाणण्याचे काम करू शकत नाहीत त्याप्रमाणे ज्ञानाहून अधिक आत्मा जाणण्याचे काम करू शकणार नाही. ज्याप्रमाणे जर अग्नीला उष्णगुणाहून मोठे मानले तर उष्णगुणाहून अधिक अग्नी उष्णतास्वभावाने रहित झाल्यामुळे थंडच होईल. ती जाळण्याचे काम करू शकणार नाही. तेव्हा तिला अग्नी हे नाव सुद्धा देता येणार नाही. परंतु ही गोष्ट असंभव आहे. त्याचप्रमाणे ज्ञानगुणाहून अधिक आत्मा ज्ञानगुणाशिवाय अचेतन होईल. तेव्हा त्याला आत्मा म्हणता येणार नाही. कारण जो जाणतो तो आत्मा आहे. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की आत्मा ज्ञानगुणाहून न छोटा आहे, न मोठा आहे. जेवढा आत्मा आहे तेवढे त्याचे ज्ञान आहे व जेवढे ज्ञान आहे तेवढा आत्मा आहे.

जर आत्म्याला ज्ञानप्रमाण न मानता आत्मा ज्ञानाहून अधिक मानला तर अव्याप्ती नावाचा लक्षणाचा दोष येतो. येथे आत्मा लक्ष्य आहे व ज्ञान हे त्याचे लक्षण आहे. जे लक्ष्याच्या एका भागामध्ये राहते त्यास अव्याप्त लक्षणाभास म्हणतात. जर ज्ञानाहून आत्मा अधिक आहे तर अधिक आत्म्यामध्ये ज्ञानाचा अभाव मानावा लागेल. तसे झाले असता ज्ञान आत्म्याच्या सर्व भागामध्ये न राहता एका भागामध्ये राहिले म्हणून अव्याप्त लक्षणाभास होतो.

जर आत्म्याला ज्ञानाहून कमी मानले तर अतिव्याप्ती नावाचा दोष येतो. जे लक्ष्य व अलक्ष्यामध्ये राहते त्यास अतिव्याप्त लक्षणाभास म्हणतात. या मान्यतेमध्ये ज्ञान लक्ष्यभूत आत्म्यामध्येसुद्धा राहिले व अलक्ष्यभूत अधिक भागामध्ये ही राहिले. म्हणून अतिव्याप्त लक्षणाभास होतो.

द्रव्य व गुणांमध्ये तादात्म्यसंबंध –

द्रव्य आणि गुणामध्ये प्रदेशांच्या अपेक्षेने एक क्षेत्रावगाहरूप

तादात्म्यसंबंध असतो. जेथे जेथे द्रव्य, तेथे तेथे त्याचा गुण. जेथे जेथे गुण तेथे तेथे त्याचे द्रव्य असा नित्य तादात्म्य संबंध आहे. किंबहुना गुणांच्या समूहालाच द्रव्य म्हणतात. प्रत्येक गुण द्रव्याच्या सर्व भागामध्ये व सर्व अवस्थांमध्ये व्यापक असतो. ज्ञान आत्म्याचा गुण असल्यामुळे तो पूर्ण आत्म्यामध्ये व्यापून आहे. प्रदेशत्व गुणाच्या निमित्ताने द्रव्याचा जो आकार असतो तेवढाच गुणांचा आकार असतो. तत्त्वार्थसूत्रामध्ये गुणांची व्याख्या करताना सांगितले आहे की 'द्रव्याश्रया निर्गुणा गुणाः' गुण द्रव्याच्या आश्रयाने राहतात व गुणांमध्ये पुन्हा गुण नसतात. द्रव्य आधार आहे व गुण आधेय आहेत. अशाप्रकारे द्रव्य व गुणांमध्ये अभिन्न-आधार आधेयसंबंध आहे. द्रव्यापेक्षा गुण लहान असत नाहीत किंवा मोठे असत नाहीत. तसेच द्रव्यसुद्धा गुणांपेक्षा छोटे किंवा मोठे असत नाही.

आत्मा व्यवहाराने देहप्रमाण –

प्रदेशांच्या अपेक्षेने आत्मा असंख्यात प्रदेशी आहे. तेवढेच मोठे त्याचे ज्ञान आहे. शरीरामध्ये स्थित आत्मा समुद्घाताला सोडून इतरवेळी शरीरप्रमाणच असतो. वेदना, कषाय इत्यादींच्या निमित्ताने मूळ शरीराला न सोडता आत्मप्रदेश शरीराबाहेर पडणे यास समुद्धात म्हणतात. वेदना व कषाय समुद्घातामध्ये आत्मा मूळ शरीराहून तिप्पट प्रमाणात बाहेर पसरतो. तैजस समुद्घातामध्ये १२ योजन, आहारक समुद्घातामध्ये संख्यात योजन, वैक्रियिक व मारणान्तिक समुद्घातामध्ये संख्यात अथवा असंख्यात योजनापर्यंत पसरतो व केवलिसमुद्घातामध्ये लोकप्रमाण पसरतो व संकुचित होऊन पुन्हा मूळ शरीरात प्रवेश करतो. आत्मा कितीही मोठा झाला तरी ज्ञानसुद्धा त्याचबरोबर पसरते व संकुचित झाल्यावर संकुचित होते. ज्याप्रमाणे चंद्र आपल्या प्रभेसहितच छोटा किंवा मोठा होतो त्याप्रमाणे आत्मासुद्धा आपल्या ज्ञानादिगुण सहितच छोटा किंवा मोठा होतो. मोक्ष अवस्थेमध्ये आत्मा अंतिम शरीराहून काही कमी आकारप्रमाण असतो तेव्हा त्याचे ज्ञानसुद्धा तेवढेच असते.

काहीजण आत्म्याला देहप्रमाण न मानता अंगठ्याएवढा मानतात, काहीजण साळी तांदुळाएवढा मानतात तर काहीजण वडाच्या बी एवढा मानतात. त्या सर्वांचा येथे निषेध होतो. कारण ज्ञान संपूर्ण शरीरामध्ये

होताना प्रतीतीला येते. जर ज्ञान संपूर्ण शरीरात होते तर आत्मासुद्धा पूर्ण शरीरातच राहतो ही गोष्ट सिद्ध होते. शरीराच्या एका भागात पीडा झाली तर दु:खाची वेदना पूर्ण शरीरात होते. एखाद्या प्रिय व्यक्तीचा संयोग झाला तर सर्वांगामध्ये सुखाचे वेदन होते. यावरून सिद्ध होते की ज्ञानसहित आत्मा शरीरप्रमाण आहे. आत्मा व शरीरामध्ये भिन्न आधार-आधेय संबंध आहे. कारण आधारभूत शरीर अन्य द्रव्य आहे व आधेयभूत आत्मा अन्य द्रव्य आहे. आत्मा व ज्ञानामध्ये जसा अभिन्न आधार-आधेय संबंध आहे तसा शरीर व आत्म्यामध्ये अभिन्न आधार-आधेय संबंध नाही.

जर कोणाला म्हटले की 'तुला काही येत नाही, तू अज्ञानी आहेस, मंदबुद्धी आहेस' तर त्याला खूप वाईट वाटते. जर कोणाला म्हटले की तू 'खूप हुशार आहेस, बुद्धीमान आहेस, ज्ञानी आहेस,' तर तो खूष होतो, आनंदित होतो. अर्थात त्याला हे म्हणणे आवडते. असे का होते याचा विचार केला तर लक्षात येते की ज्ञान आत्म्याचा स्वभाव आहे व अज्ञान आत्म्याचा विभाव आहे, दुरवस्था आहे. म्हणून स्वत:ला ज्ञानरूप अनुभवावे.

आत्म्याला ज्ञानप्रमाण जाणण्यामध्ये लाभ –

अज्ञानी जीव आत्मा कसा आहे व कोठे आहे हे जाणत नाही. त्यामुळे आत्म्याला कसे जाणावे व आत्म्याचा शोध कोठे घ्यावा हे त्याला समजत नाही. या गाथांद्वारे आत्मा ज्ञानप्रमाण आहे. तो ज्ञानाहून कमी-अधिक नाही हे लक्षात येते व त्यामुळे आत्म्याला ज्ञानरूपाने जाणावे व ज्ञानामध्येच आत्म्याला शोधावे. जेथे ज्ञान आहे तेथेच आत्मा आहे व ज्ञानसहित आत्मा शरीरप्रमाण आहे तर आत्म्याला बाहेर शोधण्याची गरज नाही हे कळते. त्यामुळे आत्म्याचा शोध घेणे सोपे होते. जेथे ज्ञानाचे वेदन होत आहे तोच मी आत्मा आहे असे ग्रहण होते.

आत्मा अनंतगुणात्मक असतानाही त्याला येथे ज्ञानप्रमाण सिद्ध केले आहे. कारण ज्ञान सर्वांना प्रसिद्ध आहे. ज्ञान विचारात्मक आहे. स्वपरप्रकाशक आहे. ज्ञान स्वत:ला ही ग्रहण करते व अन्य गुणांना ही ग्रहण करते. अन्य गुण स्वत:लाही ग्रहण करीत नाहीत तर पराला कसे ग्रहण करतील ? अप्रसिद्ध गुणांच्याद्वारे अप्रसिद्ध आत्मा कसा काय ग्रहण केला जाणार ?

अन्य गुण ज्ञानमुखानेच प्रसिद्ध होतात.

ज्ञान रेल्वेच्या इंजिनाप्रमाणे आहे. शेष गुण रेल्वेच्या डब्याप्रमाणे आहेत. इंजिनाच्या पाठीमागे ज्याप्रमाणे डबे जातात त्याप्रमाणे ज्ञानाच्या पाठीमागे श्रद्धा, चारित्र, आनंद इत्यादी गुण जातात. इंजिनच बिघडले तर सर्व डबे बंद पडतात. पुढे ते सरकू शकत नाहीत. त्याप्रमाणे ज्ञानामध्ये दोष असेल तर सर्वच गुण दोषरूप होतात. ज्ञान सुधारले की सर्व गुणांमध्ये सुधार होतो.

आत्मा ज्ञानप्रमाण आहे. ज्ञानाहून हीनाधिक नाही हे जाणल्यामुळे भय संपते व निर्भयता येते. कारण कोणत्याही अवस्थेत मी ज्ञानप्रमाण आहेच. मी झोपलो किंवा बेशुद्ध झालो तर ज्ञान मला सोडून जात नाही. किंवा आपल्यापेक्षा कमी जास्त होत नाही तर भय कसले ? ज्ञानस्वरूप आत्माच ज्ञेय आहे, ध्येय आहे व ज्ञानच साधन आहे. ज्ञानानेच आनंद होतो. म्हणून **स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाद्वारे स्वत:ला ज्ञानरूप अनुभवावे हाच खरा पुरुषार्थ आहे. या पुरुषार्थाने सर्व प्रयोजनाची सिद्धी स्वयमेव होते.**

हा अज्ञानी आत्मा स्वत:ला ज्ञानरूप अनुभवायचे सोडून अन्य सर्वरूप अनुभवतो. एकाग्र होऊन परपदार्थांचे ध्यान करतो त्यामुळेच संसार आहे म्हणजेच दु:ख आहे.

एक ध्यानाचा अभ्यासू शिष्य ध्यानामध्ये मग्न होता. मधूनच त्याला जोरात शिंक आली त्यामुळे ध्यानापासून विचलित झाला. जवळच गुरू बसले होते. त्यांनी विचारले, 'वत्स ! काय झाले ?'

शिष्य म्हणाला, 'गुरुदेव ! आज ध्यानामध्ये मसाले भात करण्याचा बेत केला. आपल्या चरणकमलाच्या कृपेने ध्यान इतके मस्त लागले की ते ध्यान न राहता प्रत्यक्ष कृतीच झाली. मी खरोखर ध्यानामध्ये मसाले भात बनवू लागलो. त्यामध्ये मिरची जास्त झाली त्यामुळे खाताना जोरात शिंक आली व ध्यान भंग झाले. असे उत्तम ध्यान कधीच झाले नव्हते. गुरुदेव, मला वरदान द्या की ज्यामुळे मी याहूनही अधिक ध्यानमग्न होऊ शकेन.'

गुरुदेव स्मितहास्य करीत म्हणाले – 'वत्स ! प्रथम तर ही गोष्ट लक्षात ठेव, की ध्यानामध्ये आत्मा-परमात्म्याचे चिंतन केले पाहिजे त्यामुळे वास्तविक आत्म्याचे कल्याण होते. ध्यानाचा मुख्य उद्देश सफल होतो. पूर्व

संस्कार व सांसारिक मोह मायेचा लोभ कमी होत नाही म्हणून ध्यानामध्ये लाडू, पेढा, शेव, पापडी इत्यादी बनविण्याचे भाव होतात. जेवढी एकाग्रता मसाले भात करण्यामध्ये लावली तेवढी एकाग्रता जर एकदा स्वत:च्या आत्म्याचे ध्यान करण्यामध्ये लावली असती तर बेडा पार झाला असता व अपूर्व आनंद प्राप्त झाला असता. वत्स ! लक्षात ठेव, आपले जीवन व आपली बुद्धी सीमित आहे. जीवनामध्ये व बुद्धीमध्ये अशा उत्तम पदार्थांचा संचय कर की जे आपल्याला लाभदायक व ज्ञानवर्धक होईल. व्यर्थ वस्तूंचा संग्रह करू नकोस की जेणेकरून हितकारी गोष्टींकरिता जागाच शिल्लक राहणार नाही. ज्याप्रमाणे कॅसेटमध्ये एखादा मजकूर भरला असेल तर त्यामध्ये दुसरे काही टेप करता येत नाही, पहिला मजकूर पुसूनच दुसरा मजकूर भरला जाऊ शकतो. त्याप्रमाणे **बुद्धीमध्ये संसार भरला असेल तर तेथे आत्मा–परमात्मा, मोक्ष इत्यादी पारमार्थिक गोष्टी भरल्या जाऊ शकत नाहीत. त्यासाठी प्रथम बुद्धीतून संसार पुसून टाकला तर आत्मा परमात्म्याला तेथे स्थान प्राप्त होणार.**

पूर्वीच्या तीन गाथांद्वारे हे सिद्ध केले आहे की आत्मा ज्ञानप्रमाण आहे. ज्ञान व आत्म्यामध्ये नित्य तादात्म्य संबंध असल्यामुळे अभेद आहे. ज्ञान लोक व अलोकरूप सर्व ज्ञेय पदार्थांना जाणते म्हणून ते सर्वगत (सर्वज्ञ) आहे. यावरून ही गोष्ट न्यायाने सिद्ध होते की ज्ञानापासून अभिन्न असणारा आत्मासुद्धा सर्वगत आहे. ज्याप्रमाणे मुलगा धनवान झाला तर बापसुद्धा धनवान म्हटला जातो. कारण पिता पुत्र अभिन्न असून एकाच घरात राहतात त्याप्रमाणे ज्ञान सर्वगत आहे म्हणून आत्मासुद्धा सर्वगत म्हटला जातो. कारण ज्ञान ही आत्म्याचीच संतान आहे. ज्ञान आत्म्यापासून अभिन्न आहे–

सव्वगदो जिणवसहो सव्वे वि य तग्गया जगदि अट्ठा।
णाणमयादो य जिणो विसयादो तस्स ते भणिदा।।२६।।

अन्वयार्थ– (जिणवसहो) जिनवर **(सव्वगदो)** सर्वगत अर्थात सर्वज्ञ आहेत **(य)** व **(जगदि)** जगातील **(सव्वे वि अट्ठा)** सर्व पदार्थ **(तग्गया)** जिनवरगत **(भणिदा)** सांगितले आहेत. **(जिणो णाणमयादो)** कारण जिनेंद्र ज्ञानमय आहेत व ते पदार्थ **(तस्स विसयादो)** त्या जिनेंद्रांचे विषय आहेत.

जिनेंद्र भगवान ज्ञानमय असल्यामुळे त्यांना सर्वगत, सर्वव्यापक म्हटले आहे व जगातील सर्व पदार्थ जिनेंद्रांच्या ज्ञानाचे विषय असल्यामुळे जिनेंद्रगत आहेत असे म्हटले आहे.

सर्वगत ज्ञानमय भगवान सर्वगत–

केवलज्ञान तीन काळातील व तीन लोकातील सर्व द्रव्य व सर्व पर्यायांना जाणत असल्यामुळे ज्ञान सर्वगत म्हटले आहे. ज्ञान त्रिलोक व त्रिकालवर्ती सर्व पदार्थांमध्ये पोहोचले आहे. ज्ञानाला अगम्य प्रदेश (स्थान) नाही. त्याचा सर्वत्र संचार आहे. ज्ञान जाणण्याच्या अपेक्षेने सर्व व्यापक आहे. अंधार असो, प्रकाश असो, गुप्त असो, प्रकट असो, सप्रदेशी असो, अप्रदेशी असो ज्ञान सर्वाला स्पर्श करते. ज्ञानाचा विषय नसणारी कोणतीही वस्तू जगामध्ये नाहीच. ज्ञानाची महिमा अगम्य आहे. या जगातील सर्वात सुंदर वस्तू ज्ञान आहे.

एकदा एका गुरुकुलातील विद्यार्थ्यांची मनोवैज्ञानिक परीक्षा घेण्यासाठी गुरुजींनी शिष्यांना सांगितले की– प्रत्येक विद्यार्थ्याने १५ मिनिट या पहाडाचे निरीक्षण करायचे व तेथे ज्याला जी वस्तू सुन्दर दिसेल ती मला येऊन सांगायची. विद्यार्थ्यांनी पहाडाचे निरीक्षण केले. गुरुजींनी एकेका विद्यार्थ्याला उभा करून विचारले– एका विद्यार्थ्याने सांगितले–गुरुजी लाल फुलांनी बहरलेले गुलमोहरचे झाड मला खूप सुन्दर दिसले. दुसऱ्या विद्यार्थ्याने सांगितले– गुरुजी पहाडावर अस्त होत असलेल्या सूर्याची लालिमा विलोभनीय होती. तिसऱ्या विद्यार्थ्यांने पहाडावरील विशाल पाषाणाच्या सुंदरतेचे वर्णन केले, एका विद्यार्थ्याने पक्ष्याच्या मधुर आवाजाच्या सुंदरतेचे वर्णन केले अशाप्रकारे अन्य सर्व विद्यार्थ्यांनी साहित्यिक भाषेमध्ये मनोहारी वर्णन केले. शेवटी एकच हुशार विद्यार्थी शिल्लक राहिला होता. गुरुजींनी त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला 'गुरुजी, मला तर माझे ज्ञानच सर्वात सुंदर वाटले. कारण जर ज्ञानच नसते तर या सर्व वस्तूंच्या सुंदरतेची किंमत कशी कळली असती. सर्व वस्तूंच्या सुंदरतेला जाणणारे ज्ञानच सर्वात सुंदर आहे.' गुरुजी या विद्यार्थ्याचे उत्तर ऐकून खुष झाले.

ज्ञानच नसते तर सर्व पदार्थ अज्ञातच राहिले असते. सर्व पदार्थ निर्मल

ज्ञानाचे ज्ञेय होतात. ज्ञानाला सीमा नाही. ज्ञान अमर्याद आहे. ज्ञानाचे काम जाणणेमात्र आहे. ज्ञान सर्व ज्ञेयाला जाणते म्हणून ते सर्वव्यापक आहे. ज्याअर्थी ज्ञान सर्वव्यापक आहे त्याअर्थी ज्ञानमय भगवान सुद्धा सर्वव्यापक आहेत.

प्रत्येक आत्म्यामध्ये सर्वज्ञत्व शक्ती आहे तथापि येथे व्यक्ततेच्या अपेक्षेने केवलज्ञानी अरिहंत व सिद्ध परमात्म्याला सर्वगत म्हटले आहे. त्यांचा आत्मा ज्ञानाशी तन्मय आहे. म्हणून जर ज्ञान सर्वगत आहे तर ज्ञानी आत्मासुद्धा सर्वगत आहे.

पदार्थ सर्वज्ञगत–

ज्याप्रमाणे जिनेंद्र भगवंतांना सर्वगत म्हटले आहे त्याप्रमाणे सर्व ज्ञेय पदार्थांना जिनेंद्रगत म्हटले आहे. सर्व ज्ञेय पदार्थ जणू भगवंतांच्या आत्म्यामध्ये सामावलेले आहेत अथवा घुसले आहेत. कारण केवलींच्या ज्ञानामध्ये सर्व ज्ञेयांचे आकार ज्ञानाकार रूप झाले आहेत. यद्यपि ज्ञेयपदार्थ भिन्न, भिन्न आहेत, परंतु ते ज्ञानामध्ये आपापल्या स्वरूपाने ज्ञेयाकाररूपाने झळकतात. ज्याप्रमाणे आरशामध्ये पदार्थाचे प्रतिबिंब झळकते त्याप्रमाणे ज्ञानामध्ये सर्व पदार्थ प्रतिभासित होतात व ते पदार्थ ज्ञानामध्ये प्रविष्ट झाल्याप्रमाणे वाटतात. जसे ते पदार्थ ज्ञानामध्ये प्राप्त आहेत तसे ते आत्म्यामध्ये प्राप्त आहेत हे म्हणणे विषयाच्या अपेक्षेने समान आहे. ज्ञानाचे विषय म्हणजेच आत्म्याचे विषय.

ज्ञान व ज्ञेयाची स्वतन्त्रता–

ज्ञान अर्थगत आहे व पदार्थ ज्ञानगत आहे असे व्यवहाराने प्रतिपादन केले तरी निश्चयाने ज्ञान आपल्या स्वरूपापासून च्युत होऊन ज्ञेयरूप होत नाही व पदार्थ आपल्या स्वरूपाला सोडून ज्ञानरूप होत नाहीत. ज्ञानाचा स्वभाव आहे जाणणे. ते आपल्या प्रदेशामध्ये राहूनच पदार्थाला जाणते. ज्ञेयाचा स्वभाव आहे जाणले जाणे. ते आपल्या स्वरूपाला न सोडता ज्ञानामध्ये जाणले जाते. ज्याप्रमाणे आरशात मोर दिसतो. परंतु मोर आरशात गेला नाही. मोर वेगळा आहे व आरसा वेगळा आहे. मोराच्या आकाररूपाने आरशाची स्वच्छता परिणमित झाली आहे. हे पाहून असे व्यवहाराने म्हटले

जाते की आरशामध्ये मोर व्याप्त आहे. अथवा आरशात मोर आहे. वास्तविक मोर आरसारूप होत नाही किंवा आरसा मोररूप होत नाही. जर आरसा पदार्थरूप होऊ लागला तर जेव्हा आरशामध्ये आग झळकू लागेल तेव्हा आरसा जळून जाईल. परंतु प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. आरशामध्ये आग झळकली तरी आरसा गरम होत नाही. किंवा अग्नि आरसारूप होत नाही. कारण अग्नि आरसारूप झाली तर आपला उष्णस्वभाव सोडून थंड होऊन जाईल. तसे ही होताना दिसत नाही. म्हणून आरसा आरसाच आहे. अग्नी अग्नीच आहे. आरसा आरसारूप राहूनच अग्नीला प्रतिबिंबित करतो. अग्नी अग्नीरूप राहूनच आरशात झळकते. त्याप्रमाणे केवलज्ञानी भगवान व त्यांचे ज्ञान आपल्याच प्रदेशामध्ये आहे. ते पदार्थांच्याजवळ जात नाहीत. पदार्थ त्यांच्याजवळ येत नाहीत. तथापि जाणण्याच्या अपेक्षेने असे म्हटले जाते की भगवान सर्वगत (सर्वव्यापक) आहेत व सर्व लोकालोक ज्ञेयरूपाने भगवंतांमध्ये व्याप्त आहेत.

केवलज्ञानाची निर्लेपता–

केवलज्ञान सर्वगत असूनसुद्धा अर्थात सर्व पदार्थांना जाणूनसुद्धा पूर्ण निराकुल राहते. कारण केवली भगवान पराशी तन्मय होऊन त्याला जाणत नाहीत. दौलतरामजींनी देवस्तुतीमध्ये म्हटलेच आहे.–

सकल–ज्ञेयज्ञायक तदपि निजानंद रसलीन।

केवली भगवान् सर्व ज्ञेयपदार्थांना जाणतात, परंतु ते आपल्या आनंदरसामध्येच लीन आहेत. ज्ञानाचे कार्य फक्त जाणणे आहे. रागद्वेष करणे ज्ञानाचे कार्य नाही. छद्मस्थ संसारी जीव अज्ञानामुळे पराला इष्ट अनिष्ट मानून हे चांगले, हे वाईट असे राग द्वेष विकल्प करतो. जे विकल्प करते ते वास्तविक ज्ञान नाही. जाणण्यामध्ये विशेष विकल्प आले नाहीत तर ते वास्तविक ज्ञान आहे. जर जाणताना ज्ञानस्वभावाशीच अन्याय केला तर ज्ञानस्वभावाचा अनुभव कसा होईल? ज्ञानदृष्टीशिवाय सहज सुखस्वरूप अमृताचा आस्वाद येऊ शकत नाही. ज्ञानस्वभावाची दृष्टी प्राप्त केली तर जीवनातील सर्वात उत्कृष्ट काम झाले म्हणून समजावे. दररोज वीतराग प्रभूंचे दर्शन करताना त्यांचा आदर्श ग्रहण करावा. सर्वज्ञ प्रभू सर्वाला जाणून सुद्धा सर्वापासून अलिप्त आहेत. निर्विकार आहेत. स्वत:मध्येच लीन आहेत.

त्याप्रमाणे मलासुद्धा निर्विकाररूपाने जाणले पाहिजे. ही निर्विकारता या छद्मस्थ अवस्थेमध्ये स्वत:ला जाणले असताच येऊ शकते. पराला जाणले असता इष्टानिष्ट विकल्प होतात म्हणून आपल्या ज्ञानाचा विषय एक ध्रुव ज्ञानानन्दस्वभावी निज आत्माच बनविणे योग्य आहे. आपल्या परिणामांना निर्मळ बनविण्याचा प्रयत्न करावा. परिणामांच्या निर्मलतेसाठी द्रव्यदृष्टी स्थिर ठेवावी. ज्या शुद्धोपयोगाने अनुपम केवलज्ञानाची प्राप्ती होते त्या शुद्धोपयोगाची भावना सतत करावी.

सर्वद्रव्यांची स्वरूपनिष्ठता–

ज्ञान आपल्या प्रदेशांना न सोडता सर्व लोकामध्ये व्यापक आहे. हे ज्ञान माझे मलाच माझ्यापासूनच प्राप्त होते असे मानून ज्ञानस्वभावाला प्राप्त करण्याकरिता बाह्य पदार्थ शोधण्याचा प्रयत्न करू नये. बाह्य पदार्थ त्याच्या स्वभावानुसार स्वाधीन आहेत असे जाणून त्यावरून दृष्टी हटवावी. जेव्हा ज्ञानस्वभाव स्वत: सर्वज्ञस्वरूपाने प्रगट होतो तेव्हा संसारातील सर्व पदार्थ त्या ज्ञानामध्ये ज्ञात होतात; परंतु ते पदार्थ ज्ञानरूप झाले नाहीत. सर्वद्रव्ये स्वतंत्र आहेत. विश्व निश्चयाने आपल्या स्वत:च्या चतुष्टयरूप आहे. त्याचे द्रव्य, त्याचा गुण अथवा पर्याय त्याच्या बाहेर अन्य क्षेत्रामध्ये नाहीत. विश्वाचा एक अंशसुद्धा सर्वज्ञामध्ये गेला नाही. तरी सुद्धा ज्ञानाच्याद्वारे व्यवहाराने विश्व जाणले जात आहे. सर्वद्रव्ये आपापल्या स्वरूपामध्ये निष्ठ आहेत. अशाप्रकारे ही गाथा ज्ञान व ज्ञेयाची स्वतंत्रता घोषित करते. वस्तुस्वभावच असा आहे म्हणून हे प्रसिद्ध आहे की ज्ञान ज्ञेयामध्ये गेले नाही व ज्ञेय ज्ञानामध्ये गेले नाहीत. ज्ञानाने आपल्या शक्तीने ज्ञेयाला जाणले व ज्ञेय आपल्या शक्तीने ज्ञानामध्ये जाणले गेले.

आतापर्यंत आत्म्याला ज्ञानप्रमाण सिद्ध केले. ज्ञान व आत्म्यामध्ये तादात्म्य संबंध असल्यामुळे दोघांमध्ये अभेद सिद्ध झाला. यावरून कोणी एकान्ताने आत्म्याला केवळ ज्ञानरूपच मानून एकान्त ग्रहण करतील म्हणून येथे ज्ञान व आत्म्यामध्ये कथंचित् एकत्व व अन्यत्व सिद्ध करतात.–

णाणं अप्पत्ति मदं वट्टदि णाणं विणा ण अप्पाणं।
तम्हा णाणं अप्पा अप्पा णाणं व अण्णं वा ।।२७।।

अन्वयार्थ– (णाणं) ज्ञान **(अप्पत्ति)** आत्मा आहे असे **(मदं)** जिनेन्द्रदेवांचे मत आहे. **(अप्पाणं विणा)** आत्म्याशिवाय अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये **(णाणं)** ज्ञान **(ण वट्टदि)** राहत नाही. **(तम्हा)** म्हणून **(णाणं अप्पा)** ज्ञान आत्मा आहे. **(अप्पा णाणं व अण्णं वा)** आत्मा ज्ञान आहे व अन्य सुखादी गुणरूप आहे.

या गाथेमध्ये हे स्पष्ट केले आहे की आत्मा केवळ एक ज्ञानगुणरूप नाही तर अनंत धर्मस्वरूप आहे.

ज्ञानाचे अनन्य आश्रयस्थान आत्मा–

ज्ञानाचा आत्म्याशी अनादी अनंत स्वभावसिद्ध संबंध आहे. ज्ञान आत्म्याला सोडून अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये राहत नाही. ज्ञानाने आजपर्यंत कोणत्याही अचेतन वस्तूबरोबर आपला संबंध जोडला नाही. ज्ञानाने स्वाधारभूत चेतन द्रव्य सोडून अन्य चेतन द्रव्याशीही आपला संबंध स्थापित केला नाही. ज्ञान अन्य द्रव्याशी संबंध स्थापित करण्यास अत्यंत निरुत्सुक आहे. ज्ञान शीलवती स्त्रीप्रमाणे एका आत्म्याशीच संबंध स्थापित करण्यास उत्सुक आहे. ज्ञानाचा स्वामी एक निज आत्माच आहे. ज्ञानाने आपले सर्वस्व आत्म्यालाच समर्पित केले आहे. ज्ञानाला अनन्य शरण एक आत्माच आहे. अनंत ज्ञानाचा भोक्ता एक आत्माच आहे. ज्ञान आत्म्याशिवाय अन्यत्र राहत नाही, म्हणून ज्ञान आत्माच आहे.

अनंतधर्माचा निधी ध्रुव आत्मा–

ज्ञान आत्माच आहे, पण आत्मा ज्ञानरूपसुद्धा आहे व अन्य अनंत धर्मरूपसुद्धा आहे. द्रव्य अनंत गुणांचा समूहस्वरूप आहे. प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत सामान्यगुण व अनंत विशेष गुण आहेत. गुण आधेय आहेत व द्रव्य अनंत गुणांचा आधार आहे. ज्यावेळी ज्या गुणाची अपेक्षा असते त्यावेळी त्या गुणरूप द्रव्य दिसते, ज्याप्रमाणे रस गुणाच्या अपेक्षेने आंबा गोड म्हटला जातो, वर्ण गुणाच्या अपेक्षेने पिवळा, स्पर्शगुणाच्या अपेक्षेने मऊ, गंधगुणाच्या अपेक्षेने सुगंधी म्हटला जातो त्याप्रमाणे ज्ञानगुणाच्या अपेक्षेने आत्मा ज्ञानरूप, दर्शन गुणाच्या अपेक्षेने दर्शनरूप, सुखगुणाच्या अपेक्षेने सुखरूप, वीर्यगुणाच्या अपेक्षेने वीर्यगुणरूप आहे. ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री

आपले सर्वस्व पतीला समर्पित करते. पतीला सोडून अन्य पुरुषाशी आपला संबंध ठेवत नाही. परंतु पती अनेक स्त्रियांशी आपला संबंध जोडतो. त्याप्रमाणे ज्ञानादी गुण एका आत्म्याशी निष्ठ राहतात. परंतु आत्मा अनेक गुणांबरोबर आपला संबंध जोडतो. ज्याप्रमाणे अनेक पत्नींचा आधार एक पती आहे, त्याप्रमाणे अनेक गुणांचा आधार एक आत्मा आहे. म्हणून आत्मा जसा ज्ञानरूप आहे तसा सुख, वीर्य, चारित्र इत्यादी अनंत गुणरूप आहे. हा मी अनंत गुणांचा एकाधिपती सम्राट आहे. माझ्यामध्ये काहीही कमी नाही. मी अनंत गुणांनी परिपूर्ण आहे हे जाणल्यामुळे निज आत्म्याची महिमा येते. दीन हीनतेची भावना नष्ट होते. स्वत:ला अनंत गुणात्मक अखंड जाणल्यामुळे सम्यग्दर्शनरूपी निधी प्राप्त होते.

अनेकान्त बलवान आहे–

जर सर्वथा ज्ञानाला आत्मा मानले तर ज्ञान आत्मारूप झाल्यामुळे ज्ञानाचा अभाव मानावा लागेल. ज्ञानाचा अभाव मानला तर पुन्हा दोन दोष उत्पन्न होतात १) ज्ञानगुणाने रहित झाल्यामुळे आत्मा अचेतन होईल. अथवा २) विशेष गुणाचा अभाव झाल्यामुळे आत्म्याचाच अभाव होईल. कारण कोणतेही द्रव्य विशेष गुणांनी रहित असत नाही. या दोषांचा परिहार करण्याकरिता सर्वथा ज्ञानाला आत्मा न मानता कथंचित् अभिन्न व कथंचित् भिन्न मानणे योग्य आहे. गुणगुणी अभेदनयाच्या अपेक्षेने ज्ञान आत्मा आहे, संज्ञा लक्षण भेदाच्या अपेक्षेने ज्ञान आत्म्यापासून भिन्न आहे. ज्ञान एक गुण आहे, आत्मा गुणी आहे. ज्ञान व आत्मा या दोन संज्ञा भिन्न आहेत. ज्ञानाचे व आत्म्याचे लक्षण भिन्न आहे. ज्ञानाचे लक्षण जाणणे आहे, आत्म्याचे लक्षण अनंत गुणांशी अविनाभावी चेतना आहे.

तसेच जर सर्वथा आत्म्याला ज्ञानरूप मानले तर आत्म्याचा अभाव मानावा लागेल. आत्म्याचा अभाव झाला तर ज्ञानाचा सुद्धा अभाव मानावा लागेल. कारण ज्ञान निराधार राहू शकत नाही. ज्ञानाचा आधार आत्मा आहे. आधाराचा अभाव झाला तर आधेयाचा अभाव होतो. ज्याप्रमाणे साखरेचाच अभाव झाला तर गोडी कुणाच्या आधाराने राहणार? अग्नीच्या अभावात उष्णता कोठे राहणार? त्याप्रमाणे आधारभूत आत्म्याचा अभाव झाला तर ज्ञान कोठे राहणार? तसेच आधारभूत गुणी आत्म्याच्या अभावात अन्य

गुणांचासुद्धा अभाव होतो. गुणांचा अभाव झाला तर गुणांशी अविनाभावी असणाऱ्या आत्म्याचासुद्धा अभाव होतो. या सर्व दोषांना दूर करण्याकरिता अनेकान्त बलवान आहे. आत्मा कथंचित् ज्ञानरूप आहे. कथंचित् अन्यरूप सुद्धा आहे. **अनेकान्त म्हणजे वस्तूस्वरूपाला जीवंत ठेवणारी संजीवनी आहे, प्राणदायिनी अमृतवल्ली आहे. म्हणून अनेकांताचा आश्रय घेणेच श्रेयस्कर आहे.**

जिनेंद्र भगवान सर्वगत आहेत व सर्व पदार्थ जिनेंद्रांच्या ज्ञानामध्ये स्थित आहेत असे पूर्वी सांगितले आहे. यावरून असे भासित होते की ज्ञानी पदार्थामध्ये गेला व पदार्थ ज्ञानामध्ये गेले आहेत. ज्ञान व ज्ञेयाचा परस्परांमध्ये प्रदेशांच्या अपेक्षेने प्रवेश होतो का? ह्या प्रश्नाचे आचार्य येथे उत्तर देतात–

णाणी णाणसहावो अट्ठा णेयप्पगा हि णाणिस्स।
रूवाणि व चक्खूणं णेवण्णोण्णेसु वट्टंति ।।२८।।

अन्वयार्थ:– (णाणी) आत्मा **(णाणसहावो)** ज्ञानस्वभावी आहे व **(हि अट्ठा)** पदार्थ **(णाणिस्स)** आत्म्याचे **(णेयप्पगा)** ज्ञेयस्वरूप आहेत. **(रूवाणि व चक्खूणं)** ज्याप्रमाणे रूप डोळ्याचे दृश्यमात्र आहेत. त्याप्रमाणे **(अण्णोण्णेसु)** ज्ञान व पदार्थ परस्परांमध्ये **(णेव वट्टंति)** प्रविष्ट होत नाहीत.

ज्ञान व ज्ञेयाचा स्वभाव भिन्न भिन्न असल्यामुळे ते एकमेकामध्ये प्रवेश करीत नाहीत हे या गाथेचे तात्पर्य आहे.

ज्ञानी ज्ञानस्वभावी–

एक वस्तू अन्य वस्तूपासून स्वभावभेदामुळे वेगळी केली जाते. ज्याप्रमाणे दूध व पाणी एकमेकामध्ये मिसळले तरी सुद्धा दूध आपल्या स्वभावाने भिन्न आहे व पाणी आपल्या स्वभावाने भिन्न आहे. मिश्रित अवस्थेमध्ये दूधाने आपला स्निग्ध, मधुर, श्वेत स्वभाव सोडला नाही व पाण्याने आपला स्वभाव सोडला नाही. ज्ञानामध्ये संपूर्ण विश्व जरी झळकले तरी त्याने आपला ज्ञानस्वभाव सोडला नाही. ज्ञानी सदैव ज्ञानस्वभावरूप आहे. जाणणे हाच ज्ञानाचा स्वभाव आहे. आत्मा ज्ञानस्वभावी आहे हे अस्तिरूपाने कथन आहे. यामध्ये अन्य अनन्त द्रव्यांच्या स्वभावाची नास्ति

आहे. अर्थात आत्मा शरीरादी ज्ञेयपदार्थ स्वरूप नाही, वर्ण-गंध-रस-स्पर्शरूप नाही, राग, द्वेष, मोह, भावरूप नाही. तिन्ही काळामध्ये स्वभावाचा कधी अभाव होत नाही. मी ज्ञानस्वभावी आहे हे जाणले तर सर्व दु:ख संपले. अज्ञानी जीव स्वत:ला ज्ञानस्वभावरूप न अनुभवता स्त्री, पुत्र, मित्रादिरूप, शरीररूप, रागद्वेषमोहादिरूप अनुभवतो. त्यामुळे आकुलित होऊन दु:खी होतो, कारण परवस्तू तर याची कधीही होऊ शकत नाही. परवस्तूचे परिणमनसुद्धा याच्या अधीन नाही.

पदार्थ ज्ञेयस्वरूप-

जी वस्तू सत्स्वरूप आहे ती ज्ञानाचा विषय आहे, म्हणजेच ज्ञेयस्वरूप आहे. पुढे गा.९३ च्या टीकेमध्ये पदार्थाची व्याख्या करताना अमृतचंद्र आचार्य लिहितात-'परिच्छिद्यमान: अर्थ:' जो जाणला जातो तो पदार्थ होय. जे सत् आहे तेच ज्ञेय आहे, जे असत् आहे ते ज्ञेय होऊ शकत नाही. ज्ञानी ज्ञानस्वभावीच आहे व पदार्थ ज्ञेयस्वरूपच आहेत. ज्ञानीचा पदार्थामध्ये व पदार्थाचा ज्ञानीमध्ये अत्यन्ताभाव असल्यामुळे कोणी कोणामध्ये प्रवेश करीत नाहीत.ज्ञान व ज्ञेयाचा व्यवहाराने ज्ञेयज्ञायकसंबंध आहे. आत्मा जाणतो म्हणून ज्ञायक आहे व पदार्थ जाणले जातात म्हणून ज्ञेय आहेत.म्हणूनच ज्ञानाचे ज्ञेय व ज्ञेयाचे ज्ञान असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे लौकिकामध्ये पित्याचा पुत्र व पुत्राचा पिता असा संबंध जोडला जातो. न पुत्राचे रूप पित्यामध्ये आहे व न पित्याचे रूप पुत्रामध्ये आहे. एखाद्याला विचारले की पिता अगोदर आहे की पुत्र अगोदर आहे. कोणी म्हणेल की पिता अगोदर आहे. कारण त्याचा जन्म पूर्वी झाला आहे, तो वयाने मोठा आहे. परन्तु ज्ञानी म्हणतो की पिता-पुत्र दोन्ही एकाच वेळेस उत्पन्न झाले आहेत. कारण ज्यावेळी पुत्र उत्पन्न झाला त्याचवेळी त्यामध्ये पितृत्व आले. पुत्राच्या जन्मापूर्वी तो पिता नव्हता. त्याचे पिता हे नाव पुत्राच्या जन्मक्षणी पडले. म्हणून पिता व पुत्र दोन्ही एकाच समयात उत्पन्न झाले असे म्हटले. याचप्रमाणे ज्ञान व ज्ञेयाचा ग्राह्यग्राहक संबंध एकाच काळात आहे. ज्या काळात ज्ञानाने घट जाणला त्याकाळात घट ज्ञानाचे ज्ञेय बनले व ज्ञान घटाचे ज्ञायक बनले.

ज्ञान–ज्ञेय संबंधामध्ये निश्चय–व्यवहाराचा समन्वय–

निश्चयनयाने ज्ञान आणि ज्ञेय आपापल्या स्थानी आहेत. कोणी कोणामध्ये घुसले नाहीत. तरीसुद्धा जाणण्याच्या अपेक्षेने ज्ञान ज्ञेयामध्ये गेले व जाणले जाण्याच्या अपेक्षेने ज्ञेय ज्ञानामध्ये गेले असा व्यवहार होतो. ज्याप्रमाणे डोळा आपल्या स्थानी आहे व पदार्थ आपापल्या स्थानी आहेत. परन्तु डोळ्यांनी पदार्थांना पाहिले म्हणून असे म्हटले जाते की हे सर्व पदार्थ आमच्या दृष्टीमध्ये आले व आमची दृष्टी सर्व पदार्थांमध्ये गेली. पाहण्याच्या अपेक्षेने दृष्टी सर्व पदार्थांमध्ये गेली. पाहण्याच्या अपेक्षेने दृष्टी सर्वामध्ये आहे, परन्तु वास्तविक आमचे डोळे सर्वामध्ये नाहीत व दृश्य पदार्थ आमच्या डोळ्यात नाहीत.जर डोळे पदार्थामध्ये गेले तर दिसणे बंद होईल. कारण डोळे पदार्थरूप झाले. पदार्थ डोळ्यामध्ये घुसले तर अग्नीला पाहताना डोळे जळून जातील, बर्फाला पाहताना डोळे थंडगार होतील.तसे तर होताना दिसत नाही. म्हणून डोळा पदार्थामध्ये व पदार्थ डोळ्यामध्ये न घुसता पाहण्याची क्रिया होते. त्याप्रमाणे ज्ञान व ज्ञेयाचा संबंध आहे. ज्ञान पदार्थाला जाणत असताना पदार्थ ज्ञानरूप होत नाही व ज्ञान पदार्थरूप होत नाही. जाणणे मात्राच्या अपेक्षेने दोघांचा संबंध सांगितला जातो. ज्ञान व ज्ञेयाचा संबंध नेत्रेन्द्रियाप्रमाणे आहे, ज्याप्रमाणे नेत्र अग्नीला पाहतात परन्तु जळत नाहीत. डोळे पदार्थांना दूर राहूनच पाहतात म्हणून अप्राप्यकारी आहेत अर्थात त्या पदार्थाला प्राप्त होत नाहीत, त्या पदार्थांजवळ जात नाहीत. म्हणून ज्ञानाला डोळ्याची उपमा दिली जाते. त्याला जीभ, नाक अथवा स्पर्शनेंद्रियाची उपमा दिली जात नाही.

ज्ञान व ज्ञेयाचे सामर्थ्य–

पदार्थ ज्ञानीला आपला आकार समर्पित करण्यामध्ये कुशल आहेत व ज्ञानी त्या पदार्थांच्या आकाराला ग्रहण करण्यामध्ये कुशल आहे. ज्याप्रमाणे आरशासमोर कोणतीही वस्तू ठेवली तर ती वस्तू आरशाला आपला आकार समर्पित करते व आरसा त्या आकाराला ग्रहण करतो. प्रत्यक्षात ती वस्तू आरशात घुसली नाही व आरसा त्या वस्तूमध्ये घुसला नाही, परंतु वस्तूंनी आपला आकार सोपविला व आरशाने त्याला ग्रहण केले

त्यामुळे त्यात प्रतिबिंब उत्पन्न झाले. हा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. याचप्रमाणे ज्ञेयपदार्थाने आपला आकार ज्ञानाला सोपविला व ज्ञानाने त्याचा आकार ग्रहण केला. ज्ञेयपदार्थ आपला आकार समर्पित करण्यामध्ये चतुर आहेत व ज्ञान त्याचा आकार ग्रहण करण्यामध्ये चतुर आहे. म्हणून ज्ञान व ज्ञेयामध्ये संबंध स्थापित झाला.

ज्ञान व ज्ञेयाचा व्यवहाराने परस्पर संबंध असूनही त्यांचा परस्परामध्ये अत्यन्ताभाव आहे. अज्ञानी ज्ञेयपदार्थाशी तन्मय होतो व त्याला आपले मानतो. कोणीतरी आपल्याला शिवी दिली. ती शिवी आमच्यात आली नाही व आम्ही शिवीमध्ये गेलो नाही, फक्त ती शिवी आमच्या ज्ञानाचे ज्ञेय बनली, परंतु हा अज्ञानी जीव त्याला केवळ ज्ञेय न मानता त्यामध्ये अनिष्टबुद्धी करतो.शिवी भाषावर्गणेचे एक परिणमन आहे. वास्तविक कोणताही शब्द इष्ट नाही व अनिष्टही नाही.

ज्ञानाचा शब्दाबरोबर केवळ ज्ञेयज्ञायक संबंध आहे. आपला मुलगा सुद्धा ज्ञेय आहे व शेजाऱ्यांचा मुलगासुद्धा ज्ञेय आहे. परंतु हा जीव आपल्या पुत्रावर मोह करतो, शेजाऱ्यांच्या मुलावर मोह करीत नाही. ज्याप्रमाणे दुसऱ्याच्या मुलाला ज्ञानाने जाणले तरी मोह होत नाही त्याचप्रमाणे स्वत:च्या मुलाला सुद्धा ज्ञानाने जाणावे; परंतु मोह करू नये. घर, स्त्री, पुत्र, शरीर, सर्व ज्ञेय आहेत. त्यांचा संयोग क्षणिक आहे. क्षणिक पदार्थाचा मोह करून पदरी दु:खच येणार. ज्ञेयभूत वस्तू पर आहे. याचा आश्रय करून जीव विकल्परूप परिणमतो आणि स्वत:वर संकट ओढवून घेतो. अनादिकाळापासून विकल्पांचे ओझेच ह्या जीवांनी वाढविले आहे.

निर्लेप आत्मतत्त्वाची भावना-

येथे ही भावना करावी, की मी जीव आहे. म्हणून मी ज्ञानस्वभावी आहे. मी स्वतंत्र चैतन्यमय पदार्थ आहे. मी कोणत्याही ज्ञेयपदार्थामध्ये प्रवेश करीत नाही. माझ्यामध्ये कोणतेही ज्ञेयपदार्थ प्रवेश करीत नाहीत, निंदा व स्तुतीचे वचन माझ्यामध्ये घुसत नाहीत. माझा त्याच्याशी कोणताही संबंध नाही. ज्ञान ज्ञान आहे. ज्ञेय ज्ञेय आहेत. आत्मा ज्ञानमय आहे, सर्व

परज्ञेयापासून भिन्न आहे अशी भेदभावना भावावी. आत्म्याचे हित सहज धर्मरूप परिणमण्यामध्ये आहे. त्यासाठी आत्म्याचे स्वरूप जाणणे आवश्यक आहे.

मागील गाथेमध्ये हे सिद्ध केले आहे की ज्ञान व ज्ञेयाचा परस्परामध्ये प्रवेश नाही. आता या गाथेमध्ये हे सिद्ध करतात की ज्ञानी पदार्थांमध्ये प्रविष्ट न होता सुद्धा प्रविष्ट होऊन पदार्थांना जाणतात, ज्ञानी पदार्थांमध्ये प्रवृत्त होत नाही तथापि त्याची अन्य पदार्थामध्ये प्रवृत्ती होते अशी शक्तिविचित्रता प्रकाशित करतात.–

ण पविट्ठो णाविट्ठो णाणी णेयेसु रूवमिव चक्खू ।
जाणदि पस्सदि णियदं अक्खातीदो जगमसेसं ।।२९।।

अन्वयार्थ– (चक्खू रूवमिव) ज्याप्रमाणे डोळा पदार्थामध्ये प्रविष्ट न होता तसेच अप्रविष्ट न होता रूपाला पाहतो त्याप्रमाणे **(णाणी)** आत्मा **(णेयेसु)** ज्ञेय पदार्थांमध्ये **(ण पविट्ठो)** प्रविष्ट न होता व **(णाविट्ठो)** अप्रविष्ट न होता अर्थात प्रविष्ट होऊन **(असेसं जगं)** संपूर्ण विश्वाला **(अक्खातीदो)** इन्द्रियातीत होऊन **(णियदं)** निश्चितपणे **(जाणदि पस्सदि)** जाणतो व पहातो.

आत्मा ज्ञानाच्या अपेक्षेने पदार्थांमध्ये प्रविष्ट होऊन व प्रदेशांच्या अपेक्षेने पदार्थांमध्ये प्रविष्ट न होऊन संपूर्ण पदार्थांना जाणतो हे या गाथेचे तात्पर्य आहे.

पदार्थामध्ये गमन न करता ज्ञानक्रिया–

ज्ञानी पदार्थामध्ये प्रविष्ट नाही व अप्रविष्ट सुद्धा नाही.ज्ञानी ज्ञेयामध्ये आहे व ज्ञेयामध्ये नाहीसुद्धा. ज्ञान आपल्या प्रदेशाला सोडत नाही तरीसुद्धा ज्ञेयाला जाणते. ज्याप्रमाणे डोळा आपल्या जागेला सोडत नाही तरीसुद्धा पदार्थांना पाहण्याचे काम करतो, त्याचा जो काही आकार-प्रकार आहे त्याला स्वीकारतो त्याप्रमाणे हा आत्मा सुद्धा आपल्या स्थानाला न सोडता पदार्थांना जाणतो. ज्याप्रमाणे पदार्थामध्ये प्रवेश न करतासुद्धा डोळा पाहण्याच्या अपेक्षेने त्यामध्ये प्रवेश करतो. आपल्या स्थानी राहूनच हा डोळा

पदार्थांना पहाण्यामध्ये निमित्त आहे त्याप्रमाणे पदार्थामध्ये प्रवेश न करतासुद्धा आत्मा जाणण्याच्या अपेक्षेने त्यामध्ये प्रवेश करतो.ज्याप्रमाणे चक्षू अप्राप्यकारी असल्यामुळे पदार्थाला स्पर्श करून जाणत नाही. तरीसुद्धा पदार्थाच्या आकाराला आत्मसात करीत प्रविष्ट होऊन पाहतो. त्याचप्रमाणे आत्मासुद्धा इन्द्रियातीत असल्यामुळे स्पर्श करून जाणण्या-पाहण्याच्या विचारापासून सुद्धा दूरच आहे. ज्ञेयभूत सर्व वस्तूंना स्वप्रदेशांनी स्पर्श न करता सुद्धा शक्तिवैचित्र्यामुळे वस्तूमध्ये असणाऱ्या सर्व ज्ञेयाकारांना आत्मसात करीत अप्रविष्ट न राहता जाणतो व पाहतो. अशाप्रकारे विचित्र शक्तियुक्त आत्म्याचा पदार्थांमध्ये अप्रवेशाप्रमाणे प्रवेशसुद्धा सिद्ध होतो.

पदार्थांना जाणण्याकरिता ज्ञान पदार्थामध्ये प्रवेश करते असे मानले तर भूत-भविष्यामध्ये ज्ञान पोहचू शकणार नाही, कारण भूत आणि भविष्याचे परिणमन वर्तमानामध्ये असत् आहे त्यामध्ये कसे पोहचणार? तेव्हा भूत भविष्य अज्ञेय झाल्यामुळे असत् होतील तर त्याला ज्ञान जाणू शकणार नाही. ज्ञानाने ज्ञेयाला जाणल्यामुळे ज्ञेयामध्ये कोणतीही बाधा उत्पन्न होत नाही अर्थात ज्ञेयामध्ये कमी-अधिकपणा होत नाही व ज्ञेय ज्ञानामध्ये जाणले गेले म्हणून ज्ञानामध्ये कोणतीही बाधा उत्पन्न होत नाही. ज्याप्रमाणे कोणी आपल्याला अपशब्द बोलले तर त्या अपशब्दाचे ज्ञान आपल्याला झाले. त्यामुळे आपल्याला कोणतीही बाधा होत नाही. जर कोणती बाधा उत्पन्न होते तर तो ज्ञानस्वभाव नाही, तो जाणण्याचा दोष नाही, इन्द्रियज्ञानाचा दोष आहे. इन्द्रियज्ञानाबरोबर रागद्वेष अनिवार्य उत्पन्न होतात. केवली भगवंतांमध्ये रागद्वेष नाहीत, त्यामुळे त्यांच्या ज्ञानामध्ये कोणतीही बाधा होत नाही. कोणी त्यांची निंदा करो अथवा स्तुती करो. त्यांच्या ज्ञानाचे ते केवळ ज्ञेय बनते.

केवलज्ञानींच्या ज्ञानामध्ये तिन्ही लोक व तिन्ही काळातील सर्व पदार्थ आले आहेत. जणू असे वाटते की केवलज्ञानींनी सर्व पदार्थांना गिळंकृत केले आहे. ज्ञान सर्व पदार्थांना जाणते, परंतु ते ज्ञान आपल्या प्रदेशांना सोडून जात नाही, यावरून हे सिद्ध होते की ज्ञान पदार्थांमध्ये प्रवेश करीत नाही व करतेसुद्धा. निश्चयाने प्रवेश करीत नाही व व्यवहार नयाने जाणण्याच्या

अपेक्षेने प्रवेश करते.

ज्ञेयाकार दोन प्रकारचे आहेत–१) बहिर्ज्ञेयाकार २) अन्तर्ज्ञेयाकार. बहिर्ज्ञेयाकार ज्ञेयपदार्थांमध्येच आहेत. ते आत्म्याहून भिन्नच आहेत. वस्तूंचे आकार वस्तूंपासून अभिन्न आहेत. ते वस्तूला सोडून अन्यत्र राहू शकत नाहीत. आकार म्हणजे स्वरूप. वस्तूचे स्वरूप वस्तूला सोडून ज्ञानामध्ये जाऊ शकत नाही. अन्तर्ज्ञेयाकार ही आत्म्याची ज्ञेयाला जाणणेरूप स्वत:ची परिणती आहे. आत्मा अन्तर्ज्ञेयाकारांमध्ये प्रविष्ट आहे. अन्तर्ज्ञेयाकार आत्म्यामध्ये प्रविष्ट आहेत. बाह्य ज्ञेयाकार आत्म्यामध्ये प्रविष्ट नाहीत. आत्मा बाह्य ज्ञेयाकारांमध्ये प्रविष्ट नाही. उदा. शरीराची रोगमय अवस्था ज्ञानामध्ये जाणली गेली तेव्हा ती अवस्था ज्ञानामध्ये गेली नाही. ज्ञान त्या रोगमय अवस्थेत गेले नाही. शरीराची रोगी अवस्था फक्त ज्ञानामध्ये जाणण्यायोग्य आहे.शरीराची अवस्था ज्ञानाची नाही. हा जीव प्रत्येक समयाला ज्ञेय पदार्थाला जाणत असतो, परंतु ज्ञान व ज्ञेयामध्ये भेद करीत नाही. दोघांना एक मानतो. ज्ञेयानुसार विकल्प करून त्यामध्ये परिवर्तन करण्याचे भाव करतो व त्यामुळे दु:खी होतो.

ज्ञानाची स्वाभाविक कला–

आत्मा व आत्म्याचे केवलज्ञान अपूर्व शक्तिसंपन्न आहेत. ज्ञान गुण ज्ञानीहून भिन्न राहू शकत नाही. म्हणून ज्ञान गुणाद्वारे आत्मा सर्व जगाला जाणतो व पहातो, असा ज्ञानाचा स्वभावच आहे. ज्ञान स्वत:हून तीन जगातील पदार्थांच्या तीन कालवर्ती अवस्थांना एकाच समयात जाणण्यास समर्थ आहे. ज्याप्रमाणे स्वच्छ आरशाला इच्छा नसताना सुद्धा त्याच्या समोर असणारे सर्व पदार्थ स्वत:हून झळकतात त्याप्रमाणे निर्मळ केवलज्ञानामध्ये सर्व विश्व स्वयं झळकते. ज्याप्रमाणे आरसा आपल्या स्थानावर आहे व पदार्थ आपल्या स्थानावर आहेत. तरीसुद्धा आरशामध्ये प्रवेश केल्याप्रमाणे व आरसा त्यामध्ये प्रवेश केल्याप्रमाणे प्रतिभासित होते. त्याप्रमाणे केवलज्ञान आपल्या स्थानावर आहे व ज्ञेय पदार्थ आपल्या स्थानावर आहेत. कोणी कोणामध्ये प्रवेश करीत नाही. तरीसुद्धा ज्ञेयज्ञायक संबंधाने सर्व ज्ञेय ज्ञानात

झळकतात, तेव्हा असे वाटते की जणू आत्म्याच्या ज्ञानामध्ये सर्व विश्व समाविष्ट झाले आहे. अथवा हा आत्मा सर्व विश्वामध्ये व्यापक झाला आहे. निश्चयाने ज्ञाता ज्ञेयांमध्ये प्रवेश करीत नाही, तरीसुद्धा व्यवहाराने म्हटले जाते की आत्म्याने ज्ञेयांमध्ये प्रवेश केला आहे. ज्ञानाची अशी अद्‌भुत महिमा जाणून आमचे हे कर्तव्य आहे की त्या ज्ञानशक्तीला प्रफुल्लित करण्याचा उपाय करावा. आत्मशक्तीला विकसित करण्याचा एकच उपाय आहे निज आत्मानुभव अर्थात शुद्धोपयोग. सतत भेदविज्ञानाच्या द्वारे शुद्ध आत्म्याची भावना करावी. अन्य व्यर्थ संकल्प विकल्पापासून परावृत्त व्हावे.

बाह्य ज्ञेयाकाराहून भिन्न अन्तर्ज्ञेयाकार परिणत स्वत:ला निरखून अन्तर्ज्ञेयाकार परिणमनाचे स्रोतभूत सहज चैतन्य स्वभावाला आत्मरूप अनुभवावे.

ज्ञान पदार्थांमध्ये प्रविष्ट न होतासुद्धा प्रविष्ट झाल्याप्रमाणे सर्व पदार्थांना जाणते ही गोष्ट मागच्या गाथेमध्ये सिद्ध केली आहे. आता या गाथेत ज्ञान कशाप्रकारे पदार्थांमध्ये प्रवृत्त होते हे दृष्टान्तपूर्वक स्पष्ट करतात.–

रयणमिह इंदणीलं दुद्धज्झसियं जहा सभासाए।
अभिभूय तं पि दुद्धं वट्टदि तह णाणमत्थेसु ।।३०।।

अन्वयार्थ– (जहा) ज्याप्रमाणे **(इह)** या लोकात **(दुद्धज्झसियं)** दूधामध्ये पडलेले **(इंदणीलं)** इंद्रनील रत्न **(सभासाए)** आपल्या प्रभेद्वारे **(तं पि दुद्धं)** त्या दुधामध्ये **(अभिभूय)** व्यापून **(वट्टदि)** राहते. **(तह)** त्याचप्रमाणे **(णाणं)** ज्ञान **(अत्थेसु)** पदार्थांमध्ये व्यापून राहते.

आत्मा ज्ञानप्रभेद्वारे संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो म्हणून तो सर्वव्यापक आहे असा ज्ञानाचा महिमा येथे गायिला आहे.

दृष्टांतपूर्वक ज्ञानाच्या अर्थव्यापकतेचे कथन–

अनेक रत्नांमध्ये इंद्रनील नावाचे एक रत्न आहे. ते निळ्या रंगाचे असते. ते रत्न दूधामध्ये टाकले असता ते संपूर्ण दुधाला निळे करते. ते रत्न आपल्याच आकाराने दूधामध्ये स्थित राहून दुधाच्या आकाररूपाने न होता सुद्धा केवळ आपल्या प्रभेने सर्व दुधामध्ये व्याप्त होते. अर्थात दुधाचा पांढरा

स्वभाव तिरस्कृत होऊन त्याचा निळा रंग दिसतो तेव्हा व्यवहाराने असे म्हटले जाते की इंद्रनील रत्न सर्व दूधामध्ये व्यापक आहे. त्याचप्रमाणे आत्म्याचे केवलज्ञान आपल्या आकाररूपाने राहून ज्ञेय पदार्थांच्या आकाररूपाने न परिणमन करता आपल्या अपूर्व ज्ञान सामर्थ्यांने सर्व ज्ञेय पदार्थांना एकाच वेळेस जाणते म्हणून त्यास सर्वव्यापक म्हणतात. वास्तविक ज्याप्रमाणे इंद्रनील रत्न आपल्या आकाराला सोडत नाही. त्याचे परिणमन आपल्या क्षेत्राच्या बाहेर नाही. स्वक्षेत्राच्या बाहेर रत्नाचा गुणपर्याय नाही. इन्द्रनील रत्नाच्या सान्निध्याला निमित्त करून दूध स्वयं निळे प्रतिभासित होते म्हणून उपचाराने असे म्हटले जाते की, इन्द्रनीलरत्न दूधामध्ये व्यापून आहे त्याप्रमाणे ज्ञान स्वक्षेत्राला सोडून बाहेर जात नाही. ज्ञानाचे परिणमन ज्ञानामध्येच होते. ज्ञानाला निमित्त करून ज्ञेय ज्ञानामध्ये प्रतिभासित होते म्हणून व्यवहाराने असे म्हटले जाते की ज्ञानाने ज्ञेयपदार्थांना जाणले.

ज्याप्रमाणे दूधाने भरलेल्या भांड्यामध्ये इंद्रनील रत्न आपल्या प्रभेने सर्व दूधाला निळे करून टाकते हे व्यवहार कथन आहे. निश्चयाने इंद्रनील रत्न स्वत:च स्वत:ला नीलवर्णरूप करते. त्याप्रमाणे ज्ञानाने पदार्थांना जाणले हे व्यवहारकथन आहे. वास्तविक ज्ञान स्वत:च स्वत:ला जाणते.

जर निळा रंग दूधामध्ये टाकला तर दूध निळे होते. त्या दूधापासून निळा रंग वेगळा करता येत नाही, परन्तु इंद्रनील रत्न दूधातून वेगळे करता येते व ते वेगळे काढले तर ते दूध आहे तसे पांढरे शुभ्र दिसते. याचा अर्थ असा की रत्न दुधामध्ये प्रवेश करत नाही. जेव्हा ते रत्न दूधामध्ये आहे तेव्हा ते दूध निळे दिसते; परंतु तेव्हासुद्धा ते पांढरेच आहे. निळे नाही.इंद्रनील रत्नाचा निळेपणा दूधामध्ये थोडासुद्धा गेला नाही व न इंद्रनील रत्नाने दूधामध्ये प्रवेश केला आहे. त्याप्रमाणे ज्ञान ज्ञेयाला जाणत असतानाही ज्ञेयामध्ये प्रवेश करीत नाही किंवा ज्ञेय ज्ञानरूप होत नाही.

ज्याप्रमाणे दूधात बिस्किट टाकले तर त्याच्या कणाकणात दूध घुसते ते बिस्किट गळून जाते व दूधाशी एकरूप होते त्याप्रमाणे इंद्रनील रत्नाच्या कणाकणात दूध घुसत नाही व इंद्रनील रत्न गळून एकरूप होत नाही. दूधाचा एक कण सुद्धा इंद्रनील रत्नामध्ये शिरला नाही. जेथे इंद्रनीलरत्न आहे तेथे दूध नाही आणि जेथे दूध आहे तेथे इंद्रनील रत्न नाही. तरीसुद्धा दूध निळे दिसते.

त्याचप्रमाणे ज्ञान ज्ञेयांना जाणते आणि ज्ञेय ज्ञानामध्ये जाणले जातात तरीसुद्धा ज्ञान ज्ञेयामध्ये थोडेसुद्धा घुसत नाही व ज्ञेय ज्ञानामध्ये घुसत नाहीत. ज्ञान आपल्या स्थानी राहूनच ज्ञेय पदार्थांना जाणते व ज्ञेय पदार्थ स्वस्थानी राहूनच जाणले जातात. ज्याप्रमाणे इंद्रनील रत्नाचा निळेपणा दूधामध्ये गेला आहे असे दिसते त्याचप्रमाणे ज्ञान ज्ञेयामध्ये गेले आहे असे भासित होते. जरी इंद्रनील रत्न दुधामध्ये कणमात्रसुद्धा गेले नाही तरीसुद्धा असे म्हटले जाते की ते पूर्ण दुधामध्ये व्याप्त आहे. कारण त्या रत्नाच्या प्रभेने सर्व दूध प्रभावित झाले आहे त्यामुळे संपूर्ण दूध निळे दिसत आहे. म्हणून इंद्रनील रत्न दूधात आहे असे म्हटले जाते.

त्याचप्रमाणे ज्ञान ज्ञेयामध्ये गेले नाही तरीसुद्धा ज्ञानाने त्या ज्ञेयाला जाणले. या अपेक्षेने ज्ञानाला सर्वगत म्हटले जाते. ज्ञेयामध्ये न जाता, ज्ञेयामध्ये थोडाही हस्तक्षेप न करता ज्ञेयाला जाणणे हा ज्ञानाचा स्वभाव आहे.

ज्याप्रमाणे इंद्रनील रत्न दूधामध्ये टाकल्यावर दूध खराब होईल किंवा इंद्रनील रत्न खराब होईल अशी चिंता करण्याचे कारण नाही. किती वेळाही इंद्रनील रत्नाला दूधामध्ये टाकले तरी व नाही टाकले तरी दूधामध्ये काही फरक होत नाही. त्याप्रमाणे ज्ञानाने ज्ञेयांना जाणले तरी व जाणले नाही तरी ज्ञेयपदार्थांमध्ये काहीही फरक पडत नाही व ज्ञेय ज्ञानामध्ये जाणले गेले तरी ज्ञानामध्ये काही फरक पडत नाही.

ज्ञान ज्ञेयाला जाणो अथवा न जाणो. ज्ञान ज्ञान आहे. ज्ञेय ज्ञानामध्ये जाणले जावोत अथवा न जाणले जावोत, ज्ञेय ज्ञेयच आहेत. ज्ञान विश्वातील सर्व पदार्थांना जाणते. परंतु ते विश्वरूप होत नाही किंवा विश्व ज्ञानरूप होत नाही.

सर्व संसारापासून विरक्त, जंगलामध्ये निवास करणाऱ्या आचार्यांनी किती सार्थक दृष्टांत शोधून काढला आहे. या दृष्टांतावरून ज्ञानाचा ज्ञेयावर प्रभाव पडून सुद्धा ज्ञान कसे निर्लेपस्वभावी आहे हे स्पष्ट होते. ज्ञानाचा महिमा अगाध आहे. अपरंपार आहे. पर्यायामध्ये सर्वज्ञता प्रकट करण्यासाठी प्रथम ज्ञानाच्या सर्वज्ञता स्वभावाचा ज्ञानामध्ये निर्णय करणे आवश्यक आहे. बिल्डिंग तयार करण्यापूर्वी इंजिनिअरच्या ज्ञानामध्ये बिल्डिंगचा नकाशा तयार होतो, तशाचप्रकारे ज्ञानामध्ये उमटलेल्या बिल्डिंगचे चित्र कागदावर रेखाटतो

व त्याच पद्धतीने बिल्डिंग तयार होते. म्हणून प्रथम आमच्या ज्ञानामध्ये सर्वज्ञतेचे चित्र रेखाटले गेले तर पर्यायात सर्वज्ञता व्यक्त होईल.

परमार्थ ज्ञानाची स्वव्यापकता–

ज्ञानामध्ये सर्व ज्ञेय पदार्थांचे प्रतिबिंब पडते, जो पदार्थांचा आकार ज्ञानामध्ये आहे त्याला निमित्त कारण बाह्य पदार्थ आहे म्हणून उपचाराने त्या ज्ञानाकाराला पदार्थ म्हणतात. ज्ञानामध्ये झळकलेल्या पदार्थांचा आकार हा वास्तविक ज्ञानाचाच पर्याय आहे. त्यास अंतर्ज्ञेयाकार म्हणतात. अंतर्ज्ञेयाकार बाह्य पदार्थांच्या अनुरूप असतो म्हणून अंतर्ज्ञेयाकारालाही पदार्थ म्हटले जाते. ज्ञान वास्तविक ज्ञानामध्ये प्रतिबिंबित अंतर्ज्ञेयाकारामध्ये व्याप्त असते परंतु उपचाराने ज्ञान पदार्थामध्ये आहे असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे आरशामध्ये मोराचे प्रतिबिंब पडले. त्या आरशामध्ये जो मोराचा आकार आहे तो आरशाचा आकार आहे, मोराचा नाही. त्या आरशामध्ये झळकलेल्या मोराच्या आकाराला निमित्त कारण बाहेरचा मोर आहे. म्हणून उपचाराने आरशातील आकाराला ही मोर म्हणतात. मोर वास्तविक मोरामध्ये आहे. आरसा आरश्यामध्ये आहे. आरशामध्ये झळकलेला मोराचा आकार आरसाकार आहे ती आरशाची स्वच्छगुणाची पर्याय आहे, मोराची नाही. कारण कोणत्याही द्रव्याची पर्याय द्रव्याच्या क्षेत्राला सोडून दुसऱ्या क्षेत्रामध्ये होत नाही. जे द्रव्याचे क्षेत्र तेच पर्यायाचेसुद्धा क्षेत्र असते. मोर बाहेर व त्याची पर्याय आरशामध्ये झाली असे होऊ शकत नाही. त्याप्रमाणे ज्ञान ज्ञानामध्ये आहे व पदार्थ पदार्थामध्ये आहेत. ज्ञानामध्ये झळकलेला पदार्थाचा आकार हा ज्ञानाकार आहे. ती ज्ञानाची पर्याय आहे. ती ज्ञानाच्या स्वच्छत्वगुणाची पर्याय आहे, पदार्थांची नाही. ज्ञानाची पर्याय आपल्या ज्ञानाच्या क्षेत्राला सोडून बाहेर जात नाही. पदार्थांचा आकार पदार्थांना सोडून ज्ञानामध्ये जात नाही. ज्ञानामध्ये प्रतिबिंबित झालेल्या ज्ञानाकाराला निमित्त बाह्य पदार्थ आहे, म्हणून त्याला पदार्थाचा आकार म्हटला जातो. घटज्ञान, पटज्ञान म्हणणे हे सर्व उपचार कथन आहे. वास्तविक ज्ञान घटाचे नाही किंवा घट ज्ञानाचा नाही. घट घटाचा आहे, ज्ञान ज्ञानाचा आहे.

सर्व दु:खाचे मूळ भ्रम आहे. भ्रमामुळे दोन भिन्न वस्तू भिन्न प्रतीत होत नाहीत. ज्ञान व ज्ञेयामधील भिन्नता लक्षात येत नाही त्यामुळे ज्ञानाला ज्ञेयरूप

व ज्ञेयाला ज्ञानरूप मानतो.

दोन व्यक्ती रेल्वेमधून जात होत्या. एक होता रामू व एक होता शामू . रामू खिडकी बंद करीत होता व शामू खिडकी उघडत होता. दोघेही वरचेवर हे करीत होते. समोर बसलेल्या व्यक्तीने विचारले, तुम्ही काय करीत आहात? एकजण खिडकी उघडतो तर एकजण बंद करतो हे काय चालले आहे. शामू म्हणतो मला खूप उकडत आहे, म्हणून मी खिडकी उघडत आहे तर रामू म्हणतो मला ताप आहे, खूप थंडी वाजत आहे, म्हणून मी खिडकी बंद करत आहे. तेव्हा समोरची व्यक्ती म्हणते तुमच्या दोघांचा उद्योग बेकार आहे, निष्फळ आहे, कारण खिडकीला काच कोठे आहे? भ्रमानेच दोघे दु:खी आहात.

मेंदी हिरवी दिसते, परंतु ती लाल आहे, बर्फ थंड वाटतो, परंतु तो गरम आहे, आत्मा शरीररूप वाटतो, परंतु तो तर चेतन आहे. अज्ञानी जीवाने ज्ञेयाशिवाय कधी ज्ञानाला जाणले नाही, म्हणूनच संसार आहे.

अशाप्रकारे हे सिद्ध केले की ज्ञान कशाप्रकारे पदार्थांमध्ये आहे. आता पुढे पदार्थ ज्ञानामध्ये आहेत अशी संभावना करतात. संभावयति या क्रियापदावरून हे ध्वनित होते की निश्चयाने ज्ञान ज्ञानामध्ये आहे व पदार्थ पदार्थांमध्येच राहतात. तथापि ज्या दृष्टीने ज्ञानाचे पदार्थांमध्ये व्यापणे सांगितले त्याच दृष्टीने पदार्थांचे ज्ञानामध्ये राहणे सांगितले आहे.-

जदि ते ण संति अत्था णाणे णाणं ण होदि सव्वगयं ।

सव्वगयं वा णाणं कहं ण णाणट्ठिया अत्था ।।३१।।

अन्वयार्थ- (जदि) जर **(ते अत्था)** ते पदार्थ **(णाणे)** ज्ञानामध्ये **(ण संति)** नाहीत तर **(णाणं)** ज्ञान **(सव्वगयं)** सर्वगत **(ण होदि)** होऊ शकत नाही **(वा)** आणि जर **(णाणं सव्वगयं)** ज्ञान सर्वगत आहे तर **(अत्था)** पदार्थ **(णाणट्ठिया)** ज्ञानस्थित **(कहं ण)** कसे नाहीत अर्थात अवश्य आहेत.

ज्ञान सर्व पदार्थांना जाणल्यामुळे सर्वगत आहे तर पदार्थ ज्ञानामध्ये स्थित आहेत ही गोष्ट सिद्ध होते.

ज्ञानज्ञेयातील संबंध-

जर विश्वातील सर्व पदार्थ आपल्या ज्ञेयाकारांच्या समर्पणाद्वारे

ज्ञानामध्ये प्रतिभासित झाले नाहीत तर ते ज्ञान सर्वगत होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आरशामध्ये सम्मुखस्थित पदार्थ आपले प्रतिबिंब समर्पण करतात. यद्यपि पदार्थ व पदार्थाचे गुण किंवा पर्याय आरशामध्ये जात नाहीत किंवा आरशाचे गुण पदार्थामध्ये जात नाहीत. पदार्थ व आरशाचा असा सहज संबंध आहे की पदार्थ झळकण्यायोग्य आहेत व पदार्थाचे निमित्त प्राप्त करून आरसा त्या पदार्थांच्या अनुरूप प्रतिबिंब बनवितो. त्याचप्रमाणे पदार्थ व ज्ञानामध्ये सहज निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. पदार्थ आपला आकार ज्ञानाला समर्पित करतात व ज्ञान ज्ञेयाकाराला ग्रहण करते. पदार्थ किंवा पदार्थाचे गुण ज्ञानामध्ये प्रवेश करीत नाहीत व ज्ञानाचे गुण पदार्थांमध्ये प्रवेश करीत नाहीत. पदार्थांना निमित्त करून ज्ञान त्या पदार्थांच्या अनुरूप ज्ञेयाकाररूपाने परिणमते. निश्चयाने ज्ञान आत्मप्रदेशांना सोडून ज्ञेयपदार्थांजवळ जात नाही आणि ज्ञेयपदार्थ आपापल्या प्रदेशांना सोडून ज्ञानामध्ये येत नाही. कोणी कोणामध्ये जात-येत नाहीत. तथापि व्यवहारनयाने जेव्हा सर्व ज्ञेयांचे आकार ज्ञानामध्ये प्रतिबिंबित होतात तेव्हा जाणण्याच्या अपेक्षेने ज्ञान ज्ञेयांमध्ये व्याप्त झाल्यामुळे सर्वगत व सर्वव्यापक आहे. तसेच पदार्थसुद्धा ज्ञानामध्ये प्राप्त, गत व व्याप्त आहेत.

ज्याप्रमाणे आरशामध्ये मोर, बालक, अग्नी, वृक्ष इत्यादिकांचे प्रतिबिंब पडते. निश्चयाने प्रतिबिंब आरशाचीच अवस्था आहे, तथापि आरशामध्ये प्रतिबिंब पाहून मोरादिक आरशात आहेत असे कार्यामध्ये कारणाचा उपचार करून व्यवहाराने म्हटले जाते. बाहेरचा मोर आरशातील मोराच्या प्रतिबिंबाला कारण आहे व आरशातील मोराचे प्रतिबिंब कार्य आहे.म्हणून उपचाराने आरशातील मोराच्या प्रतिबिंबाला मोर म्हटले. त्याचप्रमाणे ज्ञानरूपी आरशामध्ये सर्व पदार्थांच्या आकाराचे प्रतिबिंब पडते अर्थात पदार्थांच्या आकाराच्या निमित्ताने ज्ञानामध्ये ज्ञानाची अवस्था ज्ञेयाकार होते. कारण जर असे नसते तर ज्ञान सर्व पदार्थांना जाणू शकले नसते. तेथे निश्चयाने ज्ञानामध्ये होणारे ज्ञेयाकार ज्ञानाच्या अवस्था आहेत. पदार्थांचे आकार ज्ञानामध्ये प्रविष्ट झाले नाहीत. निश्चयाने असे असतानासुद्धा व्यवहाराने ज्ञानामध्ये होणाऱ्या ज्ञेयाकारांचे कारण पदार्थांचे आकार आहेत व त्या पदार्थांच्या आकाराचे कारण पदार्थ आहेत अशाप्रकारे परंपरेने ज्ञानामध्ये

होणाऱ्या ज्ञेयाकारांचे कारण पदार्थ आहेत, म्हणून त्या ज्ञानाच्या अवस्थारूप ज्ञेयाकारांना ज्ञानामध्ये पाहून कार्यामध्ये कारणांचा उपचार करून व्यवहाराने असे म्हटले जाते की पदार्थ ज्ञानामध्ये आहेत.

ज्ञानस्वभावाच्या अवलंबनाने शाश्वत सुखाची सिद्धी–

निर्मल ज्ञानाचा महिमा अगाध आहे, जगामध्ये जे सत् आहे ते निर्मल ज्ञानाच्या बाहेर नाही. सर्व पदार्थ अवश्य झळकतात. या जीवाने अशा आपल्या उत्कृष्ट वैभवाला तुच्छ गोष्टीच्या पाठीमागे लागून झाकून टाकले आहे. सदैव अंतरंगामध्ये प्रकाशमान हा स्वभाव दृष्टिओझल झाला आहे. धर्म स्वत:मध्येच आहे; परंतु त्याचा पत्ता माहित नसल्यामुळे बाहेर शोधाशोध सुरू आहे.

एक शेठजी होते. त्यांनी वहीखात्यामध्ये लिहून ठेवले होते की मुलांनो, जेव्हा तुम्हाला गरिबी सतावेल तेव्हा थंभसिंहाकडून धन घ्या. शेठजी अचानक स्वर्गवासी झाले. मुले बुद्धिहीन असल्यामुळे व्यापार सर्व ढासळला, मुले निर्धन झाली. मुलांची एक दिवस वहीखात्यामध्ये लिहिलेल्या लेखावर दृष्टी पडली. मुलांनी थंभसिंहाचा खूप शोध घेतला. आजूबाजूची सर्व गावे शोधून पालथी घातली; परंतु थंभसिंह काही मिळाला नाही. त्या मुलांना चिंताग्रस्त पाहून एका बुद्धिमान सज्जन पुरुषाने समजावले कि मुलांनो, थंभसिंह कोठे बाहेर नाही. तो तर तुमच्याच घरात असणार. त्यांच्या घरी जाऊन परीक्षा करून सांगितले की हा खांबच तुमचा दिलदार थंभसिंह आहे. त्यांनी तो खांब उखडला तर तेथून खूप धन निघाले. याचप्रमाणे धर्म करण्यासाठी व सुख प्राप्त करण्यासाठी आपण बाहेर भटकत आहोत.

धर्म–सुख–ज्ञान सर्व स्वत:मध्येच आहे. मोहामुळे व्यर्थच बाहेर भटकून क्लेश भोगत आहोत. आतापर्यंत वेळ गेली ती गेली आता पुढे काय करायचे हे ठरवूया, कर्तव्य केवळ एवढेच आहे की सर्व दृष्टींनी परिपूर्ण स्वचा निश्चय करून अखंड निज सत्चे अभेद स्वभावाने अनुभव करणे.

ज्ञान आणि ज्ञेयाचा असाच स्वभाव आहे की ज्ञानामध्ये ज्ञेयांना झळकावेच लागते. तरीसुद्धा ज्ञेयाला जाणल्यामुळे आनन्द नाही, तर ज्ञानाच्या अविकारतेमुळे आहे असे जाणून ज्ञेयाच्या प्रति थोडेही आकर्षित न होता अविकार सहज ज्ञान स्वभावाची आराधना करावी.

या ज्ञानतत्त्वप्रज्ञापन अधिकारामध्ये मुख्यत: आत्म्याच्या सर्वज्ञस्वभावाची सिद्धी केली आहे. केवलज्ञानी सर्व विश्वाला जाणतात. म्हणून ते सर्वगत आहेत व सर्व विश्व त्यांच्या ज्ञानात झळकते म्हणून सर्व विश्व ज्ञानगत आहे अशाप्रकारे ज्ञान व पदार्थ यांची परस्परामध्ये प्रवृत्ती होते व्यवहाराने ज्ञानीचा ज्ञेय पदार्थांबरोबर ग्राह्य-ग्राहक, ज्ञेयज्ञायक संबंध सत्यार्थ आहे. तरीसुद्धा निश्चयाने ज्ञेयपदार्थाशी भिन्नपणा आहे. ज्ञानी सर्व विश्वाला जाणत असताना सुद्धा सर्व विश्वापासून अत्यन्त वेगळा आहे, भिन्न आहे. ही गोष्ट पुढील गाथेत व्यक्त करतात.-

गेण्हदि णेव ण मुंचदि ण परं परिणमदि केवली भगवं।
पेच्छदि समंतदो सो जाणदि सव्वं णिरवसेसं ।।३२।।

अन्वयार्थ- (केवली भगवं) केवली भगवान **(परं)** पराला **(णेव गेण्हदि)** ग्रहण करीत नाहीत, **(ण मुंचदि)** सोडत नाहीत आणि **(ण परिणमदि)** पररूपाने परिणमत नाहीत **(सो)** ते केवली **(णिरवसेसं सव्वं)** निरवशेषरूपाने सर्वाला **(समंतदो)** सर्व आत्मप्रदेशांतून **(पेच्छदि)** पाहतात व **(जाणदि)** जाणतात.

केवली भगवान संपूर्ण पदार्थांना सर्व बाजूंनी संपूर्णरूपाने जाणतात, पाहतात. परंतु त्यांना ग्रहण करीत नाहीत, सोडत नाहीत व पररूपाने परिणमन करीत नाहीत.

त्यागोपादानशून्यत्व स्वभाव : एक वरदान-

केवली भगवान पर्यायामध्ये सुद्धा ग्रहणत्यागाच्या विकल्पाने रहित आहेत, म्हणून त्यांचे उदाहरण घेतले आहे. वस्तुत: प्रत्येक आत्मा स्वभावानेच परद्रव्याचे ग्रहण करीत नाही परद्रव्याला सोडत नाही व पररूपाने परिणमत नाही. आत्मा अनन्तशक्तींच्या वैभवाने संपन्न आहे. त्या अनन्त शक्तींपैकी ४७ शक्ती समयसार ग्रंथाच्या परिशिष्टामध्ये उदाहरणरूपाने प्रदर्शित केल्या आहेत. त्यामध्ये त्यागोपादानशून्यत्व नावाची शक्ती आहे. आत्मा परद्रव्याचे ग्रहण करू शकत नाही. जेथे ग्रहणच केले नाही तेथे सोडण्याचा प्रश्नच नाही. जर परद्रव्याला ग्रहण केले तर सोडण्याचा प्रश्न उभा राहतो. जसे एखाद्या सज्जन पुरुषाला विचारले की तुम्ही दारू केव्हापासून सोडली? तर तो

रागाने म्हणतो, तुम्ही असा कसा प्रश्न केला? मी दारू पितच नाही तर सोडण्याचा काय प्रश्न? मी दारूला स्पर्शच केला नाही. तसे आत्मा परपदार्थाला ग्रहणच करीत नाही तर सोडण्याचा विकल्पच उरत नाही.

प्रत्येक द्रव्य स्वरूपामध्ये स्थित आहे. प्रत्येक द्रव्य स्वत:च्या गुणपर्यायाशी एकरूप आहे. अन्य द्रव्य व त्यांच्या गुणाशी एकरूप नाही. प्रत्येक द्रव्य स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल, स्वभावरूपाने आहे. ते परद्रव्य, परक्षेत्र, परकाल, परभावरूप कधीही होत नाही तर परद्रव्याचे ग्रहण कसे काय करू शकणार? परद्रव्याने आपली सत्ता सोडली तर त्याचे ग्रहण होईल. जगामध्ये प्रत्येक द्रव्य अनादि-अनंत आहे. कोणतेही द्रव्य स्वत:ची सत्ता सोडत नाही व पराची सत्ता ग्रहण करीत नाही. हाच वस्तूचा स्वभाव वस्तूमध्ये एकाच काळात अस्तित्व व नास्तित्व स्वभावाला सिद्ध करतो, वस्तू आपल्या द्रव्य, क्षेत्र, काल, भावाने अस्तिस्वरूप आहे व परद्रव्य, क्षेत्र, काल, भावाने नास्तिस्वरूप आहे अर्थात् वस्तूमध्ये आपला वस्तुपणा आहे, पराचा वस्तूपणा नाही. अशी स्वतंत्र वस्तुव्यवस्था सिद्ध असताना सुद्धा हा जीव वस्तुव्यवस्थेला न स्वीकारता पराची उठाठेव करीत राहतो. संसारामध्ये हा जीव चोवीस तास हाच धंदा करीत राहतो. हे घ्या, हे सोडा. जुने वस्त्रादी सोडतो, नवीन वस्त्रादी ग्रहण करतो. वास्तविक पाहिले तर हा जीव परवस्तूला ग्रहण करू शकत नाही व सोडतही नाही. वस्तूमध्ये ग्रहणत्याग नाही, विकल्पामध्ये ग्रहण त्याग आहे. झोपडी सोडतो अर्थात झोपडीसंबंधी ममत्व सोडतो, बंगला ग्रहण करतो अर्थात बंगल्यासंबंधी ममत्व ग्रहण करतो. झोपडी झोपडीच्या ठिकाणी आहे, बंगला बंगल्याच्या ठिकाणी आहे. या जीवाने केवळ आपल्या बुद्धीमध्येच बंगल्याचे स्वामित्व ग्रहण केले आहे. या जीवाने आजपर्यंत अनंत पदार्थांना ग्रहण करण्याचे भाव केले, परंतु एकाही पदार्थाला ग्रहण करू शकला नाही. एकाही पदार्थाला आपलेसे करू शकला नाही.

परद्रव्याच्या त्यागाचा सुद्धा अज्ञानी जीव अहंकार करतो की मी एवढी मोठी संपत्ती सोडून दीक्षा घेतली. सर्व वैभवाला लाथ मारून मी साधू बनलो इ. ज्याला त्यागाचा मोह आहे त्याचा त्याग खरा त्याग नाही. तो अद्यापि परद्रव्यावरच लुब्ध आहे. परासंबंधी त्याला महत्त्व वाटते. आपल्या आत्म्याची महिमा येत नाही. बाह्य वस्तूंचा त्याग वस्तूंच्या त्यागाकरीता

नसतो, परन्तु आपल्या विकल्पाच्या त्यागाकरीता असतो. ज्यांनी वस्तूचा त्याग करूनसुद्धा विकल्पांचा त्याग केला नाही, त्यांनी वास्तविक त्याग केलाच नाही.

परिग्रहाच्या सान्निध्यात राहूनसुद्धा ज्यांना विकल्प नाहीत, निर्मोही आहेत, ते श्रेष्ठ आत्मा आहेत व जे परिग्रहापासून दूर राहूनसुद्धा परिग्रहाच्या रागामध्ये आसक्त आहेत, ते विरक्त साधू नाहीत तर मोही आत्माच आहेत.

प्रत्येक वस्तू स्वरूपाने परिणमन करते. पररूपाने परिणमत नाही. आत्म्याचा स्वभाव जाणणे आहे. आत्मा जाणणे रूपानेच परिणमतो. ज्ञानाशिवाय आत्मा दुसरे काहीही काम करीत नाही. अमृतचन्द्राचार्य समयसार कलशामध्ये म्हणतात.–

आत्मा ज्ञानं स्वयं ज्ञानं, ज्ञानादन्यत्करोति किम्।
परभावस्य कर्तात्मा मोहोऽयं व्यवहारिणाम्।

आत्मा स्वयं ज्ञानस्वरूप असल्यामुळे ज्ञानाला सोडून अन्य काहीही करीत नाही. मी परभावाचा कर्ता आहे असे मानणे हा व्यवहारी लोकांचा मोह आहे. आत्म्याच्या अनन्त गुणांमध्ये एक ज्ञानगुण आहे. आपल्या प्रदेशांमध्येच आहे. ज्ञानगुणाची क्रिया होते ती सुद्धा आत्म्यामध्येच होते. चालणे, बसणे, उठणे इ. क्रिया आत्म्याची नाही, त्याची क्रिया जाणणे मात्र आहे. जेवढी क्रिया होणार ती सर्व क्रियावान पदार्थामध्येच होते. ज्ञानाची क्रिया आत्म्यामध्येच होते. भलेही परवस्तूला जाणले तरी ते ज्ञानाचेच परिणमन आहे. परवस्तूचे नाही. परवस्तूचे ज्ञान ही ज्ञानाचीच अवस्था आहे. सम्यग्दृष्टी असो की मिथ्यादृष्टी, स्वत: स्वत:मध्ये ज्ञानरूपच परिणमतो; परंतु मिथ्यादृष्टी हे रहस्य जाणत नाही. बाह्य पदार्थांवर दृष्टी ठेवतो व मानतो की मी बाह्य पदार्थांना जाणतो. मी परद्रव्याचे परिणमन करू शकतो. अशाप्रकारे विकल्पाद्वारे मिथ्यादृष्टी परद्रव्याचा कर्ता होतो. अज्ञानी असो किंवा ज्ञानी असो कोणीही परद्रव्याला परिणमवू शकत नाही. अज्ञानीला परद्रव्याचा कर्ता मानणे हा केवळ त्याच्या मनाचा विकल्प आहे, प्रत्यक्षात नाही.

कोणत्याही वस्तूला जाणण्यामध्ये व करण्यामध्ये खूप मोठे अंतर आहे. दीवाणजी सेठजींच्या करोडो रूपयांच्या कारभाराची व्यवस्था करतो; परंतु त्याचे त्यामध्ये स्वामित्व व कर्तृत्व असत नाही. तो दिवसरात्र व्यापारामध्ये

मग्न दिसतो. व्यापारामध्ये कधी फायदा होतो तर त्याला अंतरंगातून आनंद होत नाही. कधी नुकसान होते तर शोक होत नाही. त्याला अंतरंगातून श्रद्धान आहे की फायदा झाला तरी आपल्याला काही त्यातला भाग मिळणार नाही, नुकसान झाले तरी आपल्या खिशातून काही जाणार नाही. जेवढा पगार मिळायचा तेवढाच मिळणार आहे. तो अकर्तृत्व व अस्वामित्वामुळे मध्यस्थ असतो. सेठजींना त्या व्यापारामध्ये स्वामित्व व कर्तृत्व आहे म्हणून त्यांना हर्षविषाद होतो. जर त्यांना फोन आला की तुमचे एक लाख रूपयांचे नुकसान झाले तर त्यांना हार्ट अॅटॅक येतो. कमीत कमी डोके तरी दु:खतेच. फोनवरून संदेश मिळाला की लाख रूपयांचा फायदा झाला की हर्षाचा उन्माद चढतो. शेठजी तर घरात बसून केवळ फोनवरून बोलतच आहेत. प्रत्यक्ष व्यापार करीत नाहीत; परंतु स्वामित्वभावाने सुखी-दु:खी होतात. दीवाणजी प्रत्यक्ष व्यापार करीत असतानाही सुखी-दु:खी होत नाही. कारण तो स्वत:ला व्यापाराचा कर्ता अथवा स्वामी मानत नाही.

साक्षीभावाचा ठाट-बाट-

आत्मा परद्रव्याचे ग्रहण त्याग करीत नाही व परद्रव्याच्या रूपाने परिणमत नाही. या आपल्या स्वभावाला केवली भगवंतांनी जाणले म्हणून ते स्वतत्त्वभूत केवलज्ञानस्वरूपाने परिणत होऊन निष्कम्प प्रकाशमान ज्योतियुक्त उत्तम मण्याप्रमाणे होऊन स्थिर राहतात. त्यांच्या सर्व आत्मप्रदेशातून दर्शनज्ञान-शक्ती स्फुरायमान होऊन नि:शेषरूपाने संपूर्ण आत्म्याला आत्म्याद्वारे आत्म्यामध्ये जाणतात व अनुभवतात. त्यांच्या ज्ञानामध्ये जाणण्याचे परिपूर्ण सामर्थ्य असून सुद्धा ते कधी विकल्प करीत नाहीत की मी हे जाणले किंवा याला सुद्धा जाणावे. जेथे ज्ञान पूर्ण होते तेथे काहीही इच्छा राहत नाही की याला जाणावे, त्याला जाणावे. जेथे ज्ञान पूर्ण विकसित होत नाही तेथेच इच्छा असतात. ज्ञानाचा पूर्ण विकास झाल्यानंतर मी याला ग्रहण करू की याला सोडू? इत्यादी इच्छा उत्पन्नच होत नाहीत. केवली भगवान संपूर्ण विश्वाला जाणत असतानाही संपूर्ण विश्वापासून अत्यंत विरक्त आहेत. म्हणूनच पं. बाबू युगलजी सिद्ध पूजेमध्ये म्हणतात.-

विज्ञान नगरके वैज्ञानिक तेरी प्रयोगशाला विस्मय।
कैवल्यकलामें उमड पडा संपूर्ण विश्वका ही वैभव।।

पर तुम तो उससे अतिविरक्त नित निरखा करते निज निधियाँ।

जो संपूर्ण विश्वाकडे एकत्वरूपाने पाहतो तो दु:खी होतो. जो संपूर्ण विश्वापासून दृष्टी हटवून एकाला पाहतो तो सुखी होतो. केवली भगवान अनन्त सुखी आहेत त्याचे हेच रहस्य आहे. केवली भगवंतासारखे सुख प्राप्त करण्यासाठी एकच काम करावे की ज्ञानरूपी पडद्यावर ज्या पदार्थांच्या संबंधी परिणमन येऊन नष्ट होत आहे त्या परिणमनावर दृष्टी न देता ज्या ज्ञान पडद्यावर ज्ञेयाकार उत्पन्न होत आहेत, त्या सामान्य ज्ञायक भावाकडे दृष्टी द्यावी. चित्र येतात-जातात; परंतु पडदा जसाच्या तसाच आहे. ज्ञेय येतात-जातात, परंतु ज्ञान स्थिर आहे. अशी ज्ञानरूप वस्तू ज्ञानामध्ये प्राप्त होते. केवळ अनुभवानेच ती प्राप्त होऊ शकते. सदा आपल्यामध्ये एक सामान्य भावाचा सांभाळ करावा. एक सामान्य भावाला सांभाळले तर त्यामध्ये सर्व समाविष्ट होते. पर्याय अनन्त आहेत, सामान्य भाव एक आहे. एकावर दृष्टी ठेवली असता सर्व काही प्राप्त होते. अनेकावर दृष्टी ठेवली की काहीही मिळणार नाही. प.पू. समन्तभद्र महाराज नेहमी म्हणत असत-

एक सधै सब सधै, सब साधै सब जाय।

ज्याप्रमाणे यात्रेला जाताना सर्व महिलांनी परस्परामध्ये विचार केला की रेल्वेमध्ये चढताना, उतरताना सर्वांनी आपापल्या सामानावर नजर ठेवायची, आपापले सामान सांभाळायचे. या दृष्टीने सगळ्यांचे सामान सांभाळले जाईल. जर दुसऱ्यांचे सामान सांभाळू लागलो व आपले सामान सांभाळले नाही तर कुणाचेही सामान सांभाळले जाणार नाही. त्याचप्रमाणे आपापल्या ज्ञायक स्वभावाला सांभाळले तर सर्व सुरक्षित राहील. सर्वांकडे दृष्टी आहे; पण स्वत:कडे दृष्टी नाही तर कुणाचीच सुरक्षितता राहणार नाही. सर्वजण स्वत: स्वत:ला सांभाळू लागले तर सर्व विश्व सुरक्षित आहे. स्वत:ला सांभाळणे हेच धर्माचे मूळ आहे. हीच स्वतंत्र जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. एक निज ज्ञायक भावाला सर्वजण आपल्यामध्ये प्रगट करतील तर सर्वांचा उद्धार होईल. या जगात कोणीही आमचे रक्षण करणार नाही.

भगवंतांसारखे काम करणे जमले नाही तरी निदान त्यांची काम करण्याची शैली तरी आपण समजून घेऊया. केवली भगवान कोणालाही ग्रहण करीत नाहीत; कोणालाही सोडत नाहीत, अन्य रूपाने परिणमन करीत नाहीत.

तरीसुद्धा सर्वांना जाणतात व पाहतात,त्यांच्या ज्ञानाचा विषय सर्व विश्व आहे. याचप्रमाणे आम्हीसुद्धा कोणालाही ग्रहण करीत नाही, कोणालाही सोडत नाही, अन्यरूपाने परिणमत नाही तरीसुद्धा जेवढी वर्तमान ज्ञानामध्ये योग्यता आहे तदनुसार जाणत आहोत.

ज्ञानीची पदार्थांबरोबर ज्ञेयज्ञायक संबंधाने परस्पर प्रवृत्ती होत असतानांही परद्रव्याचे ग्रहण, त्याग व पररूपाने परिणमनाचा अभाव असल्यामुळे अत्यन्त विविक्तपणा आहे. ३२ क्र. गाथेचा अर्थ तीन प्रकाराने केला आहे –

१) प्रथम अर्थ – जीवामध्ये त्यागोपादानशून्यत्व नावाची शक्ती असल्यामुळे केवली भगवान परद्रव्याचे ग्रहण, त्याग व परिणमन करीत नाहीत, ते केवलज्ञानरूपाने परिणमित होऊन सर्व आत्मप्रदेशातून निःशेषरूपाने संपूर्ण आत्म्याचे आत्म्याद्वारे संचेतन करतात. या प्रथम अर्थाचा खुलासा मागील लेखामध्ये केला आहे.

अज्ञानी जीव त्यागोपादानशून्यत्व शक्तीला न जाणता रागाच्या उदयाने परपदार्थांचा संग्रह करण्याचा भाव करतो, द्वेषभावामुळे त्यांना सोडण्याचे भाव करतो, मोहाच्या उदयाने पररूपाने परिणमण्याचे भाव करतो. हा मोहाचाच तीन प्रकाराने विस्तार आहे. राग, द्वेष, मोहामुळेच ग्रहण, त्याग व परिणमन होते. भगवंतांनी या राग, द्वेष,मोहाचा नाश केला आहे म्हणून ते परद्रव्याचे ग्रहण, त्याग व पररूप परिणमन करीत नाहीत. केवळ उत्तम मण्याप्रमाणे निष्क्रिय होऊन स्वतःमध्ये लीन आहेत.

२) दुसरा अर्थ – केवली भगवंताच्या ठिकाणी ज्ञप्तिपरिवर्तनाचा अभाव झाल्यामुळे एका ज्ञेयाला सोडून अन्य ज्ञेयाला ग्रहण करीत नाहीत. अन्य ज्ञेयाकाररूपाने परिणमन करीत नाहीत. सर्व द्रव्यांना सर्व बाजूंनी निःशेषरूपाने जाणतात व पाहतात.

एका ज्ञेयाला सोडून दुसऱ्या ज्ञेयाला ग्रहण करणे यास ज्ञप्तिपरिवर्तन म्हणतात. अल्पज्ञ जीव एकावेळी सर्व पदार्थांना जाणू शकत नाही त्यामुळे त्यामध्ये सतत ज्ञप्तिपरिवर्तनरूप क्रिया चालू असते. एका ज्ञेय पदार्थाला जाणून झाले की लगेच दुसऱ्या पदार्थाला जाणण्याची इच्छा होते. म्हणून पूर्व ज्ञेयपदार्थाला सोडून दुसऱ्या ज्ञेयपदार्थाला जाणायला जातो. पुन्हा त्याला

जाणल्यानंतर तिसऱ्या ज्ञेयपदार्थाला जाणण्याची इच्छा होते. पुन्हा त्याला जाणल्यानंतर अन्य ज्ञेयपदार्थाला जाणण्याची इच्छा उत्पन्न होते. अशाप्रकारे जाणण्याची आकुलता निरंतर वाढतच जाते. छद्मस्थाची परपदार्थासंबंधी जिज्ञासा शांत होत नाही. कारण विश्वामध्ये अनन्त पदार्थ आहेत व अल्पज्ञ जीव एकावेळी एकाच विषयाला जाणू शकतो. जाणून घेण्याची आकुलता निरंतर वृद्धिंगत होत असल्याची प्रत्येक क्षेत्रामध्ये दिसून येते. कोणी विद्यार्थी १० वी उत्तमरीतीने पास झाल्यावर १२ वी सायन्स शिकण्याची इच्छा करतो. त्यामध्ये यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर पुढे एम. बी. बी.एस. त्यानंतर पुढे एम. डी. पुन्हा एखाद्या विषयात स्पेशालिस्ट होण्याची इच्छा होते. अशारीतीने विज्ञानाविषयी जिज्ञासेची मालिका चालूच राहते. केवलज्ञानी मात्र खरे परिपूर्ण वैज्ञानिक आहेत. ते एका समयात संपूर्ण विश्वातील ज्ञेयपदार्थांना जाणतात त्यामुळे त्यांना कोणत्याही विषयाची जिज्ञासा राहत नाही.

कोणी जीव धर्ममार्गामध्ये पदार्पण करतो तेव्हाही जाणून घेण्याची जिज्ञासा वाढत जाते. सर्व प्रथम प्रवेशिका, छहढाला इत्यादी छोटे ग्रंथ शिकण्याची इच्छा करतो. ते शिकल्यावर द्रव्यसंग्रह, तत्त्वार्थसूत्र इत्यादी ग्रंथ आत्मसात करण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर पुन्हा सर्वार्थसिद्धी, पंचास्तिकाय, प्रवचनसार इत्यादी ग्रंथांमध्ये प्रावीण्य मिळविण्याची इच्छा करतो. त्यानंतर पुन्हा जीवकाण्ड, कर्मकाण्ड, लब्धिसार इत्यादी कठीण ग्रंथ समजून घेण्याची इच्छा करतो. त्यानंतर पुन्हा अष्टसहस्री, प्रमेयकमलमार्तण्ड, तत्त्वार्थश्लोकवार्तिक इत्यादी न्यायग्रंथांचा अभ्यास करण्याची अभिलाषा करतो, पुन्हा षट्खंडागमादी महान सिद्धांत ग्रंथाची जिज्ञासा वृद्धिंगत होते. जसजशी जिज्ञासेची पूर्ती होईल तसतशी जिज्ञासारूपी आग वाढतच जाते. कोणी म्हणेल तर मग काय धर्मग्रंथांचा अभ्यास करणे चुकीचे आहे ? नाही. खालच्या सविकल्प भूमिकेमध्ये धर्मग्रंथांचा अभ्यास करणे चुकीचे नाही. आपले मूळ प्रयोजन न विसरता धर्मग्रंथांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शास्त्रस्वाध्याय केवळ क्षायोपशमिक ज्ञान वाढविण्यासाठी नाही, पंडितपणा प्राप्त करण्यासाठी नाही, केवळ जिज्ञासा पूर्तीसाठी अथवा यश ख्याती, पूजा लाभासाठी करायचा नाही, तर शास्त्रस्वाध्याय कशासाठी? **वस्तुस्वरूपाचा निर्णय करण्यासाठी, स्वपरामध्ये भेदविज्ञान करण्यासाठी, परिणामांच्या**

विशुद्धीसाठी, आत्मानुभवासाठी, कर्मनिर्जरेसाठी, कषायाच्या उपशमासाठी, शाश्वत सुख प्राप्त करण्यासाठी स्वाध्याय एक प्राथमिक उपाय आहे. सविकल्प भूमिकेमध्ये अशुभ ध्यानापासून वाचण्यासाठी व शुद्धोपयोगामध्ये जाण्यासाठी स्वाध्याय कर्तव्य आहे.

चामुण्डरायविरचित चारित्रसार ग्रंथामध्ये सुद्धा स्वाध्यायाचे अनेक प्रयोजन सांगितले आहेत. ते याप्रमाणे – **मिथोऽयं स्वाध्यायः प्रज्ञातिशयः, प्रशस्ताध्यवसायः, प्रवचनस्थितिः, संशयोच्छेदः, परवादिशंकाऽभावः, प्रभावना, परमसंवेगः, तपोवृद्धिः, अतीचारविशुद्धिः, कषायेन्द्रियजयः, इत्येवमाद्यर्थं स्वाध्यायोऽनुष्ठेयः ।** (चारित्रसार, पृ. क्र. ६७)

शास्त्रस्वाध्यायाद्वारे यातील किती प्रयोजने मी सिद्ध केली हे स्वाध्यायी लोकांनी स्वतः स्वतःमध्ये तपासून पाहिले पाहिजे. प्रथम **आपणच आपले परीक्षण करणे ही आत्मविकासाची पायरी आहे.** आत्मकल्याण हा शास्त्रस्वाध्यायाचा मुख्य उद्देश आहे. शास्त्र वाचून ज्ञानाचे ओझे वाढवायचे नाही. प्रयोजन न साधता ग्रंथ वाचले तर ग्रंथसुद्धा ग्रंथ (परिग्रह) ठरतील. कोणत्याही कार्यामागचे लक्ष्य विसरलो तर कार्यसिद्धी होत नाही. स्वाध्याय, पूजा, व्रतानुष्ठान इत्यादींचे लक्ष्य एक आत्मानुभव आहे. म्हणून आत्म्याकडे लक्ष ठेवून हे केले तर ते सार्थक होतील. त्याचे योग्य फल मिळेल.

एकदा एक काळी मिरी दोऱ्याला बांधून पिंपळ्याच्या झाडावर अडकवित गुरू द्रोणाचार्यांनी कौरव पाण्डवादी सर्व शिष्यांना सांगितले, ''तुम्ही आपल्या बाणांनी ही मिरी खाली पाडा.'' नंतर क्रमाने प्रत्येक शिष्याला बाणाद्वारे खाली पाडण्याची आज्ञा दिली. त्याचबरोबर बाण सोडण्यापूर्वी प्रत्येक शिष्याला विचारत होते, तुम्हाला या वृक्षाला काळ्या मिरी शिवाय आणखीन काय-काय दिसते ? बहुतेक सर्व शिष्यांचे समान उत्तर होते, ''झाड, बुंधा, फांद्या, डहाळ्या, पाने व पिंपळ.'' त्या शिष्यांपैकी एकजणसुद्धा लक्ष्य भेदू शकला नाही, तेव्हा अर्जुनाला लक्ष्य भेदण्यासाठी आदेश दिला आणि त्यालासुद्धा विचारले की 'हे अर्जुना, तुला काळ्या मिरीशिवाय आणखीन काय-काय दिसते ?' अर्जुनाचे लक्ष काळ्या मिरीकडेच होते, तिकडेच तोंड करून त्याने म्हटले, 'गुरुदेव, येथे काळ्या मिरीशिवाय दुसरे काहीही नाही, मला तुम्हीसुद्धा दिसत नाही, मला माझे

स्वतःचे अस्तित्वसुद्धा माहिती नाही. गुरुदेवांच्या संकेतावर बाण सुटला आणि तो काळी मिरी घेऊन खाली पडला. गुरुदेव अर्जुनाला शाबासकी देऊन अनुत्तीर्ण शिष्यांना म्हणाले, ''आपल्या लक्ष्याला सोडून जो दुसरीकडे दृष्टिपात करतो तो सफल होत नाही. तुम्ही मिरीला न पाहता झाड, बुंधा, फांद्या, डहाळ्या, पाने पाहिली म्हणून तुम्ही त्यालाच भेदू शकला. जर अर्जुनाप्रमाणेच तुमचे लक्ष्य काळी मिरी असते तर तुम्हीसुद्धा काळ्या मिरीला भेदण्यासाठी समर्थ झाला असता.

त्याचप्रमाणे अज्ञानी जीव आत्मज्ञानाला लक्ष्य न बनविता स्वाध्याय, पूजा, व्रतादिकांना आपले लक्ष्य करतो म्हणून केवळ स्वाध्यायादिकच करू शकतो, आत्मज्ञानापासून वंचित राहतो. प्रत्येक शुभक्रियेचे लक्ष्य आत्मा बनविले तर प्रत्येक क्रियेत आत्म्याचे दर्शन होईल. स्वाध्याय करतांना आत्मा दिसेल. पूजेमध्ये आत्मा दिसेल, ध्यानामध्ये, व्रतादिकांच्या आचरणामध्ये केवळ आत्माच दिसेल.

केवलींच्या ठिकाणी ज्ञप्तिपरिवर्तनाचा अभाव –

छद्मस्थ जीवामध्ये ज्ञप्तिपरिवर्तन रूप क्रिया सतत चालू आहे. केवली भगवंतांच्या ठिकाणी ही ज्ञप्तिपरिवर्तनरूप क्रिया विराम पावली आहे. कारण त्यांनी प्रत्यक्ष केवलज्ञानाद्वारे लोक-अलोकातील सर्व द्रव्य, त्यांचे गुण व त्यांच्या त्रिकालवर्ती पर्यायांना एका समयात युगपत प्रत्यक्ष जाणले आहे. त्यामुळे एका ज्ञेयपदार्थाला सोडून दुसऱ्या ज्ञेयपदार्थाला ग्रहण करण्याचे कारण उरले नाही. प्रथम समयातच संपूर्ण विश्वाला निरवशेषरूपाने ग्रहण केले त्यामुळे दुसऱ्या समयात ग्रहण करण्यासाठी नवीन काही शिल्लकच राहिले नाही. प्रथम घासातच संपूर्ण विश्वाला ग्रासीभूत केले. आता नवीन खाण्यासाठी काही उरलेच नाही. म्हणून केवली भगवान कोणत्याही पदार्थाचे जाणणे सोडत नाहीत व कोणत्याही परपदार्थाला नवीन ग्रहण करीत नाहीत.

पहिल्या समयातच विश्वातील संपूर्ण पदार्थांच्या ज्ञेयाकाररूपाने परिणमतात म्हणून पुन्हा अन्य ज्ञेयाकाररूपाने परिणमत नाहीत. सर्व आत्मप्रदेशांतून संपूर्ण विश्वाला पाहतात व जाणतात. ज्याप्रमाणे स्वच्छ आरशाला कोणतीही इच्छा नाही. तरीसुद्धा त्यामध्ये घटपटादी पदार्थ झळकतात. असाच ज्ञानाचा स्वभाव आहे. सर्वज्ञ भगवान इच्छापूर्वक

कोणत्याही पदार्थाला ग्रहण करायला जात नाहीत, परंतु ज्ञानाच्या स्वच्छतेमध्ये लोकालोकातील सर्व पदार्थ स्वयं झळकतात. खण्ड खण्ड रूपाने जाणणाऱ्या क्षायोपशमिक ज्ञानामध्ये परिवर्तन होते व राग उत्पन्न होतो. परंतु केवलींना क्षायोपशमिक ज्ञानाचा अभाव आहे. त्यांना क्षायिक निरावरण केवलज्ञान प्रगट झाले आहे. त्यामुळे एकाचवेळेस संपूर्ण विश्वाला अखंडपणे जाणतात. आत्मा व पदार्थ यांच्यामध्ये व्यवहाराने ग्राह्य-ग्राहक संबंध असला तरी ज्ञान ज्ञेयापासून अत्यंत भिन्न आहे. प्रत्येक आत्मा ज्ञानस्वभावी असल्यामुळे आपल्याच प्रदेशांमध्ये आपल्याद्वारे ज्ञानरूपाने परिणमतो, ज्ञेयरूप होत नाही. समस्त ज्ञेयपदार्थ स्वद्रव्य-क्षेत्र-काल-भावरूप चतुष्टयामध्ये राहून आपापल्या परिणमनरूपाने परिणमतात, ज्ञानरूप होत नाहीत. अशाप्रकारे ज्ञानीच्या ठिकाणी सर्व परपदार्थापासून अत्यंत विविक्तपणा (वेगळेपणा) आहे.

गाथेचा तिसरा अर्थ – जयसेनाचार्यांनी आपल्या तात्पर्यवृत्तीमध्ये असा अर्थ केला-आहे की 'केवली भगवान अंतरंगात कामक्रोधादी विकारी भावांना व बहिरंगामध्ये पाच इंद्रियांच्या विषयरूप पदार्थांना ग्रहण करीत नाहीत व आपल्या आत्म्याच्या अनंत ज्ञानादि चतुष्टयस्वरूपाला सोडत नाहीत.' हेच कारण आहे की केवली भगवान केवलज्ञानाच्या उत्पत्तिकाळामध्येच एकाचवेळी सर्वांना जाणतात व पाहतात. अन्य विकल्परूप परिणमन करीत नाहीत. असे वीतरागी होऊन काय करतात ? आपल्या स्वभावरूप केवलज्ञान ज्योतीने निर्मल स्फटिकमण्याप्रमाणे निश्चल चैतन्य प्रकाशरूप होऊन आपल्या आत्म्याला आपल्या आत्म्याद्वारे आपल्या आत्म्यामध्ये जाणतात व अनुभवतात. म्हणून परद्रव्यांशी एकता नाही, भिन्नताच आहे. ज्याप्रमाणे जेव्हा सोने शुद्ध अवस्थेला प्राप्त होते त्याचवेळी किट्टिमा व कालिमेचा त्याग करते. त्याला पुन्हा ग्रहण करीत नाही व शुद्ध स्वरूपाला सोडत नाही, त्याप्रमाणे जेव्हा आत्मा पूर्ण शुद्ध होऊन स्वतः लवलीन होतो तेव्हा जे काही त्यागण्यायोग्य आहे त्या सर्वांचा त्याग करतो व जे काही ग्रहण करण्यायोग्य आहे त्याचे ग्रहण करतो. राग, द्वेष, मोह, अज्ञान, विषय, कषाय हे त्यागण्यायोग्य आहेत, कारण हे आत्म्याचे मूळस्वरूप नाहीत., विकारीभाव आहेत. ज्याप्रमाणे गटारीतील पाणी पिण्यायोग्य नाही. वमन करण्यायोग्य

आहे म्हणून कोणी शहाणा मनुष्य ग्रहणच करीत नाही, जर चुकून तोंडात गेले तर त्यास थुंकून टाकतो. त्याप्रमाणे रागादी विकारी भाव करण्यायोग्य नाहीत. जरी कर्मोदयाने उत्पन्न झाले तरी ते स्वीकारण्यायोग्य, आदर करण्यायोग्य नाहीत. ते सोडण्यायोग्य आहेत.

या गाथेचा आशय जाणून आपल्या जीवनात प्रयोग – जाणणे हा आत्म्याचा स्वभाव असल्यामुळे परपदार्थ ज्ञानामध्ये आपोआप झळकतात. कोणत्याही परपदार्थाकडे आकर्षित होऊन त्यावर मोह करू नये. कोणत्याही परपदार्थाचा द्वेष करून झिडकारू नये. जसा पदार्थ आहे तसे त्याला जाणून समताभाव ठेवावा व परपदार्थापासून भिन्न आपल्या आत्मस्वरूपाचा अनुभव करावा. बुद्धीमध्ये सर्व रागादी विभाव सोडण्यायोग्य आहेत व एक निज स्वभाव ग्रहण करण्यायोग्य आहे. म्हणून पराला ग्रहण करू नये व स्वतःला सोडू नये.

आतापर्यंत केवलज्ञानींचा महिमा गायिला. आता येथे श्रुतकेवलींचा महिमा गातात. या महिमेद्वारे कार्यशैलीच्या अपेक्षेने केवली व श्रुतकेवलींमध्ये समानता दाखवितात. जाणणे हा आत्माचा स्वभाव आहे. त्यामुळे छद्मस्थ जीव प्रतिक्षण विविध विषयांना जाणून आपले ज्ञान वाढविण्यासाठी प्रयत्न करीत राहतो. जसजसे परविषयक ज्ञान वाढू लागते तसतशी विशेष विशेष जाणण्याची आकुलता वाढत जाते. विशेष जाणण्याच्या इच्छेमुळे हा संसारी जीव दुःखाचा, अशान्तीचा अनुभव करतो. रात्रंदिवस अभ्यासाच्या मागे लागून पुस्तकी कीडा बनतो तरीही शान्ती मिळत नाही. जे ज्ञान सुखाला कारण होऊ शकते तेच ज्ञान या आकुलतेमुळे दुःखाचे कारण बनते या विशेष ज्ञानपिपासू क्षुब्ध जीवाच्या विशेष आकांक्षेचा क्षोभ शान्त करण्याच्या उद्देशाने ही गाथा आचार्यांनी येथे योजिली आहे. ती याप्रमाणे –

जो हि सुदेण विजाणदि अप्पाणं जाणगं सहावेण ।
तं सुदकेवलिमिसिणो भणंति लोयप्पदीवयरा ।।३३।।

अन्वयार्थ – (जो हि) जो निश्चयाने **(सुदेण)** श्रुतज्ञानाच्या द्वारे **(सहावेण जाणगं)** स्वभावाने ज्ञायक **(अप्पाणं)** आत्म्याला **(विजाणदि)** विशेषरूपाने जाणतो. **(तं)** त्याला **(लोयप्पदीवयरा)** लोकाला प्रकाशित करणारे **(इसिणो)** ऋषिगण **(सुदकेवलिं भणंति)** श्रुतकेवली म्हणतात.

केवलींची कार्यशैली –

केवली भगवान पूर्ण विकसित केवलज्ञानाद्वारे अनादी-अनंत, अहेतुक, असाधारण, स्वसंचेत्यमान, चैतन्य सामान्य महिमावन्त, एकत्वस्वरूपी केवळ आत्म्याचे संचेतन करतात म्हणून त्यांना केवली म्हणतात. केवली भगवान विश्वाला जाणतात असे म्हणणे व्यवहार आहे. वास्तविक केवली भगवान केवळ आत्म्याचे वेदन करतात. ज्याप्रमाणे वस्तुतः सूर्य पदार्थांना प्रकाशित करीत नाही. तो तर आपल्या प्रदेशांमध्ये स्वयं प्रकाशमान होतो. जगातील बाह्य पदार्थ त्याच्या निमित्तात येऊन स्वयं प्रकाशित होतात. त्याप्रमाणे केवली भगवान दुसऱ्या पदार्थांना जाणायला जात नाहीत. ते तर स्वयं स्वत:मध्ये केवलज्ञानरूपाने परिणमित होतात स्वत:ला अनुभवण्याचे काम करतात. ज्ञेयपदार्थ त्यांच्या ज्ञानामध्ये येऊन स्वयं जाणले जातात.

केवलज्ञान पूर्ण निरावरण आहे. त्यामुळे संपूर्ण चैतन्याचे विशेष तेथे एकाच वेळेस प्रकट झाले आहेत. केवलज्ञानामध्ये ज्ञानाचा पूर्ण विकास झाला आहे. अशा पूर्ण विकसित केवलज्ञानाने केवली केवळ आत्म्याला जाणतात. अमृतचन्द्र आचार्यांनी टीकेमध्ये आत्म्याची सात विशेषणे दिली आहेत.

१) अनादी – आत्मा अनादी आहे अर्थात त्याला सुरवात नाही. त्याला आई, वडिलांनी, ईश्वरांनी किंवा अन्य कोणीही उत्पन्न केलेले नाही. जे कोणाकडूनही केले गेले नाही त्याला प्रारंभ असत नाही. आत्मा स्वयंभू, परनिरपेक्ष, स्वत:सिद्ध आहे म्हणून अनादी आहे.

२) अनंत – आत्मा अनंत आहे अर्थात याचा कधीही अंत होणार नाही. जसा आता आहे तसाच तो अनंत काळापर्यंत राहणार आहे. अग्नी, वीज, पाणी, विषादिकांद्वारे त्याचा कधीही नाश होऊ शकत नाही.

३) निष्कारण – आत्मा अन्य कोणत्याही पदार्थांना उत्पन्न करीत नाही म्हणून तो अकारण आहे. अनादी अनंत वस्तू कोणाचे कारण होऊ लागली तर कार्य सदैव होण्याचा प्रसंग येईल. कारण वस्तू सदैव मौजूद आहे तर कार्य सतत होत राहील. तसे तर होत नाही म्हणून आत्मा कारण नाही. त्यामुळे त्याला कोणताही कार्यभार नाही. तो निश्चिन्त आहे.

४) **असाधारण –** आत्मा स्वचैतन्य लक्षणाने इतर सर्व द्रव्याहून विलक्षण असामान्य आहे. निराळा आहे. स्ववैशिष्ट्याने विशिष्ट असाधारण आहे.

५) **स्वसंचेत्यमान –** आत्मा स्वयं स्वत:द्वारे अनुभवण्यायोग्य आहे. दुसऱ्या करवी आपल्या आत्म्याचा अनुभव होऊ शकत नाही. स्मृती आदी परोक्षज्ञानाद्वारे अथवा इन्द्रियज्ञानाने आत्मा जाणला जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे साखरेची गोडी स्वत: चाखूनच लक्षात येते त्याप्रमाणे आत्मा स्वानुभव प्रत्यक्षज्ञानानेच अनुभवात येतो म्हणून तो स्वानुभवगम्य आहे.

६) **चैतन्य सामान्य महिमावन्त –** चैतन्याचा महिमा अद्‌भुत आहे. आत्मा आपल्या या चैतन्य सामान्य महिमेने युक्त आहे. दुसऱ्या कोणत्याही पदार्थाद्वारे आत्म्याचा महिमा होऊ शकत नाही. हा चैतन्य स्वभावच तीन लोकांमध्ये सर्वश्रेष्ठ, अनुपम आहे, तीन लोकामध्ये सारभूत आहे. चैतन्याचा चमत्कार अद्‌भुताहून अद्‌भुत आहे.

७) **एकत्वरूप –** चेतक स्वभावाने सदा एकत्वस्वरूपी आहे. चेतक म्हणजेच ज्ञायक. आत्मा पूर्वीही चेतक होता, आताही चेतक आहे, पुढेही चेतकच राहणार. तिन्ही काळामध्ये विज्ञानघन स्वभावी आहे म्हणून एक आहे, शुद्ध आहे. त्यामध्ये दोनपणाचा अभाव आहे. अशा केवळ आत्म्याचे आत्म्याद्वारे अनुभवन करतात म्हणून भगवान केवली म्हटले जातात.

श्रुतकेवलींची कार्यशैली –

श्रुतकेवली श्रुतज्ञानाद्वारे केवळ आत्म्याचा आत्म्याद्वारे आत्म्यामध्ये अनुभवन करतात म्हणून ते श्रुतकेवली आहेत. श्रुतज्ञान हे क्रमश: परिणमणाऱ्या काही चैतन्य विशेषाने युक्त आहे. श्रुतज्ञान हे आवरण सहित असल्यामुळे तेथे चैतन्याच्या काही पाकळ्याच विकसित झाल्या आहेत. श्रुतकवेली सुद्धा पूर्वोक्त सात विशेषणांनी युक्त केवळ आत्म्याला जाणतात.

केवली व श्रुतकेवलीमध्ये अंतर –

जो श्रुतज्ञानाद्वारे केवळ आत्म्याला जाणतो तो श्रुतकेवली व जो केवलज्ञानाद्वारे केवळ आत्म्याला जाणतो तो केवलकेवली म्हटला जातो. परंतु केवल केवलीमध्ये केवल व केवली समान शब्द असल्यामुळे केवल शब्दाचा लोप होऊन केवली तेवढेच शिल्लक राहिले. श्रुतकेवलीमध्ये दोन्ही

शब्द असमान असल्यामुळे दोन्ही ठेवले. केवली केवळ आत्म्याला जाणतात तसेच श्रुतकेवली ही केवळ आत्म्याला जाणतात. दोघांनी एक समान काम केले. फक्त दोघांच्या साधनामध्ये भेद आहे. केवली केवलज्ञानाने जाणतात व श्रुतकेवली श्रुतज्ञानाने जाणतात. साधनामध्ये भेद झाला म्हणून कार्यामध्ये भेद नाही. ज्याप्रमाणे दिवसा सूर्याचा प्रकाश घटादी पदार्थांना जसे प्रकाशित करतो रात्री दिव्याचा प्रकाश घटादी पदार्थांना तसेच प्रकाशित करतो. प्रकाशित करण्यामध्ये अंतर नाही. त्याचप्रमाणे मोक्ष अवस्थेत केवलज्ञानरूपी सूर्याने जसे आत्म्याला प्रकाशित केले तसेच संसार अवस्थेत श्रुतज्ञानरूपी दिव्याने आत्म्याला प्रकाशित केले. **दोघांच्या आत्मसंवेदनामध्ये अंतर नाही.**

जे केवली करतात तेच काम श्रुतज्ञानीसुद्धा करतात तर आम्हाला विशेष जाणण्याचा लोभ करण्याचे काय कारण ? केवलज्ञानींच्या जवळ अपार जाणण्याचे सामर्थ्य असून सुद्धा ते केवळ स्वत:लाच जाणतात तर मग आमच्याजवळ तर थोडेसे ज्ञानधन आहे. त्याद्वारे स्वत:ला जाणण्याचे सोडून सर्व जगाला जाणण्याची इच्छा करून क्षुब्ध होण्याची काय गरज ?

ज्याप्रमाणे एक गरीब मनुष्य दररोज भाकरी, भाजी, डाळ, भात खातो व दोन वस्त्र परिधान करतो. तसेच करोडपतीसुद्धा दररोज भाकरी, भाजी, डाळ, भात खातो व दोन वस्त्र परिधान करतो. फरक एवढाच आहे की करोडपती मसालेयुक्त अन्न खातो व गरीब साधे अन्न खातो. करोडपतिजवळ करोड रूपये असून सुद्धा तो पोटभरच अन्न खातो व गरीबसुद्धा पोटभरच अन्न खातो तर अधिक धन मिळविण्याचा लोभ करून काय उपयोग? त्याप्रमाणे केवलज्ञानी केवलज्ञानाद्वारे केवळ आत्म्याला जाणतो व श्रुतज्ञानी श्रुतज्ञानाद्वारे केवळ आत्म्याला जाणतो. दोघांच्या अंतरंग क्रियेमध्ये समानता आहे तर विशेष जाणण्याचा लोभ कशासाठी ? फरक एवढाच आहे की केवली केवलज्ञानाद्वारे जाणतात व श्रुतकेवली श्रुतज्ञानाद्वारे जाणतात, परंतु येथे श्रुतकेवली म्हणजे श्रुतज्ञानी ग्रहण करावा. कारण जे आत्म्याला जाणतात ते सर्व सम्यग्दृष्टी निश्चयाने श्रुतकेवली आहेत व जे श्रुताच्या बारा अंगांना जाणतात, ते व्यवहार श्रुतकेवली आहेत.

केवलीसुद्धा आपल्या आत्म्याचे संचेतन करतात आणि सर्व सुश्रुतज्ञानीसुद्धा आपल्या आत्म्याचे संचेतन करतात. दोघेही शुद्ध आत्म्याच्या

संचेतनाशिवाय या दुनियेत काय करतात ? तर मग विशेष जिज्ञासा करून आकुलित होण्यात काय अर्थ आहे ? आत्मसंचेतन करण्यालायक ज्ञान आमच्याजवळ आहे. त्या ज्ञानाद्वारे स्वत:ला जाणले तर बस झाले. **आत्मानुभव हे मनुष्य जीवनातील सर्वश्रेष्ठ कार्य आहे.** ते केल्यानंतर काही करण्याची गरजच भासत नाही.

ज्ञानतृष्णा स्वकल्याणामध्ये बाधक –

जोपर्यंत विशेष जाणण्याचा क्षोभ आहे तोपर्यंत मोक्षमार्गाला प्रारंभ होत नाही. जो बाह्य ज्ञानामध्ये विशेष आसक्त आहे तर समजावे की त्याला आत्म्यामध्ये आत्मतत्त्वाचे अवलोकन अद्यापि झाले नाही. सम्यग्दृष्टी जाणण्याची तृष्णा सोडतो. जो विशेष जाणण्याची तृष्णा सोडतो त्यालाच आत्मिक आनंद मिळतो. जोपर्यंत पराला जाणण्याचा लोभ आहे तोपर्यंत केवलज्ञान जवळ येत नाही. जो सर्वांना सोडून एक आत्म्याला जाणतो त्याच्याजवळ केवलज्ञान धावत येते. **ज्ञानाची तृष्णा दु:ख देते, ज्ञान दु:ख देत नाही.** कोणी म्हणेल सम्यग्दृष्टी ज्ञानी विशेष विशेष शास्त्रांचा अभ्यास करीत नाही का ? त्यालासुद्धा जाणण्याची इच्छा आहेच. बरोबर आहे. ज्ञानी सुद्धा विशेष शास्त्रांचा अभ्यास करतो; परंतु त्याचे प्रयोजन भिन्न आहे. अशुभापासून वाचण्यासाठी व विशेष भेदज्ञानाच्या सिद्धीसाठी तो आगमाभ्यास करतो. त्यातून तो परद्रव्यामध्ये न अडकता निज आत्मतत्त्वाकडे येतो. ज्ञानाची तृष्णा दूर करण्यासाठीच येथे केवली व श्रुतकेवलीमध्ये अभेद दाखविला आहे. आचार्य म्हणतात जे केवली करतात तेच तू सुद्धा करू शकतोस तर पुन्हा क्षोभ का करतोस? जेथे जाणण्याच्या इच्छेचा क्षोभसुद्धा बाधक आहे तेथे अन्य इच्छांचे तर काय सांगावे, तेथे तर महाअनर्थांची परंपरा आहे.

निश्चयाने आत्म्याची स्वप्रकाशकता –

निश्चयाने आत्मा पराला न जाणता स्वत:लाच जाणतो. कारण ज्ञानगुण आत्म्याच्या असंख्यात प्रदेशांमध्येच आहे. जर ज्ञानगुण आत्मप्रदेशामध्येच आहे तर ज्ञानाचा प्रयोग आत्मप्रदेशामध्येच होऊ शकतो, बाहेर होऊ शकत नाही. केवलज्ञानी आपल्या आत्म्याला जाणतात, श्रुतज्ञानी आपल्या आत्म्यालाच जाणतात व मिथ्यादृष्टीसुद्धा आत्म्याला विकृतरूपाने जाणतात. मी मनुष्य आहे, स्त्री आहे, पुरुष आहे, मी त्यागी व्रती आहे, तपस्वी आहे

अशाप्रकारे मिथ्यादृष्टी पर्यायरूपाने केवळ आत्म्याचाच अनुभव करतो. परंतु सम्यग्ज्ञानी पर्यायबुद्धीने स्वत:ला न जाणता द्रव्यदृष्टीने जाणतो की मी एक शुद्ध बुद्ध चैतन्य स्वभावी आत्मा आहे. केवलज्ञानी व श्रुतज्ञानी आत्म्याला समानच जाणतात. फरक एवढाच आहे की केवली प्रत्यक्षज्ञानाने जाणतात. श्रुतज्ञानी परोक्षज्ञानाने जाणतात. दोघांचे काम एकच आहे. ज्याप्रमाणे दोन कलाकाराच्या कलेचा मार्ग एकच असतो, फरक एवढाच की एक जास्त कला जाणतो व दुसरा कमी कला जाणतो. त्याप्रमाणे केवली व श्रुतकेवलींच्या भेदज्ञानकलेमध्ये अंतर नाही. दोघांचा मार्ग एकच आहे. **ज्याप्रमाणे केवलज्ञान प्रमाण आहे त्याप्रमाणे श्रुतज्ञान सुद्धा प्रमाण आहे असे या गाथेतून लक्षात येते.**

ही गाथा समजून जीवनात असा प्रयोग करावा की जर मी परपदार्थाला अनुभवू शकत नाही तर परपदार्थाला जाणण्याचा विकल्प सोडून आपल्या परनिरपेक्ष सहजसिद्ध चैतन्य स्वभावी निज आत्म्याला अनुभवतो.

तेहतीस नंबरच्या गाथेमध्ये स्पष्ट केले होते की केवली भगवान अनादि-अनंत अहेतुक ज्ञानस्वभावमय केवळ आत्म्याचे संचेतन करतात व श्रुतज्ञानी सुद्धा अनादि-अनंत अहुतेक ज्ञानस्वभावमय केवळ आत्म्याचे संचेतन करतात. म्हणून दोघांच्या विषयामध्ये अंतर नाही. जे भगवान करतात ते आम्ही आतासुद्धा करू शकतो व जे आम्ही करतो तेच भगवान करतात. तर मग जगामध्ये मला हे काम करायचे आहे किंवा अमुक जाणायचे आहे, असा क्षोभ करून काय उपयोग? जीव आत्म्याला जाणण्याशिवाय दुसरे काही करण्यामध्ये समर्थ नाही. केवली केवलज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतात व श्रुतज्ञानी श्रुतज्ञानाद्वारे जाणतात म्हणून दोघांच्या साधनामध्ये भेद आहे. विषयामध्ये भेद नाही. आता या गाथेमध्ये दोघांच्या मधील साधनकृत भेदाला ही दूर करतात. ज्ञानामधून श्रुत ही उपाधी दूर करून ज्ञानाची विशुद्धता दाखवतात.-

सुत्तं जिणोवदिट्ठं पोग्गलदव्वप्पगेहि वयणेहिं।
तं जाणणा हि णाणं सुत्तस्स य जाणणा भणिया ।।३४।।

अन्वयार्थ - (पोग्गलदव्वपगेहि वयणेहिं) पुद्गल द्रव्यात्मक वचनाद्वारे **(जिणोवदिट्ठं)** जिनेंद्र भगवंतानी सांगितले ते **(सुत्तं)** सूत्र होय. **(तं जाणणा हि)**

त्याला जाणणे हे **(णाण)** ज्ञान होय. **(य)** आणि तीच **(सुत्तस्स जाणणा)** सूत्राची ज्ञप्ती (श्रुतज्ञान) **(भणिया)** म्हटली आहे.

द्रव्यश्रुत शब्दब्रह्म –

जिनेंद्र भगवंतानी दिव्यध्वनीद्वारे सांगितलेल्या उपदेशाला द्रव्यश्रुत म्हणतात. वीतराग सर्वज्ञ भगवंताचे वचनच प्रमाणभूत आहे. वचनात्मक उपदेश व लिपिबद्ध स्वरूप द्रव्यश्रुताला शब्दब्रह्म म्हटले आहे. ब्रह्म हा शब्द सन्मानार्थी व आदरार्थी वापरला जातो. शब्दब्रह्मरूप द्रव्यश्रुत स्यात्कारकेतन आहे. अर्थात स्यात्पद हे द्रव्यश्रुत ओळखण्याचे चिन्ह आहे. द्रव्यश्रुताचे प्रत्येक वाक्य स्यात्पदाने मुद्रित असते. स्यात्पदाने मुद्रित जे वाक्य आहे ते जिनवचन आहे असे जाणावे. ज्याप्रमाणे कंपनीच्या मालावर कंपनीचा ट्रेडमार्क असतो. त्यावरून तो माल बनावट नसून कंपनीचा मूळ माल आहे हे लक्षात येते म्हणून मालाची सत्यता पडताळण्यासाठी मालावर कंपनीचा ट्रेडमार्क आहे का हे तपासले जाते. त्याचप्रमाणे **स्यात्पद हे वीतराग सर्वज्ञ जिनेन्द्र भगवंताच्या कंपनीचा ट्रेडमार्क आहे.** शास्त्रातील वाक्यापूर्वी तो ट्रेडमार्क असेल तर तो सर्वज्ञ कंपनीचा माल आहे हे ओळखता येते. तेच शास्त्र सत्शास्त्र आहे की ज्यामध्ये स्यात्पदाची मुद्रा झळकते. स्यात् म्हणजे कंथचित्, भगवंतांची वाणी अनेकान्तमय वस्तूचे कोणत्यातरी अपेक्षेने कथन करते. सर्व विरोधांना समाप्त करणारे हे एक अमोघशस्त्र आहे. त्याला स्यात्पदाची मुद्रा म्हणतात. सर्व वस्तूंचे प्रकाशक असल्यामुळे द्रव्यश्रुत सर्वव्यापी आहे म्हणून त्याला शब्दब्रह्म म्हणतात अथवा द्रव्यश्रुत ब्रह्मस्वरूप पूर्ण आनन्दाचा स्वामी भगवान आत्म्याला दाखवते म्हणून शब्दब्रह्म आहे.

द्रव्यश्रुताच्या आधाराने भव्य जीवांना जो अर्थबोध होतो ते भावश्रुत होय अर्थात द्रव्यश्रुत ऐकून जे पदार्थांचे ज्ञान होते त्यास भावश्रुत म्हणतात. ज्याप्रमाणे घट हा शब्द ऐकला तो घटशब्द द्रव्यश्रुत आहे. घट शब्द ऐकून घट पदार्थाचे ज्ञान झाले ते भावश्रुतज्ञान आहे. शास्त्रामध्ये आत्मा शब्द ऐकला ते द्रव्यश्रुत होय. ते द्रव्यश्रुत ऐकून आत्मा नामक पदार्थाचे ज्ञान झाले ते भावश्रुतज्ञान होय. शब्दरूप द्रव्यश्रुताला सुद्धा व्यवहाराने ज्ञान म्हटले आहे. कारण ते भावश्रुतज्ञानासाठी निमित्त आहे. येथे कारणामध्ये कार्याचा उपचार करून सूत्रालाचं ज्ञान म्हटले आहे. वास्तविक पदार्थाला जाणणेरूप

भावश्रुतालाच निश्चयाने ज्ञान म्हटले आहे. द्रव्यश्रुताच्या आधाराने जे ज्ञान झाले ती आत्म्याची परिणती आहे. आत्म्यामध्येच घडलेली ती जाणणेरूप अर्थक्रिया आहे. द्रव्यश्रुत तर तिथे उपाधी आहे.

निरुपाधी अन्तःक्रिया –

सूत्राला जाणणे हे सूत्रज्ञान अथवा श्रुतज्ञान आहे. जे सूत्रज्ञान होते ते काही श्रुताची उपाधी घेऊन होत नाही. ज्ञान तर ज्ञान आहे. त्या ज्ञानाचा आधार श्रुत असल्यामुळे त्याला श्रुतज्ञान म्हणतात. श्रुतज्ञानाचे निमित्तकारण असल्यामुळे उपचाराने सूत्राला श्रुतज्ञान म्हटले जाते. ज्ञान अनादिकाळापासून अनन्तकाळापर्यंत आपले ज्ञानतरंग आपल्यामध्ये घेऊनच उत्पन्न होते. ज्ञानामध्ये कोणतीही उपाधी नाही. ज्ञान निरुपाधी अखंड ज्योतिस्वरूप आहे.

ज्याप्रमाणे दिवा स्वच्छ प्रकाशस्वरूप आहे; परंतु त्या दिव्याला हिरवा, निळा, पांढरा कागद लावला तर प्रकाश हिरवा, निळा, पांढरा म्हटला जातो. वास्तविक पाहिले तर दिव्याचा प्रकाश हिरवा इत्यादिरूप परिणमत नाही. हिरवे, निळे, पांढरे होणे प्रकाशाचे कार्य नाही. ती तर प्रकाशाची उपाधी आहे. प्रकाशाचे कार्य स्वच्छ उजेड करणे हे आहे. हिरवी, निळी, पांढरी उपाधी बाजूला केली तर शुद्ध प्रकाशच शिल्लक राहतो. त्याप्रमाणे ज्ञान शुद्ध चेतना प्रकाशस्वरूप आहे. परज्ञेयपदार्थाच्या आधाराने ज्ञानामध्ये मती, श्रुती अवधी, मनःपर्याय इत्यादी भेद केले जातात. वास्तविक ज्ञान मति, श्रुत अवधीरुपाने परिणमत नाही. मती, श्रुती इत्यादी ज्ञानाची उपाधी आहे. ज्ञानाचे कार्य तर जाणणे हे आहे. मती, श्रुती, अवधी इ. उपाधी बाजूला केली तर केवळ ज्ञानच शिल्लक राहते. ज्याप्रमाणे हिरवा प्रकाश असो वा निळा प्रकाश असो अथवा पांढरा प्रकाश असो, प्रकाश तर उजेडाचेच काम करतो त्याचप्रमाणे मतिज्ञान असो की श्रुतज्ञान असो की अवधिज्ञान असो, ज्ञान तर जाणण्याचेच काम करते. ज्याप्रमाणे जो हिरवा आहे तो प्रकाश नाही व जो प्रकाश आहे तो हिरवा नाही. त्याचप्रमाणे जे श्रुत आहे ते ज्ञान नाही व जे ज्ञान आहे ते श्रुत नाही. भिंतीला पांढरा रंग दिला तर आपण पांढरी भिंत म्हणतो; परंतु भिंत पांढरी होत नाही. भिंत आतमध्ये पांढऱ्या रंगापासून भिन्नच आहे म्हणून भिंत वेगळी आहे व पांढरा रंग वेगळा आहे. ज्ञान ज्याला जाणते त्या अपेक्षेने ज्ञान म्हटले जाते. उदा. घटाला जाणणारे ज्ञान घटज्ञान, पटाला

जाणणारे ज्ञान पटज्ञान, प्रवचनसारला जाणणारे ज्ञान प्रवचनसारज्ञान इत्यादी. ज्ञानामध्ये बाह्य विषयांच्या अपेक्षेने भेद केले जातात. अथवा ज्ञानास निमित्त असणाऱ्या साधनांच्याद्वारे ज्ञानामध्ये भेद केले जातात. उदा. स्पर्शनेन्द्रियज्ञान, रसनेन्द्रियज्ञान, चक्षुर्ज्ञान, श्रुतज्ञान, स्मृतिज्ञान इत्यादी. केवळ ज्ञानाच्या स्वभावाकडे पाहिले तर ज्ञान स्वतंत्ररूपाने जाणते. तेथे उपाधींची गरज नाही. उपाधी बाह्य पदार्थाला घेऊन असते. ज्ञानाच्या स्वरूपामध्ये बाह्य पदार्थ नाहीत. ज्ञानाचे कार्य तर जाणणे आहे.

संसार अवस्थेमध्ये जीव ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतो व मोक्षपर्यायामध्येसुद्धा जीव ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतो. ज्ञानामध्ये केवल व श्रुताच्या उपाधीमुळे भेद नाही. ज्ञान तर केवळ ज्ञानच आहे. कोणी पदार्थ असो अथवा नसो ज्ञान तर स्वतंत्रपणे जाणण्याचेच कार्य करीत राहते.

ज्याप्रमाणे सूर्याचे काम प्रकाश करणे आहे. तो सदैव प्रकाशरूपच असून प्रकाश करतो. जर त्यावरचे मेघपटल दूर झाले की प्रकाश प्रकट होतो. म्हणून सामान्य लोकांना असे वाटते की मेघपटल दूर झाल्यामुळे प्रकाश झाला. परंतु प्रकाशाकडे प्रकाशाच्या स्वरूपाने पाहिले तर लक्षात येते की प्रकाश मेघपटल दूर झाल्यामुळे नाही तर प्रकाश प्रकाशरूपाने स्वतंत्रपणे विकसित आहे. त्याप्रमाणे ज्ञानाचा स्वभाव सर्व लोक-अलोकाला जाणणे मात्र आहे. कर्मपटलामुळे त्या ज्ञानावर आवरण येऊन ज्ञान रोकले जाते. जेवढे आवरण हटते तेवढे ज्ञान प्रकट होते. ज्ञानावरचे थोडे आवरण हटून जेवढे ज्ञान प्रकट होते त्याला मतिज्ञान असे नाव दिले. अजून थोडे आवरण हटून विशेष ज्ञान झाले त्याला श्रुतज्ञान हे नाव मिळाले. आवरण हटत पुन्हा विशेष विशेष ज्ञान झाले त्याला अवधी व मनःपर्यय संज्ञा प्राप्त झाली. पूर्ण आवरण दूर होऊन पूर्ण ज्ञान प्रकट झाले त्याला केवलज्ञान म्हटले जाते. वास्तविक ज्ञान एकच आहे. ज्ञानाचे काम जाणणेच आहे.

ज्ञान स्वपरप्रकाशक आहे. भले ते मतिज्ञान असो की श्रुतज्ञान असो की केवलज्ञान असो ज्ञानाच्या शैलीमध्ये भेद नाही. १००० वॅटचा बल्ब असो की १०० वॅटचा असो की ६० वॅटचा असो सर्व दिवे वस्तूला प्रकाशित करण्याचे काम करतात. त्याप्रमाणे ज्ञान कोणतेही असो ते जाणण्याचे काम करते. वास्तविक ज्ञान एक अखंड प्रतिभासस्वरूप आहे. निश्चयाने ज्ञानामध्ये भेद

नाही. ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश एकरूप आहे त्याचप्रमाणे आत्म्याचा ज्ञानप्रकाश एकरूप आहे; परन्तु ज्याप्रमाणे सूर्याला झाकणाऱ्या मेघाच्या आच्छादनामध्ये भेद पडल्यामुळे सूर्याच्या प्रकाशामध्ये भेद होतात त्याप्रमाणे ज्ञानाला झाकणाऱ्या आवरणाच्या भेदामुळे ज्ञानामध्ये भेद होतात. कर्माचे आवरण कमी-अधिक प्रमाणात दूर झाल्यामुळे आवरण कर्माच्या क्षयोपशमामध्ये अनेकरूपता येते त्यामुळे प्रगट ज्ञानसुद्धा अनेकरूप होते. वास्तविक ज्ञान एकच आहे.

या गाथेचा भावार्थ हा आहे की केवलज्ञानाप्रमाणेच श्रुतज्ञानाने देखील आपण आत्म्याला जाणू शकतो. जाणणे तर केवलज्ञानी व श्रुतज्ञानींचे आत्मसंचेतनामध्ये समानच आहे. म्हणून आम्ही परोक्ष ज्ञानाद्वारे आत्म्याला कसे काय जाणू शकतो? असे मानून आत्मानुभवापासून वंचित राहू नये. सर्व विकल्प सोडून एक निज आत्म्याला जाणून त्याचाच अनुभव करण्याचा सतत पुरुषार्थ चालू ठेवावा. आत्मानुभव हे मनुष्य भवातील सर्वोत्तम कार्य आहे. ते कार्य करण्याची दुर्लभ संधी आपल्याला प्राप्त झाली आहे ती व्यर्थ दवडू नये.

आचार्य म्हणतात, महाकष्टाने मरणाची सुद्धा चिंता न करता, तत्त्व समजण्याकरिता तू कौतूहली हो. आत्मा काय वस्तू आहे ही पाहण्याची उत्सुकता उत्पन्न कर, जिज्ञासा जागृत कर, मृत्यूची किंमत देऊन सुद्धा आत्मज्ञान प्राप्त झाले तरी करावे. कारण त्याशिवाय दुःख दूर होणार नाही आणि आत्मज्ञान झाल्यावर कोणतेही कष्ट राहणार नाही. पराला जाणून काही फायदा नाही. संसारसागराचा एक थेंबसुद्धा कमी होणार नाही. आपल्या आत्म्याला अनुभवपूर्वक जाणल्यामुळे संपूर्ण संसारसागर शुष्क होऊन जातो. म्हणून कोण्या ज्ञानीने म्हटले आहे – **परकी ओर का झुकाव छोडकर स्वकी ओर का झुकाव करना वही सच्चा पुरुषार्थ है।**

३३ नंबरच्या गाथेमध्ये सांगितले आहे की केवलज्ञानी केवलज्ञानाद्वारे ज्या आत्म्याला जाणतात श्रुतज्ञानीसुद्धा श्रुतज्ञानाद्वारे त्याच आत्म्याला जाणतात. दोघांच्या विषयामध्ये भेद नाही. अशाप्रकारे विषयकृत भेद दूर केला. त्यानंतर ३४ नंबरच्या गाथेमध्ये साधनकृत भेद दूर केला. केवलज्ञान व श्रुतज्ञान असे ज्ञानाचे दोन भेद नाहीत. श्रुत ही उपाधी आहे. उपाधी आदरण्यायोग्य नसते म्हणून श्रुत ही उपाधी दूर केली तर केवळ ज्ञानच शिल्लक

राहते. केवलज्ञान व श्रुतज्ञान दोन्ही ज्ञानच आहेत. आत्म्याला जाणण्याच्या अपेक्षेने दोघांमध्ये भेद नाही. केवलीसुद्धा ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतात व श्रुतज्ञानीसुद्धा ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतात. याप्रमाणे साधनामधील भेद दूर केला. आता या गाथेत हे सिद्ध करतात की आत्मा ज्ञानाद्वारे जाणतो ही गोष्टसुद्धा शोभास्पद नाही. आत्मा व ज्ञान काय भिन्न भिन्न आहेत ? की ज्याद्वारे आत्मा जाणणारा होतो. आत्मा व ज्ञान दोन भिन्न वस्तू नाहीत. ज्ञान व आत्म्यामध्ये कर्तृकरणकृत भेदसुद्धा नाही. म्हणून ज्ञाता व ज्ञानाच्या विभागाची क्लिष्ट कल्पना करण्याचे काय प्रयोजन? प्रथम केवली व श्रुतकेवलीचा विषय एक सांगितला. नंतर दोघांचे साधन एक सांगितले. आता कर्ता व करण भिन्न नाहीत हे सांगतात–

जो जाणदि सो णाणं ण हवदि णाणेण जाणगो आदा ।

णाणं परिणमदि सयं अट्ठा णाणट्ठिया सव्वे ।।३५।।

अन्वयार्थ:– (जो जाणदि) जे जाणते **(सो णाणं)** ते ज्ञान आहे. **(णाणेण)** ज्ञानाद्वारे **(आदा)** आत्मा **(जाणगो)** ज्ञायक **(ण हवदि)** नाही. **(सयं)** स्वयं **(णाणं)** ज्ञानरूप **(परिणमदि)** परिणमतो आणि **(सव्वे अट्ठा)** सर्व पदार्थ **(णाणट्ठिया)** ज्ञानस्थित आहेत.

तात्पर्य हे आहे की ज्ञानस्वरूप आत्मा स्वयं स्वत:द्वारे जाणतो. येथे कर्ता व करण भिन्न नाहीत. ज्ञानपर्याय व ज्ञाता यामध्ये भेद करणे म्हणजे क्लिष्ट कल्पना आहे. त्यामुळे आत्म्याला काय फायदा होणार? उलट ज्ञाता व ज्ञानपर्याय असा भेद केल्यामुळे विकल्प उत्पन्न होतात. जाणणेरूप क्रियेमध्ये निरन्तर प्रवृत्त ज्ञान एकच आहे. तेथे असा भेद करू नये की आत्मा ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतो. तो तर केवळ ज्ञानस्वरूप आहे. ज्याप्रमाणे अग्नी उष्णतेद्वारे ईंधनाला जाळते हे म्हणणे निश्चयनयाने खरे आहे का? ईंधन काय आहे? जे जळत नाही ते की, जे जळत आहे ते? अग्नि उष्णतेद्वारे ईंधनाला जाळूच शकत नाही. अग्नी उष्णतेद्वारे केवळ स्वत:लाच जाळते. ज्या समयात जळू लागते व उष्णरूप होते त्या समयात ते ईंधन म्हटले जात नाही. अग्नी उष्णतेद्वारे ईंधनाला जाळत नाही. स्वत: स्वत:ला जाळते. ती स्वत: जळते व राखरूप होते. त्याप्रमाणे आत्मा ज्ञानाद्वारे दुसऱ्याला जाणत नाही, स्वत:लाच जाणतो. पदार्थ ज्ञानात येतो तेव्हा तो पदार्थ नाही ते ज्ञानच आहे. अशाप्रकारे

प्रथम भिन्न विषयाचे खंडन केले.

पुन्हा अग्नी आपल्या उष्णतेद्वारे स्वत:ला जाळते तर येथे अग्नी व उष्णता असा भेद सहन होऊ शकत नाही. अग्नी व त्याची उष्णता वेगळी वस्तू नाही. अग्नी स्वयं उष्णमय आहे. अग्नी आपल्या स्वभावाने जळत आहे त्याप्रमाणे आत्मा ज्ञानाद्वारे स्वत:ला जाणतो. येथे आत्मा व ज्ञान असा भेद नाही. आत्मा स्वयं ज्ञानमय आहे. आत्मा आपल्या स्वभावाने जाणत आहे. अशाप्रकारे साधन भेदही नाही. अग्नी जळत आहे या कथनामध्ये सुद्धा असे भासित होते की अग्नी पहिला जळत नव्हती व आता जळत आहे. पहिला शांत होती व आता जळण्याची क्रिया सुरू आहे. म्हणून अग्नी एवढेच म्हणणे ठीक आहे. त्याप्रमाणे आत्मा ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतो याचे सूक्ष्मरूप एवढेच राहते की 'ज्ञान'. आत्मा सदैव स्वत: ज्ञानमय आहे.

कर्तृकरण शक्तिसंपन्न परमेश्वरता–

आत्म्याची जी कर्ता व करणरूप अभिन्न शक्ती आहे तीच परमेश्वरता आहे. सदैव या परमेश्वरपणाने सहित असणारा आत्मा परमेश्वर आहे. आत्म्याजवळ असे परम ऐश्वर्य आहे की याला आपले काम करण्यासाठी दुसऱ्या वस्तूंची गरज नाही. तो आपलेच काम करतो, स्वत:च करतो, स्वत:साठी करतो व स्वत:मध्येच करतो. लौकिकामध्ये सुद्धा आपण पाहतो की जो स्वाधीन असतो त्याला गावाचा ईश्वर(जमीनदार) म्हणतात. ज्याला आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी दुसऱ्याची अपेक्षा करावी लागत नाही. ज्या काही त्याच्या गरजा असतात तो आपल्या शेतातून उत्पन्न करून पूर्ण करतो. या आत्म्याला आपले काम करण्यासाठी परपदार्थांची अपेक्षा नसते. म्हणून आत्म्यामध्ये परम ऐश्वर्य आहे. आत्मा स्वयं कर्ता आहे व स्वयं करण आहे. आत्मा स्वयं जाणतो व स्वत:द्वारे जाणतो. परंतु हा मूढ प्राणी आपल्या या परमेश्वरपणाला विसरला आहे. याला आपल्या परमैश्वर्याची कल्पना नाही म्हणून पराधीन झाला आहे. इन्द्रिय, प्रकाश, पुस्तक, गुरु यांच्याद्वारे स्वत:ला ज्ञान उत्पन्न होते असे मानतो व पराधीन होऊन दु:खी होतो. शास्त्रज्ञानामुळे स्वत:ला ज्ञानी समजतो. त्यामुळे शास्त्रांचे ओझे वाढवतो. एक क्षणही स्वत:ला ज्ञानरूप अनुभवत नाही. वास्तविक जो स्वत:ला ज्ञानरूप अनुभवतो तोच खरा ज्ञानी आहे.

आत्मा स्वयं जाणतो म्हणून तोच कर्ता आहे. स्वत:द्वारे जाणतो म्हणून तोच करण आहे. आत्म्यामध्येच कर्तृशक्तीसुद्धा आहे व करणशक्तीसुद्धा आहे. जो आपल्या परमेश्वरपणाला जाणतो तो पर्यायामध्ये परमेश्वर होतो.

गुणगुणीमध्ये भेदाभेदरूप अनेकान्तता–

गुण व गुणीमध्ये प्रदेशांच्या अपेक्षेने अभेद आहे. आत्मा गुणी आहे व ज्ञान त्याचा गुण आहे. म्हणून दोघांचे क्षेत्र एक आहे. गुण व गुणीमध्ये संज्ञा, संख्या, लक्षण व प्रयोजनांच्या अपेक्षेने भेद आहे; परंतु प्रदेशांच्या अपेक्षेने भेद नाही, अभेद आहे. ज्याप्रमाणे अग्नी द्रव्य आहे व उष्णता त्याचा गुण आहे या दोघांमध्ये कथंचित् भेद व कथंचित् अभेद आहे. अग्नी हे नाव भिन्न आहे व उष्णता हे नाव भिन्न आहे. अग्नी अनेक प्रकारची आहे, लाकडाची अग्नी, भुश्याची अग्नी, तृणाची अग्नी, कोळशाची अग्नी इ., परंतु उष्णता एक प्रकारची आहे. अग्नीचे लक्षण दाहक, पाचक व प्रकाशक व उष्णतेचे लक्षण दाह उत्पन्न करणे, अग्नीचे प्रयोजन जाळणे, शिजविणे, प्रकाश देणे इत्यादी अनेक प्रकारचे आहे, उष्णतेचे प्रयोजन गरम करणे व थंडीचे निवारण करणे हे आहे. अशाप्रकारे संज्ञा, संख्या, लक्षण व प्रयोजनाच्या अपेक्षेने भेद असला तरी अग्नी व उष्णता यामध्ये तादात्म्यसंबंध आहे, जेथे अग्नी आहे तेथे उष्णता आहे व जेथे उष्णता आहे तेथे अग्नी आहे.त्याप्रमाणे ज्ञान व आत्म्यामध्ये कथंचित भेद व कथंचित अभेद आहे. आत्मा व ज्ञान या दोन संज्ञा भिन्न आहेत. आत्मा अनेक गुणरूप आहे. ज्ञान गुण एक आहे. आत्म्याचे लक्षण उपयोगवान, ज्ञानाचे लक्षण जाणणे हे आहे. आत्म्याचे प्रयोजन स्वाधीन होऊन निजानन्दभोग करणे हे आहे, ज्ञानाचे प्रयोजन हिताचे ग्रहण व अहिताचा त्याग हे आहे. याप्रमाणे ज्ञान व आत्म्यामध्ये भेद आहे. तथापि प्रदेशांच्या अपेक्षेने अभेद आहे. जेथे आत्मा आहे तेथे ज्ञान आहे व जेथे ज्ञान आहे तेथे आत्मा आहे. ज्ञान व आत्म्यामध्ये परस्पर अतद्भाव आहे, अभाव नाही. अत्यन्ताभाव नाही. ज्यांचे प्रदेश भिन्न भिन्न असतात त्या दोन द्रव्यांमध्ये परस्पर अभाव असतो, अत्यन्ताभाव असतो. जसे शरीर व आत्मा यामध्ये परस्पर अत्यन्ताभाव आहे, परंतु ज्या दोघांचे प्रदेश एक असतात त्यामध्ये अतद्भाव असतो. जसे ज्ञान व आत्मा.

सहज ज्ञानमयता–

हा आत्मा आपल्या ज्ञानस्वभावाच्या अपेक्षेने ज्ञानी आहे. ज्ञान एक वेगळी वस्तू आहे व त्याच्या संयोगाने आत्मा ज्ञानी होतो असे नाही. ज्याप्रमाणे काठीच्या संयोगाने पुरुषाला काठीवाला, टोपीच्या संयोगाने टोपीवाला, चष्म्याच्या संयोगाने चष्मावाला म्हटले जाते किंवा भिन्न फावड्याच्या संयोगाने देवदत्त तोडणारा म्हटला जातो, त्याप्रमाणे भिन्न ज्ञानाच्या संयोगाने आत्मा जाणणारा (ज्ञायक) आहे असे नाही.

वास्तविक निश्चयाने कर्ता व करण अभिन्न असतात. व्यवहाराने कर्ता व करण भिन्न असतात, अग्नी उष्णतेने ईंधनाला जाळते व देवदत्त फावड्याने लाकूड कापतो. या दोन वाक्यामध्ये वस्तुस्थिती भिन्न भिन्न आहे.कारण ज्याप्रमाणे देवदत्तापासून फावडा हे साधन भिन्न आहे त्याप्रमाणे अग्नीपासून उष्णता भिन्न नाही. आत्मा व ज्ञानाची स्थिती देवदत्त व फावड्याप्रमाणे नाही, अग्नी व उष्णतेप्रमाणे आहे.

भारतीय दर्शनामध्ये एक नैयायिक दर्शन आहे. त्याचे मत आहे की आत्मा वेगळा आहे व ज्ञान वेगळे आहे. हे दोन्ही समवाय संबंधाने एकत्र येतात. आत्मा स्वयं ज्ञानस्वरूप नाही, परंतु ज्ञानगुणाच्या संयोगाने ज्ञानी होतो.

आत्मा व ज्ञानाला सर्वथा भिन्न भिन्न मानले तर एक दुसऱ्याशिवाय ते दोघेही अचेतन होतील. दोन अचेतन वस्तूंचा संयोग झाला तरी जाणण्याचे कार्य होऊ शकणार नाही. ज्ञानाच्या संयोगापूर्वी आत्मा जड पुद्गलाप्रमाणे मानावा लागेल. तेव्हा ज्ञानाच्या संयोगाने जसा आत्मा ज्ञानी होतो तसे घटपट इत्यादी जड पदार्थसुद्धा ज्ञानाच्या संयोगाने ज्ञानी व्हायला पाहिजेत. त्यांच्याद्वारेसुद्धा जाणण्याचे कार्य झाले पाहिजे; परंतु तसे होताना तर लोकामध्ये दिसून येत नाही.

आत्म्यामध्ये भिन्न ज्ञानाचा समवाय संबंध होतो असे मानले तर त्याचा आत्म्यामध्येच का समवाय होतो, घटपटादी जड पदार्थामध्ये का संबंध होत नाही याचे काही कारण सांगितले जाऊ शकत नाही. पुन्हा आत्म्याचा ज्ञानाशी समवाय संबंध मानला तर दोन प्रश्न उत्पन्न होतात. ज्ञानाचा समवाय होण्यापूर्वी आत्मा ज्ञानी होता की अज्ञानी. जर प्रथम पक्ष मानला की ज्ञानाचा समवाय होण्यापूर्वी आत्मा ज्ञानी होता तर पुन्हा ज्ञानाचा समवाय मानणे व्यर्थ

आहे. साखर स्वयं गोड आहे तर त्याला पुन्हा गोड करण्याची काय गरज? ज्ञानी आत्म्याला ज्ञान समवायाची काय गरज?कारण 'न हि वस्तुशक्तय: परमपेक्षन्ते' वस्तूमध्ये स्वयं असणाऱ्या शक्ती दुसऱ्याची अपेक्षा करीत नाहीत. ज्ञानाचा समवाय होण्यापूर्वी आत्मा अज्ञानी आहे तर स्वयं अचेतन जड वस्तू ज्ञानाचा संयोग झाल्यावर ही चेतन होऊ शकणार नाही. कारण ''स्वयं असती शक्ति: कर्तुमन्येन न पार्यते। जी शक्ती स्वत:मध्ये नाही ती दुसऱ्याकडून उत्पन्न केली जाऊ शकत नाही. जर तसे मानले तर अचेतन घटपटादी पदार्थांमध्ये सुद्धा ज्ञानाचा समवाय होऊन चेतनता उत्पन्न होईल, पराच्या ज्ञानाने पराला ज्ञान होते असे मानले तर राख इत्यादिकांना ही ज्ञान मानण्याचा प्रसंग येईल. म्हणून ही गोष्ट निश्चित आहे की आत्मा व ज्ञानाचा तादात्म्य संबंध आहे.

आत्मा कर्ता व ज्ञान करण असा विभाग करण्याचे सुद्धा काय प्रयोजन? आत्मा ज्ञानाने जाणतो असे मानण्यापेक्षा ज्ञानस्वभावी आत्मा स्वत:द्वारे जाणतो असे मानणे योग्य आहे किंवा आत्मा जाणतो एवढेच पर्याप्त आहे. ज्ञानी आत्मा आपल्याच उपादान शक्तीने ज्ञानरूप परिणमतो व त्या ज्ञानपरिणतीने आपल्या निर्मलतेमुळे सर्व ज्ञेयपदार्थांना जाणतो व ते पदार्थसुद्धा आपल्या प्रमेयत्वशक्तीने ज्ञानामध्ये झळकतात. म्हणून सर्व पदार्थ ज्ञानामध्ये स्थित आहेत असे म्हटले जाते.

प्रवचनसारची प्रत्येक गाथा वस्तु-स्वातंत्र्याची उद्घोषक आहे. या गाथेमध्ये कर्ता व करण असा भेद करणेसुद्धा वस्तुस्वातंत्र्यामध्ये बाधक आहे हे सिद्ध केले आहे. म्हणून मी कर्ता, ज्ञान करण असा भेद न करता अभेद आत्म्याचा अनुभव करावा. स्वत:ला स्वत:द्वारे ज्ञानपरिणत पाहून अभेद आत्म्याची उपासना करावी. अभिन्नकारक प्रक्रियेतून उत्तीर्ण होऊन स्वत:स ज्ञानमात्र अनुभवण्याचा पुरुषार्थ करावा. जो भेदरूप ज्ञेयाला ज्ञानरूप करून स्वपरप्रकाशक ज्ञानाला आत्मारूप करतो त्याला निर्विकल्प अनुभूती होते. मी आत्मा आहे व ज्ञान माझा स्वभाव आहे. मला अन्य कोणत्याही साधनाची अपेक्षा नाही. मी माझ्यासाठी परिपूर्ण आहे असा परनिरपेक्ष होऊन वस्तुस्वातंत्र्याचा मनसोक्त भोग घ्यावा.

पूर्व गाथेमध्ये आत्मा व ज्ञान यामध्ये भिन्न कर्ताकरण संबंध नाही हे सिद्ध केले. आता या गाथेमध्ये ज्ञान व ज्ञेयाचे स्वरूप स्पष्ट करतात. कारण

अनादिकाळापासून ज्ञान व ज्ञेयाचा संकर (मिश्रण) केल्यामुळे ज्ञानाचे ज्ञान नाही व ज्ञेयाचेसुद्धा ज्ञान नाही म्हणून ज्ञेयज्ञायक संकर दोष दूर करण्यासाठी ज्ञानज्ञेय विभाग जाणणे आवश्यक आहे. कोणत्याही क्रियेचे दोन घटक असतात- १) क्रिया करणारा (कर्ता) व २) ज्याच्यावर क्रिया घडते अशी वस्तू (कर्म). ज्याप्रमाणे खाण्याच्या क्रियेसंबंधी, कोण खातो व खाण्यायोग्य पदार्थ कोणते? असे दोन प्रश्न उत्पन्न होतात. बोलण्याच्या क्रियेसंबंधी बोलणारा कोण व बोलण्यायोग्य वचन काय? असे दोन प्रश्न उत्पन्न होतात. त्याप्रमाणे जाणण्याच्या क्रियेविषयी जाणणारा कोण व जाणण्यायोग्य पदार्थ कोणते हे दोन प्रश्न होतात. या दोन प्रश्नांची उत्तरे या गाथेत देताात-

तम्हा णाणं जीवो णेयं दव्वं तिहा समक्खादं।
दव्वं ति पुणो आदा परं च परिणामसंबद्धं ।।३६।।

अन्वयार्थ- (तम्हा) म्हणून **(णाणं)** ज्ञान **(जीवो)** जीव आहे आणि **(णेयं)** ज्ञेय **(तिहा समक्खादं)** तीन प्रकाराने सांगितलेले **(दव्वं)** द्रव्य आहे. **(पुणो दव्वं ति)** पुन्हा ज्ञेयभूत द्रव्य **(परिणामसंबद्धं)** परिणामाने संयुक्त **(आदा परं च)** आत्मा व परद्रव्य आहे.

तात्पर्य हे आहे की ज्ञान फक्त स्व आत्मा आहे व ज्ञेय स्व आत्मा, पर आत्मा व समस्त अचेतन पदार्थ आहेत. आत्मा ज्ञान व ज्ञेय दोन्ही आहे. पुद्गलादी पाच द्रव्ये केवळ ज्ञेय आहेत.

ज्ञान जीवमय -

गाथेमध्ये प्रथम शब्द 'तम्हा' ठेवला आहे. तम्हा म्हणजे म्हणून. म्हणून हा पाठीमागच्या वाक्याला जोडणारा अव्यय आहे. पाठीमागच्या गाथेत सांगितले आहे की 'जीव स्वयं ज्ञानरूप परिणमतो.' म्हणून ह्या शब्दाचा हा भाव आहे. जीव स्वयं ज्ञानरूप परिणमतो म्हणून ज्ञान जीव आहे. येथे ज्ञान लक्ष्य आहे व जीव त्याचे लक्षण आहे. येथे ज्ञान काय आहे? हा प्रश्न आहे. जीव कोण आहे हा प्रश्न नाही. ज्ञान जीव आहे. कारण जीव स्वयं जाणणेरूप परिणमतो, स्वतंत्र होऊन जाणतो. घटपटादी पदार्थ ज्ञान नाहीत. कारण ते जाणत नाहीत. ते ज्ञानरूपाने परिणमण्यामध्ये असमर्थ आहेत, म्हणून ते नियमाने अज्ञानरूप अचेतन आहेत. रेडिओ, टेपरेकॉर्ड, कॉम्प्युटर यामध्ये कितीही शब्द भरले तरी त्यामध्ये जाणण्याची शक्ती येऊ शकत नाही म्हणून ते

अजीव आहेत. जाणण्याचा ज्यामध्ये स्वभावच नाही ते ज्ञानरूप कसे होणार?

आजपर्यंत ज्ञान कधी जीवरूप पाहिले नाही म्हणून अज्ञानी जीव जीवाला अनेक प्रकारचा मानतो. ज्ञानाचे लक्षण जीवरूप पाहिले पाहिजे. अज्ञानी जीव ज्ञानाचे लक्षण इन्द्रिय, ज्ञेयपदार्थ, प्रकाश, शास्त्र, शब्द इत्यादी करतो. इन्द्रिये जाणतात, ज्ञेयपदार्थामुळे ज्ञान होते, प्रकाशाद्वारे जाणतो, शास्त्रापासून ज्ञान मिळते, शब्द ऐकल्यामुळे ज्ञान होते, इत्यादी मिथ्या मान्यता सुटत नाहीत म्हणून अज्ञानीच राहतो. जोपर्यंत ज्ञानाचे लक्षण बरोबर करणार नाही तोपर्यंत विपरीत मान्यता सुटणार नाही.

जे ज्याचे असते ते त्याचेच असते, ज्ञान आत्म्याचे आहे म्हणून ज्ञान आत्माच आहे. ज्ञान अन्य पदार्थाचे नाही म्हणून ज्ञेयपदार्थ ज्ञान नाही. जे जाणते ते ज्ञान. जीव जाणतो म्हणून जीव ज्ञान आहे.

शब्द, शास्त्र, इन्द्रिये जाणत नाहीत म्हणून ती ज्ञान नाहीत, तेच समयसार ग्रंथामध्ये सांगितले आहे–

सद्दो णाणं ण हवदि जह्मा सद्दो ण याणदे किंचि ।
तह्मा अण्णं णाणं अण्णं सद्दं जिणा बेंति ।।
सत्थो णाणं ण हवदि जह्मा सत्थो ण याणदे किंचि ।
तह्मा अण्णं णाणं अण्णं सत्थं जिणा बेंति ।।

शब्द ज्ञान नाही. कारण शब्द काही जाणत नाही म्हणून ज्ञान भिन्न आहे व शब्द भिन्न आहे. शास्त्र ज्ञान नाही. कारण शास्त्र काही जाणत नाही म्हणून ज्ञान भिन्न आहे व शास्त्र भिन्न आहे.

इन्द्रिये ज्ञान नाहीत. कारण इन्द्रिये काही जाणत नाहीत म्हणून ज्ञान भिन्न आहे व इन्द्रिये भिन्न आहेत. अशा प्रकारे अनेक गाथांद्वारे आचार्यांनी ज्ञान व ज्ञेयामध्ये भिन्नत्वाची भावना केली आहे. जगामध्ये अमूर्त चेतनस्वरूपी जीवद्रव्यच जाणण्यासाठी समर्थ आहे. दुसरा कोणताही पदार्थ जाणण्यासाठी समर्थ नाही म्हणून जीवच ज्ञान आहे. अन्य पदार्थ ज्ञान नाहीत.

आत्मा व अन्य द्रव्य ज्ञेयरूप–

जाणण्यात येणारे पदार्थच ज्ञेय आहेत. जे पूर्वी झाले, जो होत आहे व जे

होणार अशा पर्यायांच्या परंपरेमध्ये प्रवाहित होणारी जितकी म्हणून द्रव्ये आहेत ती सर्व द्रव्ये ज्ञेय आहेत. कारण ती ज्ञानामध्ये जाणली जातात. ज्ञेय दोन प्रकारचे आहे- १) आत्मा व २) अन्य परपदार्थ.

सर्व ज्ञेयपदार्थ तीन प्रकाराने सांगितले जातात. ते तीन प्रकार पुढीलप्रमाणे-

१) द्रव्यांच्या भूत, भविष्य व वर्तमान पर्यायाच्या अपेक्षेने

२) उत्पाद-व्यय-ध्रौव्याच्या अपेक्षेने

३) द्रव्य-गुण-पर्यायाच्या अपेक्षेने

प्रत्येक द्रव्य या तीन प्रकाराने तीन स्वभावरूप आहे. सर्व प्रकारच्या ज्ञेय पदार्थांना द्रव्य म्हटले आहे. कारण सर्व द्रव्ये परिणमनशील आहेत. जे द्रवण करतात अर्थात परिणमन करतात त्यांना द्रव्य म्हणतात. असा द्रव्यपणा लोकातील सर्व पदार्थांच्या ठिकाणी आहे. द्रव्याला जर भूत भविष्य वर्तमान पर्यायरूपाने तीन प्रकाराने मानले नाही तर द्रव्य आपल्या सत्तेचे रक्षण करू शकत नाही. जर द्रव्य नावाप्रमाणेच द्रवणशील आहे तर त्यामध्ये प्रत्येक समयामध्ये अवस्था होणारच. भूतकाळाचे पर्याय, भविष्यकाळाचे पर्याय व वर्तमानकाळाचा पर्याय या अपेक्षेने द्रव्य तीन प्रकारचे होते. जर पर्याय प्रत्येक समयात अन्य अन्य होते तर हे स्वयंसिद्ध आहे की प्रत्येक समयात पूर्व पर्याय नष्ट होते व नवीन पर्याय उत्पन्न होते व त्यांचा आधारभूत द्रव्य ध्रुव आहे. कारण जर द्रव्य सत्‌रूप नित्य नाही मानले तर त्याचे परिणमन सदैव होऊ शकत नाही. याप्रमाणे द्रव्य उत्पाद व्यय ध्रौव्यरूप आहे.

प्रत्येक द्रव्य द्रव्यगुणपर्यायांचा समुदाय आहे. समुदायाच्या अपेक्षेने एक द्रव्य. ते द्रव्य अनंत गुणांचा समुदायरूप आहे म्हणून गुणरूप व प्रत्येक गुणामध्ये प्रतिसमयाला पर्याय होते म्हणून पर्यायरूप आहे. याप्रमाणे द्रव्य द्रव्यगुणपर्यायरूप आहे. सर्व द्रव्य या तीन प्रकारच्या स्वभावाने संपन्न आहेत. आत्म्याचे ज्ञान या सर्व द्रव्यांना जाणते, तरी सुद्धा परज्ञेयापासून आत्मा सदैव भिन्न आहे.

सहज ज्ञेय ज्ञायक संबंध-

ज्ञानाचे अवलंबन घेऊन पदार्थ ज्ञेयरूप म्हटले जातात व ज्ञेयाकाराचे अवलंबन घेऊन जीव ज्ञानरूप म्हटला जातो. दोघांमध्ये सहज ज्ञेयज्ञायक

संबंध आहे. ज्ञान ज्ञेयाला जाणते हा त्याचा स्वभावच आहे. समयसार कलश नं. २१५ मध्ये अमृतचन्द्र आचार्य म्हणतात.–

ज्ञानं ज्ञेयमवैति यत्तु तदयं शुद्धस्वभावोदयः।

ज्ञान ज्ञेयाला जाणते हा त्याच्या शुद्ध स्वभावाचा उदय आहे.

मागील गाथेत कर्ता व करण यामध्ये अभेद दाखविला. या गाथेत कर्ता व कर्म यामध्ये अभेद दाखवितात. एक जीवद्रव्य स्वयं ज्ञान आहे व स्वयं ज्ञेय आहे. ज्ञान स्वपरप्रकाशक असल्यामुळे ज्ञेय दोन प्रकारचे आहे. एक आत्मा व दुसरे अन्य ज्ञेय पदार्थ. ज्ञानसुद्धा स्वयं आहे व ज्ञानाचा प्रयोग ज्यावर झाला ते ज्ञेयसुद्धा स्वयं आहे.

स्वतःच्या क्रियेचा स्वतःमध्ये प्रयोग–

येथे शंका उपस्थित होते की हे ज्ञान स्वयं जाणते व स्वतःला जाणते ही गोष्ट लक्षात येत नाही. स्वतःच्या क्रियेचा प्रयोग स्वतःमध्ये होतो असे उदाहरण सापडत नाही. कुऱ्हाडीचे काम लाकूड कापणे आहे म्हणून कुऱ्हाड लाकडाचे दोन तुकडे करते. स्वतःचे दोन तुकडे करीत नाही. नट कितीही कुशल असला तरी तो स्वतःच्या खांद्यावर चढू शकत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानाचे काम ज्ञेयाला जाणणे आहे. ते कार्य स्वतःमध्ये कसे काय होऊ शकते? स्वतःच्या क्रियेचा प्रयोग स्वतःमध्ये कसा काय होऊ शकतो? म्हणून ज्ञान स्वतःला कसे जाणू शकते?

समाधान– येथे क्रिया कोणती? व त्यामध्ये विरोध तो कोणता? येथे विरोधी क्रिया उत्पत्तिरूप आहे की ज्ञप्तिरूप (जाणणेरूप) आहे? जर उत्पत्तिरूप क्रिया येथे ग्रहण केली जाते तर ती स्वतःपासून होण्यामध्ये विरोध आहे. कारण कोणताही पर्याय (कार्य) स्वतःपासून उत्पन्न होत नाही. परंतु तो द्रव्याच्या आधाराने द्रव्यामधून उत्पन्न होतो. कारण जर असे मानले नाही तर पर्याय द्रव्यरूप आधाराशिवाय उत्पन्न होतील. पाण्याशिवाय लाटा उत्पन्न होण्याचा प्रसंग येईल. हे तर प्रत्यक्षविरुद्ध आहे. पर्याय उत्पन्न होण्यासाठी द्रव्यरूप आधार आवश्यक आहे. एका समयाच्या परिणमनरूप क्रियेतून दुसऱ्या समयाची परिणमन क्रिया होऊ शकत नाही. अर्थात पर्यायातून पर्याय होत नाही. द्रव्य परिणमते, पर्याय परिणमत नाही. पर्यायातून पर्याय होण्यामध्ये विरोध आहे. त्याचप्रमाणे ज्ञानपर्याय सुद्धा स्वयं आपल्यापासून उत्पन्न होत

नाही. तो ज्ञानपर्याय आत्मद्रव्यापासून उत्पन्न होतो.

ज्ञप्तिक्रियेची परनिरपेक्षता –

जर क्रिया म्हणजे ज्ञप्तिक्रिया घेतली तर त्या क्रियेचा प्रयोग स्वत:मध्ये होण्यात विरोध नाही. ज्याप्रमाणे दीपक पराला प्रकाशित करतो व स्वत:लाही प्रकाशित करतो. दिव्याला स्वत:ला प्रकाशित करण्याकरिता दुसरा प्रकाश शोधण्याची गरज नाही. कोणीतरी दिवा घेऊन येण्यास सांगितले तर अशी कधी कोणी मागणी केली नाही की दिव्याला घेऊन येण्यासाठी मला दुसरा दिवा द्या. दिव्याला पाहण्यासाठी दुसऱ्या दिव्याची आवश्यकता वाटली नाही. त्याचप्रमाणे ज्ञप्तिक्रिया जाणणस्वरूप आहे. त्याद्वारे स्वपर दोघांचे ज्ञान होते. एका ज्ञानाला जाणण्यासाठी दुसऱ्या ज्ञानाला शोधण्याची गरज नाही. पर्याय द्रव्यातून होते. परंतु पर्यायाला आपले कार्य करण्यासाठी पराची अपेक्षा असत नाही. प्रकाशपर्याय दिव्यापासून उत्पन्न होतो. परंतु प्रकाशपर्याय स्वपराला प्रकाशित करण्यासाठी कोणत्याही परद्रव्याची अपेक्षा करीत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानपर्याय आत्म्यापासून उत्पन्न होतो, परंतु ज्ञानपर्याय स्वपराला जाणण्यासाठी कोण्या पराची अपेक्षा करीत नाही. पर्यायाची उत्पत्ती स्वपरनिमित्तक आहे, परंतु उत्पन्न पर्याय आपले कार्य करण्यासाठी परनिरपेक्ष आहे. ज्ञानपर्याय स्वत: उत्पन्न होत नाही. परंतु उत्पन्न झालेला ज्ञानपर्याय स्वत:ला जाणू शकत नाही असे नाही. ज्ञानपर्याय स्वयं स्वत:ला जाणते.

उलट प्रश्न असा व्हायला पाहिजे की ज्ञान आपल्यापासून भिन्न अस्तित्वयुक्त परपदार्थांना कसे काय जाणते? ज्ञान परपदार्थाला जाणते असे म्हणणे उपचार आहे.वास्तविक वस्तूचे काम वस्तूपासून अभिन्नच असते. ज्याप्रमाणे दीपक घटपटादी पदार्थांना प्रकाशित करीत नाही, तर तो स्वत:मध्ये प्रकाश करतो. त्याप्रमाणे ज्ञान वास्तविक स्वत:मध्ये जाणणेरूपाने परिणमते. ज्याप्रमाणे दीपकाच्या प्रकाशन क्रियेचा प्रयोग स्वत:वर सुद्धा होतो व निमित्तदृष्टीने अन्य पदार्थावर सुद्धा होतो, त्याचप्रमाणे ज्ञानाच्या जाणणेरूप क्रियेचा प्रयोग स्वत:वर व परपदार्थावरसुद्धा होतो. ज्याप्रमाणे दीपक प्रकाशक आहे व प्रकाश्य (प्रकाशित होण्यायोग्य) सुद्धा आहे. त्याचप्रमाणे आत्मा जाणणारा आहे व जाणण्यायोग्य सुद्धा आहे. अर्थात आत्मा ज्ञानसुद्धा आहे व ज्ञेयसुद्धा आहे. दिव्याचा प्रकाश एकच आहे तोच प्रकाशक व प्रकाश्यसुद्धा

आहे. त्याचप्रमाणे आत्म्याचे ज्ञान एकच आहे तेच स्वयं जाणते व जाणले जाते.

ज्ञान व ज्ञेयाचा परिणमन स्वभाव –

प्रश्न– आत्म्यामध्ये द्रव्यांची ज्ञानरूपता व द्रव्यांमध्ये आत्म्याची ज्ञेयरूपता कशाप्रकारे आहे? अर्थात आत्मा द्रव्यांना जाणतो व द्रव्ये आत्म्याच्या जाणण्यात येतात ही गोष्ट कशी काय घटित होते?

उत्तर– आत्मा व इतर सर्व द्रव्यांचा परिणमन स्वभाव असल्यामुळे हे सहज घटित होते. द्रव्यांच्या अवलंबनाने आत्मा ज्ञानरूप परिणमतो व ज्ञानाच्या अवलंबनाने द्रव्ये ज्ञेयाकाररूपाने परिणमतात. आत्मा व पदार्थांचा सहज परिणमन स्वभाव आहे. सर्व पदार्थ प्रमेयत्व गुणामुळे ज्ञानामध्ये जाणले जातात. ज्याप्रमाणे आरशासमोर मोर उभा राहिला तर त्यामध्ये मोराचे प्रतिबिंब झळकते. आरशामध्ये झळकविण्याची शक्ती आहे व मोरामध्ये झळकण्याची शक्ती आहे. म्हणून मोर आरशात झळकतो. जर मोराला दगडाच्या भिंतीसमोर उभे केले तर त्यामध्ये मोर झळकत नाही. कारण त्या भिंतीमध्ये झळकविण्याची शक्ती नाही अथवा आरशासमोर अमूर्तिक पदार्थ आहेत, परंतु ते आरशात झळकत नाहीत. कारण त्या अमूर्त पदार्थांमध्ये आरशात झळकण्याची शक्ती नाही. झळकण्याच्या शक्तीने युक्त पदार्थ असेल व झळकविण्याच्या शक्तीने युक्त पदार्थ असेल तर झळकण्याची क्रिया घडते. सर्व पदार्थ ज्ञानामध्ये ज्ञात होण्याच्या शक्तीने युक्त आहेत. आत्मा त्यांना जाणण्याच्या शक्तीने युक्त आहे म्हणून सर्व पदार्थ आत्म्याच्या ज्ञानामध्ये झळकतात. जगातील पदार्थांमध्ये प्रमेयत्व धर्म नसता तर ते जाणले जाऊ शकले नसते. म्हणून अन्य गुणाप्रमाणे प्रमेयत्व नावाचा एक गुण मानला पाहिजे.

संपूर्ण विश्व ज्ञान व ज्ञेयामध्ये विभक्त आहे. आत्मा सोडून अन्य सर्व परपदार्थ ज्ञेय आहेत. परन्तु आपला आत्मा स्वयं ज्ञायक आहे आणि ज्ञेयसुद्धा आहे म्हणून आपल्या आत्म्यामध्ये ज्ञेय व ज्ञायक दोन्ही विशेषता आहेत.

प्रस्तुत गाथा जाणून जीवनात प्रयोग– ज्ञानामध्ये आलेल्या परज्ञेयाशी तन्मय न होता ज्ञेय ज्या ज्ञानपडद्यावर झळकतात तो ज्ञानस्वभावी आत्मा मी

आहे. मी अन्य ज्ञेयरूप नाही. ज्ञेय माझ्या ज्ञानस्वभावाचीच प्रसिद्धी करीत आहेत. कारण ज्ञानच नसते तर ज्ञेय प्रतीतीला आलेच नसते. ज्ञेय प्रतीतीला येतात म्हणजे ज्ञान आहे. जसे पदार्थ दिसतात म्हणजे प्रकाश आहे हे लक्षात येते. पदार्थ प्रकाशाची प्रसिद्धी करतात. तसे ज्ञेयपदार्थ ज्ञायकाचीच प्रसिद्धी करतात. म्हणून ज्ञेयाला जाणून असा विचार करावा की हे ज्ञेय मी नाही. हे ज्ञेय ज्यामध्ये ज्ञात होते असा ज्ञायक मी आहे.

ज्ञान व ज्ञेयामध्ये भेद जाणून ज्ञेयज्ञायक संकर दोष दूर करावा. स्वसंवेदनप्रत्यक्ष ज्ञानाने ज्ञानस्वभावी निज आत्म्याला ज्ञेय बनवून शुद्धोपयोगाने परिणत व्हावे. ज्या शुद्धोपयोगाने निज स्वरूपसंपदा विकसित होते त्या शुद्धोपयोगाची सदा भावना करावी.

आता पुढील गाथेमध्ये हे सिद्ध करतात की भूतकाळात झालेले द्रव्यांचे पर्याय व भविष्यकाळामध्ये होणारे द्रव्यांचे पर्याय ज्ञानामध्ये वर्तमान पर्यायाप्रमाणे प्रतिभासित होतात. पूर्व गाथांमध्ये ही गोष्ट अनेकवेळा सांगितली आहे. परंतु मध्यंतरी अन्य विषय आल्यामुळे ती गोष्ट पुसट झाली आहे. येथे त्याला पुन्हा उजाळा देतात. ज्याप्रमाणे दिव्यातील ज्योत विझत आली की पुन्हा त्यामध्ये तेल घालून वात पुढे ढकलून दिवा पुन्हा प्रज्वलित केला जातो त्याप्रमाणे आचार्य पुन्हा ज्ञानाच्या सर्वज्ञ-स्वभावाची गोष्ट उजाळा देऊन प्रकाशित करतात.-

तक्कालिगेव सव्वे सदसब्भूदा हि पज्जया तासिं ।
वट्टंते ते णाणे विसेसदो दव्वजादीणं ।।३७।।

अन्वयार्थ- (तासिं दव्वजादीणं) त्या जीवादी द्रव्यजातींचे **(ते सव्वे)** ते सर्व **(सद्सब्भूदा हि)** वर्तमान व अवर्तमान **(पज्जया)** पर्याय **(तक्कालिगेव)** वर्तमान पर्यायाप्रमाणे **(विसेसदो)** विशिष्टतापूर्वक अर्थात आपापल्या भिन्न-भिन्न स्वरूपाने **(णाणे)** ज्ञानामध्ये **(वट्टंते)** राहतात.

संपूर्ण द्रव्यांचे सर्व भूत, भविष्य, वर्तमान पर्याय एकाचवेळी भिन्न-भिन्न रूपाने ज्ञान मंदिरामध्ये अवतरित होतात. संपूर्ण विश्वात जाती अपेक्षेने द्रव्य ६ आहेत व संख्येच्या अपेक्षेने अनन्त आहेत. प्रत्येक द्रव्यामध्ये क्रमाक्रमाने पर्याय होतात. एका समयात एक पर्याय होतो. प्रत्येक पर्याय आपल्या समयात प्रतापवन्त असतो. तो पर्याय आपले प्रभुत्व आपल्यामध्ये घेऊनच असतो.

क्रमाने प्रतापवन्त होणे हीच पर्यायांची स्वरूप संपदा आहे. पर्याय क्रमपूर्वक होतात ही त्यांची शोभा आहे.

पूर्व अनन्त काळातील भूतपर्याय आणि पुढील अनन्त काळातील भविष्य पर्याय वर्तमानात अविद्यमान असतानाही ज्ञानामध्ये वर्तमानाप्रमाणे भासित होतात. सर्व द्रव्यांचे सर्व पर्याय एकाचवेळेस जाणत असतानाही केवलज्ञानामध्ये प्रत्येक पर्यायाचे विशिष्ट स्वरूप, प्रदेश, आकार आदिक भिन्न भिन्नरूपाने ज्ञात होतात. केवलज्ञानामध्ये सर्व पर्यायांचे मिश्रण होत नाही.

ज्या अवस्था होऊन गेल्या, ज्या होत आहेत व ज्या पुढे होतील त्यांना ते ज्ञान भिन्न-भिन्न जाणते. केवलज्ञान एका समयात सर्व जाणते म्हणून त्याला मिश्रित म्हटले आहे; परंतु ज्ञानामध्ये प्रत्येकाचे लक्षण भिन्न-भिन्न ज्ञात होते. पहा प्रभूंच्या विराट स्वरूपाला! अनंतानंत पदार्थ व त्यांच्या अनंतानंत अवस्था एकावेळी ज्ञानात अवतरतात तरीसुद्धा ज्ञानामध्ये काही गडबड होत नाही. सर्व व्यवस्थितच आहे.

भूतभविष्य पर्याय ज्ञानप्रत्यक्ष-

येथे शंका उत्पन्न होते की ज्ञान वर्तमान पर्यायांना जाणते यात काही शंका नाही. ते तर प्रत्यक्ष आहेत. परंतु भूतकालीन व भविष्यकालीन पर्याय वर्तमानात नाहीतच. त्यांना ज्ञान कसे काय जाणते? समाधान-यामध्ये काहीही अयुक्त नाही. प्रत्यक्षाने यात विरोध येत नाही. छद्मस्थ जीवाला सुद्धा ज्याप्रमाणे वर्तमान वस्तूचे चिंतन करताना ती वस्तू ज्ञानामध्ये प्रतिभासित होते त्याप्रमाणे भूत व भविष्यकालीन वस्तूचे चिंतन करताना ती सुद्धा प्रतीतीला येते. आपण जेव्हा लहानपणीच्या गोष्टी आठवतो तेव्हा सर्व घटना प्रत्यक्षाप्रमाणे भासित होतात. शाळेतील पहिला दिवस, शिक्षकांनी आपल्याला दिलेली शिक्षा, पहिला नंबर आला असता झालेला सत्कार समारोह इत्यादी घटना आठवू लागलो तर आपण भूतकाळात जातो व जशा त्या घटना घडल्या होत्या तशाच्या तशा त्या आपल्या स्मृतिपटलावर अंकित होतात. एखाद्या ज्योतिषाने भविष्यकाळात होणाऱ्या घटना सांगितल्या असतील किंवा आपण मनामध्ये भविष्यकाळासंबंधी काही योजना आखल्या असतील तर त्यांचा विचार करताना सुद्धा त्या प्रत्यक्ष प्रतिभासित होतात.

बाहुबली-भरत आदी जे प्रधानपुरुष भूतकाळात होऊन गेले आहेत

अथवा राजा श्रेणिक आदी भविष्यामध्ये तीर्थंकर भगवान होणार आहेत त्यांचे जीवनचरित्र वाचताना त्या घटना प्रत्यक्षरूपाने प्रतिभासित होतात. ज्याप्रमाणे अल्पज्ञानीच्या ज्ञानामध्ये कोणत्यातरी द्रव्याचा विचार करताना त्याच्या भूत व भावी अवस्था झळकतात. सोन्याला पाहून त्याची खानीमध्ये असणारी भूत अवस्था, त्याचप्रमाणे अंगठी, रींगा इत्यादीरूप होणाऱ्या भावी अवस्था ज्ञात होतात. जर असे झाले नाही तर सुवर्णाचा निर्णय होऊन त्याच्यापासून दागिने बनले नसते. वैद्य रोग्याच्या भूत व भावी अवस्थांचा विचार करूनच औषध देतो. एक स्वयंपाकीन बाई अन्नाची भूत अवस्था व भावी भात, भाकरी इ. अवस्था मनामध्ये विचार करूनच स्वयंपाक तयार करते. त्याचप्रमाणे केवलज्ञानी आपल्या दिव्य ज्ञानामध्ये प्रत्यक्षरूपाने सर्व द्रव्यांचे सर्व पर्याय वर्तमानाप्रमाणे स्पष्ट जाणतात.

अल्पज्ञांच्या ज्ञानाची जर ही स्थिती आहे तर ज्यांचे संपूर्ण आवरण नष्ट झाले आहे व अनंत ज्ञान प्रकट झाले आहे, शुद्ध सहज ज्ञान प्रकाश झाला आहे असे केवली भगवान सहा द्रव्यांच्या भूत आणि भविष्यकाळाच्या अनंत पर्यायांना पाहतात यात काय शंका? केवलज्ञानामध्ये भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्यकालीन सर्व पर्याय प्रत्यक्ष आहेत.

एका समयात भूतभविष्यवर्तमान पर्यायांची ज्ञानप्रत्यक्षता–

भूतभविष्य पर्याय वर्तमानात प्रत्यक्ष आहेत हे ठीक आहे; परंतु ते एकाच वेळेस कसे काय जाणले जाऊ शकतात? यामध्ये काही अशक्य नाही. कारण ज्ञान चित्रपटाप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे चित्रपटामध्ये, अतीत, अनागत व वर्तमान वस्तूंचे चित्राकार एका क्षणात प्रत्यक्ष भासित होतात त्याचप्रमाणे ज्ञानरूपी भिंतीमध्ये अतीत, अनागत व वर्तमान पर्यायांचे ज्ञेयाकार एका समयातच भासित होतात. केवली भगवंतांच्या ज्ञानामध्ये जेथे भूत व भविष्यकालीन पर्याय झळकतात तेथेच वर्तमानकालीन पर्यायसुद्धा झळकतो व जेथे वर्तमानकालीन पर्याय झळकतो तेथे भूत व भविष्य पर्याय झळकतात. ज्ञान सर्वांना अविशेषरूपाने एका समयातच जाणते. ज्ञानाचे काम जाणणे आहे व या जाणण्यामध्ये भूत, भविष्य व वर्तमान सर्व पदार्थ एका समयातच येतात. केवळ वर्तमानाला जाणणे मतिज्ञानाची दुर्बलता आहे. तेथे ज्ञानाचा एवढाच विकास आहे. परन्तु केवलज्ञानामध्ये जे आहे,जे होते व जे होणार ते सर्व

जाणले जाते. तेथे फक्त त्याच्या अस्तित्वाचा संबंध आहे. ज्याचे अस्तित्व पूर्वी होते, आता आहे व पुढे होणार, त्या सर्वाला ज्ञान जाणते. द्रव्यामध्ये तर पर्याय क्रमाने होतात; परन्तु क्रमाने होणारे सर्व पर्याय केवलींच्या ज्ञानामध्ये युगपत येतात. पर्याय होण्यामध्ये क्रम आहे, जाणण्यामध्ये क्रम नाही. सिद्ध भगवंतांना स्वयं हा विकल्प नाही की हा पर्याय भूतकाळाचा आहे, हा वर्तमानाचा आहे व हा भविष्याचा आहे. तेथे तर सर्व पर्यायांचे एकदम आक्रमण झाले की सर्वच्या सर्व पर्याय एकावेळी प्रगट झाले. ही अतीन्द्रिय केवलज्ञानाची महिमा आहे. अनादि-अनंत पर्यायांच्या समूहस्वरूप द्रव्याला केवलज्ञान जाणते परंतु त्यामध्ये भूत, वर्तमान, भविष्य असा भेद करीत नाही. केवली भगवंतांचे सातिशय माहात्म्य आहे की सर्वच्या सर्व पदार्थ सर्वच्या सर्व पर्याय एकाचवेळेस त्यांच्या ज्ञानामध्ये झळकत आहेत. केवलज्ञानाच्या महिमेचा अन्त गणधरासारखे मोठे-मोठे महर्षिसुद्धा प्राप्त करू शकत नाहीत.

त्रैकालिक पर्यायांची ज्ञानामध्ये सद्भूतता-

ज्या अवस्था पूर्वी झाल्या किंवा ज्या अवस्था अद्यापि झाल्या नाहीत, पुढे होतील अशा असद्भावात्मक वस्तूसुद्धा ज्ञानामध्ये सद्भूतच आहेत ज्याप्रमाणे नष्ट झालेल्या व उत्पन्न न झालेल्या वस्तूंचे चित्राकार वर्तमानच आहेत त्याप्रमाणे अतीत व अनागत (भविष्य) पर्यायांचे ज्ञेयाकारसुद्धा वर्तमानच आहेत. ज्याप्रमाणे चित्राच्या भिंतीवर बाहुबली आदी पूर्वी झाले व श्रेणिक आदी तीर्थंकर पुढे होतील त्या सर्वांचे चित्र आहेत. त्या सर्वांना पाहणाऱ्याला ते सर्व चित्र वर्तमानात झळकत आहेत. त्याचप्रमाणे केवली भगवंतांच्या उपयोगरूपी भिंतीवर द्रव्याच्या भूत, भविष्य पर्यायांचे चित्र वर्तमानरूपानेच प्रतिबिंबित होत आहेत.

उद्याची पर्याय उद्या होईल; परन्तु ती ज्ञानामध्ये तर वर्तमानच आहे. आठवण करतेवेळी दहा वर्षापूर्वीची सुद्धा घटना वर्तमानच आहे. भूतकाळातील पर्याय भले नष्ट झाले असतील आणि भविष्यकालीन पर्याय अजून उत्पन्न झाले नसतील तरीसुद्धा केवलज्ञानामध्ये तर वर्तमान पर्यायासमान विद्यमान आहेत. भूत, भविष्य पर्याय वर्तमानात नाहीत; परंतु त्यांचे ज्ञान वर्तमानात आहे.

ज्ञान विश्वाचे साक्षी-

द्रव्यामध्ये जे पर्याय पूर्वी झाले, जो पर्यय आता आहे व जे पर्याय होतील तेच ज्ञानामध्ये जाणले जातात. पर्यायांचे अस्तित्व असल्यामुळे ते ज्ञानात जाणले जातात. परंतु सर्वज्ञांनी जाणल्यामुळे पर्याय होतात असे नाही. जसा पदार्थ आहे त्याचा आकार ज्ञानात येतो. ते ज्ञान असे स्वच्छ आहे की जसे झाले, होत आहे व होईल ते ज्ञानामध्ये झळकते. जे काही होणार ते सर्व केवलींच्या ज्ञानामध्ये आहे. ज्ञानामुळे काही होत नाही, तसे होणार असल्यामुळे तसे ज्ञान होते.

ज्याप्रमाणे ज्योतिषाने जाणले की ६ वाजता सूर्य उगवेल तर ज्योतिषाने जाणल्यामुळे सूर्य थोडाच ६ वाजता उगवणार, सूर्य ६ वाजता उगवणार आहे म्हणून ज्योतिषाने जाणले की असे होईल. ज्योतिषाने सांगितले की, अमुक दिवशी चन्द्रग्रहण लागेल. परन्तु चन्द्रग्रहण ज्योतिषाने सांगितल्यामुळे थोडेच लागणार आहे. चन्द्रग्रहण लागणार आहे हे ज्योतिषी केवळ जाणतो व सांगतो. तो फक्त ज्ञाता द्रष्टा आहे. जगातील पदार्थांचा कर्ता, धर्ता नाही त्याप्रमाणे केवली सर्व विश्वाचे ज्ञाता द्रष्टा आहेत, कर्ता,धर्ता नाहीत.

यद्यपि केवलज्ञानी सर्वाला जाणतात परंतु ज्ञेयाच्या सन्मुख नाहीत. ते मात्र आपल्या शुद्ध आत्मस्वभावामध्येच सन्मुख आहेत व त्याच्याच आनंदाचा स्वाद तन्मय होऊन घेतात. निश्चयाने ते स्वत:चेच वेदन करीत आहेत. अर्थात पूर्ण ज्ञानचेतना रूपाने वर्तन करीत आहेत. याचप्रमाणे मोक्षार्थी व साम्य भावाचा अभ्यास करणाऱ्याला सुद्धा उचित आहे की जरी त्याने श्रुतज्ञानाच्या बलाने अनेक द्रव्यांच्या भूत व भावी पर्यायांना वर्तमानाप्रमाणे जाणले तरीसुद्धा एकाग्र होऊन निश्चय रत्नत्रयमय आपल्या शुद्ध आत्म्याला जाणावे. त्याच्याच आनन्दाचा आस्वाद घ्यावा. हाच स्वानुभव पूर्ण स्वानुभवाचे बीज आहे. वर्तमान व भविष्यात आत्म्याला सुखी निराकुल ठेवणारा हाच निजानंदाच्या स्वानुभवाचा अभ्यास आहे म्हणून याचाच प्रयत्न करावा.

आता आचार्य असद्भूत पर्यायांना अर्थात जे पूर्वी होऊन गेले व पुढे होतील जे आता वर्तमान समयात सत् नाहीत त्या पर्यायांना कथंचित् सद्भूतपणा दाखवितात. केवलींच्या ज्ञानामध्ये असद्भूत पर्याय ज्ञेय असल्यामुळे सद्भूत आहेत हे सांगतात–

जे णेव हि संजाया जे खलु णट्ठा भवीय पज्जाया ।
ते होंति असब्भूया पज्जाया णाणपच्चक्खा ।।३८।।

अन्वयार्थ– (जे पज्जाया) जे पर्याय **(हि)** वास्तविक **(संजाया णेव)** उत्पन्न झाले नाहीत, त्याचप्रमाणे **(जे)** जे पर्याय **(खलु)** निश्चयाने **(भवीय णट्ठा)** उत्पन्न होऊन नष्ट झाले, **(ते)** ते पर्याय **(असब्भूया)** असद्भूत **(होति)** आहेत. **(णाणपच्चक्खा)** ते असद्भूत पर्याय ज्ञानामध्ये प्रत्यक्ष आहेत.

भूत व भावी पर्याय प्रभूंच्या ज्ञानामध्ये स्पष्ट प्रत्यक्ष प्रतिभासित होतात.

असद्भूत भूतभविष्य पर्याय ज्ञानामध्ये सद्स्वरुप –

जे पर्याय अद्यापि संभूतीचा अनुभव करीत नाहीत अर्थात जे पर्याय अजून झाले नाहीत ते सुद्धा प्रभूंच्या ज्ञानामध्ये प्रत्यक्ष आहेत. ज्यांच्याविषयी सांगितले जात आहे ते अवश्य सत्तारूप आहेत; परन्तु वर्तमानामध्ये सत्तारूप नाहीत असे भविष्यकालीन पर्याय आहेत. त्याचप्रमाणे जे आत्मलाभाचा अनुभव करून विलयाला प्राप्त झाले आहेत अर्थात भूतकालीन पर्याय वर्तमानात असद्भूत आहेत; परंतु ज्ञानामध्ये प्रत्यक्ष आहेत. या पर्यायांनी द्रव्यामधूनच आत्मलाभ प्राप्त केला होता व ते द्रव्यामध्येच विलीन झाले. ते द्रव्याच्या एका समयाच्या अवस्थेमध्ये होते दुसरी अवस्था होण्याच्या काळामध्ये विलयाला प्राप्त झाले. द्रव्याचे सर्व पर्याय उत्पाद, व्यय किंवा ध्रुवरूपाने द्रव्यामध्ये आहेत.

हे सर्व भूतकाळ व भविष्यकाळासंबंधी पर्याय वर्तमानामध्ये असद्भूत आहेत. असत् आहेत तथापि सर्वज्ञ भगवंतांच्या ज्ञानामध्ये प्रत्यक्ष आहेत. ज्ञानामध्ये सदैव विद्यमान आहेत म्हणून सद्भूतच आहेत. ज्याप्रमाणे एका दगडाच्या शिलेवर भूतकाळातील देवांच्या, भविष्यकाळातील देवांच्या व वर्तमानामध्ये विद्यमान देवांच्या प्रतिमा उत्कीर्ण केल्या तर त्या सर्व प्रतिमा एका काळामध्ये जाणणाऱ्याच्या ज्ञानामध्ये सद्भूतच आहेत. त्याप्रमाणे सर्व पर्याय भगवंतांच्या ज्ञानामध्ये उतरलेले आहेत म्हणून अवस्था भूतकाळाची असो की भविष्यकाळाची सर्व सद्भूत आहेत.

ज्याप्रमाणे अल्पज्ञानीला वर्तमानामध्ये पदार्थांच्या कित्येक भूत व भविष्य अवस्था झळकतात. एक कपड्याचा तागा हातात घेताच त्याच्या भूत

व भावी अवस्था अल्पज्ञानीच्या विचारात येतात. हे कापड धाग्यांपासून बनले आहे, धागे कापसापासून बनले आहेत, कापूस झाडापासून व झाड कापसाच्या बी पासून झाले आहे. त्याचप्रमाणे या कापडापासून शर्ट, धोतर, टोपी इत्यादी बनवू, अशाप्रकारे आपल्या क्षयोपशमानुसार भूत व भावी अवस्था एका बुद्धिमानाच्या वर्तमान ज्ञानामध्ये ज्ञात होतात. येथे विचारपूर्वक झळकतात व तेथे केवलज्ञानामध्ये स्वयं स्वभावाने झळकतात.

ज्याप्रमाणे केवली भगवान सर्व लोक अलोकाला प्रत्यक्ष जाणत असताना सुद्धा परम उदासीन व आत्मस्थ राहतात. त्याचप्रमाणे श्रुतज्ञानी महात्मासुद्धा श्रुताच्या अवलंबनाने सर्व ज्ञेयांना जाणून त्या सर्वांपासून उदासीन होऊन आत्मस्थ राहतात. श्रुतज्ञानीने जरी अनेक विशेष जाणले नसले तरी त्याने भेदज्ञानाची कला प्राप्त केली आहे त्यामुळे तो परम संतुष्ट आहे. ज्याप्रमाणे केवलज्ञानी मुख्यरूपाने निज शुद्ध आत्म्याच्या स्वादामध्ये मग्न आहेत त्याप्रमाणे एका आत्मानुभवाच्या अभ्यासीला स्वरूपामध्ये तन्मय झाले पाहिजे. आपल्या आत्म्याला सोडून अन्य परद्रव्याला गौणरूपाने जाणावे अर्थात त्याला जाणत असतानाही त्यामध्ये विकल्प करू नयेत. भाव आगम निक्षेपरूप निज आत्म्याला व द्रव्य आगम निक्षेप रूप पराला जाणावे.

गाथा क्रमांक ३७ मध्ये हे सिद्ध केले आहे की केवलज्ञानामध्ये सर्व द्रव्यांचे भूतकालीन व भविष्यकालीन सर्व पर्याय वर्तमान पर्यायाप्रमाणे स्पष्टपणे झळकतात व गाथा क्र. ३८ मध्ये हे सिद्ध केले की भूतकालीन व भविष्यकालीन पर्याय अविद्यमान असतानाही ज्ञानामध्ये प्रत्यक्ष असतात त्या अपेक्षेने सद्भूत (विद्यमान) आहेत. आता या दोन गाथांमध्ये सांगितलेल्या केवलज्ञानाच्या अतुल सामर्थ्याला दृढ करण्याकरिता आचार्य प्रश्नात्मक आलंकारिक पद्धतीने कथन करतात–

जदि पच्चक्खमजायं पज्जायं पलइयं च णाणस्स।
ण हवदि वा तं णाणं दिव्वं ति हि के परूवेंति ।।३९।।

अन्वयार्थ– (जदि वा) जर **(अजायं पज्जायं)** उत्पन्न न झालेला पर्याय **(च)** व **(पलइयं)** नष्ट पर्याय **(णाणस्स)** केवल ज्ञानाला **(पच्चक्खं)** प्रत्यक्ष **(ण हवदि)** नाही तर **(तं णाणं)** त्या ज्ञानाला **(दिव्वं ति)** दिव्य आहे असे **(हि)** खरोखर **(के परूवेंति)** कोण म्हणेल ? अर्थात कोणीही म्हणणार नाही.

केवलज्ञानाची दिव्यता –

केवलज्ञान भूत व भविष्यकालीन पर्यायांना वर्तमानामध्ये प्रत्यक्ष जाणते हीच केवलज्ञानाची दिव्यता व भव्यता आहे. जर इन्द्रियज्ञानाप्रमाणे केवलज्ञानसुद्धा अतीत व अनागत पर्यायांना जाणणार नाही तर त्या ज्ञानामध्ये इन्द्रियज्ञानाहून काय विशेषता? इतर व्यक्तींहून एखाद्या व्यक्तीमध्ये काही विशेषता असेल तर त्या व्यक्तीला महत्त्व प्राप्त होते. जर अर्जुनासारख्या निष्णात योद्ध्याला छोट्याशा शत्रूवर सुद्धा विजय प्राप्त करता आला नाही तर त्याला महायोद्धा कोण मानेल? सर्व शत्रूंवर विजय प्राप्त करण्याचे ज्यामध्ये सामर्थ्य आहे त्यालाच अलौकिकता प्राप्त होते. इन्द्रियज्ञानामध्ये तर भूत भविष्यकालीन पर्यायांना जाणण्याचे सामर्थ्य नाही. केवलज्ञान वर्तमान पर्यायाप्रमाणे भूत भविष्य पर्यायांना क्रमाशिवाय आत्मिक शक्तीने प्रत्यक्ष जाणते हीच त्याची अलौकिकता आहे.

जर परिपूर्ण विकसित ज्ञान त्रिलोक त्रिकालवर्ती सर्व पदार्थांना एकाच वेळेस स्पष्ट जाणत नाही तर ते ज्ञानच नाही. जे सर्व जाणण्यायोग्य पदार्थांना एका समयात जाणण्यास समर्थ आहे तेच वास्तविक ज्ञान आहे. कारण जे जाणते ते ज्ञान व जे जाणले जाते ते ज्ञेय आहे. ज्ञेय व ज्ञानाचा विषय विषयी संबंध आहे. जर ज्ञान आहे व ज्ञेय आहे तर तेथे जाणण्याची क्रिया झालीच पाहिजे. ज्या पदार्थाचे जेवढे काम व्हायला पाहिजे तेवढे काम जर त्याने केले तर त्याला शुद्ध पदार्थ म्हणतात आणि जर तेवढे काम न करता कमी केले तर त्याला अशुद्ध पदार्थ म्हणतात. जर आरसा स्वच्छ असेल तर तो पदार्थाला प्रतिबिंबित करण्याचे आपले काम पूर्ण करेल व जर मलिन असेल तर त्या आरशामध्ये पदार्थांचे प्रतिबिंब स्पष्ट उमटणार नाहीत. हीच गोष्ट ज्ञानाची आहे. जर ज्ञान शुद्ध असेल तर सर्व द्रव्यांचे सर्व पर्याय एका समयात जाणण्यात येतात हेच ज्ञानाचे माहात्म्य आहे. जर ज्ञान अशुद्ध असेल तर त्याला जाणण्यामध्ये अवश्य कमतरता राहणार. म्हणूनच मति, श्रुत, अवधि व मन:पर्यय ज्ञानाचा विषय अत्यन्त अल्प आहे.

ज्ञानाचा स्वभाव जाणणे आहे. छद्मस्थाचे ज्ञानसुद्धा आपल्या स्वभावानुसार काम करीत आहे. परन्तु ज्ञानावरण कर्माच्या निमित्ताने ह्याचा संपूर्ण विकास होत नाही. तरीसुद्धा ते ज्ञान अतीत व अनागत पर्यायांचे ज्ञान

करून घेण्यासाठी उद्यत आहे. केवलज्ञानामध्ये कोणतेही ज्ञानावरण राहिले नाही त्यामुळे ते सर्व ज्ञेयांना जाणू शकणार नाही असे कधीही होऊ शकत नाही, जेथे ज्ञानावरणाचा लवलेश ही राहिला नाही तेथे ज्ञानाच्या कार्यामध्ये मर्यादा येण्याचे कारण काय? म्हणून ते ज्ञान असीम आहे.

विश्वामध्ये द्रव्य अनन्तानन्त, एकेका द्रव्यामध्ये गुण अनन्तानन्त, एकेका गुणाची एक-एक समयवर्ती एक-एक पर्याय, एकेक गुणाच्या भूत भावी पर्याय अनन्तानन्त, एकेका पर्यायामध्ये शक्तीचे अंश (अविभाग प्रतिच्छेद) अनन्तानन्त या सर्वांना विशेषरूपाने पृथक पृथक एका समयात जाणणे हे केवलज्ञानाचे कार्य आहे. ही महिमा निर्मल ज्ञानाचीच जाणावी.

व्यवहारामध्ये एखादा व्यक्ती अनेक गोष्टी एका वेळेस जाणतो तर लौकिक लोकांना त्याची किती महिमा येते. पंडित रायचंदजी शतावधानी होते. ओळीने विचारलेल्या शंभर प्रश्नांची ते त्याच क्रमाने उत्तरे देत असत. अर्थात एकदा सांगितलेल्या शंभर गोष्टी त्यांना त्याच क्रमाने लक्षात राहत. त्यांच्या या बुद्धिमत्तेने कितीतरी लोक आश्यर्यचकित होत. जर शंभर गोष्टी जाणणाऱ्याची एवढी महिमा तर अनंत गोष्टींना न सांगता युगपत जाणणाऱ्या ज्ञानाची किती महिमा? याचा विचारच करता येत नाही. तो आमच्या बुद्धीचा विषय नाही. असे हे अलौकिक अद्भुत माहात्म्यस्वरूप ज्ञान आहे. हे ज्ञान इतक्या वेगाने सर्व विश्वाला जाणते की जणू काय ज्ञानाने सर्व पदार्थांवर एकाचवेळेस आक्रमणच केले आहे किंवा सर्व ज्ञेय आपले स्वरूप सर्वस्व इतक्या वेगाने सर्वज्ञाच्या ज्ञानाला समर्पित करतात जणू काय सर्व ज्ञेयांचा एकाच वेळेस ज्ञानावर हमला झाला आहे. असे जर झाले नाही तर त्या ज्ञानाची महिमा काय? म्हणून आवरण हटताच स्वयं ज्ञानशक्तीने प्रकट होणाऱ्या ज्ञानामध्ये सर्व द्रव्य गुणपर्यायांना जाणणे निश्चित सिद्ध आहे.

केवलज्ञानी अरिहंत भगवान, यद्यपि परद्रव्य पर्यायांना तन्मय होऊन जाणत नाहीत. केवळ जाणतात. ते तन्मयतेने सहजानंदमय निज शुद्धात्म्याला जाणतात. त्यांच्या उपयोगाची सन्मुखता निज शुद्धात्म्याकडे आहे. ते आपल्या शुद्ध आत्म्याच्या सुख समुद्रात मग्न होऊन परमानन्दामध्ये मस्त आहेत. भेदविज्ञानीचे सुद्धा हे कर्तव्य आहे की परद्रव्य गुण पर्यायांना जाणले तरी आपली तन्मयता आपल्या शुद्ध आत्मस्वभावामध्ये ठेवावी व निज ध्रुव

शुद्ध ज्ञानानन्द स्वभावाचा अनुभव करून परमानन्दामध्ये मस्त व्हावे.

अतीत अनुत्पन्न पर्यायांना जाणण्याचे सामर्थ्य इन्द्रिय ज्ञानामध्ये नाही हे आता युक्तिपूर्वक निश्चित करतात –

अत्थं अक्खणिवदिदं ईहापुव्वेहिं जे विजाणंति ।
तेसिं परोक्खभूदं णादुमसक्कं ति पण्णत्तं ।।४०।।

अन्वयार्थ–(जे) जे **(अक्खणिवदिदं अत्थं)** इन्द्रियांना प्राप्त झालेल्या पदार्थाला **(ईहापुव्वेहिं)** ईहादिपूर्वक **(विजाणंति)** जाणतात. **(तेसिं)** त्यांना **(परोक्खभूदं)** परोक्षभूत पदार्थाला **(णादुमसक्कं)** जाणणे अशक्य आहे **(ति)** असे **(पण्णत्तं)** सर्वज्ञांनी सांगितले आहे

इन्द्रियज्ञान भूत व भविष्य पर्यायांना जाणू शकत नाही.

इन्द्रियज्ञानाची अशक्तता–

इन्द्रियज्ञान आपल्या विषय क्षेत्रामध्ये असलेल्या पदार्थालाच जाणते. त्यामुळे दूरवर्ती व परमाणू आदी सूक्ष्म पदार्थांना जाणू शकत नाही. कारण दूरवर्ती पदार्थाचा इन्द्रियाशी सन्निकर्ष होऊ शकत नाही. चक्षू व मन सोडून शेष चार इन्द्रिये प्राप्त व अप्राप्त दोन्ही पदार्थांना जाणू शकतात. अप्राप्त पदार्थसुद्धा आपल्या विषयभूत क्षेत्रामध्ये असेल तरच जाणले जाऊ शकते. चक्षू व मन अप्राप्त पदार्थांनाच जाणू शकतात. येथे आपल्या विषयभूत क्षेत्राच्या बाहेरील पदार्थांना परोक्ष म्हटले आहे. इन्द्रियजन्य मतिज्ञान पदार्थाला अवग्रह, ईहा, अवाय, धारणा या क्रमानेच जाणते. मतिज्ञानापूर्वी पदार्थाचे सामान्य ग्रहण रूप दर्शन होते. त्यानंतर पदार्थाचे विशेष ग्रहण होते ते अवग्रहज्ञान होय. त्यानंतर त्या वस्तूला विशेष जाणण्याची इच्छा होते ते ईहाज्ञान होय. त्यानंतर लक्षणाद्वारे वस्तूचा विशेष निर्णय करणेरूप अवायज्ञान उत्पन्न होते. पुन्हा दृढनिश्चय होतो ते धारणाज्ञान होय. अशाप्रकारे इन्द्रिय व मनोजनित मतिज्ञान क्रमाक्रमाने होते. क्रमाक्रमाने संपूर्ण विश्वाला जाणणे शक्य नाही. म्हणून इन्द्रियज्ञानाने कोणी सर्वज्ञ होऊ शकत नाही.

त्याचप्रमाणे इन्द्रिय व मनाद्वारे सूक्ष्म परमाणू आदि पदार्थांचा संबंध होऊ शकत नाही. म्हणून इन्द्रियज्ञान सूक्ष्म पदार्थांना जाणू शकत नाही.

ज्या पर्यायांचे अस्तित्व नष्ट झाले आहे व ज्यांचे अस्तित्व अद्यापि

उपस्थित झाले नाही अशा भूत व भविष्यकालीन पर्यायांना इन्द्रियज्ञान कसे जाणू शकेल? कारण इन्द्रियांचा संबंध केवळ वर्तमान पर्यायांशी होतो. त्यामुळे इन्द्रिये फक्त वर्तमान पर्यायांनाच जाणतात. मध्ये काही अडथळा आला तरी इन्द्रिये जाणू शकत नाहीत. म्हणून इन्द्रियज्ञान क्रम-करण-व्यवधानाने सहित असते.

इन्द्रिये अमूर्तिक पदार्थांना जाणू शकत नाहीत. इन्द्रियांचा विषय मूर्तिक पदार्थ आहेत. मूर्तिकामध्येही स्थूल पदार्थालाच जाणते, स्थूलपदार्थ -सुद्धा जवळ असेल तरच जाणू शकते व त्यांना सुद्धा क्रमानेच जाणते म्हणून इन्द्रियज्ञानाने सर्वज्ञ होणे असंभव आहे. इन्द्रियज्ञानाद्वारे सर्वाला जाणण्याचा आमचा खटाटोप निष्फळ आहे. म्हणून इन्दियज्ञानाची कास सोडून अतीन्द्रियज्ञानाचा ध्यास घ्यावा. इन्द्रियज्ञान हेय आहे असे श्रद्धान करावे. रागादि विकल्परहित स्वसंवेदनरूप भावमती, भावश्रुतज्ञान सर्वज्ञतेच्या उत्पत्तीचे कारण आहे. म्हणून त्याचाच पुरुषार्थ करावा. स्वसंवेदन ज्ञान म्हणजे आत्म्याची आत्म्यामध्ये स्वसमयरूप प्रवृत्ती. ते इन्द्रिय व मनाच्या विकल्पांनी रहित निजास्वादरूप आनंदमय ज्ञान आहे. हे भेदविज्ञानमूलक आत्मज्ञान केवलज्ञानाच्या उत्पत्तीचे बीज आहे. म्हणून स्वतंत्रता इच्छिणाऱ्या जीवांनी इन्द्रिय सुखाला साधनभूत इन्द्रिय व मनाच्या विकल्पात्मक ज्ञानामध्ये रती सोडून अतीन्द्रिय ज्ञान व अतीन्द्रिय आनन्दाला कारणभूत स्वसंवेदन ज्ञानामध्ये लीनता करावी. कारण जे पुरुष इन्द्रियसुखामध्ये व इन्दियसुखाला साधनभूत इन्द्रियज्ञानामध्ये,नाना मनोरथरूप मानसिक ज्ञानामध्ये आसक्ती करतात ते सर्वज्ञपद प्राप्त करू शकत नाहीत.

पूर्वोक्त गाथेमध्ये इन्द्रियज्ञानाची अशक्तता व पराधीनता दाखविली. ते ऐकून जो शिष्य निरुत्साहित झाला आहे त्याला आचार्य उत्साहित करतात की तू दुःखी होऊ नकोस. जरी इन्द्रियज्ञान काही जाणण्यास समर्थ नसले तरी आपल्याजवळ अतीन्द्रिय ज्ञान आहे ते सर्व मनोरथ पूर्तीचे साधन आहे. जगातील जी कोणती वस्तू तुला जाणावयाची असेल ती सर्व वस्तू जाणण्यासाठी अतीन्द्रिय ज्ञान समर्थ आहे. असे समर्थ साधन असताना तू का खेदखिन्न होतोस. एखाद्या प्लॅस्टिक किंवा काचेच्या दुकानात आपण वस्तू आणण्यासाठी जातो तेव्हा दुकानदार आपल्या समोर दोन वस्तू ठेवतो. एक

नकली वस्तू व दुसरी असली वस्तू. तो प्रथम नकली वस्तू आपटून दाखवितो ती लगेच फुटते नंतर असली वस्तूला पण आपटून दाखवतो ती फुटत नाही. अशाप्रकारे नकली वस्तूची हीनता व असली वस्तूची उत्कृष्टता दाखवून असली वस्तू ग्रहण करण्याची प्रेरणा देतो त्याचप्रमाणे आचार्य प्रथम इन्द्रियज्ञानाच्या हीनतेचे चित्रण करून आता अतीन्द्रिय ज्ञानाच्या उदात्ततेचे चित्रण करतात.–

अपदेसं सपदेसं मुत्तममुत्तं च पज्जयमजादं।
पलयं गयं च जाणदि तं णाणमदिंदियं भणियं ।।४१।।

अन्वयार्थ– जे ज्ञान **(अपदेसं)** अप्रदेशी **(सपदेसं)** सप्रदेशी **(मुत्तं)** मूर्त **(च)** व अमूर्त वस्तूला आणि **(अजादं पज्जयं)** उत्पन्न न झालेल्या पर्यायाला **(च)** व **(पलयं गयं)** नष्ट झालेल्या पर्यायाला **(जाणदि)** जाणते **(तं णाणं)** त्या ज्ञानाला **(अदिंदियं)** अतीन्द्रिय **(भणियं)** म्हटले आहे.

अतीन्द्रिय केवलज्ञान एकप्रदेशी, बहुप्रदेशी, मूर्तिक, अमूर्तिक, भूत व भविष्य सर्वाला जाणते.

इन्द्रियज्ञानाची असमर्थता व पराधीनता–

पाच इन्द्रियांचे अवलंबन घेऊन जे ज्ञान प्रवृत्त होते त्यास इन्द्रिय ज्ञान म्हणतात. ज्या ज्ञानामध्ये इन्द्रिय निमित्त बनतात ते इन्द्रिय ज्ञान होय. वास्तविक इन्द्रिय तर जड पुद्गलमय आहेत. इन्द्रिये स्वयं ज्ञानरूप परिणमत नाहीत. ज्ञानच ज्ञानरूप परिणमते. परंतु ज्या इन्द्रियज्ञानाच्या द्वारे आम्ही सर्वाला जाणू इच्छितो ते इन्द्रिय ज्ञान किती कमजोर आहे पहा! प्रथम तर इन्द्रियज्ञानासाठी अनेक बाह्य व अंतरंग साधन सामग्रीची आवश्यकता लागते. जसे डोळ्यांनी जाणायचे म्हटले की प्रकाश पाहिजे, वस्तू जवळ पाहिजे, डोळ्यांचे अन्तर्बाह्य उपकरण व्यवस्थित पाहिजे, डोळ्यामध्ये विकृती असेल तर चष्मा पाहिजे. कानाने जाणायचे म्हटले तर उपदेशाची गरज वाटते. शब्दरूप पुद्गलांची आवश्यकता आहे. कान बिघडले की कानाचे मशीन स्पीकर इत्यादींचे अवलंबन घ्यावे लागते. त्याचप्रमाणे द्रव्य इन्द्रिये, द्रव्य मन, पुस्तक, इत्यादी बाह्य साधन सामग्रीवर विसंबून राहावे लागते. सर्व बाह्य साधन सामग्री पुण्ययोगाने प्राप्त झाली तरी अंतरंग इन्द्रियावरण कर्माचा क्षयोपशम असेल तरच जाणू शकणार. क्षयोपशम पण असेल परंतु जर उपयोग

लावला नाही तर जाणू शकत नाही. पुनः पुनः धारणरूप संस्कार असतील तरच लवकर ग्रहण होऊ शकते अशाप्रकारे लब्धि उपयोग व संस्कारादिक अंतरंग कारणांना ग्रहण करून इन्द्रियज्ञान प्रवृत्त होते. त्यामुळे इन्द्रियज्ञान किती पराधीन आहे हे लक्षात येते. परंतु या जीवाला इन्द्रियज्ञानाची इतकी सवय लागली आहे की त्यामध्ये पराधीनता भासित होत नाही. माझी इन्द्रिये आहेत व मी माझ्याच इन्द्रियांद्वारे जाणतो तर त्यात कसली पराधीनता? असे वाटते. इन्द्रियांमध्ये अहंबुद्धी व ममबुद्धी असल्यामुळे तो आपला स्वभाव भासित होतो.

सर्व साधनसामग्री प्राप्त होऊनसुद्धा इन्द्रियज्ञान सर्वाला जाणू शकत नाही. केवळ सप्रदेशी द्रव्यालाच जाणू शकते. अप्रदेशी द्रव्याला जाणू शकत नाही. येथे सप्रदेशी म्हणजे बहुप्रदेशी द्रव्य व अप्रदेशी म्हणजे एकप्रदेशी परमाणू व कालद्रव्य होय. एकप्रदेशी परमाणू इन्द्रियज्ञानाचा विषय नाही. कारण इन्द्रिये स्थूल पदार्थाला जाणतात. सूक्ष्म पदार्थाला जाणू शकत नाहीत. बहुप्रदेशीमध्ये सुद्धा सर्व बहुप्रदेशी द्रव्यांना जाणण्याचे सामर्थ्य इन्द्रियज्ञानामध्ये नाही. बहुपद्रशीमध्ये सुद्धा मूर्त पुद्गल द्रव्यालाच विषय करू शकते. अमूर्त धर्म, अधर्म, आकाश व जीवद्रव्याला विषय करू शकत नाही. कारण इन्द्रियांचा विषय स्पर्श, रस, गंध, वर्ण व शब्द आहे. इन्द्रिय ज्ञान मूर्त द्रव्याच्या सुद्धा वर्तमान पर्यायालाच विषय करते. भूत, भविष्य पर्यायांना विषय करीत नाही. कारण इन्द्रियज्ञान विषय व विषयीचा संबंध झाल्यावरच प्रवृत्त होते व इन्द्रियांचा संबंध वर्तमान पर्यायाशी होऊ शकतो; भूत, भविष्य पर्यायांशी होऊ शकत नाही. आम्हाला तर भूत, भविष्य व परोक्षभूत सर्व वस्तूंना जाणण्याची जिज्ञासा आहे व त्यासाठी इन्द्रियज्ञानाचेच आम्ही अवलंबन घेतो तर मग आमची इच्छा पूर्ती कशी होणार? आणि या कारणामुळेच हा जीव आकुलित होऊन दुःखी होतो.

अतीन्द्रिय ज्ञानाची समृद्धता व स्वाधीनता–

आचार्य म्हणतात 'हे जीवा, इन्द्रियज्ञानाची विकलता व पराधीनता पाहून, ऐकून तू निराश होऊ नकोस.' सर्व जिज्ञासापूर्तीचे समर्थ साधन तुझ्याजवळ आहे. ते साधन म्हणजे अतीन्द्रिय ज्ञान. अतीन्द्रिय ज्ञान संपूर्ण आवरण कर्माचा अभाव झाल्यावर प्रकट होते म्हणून ते क्षायिक व पूर्ण

निरावरण असल्यामुळे पूर्ण विकसित आहे. त्याला कोणतीही मर्यादा नाही. जे काही ज्ञेय आहे ते सर्व अतीन्द्रिय ज्ञानाद्वारे ग्रहण करण्यायोग्य आहे. भले ही ते द्रव्य एकप्रदेशी असो अथवा बहुपद्रेशी असो, मूर्त असो अथवा अमूर्त असो, भूतकालीन असो अथवा भविष्यकालीन असो सर्वाला अतीन्द्रिय ज्ञान जाणते. सर्व द्रव्यामध्ये प्रमेयत्व गुण आहे. म्हणून सर्व पदार्थ स्वतंत्र रूपाने सकल प्रत्यक्ष अतीन्द्रिय ज्ञानाचे प्रमेय होतात. ज्याप्रमाणे जेवढे काही इंधन आहे त्यामध्ये दाह्यपणा आहे. दाह्यपणा उल्लंघन करीत नसल्यामुळे ते अग्नीचे दाह्य आहे. ज्याप्रमाणे जळणाऱ्या अग्नीचे तेवढ्या आकाररूप परिणमन आहे जेवढे सर्व दाह्य पदार्थ आहेत. त्याप्रमाणे अतीन्द्रिय ज्ञानाचे तेवढ्या आकाररूप परिणमन आहे जेवढे सर्व ज्ञेय आहेत. अतीन्द्रिय ज्ञानाला कोणतीही गोष्ट जाणणे अशक्य नाही. जेव्हा अतीन्द्रिय ज्ञान उत्पन्न होते तेव्हा सर्व जिज्ञासा आपोआप शमतात. सर्व काही जाणल्यामुळे जिज्ञासाच शिल्लक राहत नाहीत. त्यामुळे आकुलता नाही. पूर्ण निराकुल अवस्था आहे. अतीन्द्रिय ज्ञान परमोत्कृष्ट, निष्कलंक व उपादेय आहे.

अतीन्द्रिय ज्ञान पूर्ण स्वाधीन आहे. त्याला इन्द्रिय प्रकाश उपदेशादी बाह्य साधन सामग्रीची व क्षयोपशम, उपयोग, संस्कारादी अंतरंग साधन सामग्रीची यत्किंचितही आवश्यकता नाही. अतीन्द्रिय ज्ञान आत्म्याचा स्वभाव आहे. वास्तविक ज्ञान अतीन्द्रियच असते. ज्ञान इन्द्रियापासून भिन्न आहे. परतुं अज्ञानी जीवाने ज्ञानाचा संबंध इन्द्रियांशी जोडला आहे. इन्द्रियाशिवाय सुद्धा माझ्यामध्ये जाणण्याचे सामर्थ्य आहे हे हा जीव विसरून गेला आहे. स्वत:ला इन्द्रियवाला व मी इन्दियांद्वारे जाणणारा आहे अशीच स्वत:ची ओळख करून बसला आहे. स्वत:च जीवनाचे निरीक्षण करून पहा. आम्ही एक क्षण तरी इन्द्रियापासून स्वतंत्र राहण्याची इच्छा करतो काय? इन्द्रियज्ञानाशिवाय आम्हाला चैन पडत नाही. सतत काहीतरी ऐकायला पाहिजे, नाहीतर पाहायला पाहिजे, नाहीतर खायला पाहिजे. काही ना काहीतरी इन्द्रियव्यापार आवडतो. अन्यथा स्वत:ला निकामी मानतो. इन्द्रियांचा व्यापार हा माझा व्यापार नव्हे. केवळ जाणणे हा माझा व्यापार आहे. ज्ञान ही कुणाची देन नसून ही माझी स्वत:ची मूलसंपत्ती आहे. हे जेव्हा जीव जाणतो तेव्हा त्याच्या स्वतंत्र जीवनाला प्रारंभ होतो. परतंत्रतेतून तो

पूर्णतः सुटू इच्छितो. त्या स्वतंत्रता प्राप्तीसाठी इन्द्रियांवर हडताल करावा लागेल. आम्ही स्वदेशी माल वापरू. परदेशी मालाची होळी करू. इन्द्रिय मन हा पुद्गल देशातील माल आहे. ज्ञान हा जीवरूपी स्वदेशातील माल आहे. त्या स्वदेशी मालाचा वापर आम्ही सर्वप्रथम आपल्यासाठीच करूया.

ज्या अतीन्द्रिय ज्ञानाची उदात्तता व्यक्त केली असे हे अतीन्द्रिय ज्ञान अतीन्द्रिय स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानसाधनाने अतीन्द्रियज्ञान स्वभावी निज आत्म्याला जाणले असताच उत्पन्न होते. म्हणून आता केवळ स्वभावाला जाणण्याचा पुरुषार्थ करूया. मला एक आत्माच असू देत, अन्य काही नको. जो एकाची इच्छा करतो त्याला सर्व काही प्राप्त होते. जो एकाला सोडून अनेक पदार्थांमध्ये आपला उपयोग जोडतो त्याला काही प्राप्त होत नाही.

एकदा एक राजा दुसऱ्या राजाबरोबर युद्ध करायला जातो. दोन महिनेपर्यंत युद्ध चालू होते. त्यामध्ये त्या राजाचा विजय झाला. तेथे राजाने मोठा उत्सव साजरा केला. खूष झाल्यामुळे राजाने आपल्या देशातील सर्व राण्यांना पत्र लिहिले की जिला जे पाहिजे ते पत्रात लिहून पाठवावे. तेव्हा कोण्या राणीने 'साडी लिहली' कोणी 'दागिने लिहले.' कोणी 'खेळणी लिहली' कोणी काही तर कोणी काही लिहले. जी सर्वात लहान राणी होती तिने आपल्या पत्रात केवळ एकचा अंक लिहला. दुसरे काही लिहले नाही. पत्र पाकिटात घालून पाठविले. जेव्हा राजाने सर्व पत्रे उघडून पाहिली, कुणी काही तर कुणी काही लिहले होते. परंतु छोट्या राणीच्या पत्रात केवळ १ चा अंक लिहला होता. राजाला या केवळ एकचा अर्थ समजला नाही. त्याने मंत्र्याला विचारले की या छोट्या राणीने काय मागितले आहे. मंत्री पत्र पाहून सांगतो की छोट्या राणीने केवळ एक आपली इच्छा केली आहे, दुसरे काही इच्छिले नाही. राजा शेष सर्व राण्यांनी लिहलेल्या वस्तू घेऊन आपल्या देशात जातो व ज्यांनी जे मागविले होते त्या त्या वस्तू त्या त्या राणीला पोहचवून स्वयं छोट्या राणीच्या महालात पोहचतो. हिने केवळ एकाची इच्छा केली होती; परंतु राजाचे सर्व वैभव राजाबरोबर तिच्या महालात पोहचले की नाही. जिला राजा मिळाला तिला सर्व काही वस्तू आपोआप प्राप्त झाल्या. ज्यांनी एक चैतन्य स्वभावाची इच्छा केली त्याला संपूर्ण विश्व आपोआप प्राप्त झाले. त्याच्या ज्ञानामध्ये संपूर्ण विश्वाचे वैभव प्रकट झाले.

स्वाभाविक ज्ञानपरिणमनाशी अविनाभावी सहज आनंदाच्या उपलब्धीसाठी सहज ज्ञानस्वभावी आत्म्याची उपासना करणे हे प्रथम कर्तव्य आहे.

गेल्या ५-६ गाथांमध्ये आचार्यदेवांनी अतीन्द्रिय ज्ञानाचे सामर्थ्य प्रसिद्ध करून त्याची उपादेयता सिद्ध केली आहे व इन्द्रियज्ञानाची अशक्तता व्यक्त करून त्याची हेयता सिद्ध केली आहे. ज्ञेय पदार्थांना जाणत असताना इष्ट अनिष्ट विकल्प होताना दिसतात. हा पदार्थ चांगला आहे, हा वाईट आहे इत्यादी रागद्वेषादी विकल्प उत्पन्न होतात. जर थोड्याशा ज्ञेयांच्या ज्ञानामध्ये एवढी आकुलता, व्याकुलता उत्पन्न होते, तर सर्वज्ञ सर्व अनन्त पदार्थांना जाणतात. त्यांना किती विकल्प व केवढी आकुलता होत असेल? असे आम्ही आमच्या परिणतीवरून सर्वज्ञांच्या परिणतीचे अनुमान करतो. मोहसहित परिणती कोठे व निर्मोह परिणती कोठे? दोघांची तुलना करणे म्हणजे काच व रत्नाची तुलना करण्यासारखे आहे. ज्ञेय पदार्थाला अनुसरून इष्टानिष्ट विकल्प करण्याची क्रिया ज्ञानामुळे होत नाही तर निर्विकार स्वसंवेदन रूप ज्ञानानुभवाच्या अभावामध्ये मोहामुळे होते. ही गोष्ट येथे सिद्ध करतात-

परिणमदि णेयमट्ठं णादा जदि णेव खाइगं तस्स ।
णाणंति तं जिणिंदा खवयंतं कम्ममेवुत्ता ।।४२।।

अन्वयार्थ- (णादा) ज्ञाता **(जदि)** जर **(णेयमट्ठं)** ज्ञेय पदार्थरूप **(परिणमदि)** परिणमित होतो तर **(तस्स)** त्याला **(खाइगं णाणं णेव)** क्षायिक ज्ञान नाहीच **(त्ति)** अशाप्रकारे **(जिणिंदा)** जिनेंद्र भगवान **(तं)** त्याला **(कम्ममेव खवयंतं)** कर्माचाच अनुभव करणारा **(उत्ता)** म्हणतात.

तात्पर्य हे आहे की ज्ञेय पदार्थरूप परिणमणाऱ्या जीवाला क्षायिक ज्ञान नाही. तो तर कर्माच्या उदयाला भोगणारा आहे. याचे व्याख्यान जयसेनाचार्य ३ प्रकाराने करतात. विकाररहित स्वाभाविक आनंद स्वरूप सुखस्वभावाच्या अनुभवाने शून्य तो जीव उदयात आलेल्या कर्माचाच अनुभव करीत आहे. ज्ञानाचा अनुभव करीत नाही. अथवा जर ज्ञाता पुरुष प्रत्येक पदार्थरूप परिणमन करून नंतर पदार्थाला जाणतो तर पदार्थ अनंत आहेत. अशा पद्धतीने सर्व पदार्थांचे ज्ञान होऊ शकत नाही. अथवा तिसरे व्याख्यान असे की जेव्हा छद्मस्थ(अल्पज्ञ) अवस्थेमध्ये बाहेरील ज्ञेय पदार्थांचे चिंतवन करतो तेव्हा

रागद्वेष रहित स्वसंवेदन ज्ञान याला होत नाही. स्वसंवेदन ज्ञानाच्या अभावामध्ये क्षायिक केवलज्ञान सुद्धा उत्पन्न होत नाही.

ज्ञेयपदार्थरूपाने परिणमन करणे म्हणजे ज्ञेयार्थपरिणमनरूप क्रिया होय. सहजानन्द वर्णीजींनी ही क्रिया तीन रूपाने सांगितली आहे. १) दर्शन मोह संबंधित २) दर्शनमोहरहित चारित्रमोह संबंधित ३) वीतराग क्षायोपशमिक ज्ञान संबंधित.

१) दर्शनमोहसंबंधी ज्ञेयार्थपरिणमन क्रिया–

आत्मरूपाने स्वीकारलेल्या ज्ञेयाकाराच्या अनुसार इष्ट अनिष्ट विकल्परूप भाव करणे दर्शन मोहासंबंधी ज्ञेयार्थपरिणमनरूप क्रिया आहे. अज्ञानी मिथ्यादृष्टी जीव ज्ञानामध्ये झळकलेल्या ज्ञेयाकाराला कारणभूत बाह्य पदार्थांना आपले स्वरूप मानतो. जसे ज्ञानामध्ये शरीर जाणले गेले की ज्ञानाला निमित्त असणाऱ्या त्या शरीराला आपले स्वरूप मानतो. शरीरामध्ये रोग झाला. तो ज्ञानात झळकला की अज्ञानीला वाटते मलाच रोग झाला आहे. निरोगी अवस्था ज्ञानात झळकली की स्वत:लाच निरोगी मानतो व त्यामध्ये निरोगी अवस्था चांगली आहे, रोगी अवस्था वाईट आहे असे इष्ट अनिष्ट विकल्प करतो.

घर, शेती, धन, स्त्री, पुत्र, मित्रादी हे ज्ञानामध्ये जाणले गेले असता त्यांना आपले आहेत असे मानून इष्टानिष्ट विकल्प करतो. शेतीमध्ये पीक चांगले आले की त्याच्याशी तन्मय होऊन आनंदित होतो, नुकसान झाले की दु:खी होतो. स्त्रीपुत्रादिकांचा संयोग झाला किंवा त्यांची अनुकूल परिणती पाहून खूष होतो. धनादिकांचा नाश झाला असता मीच नष्ट झालो असे मानतो. छहढालामध्ये दौलतरामजी म्हणतात–

मै सुखी दु:खी मै रंक राव मेरो धन, गृह, गोधन प्रभाव ।
मेरे सुत तिय मै सबल दीन, बेरूप सुभग मूरख प्रवीण ।।

अशाप्रकारे हा अज्ञानी जीव ज्ञेय पदार्थांमध्ये आत्मबुद्धी करून इष्टानिष्ट विकल्प करतो. आम्ही स्वत:ला काहीतरी समजून बसलो आहोत. जे आपण नाही त्यारूप बनण्याचा हा जीव विकल्प करतो. पुद्गल व जीवाच्या संयोगरूप उत्पन्न झालेली मनुष्य, देवादी पर्याय म्हणजे जीव नव्हे; परंतु

स्वत:ला तद्रूप मानतो त्यामुळे दु:खी होतो. बाह्य द्रव्यपर्यायामध्ये अहंबुद्धी करतो त्यामुळे कर्माची शिक्षा भोगतो म्हणून काहीही बनण्याचा प्रयत्न न करता जे वास्तविक स्वरूप आहे तसे जाणणे एवढेच आपले काम.

एक साधू होता व त्याचा एक शिष्य होता. विहार करता करता दोघेही एका राजाच्या बागेमध्ये पोहचले. तेथे दोन पलंग होते. एकावर संन्यासी जाऊन बसला व दुसऱ्यावर शिष्य जाऊन बसला. संन्याशाने शिष्याला सांगितले, 'तू काहीही बनू नकोस.' थोड्या वेळाने राजा फिरत तेथे आला. त्या दोघांना पाहून राजाने शिपायाला विचारले बंगल्यामध्ये हे कोण बसले आहेत? शिपायाने सांगितले दोन अपरिचित व्यक्ती बसले आहेत. कोण आहेत ते माहीत नाही. राजाने त्यांची चौकशी करायला सांगितली. शिपायाने शिष्याला जाऊन विचारले, 'तू कोण आहेस? शिष्याने उत्तर दिले,'दिसत नाही, आम्ही साधू आहोत.' त्या शिष्याला शिपायाने कान पकडून बाहेर हाकलून दिले. शिपायाने संन्याश्याजवळ जाऊन विचारले 'तुम्ही कोण आहात?' साधू काहीही बोलले नाहीत. शिपाई राजाजवळ गेला व म्हणाला, 'राजन, एक मनुष्य मौन आहे तो काही बोलत नाही आणि दुसरा म्हणतो 'दिसत नाही का? आम्ही साधू आहोत. मी त्याला कान पकडून बाहेर हाकलून दिले.' राजाने विचारले, 'जो मौन आहे, बोलत नाही त्याला तर तू छेडले नाहीस ना? तो कोणीतरी संन्यासी आहे.' राजा गेल्यावर शिष्य गुरुला म्हणतो, 'माझी तर चांगली हकालपट्टी झाली. गुरु म्हणाले,'तू काही बनला तर नव्हतास ना?' शिष्याने घडलेली घटना सांगितली. तेव्हा गुरु म्हणाले, 'मी तुला सांगितले हिते ना की तू काहीही बनू नकोस. तू तर ज्ञानस्वरूप आत्मा आहेस. तू स्वत:ला भ्रमवश मानतोस की मी गृहस्थ आहे, साधू आहे, या बाह्य वेशभूषेची दृष्टी सोडून स्वत:च्या परमार्थस्वरूपाला पहा.

वास्तविक बाह्य पदार्थांचा या आत्म्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. ते केवळ ज्ञानामध्ये जाणले जातात. ज्ञानाचा स्वभाव जाणणे आहे म्हणून ज्ञान त्यांना जाणते; परंतु हा मोहामुळे त्यांच्याशी आपला आत्मात्मीय संबंध जोडतो. मी त्यांचा आहे व ते माझे आहेत असे स्वीकारतो. ज्ञेय पदार्थांना आपलेसे करणे हे ज्ञानाचे स्वरूप नाही हे मोहाचे स्वरूप आहे. आरशामध्ये मोर, पोपट, झाड इत्यादी झळकले म्हणून ते पदार्थ आरशाचे होत

नाहीत किंवा आरसा त्यांचा होत नाही. आरसा आरशाच्या ठिकाणी आहे. पदार्थ पदार्थाच्या ठिकाणी आहेत. आरसा पदार्थांमध्ये जात नाही. पदार्थ आरशात जात नाहीत, आरशाचे काम आहे पदार्थांना प्रतिबिंबित करणे. आरसा तर आपल्या स्वच्छत्व स्वभावरूपाने परिणमतो. पदार्थांचे काम आहे प्रतिबिंबित होणे. प्रत्येक जण आपापल्या स्वभावाला सोडत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानाचे काम आहे जाणणे, पदार्थांचे काम आहे जाणले जाणे. ज्ञान पदार्थरूप होत नाही. पदार्थ ज्ञानरूप होत नाहीत, परंतु अज्ञानी स्वत:ला ज्ञेयरूप मानतो. अशाप्रकारे ज्ञेयार्थपरिणमनलक्षण क्रिया अज्ञानी मिथ्यादृष्टीला परज्ञेयामध्ये एकत्व, ममत्व, कर्तृत्व, भोक्तृत्वबुद्धिपूर्वक होते. एक ते तीन गुणस्थानापर्यंत दर्शनमोहजनित ज्ञेयार्थ परिणमनक्रिया होते.

२) चारित्रमोहसंबंधित ज्ञेयार्थपरिणमनरूप क्रिया–

ज्ञानामध्ये जाणलेल्या पदार्थाविषयी आपलेपणा नसतानाही ज्ञानी ज्ञेयाकाराला अनुसरून रागद्वेष, हर्ष विषादादी विकल्परूपाने परिणमतो, ही चारित्रमोहासंबंधी ज्ञेयार्थपरिणमनरूप क्रिया आहे. सम्यग्ज्ञानी परपदार्थापासून स्वत:ला भिन्न जाणतो. त्याला शरीरामध्ये आत्मबुद्धी नाही तरीसुद्धा शरीराची रोगी, निरोगी अवस्था ज्ञानामध्ये झळकली असता निरोगी अवस्था चांगली आहे, रोगी अवस्था वाईट आहे असा रागद्वेषरूप विकल्प करतो. पुत्रप्राप्ती झाली किंवा धनप्राप्ती झाली, व्यापारामध्ये फायदा झाला, शेतीमध्ये चांगले पीक आले या सर्व गोष्टी ज्ञानामध्ये येतात तेव्हा कदाचित ज्ञानीला ही हर्ष होतो व स्त्री पुत्रादिकांचा वियोग झाला, धन चोरीला गेले, व्यापारामध्ये नुकसान झाले, शेतीमध्ये पीकांची नासाडी झाली तर कदाचित ज्ञानीलाही दु:ख होते. परंतु तो स्वत:ला विसरत नाही. स्वत:च्या भिन्न अस्तित्वाची जाणीव ठेऊन त्याला ज्ञेयानुसार रागद्वेषादी विकल्प होताना दिसतात. रामचंद्रजी लक्ष्मणाच्या वियोगाने शोकाकुल झाले. लक्ष्मण जीवंत आहे असे समजून सहा महिने त्या प्रेताला घेऊन फिरले, त्या प्रेताशी प्रेम केले. त्याची सेवा वैय्यावृत्त्य केले. बलदेव ही कृष्णाचे प्रेत घेऊन सहा महिने फिरला. त्याच्या वियोगात शोक केला. ही त्यांची ज्ञेयार्थ परिणमनक्रिया चारित्रमोहासंबंधी जाणावी.

जेव्हा कोणी अल्पज्ञानी कोणत्याही ज्ञेयपदार्थाला विकल्परूपाने

जाणतो आणि हा विचार करतो की हा घट आहे, हा पट आहे, हे नीळे आहे, हे पिवळे आहे, हा पुरुष आहे, ही स्त्री आहे, हा सज्जन आहे, हा दुर्जन आहे, हा धर्मात्मा आहे, हा अधर्मी आहे, हा ज्ञानी आहे, हा अज्ञानी आहे तेव्हा विशेष रागद्वेषाचे प्रयोजन नसताना सुद्धा हेय उपादेय बुद्धी बरोबर काही ना काही रागद्वेष होतातच. हा भाव स्वानुभव दशेने शून्य आहे त्यामुळे भावकर्मांच्या उदयाला भोगणेरूप आहे. त्या परिणामामध्ये मोहाचा काही ना काही उदय आहे. तो त्याचा अनुभव करीत आहे. अशा या मोह अनुभवणाऱ्या जीवाला क्षायिक निर्मल केवलज्ञान नाही व असा सरागभाव केवलज्ञानाचे कारण नाही. केवलज्ञानाचे कारण भेदविज्ञानपूर्वक निश्चल स्वात्मानुभव आहे. म्हणून अल्पज्ञानीला परद्रव्याला जाणण्याचा निषेध केला आहे. अशाप्रकारे ही ज्ञेयार्थ परिणमन क्रिया सविकल्पक ज्ञानींना चारित्रमोहाच्या उदयाने रागद्वेषरूप व हर्ष विषादरूप विकल्पात्मक होते. ४ ते ६ या गुणस्थानापर्यंत बुद्धिपूर्वक रागद्वेष आहेत व ७ ते १० पर्यंत अबुद्धिपूर्वक राग द्वेष विकल्प असतात.

वीतराग क्षायोपशमिक ज्ञानासंबंधी ज्ञेयार्थपरिणमनरूप क्रिया–

रागद्वेषरहित छद्मस्थ मुनींच्या क्षायोपशमिक ज्ञानामध्ये ज्ञानावरण कर्माच्या देशघाति स्पर्धकांच्या उदयामुळे अस्थिरता आहे. तेथे इच्छा नसतानाही एका ज्ञेयाला सोडून दुसऱ्या ज्ञेयाला जाणण्याचे कार्य सुरू आहे; अशाप्रकारे ज्ञेयपरिवर्तन तेथे आहे. रागद्वेषजनित विकल्प नाहीत. चौथ्यादी गुणस्थानामध्ये आत्मानुभूतीच्या काळात बुद्धिपूर्वक ज्ञेयार्थपरिणमन नसते. सातव्या गुणस्थानापासून अबुद्धिपूर्वक राग असल्यामुळे बुद्धिपूर्वक एका ज्ञेयाला सोडून दुसऱ्या ज्ञेयाला जाणत नाही. अकराव्या व बाराव्या गुणस्थानात केवळ क्षायोपशमिक ज्ञानासंबंधी ज्ञेयार्थ परिणमनरूप क्रिया होते.

ज्ञेयार्थ परिणमन कर्माचे अनुभवन आहे, ज्ञानाचे नाही–

ज्ञानाचे कार्य जाणणे आहे, ज्ञानाचे जाणणेरूपाने प्रगट होणे ज्ञानाची अवस्था आहे. याच्याबरोबर जो विकार भाव आहे तो सर्व मोहनीय कर्माच्या उदयाला निमित्त करून अन्य गुणांचा विकार आहे. ज्ञेयाचे अवलंबन घेऊन जे ज्ञान रागामध्ये आसक्त होते ते विभावज्ञान आहे. वास्तविक ज्ञान नाही. बाह्य ज्ञेय पदार्थांचे चिन्तन करतेवेळी रागादिविकल्परहित स्वसंवेदन ज्ञान

नसल्यामुळे ते चिन्तनरूप ज्ञान परमार्थत: ज्ञानच नाही. निर्विकार सहज आनंदमय होऊन सहज जाणणे हे वास्तविक ज्ञान आहे.

ज्ञेय पदार्थांना आपलेसे करणे ज्ञानाचे स्वरूप नाही. ज्ञेय पदार्थामध्ये लीन होणे हे ही ज्ञानाचे स्वरूप नाही. ज्ञेयाच्या सन्मुख उपयोग वृत्ती होणे हे ही ज्ञानाचे स्वरूप नाही. जसा पदार्थ आहे तशी जाणणेरूप उपयोगवृत्ती होणे ज्ञानाचा स्वभाव आहे. परपदार्थाच्या सन्मुख झालेला आत्मा वर्तमानामध्ये निज स्वरूपाचा अनुभव करीत नाही व पुढेही स्वानुभवाच्या फलस्वरूप केवलज्ञानाला प्राप्त करणार नाही. जो कर्माच्या उदयाचा भोग सोडून निज शुद्ध स्वभावामध्ये स्वयं तन्मय होईल तोच वर्तमानामध्ये निज आत्मानन्दाचा अनुभव करेल व त्यालाच ज्ञानावरण कर्माचा क्षय होऊन निर्मल केवलज्ञान उत्पन्न होईल.

केवलज्ञानामध्ये ज्ञेयार्थपरिणमन क्रियेचा अभाव–

सर्वज्ञ परमात्म्याचे ज्ञान अतीन्द्रिय आहे, ज्ञानावरणकर्माच्या क्षयाने प्रवृत्त होते म्हणून क्षायिक आहे. यामध्ये ज्ञेयानुसार इष्टानिष्ट विकल्प नाहीत. केवलींच्या ज्ञानाचा विलास अद्‌भुत आहे. यामध्ये तीन लोक व अलोक तसेच भूत, वर्तमान, भविष्य सर्वकाळ विकल्पाशिवायच स्पष्ट प्रतिभासित होतात.

केवली भगवान सर्व ज्ञेय पदार्थांना जाणत असूनही त्यानुसार परिणमित नाहीत. अर्थात ज्ञेय पदार्थानुसार इष्टानिष्ट विकल्प करीत नाहीत. ज्ञानाचेच काम ज्ञान करते. विकल्पाचे काम, विकाराचे काम ज्ञान करीत नाही. एक शक्ती दुसऱ्या शक्तीचे काम करीत नाही. केवली भगवंतांची ज्ञानशक्ती दर्शनशक्ती, चारित्रशक्ती स्वभावरूप परिणमित आहे. पदार्थाला जाणताना पदार्थासंबंधी हा असा आहे, हा तसा आहे इत्यादीरूप विकल्प क्षायोपशमिक ज्ञानामध्येच आहेत. क्षायिक ज्ञानामध्ये नाहीत. जो विकल्प करतो, कर्माच्या फलाचा अनुभव करतो तो ज्ञानाचा अनुभव करीत नाही. वास्तविक ज्ञाता पुरुष तोच आहे जो परविषयक ज्ञान होतानासुद्धा परज्ञेयापासून भिन्न निजतत्त्वाचा अनुभव करतो. जो कर्मोदयाचा भोग सोडून निजशुद्ध स्वभावामध्ये स्वत: तन्मय होतो तो वर्तमानामध्ये आत्मिक आनन्दाचा अनुभव करतो व त्यालाच ज्ञानावरण कर्माचा क्षय होऊन निर्मल केवलज्ञान

उत्पन्न होते. म्हणून मोक्षार्थी जीवांनी सतत निज आत्मानुभवाचा पुरुषार्थ करावा.

मागील गाथेत ही गोष्ट स्पष्ट केली आहे की ज्ञेय पदार्थानुसार परिणमण्याची क्रिया ज्ञानामुळे होत नाही. कारण, ज्ञान जर त्याचे कारण मानले तर जेथे जेथे ज्ञान तेथे तेथे ज्ञेयार्थ परिणमन क्रिया अशी व्याप्ती मानावी लागते. परंतु तसे नाही. जेथे स्वाभाविक ज्ञान आहे तेथे ज्ञेयार्थ परिणमनरूप क्रिया दिसून येत नाही. म्हणून ज्ञेयार्थ-परिणमन-क्रिया ज्ञानाचे कार्य नाही. तर मग येथे प्रश्न उत्पन्न होतो की ज्ञेयार्थपरिणमन क्रिया कशामुळे होते व त्याचे फळ कुणामुळे प्राप्त होते. अर्थात ज्ञेयार्थ परिणमन क्रिया व फळाचे कारण काय आहे? या प्रश्नाचे उत्तर पुढील गाथेत देतात-

उदयगदा कम्मंसा जिणवरवसहेहि णियदिणा भणिया।
तेसु विमूढो रत्तो दुट्ठो वा बंधमणुहवदि ॥४३॥

अन्वयार्थ-(जिणवरवसहेहि) जिनवरांमध्ये श्रेष्ठ अर्थात तीर्थंकर देवांनी **(उदयगदा कम्मंसा)** उदयप्राप्त कर्मपरमाणू **(णियदिणा)** नियमरूपाने **(भणिदा)** सांगितले आहेत. **(तेसु)** त्या उदयप्राप्त कर्मांमध्ये जीव **(विमूढो रत्तो दुट्ठो वा)** मोही, रागी, अथवा द्वेषी होऊन **(बंधमणुहवदि)** बंधाचा अनुभव करतो.

कर्माच्या उदयाचे निमित्त प्राप्त करून जीव मोही, रागी, द्वेषी होतो व आगामी कर्माचा बंध करतो हे उपर्युक्त गाथेचे तात्पर्य आहे.

१) ज्ञेयार्थ परिणमनक्रिया व बंधाचे कारण ज्ञान नाही-

ज्ञेय पदार्थाच्या परिणमनाला अनुसरून आपले परिणमन करणे ज्ञेयार्थपरिणमनक्रिया होय. पदार्थाला जाणून इष्ट अनिष्ट भाव करणे म्हणजे ज्ञेयार्थपरिणमनक्रिया. ज्ञानाचा स्वभाव तर स्व पराला केवळ जाणणे आहे. जेव्हा हा जीव ज्ञानाने ज्ञेय पदार्थाला जाणतो तेव्हा त्या ज्ञेय पदार्थांचे त्यांच्या योग्यतेनुसार कोणते ना कोणते तरी परिणमन होत असते. ज्ञानाचे काम तर त्याला जसे आहे तसे जाणणे आहे. परंतु अज्ञानी जीव त्याला केवळ न जाणता मोहाच्या उदयामुळे हे चांगले आहे, हे वाईट आहे असे इष्ट अनिष्ट विकल्प करतो. कर्माच्या उदयाचा ज्ञाता न राहता कर्ता धर्ता होतो. कर्माच्या

उदयात आपल्या स्वभावाला विसरून मोहरागद्वेषरूप परिणमन करतो. त्यामुळे ज्ञेयार्थ परिणमन क्रिया घडते व त्यामुळे बंध होतो. ज्ञानामुळे ज्ञेयार्थपरिणमन क्रिया ही नाही व त्याचे फळ बंध ही नाही. ज्ञानस्वभाव जर बंधाचे कारण मानले तर जीव कधीच मुक्त होऊ शकणार नाही. कारण स्वभाव सदैव असतो त्याचा कधीही अभाव होत नाही. त्यामुळे सदैवच बंध होत राहील. ज्ञानस्वभावामुळे ज्ञेयार्थ-परिणमन-क्रिया मानली तर ज्ञानी, अज्ञानी, रागी वीतरागी सर्वांनाच ती झाली पाहिजे. कारण सर्वांजवळ ज्ञानस्वभाव आहे. परंतु सर्वांना समान विकल्प होताना दिसत नाहीत.

जेव्हा जीव जाणण्याबरोबर मोहाने परिणत होतो तेव्हा ज्ञेयपदार्थानुसार परिणमन करतो. संसार अवस्थेमध्ये जीवाला सविकल्प भूमिकेमध्ये परज्ञेयाला जाणल्यावर मोह, राग, द्वेष या तीनपैकी कोणता ना कोणता तरी परिणाम नियमाने होतो. ज्ञेयपदार्थाला एक तर आपले मानतो किंवा चांगले मानतो किंवा वाईट मानतो. त्यामुळे मोही, रागी किंवा द्वेषी होतो. त्या मोह, राग, द्वेष परिणामामुळेच ज्ञेयार्थ परिणमन क्रिया व बंध होतो. ज्ञानामुळे नाही. ही गोष्ट सिद्ध होते.

२) कर्माचा उदय अबंधक-

संसारी जीवांना पुद्गल कर्माचा उदय नियमाने आहे. श्रीमंत असो, गरीब असो, चक्रवर्ती असो की भिकारी असो, ज्ञानी असो की अज्ञानी असो, सज्जन असो की दुर्जन असो, स्त्री असो की पुरुष असो, देव असो की दानव असो, प्रत्येक संसारी जीवाजवळ अनंत कर्मपरमाणूंचा संचय आहे. त्याचा संसारीपणाच हे प्रसिद्ध करीत आहे की तो कर्मसहित आहे. कर्मसहित जीवालाच संसारी जीव म्हणतात. त्या कर्मभंडारातून प्रत्येक समयाला थोडे कर्म उदयाला नियमाने येत असते. दहाव्या गुणस्थानापर्यंत आठ ही कर्मांचा उदय नियमाने असतो. त्या कर्मांच्या उदयाने प्रत्येक जीवाला अनके प्रकारचे परिणाम उत्पन्न होतात व अनेक प्रकारचे संयोग प्राप्त होतात. यावरून अनुमानानेही उदयागत कर्मांची सिद्धी होते. तो कर्माचा उदय जीवाला जबरदस्तीने आपले फळ भोगायला लावत नाही. जीव त्या कर्मफळाशी एकरूप होऊन त्याचे फळ स्वयं भोगतो. द्रव्यकर्माचा उदय आल्यावर भावकर्म होईलच असे नाही.

एकीकडे कर्माचा उदय विद्यमान आहे व एकीकडे त्रिकाली ज्ञानस्वभाव आहे. वर्तमान ज्ञानपर्याय, त्रिकाल स्वभावाचा आश्रय न घेता जेव्हा कर्माकडे झुकते तेव्हा मोह, राग, द्वेष उत्पन्न होतात आणि जर कर्माचा उदय झाल्यावर सुद्धा ज्ञानपर्याय ज्ञानस्वभावाकडे झुकते तर मोह, राग, द्वेष उत्पन्न होत नाहीत. म्हणून केवळ कर्माचा उदय बन्धाचे कारण नाही. जर द्रव्यकर्माचा उदय बन्धाचे कारण होईल तर जीव कधीच मुक्त होऊ शकणार नाही. कारण संसारी जीवाला कर्माचा उदय सदैव आहे म्हणून सदैव बंध होत राहील. द्रव्यकर्माच्या उदयाला निमित्त करून जीव मोह, राग, द्वेषरूप भावकर्म करतो, त्यामुळे कर्माचा बंध होतो.

३) संयोग बंधाचे अकारण–

अघाती कर्माच्या उदयाने प्राप्त झालेला इष्ट व अनिष्ट संयोग सुद्धा बंधाचे कारण नाही. पुण्यकर्माच्या उदयाच्या निमित्ताने इष्ट स्त्री, पुत्र, मित्र, धनादिकांचा संयोग प्राप्त होतो व पापकर्माच्या उदयाला निमित्त करून अनिष्ट संयोग प्राप्त होतो. तो संयोग आपल्याला जबरदस्तीने राग, द्वेष करायला लावत नाही किंवा बंधनात अडकवत नाही. हा जीव स्वयं त्यांच्याशी संबंध जोडतो व मोह राग द्वेषाला प्राप्त होतो.

निंदारूप वचन आपल्याला असे म्हणत नाही की 'तू मला ऐक व रुष्ट हो.' आम्ही ते निंदारूप वचन ऐकून स्वत:वर ओढून घेतो व रुष्ट होतो. स्तुतिरूप वचन असे म्हणत नाही की, 'तू मला ऐक व संतुष्ट हो.' आम्ही ते वचन ऐकून माझी स्तुती केली असे समजून स्वयं संतुष्ट होतो. कर्माच्या उदयाने प्राप्त झालेल्या संयोगामध्ये ममत्व करून आम्ही स्वयं स्वत:ला अनेक बंधनात अडकून ठेवले आहे.

एक लहान मुलगा असतो. आई त्याला बाजारात पाठवते. तेव्हा मुलगा आईला म्हणतो की मी बाजारात हरवलो तर काय करणार? तेव्हा आई त्याची समजूत काढण्यासाठी त्याच्या हातात एक दोरा बांधते व सांगते की हा दोरा आहे तोपर्यंत तू हरवत नाहीस. तू निश्चिंतपणे जा. तो बाजारात जातो. बाजारात गर्दी असते. गर्दीमध्ये इकडे तिकडे करताना त्याचा दोरा तुटतो व कुठेतरी पडतो. तेंव्हा तो तेथेच रडायला लागतो की 'मी हरवलो.' रडत रडत घरी आईजवळ येतो व म्हणतो की आई, मी हरवलो. कारण माझा दोरा

तुटला. आई समजूत घालत म्हणते 'बाळ, तू झोप. आपण दोरा नंतर शोधू.' मुलगा झोपतो. आई हळूच त्याच्या हातामध्ये दोरा बांधते. मुलगा उठल्यावर पाहतो व ओरडतो की 'आई मी सापडलो.' त्या मुलाचे अज्ञानपण पाहून आपल्याला हसू येते; परंतु त्या मुलापेक्षाही आम्ही किती अज्ञानी आहोत हे आपल्या मान्यतेचा विचार केल्यावर लक्षात येते. आपणसुद्धा अनेक दोऱ्या बांधून घेतल्या आहेत. शरीर, पत्नी, पुत्र, मित्र, घर, धन इत्यादी एक ना दोन किती तरी दोऱ्या बांधून घेतल्या आहेत. एक एक दोरी तुटली की मी नष्ट झालो. माझे सर्वस्व संपले इ. वाटते. हा मोहच बंधाचे कारण आहे.

४) कर्म बिचारे कौन भूल तेरी अधिकाई–

कर्माचा स्वभाव तर आपला काळ संपला की फळ देऊन निघून जाणे आहे. कर्म उदयाला येते म्हणजे निघून जाते. ते जात असताना पाप पुण्य स्वभावानुसार चांगले वाईट फळ देते. जीव त्या फळामध्ये स्वत:ला जोडतो व आपला स्वभाव बिघडवतो. कर्माच्या उदयामध्ये हा जीव जर स्थितप्रज्ञ राहिला तर कर्म गुपचुप निघून जाते आणि जर या जीवाने हो, ना केले तर कर्म पुन्हा याच्याशी आपला संबंध जोडते. एखादा दुष्ट मनुष्य आपल्या संगतीत येतो, चार-आठ दिवस आपल्या जवळ थांबतो. जाताना आपल्या स्वभावानुसार त्रास देतो. ५-१० शिव्या देतो. त्यावेळी शहाणा मनुष्य काय विचार करतो? कसतरी का होईना, हा दुष्ट मनुष्य आपल्यापासून दूर चाललाय ना, जाऊ दे एकदाचा, आपण गप्प बसू, काय करतो ते करूदे, व त्याला जाताना हसतमुखाने बाय-बाय करतो व तो गेल्यावर दुष्टाच्या तावडीतून निसटल्याचा श्वास घेतो; परंतु ती दुष्ट व्यक्ती निघून जाताना जर आपण त्याला प्रत्युत्तर दिले, त्याच्या तोंडाला लागलो. तर तो जाताना म्हणतो, 'मला उत्तर देतोस काय? मी पुन्हा येतो तेव्हा तुझे पाहून घेतो. माझ्या वाट्याला तू लागलास तर तुझी काय गत होईल हे लक्षात ठेव. याहीपेक्षा जास्त त्रास देईन.' म्हणून **जाणाऱ्याचा तटस्थभावाने निरोप घेऊन स्वत:च्या घरामध्ये निवान्त रहाणे, शहाणपणाचे आहे.**

त्याचप्रमाणे एखादा मित्र आपल्या घरी येतो. ४-८ दिवस राहून तोही निघून जातो व जाताना तुम्ही खूप चांगली सेवा केली, आदर सत्कार केला इ. आपली स्तुती वगैरे करतो. शहाणा मनुष्य त्याही वेळी त्या स्तुतीला न भाळता

स्थितप्रज्ञ राहून त्याचा निरोप घेतो. तो जाणतो मी याच्याशी खूप हितगुज केले तर हा आपल्याला सारखा येऊन त्रास देणार. आपल्या कार्यात विघ्न येणार. हा सुखाने राहू देणार नाही. याची सेवा चाकरी करावी लागणार. मी माझ्या घरात स्वतन्त्रपणे निवान्त राहू शकणार नाही. म्हणून त्यालाही हसतमुखाने बाय बाय करून निरोप घेतो व निश्चिन्त होतो. जर कोणी मूर्ख मनुष्य त्याच्या स्तुतीला भाळून त्याच्याशी आपला घनिष्ट संबंध जोडतो तर त्याच्याजवळ तो पुन्हापुन्हा येतो व त्याची याला सेवा सुश्रुषा करावी लागते व हा आपली स्वतन्त्रता गमावतो. म्हणून जाणाऱ्याचा तटस्थभावाने निरोप घेऊन स्वत:च्या घरामध्ये निवान्त राहणे शहाणपणाचे आहे.

कर्मसुद्धा पाहुणा आहे. तो आपल्या चैतन्य घराचा सदस्य नाही. कर्म दोन प्रकारचे आहे. पापकर्म व पुण्यकर्म. त्यापैकी पापकर्म आपला उदयकाळ आला की आपल्या स्वभावानुसार फळ देऊन निघून जाते. ज्ञानाची हानी, दर्शनगुणाची हानी, सम्यक्श्रद्धेचा घात, कषाय उत्पन्न करणे, विघ्न करणे, दरिद्रता, अपयश, कुरूपता, इष्टवियोग इत्यादी उत्पन्न करणे हे त्या पापाचे फळ, ते कर्म फळ देऊन निघून जाताना आम्ही त्याला प्रत्युत्तर दिले, Yes किंवा No म्हटले तर ते चिडते व पुन्हा आपल्याशी खूनगाठ बांधून जाते. मी पुन्हा येईन तेव्हा यापेक्षा चांगला वचका काढेन. त्या पापकर्माच्या उदयात आम्ही जर शोक केला तर पूर्वीपेक्षा अधिक तीव्र पापकर्माचा बंध होतो व त्याचे फळ अति दु:खदायी मिळते. म्हणून ज्ञानी जीव पाप कर्माचा उदय आला असता विचार करतो की 'हा तर निघून चालला आहे. जे फळ द्यायचे आहे ते देऊ देत. त्या फळाला आनन्दाने भोगण्यासाठी मी समर्थ आहे; त्या कर्माच्या उदयाकडे लक्ष न देता स्वभावामध्ये डुबकी मारतो. तर ते कर्म त्याला बाय बाय करून निघून जाते. पुन्हा त्याच्याजवळ येण्याचे नाव काढत नाही. कारण दुष्ट व्यक्तीला कोणी चिडले तर अधिक आनंद होतो व तो त्याची अधिक कळ काढतो. अज्ञानी पापकर्माच्या उदयात संतप्त होतो. मोह, राग, द्वेषरूप परिणमतो म्हणून पुन्हा नवीन कर्माचा बंध बांधतो व आगामी काळामध्ये पुन्हा दु:खाला प्राप्त होतो. बंध-उदय पुन्हा बंध-उदय या दु:खाच्या मालिकेतून तो मुक्त होत नाही.

त्याचप्रमाणे कधी पुण्यकर्माचा उदय येतो. ते पुण्यकर्म लौकिकसुखरूप

फळ देते. श्रीमंती, सुरूपता, इष्टसंयोग इत्यादी जीवाला आवडणारे त्याचे फळ. ते पुण्यकर्म सुद्धा फळ देऊन निघूनच जाते. कायम स्वरूपी राहत नाही. त्या पुण्यकर्माचाही ज्ञानी जीव तटस्थभावाने निरोप घेतो. कारण त्याला माहीत आहे की या पुण्यफळाशी मी स्वत:ला जोडले तर हे मला निवान्त राहू देणार नाही. सदैव याचीच सेवा चाकरी करीत बसावे लागणार. मी माझ्या चैतन्यघरात स्वतंत्रपणे राहू शकणार नाही म्हणून पुण्यकर्मालाही हसतमुखाने बाय बाय करतो. उलट अज्ञानी जीव या पुण्याच्या उदयात आसक्त होतो. त्याच्याशी आपला घनिष्ट संबंध वाढवतो व सदैव त्याचीच चाकरी करतो. स्त्री, पुत्र, मित्र, धन, दौलत, हे सर्व पुण्यकर्माने दिलेले पुरस्कार आहेत. यांचीच सदैव वांछा करून मोह व राग भावाला प्राप्त होतो व पुण्याच्या अधीन होऊन स्वतन्त्रता गमावून बसतो. म्हणून जाणाऱ्याचा तटस्थभावाने निरोप घेऊन स्वत:च्या घरामध्ये सुखाने निवान्त रहाणे शहाणपणाचे लक्षण आहे.

५) राग, द्वेष, मोहासंबंधी हेयबुद्धी –

मिथ्यात्वाला मोह म्हणतात. मिथ्यादृष्टी अज्ञानी बहिरात्मा कर्माच्या उदयानुसार राग व द्वेष करतो, रागद्वेषसहितच पदार्थांना जाणतो व जाणूनही राग-द्वेष करतो. मोह-राग-द्वेष भावाला आपला स्वभाव समजून त्यांना करण्यायोग्य मानतो. त्यामुळे मिथ्यादृष्टी अनंत संसाराला कारणभूत कर्मांचा बंध करतो. ज्याचा मिथ्याभाव व अनंतानुबंधी कषाय भाव निघून गेला तो सम्यग्दृष्टी व सम्यग्ज्ञानी होतो. त्यालाही अन्य अप्रत्याख्यानादी बारा कषायांचा उदय असतो. त्या कषायाच्या उदयात त्यालाही राग-द्वेष भाव होतात; परंतु त्या राग द्वेष भावांना तो सोडण्यायोग्य मानतो. त्याच्या अंतरंगामध्ये परम वैराग्य भाव असतो. तो अतीन्द्रिय आनन्दालाच उपादेय मानतो. आत्मस्वरूपामध्येच राहण्याची रूची करतो. तरीसुद्धा जसा कषायाचा उदय असतो त्यानुसार कमी-अधिक रागद्वेष होतात; परंतु या कषाय परिणतीला तो दूर करू इच्छितो; आत्मशक्तीच्या कमजोरीमुळे दूर करू शकत नाही. म्हणून जेवढ्या अंशाने रागद्वेष होतात तेवढ्या अंशाने कर्मांचा बंधसुद्धा होतो. अनंत संसाराला कारणभूत कर्मांचा बंध होत नाही. प्रमत्तसंयत नावाच्या सहाव्या गुणस्थानापर्यंत बुद्धिपूर्वक रागद्वेष होतात. त्यानंतर स्वत:ला व दुसऱ्याला लक्षात न येण्यायोग्य रागद्वेष दहाव्या गुणस्थानापर्यंत होतात. म्हणून

तेथपर्यंत कमी-अधिक स्थिती घेऊन बंध होतो. त्यापुढे बंध होत नाही. तेराव्या गुणस्थानापर्यंत केवळ कर्म येतात व लगेच निघून जातात. म्हणून रागद्वेष मोहाच्या अभावाने बंध नाही असे जाणून रागद्वेष मोहाला दूर करण्याचा पुरुषार्थ करावा.

रागद्वेष मोह भाव कर्माच्या उदयाला निमित्त करून उत्पन्न होतात म्हणून नैमित्तिक आहेत. तो जीवाचा स्थायी भाव नाही. अध्रुव आहेत. विकाररूप मलिन आहेत. स्वभावाला बिघडवणारे आहेत. आकुलतामय आहेत. राग, द्वेष मोहभावामुळे आकुलताच वाढते. त्यामुळे परमशान्ती प्राप्त होत नाही म्हणून हेय आहेत.

बंधाचे कारण ज्ञान नाही, कर्मोदय नाही, कर्मजनित संयोग नाही; परंतु मोह राग द्वेषभावच बंधाचे कारण आहे असे जाणून नैमित्तिक विकार भावांपासून उपयोग हटवून अविकारस्वभावी स्वकीय अंतस्तत्त्वामध्ये उपयोग लावावा.

छद्मस्थ जीव चालणे, बोलणे, उभे राहणे इत्यादी क्रिया इच्छापूर्वक करतो. म्हणून त्या क्रिया त्याच्या बंधाला कारण होतात. त्याचप्रमाणे केवली सुद्धा विहार करतात, धर्मोपदेश देतात त्यांना सुद्धा बंध संभवेल अशी शंका करू नये. कारण केवली भगवंतांना तेराव्या गुणस्थानात विहार व उपदेशादी क्रिया दिसून येतात; परंतु केवलींना मोह, राग द्वेषाचा अभाव असल्यामुळे त्या क्रिया कर्मबंधाला कारण नाहीत. केवली बुद्धिपूर्वक (इच्छापूर्वक) क्रिया करीत नसून त्या क्रिया कर्माच्या उदयात स्वाभाविकपणे होतात. अशाप्रकारे मागच्या गाथेला दृष्टान्तरूपाने पुढील गाथा सांगतात.-

ठाणणिसेज्जविहारा धम्मुवदेसो य णियदयो तेसिं।
अरहंताणं काले मायाचारोव्व इत्थीणं ।।४४।।

अन्वयार्थ- (तेसिं अरहंताणं) त्या अरिहंतांना **(काले)** त्या अरिहंत अवस्थेमध्ये **(ठाणणिसेज्जविहारा)** उभे राहणे, बसणे, विहार करणे **(य धम्मुवदेसो)** आणि धर्मोपदेश इ. क्रिया **(इत्थीणं मायाचारोव्व)** स्त्रियांच्या मायाचाराप्रमाणे **(णियदयो)** स्वाभाविक आहेत.

अरिहंत प्रभूंच्या विहार, उपदेशादी क्रिया रागपूर्वक नाहीत, नैसर्गिक आहेत. हे या गाथेचे तात्पर्य आहे.

सकल परमात्म्याची योगक्रिया कषायरहित–

केवली भगवान पूर्ण ज्ञानी व राग द्वेष मोहाने सर्वथा शून्य वीतरागी आहेत. त्यांनी चार घातिकर्मांचा नाश केला आहे; परंतु अद्यापि त्यांच्या ठिकाणी चार अघाति कर्मांच्या ८५ प्रकृतींचा सद्भाव आहे. त्यातील काही कर्मांच्या उदयाने केवली भगवंतांच्या ठिकाणी वचन व काययोगासंबंधी क्रिया होतात. तरीसुद्धा केवली भगवंतांना कर्माचा बंध होत नाही. कारण त्यांच्या क्रिया इच्छापूर्वक होत नाहीत. चारित्रमोहाशिवाय इच्छा होत नाही. केवली भगवंतांच्या ठिकाणी चारित्रमोह नाही म्हणून इच्छा नाही. अंतरंग परिणतीने ते सिद्धसमान निर्विकार आहेत. भगवंतांची क्रिया योगनिमित्ताने होते. योगाला विचाराची आवश्यकता नाही. विचार न करतासुद्धा शारीरिक क्रिया होताना दिसून येतात. येथे गाथेमध्ये इच्छेशिवाय व प्रयत्नाशिवाय कर्मापासून उत्पन्न झालेल्या क्रियेकरिता स्त्रीच्या मायाचार स्वभावाचा दृष्टान्त दिला आहे. ज्याप्रमाणे स्त्रीवेदाच्या उदयामध्ये स्त्रियांमध्ये बुद्धिपूर्वक विचार न करतासुद्धा सहजपणे मायाचाररूप भाव व वर्तन घडते त्याप्रमाणे केवलींमध्ये कर्माच्या उदयाने स्वभावताच विहारादिक क्रिया होतात.

टीकेमध्ये दुसरा दृष्टांत ढगांचा दिला आहे. ज्याप्रमाणे ढग गर्जना करतात, परंतु विचार करून गर्जत नाहीत, ढग चालतात परंतु विचार करून चालत नाहीत, त्याप्रमाणे भगवंतांचे वचन व विहार विचार न करता होतात. अरहंतामध्ये विचार नाही. त्यांना द्रव्यमन आहे, भावमन नाही. ज्याप्रमाणे ढगाच्या आकाराने परिणत झालेल्या पुद्गलांचे गमनसुद्धा होते, एका स्थानावर उभे सुद्धा राहतात, ते गरजतातसुद्धा व पाण्याचा वर्षावसुद्धा करतात, त्याप्रमाणे केवली भगवंतांचा विहारसुद्धा होतो, एका स्थानावर उभेसुद्धा राहतात व त्यांची दिव्यध्वनी सुद्धा खिरते. ज्याप्रमाणे पुरुषाच्या प्रयत्नाशिवाय ढगामध्ये ह्या क्रिया दिसतात त्याचप्रमाणे प्रयत्नाशिवाय अबुद्धिपूर्वक केवलींच्या ठिकाणी उपर्युक्त क्रिया दिसून येतात.

केवली महाराज जेव्हा विहार करतात तेव्हा उभे राहून पाऊल न उचलता आकाशामध्ये अधर चालतात. विहार करता करता जीवांच्या पुण्याचा उदय असेल तेथे एके ठिकाणी उभे राहतात तेथेच समवसरणाची रचना स्वर्गातील देव येऊन करतात. त्या समवसरणामध्ये कमलाकार

सिंहासनावर अंतराळी बसतात. चालणे, उभे राहणे व बसणे ह्या शरीराच्या क्रिया आहेत. आपल्या परमशांत अमृतमयी दिव्यध्वनीच्या द्वारे निरक्षरी ध्वनी प्रगट करून धर्माचा उपदेश देतात ही वचनाची क्रिया आहे. अशाप्रकारे काय व वचनयोगाचा प्रगट व्यापार आहे. याशिवाय शरीरामध्ये नोकर्मवर्गणांचे ग्रहण, पूर्वीच्या वर्गणा झडणे, काययोगाचे प्रवर्तन, शरीराचे अवयव पुष्ट होणे इत्यादी शरीरासंबंधी कार्य कर्माच्या उदयाने होते. या कार्यांमध्ये केवली भगवंतांच्या रागयुक्त उपयोगाची प्रेरणा नाही. त्यामुळे केवली भगवंतांची क्रिया बंध करणारी नाही. कधी कधी आपल्यासुद्धा काही क्रिया विचार न करताच होतात. जसे पायी कुठे जात आहे, विचार न करताच १० पाऊले पुढे निघून जातो. रोजची सवय जशी असेल तशी सहजासहजी विचार न करतासुद्धा क्रिया घडते. त्या क्रियेच्या निमित्ताने बंध होत नाही. जिकडे विचार चालू आहेत, कषाय होत आहेत त्यामुळे बंध होतो.

इच्छेशिवाय पुद्गलाच्या प्रेरणेने पुष्कळशा वचन व शरीरासंबधी क्रिया होतात. ज्याप्रमाणे श्वास घेणे, चारी बाजूंनी हवा व परमाणू शरीरामध्ये प्रविष्ट होणे, भोजन पानाचे शरीरामध्ये गलन, पाचन, रक्तमांसादिकांचे निर्मापन, रोगांची उत्पत्ती, डोळ्याच्या पापण्या फडफडणे, शींक येणे, जांभई येणे, शरीर वाढणे, केस येणे, भूख-तहान लागणे, इंद्रिय पुष्ट होणे, स्वप्नामध्ये व झोपेत हडबडून उठणे, बडबडणे, अन्य विचार असताना सुद्धा मुखाने अभ्यस्त पाठ निघणे इत्यादी कित्येक वचन व शरीराचे व्यापार अबुद्धिपूर्वक इच्छेशिवाय होतात. परंतु त्या क्रिया झाल्यावर कित्येक क्रियांमध्ये आम्ही राग करतो व क्रित्येक क्रियांमध्ये द्वेष करतो. जसे निरोगतेमध्ये (राग) प्रेम करतो व रोगांमध्ये द्वेष करतो. इन्द्रियांच्या पुष्टीमध्ये राग करतो व निर्बलतेमध्ये द्वेष करतो. त्यामुळेच कर्मबंधाला प्राप्त होतो. केवली भगवंतांमध्ये मोहनीय कर्माचा सर्वथा अभाव आहे म्हणून त्यांना कोणत्याही क्रियेच्या अगोदर ही इच्छा होत नाही व त्या क्रिया झाल्यावर सुद्धा रागद्वेष मोह होत नाही म्हणून अरिहंत भगवंतांना कर्मबंध होत नाही.

सर्व बंधनाचे मूळ कारण इच्छा आहे असे जाणून इच्छारहित ज्ञानमात्र अन्तस्तत्त्वामध्ये उपयुक्त व्हावे.

मागील गाथेत हे स्पष्ट केले आहे की उभे राहणे, बसणे, विहार करणे व

धर्मोपदेश करणे इत्यादी अरिहंतांच्या क्रिया होतात. परंतु त्या क्रियांचे फळमात्र त्यांना प्राप्त होत नाही अर्थात त्यांना कर्मबंध होत नाही. कारण त्यांच्या क्रिया इच्छापूर्वक होत नाहीत. छद्मस्थ जीवाच्या मन वचन कायेची प्रत्येक क्रिया इच्छापूर्वक होताना दिसते. केवली भगवंतांची इच्छा नसतानाही विहारादी क्रिया कशा काय होतात असा प्रश्न उपस्थित झाला असता समाधान करतात की अरिहंत भगवंतांना सातिशय पुण्याचा उदय असतो. त्या पुण्याच्या उदयाने समवसरणाची रचना, अष्ट प्रातिहार्ये, भगवंतांचा श्री विहारादी क्रिया होतात; परंतु त्यांचा तो पुण्योदय स्वभावाचा घात करू शकत नाही. तो त्यांच्या आत्मसुखामध्ये थोडा ही बाधक नाही व बंधकही नाही. भगवान विहार करीत असताना, उठताना, बसताना, उपदेश देताना आत्मस्वरूपामध्ये लीन असून निरंतर अनंत सुखाचे वेदन करतात म्हणून त्यांच्या पुण्याचा उदय अकिंचित्कर आहे. किंचितही बंध करीत नाही हे या गाथेत स्पष्ट करतात. –

पुण्णफला अरहंता तेसिं किरिया पुणो ही ओदइया।
मोहादीहिं विरहिया तम्हा सा खाइग त्ति मदा ।।४५।।

अन्वयार्थ –(अरहंता) अरिहंत भगवान **(पुण्णफला)** पुण्य फलवाले आहेत. **(पुणो हि)** पुन्हा खरोखर **(तेसिं किरिया)** त्यांची क्रिया **(ओदइया)** औदयिकी असूनसुद्धा **(मोहादीहिं विरहिया)** मोहादिकाने रहित आहे. **(तम्हा)** म्हणून **(सा)** ती क्रिया **(खाइग त्ति)** क्षायिकी **(मदा)** मानलेली आहे.

पुण्यफलवान अरिहंत प्रभू –

अरिहंत प्रभूंना पुण्यरूपी कल्पवृक्षाचे संपूर्ण फळ प्राप्त झाले आहे. तीर्थंकर प्रकृतीचा उदय येण्यापूर्वीच तीर्थंकर प्रकृतिबरोबर बांधल्या जाणाऱ्या पुण्य प्रकृतींच्या उदयाने गर्भकल्याणिक महोत्सव, जन्मकल्याणिक महोत्सव स्वर्गातील देव इन्द्रसहित येऊन अतिशय भव्यरूपाने साजरा करतात. राज्याभिषेक सोहळा मोठ्या आनंदाने देवगण येऊन पार पाडतात. दीक्षाकल्याणिक महोत्सवही करतात. जेव्हा तेराव्या गुणस्थानात केवलज्ञानाची प्राप्ती होते तेव्हा तीर्थंकर प्रकृतीच्या उदयाने केवलज्ञान कल्याणिक संपन्न करतात. स्वर्गातील इन्द्र येऊन समवसरणाची रचना करतो. अष्ट प्रतिहार्ये प्राप्त होतात. काही न करता त्यांना तीन लोकांचे अधिपतित्व

प्राप्त होते. अधोलोकाचे स्वामी भवनेन्द्र व्यन्तरेन्द्र आदी येऊन त्यांना नमस्कार करतात. मनुष्यांचा इंद्र चक्रवर्ती व तिर्यंचांचा इन्द्र सिंहसुद्धा येऊन नतमस्तक होतात. स्वर्गातील देवेन्द्र येऊन त्यांची एका नोकराप्रमाणे सेवा करतात. अरिहंत प्रभूंचा श्री विहार आकाशातून अधांतरी होत असतो. तेव्हा इन्द्र त्यांच्या चरणाखाली मागे पुढे १०८ कमळांची रचना करतात. समस्त चतुर्निकाय देव व विद्याधर राजे त्यांच्याबरोबर विहार करतात. असे हे लोकोत्तर वैभव त्यांच्या चरणाशी लोटांगण घालीत असते.

जसा 'लोकनाथ' या शब्दाचा समास दोन प्रकारे सोडवला जातो – १) लोकांचा नाथ म्हणजे राजा (षष्ठी तत्पुरुष समास) व २) लोक ज्याचे नाथ आहेत म्हणजे भिकारी (बहुव्रीही समास) तसा 'पुण्णफला' या शब्दाचा समाससुद्धा दोन प्रकारे सोडवता येतो. १) पुण्याचे फळ समवसरणादी (षष्ठी तत्पुरुष समास)

२) पुण्याचे फळ ज्यांना प्राप्त आहे ते अरिहंत (बहुव्रीही समास) यापैकी पहिला अर्थ येथे उपयुक्त नाही. कारण अरिहंत अवस्था हे पुण्याचे फळ नाही. अरिहंत अवस्था निर्विकार, वीतराग स्वरूप जीवाची अवस्था आहे. ती शुद्धोपयागाचे फळ आहे. पाप व पुण्यभावाचा नाश करून अरिहंत बनतात. षोडशकारण पूजेच्या जयमालेमध्ये द्यानतरायजींनी म्हटले आहे –

षोडशकारण गुण करै, हरै चतुर्गति वास ।
पापपुण्य सब नाशके, ज्ञानभान परकाश ।।

पुण्याच्या उदयाने ते अरिहंत झाले नाहीत. परंतु अरिहंतांना पुण्याचा उदय आहे. चार घातिकर्मांचा नाश करून ते अरिहंत बनले आहेत; अद्यापि त्यांना चार अघातिकर्मांचा सद्भाव असल्यामुळे त्यातील काही पुण्य प्रकृतींचा उदय आहे. त्यामुळे ते पुण्यफल संपन्न आहेत. तीर्थंकर ही सर्वोत्कृष्ट सातिशय पुण्यप्रकृती म्हटली आहे. ज्याप्रमाणे कल्पवृक्षापासून जे मागू ते सर्व प्राप्त होते त्याप्रमाणे पुण्याच्या उदयाने जे इच्छित असेल ते सर्व प्राप्त होते. म्हणून पुण्याला कल्पवृक्षाची उपमा दिली जाते. अरिहंतांना पुण्यरूपी कल्पवृक्षाची सर्व फळे प्राप्त झाली आहेत म्हणून ते बाह्य लक्ष्मीने संपन्न आहेत.

तीर्थंकर भगवान अतुल बलशाली असतात. तीर्थंकरांचे बाल्य

अवस्थेमध्ये किती बळ असते पहा. २० बकरीचे बळ एका गाढवात असते, २० गाढवाचे बळ एका हत्तीमध्ये, कित्येक हत्तींचे बळ एका सिंहात, कित्येक सिंहाचे बळ एका अष्टापदामध्ये, कित्येक अष्टापदांचे बळ एका नारायणात, कित्येक नारायणांचे बळ एका चक्रवर्तीमध्ये, अनेक चक्रवर्तींचे बळ एका देवामध्ये, अनेक देवांचे बळ एका इंद्रामध्ये, अनेक इंद्रांचे बळ एका तीर्थंकर बालकाच्या अंगठ्यामध्ये असते. एका बालक तीर्थंकरांचे एवढे बळ तर अरिहंत तीर्थंकरांचे किती बल? त्यांचे बल अतुलनीय आहे. त्यांचे सोन्दर्य ही अनुपम असते.

पुण्यफळापासून सहज परम उपेक्षा –

अशाप्रकारे अद्वितीय अलौकिक वैभवाने संपन्न अपूर्व महिमायुक्त असूनही प्रभू अत्यंत विरक्त असतात. स्वरूपामध्ये मग्न असतात.

बाह्यलक्ष्मीची रीत उलटीच आहे. जे या लक्ष्मीची इच्छा करीत नाहीत लक्ष्मी त्यांच्या पाठीमागे लागते व जे तिच्या पाठीमागे लागतात त्यांच्याजवळ ती फिरकत सुद्धा नाही.

भगवान स्फटिकमय सिंहासनावर विराजमान असूनही सिंहासनापासून चार अंगुल वर अधर असतात हे त्यांच्या निरासक्ततेचे द्योतक आहे. अरिहंतांची जी कोणती क्रिया होते ती सर्वच्या सर्व कर्माच्या उदयाच्या प्रभावाने होते म्हणून ती क्रिया औदयिकी म्हटली जाते. पुण्याच्या उदयाने उत्पन्न समवसरणादी जड वैभवाचा व धर्मोपदेशादी क्रियांचा अरिहंतावर काहीच प्रभाव पडत नाही. त्यामुळे ते स्वतःला मोठे समजत नाहीत. त्यांची चेतना निर्विकार निस्तरंग निर्लेपस्वरूपीच असते. परमविशुद्ध ज्ञानचेतनास्वरूपामध्ये ते विराजमान असतात. भगवान आपल्या आत्मस्वरूपामध्ये मग्न होऊन आत्मिक अतीन्द्रिय आनंदामृताचे पान करीत तृप्त आहेत. त्यांच्या ज्ञानामध्ये सर्व क्रिया उदासीनरूपाने झळकत आहेत. त्यांचा त्यामध्ये बिल्कुल रागभाव नाही. कारण रागाचे कारण मोहनीय कर्म आहे. त्या मोहनीय कर्माचा प्रभूंच्या ठिकाणी अभाव आहे. प्रभूंच्या अपेक्षेने समवसरण राहो अथवा न राहो, दिव्यध्वनी खिरो अथवा न खिरो, देवगण चवरी आदींद्वारे भक्ती करोत अथवा न करोत, विहार होओ अथवा न होओ, प्रभूंना सर्व समान आहे. कर्माच्या उदयाने क्रिया होतात तर होऊ देत. त्या

क्रिया आत्म्याच्या परिणामामध्ये विकार उत्पन्न करीत नाहीत. म्हणून त्या कर्मबंधाला कारण नाहीत. कर्म केवळ फळ देऊन अर्थात आपले कार्य करून निघून जाते, झडून जाते अर्थात नष्ट होऊन जाते या अपेक्षेने ही औदयिकी क्रिया सुद्धा क्षायिकी म्हटली आहे.

प्रभूंची क्रिया क्षायिकी –

आठ कर्मांमध्ये मोहनीय कर्मच प्रबल आहे. हेच कर्म आपल्या उदयाने निर्बल आत्म्यामध्ये विकार उत्पन्न करू शकते. जेव्हा याचा उदय नाही तेव्हा अन्य कर्माचा उदय होओ अथवा न होओ, त्यामुळे आत्म्याचा बिघाड-सुधार नाही. अरिहंतांच्या ठिकाणी मोहनीय कर्माचा क्षय झाल्यामुळे उपरंजक भावाचा अभाव आहे. त्यामुळे ती क्रिया चैतन्याच्या विकाराला कारण होऊ शकत नाही. ती क्रिया मोक्षस्वरूप आहे म्हणून केवलींची क्रिया क्षायिकी आहे. ज्याप्रमाणे एखादे फळ देठापासून तुटून पडले की ते फळ पुन्हा देठाला चिकटू शकत नाही. ते फळ सुटण्यासाठीच तुटले आहे, पुन्हा जोडण्यासाठी नाही. त्याचप्रमाणे कर्म उदयाला येऊन तुटले की पुन्हा तेच कर्म त्याचरूपाने आत्म्याला चिकटू शकत नाही. कर्माचा उदय सुटण्यासाठीच होतो म्हणून कर्माचा उदय मोक्षासाठी आहे. म्हणून कर्माचा उदय आला असता शांती व धैर्य ठेवावे. ज्याप्रमाणे कर्जदार येऊन जर आपला हप्ता घेऊन चालला आहे तर तो आपला उपकारीच आहे. तो आपल्याला कर्जमुक्तच करीत आहे त्याप्रमाणे कर्म येऊन आपले कर्ज वसूल करून चालले आहे तर त्यामध्ये हर्ष विषाद करण्याचे कारण नाही. उलट सुटकेचा अनुभव करावा. भगवंतांची औदयिकी क्रिया मोहादिकांने रहित असल्यामुळे कर्म बंधाला कारण नाही. मोक्षाला कारण आहे म्हणून ती क्षायिकी मानली आहे.

मोहभाव बंधाचे मूळ –

यावरून जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये एक शंका उपस्थित केली आहे की जर औदयिक क्रिया बंधाला कारण नाही तर 'ओदयिया बंधयरा' 'औदयिक भाव बंधाला कारण आहेत' हे आगमवचन असत्य निरर्थक होईल. या शंकेचे समाधान आचार्यांनी केले आहे त्याचा भाव असा की औदयिक भाव बंधाला कारण आहेत ही गोष्ट सत्य आहे; परंतु ते बंधाला कारण तेव्हाच होतात जेव्हा ते मोहभावसहित असतात. कदाचित् कोण्या जीवाला द्रव्यमोह

कर्माचा उदय असेल आणि तो जर शुद्ध आत्म्याच्या भावनेच्या बलाने भावमोहरूप परिणमत नाही तर बंध होत नाही. येथे तर अरिहंतांना द्रव्यमोहाचा सुद्धा सर्वथा अभावच आहे तर भावमोहाचा नियमाने अभाव आहेच. जर कर्माच्या उदयमात्राने बंध झाला तर संसारी जीवांना सदैव कर्मांचा उदय आहे त्यामुळे सदैवच बंध होईल. कधीही मोक्ष होणार नाही. परंतु असे कधीही होऊ शकत नाही म्हणून मोहाच्या उदयरूप भावाशिवाय क्रिया बंध करीत नाही. ज्या कर्माच्या उदयाने क्रिया होते ती क्रिया संपन्न झाल्यावर ते कर्म झडून जाते. म्हणून त्या क्रियेला क्षायिकी म्हटले आहे.

आत्मपौरुष कार्यकारी –

कर्माच्या उदयाच्या अधीन न होता आपली दृष्टी स्वभावसन्मुख करावी. कर्माच्या उदयानुसार जीवाला भाव करायलाच पाहिजे असे नाही. कर्माचा डाव चुकविण्यासाठी एकच पुरुषार्थ करावा तो म्हणजे आत्मस्पर्श, आत्मानुभव. ज्यावेळी जीव आपला उपयोग शुद्ध आत्म्याकडे लावतो तेव्हा कर्माचा उदय येतो व निघून जातो. तो जीवाच्या स्वभावाचा घात करू शकत नाही व नवीन कर्मबंधाला ही कारण होत नाही म्हणून निरन्तर शुद्ध आत्म्याची भावना करावी. जेव्हा जेव्हा पुण्य किंवा पापकर्म आपापली करामत दाखवेल तेव्हा तेव्हा त्यामध्ये भुलून न जाता अर्थात रागद्वेष न करता समता भावाने ज्ञाता द्रष्टा बनून भोगावे. त्यामुळे नवीन कर्मबंध होणार नाही व जुन्या कर्माची निर्जरा होईल. आपले आत्मपौरुष जागृत करावे. कर्मापेक्षा सुद्धा माझ्यामध्ये अनंतपटशक्ती आहे. ज्याप्रमाणे एखादा शक्तिशाली पैलवान आपल्यापेक्षा हीन शक्तिवाल्या पैलवानाबरोबर कुस्ती खेळायला घाबरत नाही तो म्हणतो 'असले शेकडो काडी पैलवान आले तरी मी डगमगणार नाही व आपले पौरुष जागृत करून यश मिळवतो. त्याप्रमाणे ज्ञानी कर्माच्या उदयाला भीत नाही. 'असले कितीही व बलवान कर्म उदयाला आले तरी माझ्यापुढे त्याची काहीच धडगत नाही' असे मानून कर्माशी समर्थपणे लढून यशस्वी होतो.

आम्ही आपल्या आत्मपुरुषार्थानेच संसार सागरातून तरून जाऊ शकतो. दुसऱ्याच्या जीवावर तरून जाऊ शकत नाही अथवा दुसरा कोणी आपल्याला तारणार नाही म्हणून दुसऱ्यांवर विसंबून राहू नये. 'जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला.' मोह, राग, द्वेषाच्या अधीन होऊन

आपल्या आत्म्याचे नुकसान करू नये. जर स्वभावदृष्टी ठेवली तर पापाच्या उदयात आकुलता व पुण्याच्या उदयात उद्धतता होणार नाही. जो पापाच्या उदयात मी दु:खी व पुण्याच्या उदयात मी सुखी असा अहंकारयुक्त भाव करतो तो विकारी होतो आणि तीव्रबन्ध करतो म्हणून सतत आत्मसन्मुख दृष्टी ठेऊन साम्यभावाचा अभ्यास करावा. आत्म्याच्या स्वरूपाला पहा ज्या प्रकारे केवली भगवान कर्माचा उदय असताना सुद्धा विकाररूप परिणमत नाहीत. यद्यपि कर्माच्या व मन-वचन-कायेच्या उदयाने त्यांना समवसरणादी विभूती प्राप्त होते, धर्मोपदेश, विहारादी क्रिया होतात. कारण त्यांच्या क्रिया मोहरागद्वेषपूर्वक होत नाहीत. तरी सुद्धा ते वैभव व त्या क्रिया त्यांच्या स्वभावाच्या घाताला कारण होत नाहीत. त्याच प्रमाणे संसारी जीवांच्या सुद्धा मन-वचन-कायेच्या क्रिया स्वभावघाताला कारण होत नाहीत व संसारी जीव सुद्धा विकाररूप परिणमत नाही असे कोणी मानेल तर त्यास या गाथेमध्ये उत्तर देतात अथवा सांख्यमतवादी असे मानतो की जीव सर्वथा शुद्ध आहे तो कधीही शुभ-अशुभरूप विकारभावाने परिणमत नाही. त्याच्या स्वभावाचा कधीही घात होत नाही त्याचे या गाथेत निराकरण करतात.-

जदि सो सुहो व असुहो ण हवदि आदा सयं सहावेण ।
संसारो वि ण विज्जदि सव्वेसिं जीवकायाणं ।।४६।।

अन्वयार्थ -(जदि) जर **(सो आदा)** तो आत्मा **(सयं सहावेण)** स्वयं स्वभावाने **(सुहो व असुहो)** शुभ अथवा अशुभरूप**(ण हवदि)** होत नाही तर **(सव्वेसिं जीवकायाणं)** सर्व जीवांचा **(संसारो वि)** संसार सुद्धा **(ण विज्जदि)** राहणार नाही.

केवली भगवंतांप्रमाणे सर्वच जीव शुभ-अशुभ भावरूपाने परिणमत नाहीत असे मानले तर सर्व जीवांच्या ठिकाणी संसाराचा अभाव होण्याचा प्रसंग येईल.

विकाररूप परिणमने आत्म्याचा स्वभाव नाही. परम शुद्ध निश्चयनयाने जीव कधीही शुभ-अशुभ भावरूपाने होत नाही. तो सदा शुद्ध आहे, व्यवहारनयाने पाहिले तर पर्यायामध्ये मोह कर्माने बद्ध जीवामध्ये विकाररूप परिणाम आहे. मोहकर्माने संयुक्त जीव कर्माच्या उदयामध्ये शुभ-अशुभ भावरूपाने स्वयं परिणमतो. ज्याप्रमाणे स्फटिकमणी स्वभावाने शुद्ध आहे,

परंतु लाल, निळ्या, पिवळ्या उपाधीच्या सान्निध्यामध्ये लाल, निळा, पिवळारूपाने परिणमतो. त्यामध्ये जी योग्यता आहे, तसा तो परिणमतो देखील. त्याचप्रमाणे जीव स्वभावाने विकाररहित शुद्ध आहे, परंतु कर्मोदयाच्या सान्निध्यात मोह, राग द्वेषरूपाने परिणमतो. ज्याप्रमाणे जीव स्वभावाने शुद्ध आहे, त्याप्रमाणे संसारावस्थेमध्ये पर्यायरूपाने ही शुद्ध मानले तर सर्व जीव मुक्त होतील, ते तर प्रत्यक्ष विरूद्ध आहे. प्रत्यक्ष प्रमाणाने संसारी जीव बद्ध आहे, ही गोष्ट सिद्ध आहे. निश्चयनयाचा एकान्त करून जे पर्यायामधील अशुद्ध भावाचा निषेध करतात ते मोक्षमार्गापासून भ्रष्ट होतात, व दुर्गतीला प्राप्त होतात.

एक पंडित होते व त्यांचा एक शिष्य होता. पंडित शिष्याला दररोज हेच शिकवत होते की कर्म आत्म्यामध्ये विकारादी उत्पन्न करू शकत नाही. जीव सदैव ज्ञाता-द्रष्टा आहे. जीव सदैव शुद्ध आहे, तो अशुद्ध होत नाही. जीव परद्रव्याचा कर्ता-भोक्ता नाही. एके दिवशी पंडितजी एका गलिच्छ दुकानावर रसगुल्ला खात होते. त्यावेळी शिष्य तेथून जात होता त्याने ते पाहिले व त्याला आश्चर्य वाटले. तो पंडितजींच्या जवळ गेला व म्हणाला, 'पंडितजी, आपण पंडित असून एका मांसाहारीच्या दुकानावर रसगुल्ले कसे खात आहात ? ही गोष्ट आपल्याला शोभास्पद नाही.' पंडितजींनी उत्तर दिले 'कोण खात आहे ? आत्मा काही खात, पित नाही. तो परद्रव्याला स्पर्शसुद्धा करीत नाही. जो खाऊ लागला आहे तो खात आहे. आत्मा खात नाही.' शिष्याला हे ऐकून राग आला, त्यांनी गुरूजींच्या गालावर एक तडाखा मारला. पंडितजी म्हणाले, 'अरे हे काय करतो आहेस ? तू शिष्य होऊन गुरुलाच मारतोस, हे तुला शोभा देत नाही' शिष्याने प्रत्युत्तर दिले, गुरुजी, 'मार तर आपल्याला लागतच नाही. मार ज्याला दिला जात आहे त्याला लागत आहे. आत्मा तर ज्ञाता-द्रष्टा आहे. आत्मा दुःखी होत नाही. आत्मा परद्रव्याला स्पर्श करूच शकत नाही.' पंडितजींनी मान लाजेने खाली घातली व 'मार आत्म्याला कसा लागणार?' हे ऐकून पंडितजींना आपली चूक कळाली. सत्य वस्तुस्वरूप लक्षात आले. ते शिष्याला म्हणाले, 'तू आज माझे डोळे उघडलेस.'

निश्चयनय न समजता जे त्याचा अर्थ चुकीचा लावून गैरवापर करतात त्यांची दुर्दशा होते. नयाचे स्वरूप, त्याचा विषय, द्रव्याचे प्रयोग यथार्थ

जाणणे आवश्यक आहे. म्हणून पुरुषार्थ-सिद्ध्युपाय या ग्रंथामध्ये अमृतचन्द्र आचार्य म्हणतात.

अत्यन्तनिशितधारं दुरासदं जिनवरस्य नयचक्रम् ।
खण्डयति धार्यमाणं मूर्धानं झटिति दुर्विदग्धानाम् ।।

जिनेंद्र भगवतांचे अत्यन्त तीक्ष्ण धारदार दुःसाध्य असे नयचक्र धारण केल्यावर मिथ्याज्ञानी पुरुषांच्या मस्तकाला खण्ड खण्ड करून टाकते. जैन मतामध्ये सांगितलेले नयभेद समजणे अत्यन्त कठीण कार्य आहे. त्याला समजण्यासाठी प्रखर ज्ञान व विवेकाची आवश्यकता आहे. जर कोणी मूर्ख पुरुष न समजता चक्राचा प्रयोग करेल तर तो त्या चक्राच्या द्वारे शत्रूचा घात करायचे सोडून स्वतःच्या अंगांचाच छेद करून टाकेल. ठीक त्याचप्रमाणे नयचक्राची गोष्ट आहे.

कित्येक वेळा जीव आपले कल्याण करण्यासाठी धर्ममार्गाचा आश्रय घेतो, पण तेथे जर त्याला अज्ञानी गुरूंचा संयोग झाला तर कल्याणाच्या ऐवजी अकल्याणच होते. तो मिथ्या उपदेशाने पूर्व मिथ्यात्वच पुष्ट करतो. त्यामुळे मोक्षमार्ग अजून लांब होतो. शास्त्रामध्येच सांगितलेल्या नयांचे स्वरूप व प्रयोजन न जाणल्यामुळे एका नयाचा एकान्त करून आपले नवीन मत स्थापित करतो. जी विश्वामध्ये ३६३ मिथ्यामते तयार झाली ती दुसऱ्या नयाची अपेक्षा न घेता एका नयाचा पक्ष सर्वथा ग्रहण केल्यामुळेच झाली आहेत. त्यातीलच एक सांख्यमत. त्याचे प्रणेता कपिलमुनी आहेत. त्यांनी २५ तत्त्वे मानली आहेत. त्यामध्ये प्रमुख दोन तत्त्वे आहेत १) प्रकृती व २) पुरुष. प्रकृती अचेतन आहे, नित्य, व्यापी आहे, त्यापासून सर्व उत्पन्न झाले आहे. पुरुष चेतन आहे, अकर्ता, अभोक्ता आहे, तो नित्य शुद्ध आहे. त्यामध्ये विकार उत्पन्न होत नाही, परम शुद्ध निश्चयनयाने जे आत्म्याचे स्वरूप सांगितले तसे सांख्यमती पुरुषाचे स्वरूप सर्वथा मानतात. बंध व मोक्ष प्रकृतीलाच आहे. पुरुष बंध व मोक्ष याने रहित, निष्क्रिय आहे असे मानतात. त्यांच्या मतानुसार पुरुष परिणमत नाही. या सांख्यमतानुसार ज्याची मान्यता मिथ्या झाली आहे अशा शिष्याला लक्ष्य करून आचार्य सांगतात की जर जीव शुभ-अशुभ विकार भावरूपाने कधीही परिणमला नाही तर त्याला संसार राहणारच नाही, त्याला अनादिसिद्ध मानावे लागेल.

त्यावर सांख्यमतानुयायी म्हणतो, संसाराचा अभाव हे आम्हाला दूषण नाही, हे तर आम्हाला भूषणास्पद आहे. जीवाला संसाराचा अभावच आहे. ते आम्हाला इष्ट आहे. यावर जयसेनाचार्य समाधान करतात की, असे नाही; कारण संसाराचा अभाव म्हणजेच मोक्ष होय. मोक्ष संसारी जीवाला दिसत नाही म्हणून प्रत्यक्षाने विरोध येतो. संसारी जीव कोणी अल्पज्ञानी, कोणी मध्यम ज्ञानी, कोणी अधिक ज्ञानी दिसतो. मुक्त जीवासमान सर्वज्ञ, वीतराग व आनन्दमयी दिसत नाही तर मग सर्वथा व्यवहारामध्ये जीवाला शुद्ध व अपरिणामी कसे मानता येईल. जर सर्व जीव शुद्ध आहेत तर तो अशुद्ध, कर्मबन्ध,अज्ञानी, दुःखी इत्यादी नाना अवस्थारूप दिसतो, त्यालाच जेव्हा स्वभाव अपेक्षेने पाहतो तर तो केवळ शुद्ध दिसतो. जैन सिद्धांतामध्ये शुद्ध निश्चयनय द्रव्याच्या त्रिकाल अबाधित शुद्ध स्वभावाकडे आपली दृष्टी वळवतो. याचा हा अभिप्राय नाही की प्रत्येक संसारपर्यायच शुद्धरूप आहे. जर जीवाची संसार अवस्था पाहिली तर हा जीव आपल्या शुद्ध स्वभावामध्ये नाही. जरी हा जीव स्फटिकमण्याप्रमाणे स्वभावाने शुद्ध आहे तथापि कर्मबंधामुळे याचे परिणमन स्फटिकामध्ये लाल, काळ्या, पिवळ्या डाकाच्या संबंधाप्रमाणे नाना रूप विचित्र झळकते. जेव्हा हा जीव अशुभ अथवा तीव्र कषायरूप परिणमन करतो तेव्हा हा अशुभ परिणामवाला व जेव्हा हा जीव शुभ अथवा मंद कषायरूप परिणमतो तेव्हा शुभ परिणामवाला होतो. स्वयं स्वभावाने आपल्या उपादान शक्तीने असा होतो त्यावेळी ज्याप्रमाणे स्फटिकाचा निर्मल स्वभाव झाकला जातो त्याप्रमाणे आत्म्याचा शुद्ध स्वभाव झाकला जातो. एकावेळी एका द्रव्यामध्ये एकच पर्याय राहू शकते. शुद्ध व अशुद्ध पर्याय एकावेळी राहू शकत नाही. परिणामाच्या निमित्ताने हा जीव कर्मांचा बंध करतो व स्वतःच त्या कर्मांच्या फळाला भोगतो, पुन्हा स्वतःच शुद्ध आत्माच्या ज्ञानाच्या अभ्यासाने शुद्ध होतो. सांख्याप्रमाणे आत्म्याला अपरिणामी मानले तर संसार व मोक्ष कोणतीच अवस्था सिद्ध होत नाही. परिणामी मानले तर जीव संसारी राहतो व संसार अवस्थेचा त्याग करून मुक्त होतो.

जर जीवाला संसार (दुःख) नाहीच तर दुःखाचा नाश करण्यासाठी प्रकृती व पुरुषामध्ये भेदविज्ञान करण्याचा उपदेश का दिला जातो ?

भेदविज्ञानाची आवश्यकता एवढ्यासाठीच आहे की आम्ही दुःखी आहे. आम्हीच संसारामध्ये परिभ्रमण करतो व भ्रमामुळे शुभ व अशुभभावरूपाने स्वत: परिणमतो. भेदविज्ञानाच्या द्वारे शुभ-अशुभ भावांचा अभाव करून मोक्ष प्राप्त करतो, म्हणून मोक्ष प्राप्तीसाठी भेदविज्ञानाचा उपदेश केला जातो. प्रकृती व पुरुषामध्ये भेदविज्ञान करा व ते दृढ झाले तर मोक्ष होतो. याचा अर्थ आता मोक्ष नाही. मोक्ष नसणे याचेच नाव संसार आहे.

संसार पर्यायरूप जीव स्वयं परिणमतो. पर्याय आत्म्याचाच अंश आहे. अंश अंशीपासून भिन्न नाही म्हणून अंशी आत्मा स्वयं क्षणिक विकाररूप परिणमतो. निमित्ताचा आश्रय घेऊन स्वयं विकाररूप परिणमतो व जर स्वभावाचा आश्रय घेतला तर विकाररूप परिणमत नाही. केवली भगवतांप्रमाणे जर संसारी जीवांनासुद्धा कर्मोदयजनित क्रियांच्या काळामध्ये बंधाचा अभाव मानला तर संसारच राहणार नाही कारण बंध अवस्थेचे नावच संसार आहे. केवली भगवंतांना रागद्वेष नाहीत, म्हणून क्रियांच्या सद्भावात सुद्धा बंध होत नाही व संसारी जीवांना मोह-राग-द्वेष असल्यामुळे बंध होतो.

पर्यायामध्ये अशुद्धता आहे; परन्तु स्वभावामध्ये अशुद्धता नाही अशाप्रकारे जाणले असता मिथ्यात्वाची अशुद्धता दूर होते व स्वभावामध्ये स्थिर झाला असता रागद्वेष दूर होऊन पूर्ण वीतरागता प्राप्त होते. मोहकर्माचा उदय झाल्यावर सुद्धा जीव आपल्या पुरुषार्थाने शुद्ध आत्म्याच्या भावनेच्या बलाने रागद्वेषरूप परिणमत नाही. ज्याप्रमाणे ज्याला पोहायला येते तो तरून जातो त्याचप्रमाणे कर्माचा उदय आल्यावर सुद्धा ज्याला संसारातून तरण्याची कला, स्वभावदृष्टी प्राप्त झाली आहे तो संसारातून तरून जातो.

अशाप्रकारे संसारी छद्मस्थ जीवांच्या स्वभावाचा घात शुभाशुभ भावाने होतो म्हणून शुद्धोपयोगरूपाने परिणमने योग्य आहे. शुद्धोपयोगाद्वारे हा जीव केवलज्ञानी प्रमाणे शुद्ध निर्विकार व अबन्धरूप होतो. कर्मफलानुसार परिणमल्यामुळे जीव विकाररूप परिणमतो व बन्धाला प्राप्त होतो. सर्व आपत्तीचे मूळ कर्माच्या उदयामध्ये आपलेपणा करणे व ममत्व करणे हे आहे म्हणून निरपवाद होण्यासाठी कर्मापासून, कर्माच्या उदयापासून व त्याच्या फळापासून स्वतःला भिन्न अनुभवण्याचा प्रयत्न करावा.

अतीन्द्रिय केवलज्ञानाच्या सिद्धीचे प्रकरण चालू असता मध्येच

प्रसंगानुसार ज्ञेयार्थ परिणमनरूप क्रिया ज्ञानामुळे होत नाही. केवलींच्या स्थानगमनादी क्रिया मोहाने रहित असल्यामुळे बंधाला कारण होत नाहीत. कर्माचा उदयसुद्धा बंधाला कारण नाही, इत्यादी विषयांचे वर्णन केले. आता पुन्हा प्रकृत केवलज्ञानाचे निरूपण करतात. ज्याप्रमाणे आपण मुख्यमार्गाने इच्छित स्थानाकडे जात असता मार्ग दुरुह असेल तर गाडी मार्गावरून बाजूला घेऊन, थोडी विश्रांती घेऊन तेथे एखादे प्रेक्षणीय स्थळ असेल तर ते पाहून पुन्हा मुख्य रस्त्याने मार्ग चालू लागतो त्याचप्रमाणे आचार्यसुद्धा केवलज्ञानासारख्या कठीण विषयांचे निरूपण करताना मध्ये थोडावेळ वक्त्याला व श्रोत्याला विश्रांती म्हणून अन्य रमणीय विषयांचे वर्णन करून पुन्हा मुख्य विषयाकडे आपली लेखणी वळवून सर्वज्ञत्वसिद्धीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत किंवा ज्याप्रमाणे आपण गरिष्ट भोजन करताना त्या गरिष्ट भोजनाला पचविण्यासाठी ओवा, बडीशोप, ताक इत्यादी हलक्या पाचक पदार्थांचे सेवन करतो त्याचप्रमाणे सर्वज्ञत्वसिद्धिसारख्या गरिष्ट विषयाचे वर्णन करीत असता पाठकाला ते अजीर्ण होऊ नये म्हणून मध्यंतरी साध्या सोप्या उपयोगी पाचक विषयांचे वर्णन करून पुन्हा मूळ प्रकरणाला अनुसरून अतीन्द्रिय ज्ञानाचे सर्वज्ञत्वरूपाने अभिनंदन करतात. अतीन्द्रिय ज्ञानामध्ये सर्वाला जाणण्याचे व्यक्त सामर्थ्य आहे म्हणून त्याचे सर्वज्ञत्व रूपाने अभिनंदन करतात –

जं तक्कालियमिदरं जाणदि जुगवं समंतदो सव्वं ।
अत्थं विचित्तविसमं तं णाणं खाइयं भणियं ।।४७।।

अन्वयार्थ – (जं) जे ज्ञान **(समंतदो)** सर्व आत्मप्रदेशातून **(तक्कालियं इदरं)** तात्कालिक व अतात्कालिक **(विचित्तविसमं)** अनेक प्रकारच्या व असमान जातीय **(सव्वं अत्थं)** सर्व पदार्थांना **(जुगवं)** एकाच वेळेस **(जाणदि)** जाणते. **(तं णाणं)** त्या ज्ञानाला **(खाइयं)** क्षायिक **(भणियं)** म्हटले आहे.

जे ज्ञान वर्तमान, भूत व भविष्यकालीन पर्यायांनी सहित अनेक प्रकारच्या व अनेक जातीच्या सर्व पदार्थांना एका समयात सर्व आत्मप्रदेशातून जाणते ते ज्ञान क्षायिक होय. या गाथेत क्षायिक केवलज्ञानाची महिमा गायिली आहे. जेव्हा सर्व ज्ञानावरण कर्माचा क्षय होतो तेव्हाच केवलज्ञान व्यक्त होते

म्हणून या ज्ञानाला क्षायिक ज्ञान म्हणतात. या ज्ञानाच्या बाहेर कोणताही ज्ञेय पदार्थ नाही. जितके जगात ज्ञेय पदार्थ आहेत ते सर्व या ज्ञानामध्ये समाविष्ट आहेत.

स्वतंत्र ज्ञानामध्ये स्वतंत्र लक्ष्मीची प्रसिद्धी –

सर्व पदार्थांच्या समूहाला अतीन्द्रिय ज्ञान जाणते. तो पदार्थ समूह कसा आहे? याचे सुंदर विशेषण येथे देतात. प्रत्येक पदार्थ आपापल्या भिन्न-भिन्न लक्षण स्वरूप लक्ष्मीने संपन्न आहे. पदार्थाचे जे स्वरूप तीच त्याची लक्ष्मी आहे. चैतन्य लक्षण ही आत्म्याची स्वयंप्राप्त लक्ष्मी आहे. त्यावर दुसऱ्या कोणाचाही अधिकार नाही. आत्माच त्या लक्ष्मीचा एकटा स्वाधीन उपभोक्ता आहे. स्पर्श-रस-गंध-वर्ण लक्षण ही पुद्गलाची स्वयंसिद्ध लक्ष्मी आहे. पुद्गलाला प्राप्त झालेला स्पर्शरसगंधवर्ण ही अन्य कोणाची देन नाही ती त्याची स्वतःची निजी संपत्ती आहे. त्यावर जीवाचा अधिकार नाही. गतिहेतुत्व ही धर्मद्रव्याची लक्ष्मी आहे. स्थितिहेतुत्व ही अधर्मद्रव्याची लक्ष्मी आहे. अवगाहनहेतुत्व ही आकाशद्रव्याची व परिणमनहेतुत्व ही कालद्रव्याची लक्ष्मी आहे. अशाप्रकारे भिन्न लक्षणाने संपन्न पदार्थ ६ प्रकारचे आहेत. पुन्हा त्या सहाचे अनेक भेद-प्रभेद आहेत. त्या सर्व प्रकारच्या पदार्थांना क्षायिक ज्ञान जाणते. कारण सर्व प्रकारच्या ज्ञानावरणाचा अभाव झाला आहे.

अतीन्द्रिय ज्ञानाची विषमज्ञता –

अतीन्द्रिय ज्ञान केवळ अनेक प्रकारच्या पदार्थानाच जाणते असे नाही तर असमानजातीय पदार्थांना सुद्धा एकाच वेळेस जाणते विश्वामध्ये पदार्थ केवळ चेतनस्वरूपच नाहीत किंवा केवळ अचेतनस्वरूपच नाहीत; परंतु चेतन व अचेतन स्वरूप विजातीय आहेत. जीव चेतनस्वरूप आहे. पुद्गलादी पाच द्रव्ये अचेतन स्वरूप आहेत. त्याचप्रमाणे न केवळ मूर्तिक आहेत व न केवळ अमूर्तिकच आहेत. सर्व पुद्गल मूर्तिक आहेत व शेष पाच द्रव्ये अमूर्तिक आहेत. सर्व जीवसुद्धा एकरूप नाहीत. काही मुक्त व काही संसारी आहेत. संसारीमध्ये सुद्धा चार गतीच्या अपेक्षेने विलक्षण आहेत. सर्व सजातीय व विजातीय द्रव्यांना त्यांच्या भेदासहित जाणण्याचे सामर्थ्य केवलज्ञानामध्ये आहे. त्या ज्ञानामध्ये निगोदापासून ते सिद्धापर्यंत सर्व जीवांचे स्वरूप वेगवेगळे, त्यांचे आकारादी भिन्न दिसतात. त्याचप्रमाणे पुद्गुल

द्रव्याची विचित्रता सुद्धा झळकत आहे. स्निग्धरूक्ष गुणांच्या अंशांच्या भिन्नतेमुळे परमाणू अनंत प्रकारचे आहेत. द्वयणुक, त्र्यणुक, संख्याताणुक, असंख्याताणुक, अनंताणुक स्कंध अनेक प्रकारचे आहेत. त्यामध्ये विचित्र काम करण्याची शक्ती आहे. त्या सर्व स्कंधांना व परमाणूंना केवलज्ञान भिन्न भिन्न जाणते. त्याचप्रमाणे असंख्यात कालाणू, एक अखंड धर्मास्तिकाय, एक अखंड अधर्मास्तिकाय, एक अखंड आकाशास्तिकाय त्या निर्मल ज्ञानामध्ये पृथक् पृथक् प्रतिभासित होतात. पदार्थ भले परस्पर विरोधी आहेत; परंतु ते एका ज्ञानात झळकतात. ज्याप्रमाणे चतुर राजा व्यवहारामध्ये विषमता असताना सुद्धा सर्व प्रान्तीय व सर्वजातीय नागरिकांना एका शासनसूत्रामध्ये बांधून ठेवतो. त्याप्रमाणे पदार्थांमध्ये विषमता असताना सुद्धा चतुर केवलज्ञान सर्व जातीच्या व सर्व प्रकारच्या पदार्थांना एका पर्यायामध्ये सूत्रित करते अर्थात जाणते. हा केवलज्ञानाचा स्वभाव आहे. स्वभावविशेष तर्काचा विषय नाही. कोणी विचारले साखर गोड का? कारले कडू का? उत्तर मिळते त्याचा तो स्वभाव आहे. स्वभावामध्ये तर्क लागू होत नाही. ज्ञानाचा स्वभाव जाणणे आहे. जर स्वभावावर आवरण नसेल तर तो स्वभाव व्यक्त होण्यामध्ये कोणतीही बाधा नाही. असमान जातीय पदार्थांच्या ज्ञानावरणाचा पूर्ण क्षय झाल्यामुळे अतीन्द्रिय ज्ञान विषम अर्थात भिन्न भिन्न जातीय पदार्थांना जाणते.

अतीन्द्रिय ज्ञानाची त्रिकालज्ञता –

केवलज्ञान केवळ वर्तमान पर्यायालाच जाणते असे नाही तर नष्ट झालेल्या भूतकालीन अनंत पर्यायांना व अनुत्पन्न भविष्यकालीन अनन्त पर्यायांना जाणते. वास्तविक केवलज्ञानामध्ये भूत, वर्तमान, भविष्य असा विकल्प नाही. अनादी-अनंत पर्यायमालिका स्वरूप एक अखंड द्रव्याला केवलज्ञान ग्रहण करते. ज्या विवक्षित समयात जाणते त्या समयात असणाऱ्या पर्यायाला वर्तमान, त्यापूर्वीच्या पर्यायांना भूतपर्याय व त्यानंतरच्या होणाऱ्या पर्यायांना भविष्यकालीन पर्याय असा व्यवहार होतो. जो पर्याय विवक्षित समयात वर्तमान आहे तोच पुढील समयात भूत होतो व जो वर्तमान समयात भविष्यरूप आहे तोच पुढील समयात वर्तमान होतो. हे सर्व भूत, वर्तमान, भविष्यकालीन पर्याय केवलज्ञानरूपी पडद्यावर सत्‌रूपाने प्रतिभासित होतात. जे पर्याय नष्टच झाले व जे पर्याय उत्पन्नच झाले नाहीत अशा असद्‌भूत

पर्यायांना ज्ञान कसे काय जाणू शकते अशी शंका करू नये. कारण नष्ट झालेल्या पर्यायाला छद्मस्थ सुद्धा जाणतो ही गोष्ट प्रत्यक्ष आहे. १०-२० वर्षापूर्वी घडलेली घटना आठवली तर ती घटना जशीच्या तशी आपल्या ज्ञानात उपस्थित होते. भलेही ती घटना वर्तमानात नाही. नष्ट झाली आहे; परंतु आमच्या ज्ञानात ती वर्तमान आहे. त्याचप्रमाणे भविष्यकालीन पर्यायाचा विचार करीत असताना तो भविष्यकालीन पर्यायसुद्धा आमच्या ज्ञानात वर्तमानात येतो. ज्या मुलीचे लग्न ठरले व लग्नाची तारीख निश्चित झाली ती मुलगी भविष्यकालाचा विचार करते तेव्हा तिला आपले लग्न होत असलेले दृश्य दिसते. आपण एखादे कार्य पुढे करायचे ठरवतो ते कार्य एका वर्षानंतर पूर्ण होईल; परंतु ते आमच्या ज्ञानात आजच पूर्ण झालेले दिसते. ज्याप्रमाणे जेव्हा इमारत बांधण्याचा निर्णय करतो तेव्हा इंजिनिअर त्या इमारतीची रूपरेषा आखून इमारत पूर्ण झाल्यावर कशी असेल त्याचे चित्र आताच काढतो. ज्योतिषज्ञ भविष्यकाळात घडणाऱ्या घटनांना ग्रह नक्षत्राच्या गतीवरून वर्तमानात जाणतो. ज्ञान भविष्यकाळाला जाणत नाही असे मानले तर ज्योतिषज्ञान खोटे मानावे लागेल. भूत व भविष्यकालीन घटना वर्तमानात नसल्या तरी त्यांचे ज्ञेयाकार ज्ञानामध्ये वर्तमानात आहेत. अतीन्द्रिय केवलज्ञान निरावरण आहे त्यामुळे त्यामध्ये सर्व काही व्यक्त आहे.

केवलज्ञानाची अक्रमप्रवृत्ती-

या ज्ञानामध्ये इतकी प्रचंड शक्ती आहे की हे ज्ञान आमच्यासारखे क्रमाक्रमाने जाणत नाही; परन्तु एकावेळी एका समयात सर्व पदार्थांच्या सर्व पर्यायांना पृथक् पृथक् रूपाने प्रतिभासित करते. ज्ञानावरण कर्माचा क्षय झाल्यामुळे व क्रमप्रवृत्तीला कारणभूत ज्ञानावरणाच्या क्षयोपशमाचा अभाव झाल्यामुळे सर्व पदार्थांना व त्यांच्या सर्व पर्यायांना एकाच समयात जाणते. केवलींनी एका समयात सर्वांना जाणले तरी ते सर्वांना मिश्ररूपाने जाणत नाहीत. सर्वांना आपापल्या स्वरूपाने स्वतन्त्र जाणतात. ज्याप्रमाणे आमच्या ज्ञानामध्ये एकावेळी २५ पदार्थ आले तरी ते सर्व पदार्थ आपापल्या ठिकाणी भिन्न भिन्नच आहेत. त्याचप्रमाणे केवलींच्या ज्ञानामध्ये तीन लोकातील सर्व पदार्थ व तीन काळातील सर्व पर्याय एका वेळेस ज्ञात झाले तरी प्रत्येक पदार्थ आपापल्या ठिकाणी व प्रत्येक पर्याय आपापल्या काळातच पृथक-पृथक

रूपाने प्रतिभासित होते. ते पदार्थ भिन्न-भिन्न सत्तारूपाने जसे आहेत तसेच जाणले जातात व जो पर्याय ज्या समयात ज्या रूपाने ज्या क्रमांकावर, ज्या स्थितीत आहे तो पर्याय त्या समयात त्यारूपाने त्या क्रमांकावर त्या स्थितीतच जाणला जातो. कशाचेही कशामध्ये मिश्रण करून जाणत नाहीत.

सर्व पर्याय एका समयात कसे काय जाणले जातात हा प्रश्न करण्यापेक्षा आम्हाला हा प्रश्न उत्पन्न झाला पाहिजे की जर ज्ञानाचा स्वभाव जाणणे आहे तर तेथे क्रम का? क्रमाने जाणण्याचे कारण काय आहे? आम्हाला जाणण्यामध्ये जो क्रम पडला त्याचे कारण ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम आहे. क्षायोशमिक ज्ञानाचा क्रमशः उघाड होत असल्यामुळे तिन्ही काळातील पदार्थांना एकावेळी जाणण्याचे सामर्थ्य त्यामध्ये नाही. एकावेळी कसे जाणतो याचे कारण शोधण्याची गरज नाही. कारण स्वभावामध्ये कारण असत नाही. विभावामध्ये कारण असते. क्रमाने जाणण्यामध्ये कारण आहे, अक्रमाने जाणण्यामध्ये काही कारण नाही, क्रमाने जाणण्यामध्ये आश्चर्य आहे, खेद आहे; परंतु अक्रमाने जाणण्यामध्ये आश्चर्य व खेद नाही.

सर्व आत्मप्रदेशामध्ये केवलज्ञानाची समृद्धता –

सर्व विशुद्ध क्षायिक ज्ञान सर्व आत्मप्रदेशांमध्ये प्रगट होते. कारण छद्मस्थ अवस्थेतील आंशिक विशुद्धी सर्वविशुद्धीमध्ये अंतर्भूत झाली आहे. सर्व आत्मपद्रेशावरील आवरण हटल्यामुळे सर्व प्रदेशातून जाणण्याचे सामर्थ्य प्रगट झाले आहे. पूर्वी अल्पज्ञ अवस्थेमध्ये ज्ञानावरण कर्माच्या कैदेमध्ये बद्ध असल्यामुळे सर्व बाजूनी पाहता येत नव्हते. केवळ इन्द्रियरूपी खिडकीतूनच पाहण्याची पराधीनता होती. आता कर्मरूपी कैदेतून मुक्त झाल्यामुळे खुल्या आकाशात येऊन सर्व बाजूनी पाहण्याचे स्वातन्त्र्य प्राप्त झाले आहे. केवलज्ञानाचा आकार आत्मप्रदेशासमान आहे अर्थात आत्म्याच्या असंख्यात प्रदेशांमध्ये केवलज्ञान व्यापून आहे. प्रत्येक प्रदेशामध्ये केवलज्ञानाची शक्ती समान आहे. ज्याप्रमाणे केवलज्ञानींचा अखंड आत्मा सर्व ज्ञेयांना जाणतो त्याप्रमाणे केवलज्ञानाने संपन्न एकेक आत्मप्रदेश सुद्धा सर्व ज्ञेयांना जाणतो. या केवलज्ञानाचे माहात्म्य आमच्यासारख्या अल्पज्ञानीच्या ध्यानात येऊ शकत नाही. जे स्वयं केवलज्ञानी झाले, त्यांनाच याचे माहात्म्य लक्षात येऊ शकते. आम्ही एवढेच अनुमान करू शकतो की ज्ञानामध्ये हीनता

आवरणामुळे येते. जेव्हा सर्व आवरणाचा नाश होतो तेव्हा ज्ञानाच्या विकासाला कोणताही अडथळा नाही. ज्ञानाची महिमा अगाध आहे.

पूर्ण निरावरण झाल्यामुळे ज्ञानाचा अनिवार्य अमर्यादित विस्तार झाला आहे म्हणून क्षायिक ज्ञान सर्वकाळ, सर्वत्र, सर्वथा, सर्वांना जाणतेच.

केवलींच्या जाणण्यामध्ये व आमच्या जाणण्यामध्ये खूप अंतर आहे. आम्ही वस्तूला पकडतो व केवली वस्तुला पकडत नाहीत. पकडणे म्हणजे हाताने पकडणे नव्हे, विकल्पाने पकडणे, श्रद्धेने पकडणे. केवली एक-एक पदार्थाच्या प्रति पुस्तक आहे, चटई आहे. इ. विकल्प करत नाहीत. म्हणून आमच्या ज्ञानावरून आम्हाला शंका येते की केवली भगवान सर्वांना कसे जाणत असतील? जाणण्याचा अर्थ समजला तर ही शंका राहणार नाही. जाणणे म्हणजे केवळ प्रतिभासमात्र आहे. ज्याप्रमाणे तत्काल जन्मलेल्या बाळाला खोलीतील सर्व वस्तू प्रतिभासित होतात; परन्तु त्यामध्ये अमुक आहे, अमुक आहे असा विकल्प उत्पन्न होत नाही त्याचप्रमाणे केवलज्ञानीला पदार्थांच्या संबंधी विकल्प नसताना सुद्धा जेथे, ज्या काळामध्ये जे अवस्थित आहेत तेथे, त्या काळामध्ये ते सर्व पदार्थ प्रतिभासित होतात.

ज्या ज्ञानामध्ये इच्छा आहे ते ज्ञान अन्याययुक्त आहे. ज्या ज्ञानातून इच्छा निघून गेली ते ज्ञान न्याययुक्त आहे. जाणण्याची इच्छा करतो तोपर्यंत अल्पज्ञ आहे. जेव्हा पदार्थ सहज जाणले जातात तेव्हा तो सर्वज्ञ आहे. क्षायिक ज्ञान त्रिलोक त्रिकालवर्ती सर्व पदार्थांना जाणत राहते हा ज्ञानस्वभावाचा प्रताप आहे. या विश्वाप्रमाणे अजून अनंत विश्व असतील तरी या ज्ञानामध्ये झळकू शकतात असे अद्‌भुत केवलज्ञान जेथे प्रगट आहे तेथेच सर्वज्ञपणा आहे, तेथेच पूर्ण निराकुलता व पूर्ण वीतरागता आहे. घातिकर्मांचा नाश झाल्यामुळे जसा ज्ञानस्वभाव अमर्यादित विकसित होतो, त्याचप्रमाणे आनंद स्वभाव सुद्धा अमर्याद विकसित होतो. केवलज्ञान व अनंतसुखाचा अविनाभाव संबंध आहे. संसारी जीव ज्या सुखाच्या अभावामध्ये तृषातुर होऊन विषयरूपी मृगजळामध्ये भटकत आहे त्या सुखाची प्राप्ती या परिपूर्ण अवस्थेमध्येच प्राप्त होते.

सर्व शक्ती पणाला लावून या केवलज्ञानाचे अभिनन्दन केले तरी त्याची अंतरंग महत्ता वाणीद्वारे वाखाणणे अशक्य आहे. अतीन्द्रिय केवलज्ञान पूर्ण

निराकुल, अनन्त सुखसंपन्न, अद्वितीय आहे. त्याची महत्ता कशी सांगावी? अभिनंदन करताना अन्तरंग रहस्याचा अनुभव होताच सर्व बाजूनी आनन्द प्रमोद उत्पन्न होतो.

नियत आत्मप्रदेशातून काही पदार्थांना क्रमपूर्वक जाणणे हे स्वभावाच्या विरूद्ध कार्य आहे असे जाणून अशा जाणण्यापासून विरक्त होऊन निज सहज ज्ञानस्वभावामध्ये स्थित होऊन विश्राम करावा. निर्मल क्षायिक केवलज्ञान प्राप्त करण्याचा एकमात्र उपाय शुद्धोपयोग अर्थात स्वात्मानुभव आहे म्हणून सदैव आत्मानुभवाचाच अभ्यास करावा. सर्व संकल्प विकल्पाचा त्याग करून निज आत्मिक आनंदाचा आस्वाद घेऊन तृप्त व्हावे.

पूर्व गाथेमध्ये हे सिद्ध केले की क्षायिक केवलज्ञान तीन लोकातील व तीन काळातील सर्व पदार्थांना एकावेळी जाणते. आता या गाथेत सिद्ध करतात की जो सर्वाला जाणत नाही तो एकाला सुद्धा जाणत नाही अर्थात जो सर्वाला जाणतो तो एकाला जाणतो.–

जो णवि जाणदि जुगवं अत्थे तिक्कालिगे तिहुवणत्थे ।
णादुं तस्स ण सक्कं सपज्जयं दव्वमेगं वा ।।४८।।

अन्वयार्थ– (जो) जो जीव **(तिक्कालिगे)** तिन्ही काळातील व **(तिहुवणत्थे)** तिन्ही लोकातील **(अत्थे)** पदार्थांना **(जुगवं)** एकावेळी **(ण विजाणदि)** जाणत नाही **(तस्स)** त्याला **(सपज्जयं)** पर्यायसहित **(एगं दव्वं वा)** एका द्रव्यालासुद्धा **(णादुं ण सक्कं)** जाणणे शक्य नाही.

सर्वाला जाणल्याशिवाय यथार्थ एका आत्मज्ञानाची असिद्धी –

जो त्रिकालवर्ती त्रिभुवनस्थ सर्व पदार्थांना एकावेळी जाणत नाही तो निज आत्म्यालासुद्धा जाणत नाही. अथवा तो सर्व पर्यायसहित एका सुद्धा ज्ञेयपदार्थाला जाणत नाही. एकाच पदार्थाला सर्व पर्यायसहित जाणण्याची योग्यता त्याच्यामध्येच आहे जो सर्वद्रव्यांना सर्व पर्यायसहित जाणतो. सर्वज्ञाचे ज्ञान समस्त ज्ञेयाकार परिणत आहे. केवली भगवान सर्वांना जाणतात म्हणून ते स्वतःला सुद्धा वास्तविक जाणतात. जर त्यांनी सर्वांना जाणले नसते तर स्वतःला सुद्धा जाणले नसते.

आकाशद्रव्य एक आहे, धर्मद्रव्य एक आहे. लोकाकाशाच्या

प्रदेशप्रमाण असंख्यात कालद्रव्य आहेत. अनन्तानन्त जीवद्रव्य आहेत. त्याहून अनंतपट पुद्गलद्रव्य आहेत. कारण एकेका जीवद्रव्याबरोबर अनन्तानन्त कर्म परमाणूंचा, अनंतानंत नोकर्म परमाणूंचा, अनंतानंत तैजस परमाणूंचा संबंध आहे. तसेच प्रत्येक कर्म, नोकर्म परमाणूवर अनन्तानन्त विस्रसोपचयरूप (स्वभावरूपाने स्थित) परमाणू आहेत. यावरून सिद्ध होते की जीवराशीहून पुद्गलराशी अनन्तानन्त पट आहे. त्याचप्रमाणे या द्रव्यांचे अनन्तानन्त गुण व त्यांच्या भूत व भविष्यकालीन अनन्तानन्त पर्याय आहेत. एक वर्तमानकालीन पर्याय आहे. हे सर्व ज्ञेय अर्थात जाणण्यायोग आहेत. यापैकी कोणी एक जीवद्रव्य ज्ञाता (जाणणारा) आहे. यद्यपि जाणणारे सुद्धा अनन्तानन्त आहेत. कारण सर्व जीव ज्ञातेच आहेत. परन्तु सर्व जीव ज्ञेयसुद्धा आहेत. जेव्हा एक जीव जाणण्याचे काम करतो तेव्हा तो एकटा स्वयं ज्ञाता होतो आणि अन्य अजीव द्रव्यांबरोबर त्याहून भिन्न शेष जीवसुद्धा ज्ञेयच होतात. याप्रमाणे प्रत्येक जीव स्वतःकरिता ज्ञाता आणि ज्ञेय दोन्ही आहे. परंतु अन्यजीव त्याच्याकरिता अजीव द्रव्यासमान ज्ञेयच आहेत.

ज्याप्रमाणे संपूर्ण दाह्य पदार्थाला (ईंधनाला) जाळणारी अग्नी सर्व ईंधनाकार पर्यायाने परिणमित होत संपूर्ण दहन ज्याचा आकार आहे अशा एक अग्निस्वरूप परिणमित होते त्याप्रमाणे संपूर्ण ज्ञेयांना जाणणारा आत्मा संपूर्ण ज्ञेयाकार पर्यायरूपाने परिणमन करीत संपूर्ण एक ज्ञान ज्याचा आकार आहे अशा आत्मरूपाने परिणमतो. ज्याप्रमाणे जर अग्नी समस्त दाह्य पदार्थांना (ईंधनाला) जाळत नाही तर ती ईंधनाच्या आकाररूपाने न परिणमता संपूर्ण दहनाकार एक अग्निस्वरूप परिणमित नाही त्याप्रमाणे जो आत्मा सर्व ज्ञेय पदार्थांना जाणत नाही तो ते ज्ञेयपदार्थ ज्यामध्ये निमित्त आहेत अशा समस्त ज्ञेयाकाररूपाने परिणमन न करता सकल एक अखंड ज्ञानाकाररूप आपल्यारूपाने परिणमित नाही. अर्थात जो सर्वाला जाणत नाही तो स्वतःलासुद्धा जाणू शकत नाही. ज्याप्रमाणे एक आरसा आहे व त्या आरशासमोर एक झाड आहे. झाडाच्या फांद्या, पाने, फुले, फळे सर्वच्या सर्व आरशामध्ये झळकत आहे. त्या आरशात पडलेल्या प्रतिबिंबाला जो पहात नाही तो काय आरशाला पाहतो अर्थात तो आरशाला पाहत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानीच्या ज्ञानामध्ये सर्व पदार्थ आहेत. तेथे सर्व पदार्थांना जो

जाणू शकत नाही तो आपल्या ज्ञानाला सुद्धा जाणू शकत नाही. संपूर्ण पदार्थ ज्यामध्ये जाणले जातात ती आत्म्याची केवलज्ञानपर्याय आहे. ज्यांनी त्या सर्व ज्ञेयपदार्थांना जाणले नाही त्यांनी त्या केवलज्ञान पर्यायाला जाणले नाही व केवलज्ञान पर्यायसहित आत्म्याला सुद्धा जाणले नाही. ज्यांनी केवलज्ञानाद्वारे संपूर्ण पदार्थांना जाणले त्यानेच केवलज्ञान पर्यायसहित निज आत्म्याला जाणले.

जयसेनाचार्यांनी तात्पर्यवृत्तीमध्ये यासाठी अनेक दृष्टांत दिले आहेत. ज्याप्रमाणे कोणी आंधळा पुरुष सूर्याने प्रकाशित होणाऱ्या पदार्थांना पाहत नाही तर तो सूर्याला सुद्धा पाहत नाही. दीपकाद्वारे दिसणाऱ्या पदार्थांना न पाहणारा त्या दीपकाला सुद्धा पाहत नाही. आरशात झळकणाऱ्या प्रतिबिंबाला न पाहणारा हातपाय इत्यादी अवयवरूप आपल्या शरीराला आपल्या डोळयाने पाहत नाही. त्याप्रमाणे कोणी आत्मा केवलज्ञानाद्वारे प्रकाशित होण्यायोग्य पदार्थांना जाणत नाही तो आत्मा अखंड एक केवलज्ञानरूप आपल्या आत्म्यालासुद्धा जाणत नाही. या गाथेतून हा भावसुद्धा व्यक्त होतो की जो सर्व त्रिकालवर्ती ज्ञेयांना एका काळात जाणू शकत नाही. तो एका द्रव्यालासुद्धा त्याच्या अनंतपर्यायसहित जाणू शकत नाही. कोणत्याही क्षायोपशमिक ज्ञानामध्ये सर्व क्षेत्रातील व सर्व काळातील सर्व पदार्थांना जाणण्याची शक्ती नाही. चारी ज्ञाने थोड्या पदार्थांना जाणतात. अतीन्द्रिय स्वाभाविक क्षायिक ज्ञानामध्येच सर्व क्षेत्रातील व सर्व काळातील सर्व द्रव्यांच्या सर्व पर्यायांना जाणण्याची शक्ती आहे. यावरून हे सिद्ध आहे की जो सर्व तीन काळ व तीन लोकातील पर्यायसहित द्रव्यांना जाणू शकतो तो एक द्रव्यालासुद्धा त्याच्या अनंत पर्यायसहित जाणू शकतो.

तात्पर्य हे आहे की जो सर्व गुणपर्यायांनी सहित सर्वाला जाणत नाही तो सर्व गुणपर्यायसहित स्वतःला सुद्धा जाणू शकत नाही. त्याचप्रमाणे जो सर्व गुणपर्यायसहित स्वतःला जाणत नाही तो सर्व गुणपर्यायसहित परालासद्धा जाणू शकत नाही. पूर्वोक्त कथन केवलज्ञानाच्या अपेक्षेने जाणावे. कारण केवलज्ञानामध्येच स्वपराला सर्व गुणपर्यायसहित एकाच वेळेस जाणण्याचे सामर्थ्य आहे. केवलज्ञान प्रगट झाल्याशिवाय न आम्ही आपल्या आत्म्याला पूर्ण जाणू शकतो, न आम्ही कोणत्याही एका द्रव्याला जाणू शकतो. अशी

महिमा केवलज्ञानाचीच आहे असे जाणून केवलज्ञान प्रगट करण्याचा पुरुषार्थ करावा. त्याच्या प्राप्तीसाठी शुद्धोपयोग व समताभावाचा अभ्यास करावा.

मागील गाथेत सांगितले की सर्वाला न जाणणारा आत्मा एकाला सुद्धा पूर्णरूपाने जाणत नाही. आता या गाथेत हे सांगतात की एकाला पूर्णरूपाने न जाणणारा आत्मा सर्वाला जाणत नाही. अर्थात जो सर्वाला जाणत नाही तो एकाला जाणत नाही व जो एक आत्म्याला जाणत नाही तो सर्वाला जाणत नाही.

दव्वं अणंतपज्जयमेगमणंताणि दव्वजादाणि ।

ण विजाणदि जदि जुगवं किध सो सव्वाणि जाणादि ।।४९।।

अन्वयार्थ – (जदि) जर जो **(अणंतपज्जयं एगं दव्वं)** अनन्त पर्यायरूप एका द्रव्याला (आत्मद्रव्याला) **(ण विजाणदि)** जाणत नाही तर **(सो)** तो **(जुगवं)** एका वेळेस **(सव्वाणि अणंताणि दव्वजादाणि)** सर्व अनन्तद्रव्यांना **(किध)** कसे काय **(जाणदि)** जाणू शकतो ?

अनात्मज्ञतेमध्ये अविश्वज्ञता–

सर्व ज्ञेयाकारमय एका आपल्या आत्म्याला जाणले नाही तर सर्वांना जाणणे कसे होईल? ज्या आरशामध्ये झाडाचे प्रतिबिम्ब पडले आहे त्या आरशालाच जर पाहिले नाही तर त्या झाडाच्या प्रतिबिम्बाला तर कसे पाहू शकणार ? आत्मा स्वयं ज्ञानमय आहे. कारण तो ज्ञाता (जाणणारा) आहे. म्हणून आत्मा ज्ञानच आहे. समयसार कलशामध्ये अमृतचंद्र आचार्य म्हणतात.–

आत्मा ज्ञानं स्वयं ज्ञानं ज्ञानादन्यत् करोति किम्।

ज्याप्रमाणे अग्नि उष्णमय, पाणी शीतलमय, साखर गोडमय आहे त्याचप्रमाणे आत्मा ज्ञानमय आहे. आत्म्याच्या संपूर्ण प्रदेशांमध्ये ज्ञानच भरलेले आहे. आत्मा अनादि अनन्त ज्ञानाचा गोळा आहे. म्हणून आत्मा म्हणजे ज्ञान हे समीकरण योग्य आहे. आत्मा ज्ञानाला सोडून दुसरा कोणताही उद्योग करीत नाही. ज्ञान प्रतिभासमय आहे. आत्म्याचा ज्ञान हा असाधारण गुण आहे. तो प्रत्येक आत्म्यामध्ये समान स्वभावाला घेऊन आहे. त्रैकालिक आहे. म्हणून प्रतिभासमय असूनही महासामान्यरूप आहे. प्रतिभासाचे स्वरूप

पदार्थाला प्रतिभासित करणे अर्थात जाणणे. निरावरण निर्मल ज्ञान स्वभावतः सर्व ज्ञेयांना जाणणेरूप आहे. म्हणून ज्ञान स्वभावाच्या अपेक्षेने एक असून अनन्त ज्ञानविशेषांमध्ये व्यापक आहे. त्यातील पहिली चार ज्ञाने काही द्रव्यपर्यायांना विषय करतात व केवलज्ञान सर्व द्रव्यपर्यायांना विषय करते.

जो आत्मा सर्व द्रव्यपर्याय ज्याला निमित्तआहेत अशा अनन्त विशेषांमध्ये व्याप्त असणाऱ्या प्रतिभासमय महासामान्यरूप आत्म्याला स्वानुभव प्रत्यक्ष करीत नाही अर्थात प्रत्यक्ष जाणत नाही तो प्रतिभासमय महासामान्याच्या द्वारे व्याप्य प्रतिभासमय अनन्त विशेषांना निमित्तभूत सर्व द्रव्यपर्यायांना कसे प्रत्यक्ष करू शकतो? जो आरशाला पाहू शकत नाही तो त्यामध्ये झळकणाऱ्या पदार्थांना सुद्धा पाहू शकत नाही. जो निर्मल शुद्ध आत्म्याला पाहत नाही तो त्यामध्ये प्रतिभासित होणाऱ्या सर्व ज्ञेयरूप अनन्त द्रव्यांना सुद्धा पाहू शकत नाही.

अनन्त गुणपर्याय सहित संपूर्ण पदार्थांना जाणण्याची ही सहज प्रक्रिया आहे की संपूर्ण पदार्थ आपापल्या गुणपर्यायासहित केवलज्ञानी आत्म्याच्या केवलज्ञानामध्ये एकाच वेळेस झळकतात अर्थात जाणले जातात. यावरून हे सहज सिद्ध होते की ज्या केवलज्ञानी व्यक्तीने आपल्या केवलज्ञान पर्यायाला जाणले. तेव्हा त्या ज्ञानामध्ये प्रतिबिंबित पदार्थसुद्धा सहज जाणले गेले म्हणून हे कथन योग्यच आहे की जो व्यक्ती संपूर्ण गुणपर्यायसहित स्वतःला जाणतो तो सर्व पदार्थांना गुणपर्यायसहित जाणतोच व जो जीव स्वतःला सर्व गुणपर्यायसहित जाणत नाही तो अन्य सर्व पदार्थांना जाणू शकत नाही.

यावरून ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे की जो एक स्वतःला जाणत नाही. तो सर्वाला जाणत नाही म्हणून सर्वाच्या ज्ञानाने आत्म्याचे ज्ञान व आत्म्याच्या ज्ञानाने सर्वाचे ज्ञान होते.

आत्मा ज्ञानमय असल्यामुळे स्वसंचेतक आहे. हे स्वज्ञान विशेषरूप परिणमत राहते. ज्ञानविशेष ज्ञेयाला ग्रहण करते. येथे ज्ञाता व ज्ञेयामध्ये वस्तूरूपाने अन्यत्व असतानासुद्धा ज्ञान व ज्ञेय या दोन्हींचे एका ज्ञान अवस्थेमध्ये परस्परमिश्रण झाल्याप्रमाणे भासित होते. त्यामध्ये भेद करणे अत्यन्त अशक्य झाल्यामुळे सर्व पदार्थसमूह आत्म्यामध्ये प्रविष्ट झाल्याप्रमाणे वाटतात. ज्याप्रमाणे आरशामध्ये पदार्थांचे आकार प्रतिबिंबित

होतात तेथे जणू पदार्थ आरशामध्ये घुसले आहेत असे वाटते. पदार्थ व आरसा अत्यन्त भिन्न आहेत. आरशामध्ये झळकलेले आकार ती आरशाचीच अवस्था आहे. त्याप्रमाणे ज्ञान व ज्ञेय पदार्थ अत्यन्त भिन्न आहेत. परंतु ज्ञानामध्ये प्रतिभासित ज्ञेय ज्ञानाची अवस्था आहे. बाह्य ज्ञेयाच्या अनुरूप प्रतिभास्यमान ज्ञेय आहेत. बाह्य ज्ञेय अत्यंत पृथक् परद्रव्यरूप आहेत. परंतु प्रतिभास्यमान ज्ञेय ज्ञानाशी तन्मय आहे. जर ज्ञान सर्व परिपूर्ण निज आत्म्याला जाणणार नाही तर परिपूर्ण आत्म्याचे ज्ञानच सिद्ध होणार नाही. परिपूर्ण ज्ञान झाले नाही तर सर्वाचे ज्ञान होणे असंभव आहे. प्रतिभास्यमान सर्वाचे ज्ञान झाले नाहीतर एक पूर्ण स्वतःचे ज्ञान होणे असंभव आहे.

यावरून जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये एक शंका उपस्थित करून त्याचे समाधान केले आहे. ती याप्रमाणे या गाथेत सांगितले की जो आत्म्याला जाणतो तो सर्वाला जाणतो व यापूर्वीच्या गाथेत सांगितले की जो सर्वाला जाणतो तो एक आत्म्याला जाणतो. जर असे आहे तर छद्मस्थाला सर्वाचे ज्ञान नाही तर आत्म्याची भावना कशी करणार? आणि जर आत्म्याची भावना केली नाही तर त्यांना केवलज्ञानाची उत्पत्ती होणार नाही. असे झाले असता कोणी केवलज्ञानी होणार नाही. या शंकेचे दोन प्रकाराने समाधान केले आहे. प्रथम समाधान–परोक्ष प्रमाणरूप श्रुतज्ञानाने सर्व पदार्थ जाणले जातात. कारण छद्मस्थांना सुद्धा लोक व अलोकाचे ज्ञान व्याप्तिज्ञानरूपाने आहे. ते व्याप्तिज्ञान परोक्षरूपाने केवलज्ञानाच्या विषयाला ग्रहण करते म्हणून एका अपेक्षेने श्रुतज्ञान आत्माच आहे. दूसरे समाधान – अल्पज्ञानी स्वसंवेदन ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतो. पुन्हा त्याची भावना करतो. रागद्वेषादी विकल्पांनी रहित याच स्वसंवेदन ज्ञानाच्या भावनेने केवलज्ञानाची उत्पत्ती होते. यामध्ये कोणताही दोष नाही. वास्तविक अन्य पदार्थाला जाणणे अशक्य आहे. अन्य पदार्थविषयक प्रतिभासमय निज आत्म्यालाच हा जीव वास्तविक जाणतो असे जाणून पर पदार्थाला जाणण्याचा विकल्प सोडून स्वयं स्वतःला जाणण्याचा पुरुषार्थ करावा.

कोणी संसारी जीव क्षायोपशमिक ज्ञानाच्या द्वारे सर्वज्ञ होऊ इच्छितो. क्रमाने एकेका पदार्थाला जाणून जेव्हा सर्व पदार्थांचे ज्ञान होईल तेव्हा जीव सर्वज्ञ होईल असा जो तर्क करतो त्याला कुन्दकुन्दाचार्य येथे उत्तर देतात की

क्रमाक्रमाने पदार्थाला जाणणारा जीव सर्वज्ञ होऊ शकत नाही.–

उपज्जदि जदि णाणं कमसो अट्ठे पडुच्च णाणिस्स ।
तं णेव हवदि णिच्चं ण खाइगं णेव सव्वगयं ।।५०।।

अन्वयार्थ– (**जदि**) जर (**णाणिस्स**) ज्ञानीचे (**णाणं**) ज्ञान (**कमसो**) क्रमाने (**अट्ठे पडुच्च**) पदार्थाचा आश्रय करून (**उप्पज्जदि**) उत्पन्न होते तर (**तं**) ते ज्ञान (**णिच्चं**) नित्य (**णेव हवदि**) नाही, (**खाइगं ण**) क्षायिक नाही, (**सव्वगयं णेव**) सर्वगत नाही.

क्रमाने जाणणारे ज्ञान नित्य, क्षायिक व सर्वगत नाही.

क्रमिकज्ञानाची विनाशशीलता–

जर क्रमाने एकेक पदार्थाचे अवलंबन करून ज्ञान उत्पन्न होते तर ते अविनाशी राहू शकत नाही. कारण जे ज्ञान कोण्या एका पदार्थाचे अवलंबन घेऊन उत्पन्न झाले होते ते पुढे अन्य पदार्थाचे अवलंबन घेऊन उत्पन्न झाल्यावर नष्ट होते. ज्या पदार्थाचे अवलंबन असेल त्याच पदार्थाचे ज्ञान प्रवृत्त होते. अशाप्रकारे मानले तर पूर्वी जाणलेले अर्थज्ञान एकसुद्धा राहणार नाही.

मती, श्रुत, अवधी व मनःपर्यय ज्ञान ही चारी ज्ञाने पदार्थाला क्रमाक्रमाने जाणतात. जेव्हा एका विषयाला जाणतात तेव्हा दुसऱ्या विषयाला जाणू शकत नाहीत. जेव्हा मतिज्ञान रंगाला जाणते तेव्हा ते रसाला विषय करू शकत नाही, वास घेऊ शकत नाही, स्पर्श करू शकत नाही, शब्द ऐकू शकत नाही व मनाने काही ग्रहण करू शकत नाही. पाच इन्द्रिये व मनाद्वारे मतिज्ञान एकावेळी जाणू शकत नाही. एकावेळी एकाच इन्द्रियाने जाणू शकते. एका इन्द्रियाद्वारे सुद्धा थोड्याच विषयाला जाणू शकते त्या इन्द्रियाद्वारे ग्रहणयोग्य सर्व विषयांना सुद्धा जाणत नाही. ज्याप्रमाणे एकावेळी टी.व्ही. वर अनेक चॅनेलवरून वेगवेगळे कार्यक्रम सुरू असतात त्या सर्व कार्यक्रमांना एकावेळी पाहू शकत नाही. प्रथम एक बटण दाबून एक कार्यक्रम पाहतो पुन्हा दुसरे बटण दाबून दुसऱ्या चॅनेलवर कोणता प्रोग्रॅम आहे ते पाहतो. पुन्हा तिसरे बटण दाबून तिसरा प्रोग्रॅम पाहतो. जेव्हा दुसरा प्रोग्रॅम पाहतो तेव्हा प्रथम प्रोग्रॅमचे ज्ञान नष्ट होते. त्यावेळी ते आठवत नाही. तिसरा प्रोग्रॅम पाहू लागला की दुसरा प्रोग्रॅम विसरून जातो. एकावेळी समोर ताटामध्ये दहा प्रकारचे खाद्य पदार्थ ठेवले

आहेत. त्या सर्वांचा एकावेळी आस्वाद घेऊ शकत नाही. जेव्हा गोड पदार्थाचा आस्वाद घेतो तेव्हा तिखट पदार्थाचा स्वाद घेऊ शकत नाही. जेव्हा तिखट पदार्थाचा स्वाद घेतो तेव्हा गोड पदार्थाचा स्वाद घेऊ शकत नाही. याप्रमाणे क्रमाक्रमाने एकेक पदार्थांचा रस चाखू शकतो. जेव्हा दुसऱ्या पदार्थाचा रस घेतो तेव्हा पहिल्या पदार्थाचा स्वाद नष्ट होतो. त्याचप्रमाणे चंदन, अत्तर, गुलाबजल इत्यादी अनेक सुगंधी पदार्थांच्या बाटल्या कपाटात आहेत त्या सर्वांचा गंध एकावेळी जाणू शकत नाही. तसेच थंड, गरम, स्निग्ध, रूक्ष इत्यादी अनेक स्पर्शयुक्त वस्तू जवळ आहेत त्या सर्वांचा एकावेळी स्पर्श जाणू शकत नाही. दुसरे स्पर्शज्ञान उत्पन्न झाले की पहिले स्पर्शज्ञान नष्ट होते.

मतिज्ञान अवग्रह, ईहा, अवाय व धारणा या क्रमाने उत्पन्न होते. ईहा झाल्यावर अवग्रहज्ञान नष्ट होते पुन्हा अवाय झाल्यावर ईहाज्ञान राहत नाही. धारणा झाल्यावर सुद्धा पुन्हा पदार्थाचे स्मरण केले नाही तर ती गोष्ट विसरून जातो. त्याचप्रमाणे जे पदार्थ नष्ट झाले त्याचे ज्ञान कालान्तरामध्ये रहात नाही.

तसेच जे अनक्षरात्मक श्रुतज्ञान आहे ते मतिज्ञानाद्वारे ग्रहण केलेल्या पदार्थाच्या आश्रयाने अनुभवरूप होते आणि जे अक्षरात्मक श्रुतज्ञान आहे ते शास्त्र वाचून व वचन ऐकून उत्पन्न होते. क्रमाने ग्रहण केलेले शास्त्रज्ञान क्रमानेच लक्षात राहते. थोड्या काळानंतर विसरून जाते. आपण प्रत्यक्ष अनुभव करतो की कित्येक श्लोक पाठान्तर केले की काही काळ लक्षात राहतात. जर त्याचे पुन्हपुन्हा घोलन केले नाही तर विसरून जातात. प्रत्यक्ष आपण अनुभवतो की तरूणपणी बुद्धी किती तल्लख असते. म्हातारपणी बुद्धी चालत नाही. पूर्वी शिकलेले सर्व विस्मृत होते. एखादा अतिशय बुद्धिमान मनुष्यसुद्धा वेडा होतो. अर्थात हे क्रमिक ज्ञान क्षणभंगुर आहे. विनाशशील आहे.

अवधिज्ञानानेसुद्धा एखाद्या पदार्थाला विषय बनविले असता त्या पदार्थासंबंधी मागच्या व पुढच्या भवांचे ज्ञान क्रमाने द्रव्यक्षेत्रादीच्या मर्यादापूर्वक उत्पन्न होते. ते सुद्धा सदैव एकसारखे रहात नाही. विषयाच्या अपेक्षेने बदलत राहते व कालांतराने नष्टसुद्धा होते. हीच अवस्था

मनःपर्ययज्ञानाची सुद्धा आहे. मनःपर्ययज्ञान दुसऱ्याच्या मनामध्ये स्थित पदार्थाला क्रमाने जाणते. याप्रमाणे ही चारी ज्ञाने क्रमाने पदार्थाला जाणतात व सदैव एकसारखे जाणत नाहीत. विषय बदलला की पूर्व ज्ञान नष्ट होते व नवीन ज्ञान उत्पन्न होते. म्हणून ही ज्ञाने केवलज्ञानाप्रमाणे नित्य नाहीत. केवलज्ञान नित्य आहे. ते ज्ञान क्रमाशिवाय सर्व द्रव्यांच्या सर्व पर्यायांना सदाकाल एकसमान जाणते.

क्रमिकज्ञान क्षायोपशमिक –

जेव्हा एकेक पदार्थाला जाणून क्रमाने अन्य अन्य पदार्थाला जाणले जाते तेव्हा ते ज्ञान क्षायिक होऊ शकत नाही. चारी ज्ञानामध्ये क्रमपणा व अनित्यपणा व अल्पविषयपणा असण्याचे कारण हेच आहे की ती ज्ञाने ज्ञानावरणीय कर्माच्या क्षयोपशमाने होतात. सीमित व क्रमिक ज्ञान क्षायिक असू शकत नाही. कारण संपूर्ण ज्ञानावरणाचा क्षय झाल्यावर ज्ञानाला सीमेमध्ये बांधण्याचे कारण काय?

ज्ञान क्रमाने पदार्थाला जाणते यामध्ये मुख्य कारण ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम आहे. क्षयोपशम म्हणजे काय? जेथे कर्माच्या उदयामध्येसुद्धा गुणाचा अंश व्यक्त असतो त्या कर्माच्या अवस्थेला क्षयोपशम म्हणतात. जसे दर्शनमोहनीयाच्या सम्यक्त्व प्रकृतीचा उदय असतानासुद्धा सम्यक्त्व गुण प्रकट असतो म्हणून त्या सम्यक्त्वास क्षायोपशमिक सम्यक्त्व म्हणतात. तसेच येथे ज्ञानावरण कर्माचा उदय असताना सुद्धा ज्ञानाचा अंश प्रगट आहे म्हणून मतिज्ञानादिकांना क्षायोपशमिक म्हटले आहे.

अथवा क्षयोपशमाचा खुलासा दुसऱ्या प्रकाराने केला जातो. तो याप्रमाणे– घातिकर्मातील देशघाती प्रकृतींमध्ये दोन प्रकारचे स्पर्धक (शक्ती) असतात. १) देशघाती स्पर्धक व २) सर्वघाती स्पर्धक. सर्वघाती स्पर्धकांचा उदय असताना थोडाही गुण प्रगट होत नाही व देशघाती स्पर्धकांचा उदय असताना आंशिक गुण प्रगट होतो. म्हणून गुण व्यक्त होण्यासाठी सर्वघाती स्पर्धकांचा अभाव होणे आवश्यक आहे. जेथे वर्तमानकाळात उदयाला येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाचा अभाव होतो अर्थात् सर्वघाती स्पर्धक देशघाती स्पर्धकरूपाने परिणमित होऊन उदयाला येतात व देशघाती स्पर्धकांचा उदय असतो तसेच भविष्यकाळात उदययोग्य सर्वघाती स्पर्धकांचा

सदवस्थारूप उपशम असतो अर्थात ते उदीरणा होऊन लवकर उदयाला येत नाहीत अशा कर्माच्या अवस्थेला क्षयोपशम म्हणतात. कर्माचा पूर्ण क्षय झाला असता जीवाचा पूर्ण गुण प्रकट होतो व क्षयोपशम असता जीवाचा आंशिक गुण प्रकट होतो. म्हणून जेथे क्रमाक्रमाने एकेका पदार्थाचे ज्ञान होते ते क्षायिक ज्ञान नव्हे, ते क्षायोपशमिक ज्ञान आहे. केवलज्ञान सर्व ज्ञानावरण कर्माच्या क्षयाने होते म्हणून तेच ज्ञान तेवढे क्षायिक आहे.

क्रमिकज्ञानामध्ये सर्वगतपणाचा अभाव –

जे ज्ञान क्रमाक्रमाने एकेक पदार्थाचा आश्रय घेऊन जाणते ते अनन्ताला जाणू शकत नसल्यामुळे सर्वगत होऊ शकत नाही.एका समयामध्ये सर्व द्रव्य, क्षेत्र, काल व भावांना जाणण्यासाठी असमर्थ क्षायोपशामिक ज्ञान सर्वगत अर्थात सर्वज्ञ नाही. ज्याचा क्रमाक्रमाने जाणण्याचा व्यापार चालू आहे ते ज्ञान अनन्त द्रव्य, क्षेत्र, काल भावरूपाने सर्वाला जाणू शकत नाही. कारण क्रमाक्रमाने जाणत असल्यामुळे ज्ञान केवळ वर्तमान पदार्थालाच ग्रहण करेल. केवली भगवंतांना विशुद्ध होऊन अनन्तकाळ झाला त्यांना एकेक करीत अनन्त द्रव्यांचे ज्ञान संचित झाले असेल असे कोणी म्हणेल तर ते योग्य नाही. कारण सर्वांचा संचय झाला असेल तर त्यानंतर आलंबनासाठी कोणताही पदार्थ शिल्लक राहिला नाही. त्यामुळे जाणण्याचा व्यापार थांबल्यामुळे ज्ञानशून्यतेचा प्रसंग येईल. आणि जर कोणताही पदार्थ जाणण्यासाठी शिल्लक राहिला असेल तर सर्वज्ञता सिद्ध होणार नाही. म्हणून जे ज्ञान क्रमाने पदार्थाचा आश्रय घेऊन उत्पन्न होते त्यामध्ये सर्वज्ञता नाही. अतीन्द्रिय केवलज्ञानामध्येच सर्वज्ञता आहे. ते एकावेळी लोकालोकातील सर्व द्रव्यांना त्यांच्या अनंतपर्यायसहित जाणते. ज्ञानाची स्वभावप्रवृत्ती अशीच आहे. सर्वज्ञता माझा स्वभाव आहे अशाप्रकारे स्वभावदृष्टी ठेवली असता पर्यायात सर्वज्ञरूप स्वभाववृत्ती प्रगट होते. क्रमवर्ती ज्ञान माझा स्वभाव नाही असे जाणून त्यासंबंधी आस्था सोडून द्यावी व पराला जाणण्याचा विकल्प न करता स्वतःला विशुद्ध ज्ञानमात्र अनुभवावे.

अशाप्रकारे क्रमाक्रमाने जाणणाऱ्या ज्ञानामध्ये सर्वगतपणा नाही हे सिद्ध करून आता हे सिद्ध करतात की एकावेळी तीन लोक व तीन काळातील सर्व ज्ञेयांना जाणणाऱ्या ज्ञानामध्येच सर्वगतपणा आहे. निषेधरूपाने क्रमकृत ज्ञान

प्रवृत्तीचे खंडन करून आता युगपत् ज्ञानप्रवृत्तीच्या ठिकाणी सर्वज्ञता सिद्ध करतात.–

तिक्कालणिच्चविसमं सयलं सव्वत्थ संभवं चित्तं ।
जुगवं जाणदि जोण्हं अहो हि णाणस्स माहप्पं ।।५१ ।।

अन्वयार्थ – (**तिक्कालणिच्चविसमं**) तिन्ही काळामध्ये सदा विषम (**सव्वत्थ संभवं**) सर्व क्षेत्रामध्ये राहणाऱ्या (**चित्तं**) अनेक प्रकारच्या (**सयलं**) सर्व पदार्थांना (**जोण्हं**) जैन (जिनेन्द्र देवाचे) ज्ञान (**जुगवं**) एकावेळी (**जाणदि**) जाणते. (**अहो हि**) अहो ! खरोखर अद्‌भुत असे (**णाणस्स माहप्पं**) हे ज्ञानाचे माहात्म्य आहे.

युगपत प्रवृत्तीने जाणणारे ज्ञानच सर्वज्ञ आहे.

ज्ञानाचे माहात्म्य –

या गाथेमध्ये आचार्यांनी केवलज्ञानाचे गुणानुवाद गाऊन केवलज्ञानासंबंधी आपली अकाट्य श्रद्धा प्रगट केली आहे. आचार्य कुन्दकुन्ददेवांनी सदेह विदेहक्षेत्रात जाऊन सीमंधर प्रभूंच्या समवसरणामध्ये प्रत्यक्ष सीमंधर प्रभूंचे दर्शन घेऊन केवलज्ञानाचा महिमा प्रत्यक्ष पाहिला होता व सीमंधर प्रभूंची दिव्यध्वनी साक्षात् ऐकली होती. त्या केवलज्ञानाचा अचिन्त्य महिमा अनुभवल्यामुळे आचार्यांच्या मुखातून सहज उद्‌गार निघाले आहेत की, 'अहो हि णाणस्स माहप्पं' अर्थात केवलज्ञानाचे अद्भुत आश्चर्यकारी माहात्म्य आहे. खरोखर त्यांच्या हृदयात केवलज्ञानाचा अगाध महिमा मावला नाही म्हणूनच हे आश्चर्यजनक उद्‌गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले. जेव्हा आपण एखादे प्रेक्षणीय स्थळ किंवा उत्कृष्ट वस्तू पहायला जातो तेव्हा त्या वस्तूची दिव्यता, भव्यता व सौन्दर्य आपल्या मनात मावत नाही तेव्हा आपण सहजपणे उच्चारतो की 'अहो ! पहा, पहा किती सुन्दर आहे' इत्यादी. त्याचप्रमाणे समवसरणातील ते बाह्यवैभव पाहिले. साक्षात् केवली भगवन्त विराजमान आहेत. गणधरदेवादी अनेक मुनिराज, स्वर्गातील इन्द्रादिक देवगण भगवंतांची दिव्यध्वनी ऐकत आहेत, दिव्यध्वनी धाराप्रवाहरूपाने प्रवाहित होत आहे. त्यामध्ये ज्ञेय तत्त्वांची सत्य, सुंदर व गंभीर रहस्यमय विवेचना होत आहे. हा सर्व केवलज्ञानाचा महिमा आहे हे जाणून त्यांच्या मुखातून हे भावोद्‌गार बाहेर पडले आहेत.

क्षायिकज्ञानाची सर्वज्ञता –

क्षायिक केवलज्ञान अतिशयतेचे स्थानभूत उत्कृष्ट माहात्म्य स्वरूप आहे. केवलज्ञान संपूर्ण पदार्थांचे अवलंबन घेऊन प्रवृत्त होते. ज्ञानाचा स्वभाव जाणणे आहे. स्वतः जाणण्यामध्ये ज्ञेयाची छाटणी नसते की याला जाणतो किंवा याला जाणत नाही. ज्ञान शक्तीवर ज्ञानावरण कर्माचे आवरण असल्यामुळे क्षयोपशमानुसार ज्ञेयाची छाटणी होते की आता या समयात अमुक ह्या पदार्थाला जाणतो. ज्या पदार्थाच्या ज्ञानावरचे आवरण हटते त्या पदार्थाचे ज्ञान त्या समयात होते, इतरांचे नाही. जेथे ज्ञानावरण कर्माचा क्षय झाला आहे तेथे या क्षायिक ज्ञानाला सीमा नाही ज्ञानाचा असीम विकास स्वभावतः होतो.

जिनेंद्र प्रभूंचे ज्ञान ज्या सर्व पदार्थांना जाणते त्या पदार्थांची तीन विशेषणे गाथेमध्ये दिली आहेत. १) तिन्ही काळामध्ये सदा विषम आहेत. तिन्ही काळामध्ये पदार्थ सदा आपापल्या समयातील व्यतिरेकी पर्यायांनी परिणत होतात. त्यांच्या तीन काळासंबंधी अवस्था एक दुसऱ्याहून भिन्न असतात म्हणून त्यांना विषम म्हटले आहे. ज्याप्रमाणे जीवाच्या मनुष्य, तिर्यंच, नारक व देव या अवस्था एकमेकाहून भिन्न आहेत. पुद्गलाच्या सूक्ष्म, स्थूल, तम, छाया, आतप, उद्योत इत्यादी अवस्था भिन्न भिन्न आहेत. त्या सर्वांना एका काळामध्ये केवलज्ञान जसेच्या तसे जाणते. २) पदार्थ सर्व लोकामध्ये स्थित आहेत. संपूर्ण लोकाकाशात एक धर्मद्रव्य, एक अधर्म द्रव्य सर्वत्र व्यापून स्थित आहे. लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक कालाणू स्थित आहेत. अशाप्रकारे संपूर्ण लोकाकाशात कालद्रव्य आहेत. लोकाकाशाच्या असंख्याताव्या भागामध्ये एक जीव राहतो. तेवढ्याच जागेत अन्य अनन्त जीवसुद्धा राहू शकतात. अशाप्रकारे सपूंर्ण लोकाकाशात अनंतानंत जीव स्थित आहेत. लोकाकाशाच्या एका प्रदेशावर एक परमाणू अथवा दोन, तीन, चार अथवा संख्यात अथवा असंख्यात अथवा अनंत परमाणू सुट्टे सुट्टे किंवा स्कंधरूपाने स्थित आहेत. त्याचप्रमाणे लोकाकाशाच्या दोन प्रदेशांवर द्व्यणुक, त्र्यणुक, संख्याताणुक, असंख्याताणुक व अनंताणुक स्कंध स्थित आहेत. अशाप्रकारे संपूर्ण लोकाकाशात अनंतानंत पुद्गलराशी स्थित आहे. त्या सर्वांना केवलज्ञान युगपत जाणते.

३) पदार्थ विचित्र आहेत. काही पदार्थ चेतन तर काही अचेतन, काही मूर्तिक तर काही अमूर्तिक, काही सक्रिय तर काही निष्क्रिय अशाप्रकारे पदार्थ अनेक प्रकारचे आहेत. त्या सर्व प्रकारच्या पदार्थांना केवलज्ञान युगपत जाणते. तिन्ही काळामध्ये सदा भिन्न-भिन्न पर्यायाने परिणत संपूर्ण लोकामध्ये स्थित, अनेक प्रकारच्या सर्व पदार्थांना जैनज्ञान जाणते. जैन म्हणजे जिनासंबंधी, येथे जैनज्ञानाचे तात्पर्य अरिहंत व सिद्धांच्या केवलज्ञानाशी आहे. ज्ञानावरण कर्माच्या क्षयाने उत्पन्न झालेल्या ज्ञानाचे असे अपूर्व माहात्म्य आहे. क्षायिक ज्ञान एकावेळी सर्व पदार्थांचे अवलंबन घेऊन प्रवृत्त होते. येथे पदार्थांच्या अवलंबनाचे तात्पर्य एवढेच आहे की क्षायिक ज्ञान सद्भूत अर्थांना जाणते, असद्भूत पदार्थांना जाणत नाही. हे क्षायिक ज्ञान नित्य आहे. यद्यपि हे ज्ञानसुद्धा वस्तुभूत असल्यामुळे प्रत्येक समयाला परिणमन करते तथापि निरुपाधिस्वरूप अत्यन्त शुद्ध असल्यामुळे त्याची प्रत्येक पर्याय समान होते. सर्वज्ञ भगवंतांच्या ज्ञानामध्ये समस्त वस्तूंचे ज्ञेयाकार टाकीने उत्कीर्ण केल्याप्रमाणे खचित आहेत म्हणून ते नित्य आहेत. केवलज्ञान सर्व सत् पदार्थांना जाणते हाच ज्ञान स्वभावाचा पूर्ण विकास आहे. ज्ञानाचा स्वभाव जाणणे व जाणणेसुद्धा पूर्ण आहे.

केवलज्ञान प्रत्यक्ष शुद्ध, स्वाभाविक, असहाय अतीन्द्रिय ज्ञान आहे. जे प्रकट होण्यासाठी व त्याला आपले काम करण्यासाठी दुसऱ्याच्या सहायतेची अपेक्षा नाही, न ते इन्द्रियांच्या आश्रयाने होते, न मनाच्या आश्रयाने, न पदार्थाच्या आश्रयाने होते. केवलज्ञान स्वतन्त्र व स्वाधीन आहे. शेष क्षायोपशमिक ज्ञाने पराधीन आहेत. क्षायोपशमिक ज्ञानावर आम्ही जगतो म्हणून आमचे जीवन परतन्त्र झाले आहे. **शुद्धोपयोगाच्या द्वारे स्वतन्त्र केवलज्ञानाची उत्पत्ती होते म्हणून शुद्धोपयोग प्राप्त करणे ही जीवनस्वातन्त्र्याची कला आहे.** जी एकदा प्राप्त होते ती पुन्हा नष्ट होत नाही व कमीसुद्धा होत नाही. परमात्म्याचे मोठेपण या निर्मल ज्ञानामुळेच आहे.

जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये या दोन गाथांचा निष्कर्ष काढीत शेवटी प्रश्न उत्पन्न करून उत्तर दिले आहे ते याप्रमाणे - एका समयामध्ये सर्वाला ग्रहण करणाऱ्या ज्ञानानेच सर्वज्ञ होतो हे जाणून काय करावे? ज्योतिष, मंत्र, वाद, रससिद्धी आदींचे जे खंडज्ञान आहे व जे मूढजीवांच्या

मनामध्ये चमत्कार उत्पन्न करण्यामध्ये कारण आहे व जे परमात्म्याच्या भावनेचा नाश करणारे आहे त्या सर्व ज्ञानासंबंधी आग्रह व हट्ट सोडून तीन लोक व तीन काळातील सर्व वस्तूंना एका समयात प्रकाशित करणाऱ्या अविनाशी, अखंड, एकरूपाने उद्योतरूप सर्वज्ञत्व शब्दाने सांगण्यायोग्य जे केवलज्ञान आहे त्याच्या उत्पत्तीचे कारण जे सर्व रागद्वेषादी विकल्प जालांनी रहित स्वाभाविक शुद्ध आत्म्याचे अभेदज्ञान अर्थात स्वानुभवरूप ज्ञान आहे त्याची भावना करावी. कोणतेही क्षायोपशमिक ज्ञान अनित्य व असार आहे म्हणून हेय आहे. क्षायोपशमिक ज्ञानाचा अहंकार करणे योग्य नाही. मंत्र, तंत्र, व ज्योतिषाचे ज्ञान मोक्षमार्गामध्ये उपयोगी नाही. उलट मोक्षमार्गापासून च्युत होण्यास निमित्त आहे. म्हणून त्या ज्ञानाच्या पाठीमागे लागून आपली अल्प व दुर्लभ मनुष्यपर्याय बर्बाद करू नये. आत्महितासाठी उपयोगी सत्शास्त्रांचा अभ्यास करून मोक्षमार्ग प्रशस्त करून उपादेयभूत शाश्वत केवलज्ञान हस्तगत करावे.

'पराला जाणू नका, स्वतःला जाणा' अशाप्रकारे नेहमी पराला जाणण्याचा निषेध केला जातो व स्वतःला जाणण्याची प्रेरणा दिली जाते. यावरून अशी शंका उत्पन्न होते की पराला जाणल्यामुळे जीवाचे काय नुकसान होते? पराला जाणल्यामुळे जर बंध होतो असे म्हणाल तर सर्वात जास्त बंध केवलींना झाला पाहिजे. कारण ते संपूर्ण विश्वाला जाणतात. अल्पज्ञानी थोड्या पदार्थांना जाणतो त्यामुळे त्याला कमी बंध होईल. परंतु तसे तर होताना दिसत नाही. केवलज्ञानी सर्वाला जाणत असूनही अबंधक आहेत व अल्पज्ञानी थोडे जाणत असूनही बंधक आहे याचे काय कारण आहे हेच आता या गाथेत सांगतात. पूर्वी गाथा क्र. ३२ मध्ये सुद्धा ही गोष्ट सांगितली होती की पदार्थांचे ज्ञान होत असताना सुद्धा रागद्वेष मोहाचा अभाव झाल्यामुळे केवलज्ञानींना बंध होत नाही. त्याच अर्थाला दुसऱ्या प्रकाराने दृढ करीत आता ज्ञानाधिकाराचा उपसंहार करतात–

ण वि परिणमदि ण गेण्हदि उप्पज्जदि णेव तेसु अट्ठेसु।
जाणण्णवि ते आदा अबंधगो तेण पण्णत्तो ।।५२।।

अन्वयार्थ –(**आदा**) केवलज्ञानी आत्मा (**ते जाणण्णवि**) पदार्थांना जाणत असताना सुद्धा (**तेसु अट्ठेसु ण वि परिणमदि**) त्या पदार्थरूपाने

परिणमत नाही, (**ण गेण्हदि**) त्या पदार्थांना ग्रहण करीत नाही. (**णेव उप्पज्जदि**) त्या पदार्थरूपाने उत्पन्न होत नाही. (**तेण**) त्यामुळे ज्ञानी (**अबंधगो**) अबंधक (**पण्णत्तो**) म्हटला आहे.

प्रभू सर्वांना जाणत असताना सुद्धा त्यांचा कोणाशी कोणत्याही प्रकारचा संपर्क नाही म्हणून सर्वज्ञ प्रभू बंधरहित आहेत.

मोहपरिणती बंधकारक –

पूर्वी गाथा क्रमांक ४३ मध्ये 'पुद्गलकर्माचा उदय झाला असता त्या उदयाचा अनुभव करणारा जीव मोह, राग, द्वेषरूपाने परिणत होतो. त्यामुळे तो बंधाचा अनुभव करतो. अशाप्रकारे ज्ञेयार्थ परिणमन क्रियेमुळे बंध होतो याचे समर्थन केले आहे. संसारी जीवाला प्रत्येक समयात कर्माचा उदय नियमरूपाने आहे. कारण हा जीव अनादिकाळापासून कर्मबंधनामध्ये बद्ध आहे. बांधलेले कर्म नियमाने कोणत्या ना कोणत्या रूपाने उदयाला येते. कर्म उदयाला आल्यानंतर हा जीव कर्मफळामध्ये उपयुक्त होतो. त्या कर्मफळाशी एकरूप होऊन त्याचे वेदन करतो व त्यामुळे मोह, राग, द्वेषरूपाने परिणमित होतो. जगातील प्रत्येक पदार्थ स्वतःच्या योग्यतेनुसार स्वतन्त्ररूपाने परिणमन करतो. परद्रव्याची ती परिणती आमच्या पाप व पुण्याच्या उदयानुसार आमच्या परिणतीला अनुकूल अथवा प्रतिकूल होते. त्यामध्ये परद्रव्याचा काहीही दोष नाही व कर्माचाही काही दोष नाही. परंतु हा अज्ञानी जीव परद्रव्यालाच शाबासकी देतो किंवा परद्रव्यालाच दोष देतो. आमच्या इच्छेनुसार पराचे परिणमन झाले की त्यामध्ये हर्ष मानून तत्काल रागरूप परिणमतो अर्थात रागी होतो. पती, पत्नी, मुलगा, मुलगी मित्रमंडळी इत्यादींचे आपल्या म्हणण्यानुसार परिणमन झाले की लगेच मोह व रागाला पुष्ट करतो. 'माझा मुलगा माझे सर्व म्हणणे ऐकतो, खूप चांगला आहे, माझी आज्ञा कधीच मोडत नाही. माझी पत्नी आज्ञाकारिणी आहे इ. असे मानून मोही व रागी होतो. ज्या वस्तूसंबंधी आपलेपणाचा भाव असतो तेथे रागद्वेष होतो.

एकदा एक माणूस धोब्याकडे आपले भट्टीला दिलेले कपडे आणण्यासाठी जातो. धोबी त्याला कपडे देतो. कपडे हातात घेतो ना घेतो तोच त्याची दृष्टी फाटलेल्या कॉलरकडे जाते. तो एकदम धोब्यावर ओरडतो. 'माझा शर्ट कसा काय फाडलास? माझा एवढा महागाचा शर्ट? तुला काय

त्याची किंमत?

धोब्याला गोष्ट लक्षात येते तो लगेच दुसरे कपडे शोधून त्याला देतो व म्हणतो 'साहेब, हे घ्या तुमचे कपडे? चुकून दुसऱ्यांचे कपडे तुमच्याकडे आले, माफ करा.' दुसरे कपडे पाहिल्याबरोबर त्याचा क्रोध शांत होतो. काय जादू झाली? फाटलेले कपडे तर अजून त्याच्या हातातच आहेत. परंतु त्या कपड्याबद्दल ममत्वभाव नष्ट झाला. ते आपले नाहीत असा भाव उत्पन्न होताच राग नष्ट झाला. म्हणून **ज्या वस्तूविषयी आत्मीयभाव त्यासंबधीच रागद्वेष भाव उत्पन्न होतो.**

वास्तविक शेकडो कार्यामधून एखादेच कार्य आपल्या इच्छेनुसार झालेले असते व ९९ कार्ये आपल्या इच्छेनुसार झालेली नसतात. परंतु तेव्हा ते विसरून जातो व वर्तमान कर्माच्या उदयानुसार घडलेल्या अनुकूलतेमध्ये तन्मय होऊन माझा पती, माझी पत्नी, माझा मुलगा, माझी मुलगी असा मोह करतो. पापकर्माच्या उदयानुसार परद्रव्याची परिणती प्रतिकूल झाली की लगेच त्यामध्ये द्वेष करतो. मुलगा आपल्या इच्छेविरूद्ध वागला की तत्काल द्वेष करतो. ज्या मुलाला अनुकूल परिणतीमध्ये प्राणापेक्षा जास्त प्रेम करतो तोच मुलगा प्रतिकूल वागला असता त्याचा जीव घेण्यासाठी उतावीळ होतो. द्वेषाने त्याला दुःशब्द बोलतो, घरातून हाकलून काढतो हे सर्व द्वेषाचे रूप आहे. वास्तविक पर पदार्थ आपल्या पाप-पुण्यानुसार अनुकूल किंवा प्रतिकूल परिणमतो हे लक्षात न घेता हा कुत्र्याप्रमाणे पर पदार्थामध्येच मोह-राग-द्वेष करतो.

मोह, राग, द्वेष भाव झाल्यामुळे ज्ञेय पदार्थांच्या परिणमनानुसार जीव आपला परिणाम करतो. ज्ञेयपदार्थाच्या परिणमनानुसार इष्ट-अनिष्ट आदि भावरूप परिणाम करणे याला ज्ञेयार्थ परिणमन क्रिया म्हणतात. ज्ञेयार्थपरिणमन क्रियेने परिणत जीव क्रियेचे फळभूत बन्धाला प्राप्त होतो. विश्व ही प्रदर्शनाची वस्तू आहे. आपण फक्त या विश्वाचे ज्ञाता-द्रष्टा आहोत. जर कोणी प्रदर्शनातील वस्तूला आपली म्हणू लागेल तर त्याला जेलमध्ये बंधनात राहावे लागणार. त्याप्रमाणे या विश्वातील वस्तूंना आपले मानून आम्ही मोह करू लागलो तर चार गतिरूप जेलमध्ये कर्माच्या बंधनात जखडून रहावे लागणार. प्रदर्शनातील वस्तूंना चांगल वाईट मानून हा जीव

राग, द्वेष करू लागला तर व्यर्थ स्वतःच दुःखी होणार. प्रदर्शनातील वस्तू आवडली तर ग्रहण करू शकत नाही व नाही आवडली तर त्या वस्तूला दूर सारू शकत नाही. इष्ट, अनिष्ट विकल्प करून विनाकारण आकुल, व्याकुल होतो. त्याप्रमाणे विश्वातील पदार्थ आपल्याला प्रिय वाटला तर तो आपला कधी होऊ शकणार नाही व अप्रिय वाटला तर तो कधी नष्ट होऊ शकणार नाही. एखादी वस्तू जर अप्रिय वाटली तर आम्ही त्या वस्तूचा नाश करू इच्छितो. स्वतःच्या शान्तिकरिता आम्ही बाहेरचे विश्व बदलण्याचा प्रयत्न करतो. परंतु अंतरंग परिणामरूपी विश्व बदलण्याचा प्रयत्न करीत नाही. वास्तविक आम्ही दुःखी बाहेरच्या विश्वामुळे नाही, अंतरंग कलुषित भावरूपी विश्वामुळे दुःखी आहोत. **दुःखाला कारण विश्व नाही, अंतरंग परिणाम दुःखाला कारण आहेत.**

विश्व व संसार हे दोन शब्दांचे अर्थ कथंचित् भिन्न आहेत. **सहा द्रव्यांचा समूह विश्व आहे व परद्रव्यावरील प्रीती संसार आहे, जीवाचा विकारीभाव संसार आहे. संसार दुःखाला कारण आहे, विश्व नाही.**

वास्तविक ज्ञान कधीही बंधाचे कारण होत नाही. ज्ञानाबरोबर मोहनीय कर्माच्या उदयाने जेवढा मोह, राग, द्वेषरूप विकार होतो तोच कार्मण वर्गणारूपी पुद्गलांना कर्मबंधरूप परिणमविण्यासाठी निमित्त कारणरूप आहे. शरीराला लागलेली धूळ शरीर तेलाने लिप्त असेल तर चिकटते त्याप्रमाणे आत्मप्रदेशावर असणारी कार्माण वर्गणा आत्म्यामध्ये मोहाची स्निग्धता असेल तरच बंधाला प्राप्त होते.

केवलींच्या ठिकाणी परपरिणमनाचा अभाव –

केवलज्ञानी आत्मा ज्ञेयपदार्थांना आपल्या आत्म्यापासून भिन्नरूप जाणतात. परंतु त्या ज्ञेयपदार्थांच्या स्वरूपाने परिणमन करीत नाहीत. ज्याप्रमाणे केवली आपल्या आत्मप्रदेशांमध्ये समतारस रूपाने परिणमन करीत आहेत तसे ज्ञेयपदार्थांच्या स्वरूपाने परिणमन करीत नाहीत. अर्थात स्वयं अन्य पदार्थरूप होत नाहीत. वास्तविक आत्मा किंवा अन्य कोणत्याही द्रव्याचा स्वभाव परद्रव्यरूप परिणमन करण्याचा नाही. प्रत्येक द्रव्य आपल्याच गुणांमध्ये परिणमन करते. सोन्याचा तुकडा कुंडलरूप झाला तरी तो सोनेरूपानेच परिणमतो. सोनार भलेही स्वतःला सोन्याच्या कुंडलाचा कर्ता

मानत असला तरी सोनार त्या कुंडलरूपाने परिणमत नाही. आत्मा दीपकाप्रमाणे स्वपराला पाहणारा व जाणणारा आहे. तो सदा जाणतो- पाहतो अर्थात सदा ज्ञप्तिक्रिया करीत राहतो. राग, द्वेष, मोह करणे त्याचा स्वभाव नाही. शुद्ध केवलज्ञानामध्ये मोहनीय कर्माच्या उदयाचा काहीही सबंध नाही म्हणून ते निर्विकार आहे व बंधरहित आहे. केवलज्ञानी सर्व जीवादी द्रव्यांच्या त्रिकालवर्ती पर्यायांना जाणत आहेत. सप्तव्यसनी अत्यंत पापी जीवाला सुद्धा जाणत आहेत, परंतु त्याला बदलविण्याचे भाव केवलींना होत नाहीत. अज्ञानीला ज्ञानी बनविण्याचे विकल्प केवलींना येत नाहीत. संपूर्ण विश्वामध्ये बदल घडवून शांती प्रस्थापित करण्याची आकुलता केवलींना नाही, कारण ते सर्व द्रव्यांच्या परिणमन स्वभावाला प्रत्यक्ष जाणत आहेत. प्रत्येक द्रव्य स्वयं स्वतःमध्ये स्वरूपाने परिणमनशील आहे. त्यामध्ये परद्रव्य काहीही हेरफार करू शकत नाही. मारीचीच्या जीवाने आदिनाथांच्या मताच्या विपरीत मतांची स्थापना केली म्हणून आदिनाथांना आकुलता झाली का ? किंवा त्याला बदलविण्याचे भाव झाले का ? दुसऱ्याला बदलविण्याचा भाव हे रागाचे रूप आहे. भगवान वीतरागी आहेत ते फक्त विश्वाचे ज्ञाता-द्रष्टा आहेत म्हणूनच अबंधक आहेत. थोडेसे तत्त्वज्ञान झाल्यावर जीव प्रतिकूलतेमध्ये तर ज्ञायक राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु अनुकूलतेमध्ये ज्ञायक न राहता त्याच्याशी तन्मय होतो. अनुकूलतेमध्ये सुद्धा ज्ञायकता राहिली पाहिजे. ज्याप्रमाणे कोणी आपली स्तुती केली की 'माझी स्तुती' असे मानून मानकषायाची पुष्टी करतो. तेथे फक्त ज्ञाता-द्रष्टा राहत नाही. तेथे हे जाणत नाही की स्तुतीरूपाने शब्द परिणमलेले आहेत. शब्द पुद्गलाचा परिणाम आहे. तो माझ्यापासून अत्यंत भिन्न आहे. मी त्यारूपाने परिणमू शकत नाही. केवली भगवंतांची दुष्ट जीव निंदा करोत किंवा कोणी भक्त जीव भलेही स्तुती करोत त्यामध्ये ते ज्ञायकच आहेत. तटस्थ होऊन केवळ जाणतात. म्हणून ते अबंधक आहेत.

केवलीमध्ये ग्राह्यग्राहक भावाचा अभाव –

केवली भगवान ज्ञेयपदार्थांना ग्रहण करीत नाहीत. ज्याप्रमाणे ते आपल्या अनंत ज्ञान आदि अनंत चतुष्टयरूप स्वभावाला ग्रहण करतात त्याप्रमाणे ज्ञेयपदार्थांच्या स्वभावाला ग्रहण करीत नाहीत. विश्वातील सर्व पदार्थांना केवली जाणतात, परंतु विश्वातील कोणत्याही पदार्थाला ग्रहण

करण्याचा भाव करीत नाहीत. वास्तविक एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायाला ग्रहण करू शकत नाही. आत्म्याचा परद्रव्याशी ग्राह्यग्राहक संबंध नाही. परंतु अज्ञानी जीव मी पराला ग्रहण करतो असा फक्त विकल्प करतो. परद्रव्याची पर्याय जर आपल्यारूप झाली तर त्याला ग्रहण करू शकणार. ती तर आपल्यारूप होत नाही, मग मी पराला ग्रहण केले हा भाव मिथ्या आहे. प्रत्येक द्रव्य स्वतःच्या परिणामालाच ग्रहण करू शकतो. अज्ञानी जीव असे मानतो की मी धन, पैसा, सोने, चांदी, स्त्री, मित्र, कपडे, भांडी इत्यादींना ग्रहण करतो. परंतु त्याची ही मान्यता मिथ्या आहे. पैसा पैशाच्या ठिकाणी आहे, कपडे कपड्यामध्ये आहेत, स्त्री स्त्रीमध्ये आहे, मी पराला ग्रहण केले म्हणजे काय केले? परद्रव्याला ग्रहण करणारा जीव अपराधी आहे. तो नियमाने बंधाला प्राप्त होतो. जी वस्तू आपली नाही त्या वस्तूला ग्रहण करणारा जीव चोर समजला जातो. या विश्वामध्ये आपला आत्मा तेवढाच आपली वस्तू आहे, शेष सर्व परवस्तू आहेत म्हणून समयसार कलशामध्ये म्हटले आहे. –

परद्रव्यग्रहं कुर्वन् बध्यते सापराधवान् ।

केवली निरपराधी आहेत. कारण ते परद्रव्याला ग्रहण करीत नाहीत. म्हणून बंधनामध्ये अडकत नाहीत. केवली सर्व जाणतात, परंतु थोडेही ग्रहण करीत नाहीत. आम्ही थोडे जाणतो; परंतु सर्वाला ग्रहण करतो. पराला ग्रहण करण्याचा भाव संसार आहे.

केवलींमध्ये उत्पाद्य–उत्पादक भावाचा अभाव –

केवली भगवान पररूपाने उत्पन्न होत नाहीत. ज्याप्रमाणे ते विकाररहित परमानंदामध्ये एक स्वभावरूप पर्यायरूपाने उत्पन्न होतात. त्याप्रमाणे ज्ञेयपदार्थाच्या स्वभावरूपाने उत्पन्न होत नाहीत. केवली भगवान स्वतः परद्रव्याच्या पर्यायामध्ये उत्पन्न होत नाहीत व परद्रव्याला आपल्या पर्यायरूपाने उत्पन्न करीत नाहीत. वास्तविक एकद्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायाचा कर्ता नाही. प्रत्येक द्रव्य स्वयं स्वतःच्या पर्यायामध्ये उत्पन्न होते व स्वतःच्या पर्यायाचा स्वयं कर्ता आहे. निश्चयाने आत्म्याचा परद्रव्याबरोबर कर्ताकर्मसंबंध नाही. पराला उत्पन्न करण्याचा भाव मिथ्या आहे. पराला हा जीव उत्पन्न करू शकत नाही. उत्पन्न करण्याचे भावमात्र करतो. पराशी

उत्पाद्य-उत्पादक संबंध नाही. मी उत्पादक व केळी, ऊस, ज्वारी इ. माझे उत्पाद्य असा संबंध नाही. सोन्यापासून सोन्याचेच दागिने उत्पन्न होतात. चांदीपासून चांदीचेच जिन्नस बनतात. कॉटनच्या कपड्यापासून कॉटनचाच शर्ट उत्पन्न होतो. फॅक्टरीचा मालक स्वतःला फॅक्टरीमध्ये उत्पन्न झालेल्या मालाचा उत्पादक समजतो. सर्वोत्कृष्ट उत्पादक म्हणून सन्मान मिळताच खूष होतो.

जे उत्पन्न झाले त्यारूपाने जो परिणमतो तो उत्पादक. प्रत्येक वस्तू आपल्या परिणामाच्या द्वारे उत्पन्न होत असताना त्यारूपच राहते.

सब कुछ करके देखा कुछ भी न कर सका ।
जबसे करना छोड दिया तबसे भगवान बन गया ।।

केवली भगवान अनन्त द्रव्यांच्या अनंत पर्यायांना जाणत आहेत. परंतु एकाही पर्यायाला उत्पन्न करण्याचा विकल्प करीत नाहीत. सर्वज्ञ देव वीतराग आहेत. साक्षीभावाने फक्त ज्ञाता द्रष्टा आहेत. म्हणून त्यांची ज्ञेयार्थपरिणमन क्रिया होत नाही, केवळ ज्ञप्तिक्रिया होते. काहीही विकल्प न करता केवळ जाणणे याला ज्ञप्तिक्रिया म्हणतात. ज्ञेयार्थपरिणमन क्रियेचे फळ बंध व संसार आहे. ज्ञप्तिक्रियेचे (ज्ञानार्थपरिणमनाचे) फळ अतीन्द्रियानन्द व मोक्ष आहे. प्रभूंचे कार्य जाणणे आहे. कोणतेही कार्य क्रियेशिवाय होत नाही. कर्म तीन प्रकारचे आहे. प्राप्य, विकार्य व निर्वर्त्य. विकार्य कर्म म्हणजे एका अवस्थेचे दुसऱ्या अवस्थेमध्ये रूपांतर होणे. जसे दुधाचे दह्यामध्ये रूपांतर झाले. दुसरे प्राप्य कर्म म्हणजे एखाद्या वस्तूला ग्रहण करणे, प्राप्त होणे. जसे मी पुस्तक घेतो, मी मोक्षाला प्राप्त होतो. येथे पुस्तक व मोक्ष प्राप्य कर्म आहे. निर्वर्त्य कर्म म्हणजे एखाद्या वस्तूला उत्पन्न करणे. जसे महिलेने मुलाला उत्पन्न केले, कुंभकाराने घट उत्पन्न केला. येथे मुलगा, घट हे निर्वर्त्य कर्म आहे. निश्चयाने कर्ता, कर्म व क्रिया एकाच द्रव्यामध्ये आहेत.

केवली भगवान जाणण्याची क्रिया करतात. भगवान ज्ञानालाच ग्रहण करतात म्हणून ज्ञान प्राप्य असल्यामुळे ज्ञानच प्रभूंचे कर्म आहे. प्रभू ज्ञानरूप परिणमित होतात म्हणून ज्ञान विकार्य असल्यामुळे ज्ञानच प्रभूंचे कर्म आहे. प्रभू ज्ञानरूपच उत्पन्न होतात. म्हणून ज्ञानच निर्वर्त्य असल्यामुळे ज्ञानच प्रभूंचे कर्म आहे. केवलीप्रभूंचे ज्ञानार्थ परिणमन होते. आमचे ज्ञेयार्थ परिणमन होते

म्हणून केवलींना बंध होत नाही. आम्हाला बंध होतो.

आपल्याला केवलींच्या सारखे बंधनमुक्त होऊन अतीन्द्रिय सुखाचा आस्वाद घ्यावयाचा असेल तर अविकार चैतन्य स्वभावामध्ये स्थिर राहून ज्ञाता-द्रष्टा बनण्याचा पुरुषार्थ करावा. पररमणता थांबवून स्वरमणता करावी. छद्मस्थाचा उपयोग पराला जाणले असता कलुषित होतो म्हणून वारंवार उपयोग स्वतःमध्ये लावण्याचा प्रयत्न करावा. परासंबंधी होणाऱ्या विकल्पांचा निषेध करून त्यासंबंधी हेयबुद्धी ठेवावी. स्वानुभवाच्याद्वारे शुद्धोपयोगरूप समताभावाचा सदा अभ्यास करावा.

।। पहिला भाग समाप्त ।।

॥ दुसरा भाग प्रारंभ ॥

सुखाधिकार

५२ गाथेपर्यंत ज्ञानप्रपंच अधिकार समाप्त झाला. केवलज्ञानाचे स्वरूप व त्याची महिमा विस्ताराने वर्णिली. **आता येथून पुढे आनन्द अधिकार प्रारंभ होत आहे.** आत्म्यामध्ये अनंत गुण आहेत; परंतु त्यापैकी दोन मुख्य गुण आहेत, ज्ञान व आनन्द. इतर द्रव्यापासून जीवाला भिन्न करणारे हेच दोन गुण आहेत. जाणणे व आनन्द भोगणे ही जीवाचीच विशेषता आहे. **जेथे ज्ञान तेथे सुख व जेथे सुख तेथे ज्ञान असा परस्परांमध्ये अविनाभाव संबंध आहे.** त्यामध्येही प्रथम ज्ञानगुणाचे वर्णन केले; कारण संवेदन ज्ञानाद्वारेच होते. ज्ञानच नसेल तर सुखाचे वेदन होऊच शकत नाही. म्हणून प्रथम ज्ञानाचे वर्णन करून आता विस्ताराने सुखाचे वर्णन करतात. त्या ज्ञान व सुखगुणाच्या अनेक परिणामांपैकी कोणते ज्ञान व सुख उपादेय आहे आणि कोणते ज्ञान व सुख हेय आहे ते या गाथेत सांगतात–

अत्थि अमुत्तं मुत्तं अदिंदियं इंदियं च अत्थेसु ।
णाणं च तहा सोक्खं जं तेसु परं च तं णेयं ।।५३।।

अन्वयार्थ – (**अत्थेसु**) पदार्थासंबंधी (**णाणं**) ज्ञान (**अमुत्तं मुत्तं**)अमूर्त व मूर्त (**अदिंदियं इंदियं च**) अतीन्द्रिय व ऐन्द्रिय (**अत्थि**) आहे. (**तहा सोक्खं**) त्याचप्रमाणे सुखसुद्धा अमूर्त, मूर्त, अतीन्द्रिय व ऐन्द्रिय आहे. (**तेसु जं परं**) त्यापैकी जे श्रेष्ठ आहे (**तं णेयं**) त्याला उपादेयरूप जाणावे.

अमूर्त व अतीन्द्रिय ज्ञान आणि सुखच उत्कृष्ट आहे, म्हणून ते उपादेय आहे.

ज्ञान व सुखाचे प्रकार–

ज्ञान दोन प्रकारचे आहे.– १) मूर्त इन्द्रियज ज्ञान २) अमूर्त अतीन्द्रिय ज्ञान. सुखसुद्धा दोन प्रकारचे आहे. १) मूर्त इन्द्रियज सुख २) अमूर्त अतीन्द्रिय सुख. उपादानदृष्टीने जे मूर्त क्षायोपशमिक उपयोगशक्तीने उत्पन्न होते व निमित्तदृष्टीने मूर्त इन्द्रियांच्याद्वारे उत्पन्न होते ते ज्ञान व सौख्य मूर्त इन्द्रियज

म्हटले जाते. एकट्या चैतन्यरूप आत्मपरिणाम शक्तीने जे ज्ञान व सुख उत्पन्न होते ते ज्ञान व सुख अमूर्त अतीन्द्रिय म्हटले जाते.

मूर्त इन्द्रियज ज्ञान व सुखाची हेयता–

मूर्त इन्द्रियज्ञान व सुख हेय का आहे याची चार कारणे अमृतचन्द्र आचार्यांनी टीकेमध्ये दिली आहेत. १) पराधीन असल्यामुळे इन्द्रियज्ञान व सुख अनित्य आहे. २) क्रमप्रवृत्त आहे ३) प्रतिपक्ष सहित आहे व ४) हानिवृद्धिसहित आहे.

इन्द्रियज्ञान ज्ञानावरण व वीर्यान्तराय कर्माच्या क्षयोपशमरूप अन्तरंग निमित्ताच्या अधीन आहे. त्याचप्रमाणे इन्द्रिय, मन, प्रकाश, उपकरण, गुरु, पुस्तक, पंचेन्द्रिय विषय या बहिरंग साधनांच्या अधीन आहे. प्रथम तर ज्ञानावरण व वीर्यान्तराय कर्माचा क्षयोपशम नसेल तर ज्ञान उत्पन्न होत नाही. क्षयोपशम झाला, परंतु इन्द्रियामध्ये दोष असेल अर्थात् डोळ्यामध्ये मोतीबिंदू व काचबिंदू झाला, कानाला कमी ऐकू येऊ लागले तर ज्ञान उत्पन्न होत नाही. इन्द्रिय निर्दोष आहेत, परंतु जर प्रकाश नसेल तर दिसत नाही. प्रकाश पण आहे, परंतु सांगणारे कोणी गुरु नाहीत तरी ज्ञान होत नाही. अशाप्रकारे इन्द्रियज्ञानासाठी पराधीनतेची मालिकाच आहे. तसेच इन्द्रियसुखसुद्धा इन्द्रियज्ञान, साता वेदनीयाची उदयउदीरणा, बाह्य भोगसामग्री इत्यादींच्या अधीन आहे. इन्द्रियज्ञान झाले, परंतु जर साता वेदनीयाचा उदय नसेल तर इन्द्रियसुखाचे वेदन होऊ शकत नाही. इन्द्रियसुख विषयांच्या व अनेक साधनसामुग्रीच्या अधीन आहे. रसनेन्द्रियजनित सुखाचे वेदन करण्यासाठी इष्ट रसयुक्त पदार्थ मिळाला पाहिजे. एक एक पदार्थ प्राप्त करण्यासाठी किती सामुग्री लागते याचा आपण स्वयं विचार करावा. एक साधे चविष्ट लोणचे प्राप्त करण्यासाठी कैरी, तेल, तिखट, मीठ, मोहरी, मेथी, जिरे, साखर, कढई, गॅस, लायटर इ. किती सामुग्रीवर अवलंबून रहावे लागते. आपल्या ताटात वाढलेले १० पदार्थ आहेत. त्यासाठी किती सामुग्री लागते याची यादी तयार करा म्हणजे लक्षात येईल की एका इन्द्रियाच्या सुखाचा भोग घेण्यासाठी आपण किती पराधीन आहोत. कर्णेन्द्रियाच्या सुखासाठी निरनिराळे मधुर संगीत, निरनिराळ्या शब्दरचना, लाईट, टेपरेकॉर्ड, पैसे इत्यादी अनेक

सामुग्रींची पराधीनता आहे. चक्षुरिन्द्रियजनित सुखासाठी, निरनिराळे चित्र, निरनिराळे रंग, निरनिराळ्या आकारांचा संग्रह करतो व त्यासाठी अनेक साधनसामुग्रीच्या अधीन रहावे लागते. स्पर्शनेन्द्रियज सुखासाठी मऊ डनलपची गादी, फ्रीज, पंखा, कुलर, एअरकंडिशन इत्यादी सामुग्रीच्या अधीन राहतो. घ्राणेन्द्रियजनित सुख मिळविण्यासाठी सुगंधी तेल, अत्तर, सुगंधी साबण, चंदन, उदबत्ती इत्यादी साधनांना गोळा करतो आणि या सर्व इन्द्रियांच्या विषयसामुग्रीला मिळविण्यासाठी रात्रंदिवस पैसा मिळविण्याच्या पाठीमागे लागतो. तो पैसा मिळविण्याकरिता अनेकांच्या अधीन रहावे लागते. इन्द्रिय सुखासाठी बिचारा संसारी जीव मोठमोठे बंगले, गाडी, टीव्ही, फ्रीज, फर्निचर, दागदागिने इत्यादी सामुग्री जोडण्यासाठी अनेक परिश्रम करतो; परंतु परिश्रम पूर्ण करून वस्तू मिळविल्यावर त्या आम्ही भोगू शकू किंवा नाही याची कोणतीही गॅरंटी नाही. म्हणून हे सुख पराधीन आहे. आपण स्वतः जीवनामध्ये परीक्षण करू लागलो तर त्या इन्द्रियसुखाची व ज्ञानाची पराधीनता आपल्या लक्षात येईल.

इन्द्रियज्ञानसुखाची क्षणभंगुरता–

इन्द्रियज्ञान व सुख पराधीन असल्यामुळे अनित्य आहे. कारण हे ज्ञान व सुख ज्या पराच्या अवलंबनाने उत्पन्न झाले आहे ती परसामग्री कर्मोदयाने काही काळापुरती मिळालेली असते. कर्माचा उदय सतत बदलत असतो. त्यामुळे पराचा संयोगही शाश्वत राहत नाही. ज्ञानावरण कर्माच्या तीव्र क्षयोपशमाने एकेकाळी अत्यंत बुद्धिमान मनुष्य सुद्धा अत्यंत बुद्धिहीन उन्मत्त झालेला दिसून येतो. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे हे इन्द्रिय ज्ञान व सुख क्षणभंगुर आहे. इन्द्रियज्ञान व सुख उत्पन्न झाल्यावर जेवढा आनंद मिळतो त्याहीपेक्षा त्याचा वियोग झाल्यावर अतिशय दुःख होते. म्हणून इन्द्रियज्ञान व सुख त्याज्य आहे.

इन्द्रियज्ञान व सुखाची क्रमिकता–

इन्द्रियज्ञान व सुख पराधीन असल्यामुळे क्रमाने प्रवृत्त होते. या जीवाला तर सर्वाला एकाचवेळी जाणण्याची इच्छा असते व सर्वाला एकावेळी भोगून आनंद मिळविण्याची इच्छा असते. जेव्हा स्पर्शनेंद्रियाने

स्पर्शाला जाणतो तेव्हा रसनेंद्रियाने रस जाणू शकत नाही. जेव्हा रस जाणतो तेव्हा गंध जाणू शकत नाही. जेव्हा गंधाला जाणतो तेव्हा रूप पाहू शकत नाही. जीव तर सर्वाला एकावेळी ग्रहण करण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यासाठी आपला उपयोग पटापट बदलत राहतो; परंतु एकावेळी जाणू शकत नाही. म्हणून हे इन्द्रियज्ञान त्याज्य आहे. डनलपच्या गादीवर बसून, हातामध्ये स्वादिष्ट भोजनाचे ताट घेऊन, सुगंधी अत्तर लावून, टीव्हीसमोर चित्रपट पाहत गाणी ऐकतो. या जीवाला वाटते की मी एकावेळी पाच इन्द्रियांच्या विषयाचा भोग घेत आहे; परंतु ते शक्य होत नाही. क्षणाक्षणामध्ये उपयोग बदलत राहतो, त्यामुळे पुन्हा आकुलता वाटते. निवान्तपणे एका इन्द्रियाच्या विषयांना जाणू पण शकत नाही व भोगू पण शकत नाही. टीव्हीवर अनेक चॅनेल्सवर कार्यक्रम एकावेळी चालू असतात. सर्व चॅनेल्सवर कोणते कार्यक्रम चालू आहेत हे जाणून घेण्याची जिज्ञासा असते. त्यासाठी रिमोटचे बटण पटापट दाबत राहतो व एकही कार्यक्रम नीट पाहू शकत नाही. त्यामुळे आकुलित होऊन खेदखिन्न होतो. इन्द्रियज्ञानामध्ये सर्वाला एकावेळी ग्रहण करण्याचे सामर्थ्य नाही म्हणून ते हेय आहे. एकावेळी एका इन्द्रियाने जाणतो व त्या इन्द्रियाच्याही एकाच विषयाला ग्रहण करतो. त्यामुळे इच्छापूर्ती होत नाही. म्हणून ते हेय आहे.

इन्द्रियज्ञान व सुख प्रतिपक्षसहित–

इन्द्रियज्ञानाचा प्रतिपक्ष अज्ञान आहे. जेथे इन्द्रियज्ञान आहे तेथे अज्ञान आहेच. जेवढा ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम आहे व जेवढा उपयोग आहे तेवढेच ज्ञान आहे. शेष सर्व अज्ञान तेथे विद्यमान आहे. त्यामुळे या जीवाला जाणून घेण्याची आकुलता सतत राहते. इन्द्रियसुखाचा प्रतिपक्ष दुःख आहे. ज्यावेळी ज्या इन्द्रियाच्या द्वारे जेवढ्या विषयाचा मनोनुकूल भोग घेतो तेवढ्या अपेक्षेने फक्त इन्द्रियसुख आहे. शेष सर्व दुःखच आहे. सुखदुःखाला निमित्त साता व असाता वेदनीय कर्माचा उदय आहे. अंतर्मुहूर्त– अंतर्मुहूर्तामध्ये यांचा उदय बदलत असतो. त्यामुळे जीव एक क्षण इन्द्रियसुखाचे वेदन करतो की तुरंत दुसरी वेदना त्याला सतावते व तो दुःखी होतो.भूख लागली म्हणून त्याच्या शान्तिसाठी भोज्य पदार्थांचे सेवन करून

सुख मानू लागतो तोपर्यंत तहानेची पीडा होते. पाणी पिऊन तहान भागवून सुखाचा अनुभव करू लागतो तोच उष्णता सतावते. उष्णतेची बाधा दूर करतो तोपर्यंत दुसरीच कोणती तरी शारीरिक पीडा होऊ लागते. अशाप्रकारे इन्द्रियसुख हे दुःखाला बरोबर घेऊनच आले आहे. ज्याच्या डोक्यावर शत्रू सतत सवार आहे तो निराकुल निश्चिन्त कसा राहू शकतो?

मूर्त इन्द्रियज ज्ञान व सौख्य हानिवृद्धिसहित आहेत–

मूर्त इन्द्रियज ज्ञान ज्ञानावरण कर्माच्या क्षयोपशमाच्या अधीन असल्यामुळे अनवस्थित आहे. कधी क्षयोपशमाची वृद्धी झाली की ज्ञान वाढते व कधी क्षयोपशमाची हानी झाली की ते ज्ञान कमी होते. प्रत्यक्ष काही उदाहरणे पाहायला मिळतात की एखादा अत्यंत हुशार विद्यार्थी सुद्धा परीक्षेत नापास होतो व एखादा मंदबुद्धी विद्यार्थी सुद्धा परीक्षेत पास होतो. कधी कधी अत्यंत बुद्धिमान व्यक्तीसुद्धा मूर्ख होताना दिसते. तरूण अवस्थेत बुद्धीने तल्लख असणारा वृद्धावस्थेत अत्यंत बुद्धिहीन होतो. त्यामुळे हे ज्ञान विश्वसनीय नाही. म्हणून इन्द्रियज्ञानाचा अंहकार करणे वृथा आहे व इन्द्रियज्ञान कमी आहे, म्हणून स्वतःला हीन लेखणे हे ही चुकीचे आहे.

इन्द्रियज्ञान हे स्वतःला तपासण्याचे थर्मामीटर नाही. स्वतःला पाहण्याचे ते साधन नाही. इन्द्रियसौख्य हे सातावेदनीयाच्या उदयाधीन असल्यामुळे स्थिर नाही. कधी साता वेदनीयाचा तीव्र उदय झाल्यामुळे सुखामध्ये वाढ झाल्यासारखे वाटते तर कधी साता वेदनीयाचा मन्द उदय झाल्यामुळे सुखामध्ये हानी दिसून येते. ज्याप्रमाणे एखाद्या संतानहीन स्त्रीला प्रथम पुत्राची प्राप्ती झाली की अतिशय आनन्द होतो. थोडया वेळाने कळाले की तो मुलगा अंध आहे की सुखामध्ये हानी होते. गुलाबजामुन खाण्याची इच्छा झाली व गुलाबजामुन खायला मिळाले खूप आनंद झाला, परंतु ४–५ गुलाबजामुन खाल्यानंतर सुखाची मात्रा कमी होऊ लागते. एखादी नवीन वस्तू प्राप्त झाल्यावर जसे सुख होते तसे ते अखेरपर्यंत राहत नाही. अशाप्रकारे इन्द्रियसुख हानिवृद्धिसहित असल्यामुळे आकुलता उत्पन्न करणारे आहे. संसारामध्ये कोणी मनुष्य असा मिळणार नाही की त्याला एक दिवस लगातार सुख सुख मिळाले. कोणी मनुष्य असा सापडू शकत नाही की जो निष्पक्ष–

दृष्टीने असे म्हणेल की मी आज दिवसभर सुखी राहिलो. संसारी जीवांचे ज्ञान व सुख पराधीन, विनाशिक, कर्मोदयजनित, क्रमप्रवृत्त, प्रतिपक्षसहित, हानिवृद्धिसहित आहे. म्हणून इन्द्रियज्ञान व इन्द्रियसुख हेय आहे.

अमूर्त अतीन्द्रिय ज्ञान व सुखाची स्वाधीनवृत्ती–

अमूर्त अतीन्द्रिय ज्ञान व सुख स्वाधीन आहे, कारण त्यासाठी कोणत्याही अन्य सामुग्रीची आवश्यकता नाही. अतीन्द्रिय ज्ञान आत्म्याद्वारेच उत्पन्न होते. आत्मा तर सदैव उपलब्ध आहे. आपल्याजवळच आहे. जवळ काय आपण स्वयंच आत्मा आहोत. स्वतःद्वारे स्वतःचे ज्ञान उत्पन्न होते. तेथे अन्य साधनांची गरजच नाही. पूर्ण स्वाधीनता आहे. अतीन्द्रिय सुखसुद्धा स्वतःद्वारे स्वतःमध्ये स्वतःपासूनच उत्पन्न होते. त्यासाठी ही अन्य कारणांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. आत्मा स्वयं सदैव आहेच व त्याला अनुभवणारी, त्याकडे पाहणारी ज्ञानपर्यायसुद्धा आपल्याजवळच आहे मग आत्मिक सुख भोगायला कुणाची अडचण आहे ? कोणतीही बाधा नाहीच.

हे अतीन्द्रिय ज्ञान व सुख नित्य आहे. विनाशिक नाही. केवली भगवंतांना एकदा अतीन्द्रिय ज्ञान व सुख उत्पन्न झाले की त्याचा नाश करण्याचे सामर्थ्य कोणत्याही कर्मामध्ये नाही. किंवा कोणत्याही अन्य द्रव्यामध्ये नाही. ते सदा शाश्वत अविनाशी आहे. कारण त्या ज्ञान व सुखाचा आश्रयभूत आत्मा नित्य आहे. हे अतीन्द्रिय ज्ञान व सुख एकाचवेळी प्रवृत्त होते. अतीन्द्रिय केवलज्ञान क्रमाने पदार्थांना जाणत नाही. एकावेळी तीन लोक व तीन काळातील सर्व पदार्थांना त्यांच्या सर्वगुणपर्यायासहित जाणते व स्वतःला सुद्धा जाणते. त्यामुळे क्रमाने जाणण्यात जो छद्मस्थाला खेद होतो. त्याचा अभाव झाल्यामुळे केवलींना आकुलतारहित अनन्तसुख प्रकट आहे. केवली अनंत सुखाचा युगपत् अनुभव करतात. त्यांच्या अनन्त सुखाचे जर अनुमान करायचे झाले तर येथील इन्द्र, चक्रवर्ती, राजा, महाराजा इ. सर्व जीवांना जेवढे सुख आहे त्या सर्व सुखांची बेरीज करा आणि त्यांच्या तिन्ही काळातील सर्व सुखांची बेरीज करा, सर्व जोडल्यावर जेवढे सुख होते त्यापेक्षासुद्धा अनन्तपट सुख केवलींना एका समयात मिळते. वास्तविक संसारी जीवांच्या सुखाची जाती त्यांच्या अमूर्तिक सुखाशी समान नाही.

अमूर्तिक सुखाची जातीच भिन्न आहे.

अतीन्द्रिय ज्ञान व सुख प्रतिपक्षरहित आहे. केवलींना काहीही जाणणे शिल्लक राहिले नाही म्हणून तेथे किंचितदेखील अज्ञान नाही. पूर्ण ज्ञानावरण कर्माचा अभाव झाल्यामुळे त्याच्या उदयाने होणारा अज्ञानभाव नष्ट झाला आहे. पूर्ण मोहनीय कर्माचा अभाव झाल्यामुळे परिपूर्ण सुख व्यक्त झाले आहे. दुःखाचा लवलेश देखील नाही. केवलींचे ज्ञान व सुख उत्पन्न झाले, त्यात हानी पण होत नाही व वाढसुद्धा होत नाही. ते अनंतकाळापर्यंत स्थिर, अचल आहे.

आता विचार करा आपण कोणत्या ज्ञान व सुखाची इच्छा करतो. मला स्वाधीन, कायम टिकणारे ज्ञान व सुख मिळावे. सर्वांना युगपत जाणावे व सर्व सुख एकाचवेळी भोगायला मिळावे. कोणत्याही वस्तूसंबंधी अज्ञान राहू नये व दुःखाचा एक लवलेशसुद्धा प्राप्त होऊ नये. माझे ज्ञान कमी होऊ नये व सुखाची सुद्धा हानी होऊ नये असे प्रत्येक संसारी प्राण्याला वाटते. आचार्यांनी दोन्ही प्रकारचे ज्ञान व सुख आपल्यापुढे ठेवले आहे. तसेच त्यांची विशेषता व लक्षणे ही सांगितले आहे. आता आम्हाला इच्छित असणाऱ्या ज्ञान व सुखाची विशेषता लक्षात आली आहे. म्हणून आता कोणता माल निवडायचा ही आपली आवड आहे. आजपर्यंत इंद्रियज्ञान व सुखाचा माल वापरून पाहिला त्यामुळे आम्हाला पाहिजे तशी शांती मिळाली नाही, म्हणून आता अतीन्द्रिय ज्ञान व सुखाचा माल वापरून पाहूया व तो माल मिळविण्यासाठी जी किंमत लागते त्याचा संचय करूया.

अतीन्द्रिय ज्ञान व सुख मिळविण्यासाठी सहज ज्ञान व आनन्दस्वरूप निज आत्म्याची उपासना करावी लागेल. कारण निज ज्ञानानंद स्वरूप आत्म्याच्या आश्रयानेच अतीन्द्रिय ज्ञान व सुख प्राप्त होते. अतीन्द्रिय ज्ञान व आनंद प्राप्त करणे हीच जीवन स्वातन्त्र्याची कला आहे. ती कला हा प्रवचनसार ग्रंथ आपल्याला शिकवितो.

मागील गाथेपासून सुखाधिकार प्रारंभ झाला आहे. मागील गाथेत दोन प्रकारचे ज्ञान व सुख आहे हे सांगून त्यापैकी इन्द्रियज ज्ञान व सुख हेय आहे व अतीन्द्रिय ज्ञान व सुख उपादेय आहे ही गोष्ट सिद्ध केली आहे. अतीन्द्रिय

सुख स्वाधीन, निराकुल, अविनाशी व स्वाभाविक असल्यामुळे उत्तम आहे. असे सुख सर्वांना हवे आहे व त्यासाठी जीव प्रयत्नशीलसुद्धा आहे; परंतु त्याच्या प्राप्तीचा उपाय माहीत नसल्यामुळे जीव या सुखाला प्राप्त करण्यामध्ये अयशस्वी होतो. सुखाची प्राप्ती होण्यासाठी बाह्य भोग सामग्रींना गोळा करतो परंतु कितीही भोग सामग्री गोळा केली तरी त्याला निराकुल सुखाची प्राप्ती होत नाही; कारण भोगसामग्रीमध्ये सुख नाही. कोणी जीव सुखप्राप्तीसाठी धर्माच्या मार्गाकडे वळतो व देवपूजा, शास्त्रस्वाध्याय व्रतादिकांचे पालन करतो, परिग्रहाचा त्याग करून मुनिव्रत ही अंगीकारतो तरीदेखील ज्याअर्थी त्याला खऱ्या सुखाची प्राप्ती होताना दिसत नाही त्याअर्थी त्यामध्ये काहीतरी कमतरता नक्कीच आहे.

पूर्वोक्त साधने सुखप्राप्तीचे प्राथमिक उपाय आहेत. येथेच थांबून सुखाची प्राप्ती होणार नाही. ज्याप्रमाणे जगण्यासाठी पैसा मिळविणे आवश्यक आहे; परंतु केवळ पैसा मिळवून जीव जगू शकत नाही. पैसा मिळवून त्याद्वारे धान्य विकत आणून त्यापासून भाकरी, भाजी इ. पदार्थ बनवून त्याचे सेवन करतो तेव्हा तो जगतो. त्याप्रमाणे सुखासाठी प्रथम देवपूजा, स्वाध्याय, व्रतादिक करणे आवश्यक आहे. परंतु केवळ पूजादी करून सुख मिळू शकत नाही. पूजा, स्वाध्यादिकाच्या माध्यमातून वस्तू स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन त्याप्रमाणे आचरण केले असता सुख प्राप्त होते. अतीन्द्रिय स्वसंवेदन ज्ञानाद्वारे आत्म्याला जाणले असता अतीन्द्रिय आनन्दाचा अनुभव होतो. म्हणून सुखप्राप्तीसाठी स्वात्मानुभवाचा अभ्यास आवश्यक आहे. इन्द्रियज्ञान इन्द्रिय सुखाला कारण आहे व अतीन्द्रिय ज्ञान अतीन्द्रिय सुखाला कारण आहे. मलिन ज्ञानामध्ये मलिन सुख व निर्मल ज्ञानामध्ये निर्मल सुख आहे. सुख ज्ञानाच्या अनुरूप असते म्हणून सुखाचे साधन ज्ञान आहे म्हणून सुख पाहिजे असेल तर ज्ञानाचा सांभाळ करावा.

त्या अतीन्द्रिय सुखाच्या साधनभूत अतीन्द्रिय ज्ञानाची येथे स्तुती करतात. कोणत्याही वस्तूच्या उत्तम स्वरूपाचे वर्णन करणे हीच त्याची खरी स्तुती आहे.

जं पेच्छदो अमुत्तं मुत्तेसु अदिंदियं च पच्छण्णं ।
सयलं सगं च इदरं तं णाणं हवदि पच्चक्खं ।।५४।।

अन्वयार्थ – (**पेच्छदो**) पाहणाऱ्याचे (**जं**) जे ज्ञान (**अमुत्तं**) अमूर्ताला, (**मुत्तेसु**) मूर्तिक पदार्थांमध्ये सुद्धा (**अदिंदियं**) इन्द्रिय अगोचर परमाणू आदीला, (**च**) आणि (**पच्छण्णं**) गुप्त पदार्थाला (**सगं च इदरं**) अशाप्रकारे स्व व पररूप (**सयलं**) सर्वांना जाणते (**तं णाणं**) ते ज्ञान (**पच्चक्खं**) प्रत्यक्ष (**हवदि**) आहे.

अतीन्द्रिय ज्ञान अमूर्ताला, इन्द्रिय अगम्य मूर्ताला, द्रव्य, क्षेत्र, काल व भाव अपेक्षेने गुप्त असणाऱ्या सर्व स्व पर पदार्थांना जाणते.

अतीन्द्रिय ज्ञानाचे स्वरूप –

जे इन्द्रियांची अपेक्षा करीत नाही ते अतीन्द्रिय होय. अतीन्द्रिय ज्ञान सुद्धा दोन प्रकारचे आहे. एक नित्य कार्यरूप व दुसरे स्वानुभवरूप. अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान व केवलज्ञान ही तीन ज्ञाने इन्द्रियाशिवाय होतात म्हणून ती तिन्ही ज्ञाने अतीन्द्रिय आहेत. दुसरे स्वानुभवरूप अर्थात सहज शुद्ध अखंड आत्म्याचे ज्ञानसुद्धा अतीन्द्रिय आहे. हे ज्ञान मानसिकसुद्धा नाही. जे मतिज्ञान व श्रुतज्ञान इन्द्रिय व मनाच्या साहाय्याने उत्पन्न होते ते इन्द्रियज व मानसिक ज्ञान म्हटले आहे. छद्मस्थ अवस्थेमध्ये आत्म्याला जाणणारे ज्ञान मतिज्ञान व श्रुतज्ञानच आहे तर मग ते अतीन्द्रिय कसे? असा प्रश्न होतो. आत्मा अतीन्द्रिय आहे तो अमूर्तिक असल्यामुळे तो इन्द्रियांच्या द्वारे जाणला जाऊ शकत नाही. आत्मानुभवापूर्वी आत्म्याला जाणण्यासाठी मनाचे विकल्प निमित्त कारण आहेत, जेव्हा त्या विकल्पज्ञानानंतर निर्विकल्प अवस्था येते तेव्हा विकल्पज्ञान सुद्धा राहत नाही. म्हणून स्वात्मानुभवरूप मतिश्रुतज्ञान अतीन्द्रिय म्हटले आहे.

दुसरी गोष्ट अशी आहे की इन्द्रियज्ञानाने अतीन्द्रियज्ञान उत्पन्न होऊ शकत नाही. अतीन्द्रिय केवलज्ञानाच्या उत्पत्तीचे कारण कोणते ना कोणते अतीन्द्रियच असले पाहिजे. अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञान केवलज्ञानाच्या उत्पत्तीला कारण नाहीत; कारण ती केवळ रूपी पदार्थांनाच जाणतात. राहिले

मतिज्ञान व श्रुतज्ञान. ती सुद्धा इन्द्रियज असेल तर ती अतीन्द्रिय केवलज्ञानाच्या उत्पत्तीला कारण होऊ शकत नाहीत. इन्द्रियाशिवाय होणारे शुद्धस्वात्मानुभवरूप मतिज्ञान व श्रुतज्ञानच केवलज्ञानाच्या उत्पत्तीला कारण आहे. हीच गोष्ट समयसारच्या तात्पर्यवृत्तीमध्ये जयसेनाचार्यांनी स्पष्ट केली आहे.

केन ज्ञानेन मोक्षो भवतीति विचार्यते– केवलज्ञानं तावत्फल–भूतमग्रे भविष्यति अवधिमनःपर्ययज्ञानद्वयं च मूर्तविषयत्वादेव मूर्तः मोक्षकारणं न भवति ततः सामर्थ्यादेव बहिर्विषयमतिज्ञानश्रुतज्ञानविकल्परहितत्वेन स्वशुद्धात्माभिमुखपरिच्छित्तिलक्षणं निश्चयनिर्विकल्पभावरूपमानस–मतिज्ञान–श्रुतज्ञानसंज्ञं पंचेन्द्रियाविषयत्वेनातीन्द्रियशुद्धपरिणामिक–भावविषये तु या भावना तद्रूपं निर्विकारस्वसंवेदनशब्दवाच्यं संसारिणां क्षायिकज्ञानाभावात् क्षायोपशमिकमपि विशिष्टभेदज्ञानं मुक्तिकारणं भवति।

कोणत्या ज्ञानाने मोक्ष होतो याचा विचार करतात– केवलज्ञान हे फलभूत असल्यामुळे ते पुढे उत्पन्न होणार आहे. म्हणून ते कारण नाही. अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञान मूर्त पदार्थाला विषय करीत असल्यामुळे मूर्त आहेत. ती दोन्ही ज्ञाने मोक्षाची कारण नाहीत. म्हणून सामर्थ्याने ही गोष्ट सिद्ध होते की बाह्य विषयभूत मतिज्ञान व श्रुतज्ञानाच्या विकल्पाने रहित असल्यामुळे स्व शुद्धात्म्याच्या सन्मुख होऊन जाणणेरूप निश्चय निर्विकल्प भावमतिज्ञान श्रुतज्ञान की जे पाच इन्द्रियांचा विषय नसल्यामुळे अतीन्द्रिय आहे असे निर्विकार स्वसंवेदन रूप क्षायोपशामिक विशिष्ट भेदज्ञान मुक्तीचे कारण आहे. ते निर्विकार स्वसंवेदन ज्ञान शुद्ध पारिणामिक निर्विकार भावासंबंधी भावनारूप आहे अर्थात शुद्ध पारिणामिक भावस्वरूप निज आत्म्याचे संवेदन करणे हेच मुक्तीचे कारण आहे.

या गाथेत अतीन्द्रिय केवलज्ञानाची स्तुती करीत आहेत.

अतीन्द्रिय केवलज्ञानाचे सामर्थ्य–

अतीन्द्रिय ज्ञान अमूर्तिक पदार्थाला जाणते. धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, कालद्रव्य व सच्चिदानंदस्वरूप आत्मद्रव्य हे पाच पदार्थ

अमूर्तिक आहेत. या सर्वांना अतीन्द्रिय ज्ञान प्रत्यक्ष जाणते. मूर्तिक पदार्थांमध्ये सुद्धा जे इन्द्रियांचे विषय होऊ शकत नाहीत अशा द्व्यणुकादि सूक्ष्म स्कंधांना व परमाणू द्रव्याला सुद्धा अतीन्द्रिय ज्ञान प्रत्यक्ष जाणते. अतीन्द्रिय ज्ञान प्रच्छन्न पदार्थांना सुद्धा जाणते. प्रच्छन्न म्हणजे झाकलेले, गुप्त.

द्रव्य, क्षेत्र, काल व भाव अपेक्षेने प्रच्छन्न पदार्थ चार प्रकारचे आहेत. द्रव्य म्हणजे पदार्थ, क्षेत्र अर्थात प्रदेश, काल अर्थात भूत व भविष्यकालीन पर्याय व भाव म्हणजे वर्तमान पर्याय. द्रव्यांमध्ये कालद्रव्य अर्थात एकप्रदेशी कालाणू अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे द्रव्यप्रच्छन्न आहे. क्षेत्रापेक्षेने अलोकाकाशाचे प्रदेश प्रच्छन्न आहेत. भूतकालीन व भविष्यकालीन पर्याय कालापेक्षेने प्रच्छन्न आहेत. स्थूल पर्यायामध्ये अन्तर्लीन असणारे सूक्ष्म पर्याय भाव अपेक्षेने प्रच्छन्न आहेत. ज्याप्रमाणे एखाद्या मुलाची एक महिन्यामध्ये एक इंच वाढ झाली. तो एका क्षणात एक इंच वाढला नाही. तो प्रत्येक समया-समयात वाढत आहे ते छद्मस्थाच्या ज्ञानाचा विषय होत नाही. एका समयात किती वाढला याचे वर्णन होऊ शकत नाही. एका महिन्यानंतर एक इंच वाढणे आम्हाला दिसले म्हणून त्याचे वर्णन होऊ शकले. अशा प्रकारे प्रत्येक स्थूल पर्यायामध्ये समया-समयात होणारे सूक्ष्म पर्याय अन्तर्भूत आहेत. ते भावाने प्रच्छन्न आहेत. केवलज्ञानाला कोणतीही गोष्ट अगम्य नाही. हे सर्व केवलींच्या केवलज्ञानामध्ये हस्तरेखेप्रमाणे स्पष्ट प्रत्यक्ष आहेत.

सर्व पदार्थ स्व व पर विभागामध्ये अवस्थित आहेत. स्व म्हणजे आपला आत्मा व पर म्हणजे आत्मा सोडून शेष पदार्थ. केवली स्वतःच्या आत्म्याला, आपल्या असंख्यात अमूर्तिक प्रदेशांना, आपल्या भूत व भविष्यकालीन पर्यायांना, आपल्या वर्तमान अर्थपर्यायांना जाणतात तसेच सर्व परद्रव्यांना, त्यांच्या प्रदेशांना, त्यांच्या भूत व भविष्यकालीन पर्यायांना व त्यांच्या वर्तमान सूक्ष्म अर्थपर्यायांना जाणतात.

अतीन्द्रियज्ञान सकलप्रत्यक्ष-

अनन्त शुद्धीचा सद्भाव जेथे प्रकट झाला आहे अशा चैतन्य सामान्याशी ज्याचा अनादि संबंध आहे अशा अक्षनामक एक आत्म्याच्या प्रति नियत आहे म्हणून अतीन्द्रिय ज्ञान प्रत्यक्ष आहे. अतीन्द्रिय ज्ञानाला एक

चैतन्यस्वरूप आत्मा सोडून दुसऱ्या कोणत्याही साधनांना शोधण्याची आवश्यकता नाही. आत्म्याच्या आश्रयानेच हे अतीन्द्रियज्ञान उत्पन्न होते. त्याला इन्द्रिय, प्रकाश इत्यादिकांची गरज नाहीच असे हे ज्ञान पूर्णतः स्वाधीन आहे. सकलप्रत्यक्ष ज्ञानामध्ये अनन्त ज्ञेयपदार्थ जाणले जातात अशा अनन्तशक्तीचा सद्भाव असल्यामुळे हे ज्ञान अनन्त आहे. अनन्त पदार्थांना जाणण्याचे यामध्ये सहज सामर्थ्य आहे. ज्याप्रमाणे अग्नी दाह्याकारांचे (जळण्यायोग्य पदार्थांचे) उल्लंघन करत नाही अर्थात जेवढे जळण्यायोग्य पदार्थ असतील त्या सर्वांना अग्नी जाळते त्याप्रमाणे ज्ञान ज्ञेयाकारांचे उल्लघंन करीत नाही अर्थात ज्ञान सर्व ज्ञेयपदार्थांना जाणतेच. असे प्रभावशाली सामर्थ्यशाली प्रत्यक्ष ज्ञान कोणाकडून रोकले जाऊ शकते? त्याचा प्रसार अनिवारित आहे. आपल्या ज्ञानामध्ये अडथळा येऊ नये, आपल्याला जाणण्यासाठी दुसऱ्या कोणाचा आधार घ्यावा लागू नये असे सर्व जीवांना वाटत असते. परंतु इन्द्रियज्ञान असे असूच शकत नाही., त्यामध्ये बाधा आहे व त्यासाठी अनेक साधनांची गरज लागते म्हणून इंद्रियज्ञानाचे अवलंबन सोडून अतीन्द्रिय ज्ञानाची मैत्री करावी. निर्विकार स्वसंवेदनरूप अतीन्द्रिय ज्ञानाने पुन्हपुन्हा आपल्या आत्म्याला जाणण्याचा अभ्यास केला असता त्याच्या फलस्वरूप अतीन्द्रिय केवलज्ञानाची उत्पत्ती होते.

ज्ञानामध्ये विभुतेचे साम्राज्य–

वास्तविक एक ज्ञानरूप अभेद परिणतीच मोक्षमार्ग आहे. म्हणून ज्ञानच दर्शन आहे, ज्ञानच ज्ञान आहे, ज्ञानच चारित्र आहे. ज्ञानाचे श्रद्धान स्वभावरूपाने राहणे तेच सम्यग्दर्शन आहे, ज्ञानाचे ज्ञानस्वभावाने होणे तेच सम्यग्ज्ञान आहे. ज्ञानाचे रागादी भावांच्या त्यागस्वभावाने होणे तेच सम्यकचारित्र आहे. पुष्कळ काळापर्यंत ज्ञानमय होऊन राहणे तेच चारित्र आहे.

प्रश्न– जर ज्ञानामध्ये अनन्त गुण वास करीत असतील तर ते एक द्रव्य होईल. कारण गुण द्रव्याच्या आधाराने राहतात?

समाधान –येथे ज्ञानामध्ये अनन्त गुणांना मिसळले ते आधाररूपाने नाही तर अनन्त गुण ज्ञानाचे सहयोगी होऊन राहतात. सर्व गुणांमध्ये राजा एक ज्ञानगुण

आहे. जणू काय या ज्ञानाच्या रक्षणासाठीच सर्व गुण आहेत. हे ज्ञान किती व्यापक आहे पहा! ज्ञान अस्तित्वरूप आहे. जर अस्तित्व नसेल तर ज्ञानच राहणार नाही. ज्ञानाचे नित्य परिणमन आहे म्हणून ज्ञान द्रव्यत्वगुणरूप आहे, ज्ञान ज्ञानच राहते, अन्य गुणरूप, अन्य द्रव्यरूप किंवा अध्रुवपर्यायरूप होत नाही म्हणून ज्ञान अगुरुलघुरूप आहे. ज्ञान सूक्ष्म आहे, ज्ञान अमूर्तिक आहे, ज्ञान स्थिर आहे, ज्ञान प्रमेयत्वरूप आहे. याप्रमाणे जेवढे गुण आहेत ते ज्ञानामध्ये अभिन्नरूपाने राहतात. तरीसुद्धाएक गुण दुसऱ्या गुणाचा आधार नाही. सहयोगीरूप आहे. सहयोगी रूपाने ते सर्व गुण पृथक् आहेत. त्या सर्व गुणांचा अभेद पिण्ड एक आत्मद्रव्य आहे व ते आत्मद्रव्य ज्ञानमय आहे. जर त्यातून एक ज्ञान गुण काढला तर कोणताही गुण टिकू शकत नाही. असा अनन्त गुणमय ज्ञानविभु आत्मा अनुभवगोचर आहे, वचनाचा विषय नाही. जर तो एक निर्विकल्प अखंड ज्ञानस्वभाव अनुभवात आला तर तो सत्य भासित होतो. त्या अनुभवामध्ये विकल्प केले किंवा जर वचनाने सांगितले तर तो सत्य वाटत नाही.

ज्याप्रमाणे एखाद्याने खडी साखर खाल्ली व त्याची गोडी चाखली आता त्याचा स्वाद समजावून सांगा म्हटले तर त्याचा स्वाद समजावणे शक्य नाही. खूप गोड आहे असे सांगितले तरी ऐकणाऱ्याला त्या खडीसाखरेच्या गोडीच्या सत्यतेचा अनुभव होत नाही आणि ज्यांनी स्वयं साखर खाल्ली तो त्याच्या रसाचा अनुभव करतो; परन्तु समजावू शकत नाही त्याप्रमाणे ज्ञानमय आत्म्याचा अनुभव स्वयं केला तर त्याचा आनन्द स्वयं अनुभवायला मिळतो. ज्ञानाचा अनुभव वचनाने सांगितला तर त्याची सत्यता पटू शकत नाही.

सुख व ज्ञानाची अविनाभाविता –

अतीन्द्रिय सुख त्यालाच होते की ज्याला अतीन्द्रिय ज्ञान आहे. ज्ञानाला सोडून सुख राहू शकत नाही. सुखाला सोडून ज्ञान होऊ शकत नाही. सुख आणि ज्ञान अभिन्न मित्राप्रमाणे आहेत. एकमेकाला सोडून राहत नाहीत. ज्ञान मोठा भाऊ आहे तर सुख लहान भाऊ आहे. लहान मोठ्याचे अनुकरण करतो. जर ज्ञान अतीन्द्रिय होते तेव्हा सुखसुद्धा अतीन्द्रियच होते. जेव्हा ज्ञान इन्द्रियज होते तेव्हा सुखसुद्धा इन्द्रियजच असते. म्हणून अतीन्द्रिय सुखाचे

साधन अतीन्द्रिय ज्ञान आहे. अतीन्द्रिय ज्ञानाची उपासना केल्याशिवाय अतीन्द्रिय सुख प्राप्त होऊ शकत नाही. जसे ज्ञान तसे सुख. ज्ञानामध्ये जर अनेक संकल्प विकल्प असतील तर तेव्हा नियमाने आकुलता उत्पन्न होऊन जीव दुःखी होतो, जर ज्ञानामध्ये रागादि विकल्प कमी असतील तर आकुलता कमी होऊन जीव आंशिक सुखाचा अनुभव करतो. जर ज्ञानामध्ये रागादिविकल्प नसतील व निर्विकल्प स्वसंवेदन ज्ञान असेल तर जीव निराकुल आत्मिक सुखाचा अनुभव करतो. अनन्त अतीन्द्रिय सुखाला कारण अतीन्द्रिय केवलज्ञान आहे; कारण ते स्वाधीन ज्ञान असताना कोणत्याही अन्य पदार्थाला जाणण्याची चिंता राहत नाही. न तेथे कोणालाही ग्रहण व त्याग करण्याचा विकल्प आहे. जेथे चिंता व विकल्प आहे तेथे निराकुलता नसते. जेथे निश्चिंत व निर्विकल्प अवस्था असते तेथे कोणत्याही प्रकारची आकुलता होत नाही. अतीन्द्रिय आनन्द भोगण्यासाठी या निराकुलतेची आवश्यकता आहे. अतीन्द्रिय ज्ञानीलाच निराकुल आनन्द प्राप्त होऊ शकतो. **निराकुल आनन्द भोगणे हीच खरी जीवन स्वातन्त्र्यता आहे. त्याच्या प्राप्तीसाठी शुद्धोपयोगरूप निर्विकल्प स्वसंवेदन ज्ञानाचा वारंवार अभ्यास करणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे.** ज्ञानस्वभावाच्या विकासाकरिता आपला वर्तमान उपयोग अखण्ड एक प्रतिभासमय अन्तस्तत्त्वामध्ये उपयुक्त करावा. आपल्याला सुख पाहिजे तर ज्ञानाचे संरक्षण करावे. जो ज्ञानाचे संरक्षण न करता बाह्य पदार्थांना सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतो त्याला सुखाऐवजी दुःखच प्राप्त होते. कारण सुखाचे साधन बाह्य द्रव्य नाही; परन्तु निजज्ञानच आहे.

अतीन्द्रिय सुखाचे साधन अतीन्द्रिय ज्ञान आहे. त्या अतीन्द्रिय ज्ञानाची स्तुती मागील गाथेत केली. आता इन्द्रिय सुखाचे साधन इन्द्रिय ज्ञान आहे ते हेय आहे म्हणून त्या इन्द्रिय ज्ञानाची निन्दा या गाथेत करीत आहेत. वास्तविक आचार्य स्तुती किंवा निन्दा करीत नाहीत ते तर यथार्थ स्वरूपाचे वर्णन करतात. परन्तु अतीन्द्रिय ज्ञानाचे स्वरूपच इतके उत्कृष्ट आहे की त्याच्या स्वरूपाचे जरी वर्णन केले तर ती त्याची स्तुतीच भासित होते आणि इन्द्रिय ज्ञान इतके निकृष्ट आहे की त्याच्या स्वरूपाचे वर्णन केले तर ते वर्णन

निन्दारूपच भासित होते. ज्याप्रमाणे सज्जन पुरुषाचे वर्णन केले तर ती त्या पुरुषाची स्तुती वाटते व दुर्जन पुरुषाचे वर्णन केले तर ती पुरुषाची निन्दा वाटते. कारण त्यांचे मूळ स्वरूपच तसे आहे. सज्जन पुरुषामध्ये अनेक गुण वास करतात व दुर्जन पुरुषामध्ये अनेक दुर्गुण वास करतात. त्याप्रमाणे अतीन्द्रिय ज्ञान गुणांनी विभूषित आहे व इन्द्रिय ज्ञान अनेक दोषांनी दूषित आहे. अनादि काळापासून हा जीव इन्द्रिय ज्ञानाचीच उपासना करीत आहे व इन्द्रिय ज्ञानाशीच याची मैत्री आहे ती मैत्री तोडण्यासाठी त्या इन्द्रियज्ञानाचे हेयस्वरूप येथे प्रगट करतात.

जीवो सयं अमुत्तो मुत्तिगदो तेण मुत्तिणा मुत्तं ।
ओगेण्हित्ता जोग्गं जाणदि वा तण्ण जाणादि ।।५५।।

अन्वयार्थ–(**सयं अमुत्तो**) स्वयं अमूर्तिक (**जीवो**) जीव (**मुत्तिगदो**) मूर्त शरीराला प्राप्त होऊन (**तेण मुत्तिणा**) त्या मूर्त शरीराद्वारे (**जोग्गं मुत्तं**) योग्य मूर्त पदार्थाला (**ओगेण्हित्ता**) अवग्रह करून (**तत् जाणदि**) त्याला जाणतो (**वा**) अथवा (**ण जाणादि**) जाणत नाही.

तात्पर्य हे आहे हा अमूर्त जीव मूर्त इन्द्रियांद्वारे मूर्त पदार्थाचे अवग्रह ज्ञान करून पुढे काही जाणू शकतो किंवा काही जाणू शकत नाही. असे हे इन्द्रियज ज्ञान अत्यंत कमकुवत आहे.

इन्द्रियज्ञानाची पराधीन प्रवृत्ती–

इन्द्रियज्ञान मूर्ताद्वारे जाणते व मूर्तालाच जाणते. इन्द्रियज्ञान मूर्त इन्द्रियांद्वारेच होऊ शकते. इन्द्रियांशिवाय अमूर्त आत्मशक्तीने होत नाही. इन्द्रियज्ञान मूर्त पदार्थालाच जाणू शकते, अमूर्त पदार्थाला जाणू शकत नाही.

वास्तविक जीव स्वभावाने अमूर्तिक असताना सुद्धा त्याने पाच इन्द्रियांशी मैत्री केली त्यामुळे पाच इन्द्रियांच्या विषयामध्ये इष्ट व अनिष्ट बुद्धी करून राग द्वेषाला प्राप्त झाला आहे. त्यामुळे पंचेन्द्रिय जाती नामकर्माचा बंध केला व स्वयं पंचेन्द्रियात्मक मूर्त शरीराला प्राप्त झाला अर्थात या पंचेन्द्रियात्मक शरीररूपी तुरूंगामध्ये अडकला. आता त्याला स्वैरपणे जाणण्यामध्ये अडथळा निर्माण झाला. त्याला आता इंद्रियरूपी खिडक्यांचे अवलंबन घेणे भाग पडले. त्यामुळे इंद्रियाला गर्व उत्पन्न झाला आहे की तू

काही जाणू शकलास तर आमच्याच हूकुमाने किंवा आमच्याच सहयोगाने जाणू शकतोस. इंद्रिय असे बलाधान निमित्त झाले आहे की त्यांच्या शिवाय हा जीव काही जाणू शकत नाही. इन्द्रिये फक्त स्पर्शरसगंधवर्णमय मूर्तिक पुद्गलद्रव्यालाच जाणण्यामध्ये सहयोग देतात. मूर्त पदार्थांमध्येसुद्धा योग्य मूर्तालाच ग्रहण करण्यामध्ये निमित्त आहेत. योग्य म्हणजे इन्द्रियांच्या विषयक्षेत्रामध्ये असणाऱ्या पदार्थालाच इन्द्रियज्ञान ग्रहण करते, विषय क्षेत्राच्या बाहेर असणाऱ्या पदार्थाला ग्रहण करू शकत नाही. स्थूल मूर्तालाच ग्रहण करू शकते, सूक्ष्म मूर्त पदार्थांना ग्रहण करू शकत नाही.

इन्द्रियज्ञानाची हीनशक्ती–

इन्द्रियज्ञान कोणत्याही मूर्त वस्तूला प्रथम अवग्रह ज्ञानाद्वारे जाणते. जर त्या जीवाला क्षयोपशम विशेष झाला व त्याचा उपयोग तेथे लागला तर पुढे विशेष जाणते अर्थात अवग्रहानंतर विशेष जाणण्याची इच्छा रूप ईहाज्ञान उत्पन्न होते. अजून त्या जीवाची विशुद्धी झाली तर पुढे निर्णयरूप अवायज्ञानसुद्धा उत्पन्न होते. विशेष शुद्धिपूर्वक क्षयोपशम वाढला तर धारणाज्ञान उत्पन्न होते. जर विशेष शुद्धी झाली नाही तर कदाचित् केवळ अवग्रह होऊनच ते ज्ञान नष्ट होते. अथवा अवग्रह व ईहा होऊन ते ज्ञान नष्ट होते. आपल्याला या गोष्टीचा नित्य अनुभव होतो. काही वेळा डोळ्याने आपण काही वस्तू पाहतो; परंतु त्याचा पुढे विचार करत नाही. काही वेळा ती वस्तू पाहून त्या वस्तूला विशेष जाणण्याची इच्छा करतो. परंतु निर्णय करीत नाही. इन्द्रियज्ञानाला विशेष जाणून घेण्यासाठी क्षयोपशमाच्या अधीन रहावे लागते व क्षयोपशमासाठी जीवाच्या परिणामाची विशुद्धीसुद्धा कारण आहे. विशेष क्षयोपशम असेल तर इन्द्रियज्ञान पुढे पुढे जाणू शकते. क्षयोपशम नसेल तर पुढे पुढे जाणू शकत नाही.

आपल्याला पराधीन करणारे इन्द्रियज्ञान आपला मित्र नाही, तो तर आपला शत्रू आहे. जो आपल्या स्वभावाचा घात करणारा आहे तो मित्र कसा? इन्द्रियज्ञान आपल्याला फसविणारे आहे, विशुद्ध स्वभाववाल्या चैतन्यस्वभावाचा हा मोठा कलंक आहे, आपल्या उन्नतीमध्ये मोठा दगड आहे.

परोक्ष इन्द्रियज्ञानामध्ये व्यग्रता –

यद्यपि ह्या आत्म्यामध्ये अनादि काळापासून शुद्ध चैतन्य सामान्याचा संबंध आहे अर्थात आत्मा स्वयं चैतन्य शक्तिस्वरूप आहे; परंतु इंद्रिय जाळ्यामध्ये फसल्यामुळे स्वयं स्वतःहून स्वाधीनतेने पदार्थांना जाणण्यासाठी असमर्थ झाला आहे. ज्याप्रमाणे डोळ्याने सर्व दिसते परंतु डोळ्यावर पट्टी बांधली असेल तर स्वयं पाहण्यामध्ये असमर्थ होतो त्याप्रमाणे अनादि काळापासून चैतन्याने युक्त आहे. परंतु त्याच्यावर अज्ञानरूपी पट्टी बांधली आहे त्यामुळे स्वयं जाणण्यास असमर्थ झाला आहे. म्हणून जाणण्यासाठी याला प्राप्त व अप्राप्त परनिमित्तक सामग्री शोधावी लागते. त्याच्या शोधामध्ये हा आत्मा अत्यंत व्यग्र होतो. जीवाबरोबर एक क्षेत्रावगाह रूप शरीर, इन्द्रिये ही सर्व प्राप्त सामग्री होय व या जीवाहून भिन्न प्रदेशामध्ये स्थित प्रकाश, गुरू, पुस्तक ही अप्राप्त सामग्री होय. इन्द्रियज्ञान जाणण्याकरिता प्रकाश आदी बाह्य पदार्थांना शोधण्याच्या व्यग्रतेमुळे क्षुब्ध होते. आकुल व्याकुल होते.

ज्याप्रमाणे एखाद्याच्या घरी शिलाई मशीन होते तेव्हा तो आपले कपडे सहजपणे शिवू शकत होता. शिलाई मशीनचा मालक कर्जबाजारी झाल्यामुळे कर्जदाराने त्याचे शिलाई मशीन जप्त करून घेतले. आता त्याला कपडे शिवण्यासाठी दुसऱ्यांच्या घरी जावे लागते. त्यांना विनंती करून किंवा भाडे देऊन कपडे शिवावे लागतात. त्यामुळे तो पराधीन होऊन व्यग्र होतो व खेदखिन्न होतो. त्याप्रमाणे या आत्म्याच्या घरात जाणण्यासाठी ज्ञानरूपी यंत्र होते. परंतु या जीवाने कर्माचे कर्ज काढले त्यामुळे कर्मरूपी कर्जदाराने याचे ज्ञानयंत्र जप्त केले. आता हा स्वाधीनपणे जाणण्यासाठी समर्थ होत नाही. त्यामुळे त्याला इन्द्रिये, प्रकाश इत्यादींच्या घरी जाऊन त्यांच्या साहाय्याने जाणावे लागते. त्यामुळे पराधीन होऊन व्यग्र होतो व खेदखिन्न होतो. ह्या संसारी जीवाने स्वंय अनंतज्ञानाचा मालक असताना स्वतःच्या अपराधाने स्वयं स्वतःची अशी दुर्दशा करून घेतली आहे. आज आपण शिक्षण क्षेत्रात पाहतो की प्रत्येक विद्यार्थी ज्ञान मिळविण्यासाठी किती व्यग्र झाला आहे. एक डॉक्टरी विद्या किंवा इंजिनिअरिंगची विद्या ज्याला मिळवायची आहे तर त्याला सामग्रीची जुळवाजुळव करण्यामध्ये किती कुस्ती खेळावी लागते.

प्रथम बारावी सायन्स परीक्षेमध्ये मेरीटमध्ये येण्यासाठी दिवसरात्र एक करून अभ्यासाचे कष्ट घ्यावे लागतात. नंतर इंटरशिपची परीक्षा, त्यासाठी पुन्हा अभ्यासाची पराकाष्ठा, त्यानंतर पुढे प्रवेश मिळवण्यासाठी धडपड, डोनेशनची जुळवाजळव, दूर देशामध्ये स्वजनांपासून दूर राहण्याचे कष्ट इत्यादी सर्व व्यग्रताच दृष्टिपथात येते. त्याचप्रमाणे कोणतेही इन्द्रियज्ञान प्राप्त होण्यामध्ये अनेक साधनसामग्रींवर विसंबून राहावे लागते म्हणून इन्द्रियज्ञान पराधीन आहे.

इन्द्रियज्ञानामध्ये चंचलता–

इन्द्रियज्ञानी इन्द्रियाला व्यवस्थित ठेवण्याच्या व्यग्रतेमुळे चंचल आहे. इन्द्रियज्ञानी आपले ज्ञान वाढविण्यासाठी इन्द्रियांना सुरक्षित ठेवणे व त्यांची शक्ती वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतो, त्यामुळे अस्थिर असतो. आम्हाला वाटते जर उद्या डोळ्यांना दिसायचे बंद झाले तर आपण कसे काय पाहू शकणार? त्यामुळे डोळ्यांची सतत काळजी घेतो. दररोज डोळे पाण्याने धुणे, डोळ्यांचे व्यायाम करणे इत्यादी. एवढी काळजी घेऊनसुद्धा डोळ्यात मोतिबिंदू, काचबिंदू होतोच. पुन्हा त्या मोतिबिंदूचे ऑपरेशन करतो. ऑपरेशन केल्यावर ही त्याला अत्यंत जपावे लागते. याप्रमाणे इन्द्रियांना टिकविण्यासाठी व त्याची शक्ती वाढविण्यासाठी सतत आकुलित राहतो. एवढी काळजी घेऊनही इन्द्रिये शेवटी आमच्या अधीन नाहीत, कर्माच्या अधीन आहेत. हा जीव त्यांना आपल्या अधीन समजतो व त्यांची अवस्था इच्छानुकूल झाली नाही की खेदखिन्न होतो. आपल्यामध्ये अनंतज्ञानशक्ती आहे हे जाणत नाही व इन्द्रियांच्या शक्तीलाच आपली शक्ती समजून इन्द्रियांच्या पाठीमागे लागतो. इन्द्रिये नष्ट झाली तरी माझी ज्ञानशक्ती नष्ट होत नाही यासंबंधी या जीवाला अज्ञान आहे. त्यामुळे स्वतःची अशी दुर्दशा करून घेतली आहे. कानाने जर ऐकू येण्याचे बंद झाले तर मी काय करणार? माझे अस्तित्वच राहणार नाही म्हणून सतत कर्णेन्द्रियांचा सांभाळ करण्यामध्ये चंचल व अस्थिर राहतो.

मोहमल्लाचे आक्रमण –

इन्द्रियज्ञानाची ही दुर्दशा मोहमल्लाच्या वश झाल्यामुळे आहे.

इन्द्रियज्ञानावर मोहमल्ल आक्रमण करतो. ज्यावेळी हा जीव इन्द्रियांद्वारे जाणतो तेव्हा मोह येऊन ठपकतो व या इन्द्रिय विषयाला आपल्या इच्छेनुसार बदलविण्याचा अट्टाहास करतो. ज्याप्रमाणे चक्षु इन्द्रियाने आरशामध्ये आपल्या शरीराचे रूप पाहिले की हा जीव मोहित होतो व त्या शरीराच्या रूपाला आपल्या इच्छेनुसार बदलविण्याचा प्रयत्न करतो. शरीराचा रंग काळा असेल तर तो अनेक हिंसक पदार्थांचा लेप करून गोरा करण्याचा प्रयत्न करतो व अन्य अनेक बदल करण्याचा प्रयत्न करतो. किंवा डोळ्याने स्त्री इत्यादीचे रूप पाहिले की त्या परपदार्थावर मोहीत होऊन त्या परपदार्थाला आपलेसे करण्याचा अभिप्राय ठेवतो. ही सर्व मोहमल्लाची करतूत आहे. कानाने शब्द ऐकला की त्यामध्ये चांगले, वाईट अशी बुद्धी करून त्यामध्ये बदल घडविण्याची पराकाष्ठा करतो. जीभेने पदार्थाचा स्वाद घेतला की त्यापैकी आपले आवडते पदार्थ असतील त्यावर राग करतो व आवडते पदार्थ नसतील तर द्वेष करतो. इन्द्रियज्ञान एकटे असते तर ठीक होते; परंतु याबरोबर मोहरूपी रोग लागलेलाच आहे. यामुळे इन्द्रियज्ञान अधिक खराब झाले आहे. ज्याप्रमाणे एका मुलाला मारणारे चौघेजण असतील तर त्याची किती दुर्दशा होते. एक जण त्याला खाली पाडतो, दुसरा त्याला बुक्की मारतो, तिसरा त्याला ओढतो, चौथा त्याला थप्पड मारतो त्याप्रमाणे ज्ञानाची सुद्धा दुर्दशा झाली आहे. कर्माने त्याला खाली पाडले, इन्द्रिये त्याला ओढत आहेत, मोह त्याला मारत आहे.

अनादिकाळापासून अज्ञानामुळे हा जीव स्वयं पदार्थाला जाणत नाही. एवढे असते तरी ठीक होते; परंतु यापुढे तो पदार्थाला जाणण्यासाठी पराधीन सामग्रीला शोधण्यामध्ये व्यग्र होतो. त्या व्यग्रतेमुळे याच्या ज्ञानाची अनंत शक्ती नष्ट होते. ही आणखीन वाईट गोष्ट आहे. बरे एवढेच असते तर ठीक होते, परंतु याच्याबरोबर मोहमल्ल लागला आहे ही आणखीन दुःखद घटना आहे. त्या मोहमल्लामुळे पराला बदलण्याचा अभिप्राय उत्पन्न झाला. त्यामुळे इन्द्रियज्ञानाला जास्त वाईटपण आले आहे. ज्याप्रमाणे नावेमध्ये एखादा दुष्ट व्यक्ती असेल तर पूर्ण नाव बुडते, त्याप्रमाणे एका मोहदुष्टामुळे इन्द्रियज्ञानाला थप्पड बसत आहे. दुसऱ्याचे मी असे करतो, तसे करतो या

मिथ्या अभिप्रायामुळे स्वतःच वेळोवेळी फसवले जाऊ लागले आहे. ज्याप्रमाणे डोळ्याने पाहिले व पाहिल्यावर जो प्रेमभाव उत्पन्न होतोा त्यामुळे वाईट होते. डोळ्याने पाहण्यामध्ये वाईटपणा नाही. दुर्भाव उत्पन्न झाला तो डोळ्याचा दोष नाही. तो रागभावाचा दोष आहे. हा राग इतका चालाक व बदमाश आहे की घरात आग हा लावतो आणि बदनाम इन्द्रियांना करतो. राग सर्व चालाकी करत आहे आणि इन्द्रियज्ञानाला शिव्या बसत आहेत. हा राग इन्द्रियज्ञानाबरोबर असल्यामुळे आकुलतेची परंपरा नष्ट होणार नाही म्हणून इन्द्रियज्ञान हेय आहे. आकुलता व दुःख उत्पन्न करणारे आहे.

आचार्य म्हणतात की, ज्या ज्ञानामध्ये एवढे दोष आहेत व स्वतः फसविले जाऊ लागले आहे ते ज्ञान वास्तविक ज्ञान नाही. ते ज्ञान जाणतच नाही. ते ज्ञान म्हणून घेण्याच्या लायकीचे नाही. इन्द्रियज्ञान खरे अज्ञानच आहे. म्हणून जे इन्द्रिय ज्ञान आहे ते हेय आहे अर्थात सोडण्यायोग्य आहे.

इन्द्रियज्ञानाला फेकून आता अतीन्द्रिय ज्ञान व अतीन्द्रियसुख मिळविण्याच्या पाठीमागे लागले पाहिजे. हाच धर्म आहे. त्या अतीन्द्रिय ज्ञानाच्या प्राप्तीसाठी अनादि-अनन्त, ध्रुव शुद्ध ज्ञानसामान्याचे ध्यान करावे. जो जीव आपल्या चैतन्य सामान्याच्या अनुभवामध्ये उपयोग लावतो तो सहजच इन्द्रियज्ञानाचा त्याग करतो. अतीन्द्रिय ज्ञानस्वरूपी अरिहंत व सिद्धांस आपल्या ज्ञानपरिणतीमध्ये स्थापित करावे. अरिहंत व सिद्धांचे दर्शन, अरिहंत किंवा सिद्धांमध्ये होत नाही. वास्तविक आपल्या ज्ञानामध्ये अरिहंत व सिद्धांचे दर्शन होते. अन्य पदार्थावरून उपयोग हटवून परमात्म्यामध्ये उपयोग लावत होता. परंतु तेथे भगवान मिळाले नाहीत.जेव्हा भगवंतांना आपल्या ज्ञानपरिणतीमध्ये घेतो त्यावेळी वीतराग स्वरूपाचा अनुभव होतो. तेव्हा तेथे भगवान प्राप्त होतात. अतीन्द्रिय स्वसंवेदन ज्ञानाने निज भगवान आत्म्याचे दर्शन झाले असता पर्यायामध्ये अतीन्द्रिय केवलज्ञान प्रगट होते.

यापूर्वीच्या गाथेमध्ये इंद्रियसुखाचे साधनभूत इन्द्रियज्ञानाची तुच्छता दाखवून त्याला सोडण्यायोग्य सांगितले. इन्द्रियज्ञान मूर्तिकाद्वारे मूर्तिकालाच जाणते. अवग्रहपूर्वक योग्य वस्तूलाच जाणते तसेच त्यामध्ये अनंतशक्तीचा अभाव असल्यामुळे ते खेदखिन्न होते व मोहमल्ल जीवंत असल्यामुळे परपदार्थाला परिणमित करण्याची इच्छा करते. पंरतु पराला परिणमित करू न

शकल्यामुळे स्वतःच स्वतःची फसवणूक करून घेत आहे म्हणून ते दुःखाला कारण असल्यामुळे तुच्छ आहे. हेय आहे. इन्द्रियज्ञानाची एवढी हीनता दाखवूनसुद्धा अजून आचार्यांचे पोट भरले नाही. ज्याप्रमाणे एखादा पुरुष आपल्या विरोधी शत्रूपक्षाचे दोष दाखवून त्यासंबंधी तुच्छता भासित करविण्याचा प्रयत्न करतो. जोपर्यंत समोरच्या ऐकणाऱ्या व्यक्तीला आपल्या शत्रूबद्दल पूर्ण द्वेष निर्माण होत नाही तोपर्यंत एकेक दोष उकलून सांगतच राहतो. त्याप्रमाणे आचार्य शिष्यांच्या मनात इन्द्रिय ज्ञानाबद्दल पूर्ण अनास्था निर्माण होत नाही तोपर्यंत इंद्रियज्ञानाचे दोष सांगून त्याची तुच्छता भासवितात. आता या गाथेमध्ये असा निश्चय करवितात की इंद्रियांची आपल्या सीमित विषयांमध्ये सुद्धा एकावेळी प्रवृत्ती होऊ शकत नाही म्हणून इन्द्रियज्ञान हेय आहे. –

फासो रसो य गंधो वण्णो सद्दो य पुग्गला होंति ।
अक्खाणं ते अक्खा जुगवं ते णेव गेण्हंति ।।५६।।

अन्वयार्थ – (**अक्खाणं**) इंद्रियांचे (**फासो**) स्पर्श (**रसो**) रस (**गंधो**) गंध (**वण्णो**) वर्ण (**य**) आणि (**सद्दो**) शब्द हे विषय (**पुग्गला**) पुद्गलमय (**होंति**) आहेत. (**ते अक्खा**) ती इंद्रिये (**जुगवे**) एकावेळी (**ते**) त्या विषयांना (**णेव गेण्हंति**) ग्रहण करीत नाहीत.

इंद्रियज्ञान आपल्या विषयांना सुद्धा एकावेळी जाणू शकत नसल्यामुळे सुखाचे कारण नाही म्हणून हेय आहे.

इंद्रियांचे विषय –

इंद्रिये पाच आहेत व त्यांचे विषयसुद्धा पाच आहेत. प्रथम स्पर्शनेन्द्रिय संपूर्ण शरीरामध्ये व्याप्त आहे. संपूर्ण शरीरच स्पर्शनेन्द्रिय आहे, नाक, जीभ, कान व डोळेसुद्धा स्पर्शनेन्द्रिय आहेत. याच स्पर्शनेन्द्रियामध्ये काही भाग असा आहे की जो घ्राणेंद्रिय, रसनेन्द्रिय, चक्षुरिन्द्रिय व कर्णेन्द्रिय म्हटला जातो. घ्राण, रसना, चक्षु व कर्ण ही इंद्रिये इंद्रियाने दिसतच नाहीत, जे दिसते ते सर्व स्पर्शनेन्द्रिय आहे. स्पर्शनेन्द्रियाला सोडून इतर इंद्रियांची अवगाहना अत्यंत छोटी आहे. ती इंद्रियगोचर नाही. स्पर्शन इन्द्रियाच्या द्वारे ग्रहणयोग्य स्पर्शप्रधान पुद्गल आहे. रसनेन्द्रियाने रसप्रधान पुद्गलाचे ग्रहण होते.

घ्राणेंद्रियाने गंधप्रधान पुद्‌गलाचे ग्रहण होते. चक्षुइन्द्रियाने वर्णप्रधान पुद्‌गलाचे ग्रहण होते. कर्णेन्द्रियाने शब्दरूप पुद्‌गलाचे ग्रहण होते.

टीकेमध्ये स्पर्श, रस, गंध व वर्णाला एकत्र ग्रहण केले आहे व शब्दाचे स्वतन्त्र ग्रहण केले आहे. याचे कारण स्पर्श, रस, गंध व वर्ण हे पुद्‌गलाचे गुण आहेत. हे चार गुण प्रत्येक परमाणूमध्ये असतातच; परंतु शब्द हा पुद्‌गलाचा गुण नाही तो पुद्‌गलाचा स्कंधरूप द्रव्यपर्याय आहे. पुद्‌गलाच्या २३ वर्गणांपैकी भाषा नावाच्या वर्गणेपासून शब्द पर्याय उत्पन्न होतो. तो शब्दपर्याय कर्णेन्द्रियाचा विषय आहे. त्या शब्दरूप पर्यायामध्ये ही स्पर्श, रस, गंध व वर्ण हे गुण आहेत; परंतु शब्द सूक्ष्म असल्यामुळे त्यातील स्पर्श, रस, गंध वर्ण इतर इंद्रियांनी ग्रहणयोग्य नाहीत.

स्पर्शाचे आठ प्रकार आहेत. शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष, कडक, मऊ, हलका भारी. रसाचे पाच प्रकार आहेत गोड, कडू, आंबट, तिखट व तुरट. गंधाचे दोन प्रकार आहेत सुगंध व दुर्गंध. वर्णाचे पाच प्रकार आहेत– पांढरा, काळा, लाल, पिवळा व निळा. शब्दाचे सात प्रकार आहेत.

इंद्रियज्ञानामध्ये युगपद्‌ग्रहणाचे असामर्थ्य –

इंद्रियज्ञान आपल्या सर्व विषयांनासुद्धा एकावेळी ग्रहण करू शकत नाही. कारण त्यामध्ये या जातीचा क्षयोपशम नाही. ज्याप्रमाणे एखादा व्यक्ती जेथे आपल्या घरातसुद्धा शांतीने मित्रतेने राहू शकत नाही तेथे तो दुसऱ्यांशी कसा मित्रतेने राहू शकणार, त्याप्रमाणे इंद्रिये आपल्या विषयांमध्ये सुद्धा एकावेळी प्रवृत्ती करू शकत नाहीत तेथे दुसऱ्या विषयांना जाणण्याचा तर प्रश्नच नाही. पाच इंद्रियांच्या विषयांना एकावेळी जाणण्याची ताकद इंद्रियज्ञानामध्ये नाही. कारण इंद्रियज्ञानाची शक्ती अत्यंत अल्प आहे. पाचही इंद्रिये एका शरीरात असूनसुद्धा हे क्षायोपशमिक इंद्रियज्ञान एकावेळी एका इंद्रियाच्याद्वारेच जाणण्याचे काम करू शकते. जेव्हा स्पर्शनेन्द्रियाने स्पर्शाला जाणते तेव्हा रसाला ग्रहण करण्याचे काम करू शकत नाही. जेव्हा रसनेन्द्रियाने चव घेते तेव्हा स्पर्शाला ग्रहण करू शकत नाही. उपयोगाची चंचलता व बदल इतका शीघ्र होतो की आम्हाला कळतच नाही की यांचे काम क्रमाक्रमाने होत आहे. काहीवेळा आम्हाला असा भ्रम होतो की आमची

अनेक इंद्रिये एकावेळी काम करीत आहेत. उदाहरणार्थ आम्ही टी.व्ही समोर अत्तर लावून पंख्याच्या हवेमध्ये बसून जेवण करीत आहोत तेव्हा असे वाटते की मी डोळ्याने समोरचे चित्र पाहत आहे, त्याचवेळी मी कानाने गाणे किंवा संभाषण ऐकत आहे, त्याचवेळी जेवणाचा पण स्वाद घेत आहे व पंख्याच्या थंड हवेचे सेवन पण करीत आहे व त्याचवेळी नाकाने अत्तराचा सुवास पण घेत आहे. परंतु हे सर्व एकावेळी होऊ शकत नाही. जेव्हा पाहण्याकडे लक्ष असते तेव्हा ऐकण्याकडे लक्ष नसते. जेव्हा ऐकण्याकडे लक्ष असते तेव्हा खाण्याकडे नसते. जेव्हा खाण्याकडे लक्ष असते तेव्हा ऐकण्याकडे नसते परंतु उपयोग इतका लवकर लवकर बदलतो त्यामुळे आम्हाला असा भ्रम होतो की मी सर्व कामे एकदमच करीत आहे.

ज्याप्रमाणे कावळ्याला गोलक (बुबुळ) दोन असतात; पण बाहुली एकच असते. तो ती बाहुली इतक्या लवकर लवकर फिरवतो की पाहणाऱ्याला वाटते कावळ्याला दोन डोळे आहेत; परंतु तसे नाही. कावळ्याला एकच डोळा असतो म्हणून त्याला एकाक्षी म्हटले आहे. तो डाव्या बाजूनी पाहतो तेव्हा बाहुली डावीकडे फिरते व उजव्या बाजूनी पाहतो तेव्हा बाहुली उजव्या बाजूला फिरते. म्हणून कावळ्याची नजर कधी स्थिर दिसत नाही, सारखा इकडून तिकडून टकटक पाहत असतो. त्याप्रमाणे इंद्रियज्ञान क्रमाने होते; परंतु लवकर लवकर झाल्यामुळे असे वाटते की सर्व ज्ञान एकावेळी होत आहे. ज्याप्रमाणे पंख्याला तीन पाते असतात पंखा जोरात फिरवला तर त्यामध्ये तीन पाते आहेत हे लक्षात सुद्धा येत नाही. ती तीनही पाते क्रमानेच फिरत आहेत; परंतु शीघ्रतेमुळे भेद लक्षात येत नाही. ज्याप्रमाणे शंभर खाऊच्या पानांमध्ये एक मोठी सुई घुसवली तर सर्व पानांना छेद एकाचवेळी झाल्यासारखे वाटते; परंतु सुई एका पानाला छेद करून नंतर दुसऱ्या पानामध्ये घुसते, दुसऱ्या पानानंतर तिसऱ्या अशाप्रकारे एकेका पानामध्ये छेद व्हायला असंख्यात समय लागतात. शंभर पानामध्ये छेद व्हायला शंभर अंतर्मुहूर्त लागले.

त्याप्रमाणे एकेका इन्द्रियांना आपल्या विषयाला ग्रहण करायला एक-एक अंतर्मुहूर्त तरी लागतो. म्हणून इंद्रिये आपल्या विषयांना क्रमानेच ग्रहण

करतात. सर्व इंद्रियांचे दरवाजे एकावेळी विद्यमान आहेत; परंतु उपयोगरूपी बाहुली त्या सर्व दरवाज्यातून क्रमाक्रमानेच फिरते. उपयोग एक आहे व त्याला मदत करणारे पाच इन्द्रिये व मन असे सहा सहायक आहेत. उपयोग या सहा सहायकांच्या बरोबर एकावेळी काम करू शकत नाही. एकावेळी एकाची मदत घेऊन एकच काम करू शकतो, कारण त्याच्यामध्ये असेच सामर्थ्य आहे.

कोणी तेलामध्ये तळलेली कडक पुरी खात आहे तेथे पाचही विषयांचे एकदम ग्रहण झाल्यासारखे वाटते; कारण पुरी खात आहे तर त्याचा स्वाद घेत आहे, तेलाचा सुगंध वास येत आहे, त्याचा कडक स्पर्शसुद्धा होत आहे. खाताना कुरकुर् आवाज होतो तो ऐकू पण येत आहे व डोळ्याने त्याचा पांढरा-लाल रंग दिसत आहे. परंतु तेथेसुद्धा पाच प्रकारच्या इंद्रियांचे ज्ञान क्रमानेच होत आहे. एकावेळी एकाच विषयाला ग्रहण करण्यामध्ये उपयोग असतो.

केवलज्ञान प्रशंसनीय ग्राह्य, इन्द्रियज्ञान निन्दनीय अग्राह्य –

हा सुखाधिकार असल्यामुळे सुखाचे वर्णन चालू आहे. सर्व प्रकाराने उपादेय, अनन्त सुखाचे उपादान कारण केवलज्ञान आहे तेच एका समयात सर्व वस्तूंना जाणत असल्यामुळे जीवाच्या सुखाचे कारण आहे. इन्द्रियज्ञान आपल्या विषयांना सुद्धा एका समयात जाणू शकत नसल्यामुळे सुखाचे कारण नाही. इंद्रियज्ञान समोरच्याच व काही स्थूल विषयांनाच जाणू शकते. सूक्ष्मविषयाला जाणू शकत नाही व दूरवर्ती पदार्थांना सुद्धा जाणू शकत नाही. ह्या इंद्रियांचा विषय अत्यंत अल्प आहे, केवलज्ञानाचा विषय एकावेळी सम्पूर्ण ज्ञेय पदार्थांना भिन्न भिन्न प्रकाराने जाणणे हा आहे. या इंद्रियाद्वारे जाणलेला विषय जास्त काळ धारणेमध्ये राहत नाही; विसरून जातो; परंतु केवलज्ञान सदाकाळ सर्व ज्ञेयांना जाणत राहते. इंद्रियांद्वारे प्राप्त ज्ञान अपूर्ण, क्रमवर्ती व विस्मरणरूप असल्यामुळे न जाणलेल्या वस्तूंना जाणण्याच्या आकुलतेचे कारण आहे, ज्याला कमी ज्ञान होते तो अधिक जाणण्याची इच्छा करतो. अधिक ज्ञान जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत तो जीव चिंताकुल व दुःखी होतो. परन्तु केवलज्ञान संपूर्ण व अक्रमाने जाणत असल्यामुळे पूर्ण निराकुल

आहे. इन्द्रियजनित ज्ञानामध्ये मोहाचा उदय असल्यामुळे काही वस्तूंशी राग व काहींशी द्वेष उत्पन्न होतो. अतीन्द्रिय केवलज्ञान सर्वथा निर्मोह असल्यामुळे तेथे कोणत्याही वस्तूशी रागद्वेष होत नाही. केवलज्ञानी समताभावामध्ये भिजलेला असतो. इन्द्रियजनित ज्ञानाबरोबर रागद्वेष असल्यामुळे कर्माचा बंध होतो व केवलज्ञानामध्ये वीतरागता असल्यामुळे बंध होत नाही. अशाप्रकारे इन्द्रियजनित ज्ञानाला दुर्बल, तुच्छ व पराधीन जाणून सोडावे व केवलज्ञानाला ग्रहण करण्यायोग्य मानून ते प्रगट करण्यासाठी आत्मानुभवरूप आत्मज्ञानाची सदा भावना करावी.

इन्द्रियज्ञान आपल्या संकुचित विषयांमध्येसुद्धा एकावेळी प्रवृत्त होत नसल्यामुळे हेय आहे हे पूर्वीच्या गाथेत सिद्ध केले. आता या गाथेमध्ये इन्द्रियज्ञान प्रत्यक्ष नाही हे निश्चित करतात.–

परदव्वं ते अक्खा णेव सहावो त्ति अप्पणो भणिदा ।
उवलद्धं तेहि कधं पच्चक्खं अप्पणो होदि ।।५७।।

अन्वयार्थ – (**ते अक्खा**) ती इन्द्रिये (**परदव्वं**) परद्रव्य आहेत. (**अप्पणो सहावोत्ति**) ती आत्म्याचा स्वभावरूप आहेत असे (**णेव भणिदा**) सांगितलेले नाही (**तेहि**) त्यांच्या द्वारे (**अप्पणो उवलद्धं**) आत्म्याला उपलब्ध झालेले ज्ञान (**पच्चक्खं**) प्रत्यक्ष (**कधं होदि**) कसे असू शकते?

परापेक्ष ज्ञानामध्ये प्रत्यक्षता असंभव –

पुढच्याच गाथेमध्ये प्रत्यक्ष व परोक्ष ज्ञानाचे लक्षण सांगणार आहेत. जे केवळ आत्म्याच्या प्रति नियत आहे ते ज्ञान प्रत्यक्ष व जे ज्ञान पराद्वारे होते ते परोक्ष होय. इन्द्रिये परद्रव्य आहेत, आत्मतत्त्व नाहीत. आत्म्याचा स्वभाव नाहीत. प्रथम आपल्याला इन्द्रियासंबंधी परत्वबुद्धी उत्पन्न झाली पाहिजे. कारण आत्म्याच्या अस्तित्वाहून यांचे अस्तित्व भिन्न आहे. इन्द्रिये दोन प्रकारची आहेत. द्रव्येन्द्रिय व भावेन्द्रिय. पुद्गलवर्गणेपासून इन्द्रियांची व मनाची रचना या शरीरामध्ये होते ती द्रव्येन्द्रिये होत. अर्थात ही द्रव्येन्द्रिये (नाक, कान, डोळा, जीभ) शरीराचीच अवयवे आहेत. म्हणून शरीरापासून अभिन्न आहेत म्हणून द्रव्येन्द्रिय साक्षात् पौद्गलिक आहेत. ज्ञानावरण कर्माच्या क्षयोपशमाने उत्पन्न होतात ती लब्धि व उपयोगरूप भावेन्द्रिये होत.

यांनासुद्धा शुद्धनिश्चयनयाने पौद्गलिक म्हटले आहे. कारण ज्ञानावरण कर्माच्या क्षयोपशमाने उत्पन्न होत असल्यामुळे ती भावेन्द्रिये आत्म्याचा शुद्ध स्वभाव नाहीत. परन्तु अशुद्ध विभावरूप आहेत. अमृतचन्द्र आचार्य तर टीकेमध्ये म्हणतात,' ही इन्द्रिये आत्म्याच्या स्वभावाला थोडाही स्पर्श करीत नाहीत. अशा या पराधीन इन्द्रियांच्याद्वारे उत्पन्न होणारे ज्ञान प्रत्यक्ष कसे असू शकेल? म्हणून इन्द्रिय व मनाद्वारे होणाऱ्या ज्ञानाला परोक्ष म्हटले आहे.' ज्याप्रमाणे व्यवहारात जे काम दुसऱ्याच्या मदतीने केले जाते ते पराधीन समजले जाते व जे काम आपण स्वतः करतो ते स्वाधीन म्हटले जाते व मोठ्या फुशारकीने सांगतो की हे काम कोणाच्याही मदतीशिवाय मी प्रत्यक्ष केले आहे. दुसऱ्याच्या मदतीने जे काम करतो तेथे लाचारी येते व ते काम केले असता फुशारकीने सांगू शकत नाही की, हे कार्य मी प्रत्यक्ष केले. त्याप्रमाणे जे ज्ञान परस्वरूप इन्द्रिये व मनाच्या मदतीने केले जाते ते ज्ञान आत्म्याचे प्रत्यक्ष म्हटले जाऊ शकत नाही. इंद्रियजनित ज्ञान आत्म्याचे स्वाभाविक ज्ञान नाही. जे जे पदार्थ इन्द्रिय व मनाद्वारे जाणले जातात ते सर्व परोक्ष आहेत.

परोक्षामध्ये सहज आनन्दाचा अभाव –

परोक्षज्ञानामध्ये स्पष्टता निर्मलता नसते त्यामुळे तेथे आकुलता होते. जे ज्ञान पराच्या साहाय्याने होते तेथे पराधीनतेमुळे दुःखाचा अनुभव होतो. ज्याप्रमाणे डोळ्याला कमी दिसू लागले की चष्मा लावावा लागतो. तेथे पाहण्यामध्ये चष्म्याचा अडथळाच वाटू लागतो. पूर्वी चष्मा नसताना प्रत्यक्ष डोळ्याने पाहताना जो आनंद होत होता तो आता चष्मा लावून होत नाही. त्याप्रमाणे इन्द्रियाशिवाय आत्मिक ज्ञानाद्वारे जाणण्यामध्ये जो सहज आनन्द आहे तो इन्द्रियाने जाणणाऱ्या ज्ञानामध्ये नाही. ज्या ज्ञानाबरोबर सहज आनन्द नाही, उलट क्षोभ आहे ते ज्ञान हेय आहे. चष्मा लावणाऱ्याला अंतरंग श्रद्धान हे असते की माझा चष्मा गेला तर बरे होईल. चष्मा सुटावा. नाविलाज म्हणून तो चष्मा लावतो. त्याप्रमाणे ज्ञानीला इन्द्रियासंबंधी हेयबुद्धी असते. इन्द्रियज्ञानाचा अभाव होऊन मला अतीन्द्रिय प्रत्यक्ष ज्ञानाची प्राप्ती व्हावी. अतीन्द्रिय ज्ञानाची शक्ति सर्व जीवांमध्ये विद्यमान आहे, सर्व जीव आपल्या शुद्ध स्वभावाला घेऊन आहेत, परंतु रागद्वेष मोहामुळे जी विषय कषायांची

रूची आहे त्यामुळे आमचे ज्ञान मूर्च्छित झाले आहे.

आत्मसुधाराची संधी –

या प्रकरणावरून हे लक्षात घ्यावे की ज्या ज्ञानाला वास्तविक समजून आम्ही त्या पाठीमागे धावत चाललो आहोत, अनेक कल्पनांमध्ये, विचारांमध्ये आम्ही गर्क झालो आहोत. आता थोडे थांबून विचार करावा. ही आमच्या हिताची गोष्ट नाही. या इन्द्रिय ज्ञानामध्ये कितीही विकास केला तर त्यामुळे आमचे कल्याण होणार नाही. वस्तूस्वरूपाचे यथार्थ ज्ञान करून स्वाभाविक अतीन्द्रिय ज्ञान प्राप्त करण्यामध्येच आमचे हित आहे. आता या संज्ञी पंचेन्द्रिय पर्यायामध्ये हित व अहिताचा विवेक करण्याची बुद्धी प्राप्त झाली आहे. त्याचा सदुपयोग करून ही पर्याय सार्थक करावी. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला राजा बनविले व त्याला सांगितले की सहा महिन्यानंतर तुझे हे राज्य हिसकावून घेतले जाईल व तुला वनामध्ये सोडले जाईल. तेथे तू सडून मरशील. त्या सहा महिन्याच्या काळात त्या राजाला आपल्या त्या राज्याबद्दल कशी श्रद्धा असेल ? मला सहा महिन्यानंतर गादीवरून उतरविले जाणार व वनात जावे लागणार, तेथे सडून मरावे लागणार या चिंतेने तो राज्यसुख भोगू शकणार नाही व त्याचे पुढचे जीवनसुद्धा अंधःकारमय होईल. म्हणून त्या मनुष्याला वर्तमान जीवन व भावी जीवन सुधारण्यासाठी ६ महिन्यात वनामध्ये सुधार करून तेथे राजमहल, सुखसुविधा निर्माण करावी लागेल जेणे करून त्याला आताही चिंता होणार नाही व पुढेही शांतीने जगता येईल. त्याचप्रमाणे ज्या जीवाला ही श्रद्धा झाली आहे की ही पर्याय संपणार आहे. त्याला वर्तमान इन्द्रियसुखामध्ये काय रूची राहील? व यानंतर माझी काय परिस्थिती होईल याचा विचार करावा. हे स्थान सोडून जेथे जाणार आहोत त्याला आताच सुधारले तर या लोकामध्ये व परलोकामध्ये सुखाने जगता येईल. जर आम्ही आमची वर्तमान परिणती सुधारली तर पुढे सडून मरण्याची पाळी आपल्यावर येणार नाही. सर्व परद्रव्यावरून दृष्टि हटवून निज आत्मस्वभावावर दृष्टी स्थिर ठेवावी. अतीन्द्रिय सुखाचे साधन अतीन्द्रिय ज्ञान आहे. हे निरावरण सकल प्रत्यक्ष अतीन्द्रिय ज्ञान केवळ वाट पाहून येणार नाही, परन्तु इन्द्रिय ज्ञानाची उपेक्षा करून आपल्या सहज ज्ञानस्वभावामध्ये

मग्न झाल्यावर हाच सहज ज्ञानस्वभाव स्वयं पूर्ण विकसित होऊन केवलज्ञानरूप परिणमेल.

परोक्ष व प्रत्यक्ष ज्ञानाचा पुन्हपुन्हा उल्लेख आल्यामुळे परोक्ष व प्रत्यक्ष शब्दांचा यथार्थ अर्थ प्रतिभासित होण्यासाठी परोक्ष व प्रत्यक्षाचे लक्षण या गाथेमध्ये सांगतात. –

जं परदो विण्णाणं तं तु परोक्खत्ति भणिदमत्थेसु।
जदि केवलेण णादं हवदि हि जीवेण पच्चक्खं।।५८।।

अन्वयार्थ – (**अत्थेसु**) ज्ञेय पदार्थांमध्ये (**परदो**) पराच्या निमित्ताने (**जं विण्णाणं**) जे ज्ञान होते (**तं तु परोक्खत्ति**) त्या ज्ञानाला परोक्ष असे (**भणिदं**) म्हटले आहे. (**जदि**) जर (**केवलेण जीवेण**) केवळ जीवाद्वारे (**णादं हवदि**) जाणले जाते ते (**हि पच्चक्खं**) वास्तविक प्रत्यक्षज्ञान आहे.

इन्द्रियादिक पराच्या निमित्ताने उत्पन्न झालेले ज्ञान परोक्ष आहे व पराच्या साहाय्याशिवाय केवळ आत्म्यापासून उत्पन्न झालेले ज्ञान प्रत्यक्ष आहे.

परोक्षज्ञान –

अक्ष म्हणजे आत्मा, पराच्या निमित्ताने आत्म्याला जे ज्ञान उत्पन्न होते ते परोक्ष होय. किंवा पर+उक्ष् धातूपासून परोक्ष शब्द बनला आहे. पर म्हणजे इन्द्रियादिकांच्या द्वारे जे उक्ष् म्हणजे वृद्धीला प्राप्त होते ते परोक्ष ज्ञान होय. तात्पर्य हे आहे की ज्या ज्ञानामध्ये पर निमित्त आहे. ते परोक्ष ज्ञान होय. परोक्षज्ञान होण्यामध्ये उपादान कारण पदार्थोपलब्धीच्या संस्काराने युक्त आत्मा आहे. परोक्षज्ञान अत्यंत पराधीन आहे. त्याला अनेक साधनसामग्रीवर अवलंबून रहावे लागते. प्रथम निमित कारण त्या त्या विषयासंबधी ज्ञानावरणाचा क्षयोपशम व वीर्यान्तराय कर्माचा क्षयोपशम आहे. ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम झाल्याशिवाय क्षायोपशमिक ज्ञान प्रकट होऊ शकत नाही. क्षयोपशम झाला तरी बाह्य निमित्त इन्द्रिय व मन असल्याशिवाय परोक्षज्ञान जाणू शकत नाही. इंद्रिये असूनसुद्धा जर ती अस्वस्थ, निद्रित व मूर्छित नसतील तरच ज्ञान प्रवृत्त होऊ शकते. पुन्हा ह्या परोक्षज्ञानाला पुष्कळ कारणांची गरज लागते. जसे प्रकाश, परोपदेश, चष्मा इत्यादी. जर जीवाचा

उपयोग एका वस्तूमध्ये लीन असेल तर त्यावेळी दुसऱ्या इंद्रियाने काम करू शकत नाही. ज्याप्रमाणे कोणी मनुष्य कोणत्या तरी वस्तूला पाहण्यामध्ये उपयुक्त असेल तर कानाने ऐकण्याचे काम करू शकत नाही. जेव्हा उपयोग चक्षुइंद्रियापासून हटवून कर्णेन्द्रियाकडे लावतो तेव्हाच ऐकण्याचे काम करू शकतो.

याचप्रमाणे शास्त्रज्ञान सुद्धा पराधीन आहे. कारण त्यासाठी श्रुतज्ञानावरणीय कर्माचा क्षयोपशम आणि शास्त्र, प्रकाश, अध्यापक, स्थान आदी बहिरंग कारणे पाहिजेत. म्हणून मन, इन्द्रिय, परोपदेश, उपलब्धि, संस्कार, प्रकाश इत्यादी दुसऱ्या कारणांनी उत्पन्न होणारे ज्ञान परोक्ष आहे.

प्रत्यक्षज्ञान –

मन, इंद्रिय, उपदेश, संस्कार, प्रकाश आदि कारणांची अपेक्षा न करता केवळ आत्मस्वभावाला कारणरूपाने ग्रहण करून जाणणारे ज्ञान प्रत्यक्ष ज्ञान आहे. यद्यपि अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञान साक्षात् इंद्रिय व मनाने होत नाहीत तरीसुद्धा ही ज्ञाने सुद्धा स्वाभाविक नाहीत. यामध्ये सुद्धा काही पराधीनता आहे. ज्यावेळी ज्या जीवाला जेवढ्या अवधिज्ञानावरणीय व मनःपर्यय ज्ञानावरणीय कर्माचा क्षयोपशम होतो त्यावेळी त्या जीवाला तेवढेच ज्ञान होते. संपूर्णरूपाने स्वाधीन, स्वाभाविक एक केवलज्ञानच आहे. हेच सकल प्रत्यक्ष ज्ञान सहज आनंदाचे साधन आहे म्हणून हेच ज्ञान उपादेय आहे. या ज्ञानाच्या प्राप्तीचे कारण स्वसंवेदन प्रत्यक्ष मतिज्ञान व श्रुतज्ञान आहे. या स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानालाच शुद्धोपयोग, निर्विकल्प समाधी, आत्मानुभव इत्यादी म्हणतात. म्हणून या महाप्रत्यक्षरूप ज्ञानाच्या प्राप्तीसाठी शुद्धोपयोगरूप साम्यभावाचा निरंतर अभ्यास करावा. आपला उपयोग शरीरादी परद्रव्याहून हटवून सतत आत्मस्वरूपाला जाणण्यामध्ये लावावा हीच साधक अवस्थेतील साधना आहे. सहज ज्ञान स्वभावमात्र स्वतःला पाहणे हेच सहज केवलज्ञान उत्पत्तीचे साधन आहे.

आनन्दाचा संबंध प्रत्यक्ष ज्ञानाशी आहे, परोक्ष ज्ञानाशी आनन्दाचा संबंध नाही. परोक्षज्ञान आनन्दामध्ये साधक नाही, उलट बाधक आहे. ज्याप्रमाणे कोणी लुटारू थोड्याशा संपत्तीची फूस दाखवून मोठी संपत्ती लुटून

नेतो त्याप्रमाणे परोक्ष ज्ञान थोड्याशा इन्द्रिय विषय सुखामध्ये जीवाला आसक्त करून त्याच्या अनन्त आनन्दरूप निधीला लुटत आहे. म्हणून परोक्षज्ञान जीवाच्या अक्षयसुखनिधीला लुटणारा डाकू आहे, अहितकारी आहे. म्हणून आचार्य पारमार्थिक सुखस्वरूप प्रत्यक्ष ज्ञानाला आपल्याजवळ ठेवून घेण्याच्या तीव्र भावनेने प्रत्यक्ष ज्ञानाचे स्वरूप सुखरूपाने सांगतात–

जादं सयं समंतं णाणमणंतत्थवित्थडं विमलं ।
रहियं तु ओग्गहादिहिं सुहं ति एगंतियं भणियं ।।५९।।

अन्वयार्थ –(**सयं जादं**) स्वतः उत्पन्न झालेले (**समंतं**) सर्व आत्मप्रदेशांमध्ये झालेले (**अणंतत्थवित्थडं**) अनन्त पदार्थांमध्ये विस्तृत (**विमलं**) निर्दोष (**तु**) आणि (**ओग्गहादिहिं रहियं**) अवग्रहादींनी रहित (**णाणं**) ज्ञान (**एगंतियं सुहं**) ऐकान्तिक अर्थात सर्वथा सुख आहे (**ति भणियं**) असे सर्वज्ञदेवांनी सांगितले आहे.

स्वयं उत्पन्न झाल्यामुळे, सर्व आत्मप्रदेशांमध्ये झाल्यामुळे, अनन्त पदार्थामध्ये विस्तृत असल्यामुळे, निर्दोष व अवग्रहादिकाने रहित असल्यामुळे प्रत्यक्षज्ञान सर्वथा परिपूर्ण सुखस्वरूप आहे.

परोक्षज्ञानामध्ये परतन्त्रता असल्यामुळे सुखाचा निषेध –

परोक्ष ज्ञान पराधीन आहे. कारण तेथे पर विषय, पर इन्द्रिय, परप्रकाश, परोपदेश आदिकांची अपेक्षा राहते. जेथे पराची अपेक्षा आहे तेथे नियमाने व्यग्रता आहे. इष्ट साधन मिळाले नाही तरी व्यग्रता, इष्ट साधन मिळविण्याची व्यग्रता, इष्ट साधन मिळाले तरी ते नष्ट होण्याची व्यग्रता असते. म्हणून परोक्षज्ञानामध्ये नानाप्रकारची आकुलता असल्यामुळे तेथे खरा आनंद नाही. कारण पराधीनतेमध्ये आनंद आणि शांती नसते. ज्याप्रमाणे एखादे संगीत ऐकण्याची इच्छा झाली. तेथे गाण्याचे ज्ञान होण्यासाठी गायक पाहिजे, गायक मिळाला तरी त्याने गाणे म्हटले पाहिजे, ऐकणाऱ्याचे कान चांगले पाहिजेत. ऐकू येत नसेल तर श्रवणयंत्र पाहिजे, त्याचप्रमाणे तबला पेटी इत्यादि म्युझिक साहित्य, म्युझिक वाजवणारे लोक, लाऊड स्पीकर, लाईट इत्यादी अनेक सामग्रींसाठी व्यग्र व्हावे लागते. मोही जीव पराधीनतेमध्ये सुद्धा स्वाधीनतेची कल्पना करतात. एखाद्या राजाजवळ ही सर्व साधनसामग्री

पुण्याच्या उदयाने सहज उपलब्ध असेल तर तो असा अनुभव करतो की सर्व माझ्या अधीन आहे. परंतु तो हे जाणत नाही की सर्व साधनसामग्री पुण्याच्या अधीन आहे. जर पुण्याच्या उदयाचा काळ संपला की क्षणात सर्व साधनसामग्री लुप्त होणार आहे. ही जी मिळालेली साधनसामग्री आहे ती आत्म्यापासून भिन्न आहे, माझ्या अधीन नाही. इन्द्रिये माझी नाहीत, पुद्गलस्वरूप आहेत. इन्द्रियाचे विषय माझे नाहीत, कर्माचा क्षयोपशमसुद्धा माझ्यापासून भिन्न आहे. म्हणून इन्द्रियजनित ज्ञान पराधीन आहे.

अशाचप्रकारे सर्व इन्द्रिये व मनाद्वारे होणारे ज्ञान पराधीन असल्यामुळे आकुलतारूप आहे. त्यामुळे तेथे सुखाचा लवलेश नाही.

प्रत्यक्ष ज्ञानामध्ये स्वाधीन आनंद –

जे ज्ञान अनादि ज्ञानसामान्य स्वभावाचा आश्रय घेऊन महाविकासाला प्राप्त झाले आहे ते पराधीन नाही. स्वाधीन उत्पन्न झाले आहे त्यामुळे तेथे स्वाभाविक आनंदाचा अनुभव आहे. जेव्हा आत्मा सर्व इन्द्रियांचे व मनाचे अवलंबन सोडून स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाने आपल्या आत्म्याचा आश्रय घेतो तेव्हा केवलज्ञानाची उत्पत्ती होते व केवलज्ञान उत्पन्न झाल्यावर त्याला कोणत्याही अन्य साधन सामग्रीची आवश्यकता राहत नाही. अनंत काळापर्यंत ते स्वयंच आत्मिक शक्तीने प्रगट होत राहते. त्या ज्ञानामध्ये पूर्ण स्वाधीनता असल्यामुळे पूर्ण निराकुलता आहे व स्वाधीनता हीच आनंदाची जननी आहे म्हणून हे प्रत्यक्ष ज्ञानच पारमार्थिक सुख आहे.

विश्वामध्ये एक आपला आत्मा तेवढा स्व आहे, शेष सर्व शरीरादी पर आहेत. म्हणून केवळ आत्म्याच्या आश्रयाने जे काम होते ते स्वाधीन, शेष सर्व पराधीन. अज्ञानी जीव शरीरसहित आत्म्याला स्व मानतो. म्हणून या शरीराने केलेल्या कामालासुद्धा स्वाधीन मानतो. जसे मी स्वतः स्वयंपाक केला. स्वयं कपडे धुतले. मी स्वयं डोळ्याने पाहिले, कानाने ऐकले. ही सर्व कामे शरीराधीन असल्यामुळे पराधीनच आहेत. त्यामुळे यात वास्तविक आनंद नाही. काम अधिक करण्याची इच्छा आहे परंतु शरीरामध्ये शक्ती अधिक नाही तेव्हा खेदखिन्न होतो. म्हणून एका आत्म्याद्वारे जे ज्ञान होते त्यामध्येच खरा आनंद व शांती आहे.

असमंत परोक्षज्ञानामध्ये आकुलता –

परोक्षज्ञान विशिष्ट इन्द्रियद्वारातून व्यक्त होते. भले ही ती ज्ञानपर्याय संपर्ण आत्मप्रदेशामध्ये आहे; परंतु संपूर्ण आत्मप्रदेशातून ती व्यक्त होत नाही. जेथे डोळे आहेत तेथूनच पाहण्याचे काम होते, जेथे कानाची पोकळी आहे तेथूनच ऐकण्याचे ज्ञान होते, नाकाच्या प्रदेशातूनच वास येतो, जीभेच्या प्रदेशामध्येच चव कळते. म्हणून जेव्हा एका इन्द्रियाचा दरवाजा उघडा असतो तेव्हा शेष सर्व दरवाजे बंद असतात व या जीवाला तर सर्व द्वारातून म्हणजे सर्व आत्मप्रदेशातून जाणण्याची इच्छा आहे, ते परोक्षज्ञानामध्ये घडत नाही म्हणून हा जीव दुःखी होतो. जसे डोळ्याने समोरची वस्तू दिसते; परंतु पाठीमागची वस्तू दिसत नाही. त्यामुळे खेदखिन्न होतो. अशाप्रकारे परोक्षज्ञान शेष ज्ञानाद्वारे आवृत्त असल्यामुळे आकुलित आहे व दुःखस्वरूप आहे.

समंत प्रत्यक्षज्ञानामध्ये समंत आनंद –

प्रत्यक्ष ज्ञान सर्व आत्मप्रदेशातून व्यक्त होते म्हणून ते समंत आहे. संपूर्ण दरवाजे उघडे आहेत कोणत्याही प्रदेशावर आवरण शिल्लक नाही म्हणून पूर्ण निरावरण झाल्यामुळे तेथे सुखाचा अनुभव होतो. केवली भगवान केवळ जीभेने रसाचे ज्ञान करीत नाहीत. केवळ डोळ्याने रूप पाहत नाहीत. कानाने शब्द ऐकत नाहीत. तर सर्व आत्मप्रदेशातून रूप, रस, गंध व स्पर्शाला जाणतात. त्यांचे संपूर्ण आत्मप्रदेश सर्व इन्द्रियांच्या गुणांनी समृद्ध झाले आहेत अर्थात एका इन्द्रियाद्वारे होणारे काम आता संपूर्ण आत्मप्रदेशातून होते. जेथे सर्व प्रदेशांमध्ये प्रत्यक्ष ज्ञानमय अनुभव होत आहे तेथे सर्व आत्मप्रदेशांमध्ये परम आनंदाचासुद्धा अनुभव होत आहे. इन्द्रियजनित सुख भोगताना सर्व शरीरामध्ये रोमांच होत नाही; परन्तु कोणते तरी तत्त्वज्ञान झाले किंवा एखादी अपूर्व गोष्ट किंवा विशिष्ट ज्ञानाच्यावेळी जो आनन्द उत्पन्न होतो तो संपूर्ण आत्म्यामध्ये तर तरंगित होतोच परंतु शरीरामध्ये सुद्धा रोमांच होतो. कितीही उत्कृष्ट पदार्थाचे सेवन केले तरी त्याच्या सुखाने शरीरामध्ये रोमांच होत नाही; परंतु जेव्हा अभूतपूर्व आत्मिक आनन्दाचा आस्वाद येतो तेव्हा रोमांच उभे राहतात, म्हणून जे ज्ञान आपल्या संपूर्ण प्रदेशांमध्ये ज्ञानप्रकाशाचा अनुभव करते ते परिपूर्ण आनन्दरूप होते.

कतिपयार्थप्रवृत्त परोक्ष ज्ञानामध्ये आकुलता –

परोक्ष ज्ञान काहीच पदार्थामध्ये प्रवृत्त होते. जे ज्ञान काही पदार्थामध्ये प्रवृत्त असते तेथे अन्य पदार्थांना जाणण्याची इच्छा राहते. त्यामुळे आकुलता उत्पन्न होते. कोणी व्यापारी रात्री जमा खर्चाचा हिशोब पाहत असेल व तेथे एक रूपयाचा हिशोब जर लागला नाही तर त्याला एक रूपया कुठे गेला ही जाणण्याची उत्सुकता राहते व ते जाणण्यासाठी एक तास वेळ घालवतो व दोन रूपयाची लाईट जाळतो; परंतु हिशोब पूर्ण जाणल्याशिवाय चैन पडत नाही. जेव्हा घरातील मोठा मनुष्य बाहेरून पिशवी हातात घेऊन घरात येतो तेव्हा घरातील लहान मुलांना पिशवीत काय आहे? भले ही त्यात कोळसे असतील तरी जाणून घेतल्याशिवाय चैन पडत नाही. कोठे लोकांचा घोळका दिसला की तेथे काय झाले हे जाणून घेण्याची आकुलता राहते. भलेही आपले तेथे कोणतेही प्रयोजन दिसत नाही तरी जिज्ञासा राहते. दारावरून वाजत गाजत मिरवणूक चालली असेल तर तेथे कशाची व कोणाची मिरवणूक आहे हे जाणून घेण्याची इच्छा असते. विमान आकाशातून रोज उडते; परंतु विमानाचा आवाज आला की बाहेर येऊन त्याला पाहण्याचा मोह आपण टाळू शकत नाही. जे ज्ञान अपूर्ण आहे तेथे इच्छा सदैव असते, अजून जाणावे म्हणून तेथे सदैव आकुलता असते.

सर्व पदार्थांमध्ये विस्तृत ज्ञान निराकुल –

केवलज्ञान सर्व पदार्थांना एकाच समयात जाणते, तेथे जाणण्याचे काही शिल्लकच राहिले नाही म्हणून तेथे जाणण्याची आकुलता नाही. ज्याप्रमाणे ज्या विद्यार्थ्याचा सर्व अभ्यास पूर्ण झाला आहे त्याला परीक्षेला जाताना निराकुलता असते. परीक्षेला जाता जाता वाचण्याची आकुलता नसते. ज्याचा अभ्यास पूर्ण झाला नाही त्याला परीक्षेला जाताना सुद्धा अजून थोडे वाचावे ही आकुलता राहते. त्याप्रमाणे जे ज्ञान अनन्त पदार्थांमध्ये विस्तृत आहे; ज्यांनी संपूर्ण वस्तूंच्या ज्ञेयाकाराला पीऊन टाकले आहे अर्थात जगातील सर्व सत् वस्तू ज्या ज्ञानामध्ये जाणल्या गेल्या आहेत, संपूर्ण लोकालोकामध्ये व्यापकरूपाने व्यवस्थित अशा त्या ज्ञानामध्ये कोणत्याही सत् ला जाणण्याची, भोगण्याची, अनुभवण्याची इच्छा राहत नाही म्हणून ते

महाप्रत्यक्षज्ञान अनाकुल आहे.

समल ज्ञानामध्ये आकुलता –

जे ज्ञान समल अर्थात मलिन आहे, रागद्वेषाने सहित आहे अथवा ज्ञानावरणादिक कर्मांचे विशेष आवरण असल्यामुळे यथायोग्य जाणू शकत नाही किंवा जाणण्यामध्ये संशय, विभ्रम, विमोह उत्पन्न झाला तर यथार्थ न जाणल्यामुळे ते ज्ञान आकुलित होते. जर कोणी आपल्याला कोडे विचारले तर जोपर्यंत उत्तर मिळत नाही तोपर्यंत आपली कशी अवस्था होते? खाण्यात, पिण्यात, झोपण्यात कशातच लक्ष लागत नाही. सतत मनामध्ये आपण उत्तर शोधत राहतो. त्याचे यथार्थ ज्ञान न झाल्यामुळे आकुलता होते. म्हणून सदोष ज्ञानामध्ये सम्यक् बोध न झाल्यामुळे आकुलता असते.

निर्मल ज्ञानामध्ये विलक्षण आनन्द–

केवलज्ञान संशय, विमोह, विभ्रमाने रहित असल्यामुळे व सूक्ष्म पदार्थांना जाणण्यामध्ये अत्यन्त विशद असल्यामुळे निर्मल आहे. ज्या ज्ञानाचा पूर्ण विकास झाला आहे, संपूर्ण शक्तींचा प्रतिषेध करणारे कर्म जेथे दूर झाले आहे, संपूर्ण ज्ञानप्रकाशाने जे दैदीप्यमान आहे व जे ज्ञान प्रकाशमान स्वभावामध्ये व्याप्त होऊन राहते ते निर्मल ज्ञान यथार्थ जाणल्यामुळे अनाकुल आहे. तेथेच विलक्षण आनंद आहे. कारण जेथे जाणण्यात चूक असते तेथे दुःख होते व जेथे बरोबर जाणले जाते, स्पष्ट जाणले जाते तेथे सुख होते ही अनुभवाची गोष्ट आहे.

क्रमप्रवृत्त ज्ञानामध्ये आकुलता –

परोक्ष मतिज्ञान अवग्रह, ईहा, अवाय, धारणा या क्रमाने उत्पन्न होते. क्रमाने जेथे पदार्थाचे ग्रहण होते तेथे खेद होतो. ज्ञानामध्ये जाणण्याची इतकी घाई असते की तेथे कोणी दम धरायला तयार नसतो. थोडे आज जाणले, थोडे उद्या जाणू अशी धीरता नसते. इच्छा तर अशी असते की सर्व काही आताच ज्ञानामध्ये यावे. ज्ञानाचा स्वभाव तर असा आहे की सर्वाला जाणावे व एकाच वेळेस जाणावे. परंतु जेव्हा युगपत् ग्रहण होत नाही, क्रमाने ग्रहण होते तेव्हा खेद उत्पन्न होतो. एखादी कादंबरी वाचायला सुरवात केली की क्रमाक्रमाने त्याचे एक-एक पान वाचत असतो. तेव्हा वरचेवर पुढची पाने

चाळून पाहत असतो. कारण तेथे पुढे काय आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा असते. सर्व कथा एकदम आपल्याला कळावी अशी आकुलता असते. फोटोचा अल्बम पाहत जातो; परंतु एक-एक फोटो पाहत असताना पुढचे फोटो पाहण्याची आकुलता राहते. रेल्वेचे तिकीट काढण्यासाठी ओळीत राहिलेल्या सर्वांना तिकीट प्राप्त करण्याची घाई असते. माझा नंबर पहिला लागावा असे सर्वांनाच वाटत असते. अर्थात् जेथे क्रम आहे तेथे आकुलता आहे. परोक्ष ज्ञानामध्ये सर्वांना एकदम जाणण्याचे सामर्थ्य नाही म्हणून त्या ज्ञानामध्ये आकुलता असते.

युगपत्प्रवृत्त प्रत्यक्ष ज्ञानामध्ये अनाकुलता –

प्रत्यक्ष ज्ञानामध्ये लोक व अलोकातील सर्व पदार्थ आपल्या तिन्ही काळातील पर्यायसहित एकाच वेळेस प्रतिबिम्बित झाले आहेत अर्थात त्रिलोक व त्रिकालातील सर्व पदार्थांनी आपले सर्वस्व केवलज्ञानाला समर्पित केले आहे त्यामुळे तेथे क्रमाक्रमाने जाणण्याचा खेद नाही.सर्व काही एकाचवेळेस ज्ञान झाले आहे त्यामुळे क्रमपूर्वक जाणण्यामुळे होणारी आकुलता समाप्त झाली. म्हणून तेथे वास्तविक आनंद आहे.

प्रत्यक्षज्ञान व आनंदाची उपादेयता –

इन्द्रियज्ञान पराधीनता, असमंतता, अल्पज्ञता, सदोषता, क्रमकृतप्रवृत्ती या अवगुणांनी परिपूर्ण आहे त्यामुळे आकुलतासहित आहे म्हणून परोक्ष ज्ञान खरोखर सुखस्वरूप नाही. अतीन्द्रिय ज्ञान स्वाधीनता, समंतता, सर्वज्ञता, निर्दोषता व युगपत् प्रवृत्तता या सद्गुणांनी समृद्ध आहे म्हणून पारमार्थिक सुखस्वरूप आहे. अतीन्द्रिय ज्ञान, सहज ज्ञान, श्रमाशिवाय उत्पन्न झालेले ज्ञान स्वयं आनंदस्वरूप आहे. म्हणून तेच उपादेय आहे.

पराधीन बनून, खोट्याला खरे बनवण्याचा श्रम करून आनंद व शांती प्रकट होत नाही. म्हणून इन्द्रियजनित ज्ञान व इन्द्रियजनित सुखामध्ये चैन मानू नये. हा संदेश या गाथेतून प्राप्त होत आहे. शुद्ध अतीन्द्रिय सुखाची प्राप्ती केवलज्ञान झाल्यावर नियमाने होते असे जाणून हे ज्ञान प्रगट होण्यासाठी शुद्ध आत्म्याचा अनुभव या परोक्ष ज्ञानाद्वारे सदा करण्यायोग्य आहे. कारण ही स्वानुभवरूपी अग्नीच कर्मरूपी इंधनाला जाळण्यास समर्थ आहे म्हणून परोक्ष

ज्ञानाचा वापर स्वतःला जाणण्यासाठीच अधिक करावा.

मागील गाथेमध्ये प्रत्यक्षज्ञान वास्तविक आनन्दस्वरूप आहे, परोक्षज्ञान आनन्दस्वरूप नाही हे सांगितले. हे ऐकून शंकाकाराच्या मनामध्ये शंका उत्पन्न झाली की केवलज्ञानामध्ये प्रत्येक समयाला नवीन नवीन परिणमन चालू आहे. प्रत्येक समयात परिणमन होणे हा वस्तूचा स्वभावच आहे. जर केवलज्ञानामध्ये परिणमन आहे तर तेथे नियमाने खेद असणार, कारण **जेथे बदल घडतो तेथे नियमाने खेद होतो.** म्हणून केवलज्ञान सर्वथा सुखरूप आहे. आनंदरूप आहे हा नियम होऊ शकत नाही. या शंकेचे समाधान पुढील गाथेत देतात.

जं केवलं ति णाणं तं सोक्खं परिणमं च सो चेव ।
खेदो तस्स ण भणिदो जम्हा घादी खयं जादा ।।६०।।

अन्वयार्थ – (**जं**) जे (**केवलं ति णाणं**) केवल नावाचे ज्ञान आहे (**तं सोक्खं**) ते सुख आहे (**सो चेव**) तोच (**परिणामं च**) परिणामसुद्धा आहे (**तस्स खेदो ण भणिदो**) त्याला खेद सांगितला नाही (**जम्हा**) कारण (**घादी**) घातिकर्मे सर्व **(खयं जादा**) नष्ट झाली आहेत.

केवलज्ञान स्वयं सुखरूप आहे व तेच स्वाभाविक परिणमन आहे. घातिकर्मांचा अभाव झाल्यामुळे केवलींना थोडासुद्धा खेद नाही.

केवलींना परिणाममात्रामुळे खेद नाही –

द्रव्यत्व गुणाच्या निमित्ताने पदार्थामध्ये प्रत्येक समयाला परिणमन होत आहे पूर्वी ही झाले व पुढे ही होत राहील. पदार्थ परिणमन शून्य कधीच असत नाही. परिणामाशिवाय पदार्थ नाही व पदार्थाशिवाय परिणाम नाही. ज्याप्रमाणे ज्वारीचे पीठरूपाने व पुनः पीठाचे भाकरीरूपाने आणि भाकरीचे सप्तधातूमध्ये परिणमन होते. सोन्याचे नाणे, अंगठी, कुंडल, चेन इत्यादीरूपाने परिणमन होते. शुद्ध द्रव्यामध्येसुद्धा निरंतर परिणमन होत आहे कारण **परिणमन झाले नाही तर वस्तूचाच अभाव होईल.** स्वाभाविक परिणमन असो की वैभाविक परिणमन मात्र खेदाचे कारण नाही.

खेदाचे आयतन घातिकर्म –

खेदाचे कारण घातिकर्मांच्या उदयाच्या निमित्ताने होणारे परोन्मुख परिणमन आहे. घातिकर्मामध्ये प्रबल कर्म आहे मोहनीय. त्या मोहनीयामध्ये सुद्धा महाभयंकर आहे दर्शन मोहनीय (मिथ्यात्व). त्या मिथ्यात्वाच्या उदयाने जीव जे वस्तूचे स्वरूप नाही त्याला वस्तूचे स्वरूप मानतो, वस्तूस्वरूपाहून विपरीत निर्णय करतो. जीव ज्ञानमय आहे त्याला स्पर्शरसगंधवर्णमय जाणतो, रागद्वेष मोहमय मानतो.

मोह परिणामामध्ये हा जीव उन्मत्त पुरुषाप्रमाणे जे जसे नाही तशी बुद्धी करतो. ज्याप्रमाणे वेडा मनुष्य कधी आईला पत्नी म्हणतो आणि कधी पत्नीला आई म्हणतो. वाटेल तसे बडबडत राहतो. जी गोष्ट जशी नाही त्याला त्यारूपाने सांगणे हेच तर पागलपण आहे. जशी वस्तुस्थिती आहे तसे सांगणे हे शहाणपणाचे लक्षण आहे. परपदार्थ सुखाचे कारण नाही. त्यामध्ये मोही जीव सुखबुद्धी करतो. सर्व परपदार्थ आपल्यापासून भिन्न आहेत, प्रत्येक द्रव्याचे परिणमन आपापल्यामध्येच आहे; परंतु हा अज्ञानी जीव त्यांना आपले मानतो व त्यामध्ये इष्ट-अनिष्ट कल्पना करतो. त्या ज्ञेयपदार्थांना आपल्या अनुकूल परिणमविण्याचा विकल्प करतो व त्यासाठी प्रयत्न सुद्धा करीत राहतो. ते पदार्थ याच्या विकल्पाच्या किंवा इच्छेच्या अधीन नाहीत. ते आपल्या परिणमनानुसार परिणमतात, त्यामुळे हा खेदखिन्न होतो.

शरीर, धन, स्त्री पुत्रमित्रादिक इष्ट पदार्थांचा नाश होऊ लागला तर स्वतःचा नाश मानतो. त्या इष्ट पदार्थांची समृद्धी झाली तर स्वतःची समृद्धी मानतो. हेच खेदाचे (दुःखाचे) कारण आहे. केवळ परिणमन खेदाचे कारण नाही तर मोहामुळे जी इष्ट-अनिष्ट आदि कल्पना करतो ते खेदाचे कारण आहे. जसे एखाद्या पुरुषाकडून मित्राचे काहीतरी काम बिघडले तेव्हा तो मित्र म्हणतो, हे काम बिघडले याचा मला खेद नाही; परंतु तुझ्या मनामध्ये माझ्याबद्दल खोटे भाव उत्पन्न झाले याचा मला खेद आहे. तसे वस्तूमध्ये बदल घडत असतो. त्यामध्ये या बदलांमुळे या जीवाला खेद नाही. परंतु जो मोही जीवांच्या मनामध्ये रागद्वेष-मोहाचा तरंग उठतो त्यामुळे खेद होतो. जसे परिणमन आहे तसे मध्यस्थभावाने स्वीकारले तर काहीच दुःख नाही. मोहामुळे त्यामध्ये उलटापुलट करण्याचे विकल्प करतो त्यामुळे दुःख आहे

म्हणून ही गोष्ट सुतरां सिद्ध आहे की मोहच खेदाचे आयतन आहे.

स्वभाव परिणमनामध्ये खेदाचा अभाव –

केवलींना घातिकर्मांचा अभाव झाला आहे. कारण घातिकर्मांचा नाश झाल्याशिवाय केवलज्ञानाची उत्पत्तीच होऊ शकत नाही. केवलींच्या ठिकाणी मोहाचा नाश झाल्यामुळे खेदाला अवकाश नाही. आश्रयच नष्ट झाला तर आश्रयी कसा राहू शकतो ? खेदाचा आश्रय घातिकर्म, त्याचाच नाश झाला तर खेद कसा राहील ? ज्या वस्तूंचे जसे परिणमन होत आहे त्याला त्यारूपाने प्रभू जाणत आहेत. त्यामध्ये फेरफार करण्याचा विकल्प करीत नाहीत. साक्षीभावाने जाणण्यामध्ये निराकुलता आहे. ज्याप्रमाणे कोर्टामध्ये न्यायाधीश असतो तो दोन्ही विरोधी पक्षांचे म्हणणे तटस्थभावाने ऐकून घेतो त्याला कोणत्याही पक्षासंबंधी राग नाही किंवा कोणत्याही पक्षासंबंधी द्वेष नाही त्यामुळे कोणाच्या बाजूने निकाल लागला तरी तो शांत निराकुल असतो व ज्यांनी एक पक्ष पकडला ते आपल्या पक्षाच्या बाजूने निकाल लागला तर खुश होतात व विरोधी पक्षाच्या बाजूने निकाल लागला तर नाराज होतात. त्याप्रमाणे केवली भगवान विश्वातील सर्व पदार्थांना जसे आहे तसे साक्षीभावाने जाणतात, मात्र त्यामध्ये इष्टानिष्ट विकल्प करीत नाहीत म्हणून निराकुल सुखी आहेत. मोही जीव पदार्थांना जाणून त्यामध्ये इष्टानिष्ट विकल्प करतो म्हणून दुःखी आहे.

निर्मलतेचे मूळ साक्षीभाव –

गौतम बुद्ध वृद्धावस्थेत एके दिवशी दुपारी एका झाडाखाली विश्राम करीत होते. त्यांचा आनन्द नावाचा शिष्य जवळच्या झऱ्यातून त्यांच्यासाठी पाणी आणण्यासाठी गेला होता. काही वेळापूर्वीच त्या झऱ्यातून गाड्या गेल्या होत्या म्हणून झऱ्याचे पाणी गढूळ झाले होते. म्हणून आनन्द तसाच परत आला आणि गौतम बुद्धांना म्हणाला, 'झऱ्याचे पाणी गढूळ आहे मी नदीतून पाणी घेऊन येतो.' गौतम बुद्धांनी त्याला पुनः त्याच झऱ्याचे पाणी आणण्यासाठी पाठविले. आनन्द पुन्हा रिकाम्या हाताने आला व म्हणाला 'ते पाणी पिण्यायोग्य नाही.' गौतम बुद्धांनी त्याला तिसऱ्या वेळा पुनः तेथेच पाठविले. यावेळी आनन्दला आश्चर्य वाटले पाणी पूर्ण निर्मळ झाले होते.

चिखल व मल खाली बसला होता. आनन्द पाणी घेऊन आला. गौतम बुद्धांनी विचारले, 'आता पाणी स्वच्छ कसे झाले ?'आनन्द म्हणाला, ' हळूहळू चिखल खाली बसला त्यामुळे पाणी स्वच्छ झाले.'

हीच गोष्ट मानवी मनाची आहे. जेव्हा विकल्पांद्वारे मन मलिनतेला प्राप्त होते तेव्हा त्याचा उपाय आहे की त्या विकल्पांना पहात जावे. जर आम्ही निरंतर विकल्पांना केवळ जाणत राहिलो तर लक्षात येईल विकल्पांचा मळ खाली बसला आहे व ज्ञान निर्मळ झाले आहे. केवळ साक्षीभावाने पहाणे हाच निर्मल होण्याचा उपाय आहे. ज्ञान निर्मळ करायचे नाही तर फक्त धैर्याने पहायचे आहे. ते आपोआप निर्मळ होते.

केवळ जाणत राहणे हाच केवलज्ञानाच्या उत्पत्तीचा उपाय आहे. याच विधीनेआपण सर्व संकटातून दूर होऊ शकतो. जेथे रागद्वेष मनात येतो तेथे खेद उत्पन्न होतो. जेथे रागद्वेष नाही तेथे खेदाला अवकाश नाही. केवळ ज्ञायक राहणे हेच धर्माचे पालन आहे. धर्ममूर्ती हा स्वयं आत्मा आहे. ज्ञानदर्शन हा त्याचा स्वभावधर्म आहे. त्या स्वभावावर आपला उपयोग स्थिर करणे हेच धर्मपालन आहे. जसे आपले स्वरूप आहे ज्ञानमात्र, त्या ज्ञानमात्र स्वरूपाला 'हा मी आहे' असे जाणत राहणे म्हणजेच मोक्षमार्ग आहे. हीच साधना आहे. हीच आराधना आहे.

केवलज्ञान स्वयं स्वभाव परिणमन –

केवलज्ञान हा स्वयं शुद्ध जीवाचा शुद्ध ज्ञान परिणाम आहे. केवलज्ञानाला सोडून दुसरा कोणता परिणाम नाही की ज्यामुळे खेदाची उत्पत्ती होईल. निरुपाधी केवलज्ञान केवलज्ञानरूपाने प्रत्येक समयात परिणमित होऊन अनन्तकाळापर्यंत केवलज्ञानरूप परिणमित राहणार. केवलज्ञानरूप परिणमन झाले नाही तर केवलज्ञान नष्टच होईल. शुद्ध अवस्थेमध्ये जरी तेच तेच परिणमन नाही; परन्तु तसेच तसे परिणमन आहे. ज्याप्रमाणे एक बल्ब (दिवा) एक तासभर जळत राहिला तर एका तासाचे जेवढे सेंकद आहेत त्या सर्व सेकंदामध्ये एकसारखा दीवा जळाला, एकसारखा प्रकाश झाला; परन्तु प्रत्येक सेकंदामध्ये दीव्याने नवीन नवीन काम केले. ते काम समान आहे त्यामुळे छद्मस्थाला भेद लक्षात येत नाही. परंतु प्रत्येक सेकंदातील प्रकाशाचे

परिणमन समान असले तरी भिन्न भिन्न आहे. जर लाईटने प्रत्येक सेकंदात नवीन नवीन काम केले नसते तर मीटर वाढले नसते. प्रत्येक सेकंदात लाईटचे नवीन नवीन काम चालू आहे त्याचप्रमाणे केवलज्ञानाद्वारे प्रत्येक समयाला तेच तेच पदार्थ जाणण्याचे काम चालू आहे, परंतु परिणमन प्रतिसमय नवीन-नवीन आहे. कार्यामध्ये सदृशता असूनही नवीनता आहे. केवलज्ञानरूप परिणमन जर थांबले तर केवलींच्या ठिकाणी ज्ञानाचा अभाव होईल. केवलींच्या ठिकाणी सर्वज्ञता राहणार नाही. केवली भगवान सर्वांना जाणणे रूपाने नित्य परिणमित आहेत व हे स्वाभाविक परिणमन आहे. त्यामुळे त्याचा कधीही अभाव होत नाही.

त्रिकालवर्ती संपूर्ण पदार्थांच्या आकाराला एकावेळी प्रकाशित करण्याचे स्थानभूत केवलज्ञान आहे. ज्याप्रमाणे एका भिंतीवर, १०-२० वर्षापूर्वी झालेल्या घटनांचे चित्रण केले. वीस वर्षानंतर काय घडणार याची कल्पना करून त्याचे चित्रण केले व वर्तमानात जे घडत आहे त्याचेपण चित्रण केले तर त्या भिंतीला पाहून एकाच समयात त्या सर्व काळातील घटनांचे, एकाच वेळेस ज्ञान झाले त्याचप्रमाणे केवलज्ञानामध्ये अनंत काळापूर्वीपासूनचे, वर्तमानकाळाचे व अनंत भविष्यकाळाचे एकाच वेळेस ज्ञान होते. हे विशुद्ध आत्म्याचे शुद्ध परिणमन आहे. येथे खेदाला जागा नाही.

केवलज्ञान स्वयं सहज आनन्दमय –

केवलज्ञानामध्ये व आनंदरूप परिणमनामध्ये कोणताही भेद नाही. प्रत्येक समयात प्रभू केवलज्ञान-केवलज्ञान रूपाने परिणमतात अर्थात प्रतिसमय प्रभू आनंदरूप-आनंदरूप परिणमतात. मग तेथे खेद कोठून असणार? केवलींना घातिकर्मांचा अभाव झाला.आत्म्याच्या स्वभावाचा घात करणारे कर्मच जर राहिले नाही तर निरंकुश बेरोकटोक त्यांची अनंतशक्ती विकसित झाली, ते संपूर्ण लोक व अलोकाला जाणतात आणि ज्याप्रमाणे त्यांचे ज्ञान निष्प्रकम्प आहे त्याचप्रमाणे निष्प्रकम्प अनाकुलता अर्थात आनन्दसुद्धा आहे.

प्रभू विशुद्ध ज्ञानरूप परिणमत आहेत. त्याचबरोबर विशुद्ध आनन्दरूपसुद्धा परिणमत आहेत. केवल राहण्यामध्ये व आनन्दमय

राहण्यामध्ये काहीही अंतर नाही. केवळ होणे म्हणजेच आनंदमय होणे. केवलज्ञान स्वयं सहज असीम आनंदमय आहे. म्हणून केवलज्ञानाबरोबर पारमार्थिक आनन्दाचा ऐकान्तिक नियम आहे. प्रभू सर्वज्ञ आहेत व अनंत आनंदमय आहेत.

घातिकर्माच्या अभावात स्वाभाविक विकास –

खेदाचे कारण घातिकर्म आहेत. घातिकर्म चार आहेत. म्हणून खेदाचे कारण सुद्धा चार आहेत.

१) जेव्हा कोणाला सर्वांना पाहण्याची इच्छा होते; परंतु सर्वांना एकावेळी पाहू शकत नाही. क्रमाक्रमाने थोडे थोडे पाहतो तेव्हा खेद होतो. ज्याप्रमाणे कोठेतरी गर्दी जमली असेल तर तेथे काय चालले आहे हे पाहण्याची आकुलता होते. गर्दीत घुसल्याशिवाय आत काय चालले आहे हे दिसत नाही. गर्दीतून घुसून आत पहातो तरी पूर्ण स्पष्ट दिसत नाही तोपर्यंत आकुलता ही राहतेच. पूर्ण स्पष्ट पाहिल्यानंतर निराकुल होतो. केवलींना दर्शनावरणीय कर्माचा सर्वथा नाश झाला आहे. त्यामुळे आत्म्याच्या स्वाभाविक दर्शन गुणाच्या विकासामध्ये कोणतेही बाधक कारण राहिले नाही की ज्यामुळे खेद होईल.

२) जेव्हा कोणाला जाणण्याची खूप इच्छा आहे; परंतु एकावेळी जाणू शकत नाही. क्रमाक्रमाने थोडे थोडे जाणतो तेव्हा खेद होतो. केवलींना ज्ञानावरणीय कर्माचा सर्वथा क्षय झाला आहे त्यामुळे आत्म्याच्या स्वाभाविक ज्ञानगुणाच्या विकासामध्ये बाधक कारण विद्यमान नाही,म्हणून खेद नाही.

३) जेव्हा कोण्या व्यक्तीला खूप काम करण्याची इच्छा आहे; परन्तु शक्ती कमी असल्यामुळे करू शकत नाही तेव्हा खेद होतो. परंतु केवलींना अंतराय कर्माचा सर्वथा नाश झाला आहे त्यामुळे आत्म्याच्या स्वाभाविक अनंत वीर्यगुणाच्या विकासामध्ये कोणतेही बाधक कारण राहिले नाही की ज्यामुळे खेद होईल.

४) जेव्हा या जीवाला नाना प्रकारच्या इच्छा उत्पन्न होतात व कोणामध्ये राग व कोणामध्ये द्वेष उत्पन्न होतो तेव्हा खेद उत्पन्न होतो. येथे केवलींना संपूर्ण मोहनीय कर्माचा अभाव झाला आहे त्यामुळे सर्व प्रकारच्या

इच्छा नष्ट झाल्या आहेत व क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, रती, अरती, शोक, भय, जुगुप्सा, स्त्रीवेद, पुवेद, नपुंसक वेदरूप कलुषित भावांचा अभाव झाला आहे. त्यामुळे आत्म्याच्या स्वाभाविक अनंतसुख गुणाच्या विकासामध्ये बाधक कारण उरले नाही की ज्यामुळे खेद होईल.

घातिकर्माच्या उदयामध्ये हा जीव परतन्त्र आहे. घातिकर्मरूपी शत्रूंचा जेव्हा नाश करतो तेव्हा हा जीव स्वतन्त्रता प्राप्त करतो. ज्ञानस्वभावाच्या अवलंबनाने केवलज्ञान प्राप्त करणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे. याप्रमाणे चार घातिकर्मांचा उदय आत्म्यामध्ये खेद उत्पन्न करू शकतो. केवलज्ञानी प्रभूंच्या चारी घातिकर्मांचा क्षय झाला आहे म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारे खेद होऊ शकत नाही. ते पूर्ण निराकुल शाश्वत सुखसम्पदेने संपन्न आहेत.

केवलज्ञानामध्ये परिणमन होत असल्यामुळे केवलींना सुद्धा खेद होत असेल अशी शंकाकारांने केवली भगवंतांवर ही शंका उत्पन्न केली होती. त्या शंकेचे निरसन येथे तीन प्रकारांनी केले आहे. १) परिणमन मात्र खेदाचे कारण नाही. घातिकर्म खेदाचे कारण आहे. केवलींना घातिकर्माचा अभाव झाल्यामुळे परिणमन असूनही तेथे खेद नाही. २) केवलज्ञान हेच स्वाभाविक परिणमन आहे. त्याला सोडून अन्य कोणतेही परिणमनच नाही की ज्या परिणमनामुळे खेद होईल. ३) केवलज्ञान व सुखामध्ये भेद नाही. केवलज्ञान स्वयं सुखरूप आहे. त्यामुळे तेथे खेद नाही.

याप्रमाणे येथे हे सिद्ध झाले की केवलज्ञानी अनंत पदार्थांना जाणत असतानाही त्यांना खेद किंवा श्रम होत नाही. अशी केवलज्ञानाची महिमा जाणून ह्या केवलज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावा. केवलज्ञानाची प्राप्ती समताभावाने होते. समताभाव आत्म्याच्या आश्रयाने व्यक्त होतो. म्हणून निरन्तर निज धुवशुद्धज्ञानदर्शन स्वभावी आत्म्याचा आश्रय घेण्याचा सम्यक् पुरुषार्थ करावा.

शंकाकाराने प्रश्न केला होता की, केवलज्ञानामध्ये सुद्धा परिणमन असल्यामुळे कष्ट आहे तर तेथे खेद आहे, तेथे अनंत सुख कसे काय होऊ शकणार ?

या शंकेच्या समाधानात केवलज्ञान सुखरूप आहे ही गोष्ट सिद्ध केली. परिणमन तर स्वरूप आहे. उपाधी नाही. स्वरूप कधीही स्वतःचा घात करीत नाही. म्हणून ज्ञानाचे पूर्ण ज्ञानरूप निष्कम्प क्षोभरहित होणे हेच अनंत सुख आहे तर केवलज्ञानामध्ये व सुखामध्ये भेद कोठून ? केवलज्ञान सुखरूप आहे असा निश्चय करून त्याचाच आता उपसंहार करतात. आचार्य पुनःपुन्हा तीच गोष्ट सांगतात आणि म्हणतात की उपसंहार करतो. पाठकगण कंटाळू नयेत थकू नयेत म्हणून आचार्य त्यांना दिलासा देतात. ज्याप्रमाणे आपण शिखरजी डोंगर चढत असतो तेव्हा मध्येच थकतो तेव्हा बरोबर असणारी मोठी माणसे सांगतात, झालं, आता कुंथुनाथ टोक आलेच. चढणाऱ्याला ऐकून थोडा दिलासा मिळतो. तो पुन्हा उत्साहाने चालू लागतो. त्याप्रमाणे आचार्यसुद्धा थकलेल्या पाठकाला दिलासा देतात आता हे प्रकरण संपवितो. ज्यामुळे त्याचा पुन्हा वाचण्याचा उत्साह वाढतो. अतीन्द्रिय ज्ञान व अतीन्द्रिय सुखाची महिमा कितीही गायली तरी आचार्यांचे पोट भरत नाही. कारण अशी त्याची महिमाच अगाध आहे. केवलज्ञान सुखरूप का आहे याचे दुसऱ्या प्रकाराने कथन करतात.–

णाणं अत्थंतगयं लोयालोएसु बित्थडा दिट्ठी ।
णट्ठमणिट्ठं सव्वं इट्ठं पुण जं तु तं लद्धं ।।६१।।

अन्वयार्थ – (**णाणं**) ज्ञान (**अत्थंतगयं**) पदार्थांच्या अंताला प्राप्त झाले आहे आणि (**दिट्ठी**) दर्शन (**लोयालोएसु वित्थडा**) लोक व अलोकामध्ये विस्तृत आहे. (**सव्वं अणिट्ठं णट्ठं**) सर्व अनिष्ट नष्ट झाले आहे. (**पुण**) पुन्हा (**जं इट्ठं**) जे इष्ट आहे (**तं तु**) ते (**लद्धं**) प्राप्त झाले आहे.

केवलज्ञान आनंदरूप आहे याची तीन कारणे येथे सांगितली आहेत. १) स्वभावाच्या प्रतिघाताचा अभाव अर्थात स्वभावाचा पूर्ण विकास २) सर्व अनिष्टाचा नाश व ३) इष्टाची प्राप्ती.

स्वभावविकासामध्ये आनंदलाभ –

स्वभावाच्या प्रतिघाताचा अभाव होणे हेच वास्तविक सुख आहे. आपण लौकिकामध्ये सुद्धा पाहतो की आपल्या गुणाचा कोणी घात करीत असेल तर आपण दुःखी होतो व आपल्या गुणाचा विकास झाला तर आपण

सुखी होतो. ज्याप्रमाणे एखाद्याला संगीतकला स्वभावतः अवगत आहे, तो त्यामध्ये प्रावीण्य मिळवू इच्छितो व त्या कलेच्या विकासासाठी प्रयत्नशील असतो. जर कोणी त्याच्या कलेच्या विकासामध्ये अडथळा निर्माण केला तर तो खूप दुःखी होतो. कोणताही अडथळा न येता त्या कलेमध्ये पारंगत झाला व त्या कलेचा पूर्ण विकास झाला की तो सुखी होतो.

त्याप्रमाणे ज्ञानदर्शन हा जीवाचा स्वभाव आहे त्याच्यामध्ये बाधा उत्पन्न झाली तर जीवाला दुःख होते व त्याचा विकास झाला तर जीव सुखी होतो. केवलींना अंतराय कर्माचा सर्वथा अभाव झाल्यामुळे विघ्न करणारा शत्रू कोणी नाही व ज्ञानावरण, दर्शनावरणाचा क्षय झाल्यामुळे ज्ञान व दर्शन स्वतन्त्रतापूर्वक पूर्ण विकसित झाले आहे. केवलींना परम ज्ञानकलारूपी चन्द्राचा पूर्ण उद्योत झाला आहे. त्यामुळे त्यांचे ज्ञान लोकालोकामध्ये विस्तृत आहे. ज्याप्रमाणे पौर्णिमेच्या चन्द्राच्या सर्व कला प्रगट होऊन तो पूर्ण प्रकाशरूप परिणमतो त्याप्रमाणे हा ज्ञानचंद्रसुद्धा संपूर्ण विकसित होऊन पूर्ण ज्ञानप्रकाशरूप परिणमतो. ज्ञान संपूर्ण पदार्थाच्या पार गेले आहे. या केवलज्ञानामध्ये कोणताही पदार्थ अज्ञेय नाही. म्हणून स्वभावाच्या प्रतिघाताच्या अभावाने उत्पन्न होणारे सुख हे अभेद विवक्षेने केवलज्ञानाचे स्वरूप आहे. केवलज्ञान व अनन्तसुख यांची सदैव मैत्री आहे ते एकमेकाला सोडून कधीही राहत नाहीत. केवलज्ञान केवळच असते अर्थात पूर्ण शुद्ध. ज्याप्रमाणे दूधातील सर्व क्रीम काढून घेऊन बाजारामध्ये ते दूध शुद्ध म्हटले जाते तसे शुद्ध नव्हे. परन्तु जे आपल्या सर्व अविभाग प्रतिच्छेदांना घेऊन प्रगट झाले आहे असे शुद्ध केवलज्ञान ते केवळ सुखरूपच आहे. अन्य कोणतेही ज्ञान सुखरूप नाही.

अनिष्टाचा नाश सुखाचे कारण –

केवलज्ञान सुखरूप आहे याचे दुसरे कारण आहे सर्व अनिष्टाचा नाश. आपण लौकिक जीवनात पाहतो की अनिष्ट वस्तूंचा संयोग झाला की जीव दुःखी होतो. मुलीला लग्न झाल्यावर सासू कडक मिळाली की ती सुखी होण्याऐवजी दुःखी होते. शरीरामध्ये रोग झाला की जीव दुःखी होतो. व्यापारामध्ये नुकसान झाले की व्यापारी दुःखी होतो. पाऊस पडला की कुंभार

दुःखी होतो. शेतीमध्ये धान्य काढण्यावेळी पाऊस पडला तर शेतकरी दुःखी होतो व पेरणी केल्यावर पाऊस पडला तर सुखी होतो. स्वतःच्या इच्छेनुसार इष्ट अनिष्ट सुद्धा बदलत राहते. जे दुःखाला कारण आहे त्यालाच अनिष्ट म्हटले आहे. या संसारी जीवाचा रात्रंदिवस एकच धंदा सुरू असतो. अनिष्ट वस्तूला दूर करणे व इष्टाला जवळ करणे. एवढे करूनसुद्धा तो पूर्णतः सुखी होऊ शकत नाही. कारण एक अनिष्ट दूर केले की दुसरे अनिष्ट तेथे हजर असतेच. जसे दरिद्रतेचे दुःख ह्या जीवाला होते म्हणून काबाडकष्ट करून पैसा मिळविला व दरिद्रता नष्ट केली. श्रीमंत होताच त्याच्या शरीरामध्ये रोग उत्पन्न झाला. तो रोग बरा होत नाही तोपर्यंत मुलगा दुव्यर्सनी बनला. एका पाठोपाठ अनिष्टाचा संयोग सदैव होत राहतो. याचा अर्थ आम्ही अनिष्टाचा वर वर नाश करतो. त्याचे जे मूळ आहे ते तसेच जीवंत आहे. त्यामुळे अनिष्टाची शृंखला तुटत नाही. सर्व दुःखाचे मूळ अज्ञान हेच खरे अनिष्ट आहे. जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत हा जीव पूर्ण सुखी होऊ शकत नाही. परवस्तूला आम्ही अनिष्ट मानले याचे कारण अज्ञानच आहे. परवस्तू इष्ट किंवा अनिष्ट नाही. आमच्या इच्छेनुसार आम्ही त्याला इष्ट किंवा अनिष्ट मानतो. उन्हाळ्यामध्ये थंड वारा इष्ट वाटतो, तोच थंड वारा थंडीमध्ये अनिष्ट वाटतो. निरोगी अवस्थेत गोड पदार्थ आवडतो, ताप आला की गोड पदार्थ खाणे तर दूर, पाहण्याची सुद्धा इच्छा होत नाही.

याप्रमाणे एका जीवाला एकच वस्तू कधी इष्ट तर कधी अनिष्ट भासित होते. याचा अर्थ वस्तू इष्ट किंवा अनिष्ट नाही. वस्तूमध्ये इष्ट अनिष्ट कल्पना करविणारे मिथ्याज्ञान अनिष्ट आहे तेच वास्तविक दुःखाचे कारण आहे.

एकदा एके ठिकाणी रामायणाचे पारायण चालू होते. अशी किंवदन्ती आहे की जेथे रामायणाचे पारायण होते तेथे हनुमान कोणत्या ना कोणत्या रूपामध्ये पोहचतो. कथावाचक पंडितजी म्हणाले की, जेव्हा हनुमान अशोक वाटिकेमध्ये गेला तेव्हा त्या वृक्षावर पांढरी फुले होती. ग्रन्थामध्ये लाल फुले होती असे लिहीले होते. यावर काही श्रोत्यांनी वक्त्याला विचारले, 'ग्रन्थामध्ये तर लाल फुले लिहिली आहेत तुम्ही पांढरी का सांगता ? '

पंडितजी आपल्या कथनावर अडून बसले की मी सांगतो,' पांढरी फुले होती. तेथेच हनुमान बसला होता,' त्याने म्हटले, 'मी हनुमान आहे, मी सांगतो की फुले लाल होती.' दोघे आपापल्या म्हणण्यावर अडून बसले. शेवटी याचा निर्णय करण्याकरिता सर्व लोक रामचन्द्रजींच्या जवळ गेले. रामचन्द्रजी म्हणाले, फूले तर पांढरीच होती; परंतु हनुमानाच्या डोळ्यामध्ये एवढा क्रोध होता की त्याला फूले लाल दिसत होती.

हीच स्थिती आपली झाली आहे. कोणतीही वस्तू इष्ट अथवा अनिष्ट नाही. वस्तू तर आपल्या रूप आहे; परन्तु आमचा जसा दृष्टिकोण असेल तशीच वस्तू दिसायला लागते. आम्ही समजतो वस्तू तशी आहे आणि त्याला ठीक करण्याचा प्रयत्न करतो. परन्तु वस्तू तशी नाहीच तर आमच्या ठीक करण्याचा प्रयत्न करूनसुद्धा ठीक कशी होणार ? दोष आमच्या दृष्टीमध्ये आहे. जर आम्ही आमचा दृष्टिकोन बरोबर केला तर वस्तू जशी आहे तशी दिसेल. ज्याप्रमाणे कावीळ झालेल्या रोग्याला सर्व वस्तू पिवळ्या दिसतात; परन्तु वस्तू पिवळी नाही, त्याच्या डोळ्यात दोष आहे.

मिथ्याज्ञानाच्या सद्भावामध्ये वस्तूचे यथार्थ स्वरूप जाणत नाही त्यामुळे अनन्त दुःख आहे. क्षायोपशमिक अज्ञानरूप मिथ्याज्ञानाचा अभाव झाला की वास्तविक सुखाला सुरवात होते. परंतु जोपर्यंत मोहनीय कर्म व ज्ञानावरण कर्म जीवंत आहेत तोपर्यंत परिपूर्ण सुख प्राप्त होऊ शकत नाही. केवलींच्या सर्व मोहनीय व ज्ञानावरण कर्माचा नाश झाल्यामुळे दुःखाला कारणीभूत असणाऱ्या अनिष्ट अशा संपूर्ण मोह व अज्ञानाचा नाश झाला त्यामुळे केवली परिपूर्ण सुखी आहेत. अनन्त सुखी आहेत. म्हणून केवलज्ञानच सुखरूप आहे.

इष्टाची प्राप्ती सुखाचे कारण –

केवलज्ञान सुखरूप आहे याचे तिसरे कारण आहे सर्व इष्टाची प्राप्ती. व्यावहारिक जीवनात आपण पाहतो की इष्ट वस्तूचा संयोग झाल्यावर जीव सुखी होतो. ज्यामुळे सुख होताना भासित होते त्या वस्तूलाच हा जीव इष्ट मानतो. गरीब व्यक्तीला धन मिळाले की सुख वाटते म्हणून तो धनाला इष्ट मानतो. स्त्रीला पुत्राची प्राप्ती झाली की सुख भासित होते म्हणून ती पुत्राला

इष्ट मानते. शेतकऱ्याला शेतीमध्ये चांगले पीक आले की आनंद होतो. इष्ट वस्तूचा संयोग झाल्यावर सुख होताना भासित होते. म्हणून जीव सुखासाठी सदैव इष्ट वस्तूंचा संयोग मिळविण्याचा प्रयत्न करतो. परंतु कितीही इष्ट वस्तू प्राप्त झाल्या तरी जीव सुखी होताना दिसत नाही. कारण एका इष्टाची प्राप्ती होते ना होते तोपर्यंत दुसरी इच्छा उत्पन्न होऊन त्या इष्टाची पूर्ती करण्याच्या पाठीमागे लागतो. ही धारा सतत चालू राहते म्हणून त्याला परिपूर्ण सुखाची प्राप्ती होत नाही. इष्टाची प्राप्ती सुखाचे कारण आहे. परंतु इष्ट काय आहे याबाबतीत जीवाचे अज्ञान आहे. वस्तूचे यथार्थ ज्ञान होणे हे इष्ट आहे. परंतु हा वस्तूलाच इष्ट मानून बसला आहे. हीच मुळात चूक आहे. ज्ञान इष्ट आहे. वस्तू इष्ट नाही. वस्तू जशी आहे तसे जीवाला ज्ञान झाले तर खरा आनंद प्राप्त होतो. आम्ही वस्तूलाच इष्ट समजून आमच्या इच्छेनुसार त्याला इष्टरूप परिणमविण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणून दुःखी आहोत. वस्तूला न बदलविता वस्तूसंबंधी अज्ञान दूर करून वस्तूचा जसा स्वभाव आहे तसा स्वीकार केला तर जीव सुखी होतो.

एका बिल्डिंगमध्ये दोन व्यक्ती राहत होते. दोघांचे फ्लॅट वेगवेगळ्या मजल्यावर होते. संध्याकाळच्या वेळी दोघेही एकाचवेळी आपापल्या ऑफीसमधून परत येत होते आणि लिफ्टमध्ये चढत होते. पहिल्या व्यक्तीचा फ्लॅट पाचव्या मजल्यावर होता. लिफ्ट पाचव्या मजल्यावर थांबली की लगेच दरवाजा उघडणार, तो मनुष्य उतरण्याकरिता पुढे येणार व परत पाठीमागे वळून दुसऱ्या माणसावर थुंकणार व लिफ्टमधून उतरून जाणार. दुसरी व्यक्ती गपचुप रूमाल काढणार, आपला चेहरा पुसरणार, कोटावर पडलेली थुंकी पुसणार. नंतर तो आठव्या मजल्यावर उतरण्याची तयारी करणार. रोजच्या रोज हा कार्यक्रम चालू होता. हे पाहून एक दिवस लिफ्टमॅन ला राहवले नाही. त्यांने दुसऱ्या व्यक्तीला विचारले, साहेब हा काय मामला आहे ? हा माणूस असे का करतो ? त्या व्यक्तीने उत्तर दिले, ते तुम्ही त्यालाच विचारा. ही त्याचीच समस्या आहे. माझा यामध्ये काहीही हात नाही. काही ना काही पागलपण त्याच्यावर सवार आहे. माझे तर काही बिघडत नाही. रूमाल काढून पुसतो. खरा त्रास त्याला होतो. थुंकण्यापूर्वी तो त्रस्त असतो. थुंकताना

त्रास होतो व थुंकल्यावरही त्रास होत असणार म्हणून ही समस्या तर त्याची आहे. मी फक्त दर्शक आहे. सर्व बाह्य घटनांना अशाप्रकारे पाहण्याची कला जर आम्हाला अवगत झाली तर आम्हाला कोणी दुःखी करू शकणार नाही. वस्तूचे यथार्थ ज्ञान होणे हेच सुखाचे कारण आहे. म्हणून ज्ञानच इष्ट आहे. ज्यावेळी या जीवाला सम्यग्ज्ञानाची प्राप्ती होते तेव्हा खऱ्या सुखाचा प्रारंभ होतो. जेव्हा परिपूर्ण केवलज्ञानाची प्राप्ती होते तेव्हा परिपूर्ण सुखाची प्राप्ती होते. अशा परिपूर्ण सुखाचे साधनभूत परिपूर्ण ज्ञान केवलींना उत्पन्न होते म्हणून केवलज्ञानच सौख्यरूप आहे.

आत्म्याच्या स्वभावाचे घातक सर्व विकार दूर झालेत व स्वभावाला प्रफुल्लित करणारे अनंत ज्ञान, दर्शन, सुख, वीर्यादि गुण प्रगट झाले आहेत. सर्व अनिष्ट नष्ट झाले व सर्व इष्ट प्राप्त झाले. केवलज्ञान प्रगट होताच आत्म्याचा परमहितकारी यथार्थ स्वभाव प्रगट होतो. केवलज्ञानाबरोबर पूर्ण निराकुलता राहते. म्हणून केवलज्ञानच सुखस्वरूप सांगितले आहे. यद्यपि सुख नावाचा गुण ज्ञानाहून भिन्न आहे. तथापि शुद्ध ज्ञान व अतीन्द्रिय सुखाचा अविनाभाव संबंध आहे. म्हणून ज्ञानालाच अभेदनयाने सुख म्हटले जाते. प्रयोजन हे आहे की केवलज्ञानाच्या प्रगटतेशिवाय अतींद्रिय अनन्त सुख प्राप्त होत नाही. म्हणून सुख पाहिजे असेल तर सुखप्राप्तीचे अन्य लाख उपाय सोडून केवलज्ञान प्रगट करण्याचा पुरुषार्थ करावा. केवलज्ञानाच्या प्राप्तीचे साधन सम्यक् श्रुतज्ञान आहे. सम्यग्श्रुतज्ञान स्वानुभवाने प्राप्त होते म्हणून पुन्हपुन्हा स्वानुभवाचा अभ्यास करावा. केवळ आत्म्याची साधना केल्याने केवलज्ञानाची प्राप्ती होते म्हणून केवळ आत्म्याची साधना करण्यामध्येच बहुमूल्य असा दुर्लभ मनुष्य भव खर्ची घालावा.

एखादा श्रीमंत व्यक्ती पाहिल्यावर ' हा सुखी आहे' असे श्रद्धान या संसारी अज्ञ जीवाला न सांगतासुद्धा उत्पन्न होते. केवली भगवान अनंत सुखी आहेत असे अनेकवेळा सांगून सुद्धा या जीवाला त्याची श्रद्धा उत्पन्न होत नाही. याची दोन कारणे आहेत –१) आज या पंचमकाळात केवली प्रत्यक्ष पहायला मिळत नाहीत. जिनचैत्यालयामध्ये प्रतिष्ठापित मूर्तीमध्ये भगवंतांची प्राणप्रतिष्ठा केल्यामुळे ते सुद्धा साक्षात् जिनेंद्र भगवान आहेत; परंतु त्यामध्ये

हा जीव चैतन्य पाहत नाही. त्याला एक जड अचेतन पाषाणच पाहतो. त्यामुळे त्यांना सुख आहे याचे याला श्रद्धान होत नाही. २) अज्ञानी जीव बाह्य अनुकूल सामग्रीच्या सद्भावालाच सुख मानण्याचा भ्रम करीत आहे. खऱ्या आत्मिक सुखाची त्याला ओळख नाही म्हणून इंन्द्रियसुखालाच सुख मानतो. ते इन्द्रियसुख केवलींना दिसत नाही म्हणून ते सुखी आहेत याचे श्रद्धान या जीवाला उत्पन्न होत नाही. म्हणून याठिकाणी कुन्दकुन्द आचार्यदेव केवलींना वास्तविक सर्वोत्कृष्ट सुख आहे अशी जीवाला श्रद्धा करवितात–

णो सद्दहंति सोक्खं सुहेसु परमं ति विगदघादीणं ।
सुणिऊण ते अभव्वा भव्वा वा तं पडिच्छंति ।।६२।।

अन्वयार्थ –(**विगदघादीणं**) घातिकर्मांनी रहित केवलींचे (**सोक्खं**) सुख (**सुहेसु परमं**) सर्व सुखामध्ये उत्कृष्ट आहे (**ति सुणिऊण**) हे ऐकून (**णो सद्दहंति**) जे श्रद्धान करीत नाहीत (**ते अभव्वा**) ते अभव्य आहेत. (**भव्वा वा**) आणि भव्य जीव (**तं**) त्याचा (**पडिच्छंति**) स्वीकार करतात अर्थात त्याची श्रद्धा करतात.

केवलज्ञानींच्या अनन्तसुखाचे ज्यांना श्रद्धान नाही ते मिथ्यादृष्टी आहेत व जे श्रद्धान करतात ते सम्यग्दृष्टी आहेत.

सुखाभासामध्ये सुखबुद्धी –

मोहाने ग्रस्त झालेल्या जीवाला सुखाभासामध्ये सुखाची कल्पना होते. जे इन्द्रियांना सुखप्रद वाटते तेच वास्तविक सुख आहे अशी या मोही जीवाची खोटी मान्यता आहे. उन्हाळ्याच्या दिवसामध्ये खूप उकडत आहे तेव्हा थोडे थंड वारे सुटले की स्पर्शनेन्द्रियाला बरे वाटायला लागते म्हणून थंड वाऱ्याला सुखाचे कारण मानून बसतो. जीभेला रूचकर अन्न मिळाले की रसनेन्द्रियांची तृप्ती होते. त्यालाच हा जीव सुख मानून बसतो. कर्णेन्द्रियाला संगीत ऐकायला मिळाले की बैचेन व्यक्तीला बरे वाटते. अशाप्रकारे बाह्य इन्द्रिय विषयाच्या भोगामध्ये अज्ञानी जीवाला सुख भासित होते; परंतु ते वास्तविक सुख नाही. कारण तेथे स्वभावाचा घात आहे व आकुलता आहे. जी स्वभावाचा घात करणारी अवस्था आहे ती सुखाचे कारण होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे भांड्यामध्ये स्वच्छ पाणी आहे त्यामध्ये खडे टाकले तर त्या पाण्याच्या

स्वच्छस्वभावाचा घात होतो व त्यामध्ये अस्थिरता उत्पन्न होते. त्याप्रमाणे जीवाच्या ज्ञान दर्शन आनंद स्वभावामध्ये इन्द्रिय सुखाचे खडे पडले की ज्ञान, दर्शन, आनंदस्वभावाचा घात होतो व आकुलता उत्पन्न होते. इन्द्रियसुखामध्ये तात्कालिक क्षणिक निराकुलता झाल्यामुळे सुख वाटायला लागते. परंतु ते तृष्णेला वाढविणारे असल्यामुळे आकुलता उत्पन्न करते. इन्द्रिय व मानसिक सुख अत्यंत निर्बल, पराधीन, अशांतिकारक, तृष्णावर्धक व कर्मबंधाचे बीज आहे. म्हणून ते वास्तविक सुख नसून दुःखच आहे. त्यामध्ये सुख मानण्याची रूढी अपारमार्थिक आहे. ज्यांच्या घातिकर्माचा अभाव झाला आहे, ज्यांच्या स्वभावाचा घात नाही त्यांनाच खरा अतीन्द्रिय आनंद प्रकट होतो. भगवंतांचे अतीन्द्रिय सुखच पारमार्थिक व वास्तविक सुख आहे. यामध्ये संदेह करू नये. कारण सुख आत्म्याचा स्वभाव आहे. ज्ञानावरणादी चारही घातिकर्मे त्या शुद्ध अनंत आनंदामध्ये बाधक होती, त्यांचा जर नाश झाला तर त्या आत्मिक आनन्दाला कोण रोखू शकते ?

स्वानुभवामध्ये खऱ्या सुखाचा निर्णय –

केवलज्ञानी अरिहंत व सिद्धांना सर्वोत्कृष्ट आत्मिक आनन्द आहे याचे श्रद्धान अभव्य जीवांना कधीच उत्पन्न होऊ शकत नाही. कारण त्यांची अनादि कर्मकालिमा कधीही नष्ट होणार नाही व ते कधीही शुद्ध भाव प्राप्त करून सिद्ध होणे तर दूर, त्यांना सम्यग्दर्शन होणेसुद्धा अशक्य. मिथ्यात्वरूपी कालिमा दूर झाल्याशिवाय शुद्ध सुखाच्या जातीचे श्रद्धान कोणीही करू शकत नाही. भव्यामध्येसुद्धा जे निकट भव्य जीव आहेत तेच सिद्धांच्या सुखाचे श्रद्धान करू शकतात. सम्यक्त्व प्रकट होताच भव्यजीवाला स्वात्मानुभव होतो व आपल्या आत्म्याचा स्वाद येऊ लागतो. या स्वादामध्ये खऱ्या आत्मिक सुखाचा स्वाद येतो. चौथ्या गुणस्थानवर्ती अविरत सम्यग्दृष्टीलासुद्धा त्याच जातीच्या सुखाचा स्वाद येतो की जे सुख अरिहंत व सिद्धांना प्रगट आहे. खालच्या गुणस्थानवर्ती जीवांच्या अनुभवामध्ये तेवढा निर्मल आनन्द प्रकट होत नाही जेवढा अरिहंत व सिद्ध परमात्म्यांना होतो. कारण अजून त्यांच्या घातिकर्मांचा अभाव झाला नाही. तरीसुद्धा जो काही स्वसंवेदन भावश्रुतज्ञानाद्वारे स्वानुभव होतो तो आत्मिक सुखाचा स्वाद आहे. त्यामुळे सम्यग्दृष्टी जीवांना पक्का निर्णय होतो. जसे आत्मिक सुख आमच्या अनुभवात येत आहे याच जातीचे

अनन्त अविनाशी शुद्ध सुख अरिहंत व सिद्धांना होत आहे. ज्याप्रमाणे कोणी पुरुषाने एक रूपयाचे पेढे घेऊन खाल्ले व कोणी दहा रूपयांचे पेढे घेऊन खाल्ले. दोघांच्या आस्वादाच्या जातीमध्ये फरक नाही. एक रूपयाचे पेढे घेऊन खाणाऱ्याला दहा रूपयांचे पेढे घेऊन खाणाऱ्याच्या सुखाचा अंदाज येतो. त्याचप्रमाणे सम्यग्दृष्टी स्वानुभवानंतर जाणतो की जसा आनंद आम्ही अनुभवला तसाच केवलींच्या स्वानुभवाचा आनंद आहे. फक्त फरक एवढा आहे की त्यांचा आनंद पराकाष्ठेला पोहचला आहे.

स्वानुभव लब्धिरूप व उपयोगरूप असा दोन प्रकारचा आहे. स्वानुभव जेव्हा उपयोगरूप असतो तेव्हा तेथे विषय, कषाय, मैथुन, संज्ञादि भाव असत नाहीत. जेव्हा उपयोग विषय कषायादींमध्ये असतो तेव्हा स्वानुभव लब्धिरूप असतो. सम्यग्दृष्टीला भय मैथुनादी भाव सम्यक्त्वाबरोबर राहू शकतात; परंतु स्वानुभव उपयोगरूप असताना राहू शकत नाहीत. ज्याप्रमाणे एका व्यक्तीला इंग्रजी व हिन्दी दोन्ही भाषा अवगत आहेत. जेव्हा तो हिंदीचे पुस्तक वाचत असतो तेव्हा हिंदी उपयोगरूप असते व इंग्रजी केवळ लब्धिरूप असते. तेव्हा इंग्रजीची योग्यता नाही असे नाही अर्थात इंग्रजीची योग्यता तर आहे; परन्तु उपयोगरूप हिन्दीच आहे.

गृहस्थ सम्यग्दृष्टीला खऱ्या सुखाचा लाभ होत असताना सुद्धा तो इन्द्रियभोग जनित व मानसिक कषायजनित सुखामध्ये का प्रवृत्ती करतो? याचे उत्तर जयसेनाचार्यांनी दृष्टान्त देऊन छान दिले आहे. सम्यग्दृष्टीला विषयभोगजनित व कषायजनित सुखापासून उदासीनता आहे. श्रद्धान अपेक्षेने तो त्याला हेयच मानतो; परन्तु चारित्राच्या अपेक्षेने जेवढा चारित्र मोहाचा उदय आहे तेवढी उदासीनतेमध्ये कमतरता आहे म्हणून जेव्हा कषायाचा तीव्र उदय येतो तेव्हा विवश होऊन कषायानुकूल विषयभोग भोगतो. नंतर कषाय कमी झाल्यानंतर आपली निन्दा गर्हा करतो. त्याची अवस्था कोतवालाने पकडलेल्या चोराप्रमाणे झाली आहे. चोर शिक्षा भोगणे इच्छित नसताना सुद्धा कोतवालाकडून बलपूर्वक पकडला जाऊन दंडित केला जातो. वीतराग सम्यग्दृष्टी जीव निरन्तर शुद्ध सुखाचा स्वाद घेऊ इच्छितो. त्याला विकाररहित आत्मिक सुखापासून दूर होणे त्याप्रमाणे कष्टप्रद वाटते, ज्याप्रमाणे माशाला

भूमीवर येणे. तेच पुढील श्लोकात सांगितले आहे.

समसुखशीलितमनसां च्यवनमपि द्वेषमेति किमु कामाः।
स्थलमपि दहति झषाणां किमङ्ग पुनरङ्गमङ्गाराः ।।

समतामयी सुख भोगणाऱ्या पुरुषांना समतेपासून च्युत होणे सुद्धा जेथे दुःखरूप भासित होते तेथे भोगामध्ये पडणे दुःखरूप भासित कसे होणार नाही? जर माशांना जमिनीवर येणेच दाह उत्पन्न करते तर अग्नीचे अंगार दाह कसे बरे करणार नाहीत ?

त्याची दशा त्या रोग्याप्रमाणे आहे जो कडू औषध खाऊ इच्छित नाही; परन्तु वैद्याच्या आज्ञेने लाचार होऊन खातो. अंतरंगामध्ये तर औषध खाण्याची बिल्कुल रूची नाही. विरक्त होऊनच औषधीचे सेवन करतो. त्याप्रमाणे सम्यग्दृष्टीला विषयांची रूची नाही. विषयजनित सुखाची इच्छा करीत नाही; परन्तु चारित्रमोहाच्या अधीन होऊन थोडेफार विषयांचे सेवन करतो. अंतरंगामध्ये तर विषयसुखाला हेय समजतो. आत्मिक सुखाची रूची व विषयसुखाची अरूची एक दिवस या भव्य जीवाला पूर्ण विरक्त करते. तेव्हा तो कषायाने मोहीत न होता रूचिपूर्वक केवळ आत्मिक आनन्दाचा भोग घेईल.

यद्यपि केवलींच्या व छद्मस्थ सम्यग्दृष्टीच्या सुखाची जात समान आहे. परंतु उज्ज्वलता, स्पष्टता व शक्तीमध्ये अंतर आहे. जसजसा कषायांचा अभाव होतो तसतशी उज्ज्वलता वाढते, जसजसे अज्ञान नष्ट होते तसतशी स्पष्टता वाढते, जसजसा अंतरायाचा क्षय होतो तसतसे वीर्य वाढते. जेव्हा शुद्धता, स्पष्टता, पुष्टतेचे घातक सर्व आवरण कर्म निघून जाते तेव्हा हे अतीन्द्रिय सुख आपल्या पूर्ण स्वभावरूपाने प्रकट होते. पुन्हा अनन्तकाळापर्यंत या सुखामध्ये एक क्षणसुद्धा विच्छेद होत नाही.

ज्यांचे अंतर्मुहूर्तामध्ये ध्यान बदलते त्यांच्या सुखास्वादामध्ये अंतर पडते; परंतु केवलज्ञानींचा सदा परम निर्मल शुद्धोपयोग आहे. कारण त्याचा आधार पूर्ण निर्मल अनंत, अपूर्व माहात्म्ययुक्त केवलज्ञान आहे म्हणून हे सुख सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. असे जाणून समता भाव धारण करून रागद्वेष सोडून केवलज्ञानाच्या उदयाचा नित्य पुरुषार्थ करावा. स्वतःचा विकास

करण्याकरिता प्रभूंच्या विकासाची श्रद्धा करावी. त्या विकासाचा आधारभूत सहज चैतन्यस्वभावामध्ये उपयोग स्थिर करावा. स्वात्मानुभवाद्वारे निजानन्दाचा भोग घेणे हाच खरा पुरुषार्थ आहे. कारण जसे साध्य तसे साधन असेल तर साध्याची सिद्धी निश्चित होते. जे प्रभूंच्या सहज आनन्दाची श्रद्धा करतात व अशाच निज सहज आनन्दाची रूची ठेवतात ते मोक्षलक्ष्मीचे पात्र आहेत, निकटभव्य आहेत. केवली भगवंतामध्ये सहज परम आनन्द आहे अशी श्रद्धा निज सहज आनन्दाच्या रूचीची साधिका आहे.

पूर्व गाथेमध्ये आचार्यांनी 'प्रत्यक्षज्ञानी केवली भगवंतांचे सुख सर्व सुखामध्ये श्रेष्ठ आहे. तेच खरे वास्तविक सुख आहे' अशी श्रद्धा करविण्याचा प्रयत्न केला. हे ऐकूनसुद्धा इन्द्रियसुखामध्ये आसक्ती असणाऱ्या जीवाला अतीन्द्रिय सुखासबंधी श्रद्धा उत्पन्न होत नाही. कारण त्याला अतीन्द्रिय सुखाचा परिचय नाही, अनुभव नाही. म्हणून आता आचार्य त्याला ज्या इन्द्रियसुखामध्ये सुखबुद्धी आहे त्याची अवास्तविकता (असत्यता) पटवून देतात. परोक्ष ज्ञानीच्या अपारमार्थिक इन्द्रियसुखाचा विचार करतात.–

मणुआसुरामरिंदा अहिद्दुदा इंदियेहिं सहजेहिं ।
असहंता तं दुक्खं रमंति विसएसु रम्मेसु ॥६३॥

अन्वयार्थ – (**मणुआसुरामरिंदा**) मनुष्येंद्र (चक्रवर्ती) असुरेन्द्र आणि सुरेन्द्र (**सहजेहिं इंदियेहिं**) सहज इन्द्रियांनी (**अहिद्दुदा**) पीडित होऊन (**तं दुक्खं**) त्या दुःखाला (**असहंत**) सहन न करीत (**रम्मेसु विसएसु**) रमणीय वाटणाऱ्या विषयांमध्ये (**रमंति**) रममाण होतात.

संसारातील मोठे इन्द्रियज्ञानीसुद्धा इन्द्रियविषयांच्या तृष्णेची पीडा सहन न झाल्यामुळे कल्पनारम्य विषयांमध्ये रममाण होतात.

परोक्षज्ञानींची इन्द्रियांशी मैत्री –

साधारण मनुष्य, असुर व देवांना तर जाऊ देत त्यांच्या इन्द्रांना अर्थात चक्रवर्ती, असुरेन्द्र व देवेन्द्रांनासुद्धा प्रत्यक्षज्ञान नाही. इन्द्रियादिकांच्या सहाय्यतेशिवाय आत्मिक शक्तीने जे स्पष्ट ज्ञान होते त्यास प्रत्यक्ष ज्ञान म्हणतात. प्रत्यक्षज्ञान केवलज्ञान आहे. केवलज्ञान होण्यापूर्वी जेवढी ज्ञानाची

प्रवृत्ती आहे ती परोक्षज्ञानाचीच आहे. प्रत्यक्षज्ञानाचा अभाव असल्यामुळे चक्रवर्ती आदींना परोक्षज्ञान आहे. परोक्षज्ञानामध्ये इन्द्रिये निमित्तमात्र आहेत. ज्याप्रमाणे मनुष्य डोळ्याने पाहतो, परन्तु ज्याचे डोळे कमजोर आहेत त्याला पाहण्यामध्ये चष्मा निमित्तमात्र आहे. चष्मा पाहत नाही. तो तर जड अचेतन आहे. त्याप्रमाणे परोक्ष ज्ञानाद्वारे आत्माच जाणतो, इन्द्रिये जाणत नाहीत. ती केवळ परोक्ष ज्ञानाच्या प्रवृत्तीसाठी निमित्तभूत आहेत. परोक्षज्ञानीची त्या इन्द्रियांशी आपोआप मित्रता होते. ज्याप्रमाणे आपण लौकिकामध्ये पाहतो की एखादे कार्य सिद्ध करायचे असेल तर त्या कार्यसिद्धीसाठी ज्या ज्या साधन सामग्रीची आवश्यकता आहे ती साधनसामग्री जुळविण्याचा प्रयत्न करतो व त्या साधनसामग्रीवर आपले साहजिकच प्रेम उत्पन्न होते. उदाहरणार्थ – आपल्याला प्रवास करायचा असेल तर गाडी हे साधन आहे. आपण हे साधन प्राप्त करतो व त्या गाडीला धुणे, पुसणे, नीटनेटके ठेवणे, त्यामध्ये पेट्रोल भरणे इत्यादी त्याची देखभाल करतो अशाप्रकारे त्याच्याशी साहजिकच मैत्री उत्पन्न होते. त्याप्रमाणे जाणण्यासाठी इन्द्रिये साधन आहेत. त्या इन्द्रियांना प्राप्त करून त्याची सेवा शुश्रूषा पालनपोषण करतो व इन्द्रियाशिवाय मी जाणू शकत नाही म्हणून इन्द्रियांवर अति प्रीती करतो. त्याच्याशी याची गाढ मैत्री होते.

विषयवेदनेची पीडा –

परोक्षज्ञानींच्या ज्ञानविकासामध्ये इन्द्रिये निमित्तमात्र आहेत म्हणून त्यांच्याशी मैत्रीला प्राप्त झालेले प्राणी मोहाने ग्रस्त असल्यामुळे इन्द्रियाच्या विषय अभिलाषेच्या पीडेने त्रस्त होतात. स्पर्शनेन्द्रियाला थंडीमध्ये उष्ण स्पर्श करण्याची पीडा होते, रसनेन्द्रियाला इच्छानुकूल रस चाखण्याची पीडा उत्पन्न होते, घ्राणेन्द्रियाला सुवास सुंघण्याची वेदना होते, चक्षुरिन्द्रियाला मनोहर रूप पाहण्याची अभिलाषा उत्पन्न होते, कर्णेन्द्रियाद्वारे मधुर कर्णप्रिय संगीत ऐकण्याची इच्छा होते. या इन्द्रियपीडेने त्रस्त झालेला प्राणी त्या वेदनेचे दुःख सहन न झाल्यामुळे रम्य विषयांमध्ये रती करतो. वास्तविक इन्द्रियविषय जड आहेत, ते रम्य पण नाहीत व अरम्य पण नाहीत. विषयभूत पुद्गल तर स्पर्श, रस, गंध, वर्णरूप परिणामाने परिणमित होते. मोही जीवच आपल्या कषायानुसार पदार्थांमध्ये इष्टानिष्ट कल्पना करतो. त्यामध्ये ज्या पदार्थांना

इष्ट जाणतो त्याला भोगण्याचा तृष्णारूपी दाह उत्पन्न होतो. दाहामुळे जी पीडा उत्पन्न होते त्याला सहन करू शकत नाही आणि घाबरून इंद्रियांच्या विषयभोगामध्ये रमू लागतो. जे विषय अनिष्ट वाटतात त्यांना दूर करण्याची इच्छा करतो. इन्द्रियांशी मैत्री करून हा जीव स्वस्थतेचा अनुभव करीत नाही. कारण इन्द्रियांची मैत्री ही दुष्टांची मैत्री आहे. दुष्टाबरोबर केलेल्या मैत्रीने आपल्याला कधी स्वस्थता व सुख मिळू शकत नाही.

इन्द्रियवृत्ती रोगसमान, विषयसेवन उपचार समान –

ज्याप्रमाणे रोगाने त्रस्त रोगी रोगाचा प्रतीकार करतो. त्याप्रमाणे इन्द्रिय इच्छारूपी रोगाने त्रस्त संसारी प्राणी विषयांच्या सेवनाने त्याचा प्रतीकार करतो. ज्याप्रमाणे अत्यंत तापलेल्या लोखंडाचा गोळा पाण्यामध्ये टाकला असता चारी बाजूंनी पाण्याला शोषून घेतो त्याप्रमाणे इन्द्रियरूपी व्याधीने तप्त झालेला प्राणी दुःखाच्या वेगाला सहन न केल्यामुळे विषय भोगांना ग्रहण करतो. यद्यपि विषयामध्ये रमणे हा रोगशांतीचा उपाय नाही तथापि अज्ञानाने व पूर्व संस्कारामुळे तोच उपाय करीत राहतो. ज्याप्रमाणे खरूज झालेल्या जीवाला खाज सुटते. ती पीडा न सहन झाल्यामुळे रोगी खाजवत राहतो. खाजवल्यामुळे त्याला तात्पुरते दुःख कमी झाल्यासारखे वाटते. परंतु जसजसे खाजवतो तसतशी खाज वाढत जाते. आणि खाजवल्यामुळे त्यातून रक्त येते. त्यामुळे रोग बरा न होता वाढतोच, त्याप्रमाणे इन्द्रियरोगाने पीडित प्राणी इन्द्रियांची पीडा सहन न झाल्यामुळे विषयांचे सेवन करतो. विषयसेवनामुळे तात्पुरती पीडा कमी झाल्यासारखी वाटते; परंतु जसजसे विषयांचे सेवन करीत जातो तसतशी तृष्णा वाढत जाते.

मोठमोठ्या पुण्यवान पुरुषांनासुद्धा मनोनुकूल सामग्री प्राप्त होऊनसुद्धा या विषयभोगाने कधी तृप्ती होत नाही तर अल्प पुण्यशाली जीवांना थोड्याशा विषयभोगाने कशी तृप्ती होणार? मिथ्यादृष्टी मनुष्य व देव सम्यग्ज्ञानाच्या अभावात खऱ्या सुखाला न जाणता इंद्रियाद्वारे ज्ञान व सुखाला ग्रहण करण्यायोग्य मानतात व या बुद्धीने रात्रंदिवस विषयांच्या इच्छारूपी अग्नीमध्ये जळत राहतात. पुण्याच्या उदयाने इच्छित पदार्थ मिळाले की त्याच्या सेवनामध्ये लीन होतात. जर इच्छित पदार्थ मिळाले नाहीत तर त्याला मिळविण्याकरिता निरंतर उद्यम करीत आकुलित होतात. दुसऱ्या पुण्यवानाला

पाहून ईर्ष्या केल्यामुळे मानसिक वेदनेने पीडित होतात.

गाथेमध्ये नारकी व तिर्यंचांचे नाव घेतले नाही. कारण त्यांना सदैव इष्ट पदार्थांचा वियोग असतो. काही तिर्यंचांना इच्छित पदार्थ मिळतात; परंतु ते अत्यंत कमी आहेत. बहुभाग तिर्यंच भूक, तहान, उष्णता, भय, मारण, पीडन, वैर, द्वेष, तीव्र विषयलोलुपता इत्यादी दुःखांनी संतप्त असतात. मनुष्यांपेक्षा असुर (भवनत्रिक) देवांना अधिक रमणीय विषय प्राप्त होतात. त्यापेक्षाही कल्पवासी देवांना अधिक मनोज्ञ विषय प्राप्त होतात. असे प्राणीसुद्धा जर इंद्रियांच्या तृष्णेने पीडित होतात व दुःख सहन न झाल्यामुळे विषयांमध्ये रमतात तर क्षुद्र प्राण्यांची काय गोष्ट ? तात्पर्य हे आहे की विषयाच्या इच्छारूपी दावानलामध्ये मूर्च्छित झालेला प्राणी हरिणाप्रमाणे मृगमरीचिकेमध्ये पाण्याची कल्पना करून त्याच्यामागे धावत जाऊन कष्ट प्राप्त करतो; परंतु आपल्या विषयवासनेच्या पीडेला शांत करू शकत नाही हा सर्व अज्ञानाचा व मोहाचा महिमा आहे.

इन्द्रिय रोगसमान आहेत व विषयभोग हे उपचारसमान आहेत. रोगी कधीही सुखी असू शकत नाही. तो दुःख दूर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. इन्द्रियानुरागी छद्मस्थ जीवाला पारमार्थिक सुख नाही ही गोष्ट लक्षात येते.

काही औषध असे असते की ते रोगाला दाबून टाकते, मुळासकट नष्ट करीत नाही. हिंदीमध्ये त्याला दवा म्हणतात. **जी रोगाला दाबते ती दवा. संसारसुख इन्द्रियसुख त्याप्रकारचे औषध आहे. जे दुःखाला दाबून टाकते, समूळ नष्ट करीत नाही. याच्या उलट ज्ञानावलम्बन एक अमृत आहे त्याद्वारे दुःखरूपी रोग मुळापासून नष्ट होतो**. म्हणून इन्द्रियज्ञानाच्या मैत्रीला अहितकर जाणून इन्द्रियविषयांमध्ये न रमता अतीन्द्रिय अविकार सहज ज्ञानस्वरूपामध्ये मग्न होण्याचा पुरुषार्थ करावा. ज्या जीवांचे अनादि-अनन्त अहेतुक ज्ञानस्वभावाकडे लक्ष नाही त्या जीवांचीच इन्द्रियांशी मित्रता होते. ज्ञानस्वभावी आत्म्याशी मित्रता झाल्यावर इन्द्रियांशी मैत्री आपोआप तुटते. केवलज्ञानाच्या प्राप्तीचा उपाय करण्यायोग्य आहे. ज्यामुळे ह्या अनादि रोगाचे मूळ नष्ट होऊन आत्मा नेहमीकरिता सुखी होईल. आजपर्यंत असे इन्द्रिय

विषयभोगरूपी वरवरचे उपचार पुष्कळ केले, परंतु दुःखरूपी रोग दूर झाला नाही म्हणून आता एक डॉक्टर बदलून पाहूया व त्याचे औषध सेवन करून पाहूया की ज्याद्वारे आमचा रोग पूर्ण नष्ट होतो की नाही. एकदा प्रयोग तरी करून पहा. **अतींद्रिय प्रत्यक्षज्ञानी सर्वज्ञ भगवान हे सफल वैद्य आहेत व दुःखरूपी रोगावर शुद्धात्मानुभव हे त्यांनी दिलेले अमोघ रामबाण औषध आहे.** त्याचे सेवन करून पहा.

एवढे सांगूनसुद्धा मोही जीवाला 'इन्द्रियसुख वास्तविक सुख नाही, दुःख आहे' इन्द्रियसुखाने समृद्ध देवेन्द्रादिकांना खरे सुख नाही ते दुःखीच आहेत. याचा विश्वास बसत नाही म्हणून आता आचार्य इन्द्रियसुखवाल्या जीवांना स्वाभाविक दुःख आहे हे युक्तीने पटवून देतात.–

जेसिं विसयेसु रदी तेसिं दुक्खं वियाण सब्भावं ।
जइ तं ण हि सब्भावं वावारो णत्थि विसयत्थं ।।६४।।

अन्वयार्थ – (**जेसिं**) ज्यांची (**विसयेसु रदी**) विषयांमध्ये रती आहे (**तेसिं**) त्यांना (**दुक्खं**) दुःख (**सब्भावं**) स्वाभाविक (**वियाण**) जाण (**हि**) कारण (**जइ**) जर (**तं**) ते दुःख (**सब्भावं ण**) स्वाभाविक नसते तर त्या जीवांचा (**विसयत्थं**) विषयांकरिता (**वावारो**) व्यापार (**णत्थि**) झाला नसता.

इन्द्रिय विषयांमध्ये अनुराग असल्यामुळे दुःख होणे स्वाभाविक आहे.

विषयरतीमध्ये दुःखाची स्वाभाविकता –

ज्या प्राण्यांची घातक इन्द्रिये जीवित आहेत त्यांना स्पर्शादि विषयामध्ये प्रेम उत्पन्न होते. त्यांना दुःख होणे स्वाभाविक आहे. इन्द्रियांच्या उद्धततेमुळे त्यांना तुरंत दुःखाचा अनुभव होतो. येथे स्वाभाविक शब्दाचे तात्पर्य आत्म्याच्या स्वभावाने, अन्य निमित्ताशिवाय होते असे घेऊ नये. परंतु जो विषयामध्ये प्रेम करतो त्याला दुःखी होण्याकरिता दुसऱ्या कारणांची गरज नाही. विषयप्रेमच दुःखाला घेऊन उत्पन्न होते. दुःख परिणती अन्य पदार्थापासून होत नाही ती आत्म्याच्या आनन्दगुणाच्या विभावपरिणमनामुळे उत्पन्न होते. परंतु विभावपरिणाम निमित्ताच्या अनुपस्थितीत होत नाही. जेव्हा कर्मोदयादी बाह्य निमित्त उपस्थित आहेत व आत्मा विषयामध्ये प्रेम करतो तेव्हा दुःख होणे स्वाभाविक आहे. जसे जेथे अग्नीचे सान्निध्य प्राप्त आहे तेथे

पाणी गरम होणे प्राकृतिक आहे तसे जेथे कर्मोदयाच्या सान्निध्यात आत्मा विषयामध्ये आसक्त होतो तेथे दुःख होणे प्राकृतिक आहे. इन्द्रिय विषयाभिलाषेचे स्वरूपच दुःखरूप आहे.

इन्द्रियजनित वेदनेमुळे विषयविपदाभिपात –

ज्या जीवांची रूची इन्द्रियांच्या विषयभोगामध्ये आहे त्यांना मोहकर्मजनित अंतरंग पीडा होते. जेव्हा जेव्हा इन्द्रियजनित दाह उत्पन्न होतो तेव्हा तेव्हा हा प्राणी घाबरतो व त्या दाहाची पीडा शांत करण्यासाठी इन्द्रियांच्या विषयांमध्ये उडी मारतो. त्या विषयांमुळे नाश अतिनिकट पाहत असतानाही त्या विषयांकडेच धावतो. हत्ती स्पर्शनेन्द्रिय जनित पीडा सहन न झाल्यामुळे हत्तीणीचा स्पर्श करण्यासाठी जातो व खड्ड्यामध्ये पडतो. खड्ड्यामध्ये त्याला दुसरे कोणीही पाडत नाही. तो स्वयं विषय आशावश खड्ड्यामध्ये पडतो. हत्ती पकडणारे लोक जंगलामध्ये एक खड्डा खोदतात त्यावर कागदाची एक कृत्रिम हत्तीणी ठेवतात. आणि एका बाजूला ५० हात दूरवर पळत येणाऱ्या हत्तीचे चित्र सुद्धा तयार करतात. त्या जंगलामध्ये वन हत्ती येतो. तेव्हा त्या कृत्रिम हत्तीणीला खरी हत्तीण समजतो हे त्याचे अज्ञान अर्थात मोह आहे. पुन्हा हत्तीणीच्या अनुरागामुळे तिकडे धावतो हा राग आहे. तो दुसरा हत्ती हत्तीणीला येऊन पकडेल व माझे विषय साधन हरण करेल या भीतीने जोरात पळतो हा झाला द्वेष. अशाप्रकारे स्पर्शनेन्द्रियाच्या अधीन होऊन मोह, राग, द्वेषाच्या वश होऊन हाथी बंधनामध्ये सापडतो व आपले प्राण गमावतो. जर स्पर्शनेन्द्रियाच्या अधीन होऊन विषयासक्ती नसती तर का विपत्तीमध्ये पडला असता ? इन्द्रियवासनेमुळेच तो दुःखी होतो. मनुष्यसुद्धा आपला विवेक विसरून विषयवासनेच्या वश होऊन स्पर्श विषयामध्ये प्रवृत्त होतो. या सप्तधातुमय चामड्याचे आच्छादन असलेल्या शरीराच्या स्पर्शाने सुख मानतो व शांतीचा अनुभव न होता सतत वासना अतृप्त राहिल्यामुळे अशांतीचाच अनुभव करतो. विषयमार्गाने स्वतःचे घोर अहित करून टाकतो. ज्ञानमार्गानेच आपले पूर्ण हित होते.

रसनेन्द्रियांच्या विषयाच्या लोभाने मासा त्या मांसाच्या तुकड्याला पकडण्यासाठी झेप घेतो व कोळ्याच्या जाळ्यात अडकून मरण पावतो.

आपला नाश निकट जाणूनसुद्धा विषयाला सोडण्याची इच्छा होत नाही. अमृतासारख्या गोडफळाच्या लालसेने सुभौम चक्रवर्ती मरणाला प्राप्त झाला. आम्हीसुद्धा गोड, आंबट, तिखट, खारट स्वादाच्या अधीन होऊन रागद्वेषभाव करतो व त्यामुळे आमच्या आनंदस्वभावाचा घात करतो. तऱ्हेतऱ्हेच्या मिठाई, शेव पापडी इत्यादी व्यंजन बनविण्यामध्ये अमूल्य वेळ खर्च करतो. रसना इन्द्रियाच्या क्षणिक तृप्तीसाठी रात्रंदिवस झटतो. कोणताही नवीन पदार्थ दिसला अथवा ऐकला की त्याचा स्वाद घेण्याची इच्छा करतो अशाप्रकारे रसनेन्द्रियाची पीडा सहन न झाल्यामुळे रसविषयावर झडप घालतो.

एक-दोन अंगुलप्रमाण नाकाला खुश करण्यासाठी किती प्रकारचे सुगंधी तेल, अत्तर, अगरबत्ती यांचा संग्रह करतो. सुगंधित पुष्प घेऊन वास घेतो. ही सर्व घ्राणेन्द्रियामध्ये आसक्त जीवाची दशा आहे. भुंगा गंधाच्या आसक्तीने कमळावर बसतो. त्याच्या वासामध्ये मग्न असतो. तोपर्यंत सूर्यास्त झाल्यावर कमळ बंद होते भुंगा आत अडकतो. वायूचा संचार न झाल्यामुळे आतच मरण पावतो अथवा हत्ती येऊन त्या कमळाला तोडून आपल्या तोंडात टाकतो त्याबरोबर स्वयं सुद्धा चिरडला जाऊन मरण पावतो. गंधलोभी भुंग्यामध्ये लाकडाला सुद्धा तोडण्याचे सामर्थ्य आहे परंतु गंधामध्ये आसक्त झाल्यामुळे कमळाच्या नाजूक पानांनासुद्धा तोडून बाहेर निघत नाही व आपले प्राण गमावतो.

चक्षुरिन्द्रिय विषयाच्या लोभी पतंगाची अवस्था तर पहा ! एकदम रूपाच्या लोभाने दीव्याच्या ज्योतीवर येऊन पडतो आणि तत्काल मरून जातो. विषयासक्त जीव सिनेमा, नाटक पाहण्याच्या तीव्र लालसेने आपला वेळ, शक्ती, पैसा वाया घालवतो. कुणाचे सुंदर रूप पाहिले की त्यावर मोहित होतो; परंतु शरीराच्या स्वरूपाचा विचार करीत नाही. शरीर सप्तधातूने परिपूर्ण अशुची आहे. याच्या नवद्वारातून सतत दुर्गंधी मल वाहत असतो. अशा या दुर्गंधमय शरीरावर काय प्रेम करतोस ? सुन्दर सुन्दर रूप, ड्रेस, साड्या, नवीन आकाराची भांडी, फर्नीचर, नवीन नवीन डिझाईन पाहून लोभ सुटतो.

सागर शहरामध्ये एक कॉन्स्टेबल होता. तो वेश्येमध्ये आसक्त झाला. जी काही त्याच्याजवळ धनसंपत्ती होती ती वेश्येजवळ पोहचली. काही

दिवसांनी तो म्हातारा झाला. धन तर सर्व वेश्येजवळ निघून गेले होते, आता तिला काही परवा नव्हती. आता ती त्या शिपायाला आपल्या घरी घेत नव्हती तरी तो तिच्या घरासमोरच रात्रंदिवस पडून राहायचा. कोणी त्याला विचारले, भाऊ तुम्ही येथे का पडून राहता ? तो म्हणतो 'मी एवढ्यासाठी पडून राहतो की रात्री किंवा दिवसा ती कधी तरी घराबाहेर येईलच त्यावेळी मी तिला पाहून संतुष्ट होईन.' पहा विषयांधतेचा अंधकार, स्वतःचे सर्व धन, स्वाभिमान व सर्वस्व नष्ट झाले तरी विषयांची इच्छा नष्ट होत नाही.

हरणे सुंदर संगीत ऐकण्याच्या लोभाने शिकारीजवळ जाऊन उभारतात व पकडले जातात. संगीत कानावर पडले की कर्णेन्द्रियामध्ये आसक्त व्यक्ती देहभान विसरून जातो. गंधर्वसेना नावाची राजकन्या गानविद्येमध्ये अंत्यत कुशल होती. तिची अशी प्रतिज्ञा होती की, 'गाण्यामध्ये मला कोणी जिंकेल तो माझा स्वामी होईल'. गंधर्वसेनेच्या सौन्दर्यावर मोहीत होऊन अनेक राजकुमार येत होते, परंतु तेथे आल्यावर त्या सर्वांना निराश होऊन परत जावे लागे. गंधर्वसेनेच्या समोर गाण्यामध्ये कोणी उभे राहू शकत नव्हता. एक पांचाल नावाचा उपाध्याय गानशास्त्राचा चांगला अभ्यासक होता. त्याचीसुद्धा गंधर्वसेनेला पाहण्याची इच्छा झाली.तो आपल्या पाचशे शिष्यांना घेऊन पाटलीपुत्र नगराच्या उद्यानामध्ये येऊन थांबला. उन्हाळ्याचे दिवस होते. प्रवासाने थकल्यामुळे पांचाल एका झाडाच्या सावलीत झोपी गेला. त्याचे शिष्य शहर पाहण्यासाठी गेले.

गन्धर्वसेनेला त्याच्या पाण्डित्याची बातमी मिळाली. ती त्याला पाहण्यासाठी आली. तिने आजूबाजूला ठेवलेल्या पुष्कळ वीणा पाहून त्याची विद्वत्ता ओळखली. परंतु जेव्हा त्याच्या तोंडातून लाळ गळताना पाहिली तेव्हा तिला घृणा झाली. ती तेथून तत्काल निघून गेली. ती येऊन गेलेली समजल्यावर पांचालला खूप पश्चात्ताप झाला. निद्रेने आपला डाव बिघडवला असे त्याला वाटले. त्याने राजाकडे आपल्याला राहण्यासाठी एक स्थान मागितले. त्याचा अभिप्राय ओळखून राजाने राजकुमारीच्या महालाजवळच त्याची राहण्याची व्यवस्था केली.

एक दिवस पांचाल मध्यरात्रीच्या वेळी वीणा हातात घेऊन मधुर गाऊ

लागला. त्याचा मधुर गाण्याचा आवाज शांत नीरव रात्रीच्या वेळी गंधर्वसेनेच्या कानामध्ये जाऊन पोहचला. गंधर्वसेना गाढनिद्रेमध्ये होती; परंतु मनोमुग्ध करणाऱ्या मधुर संगीताला ऐकून खडबडून जागी झाली. उठून जिकडून गाण्याचा आवाज येत होता तिकडे धावत सुटली. या बेभान अवस्थेमध्ये पळतांना तिचा पाय निसटला व ती वरच्या मजल्यावरून खाली पडली. पाहता-पाहता तिचे प्राणपखेरू उडून गेले. या विषयासक्तीने ती पुन्हा संसारामध्ये दीर्घकाळ भटकली. केवळ कर्णेन्द्रियांच्या विषयलम्पटतेमुळे ती संसारसागरामध्ये बुडाली तर पाच इन्द्रियांच्या विषयामध्ये जे सदाकाल आकण्ठ मग्न होतात ते जर बुडाले तर यात काय नवल. विषयांची पीडा किती भयानक आहे ? त्यामध्ये आसक्तजीव आपल्या मरणालासुद्धा न जुमानता विषयांवर झडप घालतो व घोर संकटात सापडतो.

दुःखाशिवाय विषयव्यापाराची असंभावना –

विषयपीडित जीवांना जर स्वाभाविक दुःख नसते तर त्यांचा विषयामध्ये व्यापार दिसला नसता. विषयामध्ये एवढा खटाटोप चालू आहे तो दुःख दूर करण्यासाठीच. दुःखी मनुष्यच सुख मिळविण्यासाठी प्रयत्न करताना दिसतो. ज्याप्रमाणे ज्याला ज्वर झाला नाही तो घाम आणण्यासाठी कशाला प्रयत्न करेल. ज्याचा दाहज्वर उतरला आहे तो आरनालाचा शेक कशाला घेईल? ज्याला डोळ्यामध्ये रोग नाही तो डोळ्यात वटाचूर्ण का घालून घेईल? ज्याला कानामध्ये दुःख नाही तो बकरीचे मूत्र कानात कशाला घालून घेईल? ज्याची जखम बरी झाली आहे तो पुन्हा मलमपट्टी कशाला करेल ? हे उपचार जो करीत असेल तर तो रोगाने पीडित आहे हे आपण ओळखतो. त्याप्रमाणे जर इन्द्रियज्ञानवाल्या जीवांना स्वाभाविक दुःख नसते तर त्यांचा विषयामध्ये व्यापार दिसला नसता. ज्याचे पोट भरले आहे तो पुन्हा जेवायला बसत नाही. जेवायला बसला आहे याचा अर्थ तो भुकेने पीडित आहे हे निश्चित. ज्याला रोग नाही तो औषधीचे सेवन करीत नाही. आपला पण अनुभव पहा. डॉक्टरांनी पंधरा दिवसाचे औषध दिलेले असते. जर पाच-सहा दिवसातच रोगाची पीडा नष्ट झाली की आम्हाला औषध घेण्याचा कंटाळा येतो. त्याची आवश्यकता वाटत नाही. ते औषध तसेच पडून राहते. कोणीही दुःखाशिवाय

दुःख दूर करण्याचा प्रयत्न करीत नाही. इन्द्रियाधीन जीवांची विषयप्रवृत्ती दिसते याचा अर्थ त्यांना स्वाभाविक दुःख आहे.

विषयामध्ये प्रेम होण्याचे कारण स्वतःमध्ये भेदविज्ञानाचा अभाव आहे. ज्या जीवांनी असमान जातीय पर्यायरूप शरीरामध्ये अहंबुद्धी केली आहे, ते शरीराच्या व्यवहारामध्येच मग्न असतात व ज्यांना चैतन्यमात्र आत्मतत्त्वामध्ये अहंभावाचे श्रद्धान आहे ते 'मी चैतन्यमात्र आहे. ज्ञाता द्रष्टा राहणे माझे कर्तव्य आहे ' या भावनेने आत्मव्यवहारामध्ये मग्न होतात.

इन्द्रियांशी आम्ही मित्रता केली आहे तो निव्वळ धोका आहे. या शरीराचा व इन्द्रियांचा विश्वास सोडून असे श्रद्धान करावे की आत्म्याचा स्वभाव इन्द्रियरहित आहे. चैतन्यस्वरूप आहे. स्वभावाच्या उपासनेने प्रकट झालेला विकासच सुखाचे स्थान आहे. परोक्षज्ञानसुद्धा हितरूप व हितकारक नाही; म्हणून परोक्षज्ञानामध्ये व इन्द्रियसुखामध्ये हिताची बुद्धी व अहंबुद्धी सोडून द्यावी व स्वतःचे एक अखंड सामान्य प्रतिभासमय, अतीन्द्रिय आत्मतत्त्व जाणून त्याचाच अनुभव करावा.

मुक्त जीव शरीररहित आहेत. संसारी जीवांना शरीराच्या माध्यमातूनच सुख होताना भासित होते. शरीराशिवाय सुख भासित होत नाही. कारण शरीर आहे म्हणून गोड धोड, तिखट इ. आवडत्या पदार्थांचे सेवन करून जीव सुखी होतो. शरीराद्वारे प्रिय वस्तूंना स्पर्श करून सुखाचा अनुभव होताना प्रत्यक्ष दिसतो. डोळ्याने सुंदर रूप पाहून जीवाला आनंद होतो. जर शरीरच नसेल तर मुक्तजीवांना सुख कसे होऊ शकणार ? म्हणून मुक्त जीवांना सुख नाहीच अशी अज्ञानी जीवाची मान्यता आहे. त्याच्या मान्यतेचे निराकरण करून मुक्त जीवांमध्ये वास्तविक सुखाची प्रसिद्धी करण्याकरिता शरीर सुखाचे साधन नाही ही गोष्ट पुढील गाथेत सिद्ध करतात.–

पप्पा इट्ठे विसये फासेहिं समस्सिदे सहावेण ।
परिणममाणो अप्पा सयमेव सुहं ण हवदि देहो ।।६५।।

अन्वयार्थ – (**फासेहिं समस्सिदे**) स्पर्शनादिक इन्द्रियांनी आश्रित (**इट्ठे विसये**) इष्ट विषयांना (**पप्पा**) प्राप्त करून (**सहावेण**) अशुद्ध स्वभावाने (**परिणममाणो**) परिणमणारा (**अप्पा**) आत्मा (**सयमेव**) स्वयंच (**सुहं**)

सुखरूप (**हवदि**) होतो. (**ण देहो**) शरीर सुखरूप होत नाही.

संसारी अवस्थेमध्येसुद्धा इष्ट विषय सामग्रीद्वारे जीवच सुखाचा अनुभव करतो. शरीर सुखाचा अनुभव करीत नाही.

शरीरामध्ये सुखपरिणामाचा अभाव –

शरीर, शरीराची अवयवभूत द्रव्येन्द्रिये किंवा बाह्य पदार्थ यांच्यामध्ये सुख नाही. इंद्रियसुखसुद्धा संसारी आत्म्याला अशुद्ध भावामुळे अनुभवात येते. हा संसारी जीव प्रथम सुखासाठी इन्द्रिय विषयभोगाची इच्छा करतो. इच्छेची पीडा सहन न करू शकल्यामुळे ज्या पदार्थाविषयी सुखाची कल्पना होते त्याला भोगण्याची चेष्टा करतो. जर त्यांना भोगू शकला नाही तर आकुलताच राहते. जर कदाचित् त्यांचे ग्रहण झाले तर आपल्या रागभावामुळे 'मी सुखी झालो' अशी अज्ञानी जीव कल्पना करतो. ज्याप्रमाणे तहान लागली की थंड पाण्याला इष्ट मानून जीव त्याची इच्छा करतो. इच्छेची पीडा सहन न झाल्यामुळे ते थंड पाणी पिण्यासाठी प्रवृत्त होतो. पाणी नाही मिळाले तर दुःखी होतो व थंड पाणी मिळाले तर 'मी सुखी झालो' असे मानतो. थंड पाणी प्याल्यावर आत्माच आपल्या अशुद्ध भावरूप परिणमल्यामुळे सुखी होतो. शरीर सुखी होत नाही. जर शरीराला सुख होते असे मानले तर जड प्रेताला किंवा कृत्रिम मूर्तीला पाणी पाजल्यावर आनंद व्हायला पाहिजे. परंतु त्यांना सुख होताना दिसत नाही. शरीराला वस्त्र, अलंकार, पुष्पमाला इत्यादिकांनी नटविले तर शरीराला सुख होताना दिसत नाही. त्या शरीरात असणाऱ्या जीवाला त्या शरीरामध्ये आत्मबुद्धी असल्यामुळे 'शरीराची शोभा ती माझी शोभा आहे' अशा कल्पनेमुळे सुख होते. श्रद्धा, ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य हे आत्म्याचे गुण आहेत. ज्याप्रमाणे मिथ्यादर्शन व सम्यग्दर्शन हे एका श्रद्धा गुणाचे विभाव व स्वभाव पर्याय आहेत त्याप्रमाणे इन्द्रियसुख, दुःख व आत्मिक सुख हे सुखगुणाचेच विभाव व स्वभाव पर्याय आहेत. ज्या द्रव्यामध्ये जे गुण आहेत त्याच द्रव्यामध्ये त्या गुणांचे कार्य दिसून येते. शरीरामध्ये स्पर्श, रस, गंध व वर्ण हे गुण आहेत म्हणून शरीरामध्ये थंड–गरम, सुगंध–दुर्गंध, काळा–गोरा इ. परिणमन दिसून येते. सुख–दुःख हे शरीराचे परिणमन नाही म्हणून शरीर स्वयं सुखस्वरूप नाही, सुखाचे कारणसुद्धा नाही.

आत्मा स्वयं सुखस्वरूप –

ज्याप्रमाणे मद्यपायी व्यक्ती मत्त होऊन दारू पिण्यामध्ये प्रवृत्त होतो त्याप्रमाणे इन्द्रिये तीव्र मोहवश होऊन विषय ग्रहणामध्ये प्रवृत्ती करतात. मद्यपायी मोहवश दारूला इष्ट मानतो त्याप्रमाणे आत्मा मोहामुळे परविषयांना इष्ट मानतो. या कुसंस्कारामुळे त्याची शक्ती कुंठित होते. त्याप्रमाणे स्वभावविरूद्ध परिणमन केल्यामुळे आत्म्याचे सहज वीर्य कुंठित होते. आत्मशक्ती रोखली गेल्यावर सुद्धा जे ज्ञानदर्शनवीर्यस्वरूप स्वभावाने परिणमन करीत आहे त्या परिणमनामुळे जीव सुखरूप अवस्थेला प्राप्त करतो. शरीरसहित अवस्थेमध्ये सुद्धा जीवाच्या सुखरूप परिणतीचे कारण ज्ञानदर्शनसुखस्वरूप आत्मा आहे.

अचेतन असल्यामुळे शरीर सुखाचे उपादान कारण नाही. सुखस्वरूप परिणमन व शरीर भिन्न भिन्न द्रव्यामध्ये आहेत म्हणून शरीरामध्ये सुखकारणता नाही. म्हणून मुक्त जीवांना शरीर नाही तर त्यांना सुख कसे होऊ शकते अशी शंका करू नये. कारण संसारी जीवाला शरीर असूनसुद्धा जर ते सुखपरिणतीमध्ये निरूपयोगी आहे तर मुक्त जीवांना शरीर नसले तरी सुख होण्यामध्ये बाधा नाही.

जीव सुखरूप आहे. जीव व सुखामध्ये अविनाभाव आहे. जेथे जेथे सुख तेथे तेथे जीव व जेथे जेथे जीव आहे तेथे तेथे सुख आहे. जो जो जीव तो तो सुखमय आहे. जीवाची रचना सुखमय आहे. मी सुखमय आहे तर सुखी होण्यासाठी मला काहीही करण्याची गरज नाही. **मी सुखमय आहे हे स्वीकारणे हाच सुखी होण्याचा उपाय आहे.**

स्वतःला विसरून हैराण –

हा जीव या संसारामध्ये पराला आपले मानल्यामुळे व स्वतःला विसरल्यामुळे दुःखी आहे. ज्याप्रमाणे कोण्या व्यक्तीला परिवारासहित मरेपर्यंत कारावासाची शिक्षा झाली त्याला कारागृहामध्येच सन्तान उत्पन्न झाली. ती सन्तान मोठी झाल्यावर त्या तुरुंगालाच आपले घर मानते. कारण त्याला आपल्या घराची ओळख नाही. लहानपणापासून तुरुंगातच राहत असल्यामुळे तेच आपले घर भासित होते. त्याला कोण्या बुद्धिमान व्यक्तीने

तुरुंगाचा आणि घराचा भेद समजावून सांगितला; परंतु त्याला तुरुंगाचा मोह होता म्हणून तुरुंग सोडू इच्छित नाही. घाबरतो की हा आश्रय सोडला तर काय काय दुःख भोगावे लागेल कुणास ठाऊक ? म्हणून बंदीगृह सोडू इच्छित नाही. त्याला सदैव तुरुंगाचाच अनुभव आहे. घराच्या स्वतंत्रतेचा त्याला अनुभव नाही. म्हणून तेथेच मग्न आहे. कोणी बुद्धिमान मनुष्य त्याला त्याच्या घराचे दर्शन करवून त्याला क्षणभर का होईना घराच्या स्वतंत्रतेचा अनुभव करवेल तर तो तत्काल त्या तुरुंगाचा मोह सोडून देईल आणि घरी जाण्यासाठी तत्पर होईल.

त्याचप्रमाणे या संसारी जीवाने सदा शरीरच पाहिले आहे. त्यामुळे त्या शरीराचा साजशृंगार करण्याचीच इच्छा करतो. या शरीरापासून भिन्न असणाऱ्या निज आत्मगृहाची ओळख नाही म्हणून तेथे जाण्याची इच्छा करीत नाही. शरीरालाच स्वगृह मानल्यामुळे त्याचीच सेवा करतो. कोणी ज्ञानी पुरुषांनी शरीरापासून भिन्न आत्म्याची चर्चा केली तर ती याला रूचत नाही. सुखी होण्याकरिता या शरीरामध्येच मग्न होतो. जर कोणी अनुभवी पुरुषाच्या सदुपदेशाने शरीरापासून भिन्न निजचैतन्य आत्म्याचे दर्शन होऊन त्याचा अनुभव करेल तर शरीरावरचा मोह दूर होईल व स्वचैतन्य गृहामध्ये जाण्यासाठी तत्पर होईल.

सुख आपल्यामध्ये आहे. शरीरादी कोणत्याही बाह्य पदार्थामध्ये सुख नाही. शरीर, स्त्री, पुत्र, मित्र, धन, भोजन, वस्त्र इ. पदार्थ सुखदायी आहेत अशी मिथ्याबुद्धी सोडून द्यावी. आपल्याच कल्पनेने हे सुखदायी व दुःखदायी भासित होतात. हे पदार्थ जेव्हा आमच्या इच्छेनुसार वर्तन करतात तेव्हा इष्ट व सुखदायी वाटतात व जेव्हा हेच पदार्थ आमच्या इच्छेविरूद्ध वर्तन करतात तेव्हा ते अनिष्ट व दुःखदायी वाटतात. हे जाणून इन्द्रियसुखाचे उपादान कारण आपला अशुद्ध आत्मा आहे. पर पदार्थ निमित्तमात्र आहेत. सुख आत्म्याचा गुण आहे. म्हणून शरीररहित सिद्धांना अनंत अतीन्द्रिय आनन्द सदा विद्यमान आहे. स्वाधीन अनंत अतींद्रिय सुख भोगण्यासाठी आत्म्याला कर्मापासून मुक्त करावे. कर्मापासून मुक्त होण्यासाठी सहजानन्द व चैतन्य स्वरूप निज अंतस्तत्त्वामध्ये मग्न होण्याचा पुरुषार्थ करावा. अनन्त सुखसागरामध्ये डुबकी

मारली असता स्वाधीन सुखाचा आस्वाद होऊन पूर्णानन्द प्रकट होतो.

कोणी शंकाकार म्हणतो की मनुष्यांचे शरीर सप्तधातूंनी सहित, मलमूत्राने परिपूर्ण, रोगाने युक्त व क्षणभंगुर असल्यामुळे सुखाचे कारण नाही हे ठीक आहे, परंतु देवांचे वैक्रियिक शरीर सप्तधातुरहित आहे, मलमूत्राने रहित आहे, निरोगी व दीर्घकाळ टिकणारे आहे म्हणून ते तरी सुखाला कारण आहे. पूर्वोक्त शंकेचे आचार्य पुढील गाथेमध्ये समाधान करतात–

एगंतेण हि देहो सुहं ण देहिस्स कुणदि सग्गे वा ।
विसयवसेण दु सोक्खं दुक्खं वा हवदि समयादा ॥६६॥

अन्वयार्थ – (**एगंतेण हि**)एकान्ताने अर्थात नियमाने (**सग्गे वा**) स्वर्गामध्ये सुद्धा (**देहो**) शरीर (**देहिस्स**) शरीरधारी जीवाला (**सुहं ण कुणदि**) सुख देत नाही. (**दु विसयवसेण**) परन्तु विषयांच्या वश झाल्यामुळे (**सयमादा**) आत्मा स्वयं (**सोक्खं वा दुक्खं**) सुख अथवा दुःखरूप (**हवदि**) होतो.

स्वर्गामध्ये सुद्धा देवांचा जीवच सुखःदुखरूप होतो, त्यांचे शरीर सुखदुःखरूप होत नाही.

देवगतीमध्ये सुद्धा शरीरापासून सुखाची अनुत्पत्ती –

शरीर जड पुद्गलमय असल्यामुळे शरीर सुख अथवा दुःखरूप होत नाही. मनुष्यांचे शरीर अशुची आहे. त्यामध्ये रक्त, पू, मलमूत्र इत्यादी दुर्गंधमय पदार्थ भरलेले असल्यामुळे ते अपवित्र आहे. अनेक प्रकारच्या रोगांचे घर असल्यामुळे दुःखाचे कारण आहे. वात, पित्त, कफाची अधिकता झाल्यावर जीवाला त्रास होतो. त्यामुळे मनुष्य शरीर तर सुखाला कारण नाही, परंतु देवांचे शरीर वैक्रियिक आहे. देवांच्या शरीरामध्ये कोणत्याही प्रकारचा रोग होत नाही. रक्त, पू, मलमूत्राचा ही त्यांच्या शरीरात अभाव आहे. म्हणून देवांचे शरीर सुखाला कारण असेल अशी शरीरमोही जीवाची मिथ्या मान्यता आहे. ती मान्यता दूर करण्यासाठी आचार्य येथे सांगतात की भलेही देवांचे नाना रूप बदलणारे वैक्रियिक शरीर धातू उपधातुरहित कांतिमय, सदैव भूक, तहान व निद्रेच्या बाधेने रहित आहे तथापि देवांना सुख किंवा दुःख त्यांच्या अनादिकाळापासून चालत आलेल्या विषयवासनेमुळे होते. 'इंद्रियांचे विषय

भोगल्यामुळे सुख होईल' या वासनेने स्वर्गातील देव भोगाची तृष्णा शांत करण्यासाठी देवींच्या बरोबर क्रीडा करतात, रममाण होतात. त्यांचे नृत्य, गानादी ऐकतात. त्यामुळे क्षणभरासाठी आकुलता दूर झाल्यामुळे सुखाची कल्पना करतात. जर त्या देवीचे मरण झाले तर तिच्या वियोगामध्ये तिचा भोग करू शकत नसल्यामुळे दुःखाचा अनुभव करतात. शरीर दोन्ही अवस्थेमध्ये समानच आहे तरीसुद्धा हा जीव कषायवश कल्पनेने सुखी किंवा दुःखी होतो.

सांसारिक सुख वासनामात्र –

इष्टोपदेश ग्रंथामध्ये पूज्यपाद आचार्य म्हणतात –

वासनामात्रमेवैतत् सुखं दुःखं च देहिनाम् ।
तथा ह्युद्वेजयन्त्येते भोगा रोगा इवापदि ।।६।।

संसारी जीवांचे हे इन्द्रियजनित सुख किंवा दुःख वासनामात्र आहे. जे भोग अत्यंत सुखदायक वाटतात संकटकाळी ते भोगसुद्धा रोगाप्रमाणे दुःखदायी भासित होतात. जे सोन्याचे दागिने अंगावर परिधान करून आम्ही सुखाचा अनुभव करतो तेच दागिने जर आमच्या घरावर इनकम टॅक्सच्या ऑफीसरनी छापा घातला तर ते काट्या प्रमाणे टोचायला लागतात म्हणून ते काढून आम्ही त्याला कचऱ्यामध्ये लपवून ठेवतो. जे मिष्ट पदार्थ आपल्याला निरोगी अवस्थेत गोड लागतात तेच पदार्थ ताप आल्यावर कडू लागतात. सांसारिक सुख किंवा दुःख होण्यामध्ये रागद्वेषाची तीव्रता कारण आहे. जेव्हा एखाद्या इष्ट पदार्थाचा संयोग होतो तेव्हा राग उत्पन्न होतो. त्यामुळे हा जीव अत्यंत सुखाचा अनुभव करतो व इष्ट पदार्थाचा वियोग झाला असता त्या वियोगापासून द्वेषभाव होतो. त्यामुळे परिणाम अत्यंत संक्लेशरूप होतात. त्याचवेळी अरती व शोक नोकषायाचा तीव्र उदय होतो. त्यामुळे हा जीव दुःखाचा अनुभव करतो. जेव्हा अनिष्ट पदार्थाचा संयोग होतो तेव्हा द्वेष भाव उत्पन्न होतो. त्याचा संयोग दूर करण्यासाठी आकुलित होतो. तेव्हा अरती, भय, जुगुप्सा नोकषायाचा तीव्र उदय होतो. त्यामुळे जीव दुःखाचा अनुभव करतो. त्या अनिष्ट पदार्थाचा संयोग दूर झाला की तेथे रागभाव उत्पन्न होतो त्यामुळे हा जीव सुखी होतो.

वास्तविक परपदार्थाच्या संयोग व वियोगामुळे हा जीव सुखी दुःखी

नाही. त्या पदार्थामध्ये रागद्वेषवश केलेल्या इष्ट अनिष्ट कल्पनेमुळे सुखदुःखाचा अनुभव करतो. पदार्थामुळे सुखदुःख नाही. कारण जे पदार्थ कधी काळी इष्ट वाटतात त्यावेळी सुख भासित होते. तेच पदार्थ कधी काळी अनिष्ट वाटतात तेव्हा त्याच पदार्थामुळे दुःख भासित होते. जेव्हा पुत्राची उत्पत्ती होते तेव्हा हा जीव त्यामध्ये इष्ट कल्पना करून अत्यंत सुखी होतो. गावभर पेढे वाटतो व जेव्हा तोच मुलगा इच्छेविरूद्ध वागतो, दिवाळ काढतो, तेव्हा तो अनिष्ट वाटायला लागतो व त्यामुळे हा जीव दुःखी होतो व त्याला दूर करू इच्छितो. जर पदार्थ सुखदुःखाला कारण असते तर विशिष्ट पदार्थापासून सर्वांना सदैव सुखच व्हायला पाहिजे व विशिष्ट पदार्थापासून सर्वांना सदैव दुःखच व्हायला पाहिजे. परंतु तसे तर दिसत नाही. कारण एकच पदार्थ एकाच व्यक्तीला कधी सुखाला कारण तर कधी दुःखाला कारण होतो.

उन्हाळ्यामध्ये थंड हवा आम्हाला सुखकारक वाटते तर थंडीच्या दिवसात ती दुःखदायक वाटते. एकच पदार्थ कुणाला सुखदायक तर कुणाला दुःखदायक वाटतो. मनुष्याला वीष्टा दुःखदायक वाटते तर कुत्र्याला व डुकराला ती सुखकारक वाटते. एका खोलीत चार व्यक्ती झोपल्या असतील तेथे कुणाला पंख्याचे वारे इष्ट वाटते तर कुणाला अनिष्ट वाटते. ज्याला पंखा इष्ट वाटतो तो उठून पंख्याचे बटण चालू करतो. ज्याला ती हवा अनिष्ट वाटते तो उठून बटण बंद करतो. पुन्हा तिसरा व्यक्ती उठून चालू करतो. अशाप्रकारे रात्रभर खेळ चालू असतो.

तात्पर्य पदार्थ सुखदुःखाला कारण नाही तर रागद्वेषवश त्या पदार्थासंबंधी आम्ही इष्ट अनिष्ट कल्पना करतो तीच सुखदुःखाला कारण आहे.

जर बाह्य पदार्थापासून सुख झाले असते तर देव व श्रीमंत लोकांनी महा अंधकार माजवला असता, परंतु सुख तर ज्ञानाशी अविनाभावी आहे म्हणून या लोकांचे त्यावर वश चालत नाही. सुखावर अधिकार ज्ञानी लोकांचा आहे. मुक्त आत्म्यांना जे अनन्त अतीन्द्रिय सुख आहे तेथे तर आत्माच कारण आहे, शरीरादी नाही. संसारी मोही जीवांना जो सुखाभास प्रकट होतो तेथे सुद्धा त्यांचा आत्माच कारण आहे. कारण ते जीवच स्वयं सुख व दुःखरूप

परिणमतात. म्हणून आपल्या कोणत्याही परिणतीला बाह्य पदार्थापासून उत्पन्न झालेली पाहू नये. सुखाच्या प्राप्तीसाठी कोणत्याही बाह्य पदार्थाच्या पाठीमागे न लागता सुखमय आत्मस्वभावाची उपासना करावी.

सुख माझ्यामध्ये आहे. मी स्वयं सुखस्वभावी आहे हे जाणून स्वाधीन निर्विकार आत्मिक सुखाचा उपाय करणे हेच आपले कर्तव्य आहे. त्या सुखासाठी आपल्या शुद्धात्म्यामध्ये उपयोग लावून साम्यभावाचा अभ्यास करावा. सत्य सहज आनन्दाच्या प्राप्तीसाठी सहज ज्ञानस्वभावाची उपासना करावी.

आत्मा स्वयं सुखस्वभावी असल्यामुळे वास्तविक शरीर सुखाचे कारण नाही ही गोष्ट मागील दोन गाथेमध्ये स्पष्ट केली आहे. यावर विषयलोलुपी जीव म्हणतो, 'ठीक आहे, शरीर सुखाचे कारण नाही. परंतु भोजनादी बाह्य विषय सामग्री सुखाचे कारण आहे. कारण जेव्हा जेव्हा या विषयासक्त जीवाला इन्द्रियसुखाचा आस्वाद येतो तेव्हा तेव्हा विषय सामग्रीशिवाय सुखाचा आस्वाद येताना दिसत नाही. जीभेवर कोणतातरी स्वादिष्ट पदार्थ ठेवल्याशिवाय जिह्वेन्द्रियाचे सुख उत्पन्न होत नाही. संगीत ऐकल्याशिवाय कर्णेन्दियजनित सुख होत नाही. म्हणून बाह्यपदार्थ विषयरूपसुखाचे कारण आहेत.

अशाप्रकारे विषयामध्ये सुख भासित होणाऱ्या विषयानुरागी जीवाला पुढील गाथेमध्ये आचार्य दृष्टान्ताने सिद्ध करून दाखवितात की आत्मा स्वयं सुखस्वभावी असल्यावर तेथे विषयांची काय गरज ? सुखामध्ये विषयांची अकिंचित्करता प्रकट करतात.–

तिमिरहरा जइ दिट्ठी जणस्स दीवेण णत्थि कायव्वं

तध सोक्खं सयमादा विसया किं तत्थ कुव्वंति ॥६७॥

अन्वयार्थ – (**जइ**)जर (**जणस्स दिट्ठी**) प्राण्याची दृष्टी (**तिमिरहरा**) अंधःकारनाशक असेल तर त्याला (**दीवेण णत्थि कायव्वं**) दिव्याशी काही ही प्रयोजन नाही. (**तध**) त्याप्रमाणे (**आदा**) आत्मा (**सयं सोक्खं**) स्वयं सुखरूप आहे तर (**तत्थ**) तेथे (**विसया**) विषय (**किं कुव्वंति**) काय करू शकतात ?

तात्पर्य – जीव स्वयं सुखरूप परिणमतो, विषयभूत पदार्थ स्वयं सुखरूप परिणमत नाहीत व ते जीवाला सुखरूप परिणमवित नाहीत.

सुखस्वभावी आत्म्याला सुखरूप परिणमण्यामध्ये पराची अकिंचित्करता –

ज्याप्रमाणे रात्री विचरण करणाऱ्या गाय, म्हैस, मांजर, सिंह इत्यादी जीवांच्या डोळ्यामध्ये अंधाराला दूर करण्याचे स्वयं सामर्थ्य आहे तेथे त्या जीवांना पाहण्यासाठी दीव्याच्या प्रकाशाची आवश्यकता नाही, तेथे दीवा अकिंचित्करच आहे त्याप्रमाणे हा आत्मा विषयरहित अमूर्त संपूर्ण आत्मप्रदेशांमध्ये आल्हाद उत्पन्न करणारा आनंद स्वभाववाला आहे त्याला आनन्दी होण्यासाठी विषयभूत बाह्य पदार्थांची गरज नाही. आनन्दाच्या विकासासाठी बाह्य पदार्थ अकिंचित्कर आहेत. मोहामुळे हा संसारी प्राणी धन, स्त्री, पुत्र मित्रादी पदार्थांना सुखदायी मानतो. वास्तविक बाह्य पदार्थ जसेच्या तसे आपल्या स्वभावामध्ये आहेत. त्यांना आपापल्या गुणांमध्ये परिणमण्याचे कार्य सतत आहे. त्यांना आपल्याला सुखी करण्याची फुरसत नाही. कल्पनेनेच आम्ही काही पदार्थांना सुखदायी व काही पदार्थांना दुःखदायी मानतो. निश्चयाने कोणताही पदार्थ सुख अथवा दुःखरूप नाही किंवा दुसऱ्याला सुखी दुःखी करू शकत नाही.

प्रश्न– कोणी म्हणेल की ज्याप्रमाणे नक्तंचर प्राण्याला दीव्याच्या प्रकाशाची गरज नाही, परन्तु मनुष्य आदिकांना तर रात्री पाहण्यासाठी दीव्याच्या प्रकाशाची गरज लागते. त्याप्रमाणे मुक्त जीवांना सुखासाठी विषयभूत पदार्थांची आवश्यकता नाही. परंतु संसारी जीवाला सुखासाठी बाह्य विषयभूत पदार्थांची आवश्यकता आहे, तर मग विषय अकिंचित्कर कसे ?

उत्तर – ज्याप्रमाणे मनुष्यादिकांमध्ये पाहण्याचे परिणमन प्रकाश करीत नाही. पाहण्याचे व जाणण्याचे परिणमन आत्माच करतो. त्याप्रमाणे संसार अवस्थेमध्ये सुद्धा सुखरूप परिणमण्याचे कार्य विषयरूप पदार्थ करीत नाहीत, तेथेसुद्धा आत्माच स्वयं सुखरूपाने परिणमतो.

'न हि वस्तुशक्तयः परमपेक्षन्ते ' ज्या शक्ती वस्तूमध्ये स्वभावतः आहेत त्यांना पराची अपेक्षा असत नाही. साखर स्वयं गोड आहे. त्या साखरेला गोडरूपाने परिणमण्यासाठी दुसऱ्याची अपेक्षा नाहीच. त्याप्रमाणे

आत्मा सुखस्वरूपी आहे. त्याला सुखरूप परिणमण्यासाठी दुसऱ्याची अपेक्षा नाही. हा अज्ञानी जीव स्वतःच्या सुखस्वभावाला जाणत नाही म्हणून सुखासाठी अनेक साधनांचा संग्रह करण्याच्या पाठीमागे लागतो. जन्मभर सुखसामग्री गोळा करण्यामध्येच व्यस्त राहतो; परंतु एक क्षणही सुखाचा आस्वाद घेऊ शकत नाही. कारण तो सुखाचा पत्ताच चुकलेला आहे. त्याला वाटते धन मिळाले तर मी सुखी होईन. कारण धनाच्या अभावामध्ये शारीरिक गरजा भागवू शकत नाही त्यामुळे दुःखी होतो व धन ज्यांच्याजवळ आहे ते याला वरकरणी सुखी वाटतात. परंतु ते धनामुळे सुखी नाहीत, थोडी तत्कालीन आकुलता कमी झाल्यामुळे सुखी झाल्यासारखे वाटतात.

वास्तविक अंतःकरणामध्ये महातृष्णा असल्यामुळे महादुःखी आहेत. कोणी सोने, चांदी, रत्नामध्ये सुखाची कल्पना करतो. तर कोणी यश ख्यातीमध्ये सुखाची कल्पना करतो तर कोणी स्त्री, पुत्रामध्ये सुखाची कल्पना करतो तर कोणी पद प्रतिष्ठा मिळविण्यामध्ये सुखाची कल्पना करतो व रात्रंदिवस त्या गोष्टींच्या प्राप्तीसाठी महाकष्ट करतो. काही अंशाने त्याची प्राप्ती झाली की मी सुखी झालो असे मानतो. परंतु त्याची अंतरंग तृष्णा बळावत जाते त्यामुळे पूर्वीपेक्षा अधिक दुःखी होतो. वास्तविक सुखाकरिता शरीराची, धनाची, भोजनपान वस्त्रादिकांची आवश्यकता नाही. कारण त्या वस्तूंमध्ये सुखगुण नाही.

जी वस्तू जेथे असते तेथे ती वस्तू शोधावी तर प्राप्त होणार. जेथे जी वस्तू नाहीच तेथे ती शोधली तर ती कशी प्राप्त होणार ? आत्मा स्वयं सुखाची खाण आहे तेथे सुख शोधले असता नक्की प्राप्त होते.

ज्याप्रमाणे खीर गोड होण्यासाठी ज्याच्यामध्ये गोडी नाही असे मीठ टाकले तर खीर गोड होईल का ? नाही. उलट ती खारट होणार. त्याप्रमाणे सुखगुणरहित विषयांचा आश्रय घेऊन आत्मा सुखी होईल का ? आत्मा स्वयं सुखस्वभावी आहे म्हणून स्वयं सुखरूपाने परिणमला तर तेथे विषयांनी काय काम केले, ते निरर्थकच आहेत. कारण ज्यासाठी आम्ही या विषयांना ग्रहण केले ते काम आत्म्यांनी स्वयंच केले आहे. जर मालक स्वयं स्वतःच्या घरचे काम करायला समर्थ आहे तर तेथे नोकरांची काय गरज ? घरात नोकर

असूनसुद्धा स्वयं मालकाने काम केले तर नोकर निरर्थक आहेत. तसे सर्व विषयभोगांचे सान्निध्य असतानाही जर आत्म्याने स्वयं सुखरूपाने परिणमण्याचे कार्य केले आहे तर विषयभोग निरर्थक आहेत.

एकदा एका राजाला संसार-शरीर-भोगापासून वैराग्य झाले. त्यांनी आचार्यांजवळ परम निर्ग्रन्थ मुनि अवस्था धारण केली. ते सतत आत्मसाधनेमध्ये तत्पर झाले. उठता, बसता, चालता, बोलता त्यांच्या मुखातून 'अहो सुख' 'अहो सुख' असा शब्द बाहेर पडे. त्यांच्याजवळ असणाऱ्या संघातील साधूंना वाटत असे की हे पूर्वी राजे होते. त्यामुळे त्यांना अद्यापि ते राजसुख, विलास भोग आठवत असतील त्यामुळे सतत अहो सुख म्हणतात. ही गोष्ट आचार्यांच्या कानावर गेली. आचार्यांनी त्यांना बोलावून विचारले, 'तुम्ही सतत 'अहो सुख' का म्हणता ?'

तेव्हा त्या साधूंनी उत्तर दिले. 'गुरुवर, येथे मला जो निराकुल आत्मिक सुखाचा आस्वाद येत आहे तो अभूतपूर्व आहे. पूर्वी मी राजगादीवर असताना सतत आकुलताजन्य दुःखाचाच अनुभव करत होतो. पूर्वी जेवायला बसलो की कोणी अन्नामध्ये विष घातले असेल का म्हणून खाताना भिती वाटे. म्हणून सुखाने कधी जेवू शकलो नाही. राजसभेमध्ये बसलो तरी संरक्षक हातात तलवारी घेऊन दोन्ही बाजूला उभे असत, झोपलो तरी निवान्त नाही. सतत शत्रूच्या हल्याची भीती असे. सर्व जीवन भीती व चिन्तेमध्ये व्यतीत झाले. एक क्षणही सुखाचा अनुभव आला नाही. येथे मला कसलीही भीती वा चिंता नाही. राज्य अवस्थेमध्ये अत्यंत सुस्वादु, गरिष्ठ मेवा मिठाईचा स्वाद घेऊन सुद्धा सुख मिळाले नाही पण येथे नीरस भोजन करून सुद्धा मी अत्यंत सुखी समाधानी आहे. राजमहालामध्ये मऊ डनलपच्या गादीवर सुद्धा मी कधी सुखाने निश्चिन्तपणे झोपलो नाही पण येथे खडकाळ जमिनीवर मी थोडा काळ का होईना निश्चिन्त झोपतो. सतत आत्म्याच्या अनुभवाद्वारे आनंद सागरामध्ये पूर्ण बुडालो आहे. त्या सुखाचे वर्णन मी करू शकत नाही म्हणून मुखातून 'अहो सुख' असे उद्‌गार सहजच बाहेर पडतात.

राजैश्वर्यामध्ये सर्व प्रकारची विषयसामग्री असूनही सुखाचा अभाव होता व मुनि-अवस्थेमध्ये तिलतुषमात्र विषयसामग्री नसतानाही परम सुखी

आहेत यावरून लक्षात येते की सुखासाठी विषयभोग निरर्थक आहेत. आत्मिक सुखाचा तेव्हाच अनुभव होतो जेव्हा सर्व परपदार्थापासून मोह हटवून स्वतःमध्ये स्थिर होतो.'

आपल्या रोजच्या जीवनामध्ये सुद्धा आपण प्रयोग करावा की भोजन केल्यावर मी सुखी झालो असे वाटते, तेथे भोजन सुखी झाले की मी सुखी झालो ? भोजनातून सुख आले का ? याचा विचार करावा. भोजन तर प्रत्यक्ष सुखरूपाने परिणमलेले दिसत नाही. मीच सुखरूपाने परिणमतो. जर मीच सुखरूपाने परिणमतो तर मला भोजनाची काय आवश्यकता ? टी.व्ही. पाहिल्यावर मी सुखी झालो, टी. व्ही. सुखी झाले नाही. टी.व्ही. तून सुख आले नाही तर मला सुखासाठी टी.व्ही. पाहण्याची काय गरज ? गाणे ऐकल्यावर मी सुखी झालो, गाणे सुखरूपाने परिणमले नाही. गाण्यातून सुख आले नाही तर मला गाणे ऐकण्याची काय गरज ? जर मी स्वयं सुखस्वभावी आहे तर मी माझ्यापासून माझ्यामध्ये माझ्याद्वारे स्वयं सुखी होऊ शकतो तर मला या सर्व बाह्य पदार्थांची काय गरज ? अशाप्रकारे प्रयोगात्मकपद्धतीने परद्रव्यामधील सुखबुद्धी नष्ट करून निज आत्म्यामध्ये सुखबुद्धी उत्पन्न करावी. सुखासाठी सुखस्वभावी आत्म्याला जाणण्याची गरज आहे. करा प्रयोग व व्हा सुखी.

परपदार्थाला आपल्या सुखपरिणमनामध्ये अकिंचित्कर जाणून स्वतःला आनन्दस्वरूप ओळखून परविकल्पापासून हटावे व अविकल्प सहजानन्दमय चित्स्वभावामध्ये उपयोग लावावा. आता आत्मा सुखस्वभावी आहे हे एका दृष्टान्ताने दृढ करतात.–

सयमेव जहादिच्चो तेजो उण्हो य देवदा णभसि ।
सिद्धो वि तधा णाणं सुहं च लोगे तधा देवो ।।६८।।

अन्वयार्थ – (**जहा**) ज्याप्रमाणे (**णभसि**)आकाशामध्ये (**आदिच्चो**) सूर्य (**सयमेव**) स्वयंच स्वतःहून (**तेजो**) तेज, (**उण्हो**) उष्ण (**य**) व (**देवदा**) देव आहे. (**तधा**) त्याप्रमाणे (**लोगे**) लोकामध्ये (**सिद्धो वि**) सिद्ध भगवानसुद्धा (**णाणं**) ज्ञान, (**सुहं च**) सुख आणि (**तधा**) तसेच (**देखो**) देव आहेत.

भगवान स्वयं अनन्तज्ञानस्वरूप, अनन्तानन्दमय देव आहेत.

सूर्याच्या तेजस्वरूपाप्रमाणे आत्म्याची स्वयं ज्ञानस्वरूपता–

ज्याप्रमाणे आकाशामध्ये अन्य कारणांची अपेक्षा न ठेवता सूर्य स्वयमेव अत्यधिक प्रभासमूहाने दैदीप्यमान प्रकाशयुक्त असल्यामुळे तेजोस्वरूप आहे. त्या सूर्याला तेजस्वरूप त्या आकाशाने बनविले की पाहणाऱ्याने बनविले की त्यामध्ये कोणत्या परवस्तूतून तेज आणून साठविले आहे का ? नाही. सूर्य स्वयं तेजस्वरूप आहे तो अन्य कारणांची अपेक्षा ठेवत नाही. तो स्वयं प्रचुरस्वकिरणांनी प्रभासमूहांनी सदैव स्वयं प्रकाशमान आहे. त्याला कोणीही तेजोमय बनविले नाही त्याप्रमाणे लोकामध्ये भगवान आत्मासुद्धा अन्य कारणांची अपेक्षा न ठेवता स्वयमेव स्वपराला प्रकाशित करण्यामध्ये समर्थ यथार्थ अनन्त शक्तिस्वरूप सहज संवेदनाशी तादात्म्य असल्यामुळे ज्ञान आहे.

ज्याप्रमाणे सूर्य सदैव प्रकाशशील आहे त्याच्या खाली ढग येऊन जमले तर त्या ढगांनी त्याच्या तेजामध्ये काहीही विघात केला नाही, ढग आडवे आल्यामुळे सूर्याचा प्रकाश येथे येऊ शकत नाही, परंतु सूर्य आपल्यामध्ये तेजस्वरूप आहे त्याप्रमाणे कदाचित् संसार अवस्थेमध्ये या विकार भावांमुळे आत्म्याचे ज्ञानस्वरूप विकसित होऊ शकत नाही, परंतु ज्ञानस्वभावामध्ये पहा, काय ज्ञानस्वभाव नष्ट झाला आहे? नाही. आत्मा सदैव ज्ञानस्वरूपच आहे.

या प्रकरणामध्ये तर सिद्ध प्रभूंची गोष्ट सांगत आहेत. सिद्ध प्रभू प्रगट ज्ञानस्वरूप आहेत. शक्तीरूपाने पण ज्ञानस्वरूप व व्यक्त विकासरूपाने सुद्धा ज्ञानस्वरूप आहेत. संसार अवस्थेमध्ये आत्मा ज्ञानस्वरूप असूनसुद्धा ज्ञानरूप परिणमत नाही. उलटा परिणमतो, मिथ्याज्ञानरूप परिणमतो, परंतु त्यामुळे ज्ञानस्वभावाचा निषेध होत नाही.

आत्म्याची सहज आनन्दमयता –

ज्याप्रमाणे सूर्य स्वयं उष्णस्वरूप आहे, जसे लोखंड कधी कधी अग्नीच्या संपर्कात उष्णरूप परिणमते तसा सूर्य अग्नीच्या संपर्काने उष्णस्वरूप नाही. तो नित्यच स्वयं उष्णस्वरूप आहे. सूर्यामध्ये उष्णता बाहेरून आणली

नाही. त्याप्रमाणे सिद्ध आत्मा स्वयं आनन्दमय आहेत. त्यांच्यामध्ये आनन्द बाहेरून उधार आणलेला नाही. परनिरपेक्ष स्वतःमध्ये स्वयं परम तृप्तिरूप निराकुलता लक्षणमय आनन्दस्वरूप परिणमतात. संसार अवस्थेमध्ये जीव सुखरूप, आनंदस्वरूप न परिणमता क्लेशरूप, दुःखरूप परिणमतो; परंतु त्यामुळे आत्म्यामध्ये सुखस्वभावाचा विघात होत नाही. सुखस्वभाव स्वयं सुरक्षित आहे. जेव्हा तो आपल्या सुखस्वभावाला जाणतो तेव्हा स्वयं सुखरूप परिणमतो.

सहज आनंदलाभ –

आनन्द स्वरूप प्राप्त करण्यासाठी कोणत्याही उपायाचा विचार करण्याची गरज नाही, काही परिश्रम करण्याची गरज नाही. दुःखासाठी जो उपाय चिन्तत आहोत, जे परिश्रम करीत आहोत त्या परिश्रमाला व उपायाला सोडले तर आनन्द स्वयंच आहे.

ज्याप्रमाणे आरशामध्ये स्वच्छतेसाठी काही प्रयत्न करण्याची गरज नाही, तो तर स्वयं स्वच्छच आहे, त्यावर जी धूळ चिकटली आहे, तेलाचे डाग लागले आहेत त्याला हटविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्याप्रमाणे आत्म्यामध्ये आनंदासाठी उद्यम करावा लागत नाही. जेवढा हा आत्मा दुःखरूप, क्लेशरूप विपरीत परिणमला आहे त्या विपरीतपणाला मिटविण्यासाठी श्रम करावे लागतात. आनंदासाठी श्रम करावे लागत नाहीत.

श्रमाला दूर करण्याचे श्रम –

ज्या स्थानाहून जेवढा रस्ता हा जीव उलटा चालत गेला आहे त्या स्थानावर परत येण्यासाठी तेवढा रस्ता पुन्हा चालत येण्याचे श्रम करावे लागतात. ते चूक सुधारण्याचे श्रम आहेत. त्याचप्रमाणे आत्म्यामध्ये जेवढे उलटे चालत आहोत, इंद्रिय व मनाच्या विषयांमध्ये उपयोग आसक्त झाल्यामुळे ध्यानामध्ये, ज्ञानामध्ये मन लागत नाही त्या उपयोगाला विषय कषायापासून सोडविण्यासाठी श्रम करावे लागतात. उपयोग एकाग्र करण्यासाठी जो काही प्रयत्न करतो ते चूक सुधारण्याचे श्रम आहेत. देवपूजा, गुरूपास्ती, स्वाध्याय आदी व्यवहारधर्माचे जे पालन करतो ते अधर्मामध्ये लावलेल्या उपयोगाला बदलविण्यासाठी करतो. वास्तविक धर्मामध्ये काय

कष्ट आहेत ? आम्ही स्वयं धर्मस्वरूप आहोत. जी वस्तू जशी असते तिला तसे होण्यासाठी काय करावे लागते ? साखरेला गोड होण्यासाठी काय करावे लागते ? काहीही नाही .

आत्मा स्वयं धर्मस्वरूप आहे; परंतु त्या धर्माला तो विसरला आहे व अधर्मामध्ये त्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्या अधर्मस्वरूप उलट्या प्रवृत्तीपासून दूर होण्याकरिता प्रयत्न करावे लागतात. आत्मा स्वयं आनंदस्वभावी धर्मस्वरूप आहे.

आत्म्यामध्ये स्वयं दिव्यरूपता–

ज्याप्रमाणे सूर्य देवगतिनामकर्माचा सदैव उदयरूप स्वभाव असल्यामुळे ज्योतिषी देव आहे त्याप्रमाणे सिद्ध आत्मा ज्ञानी जीवांच्या मनरूपी शिलास्तंभावर ज्यांची स्तुती उत्कीर्ण आहे असे दिव्य आत्मस्वरूपवान असल्यामुळे देव आहे. सिद्ध भगवान सहज केवलज्ञानमय आहेत व स्वाधीन निजानन्दाचा भोग करीत परम आनंदस्वरूप आहेत म्हणून अभेद रत्नत्रयस्वरूप निर्विकल्प समाधिपासून उत्पन्न सुखरूपी अमृताचे पिपासू गणधर देवादी परम योगींना, इन्द्रादी देवांना व अन्य निकट भव्य जीवांना निरन्तर आराधना करण्यायोग्य, स्तुती करण्यायोग्य परम देव आहेत.

यद्यपि शुद्ध आत्म्यामध्ये अनंत गुणांचा विकास एकावेळी झाला आहे तथापि येथे ज्ञान व आनन्द या दोन गुणांचे मुख्यरूपाने कथन केले आहे. कारण या गुणांच्या द्वारे आम्ही आत्म्याचे अस्तित्व अन्य वस्तूपासून भिन्न ओळखू शकतो. जसा सिद्धांचा स्वभाव आहे तसाच आपल्या आत्म्याचा स्वभाव जाणावा. जो आत्मा स्वयं ज्ञान आहे, स्वयं आनन्दस्वरूप आहे, स्वयं देव आहे त्या आत्म्याला सुख साधनाभासांशी काय प्रयोजन ?

संसारदशेत आनंदगुणाच्या विपरीत इंद्रियसुख हे सुख नसून सुखाभास आहे. त्या सुखाभासाची साधनभूत विषयसामग्री साधनाभास आहे. या साधनाभासांचा आश्रय घेऊन सुखी होण्याचे स्वप्न आम्ही रंगवित आहोत; परंतु हे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. या साधनाभासांमुळे खरे सुख कधीही प्रगट होणार नाही. सुखाभासरूप सुखच प्रगट होणार म्हणून आता या साधनाभासांचा त्याग करून खऱ्या सुखाला कारणभूत सुखस्वभावी

आत्म्याचा आश्रय घ्यावा. ज्ञानानन्दस्वभावी आत्म्याला जाणावे, मानावे व निर्विकल्प समाधीच्याद्वारे त्याचाच अनुभव करावा ज्यायोगे अतींद्रिय शाश्वत सुख प्रगट होईल. परिपूर्ण निराकुल राहण्यासाठी आपल्या सहजानन्दस्वभावमय सहज ज्ञानस्वरूप अंतस्तत्त्वामध्ये उपयोग रमवावा.

आतापर्यंत ज्या अतीन्द्रिय ज्ञान व सुखाचे वर्णन केले त्या अतीन्द्रिय ज्ञान व सुखाला धारण करणाऱ्या अरिहंताचे स्वरूप आता येथे सांगतात. कोणत्याही गुणाचे केवळ वर्णन केले असता त्याची प्रतीती होत नाही. त्या गुणाने युक्त गुणीचे वर्णन केले असता त्या गुणाची प्रतीती येते. लौकिकामध्ये सुद्धा आपण पाहतो एखाद्या कलेचे केवळ आपण स्वरूप जाणून ती कला आत्मसात होत नाही. ती कला ज्याला अवगत आहे अशा कलावंताला पाहिले असता त्या कलेवर विश्वास उत्पन्न होतो व ती कला सहज अवगत होते. ती कला आपल्यामध्ये विकसित करण्यासाठी प्रयत्नशील होतो. म्हणून येथे त्या अतीन्द्रिय अनंत सुखाने संपन्न सर्वज्ञ भगवंतांचे वस्तुस्वरूपाने वर्णन करणेरूप मध्य मंगलाचरण करतात.

वस्तूचे यथार्थ वर्णन करणे हीच त्या वस्तूची यथार्थ स्तुती आहे. अरिहंतांना नमस्कार असो अशाप्रकारे नमस्कार शब्दाचा उच्चार न करता अरिहंतांच्या स्वरूपाचे वर्णन केले हीच त्यांची खरी स्तुती आहे व हाच त्यांना खरा नमस्कार आहे. यालाच वस्तुस्तवस्वरूप मंगलाचरण म्हणतात.

तेजो दिट्ठी णाणं इड्ढी सोक्खं तहेव ईसरियं ।
तिहुवणपहाणदइयं माहप्पं जस्स सो अरिहो ।।६८–१ ।।

अन्वयार्थ – (**तेजो**) प्रभामंडल (**दिट्ठी**) अनंतदर्शन (**णाणं**) अनंतज्ञान (**इड्ढी**) समवसरणादी विभूती (**सोक्खं**) अनंतसुख (**ईसरियं**) ईश्वरपणा (**तहेव**) तसेच (**तिहुवणपहाणदइयं**) तिन्ही लोकामध्ये प्रधानपणा आणि (**माहप्पं**) माहात्म्य (**जस्स**) ज्यांचे आहे (**सो अरिहो**) ते अरिहंत भगवान आहेत.

ही व यापुढील गाथा अमृतचन्द्र आचार्यांच्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये उपलब्ध नाही. जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये या दोन गाथा समाविष्ट आहेत. त्यावर तात्पर्यवृत्तीसुद्धा आहे. त्यानुसार येथे या गाथांचे विवरण देत

आहोत.

वस्तुस्तवस्वरूप नमस्कार –

येथे अरिहंतांच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे हाच त्यांना खरा नमस्कार आहे. कारण वस्तूचे जसे स्वरूप आहे तसे स्वरूप सांगितल्याने सुद्धा नमस्कार होतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा वस्तूबद्दल आपल्या मनात आदरभाव असतो तेव्हा आपण त्याच्या यथार्थ गुणांचे वर्णन करतो. त्याच्या गुणांचे वर्णन करणे हीच खरी त्याची स्तुती आहे व हाच त्याला नमस्कार आहे. एखाद्या व्यक्तीच्या आम्ही खूप वेळा पाया पडत असू; परंतु त्या व्यक्तीच्या विशेषता आपल्याला माहीत नाहीत, त्याचे गुण आपण ओळखत नाही तर त्याला केवळ शरीराने पाया पडणे व्यर्थ आहे जेव्हा एखाद्या व्यक्तीची विशेषता जाणतो तेव्हा त्याबद्दल पूज्यतेची भावना आपोआप उत्पन्न होते. **पूज्यतेची भावना उत्पन्न होणे हाच खरा नमस्कार आहे.**

अरिहंतांचे अंतरंग वैभव –

अरिहंत ही जीवाची शुद्ध अवस्था आहे. त्यांनी ज्ञानावरणादी चार घाति कर्मांचा नाश केला आहे त्यामुळे त्यांच्यामध्ये अनन्तज्ञान, अनन्तदर्शन, अनन्तसुख व अनन्तवीर्य प्रकट झाले आहे. या अनन्तचतुष्टयाने संपन्न असणे म्हणजेच अरिहंत अवस्था आहे. अनन्तचतुष्टय हेच आत्म्याचे निजवैभव आहे. अरिहंतांचे दर्शन करताना त्यांच्यामध्ये अनन्तचतुष्टयाचे दर्शन झाले पाहिजे. ज्याप्रमाणे एखाद्या गुणी व्यक्तीला पाहताना त्याच्यामध्ये असणाऱ्या गुणांचे दर्शन होते त्या गुणांनी युक्तच त्या गुणी व्यक्तीला आपण पाहतो. त्याप्रमाणे अरिहंतांना पाहताना अनन्तदर्शन, अनन्तज्ञान, अनन्तसुख व अनन्त वीर्यमय असे ते अरिहंत प्रभू दिसले पाहिजेत. बाहेरून दिसणारे शरीर किंवा शारीरिक सौन्दर्य म्हणजे अरिहंत नव्हेत.

या अनन्तचतुष्टयाबरोबर अन्य अनंतगुण ही त्यांच्यामध्ये विकसित झाले आहेत. अरिहंत प्रभू क्षुधा-तृषादी १८ दोषांनी रहित झाले आहेत. म्हणून ते निर्दोष वीतरागी आहेत. **दोषांचा अभाव व गुणांचा विकास हे पूज्यतेचे कारण आहे** म्हणून ते त्रिलोकपूज्य आहेत.

अरिहंताचे बाह्य वैभव –

अरिहंतांचे शरीर सप्तधातुरहित परम औदारिक बनले आहे. त्यांचे शरीर करोडो सूर्यापेक्षा अधिक दीप्तिमान आहे. त्यांच्या शरीराची कांती चारी बाजूला पसरते त्यामुळे त्यांच्या भोवती एक तेजोवलय तयार होते. त्यांच्या शरीराला भोजनपानाची आवश्यकता नाही. चारी बाजूंनी शरीराला पुष्टिकारक, सुगंधमय नोकर्म परमाणूंना नित्य ग्रहण करतात. त्यांच्या सातिशय पुण्यकर्माचा तीव्र उदय आहे की ज्यामुळे स्वर्गातील इन्द्र समवशरणाची रचना करतो. त्यामध्ये देव, मनुष्य, तिर्यंच बारा सभेमध्ये यथास्थान बसून भगवंतांची अनक्षरात्मक दिव्यध्वनी आपापल्या भाषेमध्ये ऐकून धर्माचे स्वरूप समजून घेतात.

मोठमोठे गणधर, मुनी, चक्रवर्ती, राजे लोक, स्वर्गातील इंद्रादिक देव त्यांची आराधना करतात म्हणून ते ईश्वरपणाला प्राप्त झाले आहेत. तिन्ही लोकाचे स्वामी इन्द्र त्यांच्या चरणावर नतमस्तक होतात म्हणून ते तीन लोकाचे प्रधान देव आहेत. अशाप्रकारे अद्‌भुत माहात्म्याचे धारक श्री अरिहंत प्रभू आहेत.

अरिहंतांच्या परम सौम्य वीतरागमय परम शांत मुद्रेचे दर्शन करून भव्य जीव परमशांतीचा अनुभव करतात व त्यांच्यासारखी अनन्त शान्ती प्राप्त करण्याकरिता त्यांचा आदर्श ग्रहण करतात व त्यांचे अनुकरण करतात.

जिनसेवा हीच आत्मसेवा –

जोपर्यंत आपण निर्विकल्प समाधीमध्ये आरूढ होत नाही तोपर्यंत अरिहंत भगवंतांची पूजा, भक्ती, आराधना करण्यायोग्य आहे. परमपुरुषांची सेवा आमच्या भावविशुद्धीला विकसित करते. अरिहंत भगवान वीतराग असल्यामुळे भक्ती करणाऱ्यावर प्रसन्न होत नाहीत किंवा निंदा करणाऱ्यावर द्वेष करीत नाहीत. त्यांची भक्ती केल्यामुळे आमचे भाव शुभ होतात व स्वयं पुण्याचा बंध होतो. त्यांचा अनादर केल्यामुळे अशुभ भाव होतात व पापाचा बंध होतो. ते वीतराग व समदर्शी आहेत. त्यांचे दर्शन, पूजन व स्तवन केल्यामुळे आमचा फायदा होतो, त्यामुळे त्यांचा काही फायदा–तोटा नाही. त्यांच्या पुण्य गुणांचे स्मरण केल्यामुळे आमचे मन पवित्र होते. जो स्वतःसाठी

प्रभूंची भक्ती करतो त्याची भक्ती उत्कृष्ट होते.

अकबर बादशहाच्या दरबारी तानसेन नावाचा उत्कृष्ट गायक होता. एकदा अकबर बादशहाने तानसेनचे गायन ऐकून विचारले ''तानसेन ! काय यापेक्षा ही चांगले गाणे कोणी म्हणू शकतो ? '' तेव्हा तानसेन म्हणाला '' जी महाराज, माझे गुरू आहेत, ते यापेक्षा ही सुंदर गायन करू शकतात.''

अकबर म्हणाला ' मी तुझ्या गुरूंचे दर्शन करण्याकरिता येईन!' अकबर बादशहा तानसेनबरोबर त्याच्या गुरूच्या झोपडीमध्ये गेला. सकाळची वेळ होती. तानसेनचे गुरू भगवंतांची भक्ती करत होते. बादशहा ते ऐकून बेहोश झाला. तानसेनने बादशहाला हलवून सजग केले व परत घेऊन आला. बादशहाने विचारले, ' तानसेन तू असे गाऊ शकत नाहीस काय ?' तानसेन म्हणाला, ' नाही, हुजूर !' बादशहाने विचारले , ' का ? ' तेव्हा तानसेन म्हणाला, '**वे अपने लिए गाते हैं और मैं आपके लिए गाता हूँ**' हा फरक आहे. भगवंतांची भक्ती भोगाकरिता, मान बढाईकरिता केली तर ती खरी भक्ती नाही. ती तर नोकरी करून पोट भरल्यासारखे आहे. **जी भक्ती त्यांच्यासमान बनण्याकरिता त्यांच्या गुणांमध्ये अनुरागपूर्वक होते ती खरी भक्ती आहे. जेथे देण्याघेण्याच्या गोष्टी आहेत ती भक्ती नाही, तो व्यापार आहे.**

अरिहंत भगवंतांची भक्ती करता करता त्यांच्यासमान आपल्या आत्म्याचे स्वरूप जाणून आत्म्याचा अनुभव करावा. जिनदर्शनाचे फळ निजदर्शन आहे. निजदर्शनाद्वारे अखंड अविनाशी मोक्ष साम्राज्य हस्तगत होते.

आता पुढील गाथेत सिद्ध भगवंतांच्या गुणांची स्तुती करून त्यांना नमस्कार करतात.

तं गुणदो अधिगदरं अविच्छिदमणुवदेवपदिभावं ।
अपुणब्भावणिबद्धं पणमामि पुणो पुणो सिद्धं ।।६८-२।।

अन्वयार्थ -(**गुणदो अधिगदरं**) अरिहंतापेक्षा गुणाने अधिक (**अविच्छिदमणुवदेवपदिभावं**) मनुष्य व देवांच्या स्वामीपणाचे ज्यांनी उल्लंघन केले आहे (**अपुणब्भावणिबद्धं**) जे मोक्षाशी निबद्ध आहेत (**तं सिद्धं**) त्या सिद्धांना मी (**पुणो पुणो**) पुन्हपुन्हा (**पणमामि**) नमस्कार करतो.

या गाथेमध्ये सिद्धांची तीन विशेषणे दिली आहेत. १) गुणांने अधिक २) मनुष्यदेवांच्या स्वामिपणाचा अभाव ३) मोक्षनिबद्ध.

१) गुणाने अधिक –

सिद्ध अवस्था अरिहंतापेक्षा श्रेष्ठ अवस्था आहे. अरिहंत चार अघातिकर्माने सहित आहेत. शरीरसहित आहेत. म्हणून त्यांना अव्याबाध सुख नाही. सिद्ध भगवंतांनी चार अघातिकर्मांचा नाश केला आहे. म्हणून त्यांना अव्याबाध सुखाची प्राप्ती झाली आहे. चार अघातिकर्मांच्या अभावामध्ये अवगाहनत्व, सूक्ष्मत्व, अगुरुलघुत्व व अव्याबाधत्व हे चार प्रतिजीवी गुण सिद्धांमध्ये प्रकट झाले आहेत. अरिहंतांमध्ये हे चार गुण प्रकट नाहीत म्हणून अरिहंतांपेक्षा सिद्ध गुणाने अधिक आहेत.

२) मनुष्यदेवांच्या स्वामिपणाचा अभाव –

पूर्वी अरहंत अवस्थेमध्ये मनुष्य, देव व इन्द्रादिक समवशरणामध्ये येऊन नमस्कार करीत होते. आता सिद्ध अवस्थेमध्ये समवशरण नाही. देवादिक येऊन प्रत्यक्ष नमस्कार करीत नाहीत. म्हणून मनुष्यदेवांच्या स्वामिपणाचा अभाव आहे असे म्हटले आहे. परंतु याचा अर्थ मनुष्य व देव सिद्धांची आराधना करीत नाहीत किंवा त्यांना आपला स्वामी मानत नाहीत असे नाही. गाथेमधील 'अविच्छिदमणुवदेवपदिभावं' दोन पदे एक मानली असता पूर्वी सांगितलेला अर्थ निघतो. पं. शीतलप्रसादजींनी या दोन पदांना वेगळे मानून असा अर्थ केला आहे की सिद्ध भगवान अविनाशी आहेत. त्यांच्या अवस्थेचा कधी अभाव होत नाही. तसेच ते मनुष्य व देवांच्या स्वामिपणाला प्राप्त आहेत. या तिन्ही लोकामध्ये त्यांच्यापेक्षा महान कोणी नाही. इन्द्र, नरेन्द्र, तीर्थंकर, गणधरादिक मुनीश्वर सुद्धा छद्मस्थ अवस्थेमध्ये सिद्धांचे ध्यान करतात.

३) मोक्षनिबद्ध–

सिद्ध भगवान मोक्षाशी निबद्ध आहेत. त्यांची अवस्था निश्चल आहे. द्रव्य, क्षेत्र, काल, भव, भावरूप पंच परावर्तनरूप संसाराहून मोक्ष विलक्षण आहे. स्वात्मोपलब्धी हे मोक्षाचे लक्षण आहे. सिद्धांनी मुक्तिरूपी सुंदरीला वरले आहे. आता ते मुक्तिवधूला सोडून अन्यत्र कोठेही रममाण होत नाहीत.

कारण संसृतिरूपी रमणीचा त्रास ते भोगून चुकले आहेत व मोक्ष ही सर्वोत्कृष्ट अवस्था आहे. तेथे भय, चिन्ता, शोक, पीडा इत्यादी कोणत्याही प्रकारचा क्लेश नाही व आकुलता नाही. निराकुल शाश्वत आनंदमय शान्त निरामय अवस्था आहे. तेथे गेलेला जीव परत कधीही येत नाही. अशाप्रकारे सिद्ध जीव मोक्षाशी निबद्ध आहेत.

आचार्य म्हणतात अशा सिद्धांना मी पुन्हपुन्हा नमस्कार करतो. तुम्हीसुद्धा यांचीच भक्ती करा. कारण यांच्याद्वारे मोक्षाचा मार्ग प्रकट होईल व परमसुखाची प्राप्ती होईल. अरिहंत व सिद्ध, साधक जीवांचे आराध्य देव आहेत. त्यांची आराधना केल्याने मोक्षाचा मार्ग सुलभ होतो.

६८ नंबरच्या गाथेपर्यंत आनन्दप्रपंच नावाचा अंतराधिकार समाप्त झाला. आता यापुढे शुभपरिणाम अधिकार प्रारंभ करतात. जयसेन आचार्यांच्या अभिप्रायाने सर्वप्रथम १४ गाथांमध्ये पीठिकेचे वर्णन, नंतर ७ गाथांमध्ये सामान्य सर्वज्ञसिद्धी, त्यानंतर ३३ गाथांद्वारे ज्ञानप्रपंच व त्यानंतर १८ गाथांद्वारे सुखप्रपंच अशाप्रकारे ७२ गाथांद्वारे व चार अन्तराधिकारांद्वारे शुद्धोपयोग नावाचा अधिकार पूर्ण झाला. येथून पुढे २५ गाथांपर्यंत ज्ञानकंडिकाचतुष्टय नावाचा अधिकार प्रारंभ करतात. त्यापैकी शुभ व अशुभ उपयोगासंबंधी मूढता (अज्ञान) दूर करण्यासाठी १० गाथांमध्ये प्रथम ज्ञानकंडिका आहे. आप्त व आत्मा यांच्या स्वरूपासंबंधी मूढता दूर करण्यासाठी ७ गाथांद्वारे दूसरी ज्ञानकंडिका आहे. द्रव्य-गुण-पर्यायाच्या स्वरूपासंबंधी मूढता दूर करण्यासाठी ६ गाथांमध्ये तिसरी ज्ञानकंडिका आहे. स्व आणि परतत्त्वाच्या ज्ञानासंबंधी मूढता दूर करण्याकरिता दोन गाथांपर्यंत चौथी ज्ञानकंडिका आहे.

त्यापैकी प्रथम ज्ञानकंडिकेमध्ये सर्वप्रथम इंद्रियसुखाला साधनभूत शुभोपयोगाच्या स्वरूपाचे वर्णन करतात. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी शत्रूंचे सहाय्यक कोण आहेत, कोणाच्या बलावर शत्रू एवढा समर्थ झाला आहे हे जाणणे आवश्यक आहे. शत्रूचा नाश करण्यासाठी सरळ शत्रूवर वार करायला गेलो तर शत्रूचा नाश होईल की नाही सांगता येत नाही, उलट आपणच तेथे फसण्याची शक्यता आहे. शत्रूला जिवंत ठेवणारी व शत्रूला पुष्ट

करणारी जी साधने आहेत त्यांना प्रथम बाजूला केले पाहिजे.

या विधीने शत्रूचा आम्ही सहज नाश करू शकतो. इंद्रियसुख हे आमच्या ज्ञानानन्दस्वरूप साम्राज्याच्या प्राप्तीमध्ये बाधक असल्यामुळे ते आमचा शत्रू आहे. त्या इन्द्रियसुखावर विजय मिळविण्यासाठी त्या इन्द्रियसुखाला कोण जिवंत ठेवते, त्याला कोण पुष्ट करते याचा शोध घेतला पाहिजे. त्या इन्द्रियसुखाचे साधन शुभोपयोग आहे, शुभोपयोगाच्या सद्भावामुळे इन्द्रियसुख जिवंत आहे म्हणून त्या शुभोपयोगाचे स्वरूप पुढील गाथेत सांगतात.–

देवदजदिगुरुपूजासु चेव दाणम्मि वा सुसीलेसु ।
उववासादिसु रत्तो सुहोवओगप्पगो अप्पा ।।६९।।

अन्वयार्थ – (**देवदजदिगुरुपूजासु**) देव, यती व गुरूंच्या पूजेमध्ये (**चेव दाणम्मि**) आणि दानामध्ये (**सुसीलेसु**) तसेच उत्तम शीलामध्ये (**उववासादिसु**) उपवासादिकांमध्ये (**रत्तो अप्पा**) अनुरक्त आत्मा (**सुहोवओगप्पगो**) शुभोपयोगात्मक आहे.

देवपूजा, गुरूपास्ती, दान, शील, व्रत तपादिकांमध्ये ज्याचा उपयोग लीन आहे तो शुभोपयोगी जीव आहे.

अशुभोपयोग भूमिकेचे उल्लंघन केल्यावर शुभोपयोग भूमिका –

कोणत्याही पदार्थासंबंधी द्वेषरूप भाव असो तो सर्व अशुभोपयोगच आहे. क्रोध व मान कषाय द्वेषरूप आहेत. द्वेषामध्ये शुभ, अशुभ असा भेद नाही. द्वेष अशुभच आहे. राग दोन प्रकारचा आहे. १) शुभराग व २) अशुभराग. पाच इन्द्रिय विषयांचा अनुराग हा अशुभराग आहे. जेव्हा त्या इष्ट विषयांमध्ये प्रीती उत्पन्न होते तेव्हा या मोही जीवाला मी काही पाप करतो असे भासित होत नाही. उलट विषयामध्ये आनंद मानतो. विषयासंबंधी अनुराग अशुभोपयोग आहे व अशुभोपयोग दुःखाला कारण आहे. जो जीव अशुभोपयोग भूमिकेचे उल्लघंन करून देवगुरुपूजा, दान, शील, उपवासादिकामध्ये प्रीतिरूप धर्मानुराग स्वीकार करतो तो शुभोपयोगरूप भूमिकेवर आरूढ होतो.

देवपूजा –

पूजा, दानादी केवळ बाह्य क्रिया करणे म्हणजे शुभोपयोग नाही. अरिहंतादिकांच्या गुणांवर प्रीतिरूप जो जीवाचा परिणाम आहे त्याला शुभोपयोग म्हटले आहे. प्रीती उत्पन्न होण्यासाठी ज्यांची पूजा करतो त्यांच्या गुणांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जर गुणांचा महिमा भासित झाला तरच त्या गुणांनी युक्त गुणीवर सुद्धा प्रीती उत्पन्न होते. अरिहंत व सिद्ध यांना येथे देवता म्हटले आहे. अरिहंत भूक इत्यादी अठरा दोषांनी रहित निर्दोष आहेत. सर्वज्ञ व सर्वदर्शी आहेत. अतीन्द्रिय अनंत सुखसंपन्न आहेत. सिद्ध भगवान सर्व कर्मांनी रहित शरीरविरहित अशरीरी, अनंत गुण संपन्न आहेत. हे दोघेही पूजण्यायोग्य देवता आहेत. तिन्ही लोकामध्ये सर्वोत्कृष्ट पदार्थ आहेत. यांच्या गुणांमध्ये प्रीती वाढवून एकाग्रमनाने पूजा करणे शुभोपयोग आहे. अरिहंतांच्या प्रतिबिंबाद्वारे सुद्धा साक्षात् समवसरणामध्ये स्थित अरिहंत भगवंतांप्रमाणे भक्ती होऊ शकते. द्रव्यपूजेच्या अवलंबनाने भावपूजा होते. **पूज्य पुरुषांच्या गुणांमध्ये उपयोग भिजणे हीच खरी भावपूजा आहे.** ज्याप्रमाणे नमस्कार दोन प्रकारचा आहे, द्रव्य नमस्कार व भाव नमस्कार. त्याप्रमाणे पूजेचे दोन भेद आहेत, द्रव्यपूजा व भावपूजा. ज्याप्रमाणे ज्यांना नमस्कार करतो त्यांच्या गुणांमध्ये लीन होणे भावनमस्कार आहे, त्याप्रमाणे ज्यांची पूजा केली जाते त्यांच्या गुणांमध्ये तन्मय होणे भाव पूजा आहे. ज्याप्रमाणे वचनाने 'नमोस्तु' शब्द बोलणे व कायेने हात जोडणे द्रव्यनमस्कार आहे त्याप्रमाणे पूज्य पुरुषांच्या गुणांची स्तुती करणे, शरीर नमणे, अष्टद्रव्य चढविणे ही द्रव्यपूजा आहे. भावपूजा हीच खरी पूजा आहे. द्रव्यपूजा बाह्य साधनमात्र आहे. भावपूजेशिवाय द्रव्यपूजा कार्यकारी नाही.

अरिहंत व सिद्धांची भक्ती आपल्या परिणामांच्या निर्मलतेसाठी करावी. परिणामांच्या निर्मलतेपूर्वक जो शुभराग होतो तो उत्कृष्ट शुभोपयोग आहे. ज्यांना इन्द्र, धरणेन्द्र, चक्रवर्ती, साधू व गणधरादी महापुरुष पूज्य मानतात, तेच गृहस्थांकडून पूजण्यायोग्य देव आहेत, यांना सोडून रागद्वेषसहित कर्मबंधनाने बद्ध, जन्ममरणशील, स्वर्ग–मध्य व पातालामध्ये स्थित कोणत्याही जीवांना देवता मानून त्यांची पूजा आराधना करणे योग्य

नाही.

गुरूपास्ती –

इन्द्रियांच्या विषयांची इच्छा सोडून शुद्धात्मस्वभाव प्रगट करण्याकरिता रत्नत्रयमय धर्मामध्ये प्रयत्नशील साधूंना यती म्हणतात. यांची पूजा करणेसुद्धा शुभोपयोग आहे. त्यांच्यातील सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र गुणांवर प्रीती करणे ही खरी पूजा आहे. त्यांच्यातील समताभावरूप साधुतेचे दर्शन करणे खरे साधुदर्शन आहे. त्या रत्नत्रय गुणाच्या प्राप्तीच्या इच्छेने साधक त्यांची आराधना पूजा करतो.

जे साधू स्वयं भेदाभेद रत्नत्रयाची साधना करतात व दुसऱ्या जीवांना साधना करवितात, भव्य जीवांना दीक्षा देतात त्यांना आचार्य म्हणतात. जे शास्त्राचे शिक्षण देतात ते उपाध्याय गुरु आहेत. यांच्या पूजेमध्ये तत्पर उपयोग शुभोपयोग आहे. 'देवदजदिगुरुपूजासु' या एका पदाने अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व साधु या पंच परमेष्ठींची भक्ती सूचित केली आहे.

दान–

दान चार प्रकारचे सांगितले आहे. आहारदान, औषधदान, ज्ञानदान, अभयदान. भक्तिपूर्वक उत्तम, मध्यम व जघन्य पात्राला दान देण्यासंबंधी प्रीतिरूप परिणाम शुभोपयोग आहे. गृहस्थ चारही प्रकारचे दान देतो. मुनिराज ज्ञानदान व अभयदान देतात. ज्याप्रमाणे पूजा करण्यामध्ये कषाय मंद होतात त्याप्रमाणे दान देण्यामध्ये कषाय मंद होतात. धनादी परिग्रहासंबंधी ममत्व कमी होते.

शील –

सुशील म्हणजे महाव्रतरूप मुनींचे व अणुव्रतरूप श्रावकांचे व्यवहार चारित्र होय. पाच महाव्रते, पाच समिती व तीन गुप्तिरूप तेरा प्रकारच्या चारित्रामध्ये मुनींची लीनता व पाच अणुव्रते, तीन गुणव्रते व चार शिक्षाव्रतरूप चारित्रामध्ये श्रावकांची लीनता हा सर्व शुभोपयोग आहे.

तपश्चरण–

उपवासादिक या पदाने बारा प्रकारचे तप ग्रहण करावे. बारा प्रकारच्या तपांमध्ये मुनींनी पूर्णरूपाने व श्रावकांनी एकदेशरूपाने लीन व्हावे. या सर्व

तपामध्ये मुख्य तप ध्यान आहे. ध्यान करण्यामध्ये उत्साह असणे व ध्यानाच्या सिद्धीसाठी उपवासामध्ये अनुराग करणे, रसत्याग, विविक्त शय्यासन इत्यादी बार तपांमध्ये तत्परता असणे शुभोपयोग आहे. या शुभोपयोगरूपाने परिणमणारा जीव स्वयं शुभोपयोगी होतो. शुभोपयोगामध्ये वर्तन केल्याने हा जीव अशुभोपयोगापासून वाचतो व तो शुभोपयोग शुद्धोपयोगामध्ये चढण्यासाठी शिडीस्वरूप होतो.

इन्द्रियसुखाचे साधन शुभोपयोग –

शुभोपयोगाचे फळ इन्द्रियसुख आहे. कारण इन्द्रियसुखाचे निमित्त पुण्यकर्माचा उदय आहे. पुण्याच्या सत्तेशिवाय पुण्याचा उदय होऊ शकत नाही. पुण्याची सत्ता पुण्यबंधाशिवाय होऊ शकत नाही. पुण्यबंधाचे निमित्त शुभोपयोग आहे. शुभोपयोगाचे निमित्त कषायाचा मंदोदय व त्याचे नोकर्म (निमित्त) देव, यती, गुरु, दुःखी जीव, तत्त्वजिज्ञासु, शुभक्रिया इत्यादी आहेत.

इन्द्रियसुख हेय आहे म्हणून इन्द्रियसुखाचे साधनभूत शुभोपयोग सुद्धा हेय आहे. कारण ज्या वृक्षाचे फळ हानिकारक आहे म्हणून त्याज्य आहे त्या फळाला कारणभूत वृक्षाचे बी ग्राह्य कसे असेल ? ते सुद्धा त्याज्यच असणार. बी पेरले की वृक्षाची उत्पत्ती नियमाने होते व त्याला फळेसुद्धा येतात. म्हणून जे फळ नको असेल त्याचे बीसुद्धा पेरू नये. इन्द्रियसुख मोक्षमार्गामध्ये बाधक आहे, दुःखाला कारण आहे, दुःखरूप आहे म्हणून सोडण्यायोग्य आहे. इन्द्रियसुख नको असेल तर त्या इन्द्रियसुखाचे बी शुभोपयोग आहे. त्याचासुद्धा त्याग करणे योग्य आहे. परन्तु शुद्धोपयोग शुभोपयोगपूर्वकच होतो म्हणून ज्ञानी शुद्धोपयोगासाठी शुभोपयोगाचे प्रयत्नपूर्वक अवलंबन घेतो. शुभोपयोगाच्या मार्गावरून जाऊन शुद्धोपयोगाचा मार्ग मिळतो म्हणून ज्ञानीच्या जीवनात शुभोपयोगाला स्थान आहे. हे रहस्य अज्ञानी जाणत नाही. ज्ञानी जशी क्रिया करतो तोच धर्म आहे असे समजून अज्ञानी बाह्य मन-वचनकायेच्या चेष्टेलाच धर्म मानून त्याचे अनुकरण करतो. अंतरंग परिणाम जाणत नाही.

एकदा काही लोक यात्रा करायला चालले होते. वाटेत संध्याकाळ

झाल्यामुळे त्यांनी जंगलातच आपला मुक्काम ठोकला. थंडीचे दिवस होते. कडाक्याची थंडी पडली होती म्हणून त्यांनी आजूबाजूच्या काटक्या, वाळलेले गवत व वाळलेला पाला-पाचोळा गोळा केला व त्यात काडी ओढून आग पेटवली व सर्वजण भोवतीने शेकायला बसले. मधून-मधून त्यामध्ये काटक्या टाकून आग पेटण्यासाठी फू-फू करीत होते. झाडावर बसलेले वानर हा सर्व प्रकार पाहत होते. त्यांना सुद्धा थंडी वाजत होती. त्यांनी विचार केला की आपणसुद्धा अग्नी पेटवून थंडीपासून आपले संरक्षण करू. त्यांनीसुद्धा काटक्या, गवत व पालापाचोळा गोळा केला. परंतु आता आग कोठून आणायची ? मनुष्यांनी काही तरी चमकणारी वस्तू त्यामध्ये ठेवली होती असा विचार करून उडणाऱ्या काजव्यांना त्यांनी पकडले आणि गवताच्या ढिगात आणून ठेवले व फू-फू करीत बसले.

अशाप्रकारे खूप परिश्रम केले. परन्तु वानर अग्नी पेटवू शकले नाहीत व त्यांची थंडीपण दूर होऊ शकली नाही. कारण तेथे मुख्य साधनाचा अभाव होता. त्याचप्रमाणे ज्ञानींनी चैतन्याची अग्नी प्रगट केली आहे. अंतरंगामध्ये सम्यक्श्रद्धा, ज्ञान व चारित्राद्वारे त्यांना धर्म प्रगट होतो व शुभरागाच्या वेळी पूजा-भक्ती, दया, दानादिकामध्ये प्रवृत्ती करतात. अज्ञानी जीव माकडाप्रमाणे ज्ञानींच्या अंतरंग चैतन्य अग्नीला जाणत नाही व केवळ पूजा भक्ती, दया दानादी शुभक्रियेने ज्ञानींना धर्म होत असेल असे समजून स्वयंसुद्धा त्यालाच धर्म मानून पूजा भक्ती आदि शुभक्रियेमध्ये प्रवृत्ती करतो. बाह्य क्रियेची नकल करणे म्हणजे माकडाप्रमाणे 'अकल के बिना नकल' आहे.

वास्तविक शुभोपयोग सम्यग्दृष्टीलाच होतो. कारण तो निश्चयमोक्षमार्गाचा सहचरभूत व्यवहार मोक्षमार्गरूपाने परिणमतो. गौणरूपाने मिथ्यादृष्टीला सुद्धा शुभोपयोग आहे. परंतु तो केवळ पुण्यबंधाला कारणभूत आहे. मोक्षमार्गामध्ये परिणमनरूप नाही. या शुभोपयोगाने मिथ्यादृष्टी द्रव्यलिंगी मुनी नौ ग्रैवेयकापर्यंत जाऊ शकतात. शुद्धोपयोगाला उपादेय मानून त्याच्याच भावनेच्या प्राप्तीसाठी अरिहंत भक्ती इत्यादी शुभोपयोगाच्या मार्गामध्ये वर्तन करावे.

यापूर्वीच्या गाथेमध्ये इन्द्रियसुखाच्या साधनाच्या स्वरूपाचा निर्देश केला आहे. आता या गाथेमध्ये शुभोपयोगाच्याद्वारे साध्यभूत इंद्रियसुख आहे अर्थात शुभोपयोगाद्वारे पुण्यकर्माचा बंध होतो व त्याच्या उदयाने इन्द्रियसुख प्राप्त होते ही पराधीनता इंद्रियसुखामध्ये आहे ही गोष्ट व्यक्त करतात. –

जुत्तो सुहेण आदा तिरियो वा माणुसो व देवो वा।
भूदो तावदि कालं लहदि सुहं इंदियं विविहं ।।७० ।।

अन्वयार्थ –(**सुहेण जुत्तो**) शुभोपयोगाने युक्त (**आदा**) आत्मा (**तिरियो वा**) तिर्यंच (**माणुसो व**) अथवा मनुष्य (**देवो वा**) अथवा देव (**भूदो**) होऊन (**तावदि काल**) तेवढा काळ (**विविहं**) अनेक प्रकारचे (**इंदियं सुहं**) इंद्रिय सुख (**लहदि**) प्राप्त करतो.

हा आत्मा इंद्रियसुखाला साधनभूत शुभोपयोगाच्या सामर्थ्याने तिर्यंच, मनुष्य आणि देवत्वाच्या भूमिकांमधून कोणत्यातरी एका भूमिकेला प्राप्त करून जेवढ्या काळापर्यंत त्या गतीत राहतो तेवढ्या काळापर्यंत अनेक प्रकारच्या इंद्रिय सुखाला प्राप्त करतो.

निश्चयाने शुभोपयोगसुद्धा अपराध आहे. कारण तो सुद्धा पराच्या आश्रयाने होणारा एक रागरूप परिणाम आहे. त्यामुळे बन्धच होतो. शुभोपयोग अपराध नसता तर त्यायोगे बंध कसा झाला असता ? अपराधीलाच शिक्षा मिळत असते. अपराधीच बंधनामध्ये बद्ध होतो. जेवढ्या प्रतीचा शुभ भाव असतो तेवढ्या प्रतीचा अर्थात् विशिष्ट अनुभागयुक्त साता वेदनीय, शुभ नामकर्म, उच्च गोत्र व शुभ आयूचा बंध होतो. सम्यक्त्वी जीवांना सम्यक्त्वाच्या भूमिकेमध्ये जो शुभ भाव होतो त्याद्वारे सातिशय पुण्याचा बंध होतो. सम्यग्दृष्टी जीव मनुष्य, तिर्यंच व देवायूला सोडून अन्य आयूंचा बंध करीत नाहीत. तसेच सम्यग्दृष्टी देव व नारकी उत्तम मनुष्य पर्यायाला सोडून अन्य आयूंचा बंध करीत नाहीत.

मिथ्यादृष्टी जीव आपल्या योग्य शुभोपयोगाने तिर्यंच, मनुष्य अथवा देव आयूचा बंध करतात. त्या गतीमध्ये भोगाला योग्य पुण्यकर्म बांधतात. चार आयूंमध्ये एक नरक आयु अशुभ व अन्य तीन आयू शुभ मानल्या आहेत. कारण नारकींना आपले आयुष्य सदैव क्लेशरूप भासित होते आणि तिर्यंच,

मनुष्य व देवांना आपापली आयू क्लेशरूप भासित होत नाही. नारकी सदा मरू इच्छितात; परंतु पूर्ण आयू भोगल्याशिवाय तेथून सुटका नाही. मनुष्य गतीतील जीवाप्रमाणे तिर्यंच जीवसुद्धा मरू इच्छित नाहीत. जर त्यांना कोणी मारण्याचा प्रयत्न केला तर ते आपले प्राण वाचविण्यासाठी तेथून पळून जातात. भले त्या तिर्यंच गतीमध्ये कितीही दुःख असले तरी मुंगी, कीडा, अळी इत्यादी द्वीद्रिंय, त्रीद्रिंय, चतुरिंद्रिय जीवसुद्धा आपला जीव वाचविण्यासाठी धडपडताना दिसतात.

एका राजाला एका साधूने सांगितले की तू सात दिवसानंतर मरणार आहेस व विष्टेमध्ये कीडा होऊन जन्माला येणार आहेस. त्यावेळी त्या राजाला वाटले की नको, अशी तुच्छ पर्याय आपल्याला नको. म्हणून आपल्या मुलाला सांगितले की मी कीडा झाल्यानंतर तू मला मारून टाक.

राजा मरून विष्टेत कीडा होऊन जन्माला आला, मुलगा बंदूक घेऊन मारायला गेला तेव्हा तो कीडा विष्टेमध्ये लपून बसला. त्या पर्यायात गेल्यावर त्या पर्यायाला आपले स्व मानले व तेथे तो रमला. आपण प्रत्यक्ष सुद्धा पाहतो की फुलपाखरू, डास इत्यादींना कोणी पकडू लागले तर ते उडून जातात व आपले प्राण वाचविण्याचा प्रयत्न करतात. यावरून हे लक्षात येते की ते त्या पर्यायाला चांगले मानतात म्हणून तिर्यंच आयू शुभ मानली आहे.

तिर्यंच गतीतील जीवसुद्धा त्याला योग्य शुभोपयोगाच्या फळामध्ये सुख प्राप्त करतात. भोगभूमीमध्ये सुद्धा उत्पन्न होतात. तेथे त्यांना कल्पवृक्षापासून विविध भोगवस्तू प्राप्त होतात. असंख्यात वर्षापर्यंत तेथे ते इंद्रियसुख भोगतात. अमेरिकेतील कुत्र्यांना व मांजरांना राहण्याकरिता एअर कंडिशन खोल्या असतात व फिरण्याकरिता गाडी असते. पूर्वी राजाच्या राजवाड्यामध्ये पोपटांना राहायला सोन्याचा पिंजरा असायचा व खाण्यासाठी उत्तमोत्तम पदार्थ मिळायचे. हे एक प्रकारे त्यांनी पूर्व भवामध्ये शुभोपयोगाने बांधलेल्या शुभकर्माचेच फळ आहे. नारकींना अशा पुण्याचा उदय नसतो म्हणून तिर्यंचांना शुभोपयोगाच्या फळामध्ये समाविष्ट केले आहे. नारकींना समाविष्ट केले नाही.

शुभोपयोग इन्द्रियसुखाचे साधन आहे. तो अतीन्द्रिय आनन्दाचे साधन नाही. शुभभावाच्या फळामध्ये देवगती, उत्तम मनुष्य गती आणि तिर्यंच

गती प्राप्त होऊन अनित्य व काल्पनिक सुख मिळते. आत्म्याचा कधी नाश होत नाही. म्हणून आत्म्याच्या आधाराने शाश्वत आनन्दाची प्राप्ती होते, सादि अनन्त सुख प्राप्त होते. इन्द्रियसुख थोड्या काळच असते. इन्द्रियसुखाचा आधार गती आहे आणि गती क्षणिक आहे म्हणून इन्द्रियसुख क्षणिक आहे. शुभोपयोगाच्या फळामध्ये इन्द्रियसुखाची अर्थात भोगांची प्राप्ती होते. भोग भोगण्याचा भाव पापबंधाचे कारण आहे. जर उपलब्ध भोगांना भोगतो तर पापांचा बंध होतो. अशाप्रकारे सुखासारखे दिसणारे इन्द्रियसुख वस्तुतः दुःखच आहे. दुःखाचे कारण आहे.

पुढे ५-६ गाथांमध्ये ही गोष्ट आचार्य स्वयं सिद्ध करणार आहेत. इन्द्रियसुख पराधीन आहे, पुण्यकर्माच्या अधीन आहे म्हणून सोडण्यायोग्य आहे. अतीन्द्रिय सुख स्वाधीन आहे म्हणून ग्रहण करण्यायोग्य आहे असे जाणून शुद्धोपयोगाची भावना नित्य करावी.

मागील दोन गाथांमध्ये इन्द्रियसुखाचे साधन व त्याच्या स्वरूपाचे वर्णन केले त्यावरून ही गोष्ट सिद्ध झाली की इन्द्रियसुख प्राप्त करविण्यामध्ये शुभोपयोगाचे विशेष सामर्थ्य आहे. जीव शुभोपयोगाच्या कृपेने तिर्यंच, मनुष्य व देव यापैकी कोणत्यातरी गतीला प्राप्त होऊन शुभोपयोगाच्या निमित्ताने बांधलेल्या पुण्य कर्मांचा उदय जोपर्यंत आहे तोपर्यंत अनेक प्रकारच्या इन्द्रियसुखांना प्राप्त करतो. आता आचार्यदेव इन्द्रियसुखाला सुखरूपी पात्रातून काढून दुःखरूपी पात्रामध्ये फेकतात. कारण इन्द्रियसुखरूपी माल सुखजातीचा नसून दुःखजातीचा आहे.

ज्याप्रमाणे तूपामध्ये कोणी डालडा मिसळून विकतो. डालडा तूपाप्रमाणे पांढरा दिसत असल्यामुळे तूपासारखा वाटतो. परंतु विवेकी व्यक्ती त्या तूपामध्ये मिसळलेल्या डालड्याच्या गोळ्याला ओळखतो व हे तूप नाही हे जाणून डालड्याच्या गोळ्याला तूपातून बाजूला काढून दुसऱ्या पात्रात ठेवतो. त्याप्रमाणे इन्द्रियसुख वरकरणी सुखरूप भासित होत असल्यामुळे त्या इन्द्रियसुखाला संसारी मोही जीवांनी सुखामध्ये मिसळले आहे. परंतु ज्ञानी विवेकी जीव जाणतो की हे इन्द्रियसुख सुख नाही, कारण ते आकुलतास्वरूप आहे म्हणून त्याला सुखाच्या पात्रातून बाजूला काढून दुःखाच्या पात्रात ठेवतो. हीच गोष्ट आचार्य या गाथेत सिद्ध करतात. -

सोक्खं सहावसिद्धं णत्थि सुराणं पि सिद्धमुवदेसे ।
ते देहवेदणट्टा रमंति विसयेसु रम्मेसु ।।७१।।

अन्वयार्थ– (**उवदेसे सिद्धं**) जिनेन्द्रदेवांच्या उपदेशामध्ये सिद्ध आहे की (**सुराणं पि**) देवांना सुद्धा (**सहावसिद्धं**) स्वभावसिद्ध (**सोक्खं**) सुख (**णत्थि**) नाही. कारण (**ते**) ते (**देहवेदणट्टा**) शरीराच्या वेदनेने पीडित होऊन (**रम्मेसु विसयेसु**) रम्य विषयांमध्ये (**रमंति**) रमतात.

सर्वाधिक इन्द्रियसुखसंपन्न देव –

तिर्यंच, मनुष्य व देवगतीमध्ये इन्द्रियसुख आहे. त्यापैकी तिर्यंच गतीमध्ये इन्द्रियसुख अल्प आहे. त्याहून अधिक इन्द्रियसुख मनुष्यगतीमध्ये आहे व त्याहूनही अधिक इन्द्रियसुख देवांमध्ये आहे. देवांच्या सुखाचे वर्णन करताना पूज्यपाद आचार्य म्हणतात.–

हृषीकजमनातंकं दीर्घकालोपलालितं ।
नाके नाकौकसां सौख्यं,नाके नाकौकसामिव ।।५।।

देवांना इन्द्रियापासून उत्पन्न होणारे सुख आहे. त्यांचे शरीर धातू व उपधातूंनी रहित, वातपित्तकफरहित, रोगांनी रहित निरोगी असते व ते सुख सागरो वर्षापर्यंत टिकते. कारण त्यांचे आयुष्य सागरों वर्षे असते. जेवढे सागर त्यांचे आयुष्य असते तेवढ्या पंधरवड्यानंतर त्यांना एकदा श्वासोच्छ्वास घ्यावा लागतो व तेवढ्या हजार वर्षानंतर त्यांना भूकेची वेदना होते. भूक लागल्यावर स्वतःच त्यांच्या कंठातून अमृत झरते आणि त्यांची भूक शमते. एकेका देवांच्या शेकडो हजारो देव्या असतात. त्या आपल्या हावभाव विलासादी चेष्टांच्या द्वारे त्यांचे मन प्रसन्न करतात. त्यांच्या देवींचे मरण झाले की तत्क्षण दुसरी देवी उत्पन्न होते व काही सेकन्दामध्येच युवती होते. तेथे उपजीविकेसाठी व्यापारधंदा, शेती वगैरे करण्याची गरज नाही. कारण तेथे कल्पवृक्ष आहेत. इच्छा होताच त्यांच्यापासून अनेक प्रकारच्या भोग–उपभोग सामग्री प्राप्त होतात. देवांच्या सुखाचे वर्णन कोठपर्यंत करायचे ? या पृथ्वीतलावरील कोणासारखे त्यांचे सुख आहे ? असे विचारले असता आचार्य सांगतात देवांचे सुख देवाप्रमाणेच आहे. त्याला उपमा देण्यासारखे सुख या मनुष्य लोकात कोणालाही नाही. उपर्युक्त सर्व सुख देवांना प्राप्त

आहे, परंतु ते सुद्धा वास्तविक स्वाभाविक सुख नाही.

आचार्यांनी शास्त्रामध्ये शुभोपयागाचे स्वरूप व त्याची महिमा सांगितली आहे. परंतु श्रोत्यांनी तेथपर्यंतच ऐकून संतुष्ट होऊ नये. कारण तेथे अद्यापि आचार्यांचे संभाषण पूर्ण झाले नाही. पुढेसुद्धा ऐकावे तरच शुभोपयोगाची प्रशंसा करणे व पुण्याची प्रशंसा करण्याचे आचार्यांचे प्रयोजन समजून येईल.

शुभोपयोग व त्याच्या फल वर्णनाचे प्रयोजन एवढेच आहे की पुण्याच्या उदयाने प्राप्त झालेल्या भोगामध्ये आत्म्याचे थोडेसुद्धा हित नाही. लोक आपल्या जीवनाचे यथार्थ साफल्य गमावू नयेत म्हणून शुभोपयोगाची महिमा सांगून त्यापेक्षासुद्धा अनंतपट ज्याची महिमा आहे अशा शुद्धोपयोगाचे वर्णन करतात.

एकदा एक चतुर पंडितजी रामायण सांगत होते. त्यांनी सुरवातीला रावणाच्या शौर्य पराक्रमाचे खूप वर्णन केले. लोकांना वाटू लागले की हे रामायण सांगत आहेत की रावणायन सांगत आहेत. तेवढ्यात पंडितजी म्हणाले अशा शूर पराक्रमी विद्याधर रावणाचा भूमिगोचर रामाने पराभव केला. सर्व परिस्थिती उलटली. रावणाची स्तुती रावणाचे माहात्म्य सांगण्याकरिता नव्हती तर त्याहून श्रेष्ठ रामाची स्तुती करण्यासाठी रावणाची स्तुती केली होती. आचार्यांनीसुद्धा याच शैलीने इन्द्रियसुख व शुभोपयोगाचे वर्णन केले आहे. इन्द्रियसुख व त्याला कारणभूत शुभोपयोगााचे वर्णन करून आता हे सिद्ध करतात की ते सर्व पर्यायमूढ बहिरात्मा जीवाकडून मूर्खतावश मानले गेलेले सुख आहे.

वास्तविक इन्द्रियसुखामध्ये मुख्य देवसुद्धा महादुःखी आहेत. त्यांना स्वाभाविक सुख नाही, उलट स्वाभाविक दुःख आहे, कारण जर देव दुःखी नसते तर कल्पित मनोज्ञ विषायांमध्ये का मुग्ध झाले असते. देवींना खूष करणे, मनामध्ये नाना कल्पना करणे, लोकामध्ये इकडे-तिकडे फिरणे, आपल्यापेक्षा मोठ्या देवांची विभूती पाहून ईर्ष्या मत्सर करणे, त्यांच्या आज्ञेमध्ये राहण्याचे कष्ट सोसणे, रमणीय क्रीडास्थलांमध्ये क्रीडा करण्यासाठी धावणे, हे सर्व काय दुःख नाही ?

इंद्रियविषय दुरून रमणीक वाटतात, परंतु ते महाभयंकर पीडादायक आहेत. इन्द्रियसुखामध्ये आसक्त हा संसारी प्राणी विषवृक्षापासून पडणाऱ्या मधाच्या थेंबामध्ये आसक्त प्राण्याप्रमाणे मूर्ख बनला आहे. अनेक जुन्या मंदिरामध्ये एक चित्र काढलेले आहे. त्यामध्ये असे दाखविले आहे की एक पुरुष जंगलामध्ये मार्ग विसरला आहे, त्या पुरुषाच्या पाठीमागे एक मत्त हत्ती लागला आहे. तो त्या हत्तीच्या भीतीने जोरात धावत सुटला आहे. त्याला दुसरा कोणताही वाचण्याचा उपाय दिसेना.

तेवढ्यात समोर एक वडाचे झाड दिसले. त्याच्या पारंब्या खाली लोंबत होत्या, त्या पारंब्यांना पकडून पुरुष लोबंकळू लागला. खाली एक अंधकूप होता. त्या झाडावर एक मधमाश्यांचे पोळे होते त्या वृक्षाला तो विक्षिप्त हत्ती क्रोधित होऊन हालवत होता. त्यामुळे मधमाशा उडून त्या पुरुषाला सर्व बाजूंनी वेढल्या व चावू लागल्या. परंतु मधाचे पोळे हलल्यामुळे त्यातून मधाचा एक-एक थेंब गळू लागला. भाग्याने त्या पुरुषाच्या मुखामध्ये एक थेंब पडला. त्यामध्ये आसक्त होऊन वर तोंड करून पडणाऱ्या एक-एक मधाच्या थेंबाची वाट पहात तसाच तो लोंबकळत राहिला. ज्या पारंब्याला तो लटकत होता त्याच्या मुळ्याला पांढरा व काळा असे दोन उंदीर कुरतडत होते. जेथे तो लोंबकळत होता त्याच्याखाली एक कोरडी विहीर होती. त्या विहिरीमध्ये मध्यभागी अजगर गिळंकृत करण्यासाठी तोंड पसरून बसले होते. अनेक सापसुद्धा त्या विहीरीत होते. हत्ती त्या झाडाला उखडून काढण्यासाठी झाडाला जोरजोरात हलवत होता. मधमाशा अंगाला चिकटून अंग फोडून खात होत्या. एवढ्या सर्व विपत्तीमध्ये असतानासुद्धा तो वाटसरू मधाच्या थेंबामध्ये आसक्त झाला आहे.

तेवढ्यात एक विद्याधर विमानात बसून येतो व त्याची ही दुरवस्था पाहून करूणा करून त्याला वाचविण्यासाठी एक हात पुढे करतो व म्हणतो,' हे पुरुष, तू माझा हात घट्ट पकड, मी तुला या महासंकटातून वाचवतो. तू माझ्या विमानात बसून चल, मी तुला चांगल्या ठिकाणावर सोडतो. परन्तु तो अभागी पुरुष म्हणतो 'थांब, वरून पडणारा मधाचा आणखीन एक थेंब चाटू दे !' अशाप्रकारे तो एकेक मधाच्या थेंबामध्ये आसक्त होऊन तेथेच तोपर्यंत

लोंबकळत राहतो जोपर्यंत तो वृक्ष उखडला जात नाही, त्याच्या फांद्या तुटून पडत नाहीत, तो पुरुष पडून विकराल अजगराच्या तोंडात प्रवेश करीत नाही, सापांकडून डसला जात नाही. जास्त काय, मृत्युला प्राप्त होत नाही.

मधाच्या थेंबाप्रमाणे संसारसुखामध्ये लुब्ध हा मनुष्य प्राणी संसाररूपी भयंकर वनामध्ये मिथ्यात्वरूपी कुमार्गामध्ये भटकत मुत्युरुपी हत्तीच्या भीतीने शरीररूपी अंधकूपामध्ये आयुकर्मरूपी वृक्षाच्या शाखेला लटकत आहे. त्या आयुकर्मरुपी वृक्षाच्या फांदीला रात्रंदिवस शुक्ल व कृष्णपक्षरूपी दोन उंदीर कुरतडत आहेत. शरीररूपी अंधकूपामध्ये चार गतीचे चार साप आणि निगोदवासाचा मोठा अजगर तोंड पसरून बसला आहे. परिवार, बन्धु, मित्ररूपी मधमाशा याच्या चारी बाजूला चिकटत आहेत. मृत्युरूपी हत्ती वृक्ष व त्याच्या फांद्यांना नष्ट करण्यासाठी झाड हालवत आहे. ज्यामुळे जीवनाचा अंत होण्याची वेळ जवळ येऊ लागली आहे.

तरीसुद्धा हा मनुष्य विषयसुखरूपी मधाच्या थेंबाच्या स्वादामध्ये सुख मानून त्यालाच चाटत आहे. सौभाग्यवश सद्गुरुरूपी देवता त्याला वाचविण्यासाठी हात पुढे करतात व सांगतात, चल तू माझा हात पकड, तुला मी या संसाररूपी महासंकटातून वाचवतो. दुःखातून काढून सुखामध्ये ठेवतो, परंतु हा विषयसुखामध्ये आसक्त प्राणी तेथून निघू इच्छित नाही. तो विचार करतो व म्हणतो थांबा अजून एवढे सुख भोगतो, मुलाचे लग्न करतो, नातवांचे तोंड पाहतो, नंतर नातवांना खेळवतो, शिकवतो इत्यादी. विषयाचा व मोहाचा अंत कधी होत नाही. उलट याचाच अंत होतो व हा नरकादी दुर्गतीमध्ये जाऊन पडतो.

वास्तविक दृष्टीने पाहिले तर अज्ञानी देव दुःखी आहेत व ज्ञानी नारकी सुखी आहेत. सुखपर्याय सुख गुणापासून व्यक्त होते. कोणत्याही द्रव्याच्या गुणाच्या पर्यायाला अन्य अनन्तानन्त द्रव्य मिळूनसुद्धा करू शकत नाहीत. खरे सुख आत्म्याचा निज स्वभाव आहे. ह्या स्वाभाविक सुखाकरिता कोणत्याही परपदार्थाची इच्छा करावी लागत नाही. तेथे कोणतीही आकुलता नाही, चिंता व तृष्णा नाही. ते सुख निज आत्म्याच्या अनुभवाने प्राप्त होते. या आत्मिक सुखापुढे इंद्रियजनित सुख दुःखरूपच भासित होते. ज्यांच्या

मिथ्यात्व व कषायाचे दमन झाले आहे असे वीतराग सम्यग्दृष्टि जीव याच आत्मानंदाचा निरन्तर अनुभव करतात. त्यांना इंद्रिय विषयभोगाची इच्छा त्रास देत नाही.

याउलट मिथ्यादृष्टि अज्ञानी बहिरात्मा देवगतीमध्ये असले तरी स्वात्मानुभवाच्या लाभाशिवाय अतीन्द्रिय आनन्दाच्या स्वादापासून वंचित आहेत. ते बिचारे या इंद्रियांच्या विषयभोगाच्या ज्वालेमध्ये जळतात व अनेक आपत्तींना सोसूनसुद्धा क्षणिक विषयसुखाला भोगू इच्छितात. मोठ्या उद्यमाने विषयभोगाची सामग्री प्राप्त करून भोगतात, परंतु त्यामुळे त्यांची तृष्णा शांत होण्याऐवजी अधिक वाढते, त्यांना सुखशांती मिळत नाही. **आत्म्याच्या अभेद स्वभावाचा स्पर्शच आनंदाला कारण आहे, अन्य सर्व धोका आहे. अनादी अनंत अहेतुक अखंड निर्विकल्प ध्रुव निज स्वभावाच्या आश्रयानेच निर्विकल्प आनंद प्राप्त होतो.**

शुभोपयोगाचा ज्यांना प्रसाद प्राप्त झाला आहे त्यांना जर यथार्थ ज्ञानदृष्टी नसेल तर त्यांची दशा दयनीय आहे. देवगतीमध्ये देव असंयमी आहेत त्यापैकी लौकान्तिक देव, अनुदिश, अनुत्तरवासी देव व अन्य अहमिन्द्र देव आत्मभावनेमध्ये लीन असतात. अन्य सर्व देव पंचेन्द्रियात्मक शरीररूपी पिशाचाच्या पीडेने पीडित होऊन मनोज्ञ विषयामध्ये झेप घेतात.

विषयसुख दुःखाचे घर आहे म्हणून ते सोडण्यायोग्य आहे. मोक्षसुख आपत्तिरहित स्वाधीन अविनाशी आहे म्हणून ग्रहण करण्यायोग्य आहे. त्या मोक्षसुखाच्या प्राप्तीसाठी इन्द्रियविषयातील उपयोग काढून घेऊन निज सहज शुद्ध स्वभावामध्ये उपयोग लावावा. अतीन्द्रिय सुखासाठी शुद्धोपयोगाद्वारे निज आत्म्याचा अनुभव करावा.

आतापर्यंत इंद्रियसुख दुःखरूप आहे म्हणून हेय आहे, हे अनेक युक्तींनी सिद्ध केले. आता त्या इंद्रियसुखाचे साधन पुण्य आहे व त्या पुण्याला उत्पन्न करणारा शुभोपयोग आहे. जेथे इंद्रियसुख हेय आहे तेथे त्याचे कारणभूत पुण्य व शुभोपयोग उपादेय कसे असणार ? ते सुद्धा हेय आहे ही गोष्ट सांगतात.–

णरणारयतिरियसुरा भजंति जदि देहसंभवं दुक्खं
किह सो सुहो व असुहो उवओगो हवदि जीवाणं ॥७२॥

अन्वयार्थ – (**णरणारयतिरियसुरा**) मनुष्य, नारकी, तिर्यंच आणि देव हे सर्वजण (**जदि**) जर (**देहसंभवं**) शरीरापासून उत्पन्न (**दुक्खं**) दुःखाचा (**भजंति**) अनुभव करतात तर (**जीवाणं**) जीवांचा (**सो उवजोगो**) तो उपयोग (**सुहो व असुहो**) शुभ आणि अशुभ दोन प्रकारचा (**किह हवदि**) कसा आहे ?

आत्मीय आनन्दाचे विराधक असल्यामुळे शुभ व अशुभ दोन्ही उपयोग समान आहेत, अशुद्ध आहेत.

सांसारिक सुख दुःख आकुलतेने परिपूर्ण–

मनुष्य, तिर्यंच, नारकी व देव शारीरिक दुःखाचा अनुभव करतात. नारकी जीव तर प्रत्यक्ष दुःख भोगतात हे स्पष्ट आहे. तिर्यंच व मनुष्यामध्ये जे पुण्यवान तिर्यंच आहेत ते इंद्रियजन्य सुख भोगतात. देव इंद्रियजन्य सुख भोगतात. परंतु इंद्रियजन्य सुखामध्ये ते शांतीचा अनुभव करतात की अशांतीचा? ही गोष्ट आपल्या सर्वांना प्रत्यक्ष अनुभवायची आहे कि खाण्यामध्ये, पिण्यामध्ये, रूप पाहण्यामध्ये, संगीत ऐकण्यामध्ये जी प्रवृत्ती होते त्यामध्ये आकुलता असते की निराकुलता ? त्या विषयांची पूर्ती करण्याकरिता इकडे तिकडे धडपडणे, विषय सेवन करण्यामध्ये प्रवृत्ती होणे इत्यादी आकुलतेचाच अनुभव होताना दिसतो. वास्तविक सांसारिक सुख, सुख नाही; परन्तु विषयांच्या इच्छेमुळे जास्त पीडा होत होती ती काही अंशाने कमी झाल्यामुळे त्या कमी दुःखालाच व्यवहारात सुख म्हटले जाते. व्यवहारात दुःखाच्या अधिकतेला दुःख व दुःखाच्या अल्पतेला सुख म्हणतात. ते कमी दुःख सुखाभास आहे.

ज्याप्रमाणे कोणी मनुष्य उन्हाळ्यात दुपारच्या उन्हामध्ये चालत आहे तो उष्णतेच्या तापाने अतिदुःखी होऊन जंगलामध्ये एका छायादार वृक्षाच्या सावलीत विश्राम घेतो. जोपर्यंत तेथे विश्रांती घेतो तोपर्यंत उन्हाचा ताप कमी झाल्यामुळे त्याला सुखाप्रमाणे वाटते. वास्तविक त्याचे दुःख कमी झाले आहे. जेव्हा पुन्हा चालू लागतो तेव्हा त्याला ऊन्हाची पीडा जास्त त्रास

देते. त्याचप्रमाणे सांसारिक सुखाला केवळ दुःखाची काही वेळ शांती झाली असे समजावे. ज्याच्यापूर्वी व पश्चात् आकुलता आहे तेथे सुख कसे ? ते तर दुःखच आहे. **'तत्सुखं यत्र नासुखं'** सुख तेच आहे जेथे दुःख नाही.

शुभोपयोग व अशुभोपयोगामध्ये समानतेचे दिग्दर्शन–

जर सुख व दुःख दोन्ही समान आहेत तर ज्या पुण्याच्या उदयात सुख होते व ज्या पापाच्या उदयात दुःख होते ते पुण्य पापसुद्धा समानच आहेत. जर पुण्य व पाप समान आहेत तर ज्या परिणामाने पुण्यबंध होतो तो शुभोपयोग व ज्या परिणामाने पापबंध होतो तो अशुभोपयोग सुद्धा समान आहे. दोन्ही कषायरूप भाव आहेत. अशुद्धोपयोग आहेत. पूजा, दान, परोपकारादीमध्ये रागभाव करणे वा अन्याय, अभक्ष्य इत्यादीमध्ये द्वेषभाव करणे शुभोपयोग आहे. तसेच विषयभोगामध्ये व पराचा अपकार करण्यामध्ये रागभाव व धर्माचरणापासून द्वेष भाव करणे यास अशुभोपयोग म्हणतात.

हे शुभ व अशुभ दोन्ही उपयोग रागद्वेषमय आहेत. व्यवहारामध्ये मंद कषायाला शुभोपयोग व तीव्र कषायाला अशुभोपयोग म्हणतात. निश्चयाने दोन्ही कषायरूप आहेत म्हणून त्यागण्यायोग्य आहेत. हे दोन्ही आत्म्याच्या शुद्ध उपयोगापासून भिन्न आहेत म्हणून समान आहेत.

शुभोपयोगाने जीव देवेन्द्र आदिक पुण्यसंपदा प्राप्त करतात. अशुभोपयोगने जीव कुयोनीमध्ये पापरूप विपदा प्राप्त करतात. पुण्यसंपत्तिवाले व पापरूप विपत्तिवाले जीव पंचेन्द्रियात्मक शरीराच्या निमित्ताने दुःखाचा अनुभव करतात. पापाच्या उदयाने कोणी गरीब मनुष्य झाला आणि पुण्याच्या उदयामध्ये कोणी करोडपती मनुष्य झाला. एवढ्याने त्यांची मानसिक अशांती नष्ट होत नाही. संपत्ती व विपत्ती एकाच कर्मरूपी मातेच्या पोटी जन्माला आलेल्या दोन भगिनी आहेत.

एकदा एक गरीब मनुष्य दीवान अमरचंदजींना भेटण्यासाठी गेला. पहारेकऱ्यांनी त्याची अस्ताव्यस्त अवस्था पाहून राजसभेमध्ये जाण्यास मनाई केली. तेव्हा तो गरीब मनुष्य म्हणाला की दीवानसाहेब माझे साडू आहेत. हे ऐकून पाहरेकऱ्यांनी त्याला राजदरबारात जाऊ दिले. जेव्हा लोकांनी त्या

दरिद्र्याला पाहिले तेव्हा ते म्हणू लागले. 'हे दीवाण साहेबांचे साडू भाऊ आहेत ?' तेव्हा दीवाणजी म्हणाले होय, हे माझे साडू भाऊ आहेत. कारण संपत्ती व विपत्ती दोन बहिणी होत्या. त्यापैकी संपत्तीचा विवाह माझ्याशी झाला व विपत्तीचा विवाह याच्याशी झाला. लोक ऐकून अवाक् झाले.

हेतु, स्वभाव, अनुभव व आश्रयामध्ये भेद नसल्यामुळे पुण्य व पाप यामध्ये भेद नाही. पुण्य कर्म व पाप कर्म दोघांचे कारण आत्म्याचा अशुद्ध भाव आहे, दोघांचा स्वभाव पुद्गलमय आहे. दोघांचा अनुभव रागद्वेषरूप, दोघांचा आश्रय बंधमार्ग आहे. दोन्ही आकुलतारूप, आत्म्याच्या शुद्ध परिणतीपासून भिन्न व बंधरूप आहेत.

शुभोपयोग व अशुभोपयोगाहून विलक्षण असणारा शुद्धोपयोगच परम कल्याणस्वरूप आहे. शुद्धोपयोग बंधाला कारण नाही, संवर व निर्जरेला कारण आहे. शुद्धोपयोग शुभोपयोग पूर्वकच होतो, अशुभोपयोगपूर्वक नाही. म्हणून अशुभोपयोग अत्यन्त हेय आहे. अशुभोपयोगामध्ये आत्मोद्धाराला अवकाशच नाही. शुभोपयोगामध्ये उद्धाराची संधी मिळू शकते. जर शुभोपयोगरूप साधनाच्या माध्यमातून शुद्धोपयोगाला प्राप्त झालो तर शुभोपयोगाला परंपरेने मोक्षाचे कारण मानले आहे. परंतु शुभोपयोग साक्षात् बंधाला कारण असल्यामुळे सोडण्यायोग्य आहे असे या गाथेत सिद्ध केले आहे. प्रथम अशुभोपयोगापासून हटून शुभोपयोगामध्ये यावे. नंतर शुभोपयोगपासून निवृत्त होऊन शुद्धोपयोगरूप परिणमावे, सहज चैतन्य स्वभावाच्या आश्रयाने उपयोग शुद्ध होतो.

या शुभोपयोग अधिकारामध्ये शुभोपयोगाचे यथार्थ स्वरूप प्रकट करतात. राजा, महाराजा, चक्रवर्ती, इन्द्र इत्यादिकांचे वैभव पाहून पुण्यकर्माचे अस्तित्व सिद्ध होते. शुभोपयोगामध्ये दोष दाखविण्यासाठी प्रथम शुभोपयोगाने उत्पन्न पुण्यकर्म आहे हे सांगतात. कारण ज्या वस्तूची सत्ताच सिद्ध नाही त्याला दूषित पण करू शकत नाही व त्याला भूषित पण करू शकत नाही. शुभोपयोगाने उत्पन्न पुण्य नावाचे कर्म आहे व त्या पुण्याचा उदय इन्द्र चक्रवर्ती इत्यादींच्या ठिकाणी दिसून येतो. प्रथम पुण्याचा स्वीकार करून नंतर त्याला उखडून काढतात.–

कुलिसाउहचक्कधरा सुहोवओगप्पगेहिं भोगेहिं ।
देहादीणं विद्धिं करेंति सुहिदा इवाभिरदा ।।७३।।

अन्वयार्थ – (**कुलिसाउहचक्कधरा**) इन्द्र व चक्रवर्ती (**सुहोवओगप्पगेहिं भोगेहिं**) शुभोपयोगस्वरूप भोगांच्या द्वारे (**देहादीणं**) शरीरादिकांची (**विद्धिं करेंति**) वृद्धी करतात व (**अभिरदा**) भोगामध्ये रत होऊन (**सुहिदा इव**) सुखी झाल्यासारखे वाटतात.

इन्द्र चकवर्तीसारखे वैभवशाली मोठे लोकसुद्धा शुभोपयोगाच्या निमित्ताने उत्पन्न पुण्याच्या फळाला भोगतात व भोगामध्ये रत होऊन सुखीप्रमाणे वाटतात. परन्तु ते सुखी नाहीत.

भोगामध्ये सुखाचा भ्रम–

वैभवसंपन्न महापुरुष पुण्याच्या उदयामध्ये आपल्या इच्छेनुसार भोग प्राप्त करतात व त्या भोगादिकाने शरीराला पुष्ट करतात. ज्याप्रमाणे जळवा अशुद्ध रक्तामध्ये आसक्त होऊन स्वतःला सुखी अनुभवतो त्याप्रमाणे या पाच इंद्रियांच्या विषय भोगांमध्ये आसक्त होऊन इन्द्र चक्रवर्ती सुद्धा स्वतःला सुखी अनुभवतात. दुसऱ्या संसारी विषयासक्त जीवांनाही ते सुखी वाटतात. परंतु त्यांचे ते वास्तविक सुख नाही. जळव्यांचा असा स्वभाव आहे की तो गायीच्या किंवा म्हशीच्या स्तनाला जरी लागला तरी तो तेथील मधुर दूध ग्रहण न करता, अशुद्ध रक्तच ग्रहण करतो. पुष्कळ आयुर्वेदिक वैद्य आपल्याजवळ जळवा ठेवतात व माणसाचे कोठे अशुद्ध रक्त साठले असेल तेथे लावतात. तो जळवा तेथील सर्व अशुद्ध रक्त पीतो. त्याला मध्येच सांडशीने ओढून काढण्याचा प्रयत्न केला तरी तो त्या रक्ताला चिकटून बसतो. मेला तरी सोडत नाही. एवढा त्यामध्ये आसक्त होतो. त्याला त्यामध्ये सुख भासित होते, त्याप्रमाणे जे विशेष पुण्यशाली आहेत ते सुद्धा पाच इंद्रियांच्या विषयांमध्ये अति आसक्त होऊन त्यांना भोगतात, व स्वतःला सुखी मानतात, परंतु त्यांचा हा भ्रम आहे. कारण तेथे निराकुलतापूर्वक शांतीचा अनुभव होत नाही म्हणून ते वास्तविक सुख नाही.

इन्द्र, चक्रवर्ती इत्यादी जीवांनी पूर्व भवामध्ये शुभोपयोगाच्या द्वारे पुष्कळ पुण्यबंध केला होता. त्यामुळे ते उच्च पदाला प्राप्त झाले व पुण्याच्या

उदयाने त्यांनी मनोज्ञ इंद्रियविषयांना प्राप्त केले. आता ते अज्ञानामुळे या विषयांच्या भोगामुळे मला सुख होईल असे मानून त्या विषयांमध्ये अति आसक्त होऊन भोगतात, परंतु त्याद्वारे त्यांची विषयेच्छा शांत होत नाही. क्षणिक थोडी आकुलता कमी होते त्यालाच ते सुख मानून बसतात, परंतु पुढे अधिक चिंतावान होतात. ज्याला सुखदायी मानले होते तेच दुःखदायी ठरते. पुण्याच्या उदयाने जे भोग प्राप्त होतात त्यांना भोगण्याची इच्छा उत्पन्न होते. जसे पुण्याच्या उदयाने मधुर स्वादिष्ट भोजन प्राप्त झाले की त्याला पाहून खाण्याचीच इच्छा होते. पुण्याच्या उदयाने सोन्याचे दागिने प्राप्त झाले की त्याला परीधान करण्याची इच्छा होते. पुण्योदयाने अनुकूल सुंदर पत्नी मिळाली की तिला पाहून विषयेच्छाच उत्पन्न होते. इच्छा म्हणजे आकुलताच आहे व आकुलता म्हणजे दुःखच आहे.

शांतीचा उपाय –

शांतीचे कारण एकमात्र आत्मस्वभावाचे अवलंबन आहे. सर्व परपदार्थाहून, सर्व परभावाहून भिन्न मी एक ज्ञानमात्र आत्मा आहे असा अनुभव झाला तेथेच शांती आहे. जेथे पराचे आकर्षण आहे तेथे क्षोभ आहे. जेथे स्वतःचे आकर्षण आहे तेथे शांती आहे. शुद्धोपयोगच या जीवाला परमार्थ शरण आहे. आपल्या सहजस्वभावामध्ये, शुद्धस्वभावामध्ये निरन्तर उपयोग लावला असता संसारातील सर्व संकटे संपतात. एक ज्ञानतत्त्वाच्या अवलंबनामुळे जो आनंद उत्पन्न होतो त्याद्वारे अनादिपरंपरेने चालत आलेल्या कर्मसमूहाचा नाश होतो. सतत आनन्दाचाच अनुभव होतो. म्हणून आत्मानुभवच मोक्षमार्ग आहे. अनादिअनन्त ध्रुव चिदानन्दरूप आत्मविषयाचा भोग अनन्ततृप्तीला देणारा आहे. धर्म कष्टाने मिळत नाही. आनन्दाने मिळतो. अज्ञानीला धर्म कष्टप्रद वाटतो. कारण त्याची दृष्टी बाह्य क्रियेवर आहे. पूजा करणे, उपवास करणे, रसत्याग करणे इत्यादीला तो धर्म समजतो. म्हणून धर्म करणे सोपे काम नाही असे त्याला वाटते. धर्मपालन अत्यन्त सुगम आहे. थोडी दृष्टी आत वळवा व अंतरंगामध्ये चैतन्य प्रभूला पहा. त्वरित आनंद भोगा. आज करा व उद्या भोगा असा धर्माचा धंदा उधार नाही. धर्म म्हणजे आता करा व आता आनंद भोगा असा रोखीचा धंदा आहे.

पुण्याच्या फळामध्ये संसारी प्राणी विषयांमध्ये रममाण होऊन सुखी झाल्यासारखे वाटतात, परंतु तेथेसुद्धा सुरवातीपासून शेवटपर्यंत क्षोभच भरलेला आहे. हे पुण्य दुःखाच्या बी चे कारण आहे. दुःखाचे बी विषयतृष्णा आहे व विषयतृष्णेचे कारण पुण्याचा उदय आहे. हेच आता येथे प्रकट करून सांगतात.

जदि संति हि पुण्णाणि य परिणामसमुब्भवाणि विविहाणि।
जणयंति विसयतण्हं जीवाणं देवदंताणं ।।७४।।

अन्वयार्थ – (**जदि**) जर (**हि**) निश्चयाने (**परिणामसमुब्भवाणि**) शुभोपयोग रूप परिणामाने उत्पन्न होणारे (**विविहाणि**) अनेक प्रकारचे (**पुण्णामि**) पुण्य (**संति**) आहे तर ते (**देवदंताणं**) देवा पर्यन्तच्या (**जीवाणं**) जीवांना (**विसयतण्हं**) विषयतृष्णाच (**जणयंति**) उत्पन्न करते.

इन्द्रादिकांचे पुण्यसुद्धा विषयतृष्णेलाच उत्पन्न करून दुःखाचेच मूळ बनते.

पुण्याची तृष्णोत्पादकता –

शुभोपयोगरूप परिणामाद्वारे उत्पन्न होणारे पुण्य विद्यमान आहे. पुण्याचा उदय पाहून संसारी अज्ञानी जीव त्या पुण्योदयाची व पुण्यवंताची स्तुती करतो. जर कोण्या जीवाचे वैभव वाढले, परिवारातील लोक अनुकूल आहेत, आज्ञाकारी स्त्री, पुत्र, मित्र असतील, राज्यातील उच्च पदावर प्राप्ती झाली असेल तर लोक म्हणतात, 'वाहवा यांचे मोठे पुण्य आहे, हा पुण्यशाली जीव आहे, याचे भाग्य उन्नत आहे, इत्यादि. ज्या पुण्याचे आम्ही गोडवे गातो ते पुण्य देवेंद्रापर्यंतच्या जीवांना तृष्णा उत्पन्न करते.

शुभोपयोगाद्वारे साता वेदनीय, शुभनाम, शुभगोत्र, शुभ आयुरूप पुण्यकर्माचा बंध होतो. त्याच्या उदयामध्ये मनोहर बाह्य सामग्री, मनोहर शरीराचे रूप, माननीय कुल, निरामय दीर्घायु प्राप्त होते. भोगभूमीचे तिर्यंच व मनुष्य पुण्यकर्मानेच होतात. कर्मभूमीमध्ये पुष्कळ पशू व मनुष्य सुखकारी साधन प्राप्त करतात. भवनत्रिक व कल्पवासी देवांना सुद्धा पुण्यफलामुळे पुष्कळ मनोज्ञ देवी आदी सामग्री प्राप्त होतात. सर्वात अधिक सुखरूप सामग्री

नारायण, प्रतिनारायण, चक्रवर्ती, देवेन्द्र आदि पदवीधारींना प्राप्त होते. त्यापैकी जे जीव सम्यग्दृष्टी ज्ञानी असतात त्यांच्या परिणामामध्ये ही सामग्री कषायाच्या उदयाने केवळ अनुराग उत्पन्न करण्यामध्ये निमित्त होते; परंतु जे मिथ्यादृष्टि बहिरात्मा आहेत त्यांच्या परिणामामध्ये ही सातारूप बाह्य सामग्री विषयतृष्णा वाढवते. ज्याप्रमाणे इंधन मिळाल्यावर अग्नी भडकते त्याप्रमाणे इच्छानुकूल भोग प्राप्त झाल्यावर तृष्णारूपी अग्नी भडकते. म्हणून मुख्यतेने पुण्यकर्म अज्ञानींना विषयदाह वाढविण्यामध्ये प्रबल निमित्त आहेत.

मनोज्ञ सामग्री प्राप्त होऊनसुद्धा अधिकाधिक सामग्रीच्या इच्छेच्या वश होऊन त्याकरिता आकुलित होतात. म्हणून पुण्य तृष्णेचे घर आहे.

तृष्णेमुळे विषयप्रवृत्ती –

कोणी म्हणेल होऊ दे तृष्णा, तृष्णा झाल्यामुळे काय हानी आहे? हो, हानी आहे. कारण जर त्यापासून नुकसान नसते तर त्याचा निषेध का केला असता ? तृष्णा उत्पन्न झाल्यामुळे विषयांमध्ये प्रवृत्ती होते.

ज्याप्रमाणे जळवा दूषित रक्त पिण्यामध्ये प्रवृत्त होतो तो तृष्णेशिवाय नाही. त्याला अशुद्ध रक्ताची तृष्णा आहे म्हणून तो ते रक्त पितो. त्याचप्रमाणे सर्व संसारी जीवांना विषयांमध्ये प्रवृत्ती होते ती तृष्णेशिवाय नाही. विषयतृष्णा असल्यामुळे विषयांमध्ये प्रवृत्ती पाहिली जाते. देवेन्द्र चक्रवर्ती आदिक पुण्यशाली जीवसुद्धा विषयामध्ये प्रवृत्ती करतात. यावरून त्यांना तृष्णा आहे हे लक्षात येते. त्यामुळे पुण्यकर्म तृष्णा वाढविणारे आहे ही गोष्ट सिद्ध होते.

विषयप्रवृत्तीमुळे संकट–

कोणी म्हणेल, होऊ दे विषयामध्ये प्रवृत्ती, त्यामुळे काय नुकसान आहे ? संसारातील सर्वच प्राणी विषयाकरिता प्रयत्न करतात. मुंगी साखर शोधण्यासाठी इकडे-तिकडे फिरते, भुंगा प्रकाशासाठी दिव्यावर झडप घालतात, संगीतप्रिय व्यक्ती गाणे ऐकण्यासाठी इतस्ततः फिरतात. ज्यांच्याजवळ विषय जास्त आहेत त्यांचीच स्तुती केली जाते, याचे किती पुण्य आहे, याला किती साधनसुविधा प्राप्त आहेत, त्यांचेच अभिनंदन केले जाते, त्यामुळे विषयप्रवृत्तीमध्ये काय नुकसान आहे ? आचार्य म्हणतात, हो नुकसान आहे, विषयांच्या प्रवृत्तीमुळे तर सर्व संकटे आहेत, दुःख आहे, कष्ट

आहे. जेथे भिन्न भिन्न एकेका इन्द्रियांच्या विषयप्रवृत्तीमध्ये प्राणघात होतो तेथे पाच इन्द्रियांच्या विषयप्रवृत्तीमध्ये तर काय सांगावे ? तेथे संकटच आहे. हत्तीची स्पर्शनेन्द्रियांच्या विषयामध्ये, माश्याची रसनेन्द्रियाच्या विषयामध्ये, भुंग्यांची घ्राणेन्द्रियाच्या विषयामध्ये, पतंगाची चक्षुरिन्द्रियाच्या विषयामध्ये, सांप व हरिणाची कर्णेन्द्रियाच्या विषयामध्ये विशेष आसक्ती असते. त्यामुळे ते बंधनात सापडतात व मारले जातात.

बनारस नगरीमध्ये ब्रह्मदत्त राजा राज्य करीत होता. राजाचे एक सुंदर विशाल उद्यान होते. त्या उद्यानाच्या सौन्दर्याची चर्चा सर्वत्र होती. तेथे सुंदर वृक्ष, वेली व हिरवे-हिरवे गवत सुद्धा होते. अत्यंत कोमल व रसयुक्त गवत पाहिल्यावर जनावरांच्या तोंडाला पाणी सुटायचे. उद्यानाच्या चारी बाजूला तट होता. परंतु तो एका बाजूला तुटला होता. तेथून एक हरिण येऊन बागेतील गवत खात होते. माळी तेथे येताच हरिण पळून जात असे.

एके दिवशी राजाने माळ्याला बागेची चौकशी केली. ' बाग कशी आहे, झाडे कशी आहेत. त्याला फुले-फळे तर लागतात ना ?'

माळी म्हणाला, ' राजन्, सर्व काही ठीक आहे, वृक्षवल्ली सुंदर आहेत, ऋतुप्रमाणे फुले-फळेसुद्धा येतात, परंतु एकच समस्या आहे, एक हरिण बागेत शिरते व गवत खाऊन पळून जाते. राजाने विचारले, 'काय ते हरिण सुंदर आहे ? माळी म्हणाला, हो महाराज. खूप सुंदर आहे. त्याचा रंग सोन्याप्रमाणे आहे. त्याचे डोळे चमकदार आहेत. त्याला पाहून मन प्रसन्न होते.' राजाने आज्ञा केली. ' त्याला पकडून माझ्या हवाली करा. माळी म्हणाला, हे काम अवघड आहे. तरी मी प्रयत्न करतो. त्यासाठी मला मध मिळाले तर बरे होईल. राजाने माळ्याला भरपूर मध दिले. माळ्याने बागेतील गवतावर मध शिंपडले. मधयुक्त गवत खाल्ल्यामुळे हरिणाचे मन प्रसन्न झाले. आता ते बागेत जास्त वेळ राहू लागले. पूर्वी तो माळ्यासमोर कधी येतच नव्हता. त्याला पाहताच पळून जाणार. आता त्याला पाहून पळून न जाता थांबू लागला. जवळ येऊ लागला. त्याच्या हातून ही गवत खाऊ लागला. एवढ्यावर त्याला पकडणे शक्य नव्हते म्हणून माळ्याने एक युक्ती केली.

त्याने बागेपासून राजभवनापर्यंत चटई अंथरली व त्या चटईवर

मधयुक्त गवत टाकले व हातात एक मधाचा लोटा घेतला. एका हातात गवत घेऊन त्या मधामध्ये बुडवून हरिणाला चाखू लागला. त्याला चारवत चारवत तो राजभवनाकडे जाऊ लागला. हरिण कधी हातातील गवत तर कधी चटईवरील गवत खात मधाच्या लोभामध्ये पुढे जाऊ लागले. अशाप्रकारे मधाच्या लोभामध्ये फसून तो राजमहालाच्या फाटकाच्या आत शिरला. फाटकाच्या आत जाताच फाटक बंद झाले. आता हरिणाला आपली चूक कळाली. तो भितीने इकडे-तिकडे पळू लागला; परंतु आता काही ही उपयोग नव्हता. रसाच्या तृष्णने हरिण कैदेमध्ये बद्ध झाले. दुःखाची मालिका सुरू झाली. म्हणून विषयप्रवृत्ती घोर संकटाचे प्रवेशद्वार आहे. विषयप्रवृत्ती बंधनकारक आहे, मृत्युदंड देणारी प्राणघातक आहे. अनंतसंसार वाढवणारी विषवेल आहे.

मोही लोक पुण्याची प्रशंसा अज्ञानवश उपादेयरूपाने करतात. येथे आचार्य पुण्याची हेयरूपाने प्रशंसा करतात.

शुभोपयोगामध्ये हेयत्वाची दृष्टी –

पुण्याला हेय सांगितले यावरून पुण्याचे फळ इन्द्रियसुख व पुण्याचे कारण शुभोपयोग सुद्धा हेय आहे ही गोष्ट सिद्ध होते. कारण जी गोष्ट स्वयं त्याज्य आहे तर त्याचे कारण व त्याचे फळसुद्धा त्याज्यच असते. विषवृक्षाचे बी व विषवृक्षाचे फळ दोन्ही ही ग्रहण करण्यायोग्य नाहीत. ज्यांना शुद्धोपयोगाची रूची आहे, ज्यांनी शुद्धोपयोगाचे मर्म जाणले आहे व ज्यांना शुद्धोपयोगाचे फळरस कैवल्य अवस्था आनंदरूप आहे असा निर्णय झाला आहे त्यांच्या दृष्टीमध्ये शुभोपयोग व अशुभोपयोग दोन्ही समान आहेत. अशुभोपयोगाने कोणाचेही हित नाही, अशुभोपयोग कोणाच्याही दृष्टीमध्ये हितरूप नाही. ज्यांना कैवल्य अवस्था प्रिय आहे त्यांच्या दृष्टीमध्ये शुभोपयोगसुद्धा हितरूप नाही.

शुभोपयोग करूनसुद्धा शुभोपयोगाच्या अग्रहणाची दृष्टी–

जे ज्ञानी शुभोपयोग करतातसुद्धा व त्याला हेयसुद्धा मानतात त्यांची गोष्ट सत्य आहे. जे शुभोपयोग करीत नाहीत व अशुभोपयोगामध्ये लीन आहेत. शुद्धोपयोगाची अवस्था प्राप्त नाहीच व शुभोपयोगाला हेय मानतात

त्यांची गोष्ट खरी नाही. ज्यांना शुद्ध मार्गाचे दर्शन तर झाले आहे परंतु कर्मोदयवश, परिस्थितीवश शुद्धोपयोगाच्या मार्गावर यथेष्ट चालू शकत नाहीत त्यांची शुभोपयोगामध्ये प्रवृत्ती होते; परंतु त्यांच्या श्रद्धेमध्ये शुभोपयोग ग्रहण करण्यायोग्य नाही.

ज्याप्रमाणे कोण्या रोग्याला पित्तज्वर आहे त्याला कडू, गोड सर्व प्रकारचे औषध सेवन करावे लागते. गोड औषधाचे सेवन करताना त्याला असे भाव असतात का की हे औषध मला जीवनभर सेवन करण्यास मिळाले तर बरे होईल ? जरी त्याला त्या औषधासंबधी प्रेम आहे, वेळच्यावेळी औषध सेवन करतो, वेळेवर औषध मिळाले नाही तर कुटुंबीजनांवर चिडतो; परंतु त्याला हृदयापासून विचारा की तू खरोखर जीवनभर हे औषध घेऊ इच्छितोस काय ? तो हेच म्हणेल, नाही मी औषध घेऊ इच्छित नाही. त्याचप्रमाणे संसाररोगाने पीडित ज्ञानी पुरुष या रोगनिवारणाकरिता प्रयत्नशील राहतो. शुभोपयोगाचे औषध प्रेमाने पीतो. ज्याप्रमाणे मुलांना जबरदस्तीने औषध पाजवतो तसे नाही, वेळच्या वेळी शुभोपयोग करताना दिसतो. पूजेची वेळ झाली की पूजा करतो, स्वाध्यायाची वेळ झाली की स्वाध्याय करतो. सामायिकाच्यावेळी सामायिक करतो. सर्व प्रेमपूर्वक करतो. परंतु एवढ्यावरून त्याला कोणी विचारले. काय तू अशी पूजा, असे सामायिक अनंत काळापर्यंत करू इच्छितोस ? तर त्याचे उत्तर असेल नाही, आम्ही तर सर्व क्लेशाने रहित केवळ स्वस्थरूप राहू इच्छितो. म्हणून ज्ञानी शुभोपयोग करीत असतानाही त्याला उपादेय मानत नाही.

सुख, दुःख, पुण्य, पाप, शुभोपयोग व अशुभोपयोगामध्ये अनात्मरूपता –

येथे सहा गोष्टी सांगितल्या आहेत. त्या सहाच्या सहा गोष्टी आत्मस्वरूपापासून भिन्न आहेत. न सुख (संसारसुख) आत्म्याचे स्वरूप आहे, न दुःख आत्म्याचे स्वरूप आहे. आत्म्याचे स्वरूप तर आनंद आहे. न पुण्य आत्म्याचे स्वरूप आहे, न पाप आत्म्याचे स्वरूप आहे. आत्म्याचे स्वरूप तर ज्ञायकस्वभाव आहे. न शुभोपयोग आत्म्याचे स्वरूप आहे, न अशुभोपयोग आत्म्याचे स्वरूप आहे. आत्म्याचे स्वरूप शुद्ध ज्ञानस्वभाव आहे. या ज्ञानस्वभावाच्या अवलंबनामध्ये ही सहा परतत्त्वे परभाव भासित

होतात. एक ज्ञानतत्त्वाच्या अवलंबनामध्ये जो आनंद उत्पन्न होतो त्याद्वारे कर्माचा समूह विलीन होतो. एक आनन्दाचाच अनुभव होतो. तो अनुभव मोक्षाचा मार्ग आहे. मुक्ती दुःख सोसून होत नाही तर शुद्ध आनन्दाचा अनुभव करून मिळते.

ज्या ज्ञानी पुरुषाला शुभोपयोगाच्या फळामध्ये प्राप्त झालेला पुण्यबंध, पुण्याच्या फळामध्ये प्राप्त झालेली तृष्णा व तृष्णेच्या फळामध्ये प्राप्त झालेला क्लेश याचे सम्यग्ज्ञान आहे त्याच्या दृष्टीमध्ये पुण्य दुःखाच्या बीचे कारण आहे. दुःखाचे बी तृष्णा व तृष्णेचे कारण पुण्योदय. पुण्य तृष्णेचे घर असल्यामुळे उपादेय नाही. ज्या शुभोपयोगाने पुण्यकर्माचा बंध होतो तो शुभोपयोगसुद्धा उपादेय नाही. एक शुद्धोपयोगच उपादेय आहे. कारण तो कर्मनाशक आहे, विषय दाहाचे उपशमन करणारा आहे. निजानन्द प्रवर्तक आहे म्हणून याचीच निरन्तर भावना करावी. त्यासाठी सहजशुद्ध ज्ञानानन्दस्वभावी आत्म्याला जाणण्याचा पुरुषार्थ करावा. शुभोपयोग करीत असता पुण्यप्राप्तीचे लक्ष न ठेवता शुद्धोपयोगाचे लक्ष ठेवावे.

मागील गाथेमध्ये पुण्य दुःखाचे कारण आहे ही गोष्ट स्पष्ट केली आहे. आता या गाथेमध्ये हे जाहीर करतात की पुण्य दुःखरूप फळाला देते यारूपाने पुण्याचा विजय प्रसिद्ध आहे. ज्याप्रमाणे सज्जन व्यक्ती विजय मिळवतो व दुर्जन व्यक्तीसुद्धा विजय मिळवितो. सज्जन व्यक्ती दया, दान, परोपकार, क्षमा इत्यादीमध्ये प्रसिद्धी प्राप्त करून विजयी होतो, दुर्जन व्यक्ती दरोडा, मारामारी, व्यभिचार, इत्यादी कार्यामध्ये प्रसिद्धी प्राप्त करून अशुभ कार्यामध्ये विजयी होतो. त्याप्रमाणे धर्माचा व पुण्याचा सुद्धा विजय होतो.

धर्माचा सुख देण्यामध्ये विजय होतो व पुण्याचा दुःख देण्यामध्ये विजय होतो. पुण्य प्रत्यक्ष सुख देते असा आभास होतो; परंतु वास्तविक ते दुःखरूप फळ देते ही गोष्ट येथे जाहीरपणे सांगतात.–

जे पुण उद्दिण्हतिण्हा दुहिदा तण्हाहिं विसयसोक्खाणि
इच्छंति अणुहवंति य आमरणं दुक्खसंतत्ता ॥७५॥

अन्वयार्थ – (**पुण**) पुन्हा (**उद्दिण्हतिण्हा ते**) ज्यांना तृष्णेचा उदय झाला आहे ते (**तण्हाहिं दुहिंदा**) तृष्णांच्या द्वारे दुःखी होऊन (**आमरणं**)

मरणपर्यन्त (**विसयसोक्खाणि**) विषयसुखाची (**इच्छंति)** इच्छा करतात (**य**) व (**दुक्खसंतत्ता**) दुःखाने संतप्त होऊन (**अणुहवंति**) त्यांचा अनुभव करतात.

तात्पर्य हे आहे की पुण्याच्या उदयाने ज्यांची तृष्णा वाढली आहे ते विषयेच्छेच्या दाहामुळे मरणापर्यंत दुःख भोगतात.

तृष्णेमुळे विषयाभिलाषा व दुःखानुभव –

सामान्य संसारी जीवापासून ते देवापर्यंतचे सर्व संसारी जीव या पुण्यकर्माच्या उदयाने उत्पन्न झालेल्या तृष्णेमुळे विषयसुखाची अभिलाषा करतात व त्याद्वारे दुःखाचाच अनुभव करतात.

ज्याप्रमाणे तहानलेले हरिण मृगमरीचिकेला दुरून पाणी समजून पाणी पिण्यासाठी तिकडे धाव घेते; परंतु तेथे जल प्राप्त न झाल्यामुळे दुःखी होते. त्याप्रमाणे तृष्णायुक्त संसारी जीव सुखाच्या इच्छेने इंद्रिय विषयांच्या पाठीमागे लागतात, परंतु तेथे सुख प्राप्त होत नाही. कारण विषयामध्ये सुख नाही. विषयसुखाच्या इच्छेमध्ये दुःखाच्या संतापाचा वेग असतो. विषयासक्त जीव त्या दुःखसंतापाच्या वेगाला सहन करू शकत नाही. त्यामुळे नाना उपाय करीत राहतो. सदैव निदान नावाचे आर्तध्यान करीत राहतो. शेखचिल्लीप्रमाणे विचार करणे, भोगांची इच्छा करणे, सम्पत्तीची अभिलाषा करणे, या सर्वामुळे निदाननावाचे आर्तध्यान होते. '**ऋतेर्भवं आर्तम्**' पीडा झाल्यावर जे ध्यान होते ते आर्तध्यान. ज्यामध्ये दुःखच दुःख आहे असे ध्यानसुद्धा पुण्यवान जीवांना होते.

विषयाभिलाषेमुळे आमरण क्लेश –

सुखाची इच्छा करण्यामध्ये दुःखाच्या संतापाचा एक वेग असतो. संतापापेक्षा सुद्धा भयंकर संतापाचा वेग असतो. त्या वेगाला सहन न करता पुण्यवान जीव विषयांचा अनुभव करतात आणि विषयामध्ये तोपर्यंत प्रवृत्ती करतात जोपर्यंत ते नाशाला प्राप्त होत नाहीत.

ज्याप्रमाणे जळवा अशुद्ध रक्त तोपर्यंत पितो जोपर्यंत तो नाशाला प्राप्त होत नाही. जळवा खराब रक्त पोट भरून पिऊन मरून जातो. माणसाचे अशुद्ध रक्त शोषण्यासाठी जळवा जेव्हा त्या अवयवाला चिकटवला जातो तेव्हा पूर्ण पोट भरल्याशिवाय सोडत नाही. जेव्हा त्यामध्ये रक्त पिण्याची ताकत राहत

नाही तेव्हा तो रक्त पिणे सोडतो. जेव्हा जळवा रक्त पिणे स्वतःहून सोडतो तेव्हा वैद्य त्याला उलटे करून हळूच दाबून त्याच्या पोटातून रक्त काढतो नाहीतर तो लवकरच मरण पावतो त्याप्रमाणे पुण्यवान जीव विषयांच्या अभिलाषेने उत्पन्न झालेल्या संतापाच्या वेगाला सहन न करता तोपर्यंत विषयामध्ये प्रवृत्ती करतात की जोपर्यंत मरणाला प्राप्त होत नाहीत. मरेपर्यंत जीवांची विषयतृष्णा शांत होत नाही.

एक वृद्ध पुरुष मृत्युशय्येवर पडून झटपटत होता. डॉक्टरांनी सांगितले होते 'आता उपचार संपले आहेत, देवाचे नाव घ्या.' परिवारजन त्याच्या चारी बाजूला चिंतातुर होऊन बसले होते. म्हाताऱ्याने एकदा डोळे उघडले व आतुर होऊन विचारले माझी पत्नी कोठे आहे ? पत्नीने धीर देऊन सांगितले 'मी तुमच्या चरणाजवळच बसले आहे, तुम्ही घाबरू नका. देवाचे नाव घ्या.

वृद्ध पुरुषाने दुसरा प्रश्न विचारला 'मोठा मुलगा कोठे आहे ? 'लगेच मोठ्या मुलाने उत्तर दिले, 'पिताजी मी येथेच आहे. तुम्ही काळजी करू नका.' पुन्हा वृद्ध पुरुषाने विचारले,' मधला मुलगा कोठे आहे ? तो म्हणतो, मीसुद्धा तुमच्याजवळच आहे. आमची चिंता न करता देवाचे नामस्मरण करा.' पुन्हा तो विचारतो, 'आणि छोटा मुलगा कुठे आहे ?' 'मी तुमच्या समोरच आहे पिताजी' असे म्हणताच वृद्ध चिडून जोराने म्हणतो, 'नालायकांनो, सर्वजण येथेच चिकटून बसला आहात तर दुकानात कोण आहे?'

मनुष्याच्या लालसा व तृष्णेची ही किती विडम्बना आहे की स्वतः मृत्युशय्येवर पडला असतानाही मन दुकानात आहे. जो आत्मा परलोकात निघून जाणार त्याची काळजी नाही व जे आपल्यापासून अत्यंत भिन्न आहे व जे आपल्याबरोबर येणार नाही त्याची हा जीव चिन्ता करतो.

या मनुष्यामध्ये एक इच्छा नसती तर काय झाले असते ? मनुष्य सुखी झाला असता. जेवढे दुःख आहे ते इच्छेमुळेच आहे. ज्याप्रमाणे इष्टवियोगामध्ये, अनिष्ट संयोगामध्ये, शरीरामध्ये रोग झाल्यावर कष्ट होते तसेच कष्ट विषयांच्या इच्छेमुळे होते. विषयाभिलाषेमुळे मन चंचल असते, दुसरीकडे मन लागत नाही. बुद्धीसुद्धा काम करीत नाही. अंतरंगामध्ये सदैव

आकुलता असते. इच्छा करून करून जीव जोपर्यंत क्षयाला प्राप्त होत नाही तोपर्यंत कष्ट दुःख प्राप्त करतो.

पुण्य दुःखाचे आयतन –

पापाच्या उदयामध्ये प्रतिकूल संयोगामुळे किंवा अनुकूल संयोगाच्या अभावामुळे दुःखी आहे आणि पुण्याच्या उदयामध्ये तृष्णेमुळे भोग भोगताना सुद्धा आकुलित आहे, दुःखी आहे. या संसारात कोणी सुखी नाही म्हणून दौलतरामजी म्हणतात–

दाम बिना निर्धन दुःखी, तृष्णावश धनवान ।
कहू न सुख संसार में, सब जग देख्यो छान ।

ज्यांना आत्म्याच्या आश्रयाने संतोष नाही, त्यांना व्यक्त किंवा अव्यक्तरूपाने तृष्णा राहतेच. संसारामध्ये मिथ्यादृष्टी जीवाला तृष्णा उत्पन्न करणाऱ्या तीव्र लोभाचा उदय सदैव असतो. जेथे बाह्य निमित्त प्राप्त होत नाही तेथे तो तीव्र लोभ बाहेर प्रगट दिसत नाही, परन्तु जेथे निमित्त असते व निमित्त मिळत जाते तेथे तो लोभ तृष्णेच्या नावाने प्रगट होतो. पुण्यकर्माच्या उदयाने जेव्हा बाह्य पदार्थ इंद्रियांचे विषय भोगण्यायोग्य प्राप्त होतात तेथे तो लोभी त्यामध्ये अतिशय तन्मय होतो आणि अधिक विषयभोगांची इच्छा करतो त्या इच्छेनुसार पदार्थांचा संबंध प्राप्त करण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करतो, त्यासाठी अनेक कष्ट सहन करतो. जर कदाचित् पुण्याच्या उदयाने इच्छित पदार्थ मिळाले तर त्यांना भोगून क्षणिक सुख मानतो व पुन्हा अधिक तृष्णा वाढवितो. त्या वाढलेल्या तृष्णेनुसार पुन्हा नवीन सामग्रींचा संबंध प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहतो. जर इच्छित पदार्थ मिळत नाहीत तर महादुःखी होतो व कदाचित् मिळाले तर त्यांना भोगून अधिक तृष्णा वाढवतो. याप्रमाणे विषयांच्या संग्रहामध्ये रात्रंदिवस घालवितो. असाच उद्यम करता–करता एक दिवस आपले जीवन समाप्त करतो. परंतु विषयांचा दाह कमी न करता उलट वाढवत जाऊन त्याच्या दाहामध्ये जळून जातो. म्हणून पुण्य सुखाभासरूप दुःखाचेच साधन आहे.

संपूर्ण बाह्य धनवैभवाचा, स्त्री पुत्रादिकांचा त्याग करून संन्यासी होऊनसुद्धा जर अंतरंगस्वभावामध्ये तृप्ती नाही तर त्यालासुद्धा तृष्णा राहतेच.

आत्म्याची शांती अमृतस्वरूप निज आत्म्याच्या आश्रयाने आहे. ज्याला अशी अंतरंगस्वरूपाची तृप्ती नाही त्याला तृष्णेचा वेग असतोच. कुणाला ती प्रकट दिसते तर कुणाला अप्रकट असते. अंतरंगामध्ये संतोष नाही तर तृष्णारूपी बीज क्रमशः अंकुरित होऊन दुःखवृक्षरूपाने वृद्धीला प्राप्त होते.

आत्म्याची शांती अथवा आनन्द ज्ञानस्वरूपाच्या आश्रयाने होतो. जो त्याचा आश्रय सोडून इन्द्रियांचा आश्रय घेतो त्याला सुख नाही, तृष्णा आहे. मराठीमध्ये एक म्हण आहे, 'काखेत कळसा व गावाला वळसा.' आपल्या काखेतच घागर धरली आहे आणि विसरून गेला व माझी घागर कोठे आहे म्हणून गावभर शोधून हैरान होतो. शेवटी आपल्याकडे बघतो तर आपल्या काखेतच घागर आहे. त्याचप्रमाणे अत्यन्त निकट विराजमान स्वयं सुखस्वरूप प्रभूजवळच आम्ही राहतो. प्रभू परिपूर्ण आनन्दमय व ज्ञानस्वरूप आहे. तो प्रभूच तर मी आहे आणि आम्ही बाहेर विषयांमध्ये सुख शोधतो आहोत. ज्ञानवृद्धीसाठी बाहेर प्रयत्न करीत आहोत की या पुस्तकातून ज्ञान मिळेल, या गुरूपासून ज्ञान मिळेल. परंतु ज्ञान व सुखाची खाण हा स्वयं आत्माच आहे हे जाणत नाही. एक आत्मिक आनन्दाला हितकारी जाणून त्यासाठी सदैव आत्मस्वभावाची भावना करावी.

गाथा ६३ पासून इंद्रियसुख अपारमार्थिक आभासरूप व आकुलतामय असल्यामुळे दुःखरूप आहे ही गोष्ट सिद्ध केली आहे. आता पुनः अनेक प्रकाराने इंद्रियसुखाच्या दुःखरूपतेला प्रकाशित करतात. इंद्रियसुखाच्या वर्णनाची ही अंतिम सारगर्भित गाथा आहे.

ज्याप्रमाणे कोणी कलाकार अनेक प्रकाराने आपली कला दाखवून शेवटच्या प्रयोगामध्ये आपले पूर्ण कौशल्य प्रकट करून पाहणाऱ्यांचे मन आकर्षून घेतो त्याप्रमाणे आचार्य इंद्रियसुखाचे अनेक प्रकाराने वर्णन करून शेवटच्या गाथेमध्ये त्याचे पूर्ण स्वरूप प्रकट करून वाचकांच्या मनामध्ये इंद्रियसुखासंबंधीची रूची कमी करून अतींद्रिय सुखाकडे वाचकांना आकृष्ट करतात. अनेक हेतूंच्या द्वारे इंद्रियसुखाची दुःखरूपता व्यक्त करतात.-

सपरं बाधासहियं विच्छिण्णं बंधकारणं विसमं ।
जं इंदियेहि लद्धं तं सोक्खं दुक्खमेव तहा ॥७६॥

अन्वयार्थ – (**जं**) जे (**इंदियेहिं लद्धं**) इंद्रियाने प्राप्त होते (**तं सोक्खं**) ते सुख (**सपरं**) परसापेक्ष (**बाधासहियं**) बाधासहित (**विच्छिण्णं**) नष्ट होणारे (**बंधकारणं**) बंधाचे कारण व (**विसमं**) विषम आहे. (**तहा**) तसेच (**दुक्खमेव**) ते दुःखच आहे.

जे सुख पराधीन, बाधासहित, विनाशिक, विषम व बंधाचे कारण आहे ते स्वयं दुःखच आहे.

इंद्रियसुखाची पराधीनता –

इंद्रियसुख प्राप्त होण्यासाठी अनेक परवस्तूंवर अवलंबून रहावे लागते. प्रथम तर इंद्रिये पाहिजेत. इंद्रिये आपल्यापासून भिन्न आहेत. ती कर्माच्या अधीन आहेत. कर्माच्या उदयाने इंद्रिये प्राप्त झाली पण जर त्याच्या अभ्यन्तर उपकरणामध्ये बिघाड झाला तर ती विषयांना ग्रहण करू शकत नाहीत. त्यासाठी पुनः डॉक्टर व औषध इत्यादींच्या अधीन व्हावे लागते. दुसरी गोष्ट इंद्रियसुखासाठी अनेक विषयसामुग्रीची आवश्यकता आहे. ती विषयसामुग्री पुण्य कर्माच्या अधीन आहे. जर पुण्यकर्माचा उदय असेल तर प्राप्त होईल. उदाहरणार्थ कोण्या जीवाला डोळ्याने चित्रपट पाहण्याची इच्छा झाली. ते डोळ्याचे सुख प्राप्त होण्यासाठी प्रथम त्याला डोळे पाहिजेत. डोळे असून त्यामध्ये जर मोतीबिंदू, काचबिंदू किंवा इतर काही रोग झाला तर ते सुख तो भोगू शकत नाही. ते डोळे नीट करण्यासाठी डॉक्टर, औषध, पैसे इत्यादींच्या अधीन रहावे लागते. डोळे व्यवस्थित आहेत परंतु चित्रपट उपलब्ध नसेल तर सुख भोगू शकत नाही. चित्रपटासाठी पुन्हा पैसे पाहिजेत. पैसे पण आहेत; परंतु लाईट नसेल तर चित्रपट पाहू शकत नाही.

इंद्रिये आहेत व विषयसुद्धा प्राप्त झाले; परंतु जीवाचा उपयोग दुसरीकडे असेल किंवा ती इच्छा नष्ट होऊन दुसरीच इच्छा उत्पन्न झाली की ते इंद्रियसुख मिळू शकत नाही. कारण जेव्हा इच्छा असते तेव्हा भोग मिळत नाही व जेव्हा भोग मिळतात तेव्हा इच्छा असत नाही.

अशाप्रकारे एक एक इंद्रियसुखासाठी अनेक परवस्तूंवर अवलंबून रहावे लागते म्हणून ते पराधीन आहे.

पराधीनता म्हणजे दुःख–

पराधीनतेमध्ये सुख मिळाले तर त्या सुखाला कोणी सुख मानत नाही उलट दुःखच मानतात. ज्याप्रमाणे भारत देशावर इंग्रजांचे राज्य होते व त्या इंग्रजांनी अनेक सुखसुविधा दिल्या तरी भारतवासी दुःखाचा अनुभव करीत होते. आम्ही स्वतंत्र नाही, दुसऱ्यांचे राज्य आहे. स्वतःला गुलाम मानून मनामध्ये पीडा उत्पन्न होत असे. स्वतंत्रता प्राप्त होण्यासाठी असहयोग, सत्याग्रह आदी अनेक चळवळी केल्या. अनेक सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. यावरून पराधीनतेमध्ये किती दुःख आहे हे लक्षात येते. देश स्वतंत्र झाल्यावर अनेक कष्ट भोगताना सुद्धा भारतवासी सुखाचा अनुभव करतात. यावरून स्वतंत्रतेमध्ये सुख आहे हे लक्षात येते. पशुपक्षी बंधनामध्ये सर्व काही सुखसुविधा असल्या तरी दुःखाचा अनुभव करतात. ज्या सुखामध्ये पराधीनता आहे ते सुख, सुख नाही, तो सुखाभास आहे अर्थात दुःखच आहे.

इंद्रियसुख बाधासहित–

इंद्रियसुखामध्ये अनेक बाधा आहेत. इन्द्रिये मिळाली, भोगवस्तू सुद्धा प्राप्त झाल्या, भोगण्याकडे आपला उपयोग सुद्धा आहे, परंतु जर त्यामध्ये बाधा उपस्थित झाल्या तर इंद्रियसुख प्राप्त होत नाही. ज्याप्रमाणे डोळे निर्दोष आहेत, चित्रपट लागला आहे, तो चित्रपट पाहण्यामध्ये आमचा उपयोग पण लागला आहे, तेवढयात लाईट गेली किंवा आपल्यापेक्षा मोठी पूज्य व्यक्ती किंवा मित्र भेटण्यासाठी आला तर त्या सुखामध्ये भंग होतो. त्या परिस्थितीमध्ये सुख भोगू शकत नाही. पंचपक्वान्नाचे ताट समोर आहे, आमची जिव्हा इंद्रियसुद्धा सबल आहे. आम्ही त्या पक्वान्नाचा भोग घेत आहोत तेवढ्यात त्या ताटात माशी येऊन पडली की सुखामध्ये बाधा उपस्थित झाली. तेव्हा त्या क्षणिक भोगलेल्या सुखापेक्षा दुःखच अधिक होते. निरन्तर या संसारी जीवाला भूक, तहान, मैथुन इत्यादींच्या बाधा उपस्थित होतात तेव्हा हा जीव अत्यन्त आकुल व्याकुल होतो. त्याची ही आकुलताच सुखामध्ये बाधारूप आहे. ज्या इंद्रिय सुखामध्ये बाधा आहेत ते सुख सुख नाही तर ते दुःखच आहे.

आम्हाला वाटते सांसारिक सुखामध्ये कोणतीही बाधा येऊ नये; परंतु

संसार हीच मोठी बाधा आहे. संसारसुखामध्ये कोणतेही विघ्न येऊ नये, परंतु संसार हेच मोठे विघ्न आहे. संसारामध्ये कोणतेही संकट येऊ नये, परंतु संसार हेच संकट आहे हे या अज्ञ प्राण्याला अवगत नाही.

इंद्रियसुख विच्छिन्न (विनाशिक)–

इंद्रियसुखाचा तीसरा दोष आहे ते नष्ट होते. कारण सुख साता वेदनीयाच्या अधीन आहे. साता वेदनीयाचा उदय अन्तर्मुहूर्तापेक्षा अधिककाळ असत नाही. भले ही तो ज्ञानी असो की मूर्ख असो, गरीब असो की श्रीमंत असो. साताच्या उदयानंतर असाताचा उदय नियमाने येतो. त्यामुळे दुःख उत्पन्न होते. जसे कोणी स्त्री लहान मुलाच्या बालक्रीडा पाहून आनंदित होत होती. थोड्या वेळाने मुलगा हट्ट करून रडायला लागतो की तो आनंद नष्ट होतो व त्या मुलाचा हट्ट पाहून क्लेश होऊ लागतो. ती महिला दुःखी होते. कोणी पुरुष भोजन करण्यासाठी बसला आहे. ताटामध्ये इच्छानुरूप भोजन सामग्री येऊ लागली आहे ते पाहून अत्यंत खूष होतो. तेवढ्यात कोणीतरी नको ती वस्तू ताटात टाकली की लगेच खेदखिन्न होतो. त्याच्या आनंदात विरजन पडते.

संसारामध्ये हा सुखदुःखाच्या पाठशिवणीचा खेळ आम्ही सतत अनुभवत आहोत. एकतर आपली भोगण्याची शक्ती नष्ट होते अथवा पदार्थ नष्ट होतो अथवा त्या इंद्रियविषयाला भोगता भोगता उपयोग तेथून ऊबतो.

व्यावहारिक जीवनामध्ये दररोज नवीन नवीन इच्छा व चिन्ता उत्पन्न होतात. मुलगा जन्माला आला आनंद झाला, त्याला कोणता रोग झाला की दुःखी होतो पुन्हा बरा झाला की आनंद होतो. थोडा मोठा झाला की कोणत्या शाळेत घालायचे याची चिन्ता, ॲडमिशन मिळविण्याची चिंता, पुन्हा त्याचा रोज अभ्यास घेण्याची चिंता, त्याचा परीक्षेत नंबर आला की आनंदी होतो, पुन्हा लगेच पुढच्या ॲडमिशनची चिंता, शिक्षण पूर्ण झाले की नोकरीची चिंता, नोकरी लागली की आनंद झाला. लगेच लग्नाची चिंता, लग्न झाले आनंद झाला पुन्हा सुनेचा स्वभाव चांगला नाही की पुन्हा दुःखी होतो, पुन्हा त्यांना मुल होण्याची चिंता याप्रमाणे संसारामध्ये सतत सुखानंतर दुःख नित्य अनुभवतो, जे सुख दुःखाला घेऊन आले ते सुख, सुख कसे ? ते दुःखच

आहे. संसार अवस्थेमध्ये कोणत्याही प्रसंगामध्ये निरन्तर सुख मिळू शकत नाही म्हणून सांसारिक सुख पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणभंगुर आहे.

इंद्रियसुख बंधाला कारण –

कोणी म्हणेल ठीक आहे, इंद्रियसुख क्षणभर का होईना आनंद देते, तेवढेच सुख भोगावे, तेवढाच आनंद लुटावा काय बिघडते?. अरे परंतु जेवढा आनंद लुटला त्यामुळे जर आम्ही बंधनात पडणार असू तर त्या आनंदाचा काय उपयोग ? इंद्रियजनित सुख कर्मबधांचे कारण आहे; कारण या सुखाच्या भोगामध्ये तीव्र अनुरागाने प्रवृत्ती होते. जेथे विषयांचा तीव्र राग आहे तेथे अवश्य अशुभ कर्माचा बंध होतो.

विषयांचा उपभोग करण्याच्या मार्गामध्ये रागादिक दोषांची सेना पाठीमागे धावते. विषयोपभोगाच्या प्रसंगी एक प्रकारचा राग असतो काय ? कितीतरी प्रकारचे राग उत्पन्न होतात. एक जेवणाचा प्रसंग घ्या. जेवढ्या प्रकारच्या स्वादिष्ट वस्तू आहेत तेवढे अनुराग तर आहेतच. पुन्हा एक वस्तू खाण्याच्या प्रसंगी किती प्रकारचे राग उत्पन्न होतात. जेव्हा फुलका खाता–खाता पोट भरते. तोपर्यंत फुलका फुलला नाही. पोट भरले आणि फुलका फुलला की अंतरंगामध्ये खेद उत्पन्न होतो. जेवण करताना किती तऱ्हेचे रागद्वेष उत्पन्न होतात हे आपल्याला समजतसुद्धा नाही. भोगत असताना तत्काल एवढे विकल्प होतात, अजून पुढे जाऊन भयंकर दुःख येणार आहे. ज्याप्रमाणे मोठी सेना निघाली असेल तर त्या सेनेच्या निघण्याने भयंकर धूळ उडते, चारी बाजूला अंधार पसरतो हे तर त्याचे पूर्व रूप आहे, अजून सेना आलीच नाही, त्याप्रमाणे विषय उपभोगाच्या मार्गामध्ये जो आमचा लगाव आहे ती सेनेच्या निघण्याने उठलेल्या धूळीप्रमाणे छोटी विपदा आहे. याचा परिणाम तर पुढे दुःसह क्लेश मिळेल.

पुण्याच्या उदयाने भोगसामग्री मिळाली त्याला भोगण्याचे भाव पापभाव आहेत आणि पापभाव पापबंधाला कारण आहेत. या पापाचा जेव्हा उदय होईल तेव्हा मोठी विपदा येईल. म्हणून इंद्रियसुख वर्तमानामध्ये दुःखरूप आहे व भविष्यकाळामध्ये दुःख देणारे आहे तर ते सुख सुख कसे ? ते दुःखच आहे.

इंद्रियसुखाची विषमता –

या इंद्रियसुखाचा पाचवा दोष हा आहे की हे सुख विषम आहे, कधी वाढते तर कधी कमी होते. हा एक अत्यन्त विषम मार्ग आहे. ज्याप्रमाणे आपण गमन करताना मार्गावर केवळ चढावच असेल, किंवा केवळ उतारच असेल तर गमन करायला इतका त्रास होत नाही, परंतु जर थोडा चढाव व थोडा उतार असेल तर गमन करायला खूप त्रास होतो त्याप्रमाणे जीवनरूपी मार्गावर केवळ स्पष्ट दुःखच आले तर त्या दुःखाच्या परिस्थितीमध्ये मन मजबूत बनते, दुःख सहन करण्याची सवय लागते; परंतु कधी सुख तर कधी दुःख, कधी सुख कमी तर कधी जास्त, अशा जीवनामध्ये मन मजबूत राहत नाही. स्थिरता येत नाही. ज्याप्रमाणे कोणी जन्मापासून गरीबच असेल तर त्याला एवढे दुःख होत नाही; परंतु जो पूर्वी श्रीमंत होता व त्याला गरीबी आली तर त्याला जास्त दुःख होते. असे हे विषम इंद्रियसुख सुख कसे ? ते दुःखच आहे. अशा पाच दोषांनी परिपूर्ण इंद्रियसुख सोडण्यायोग्य आहे.

पाच इंद्रियाचे विषय भोगता भोगता अनन्तकाळ व्यतीत झाला; परंतु अद्यापि एकाही इन्द्रियाची तृप्ती झाली नाही. ज्याप्रमाणे समुद्र कधी नद्यांद्वारे तृप्त होत नाही त्याप्रमाणे कोणी प्राणी विषयभोगांनी तृप्त होत नाही. म्हणून इंद्रियसुख सुखदायी व शांतिकारक नाही. ज्या पुण्याच्या फळामध्ये दुःखरूप इंद्रियसुख मिळते ते पुण्यसुद्धा पापाप्रमाणे दुःखाचेच साधन आहे. पापाच्या उदयात स्पष्ट दुःख आहे व पुण्याच्या उदयात दुःख लपलेले आहे.

आत्मिक सुख गुणनिधान–

आत्मस्वभावाच्या अनुभवाने उत्पन्न होणारे अतीन्द्रिय सुख उपर्युक्त पाच दोषांनी रहित व त्याच्या विरोधी गुणांनी परिपूर्ण आहे.

१) आत्मिक सुख स्वाधीन आहे. कारण यासाठी केवळ आत्म्याची आवश्यकता आहे, तो स्वयं आहेच व ते स्वयं स्वतःद्वारे अनुभवाला येते. त्यामध्ये परवस्तूची गरज नाही, उलट परवस्तूचा त्यागच या सुखानुभवामध्ये उपयुक्त आहे.

२) आत्मिक सुख सर्व बाधांनी रहित अव्याबाध व निराकुल आहे. या

सुखाला भोगताना न आत्म्याला काही कष्ट होते, न शरीरामध्ये रोग होतो. उलट या सुखाच्या भोगाने आत्मा व शरीर दोन्ही पुष्ट होतात. आत्म्याचे अन्तराय कर्म नष्ट होते त्यामुळे आत्मवीर्य वाढते. परिणामामध्ये शांती शरीररक्षक व अशांती शरीरनाशक आहे.

३) अतींद्रिय सुख आत्म्याचा स्वभाव आहे म्हणून अविनाशी आहे. यद्यपि स्वानुभवी छद्मस्थ जीवांना धारावाहीरूपाने आत्मसुखाचा स्वाद येत नाही. कारण त्यामध्ये बाधक कषाय आहेत; परंतु आत्मिक सुख आत्म्याचा स्वभाव आहे त्याचा कधी नाश होत नाही. मोक्षामध्ये तर हे सुख अविनाशी आहेच.

४) आत्मिक सुख कर्मबंधाचे कारण नाही, उलट कर्मबंधाच्या नाशाला कारण आहे. आत्मानुभवामध्ये जो परमानन्द येतो तो कर्माच्या समूहाला जाळून टाकतो. कर्मबीज समूळ नष्ट होते.

५)आत्मिक सुख समतारूप आहे. हानिवृद्धीने रहित आहे. संसार अवस्थेमध्ये आत्मिक सुखामध्ये तरतमता दिसते ती कषायांच्या तरतमतेमुळे आहे. जेवढा कषायांश कमी होत जाईल तेवढे सुख वृद्धिंगत होत जाते. मोक्षामध्ये तर हे सुख समरूप आहे.

या आत्मिक सुखाच्या भोगामध्ये आकुलता नाही व हे कधी आपल्या जातीला बदलत नाही. हे सुख परमतृप्ती व संतोष देणारे आहे असे जाणून आत्मिक सुखालाच सुख मानावे आणि इंद्रियसुखाला सर्वथा दुःखरूप मानावे. यावरून हे सिद्ध होते की ज्या पुण्याच्या उदयाने इंद्रियसुख होते त्या पुण्याला कारणभूत शुभोपयोग आहे तो सुद्धा हेय आहे व समताभावरूप शुद्धोपयोगच ग्रहण करण्यायोग्य आहे. आत्मिक सुख प्राप्त करण्यासाठी निरन्तर आत्मस्वभावाची उपासना करावी.

मागील गाथांमध्ये अनेक प्रकाराने ही गोष्ट सिद्ध केली आहे की इन्द्रियसुख सुख नाही, दुःखच आहे. जर पापाच्या उदयामध्ये प्राप्त होणाऱ्या दुःखाप्रमाणेच पुण्याच्या उदयामध्ये प्राप्त होणारे इंन्द्रियसुख सुद्धा दुःखच आहे. तर पुण्यपापामध्ये अंतरच काय राहिले? पुण्य पापामध्ये निश्चयाने अंतर नाही हीच गोष्ट पुढील गाथेत सांगून शुभोपयोग अधिकाराचा उपसंहार

करतात.–

ण हि मण्णदि जो एवं णत्थि विसेसो त्ति पुण्णपावाणं ।
हिंडदि घोरमपारं संसारं मोहसंछण्णो ।। ७७।।

अन्वयार्थ – (**एवं**) अशाप्रकारे (**पुण्णपावाणं**) पुण्य आणि पापामध्ये (**विसेसो णत्थि त्ति**) भेद नाही असे (**जो**) जो (**ण हि मण्णदि**) मानत नाही तो (**मोहसंछण्णो**) मोहाने आच्छादित होऊन (**घोरं अपारं संसार**) भयानक अपार संसारामध्ये (**हिंडदि**) हिंडतो अर्थात् परिभ्रमण करतो.

तात्पर्य हे आहे की दोन्हीही बंधाचे कारण असल्यामुळे पुण्य व पापामध्ये अंतर नाही असे जो मानत नाही तो या भयानक संसारामध्ये भटकतो.

शुभोपयोग व अशुभोपयोगामध्ये आत्मधर्मतेचा अभाव –

अशुभोपयोग कषायाच्या तीव्र उदयाच्या निमित्ताने होणारा विकार आहे, तो आत्म्याचा धर्म नाही. कारण अशुभोपयोग कर्माच्या निमित्ताने होणारा नैमित्तिक भाव आहे. शुभोपयोग कषायाच्या मन्द उदयाच्या निमित्ताने होणारा विकार आहे तो ही आत्म्याचा धर्म नाही. कारण तो सुद्धा नैमित्तिक भाव आहे. स्त्री, पुत्र, मित्र, शत्रु, यश, ख्याति, प्रतिष्ठा इत्यादींचा आश्रय करून होणाऱ्या विषय कषायरूप विकाराला अशुभोपयोग म्हणतात. तो आत्म्याचा धर्म नाही, कारण तो पराधीन आहे.

देव, शास्त्र, गुरु, धर्मात्मा, दुःखी इत्यादींचा आश्रय करून होणाऱ्या विकाराला शुभोपयोग म्हणतात. तो सुद्धा आत्म्याचा धर्म नाही कारण तो ही पराधीन आहे. सदा एकसमान न राहणारा, अनुरागाच्या अनेक डिग्रीमध्ये दोलायमान होणारा, शुभोपयोग व अशुभोपयोग दोन्ही आत्म्याचे धर्म नाहीत कारण ते विषम आहेत. अन्तर्मुहूर्तामध्ये अशुभोपयोग तर अन्तर्मुहूर्तामध्ये शुभोपयोग अशाप्रकारे आलटून पालटून होणारे ते दोन्ही ही आत्म्याचा धर्म नाहीत. कारण ते दोन्ही अनियत आहेत. आत्म्याच्या सहज स्वभावाच्या स्वाभाविक विकासाच्या विरूद्ध उत्पन्न होणारे ते दोन्ही उपयोग आत्म्याचे धर्म नाहीत, कारण ते आत्म्याच्या विपरीत स्वभावरूप आहेत. दोन्ही कर्माच्या उदयाशिवाय होत नाहीत म्हणून ते आत्म्याचे धर्म नाहीत. केवळ आत्मा

त्यांचा स्वामी नाही म्हणून संयोगी भाव आहेत.

हे शुभोपयोग व अशुभोपयोग ज्ञाता द्रष्टा न राहिल्यामुळे कलुषतेने रचले गेले आहेत. ते आत्म्याचे धर्म नाहीत. कारण मलिनतेने रचलेले असल्यामुळे अपवित्र आहेत. हे दोन्ही उपयोग आकुलतास्वरूप असल्यामुळे आत्म्याचे धर्म नाहीत. ते स्वयं दुःखस्वरूप आहेत, दुःखाचे क्षणिक प्रतिकार मात्र आहेत. कर्माचा उदयकाळ सपंल्यावर नष्ट होणारे ते दोन्ही विकार आत्म्याचा धर्म नाहीत. एका क्षणानंतर ते स्वतःला पण वाचवू शकत नाहीत म्हणून ते अशरण आहेत. दोन्ही उपयोग भविष्यकाळासाठी दुःखाचे बी पेरणारे आहेत. ते आत्म्याचे धर्म नाहीत कारण त्यांचे फळसुद्धा दुःखच आहे.

ज्यांची शुभोपयोगामध्ये रुची आहे त्यांची विकारामध्ये रुची आहे. ज्यांची विकारामध्ये रुची आहे त्यांची संसारामध्ये रुची आहे. ज्यांची संसारामध्ये रुची आहे त्यांची मोक्षासंबंधी अरुची आहे ते नियमाने या संसाररूपी जंगलातच भटकणार व यातून बाहेर पडण्याचा मार्ग प्राप्त करू शकणार नाहीत. कारण ज्याला जशी रुचि असते तसा तो बनतो.

पुण्यकर्म व पापकर्माची समानता–

अशुभोपयोगाच्या निमित्ताने पापकर्माचा बंध होतो व शुभोपयोगाच्या निमित्ताने पुण्यकर्माचा बंध होतो. निश्चयाने पुण्यकर्म आणि पापकर्म दोन्ही समान आहेत. कारण दोघांचा स्वभाव, कारण, फल व आश्रयामध्ये भेद नाही. पुण्यकर्म व पापकर्म दोन्ही अचेतन पुद्गलमय आहेत. त्यामुळे स्वभावामध्ये भेद नाही. दोघांचे कारण जीवाचा अज्ञानमय परिणाम आहे. विकार आस्रवभाव आहे म्हणून कारणामध्ये भेद नाही.

दोघांचे फळ दुःखच आहे. पापकर्माचे फळ तर साक्षात् दुःखमय नरक व तिर्यंच गती आहे. पुण्यकर्माचे फळ इंद्रियसुख आहे. इंद्रियसुखाचे वर्णन पूर्वी केले आहे. इंद्रियसुख पराधीन, अनेक बाधांनी सहित, विनाशिक बंधाचे कारण व विषम आहे. असे सुख ते सुख कसले ते दुःखच आहे. म्हणून पुण्याच्या उदयामध्ये सुद्धा दुःखच मिळाले.

दोघांचा आश्रय बंधमार्ग आहे. पुण्यकर्म व पापकर्म दोन्ही बंधनच आहेत. लोखंडाची बेडी असो की सोन्याची दोन्ही बेड्याच आहेत. बांधून

घालण्याचेच काम करणार. एकदा अकबरांनी बिरबलाला प्रश्न विचारला, 'सांग बिरबल, या जगामध्ये सर्वात असंतुष्ट प्राणी कोण आहे ?'

बिरबलाने सांगितले, 'राजन्, जावई या जगातील सर्वात असंतुष्ट प्राणी आहे. अकबराने लगेच आज्ञा दिली की सर्व जावयांना एकत्र करा व त्यांना फासावर चढवा. बिरबलाने सांगितले ठीक आहे. त्याची तयारी करायला आठ दिवसांची मुदत पाहिजे. अकबराने होकार दिला.

मोठ्या पटांगणावर अनेक फास लटकावून तयारी केली व अकबराला पहायला बोलाविले. अकबराने पाहिले, पहिला फास सोन्याचा, दुसरा फास चांदीचा व नंतर अनेक फास लोखंडाचेच होते.

अकबराला पाहून आश्चर्य वाटले, तो म्हणाला, 'हा पहिला फास सोन्याचा व दुसरा चांदीचा कशाला टांगला आहे. बिरबलाने खाली मान घालून उत्तर दिले. 'जहांपनाह, माफ करावे, राजन व मंत्रीसुद्धा कुणाचे तर जावई आहेत. त्यांना सर्वांच्या सारखे लोंखडाच्या फासावर कसे काय चढवता येणार ? त्यांच्या पदाप्रमाणे त्यांचा मान राखण्यासाठी ही व्यवस्था आहे. तेव्हा अकबराच्या डोक्यात आपल्या अविवेकपूर्ण निर्णयाचा पश्चात्ताप झाला. लख्ख प्रकाश पडला. लोखंडाचा फाससुद्धा जीवाला मारणारच व सोन्याचा फाससुद्धा मारणारच. पापकर्म जीवाला संसारात अडकविते व पुण्यकर्म जीवाला संसारातच अडकविते मग ते चांगले कसे ?

सुखदुःखाची समानता–

सांसारिक दुःख तर दुःखमय आहे; परंतु सांसारिक सुखसुद्धा दुःखरूपच आहे. कारण दोघांचा स्वाद आकुलतामय आहे. निश्चयाने आत्म्याच्या स्वाभाविक आनन्दाहून विपरीत असल्यामुळे समान आहेत. अज्ञानी जीवाला पाच इन्द्रियांचे सुखच सुखरूप भासित होते. ज्याच्या करिता तो सतत तृषातुर असतो त्या सुखाची प्राप्ती बाह्य पदार्थांच्या संयोगाने होते असे मानून चक्रवर्ती व इंद्रापर्यंतच्या ऐश्वर्याची इच्छा करतो, व द्रव्यलिंग धारण करून निदानबंध करतो. मुनिधर्माचे पालन करूनसुद्धा मिथ्यादृष्टी गुणस्थानातच राहून अनन्तसंसाराला कारण होतो.

शांतिप्रदायक धर्म–

सुख व शांती धर्मामुळे होते, धर्म आत्मस्वभावाच्या लक्ष्याने सहज प्रकट होतो. जर इंद्रियसुख व दुःख दोन्ही समान आहेत तर त्याचे कारणभूत पुण्य आणि पाप दोन्ही समान असले पाहिजेत व जर पुण्य व पाप कर्म समान आहेत तर त्याचे कारणभूत शुभोपयोग व अशुभोपयोग दोन्ही समानच मानले पाहिजेत. एवढ्यावर सुद्धा जो प्राणी पुण्याला, शुभोपयोगाला व इन्द्रियसुखाला विशेष मानून अंहकार करतो तो संसारामध्ये शारीरिक दुःखाचाच अनुभव करतो. जे आत्म्याच्या शुद्धोपयोगाला, त्याच्या अबंधरूप अवस्थेला व अतीन्द्रिय आनंदाला जाणून त्यांना उपादेय मानतात तेच या संसारातून पार होतात; परन्तु जे असे न मानता मिथ्यात्व कर्माने आच्छादित होऊन अज्ञानाने शुभोपयोग, पुण्यकर्म व सांसारिक सुखाला उपादेय व अशुभोपयोग, पापकर्म व दुःखाला हेय मानतात ते रागद्वेषरूपाने परिणमित होऊन या भयानक संसारवनामध्ये अनन्तकाळ भटकतात.

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की अशुद्ध भावांनी, पुण्यपापकर्मांनी आत्म्याला साम्यभावाची प्राप्ती होऊ शकत नाही. म्हणून त्यापासून विरक्त होऊन वस्तूस्वरूपाला ओळखावे. मी चैतन्यस्वरूप आहे अशी प्रतीती करून सर्व द्रव्य पर्यायासंबंधी रागद्वेष सोडावेत व एक शुद्धोपयोगाला शरण जावे. यामध्येच सहज शान्ती आहे.

शुद्धोपयोग कोणत्या अन्य निमित्ताने उत्पन्न होत नाही म्हणून अनैमित्तिक आहे, स्वतः सिद्ध असल्यामुळे स्वाभाविक आहे. सर्व परिणमन समान असल्यामुळे सम आहे, स्वतःच्या आश्रयाने असल्यामुळे स्वाश्रित आहे, अन्यरूप परिणमनाची संभावना नसल्यामुळे नियत आहे, कोणत्याही परद्रव्याच्या संयोगामध्ये होत नाही म्हणून असंयोगी भाव आहे, स्वभावाने उत्पन्न असल्यामुळे आनन्दस्वरूप आहे. कलुषता रहित असल्यामुळे अत्यन्त पवित्र आहे. शाश्वत आनन्दाचे कारण असल्यामुळे शरणस्वरूप आहे, इत्यादी स्वलक्षणांनी शुद्धोपयोगच उपादेय आहे. शुद्धोपयोग तर कार्यरूप आहे. कारणरूप अनादि अनन्त, अखण्ड, एकरूप नियत, सामान्यरूप, स्वतः पवित्र, सहजज्ञान आनन्दादी अभेदस्वरूप चैतन्यस्वभावी आत्मा आहे.

त्याच्याकडे दृष्टी दिल्यावर शुद्धोपयोगाचा प्रवाह चालू होतो. म्हणून शुद्ध आत्म्याचा सदैव आश्रय करावा.

ज्याप्रमाणे एखादी वस्तू महत्त्वाची समजून हातात ग्रहण केली असेल व नंतर लक्षात आले की ही वस्तू उपयोगाची नाही, तुच्छ आहे तर ती वस्तू लगेच फेकून देतो. जसे कोणी गोल चमकणारा काचेचा तुकडा हिरा समजून उचलून घेतला असेल व थोड्या वेळानंतर समजले की अरेच्या हा हीरा नाही ही तर काच आहे तर त्याचक्षणी तिला भिरकावून फेकून देतो. त्याचप्रमाणे अज्ञान अवस्थेमध्ये रागद्वेषांना चांगले मानून ग्रहण केले होते; परंतु जेव्हा हे जाणले की सर्व संकटाचे मूळ तर हे रागद्वेष आहेत तेव्हा सर्व रागद्वेषांना दूर करीत सर्व दुःखाचा क्षय करण्यासाठी आपले मन तयार करतो.

बस, आता मला या संसारामध्ये काहीही नको. माझ्यापासून सर्व पदार्थ भिन्न आहेत, त्यांच्यामुळे माझे हित नाही, संसारामध्ये जन्ममरण करविण्यासाठी हे कारण आहेत, आता माझा कोणत्याही परपदार्थावर मोह नाही. याप्रमाणे संपूर्ण दुःखाचा नाश करण्यासाठी शुद्धोपयोगाचा आश्रय घेऊ इच्छितो. आता पुढील गाथेमध्ये हेच सांगतात की ज्ञानी जीव शुभ व अशुभ उपयोगाला समान जाणून, शुद्धात्मतत्त्वाचा निश्चय करून संसारदुःखाचा नाश करण्यासाठी शुद्धोपयोगरूप साधनाचा स्वीकार करतो. –

एवं विदिदत्थो जो दव्वेसु ण रागमेदि दोसं वा ।
उवओगविसुद्धो सो खवेदि देहुब्भवं दुक्खं ।।७८।।

अन्वयार्थ – (**एवं**) अशाप्रकारे (**विदिदत्थो**) ज्यांनी वस्तुस्वरूपाला जाणले आहे असा (**जो**) जो ज्ञानी (**दव्वेसु**) द्रव्यांमध्ये (**रांग दोसं वा**) राग आणि द्वेषाला (**ण एदि**) प्राप्त होत नाही. (**सो**) तो (**उवओगविसुद्धो**) उपयोगाने विशुद्ध होऊन (**देहुब्भवं दुक्खं**) शरीरापासून उत्पन्न दुःखाचा (**खवेदि**) क्षय करतो.

तात्पर्य हे आहे की वस्तुस्वरूपाला जाणून जो ज्ञानी पदार्थांमध्ये राग द्वेष करीत नाही तो दुःखाचा नाश करतो.

यथार्थ तत्त्वज्ञानीची समदृष्टी –

ज्याने जिनेंद्र सर्वज्ञ प्रणीत आगमाचे अध्ययन करून युक्तीच्या द्वारे

सम्यक् परीक्षण करून स्वानुभवपूर्वक वस्तूचा निर्णय केला आहे तो यथार्थ ज्ञानी होय. सर्वप्रथम प्रयोजनभूत सात तत्त्वांना जसे आहे तसे जो जाणतो तो ज्ञानी होय. सात तत्त्वांचे लक्षण जाणून त्यामध्ये हेयोपादेय बुद्धी जागरूक होणे हे ज्ञानाचे प्रथम लक्षण आहे. जीवाला जीवरूपाने, अजीवाला अजीवरूपाने जाणून, आस्रव व बंधतत्त्वाची दुःखरूप व दुःखाला कारण आहेत अशी हेय रूपाने प्रतीती करून, संवर व निर्जरा तत्त्वाला एकदेशरूपाने प्रकट करण्यायोग्य उपादेय मानून, मोक्षतत्त्वाला निराकुलस्वरूप सर्वथा प्राप्त करण्यायोग्य जाणतो तो खरा विवेकी आहे. हे सर्व शाब्दिकरूपाने नव्हे तर प्रात्यक्षिकरूपाने तशी भावना करून स्वानुभवपूर्वक सम्यक् स्वपरभेदविज्ञान करतो तो विदितार्थ आहे. ज्याला अशाप्रकारे यथार्थबुद्धी प्रकट झाली आहे तो कोणत्याही द्रव्यामध्ये राग करीत नाही व द्वेष करीत नाही. तो जाणतो की माझा आत्मा एकटा आहे. माझे दुसरे कोणीही शरण नाही, माझा आत्माच मला शरण आहे. शुभ व अशुभ भाव बंधाला कारण असून संसारामध्येच भटकविणारे आहेत. आत्म्याला संसार सागरातून तारणारे नाहीत. भले ही शुभ भाव दुर्गतीमध्ये गटांगळ्या खाणाऱ्या जीवाला सुरवातीला वर काढून त्याला पार होण्यासाठी निमित्तभूत होतात म्हणून ते प्राथमिक अवस्थेमध्ये अवलंबन करण्यायोग्य आहेत, परंतु ते संसारातून सर्वथा तारण्यासाठी समर्थ नाहीत, म्हणून अंगीकार करण्यायोग्य नाहीत.

ज्ञानी मुनीसुद्धा अशुभापासून वाचण्यासाठी शुभभावाचे अवलंबन घेतात, परंतु श्रद्धेतून त्याला हेय मानतात. बंध करण्याच्या अपेक्षेने शुभाशुभभाव समान आहेत. दोघांचा ही आस्रव व बंधतत्त्वामध्येच अंतर्भाव होतो. दोघांची जाती एक आहे असे जाणून त्यांना हेय मानतो. ज्यांनी इन्द्रियजनित सुख व दुःखाला दुःखरूपच जाणले ते त्याला कारणभूत असणाऱ्या पुण्य व पापकर्मांना समान जाणतात व जे पुण्यपापकर्मांना समान जाणतात ते त्यांना कारणभूत शुभाशुभभावांना सुद्धा समान जाणतात. त्यामुळे सर्वांमध्ये त्यांची समदृष्टी आहे.

स्वपरविभागामध्ये अवस्थित सर्वद्रव्याविषयी समचितत्ता –

विश्वातील सर्व द्रव्यांचे दोन विभाग आहेत. १) स्व व २) पर. स्वमध्ये तर एकटा आत्मा आहे आणि परामध्ये स्वतःच्या आत्म्याला सोडून

शेष अनन्तानन्त जीव, सर्व पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व असंख्यात कालद्रव्य आहेत. अशाप्रकारे स्व आणि परामध्ये अवस्थित सर्व द्रव्य व त्यांच्या सर्व पर्यायांमध्ये ज्ञानी पुरुष राग आणि द्वेषाला सोडून देतो. अज्ञानी जीवाला परपदार्थामध्ये तर रागद्वेष होतातच, परंतु स्वतःचा यथार्थ निर्णय नसल्यामुळे स्वतःवर सुद्धा राग आणि द्वेष करतो. कधी-कधी स्वतःमुळे स्वतःचे नुकसान झाले की स्वतः स्वतःवर क्रोध करतो.

ज्याप्रमाणे स्वतःच्या हाताने दूध सांडले की स्वतःवर क्रोध करतो. कस काय माझ्या हातून दूध साडलं म्हणून कपाळ बडवतो. आपल्या हातून हजार रूपये हरवले की माझ्याकडून असे कसे काय घडले म्हणून स्वतःचा द्वेष करू लागतो. किंवा स्वतःची एखादी गोष्ट चतुराईपूर्ण वाटते तेव्हा स्वतःवर राग (प्रेम) करतो. स्वतःची स्तुती करतो. पहा, मी किती सुन्दर लेख लिहिला आहे किंवा सुंदर चित्र काढले आहे. सुंदर विणकाम केले आहे. आपली सर्व प्रशस्तिपत्रे लोकांना दाखवून मी अमुक विषयात पहिला नंबर पटकाविला आहे इत्यादी स्वतःचे कौतुक करतो. हे स्वतःवर प्रेम करणेच तर आहे. हे सर्व स्वसंबंधी अज्ञान असल्यामुळेच तर घडते.

पर्यायामध्ये आत्मबुद्धी हे रागद्वेषाचे मूळ आहे. अनादिअनन्त ध्रुवशुद्ध ज्ञानानंदस्वभावी आत्म्याला स्व न जाणता गती, जाती इत्यादी औदयिक भावांना स्व जाणतो म्हणून त्या परिवर्तनशील पर्यायाकडे पाहून राग द्वेष करतो. ज्ञानी स्वतःला ज्ञानानंदस्वभावी जाणतो व पर्यायांना स्वतःपासून भिन्न अनुभवतो. त्यामुळे स्वतःमध्ये रागद्वेष करीत नाही. कोणताही पर्याय असो निजस्वभावाला जाणून त्यामध्ये समताभाव धारण करतो.

अज्ञानी सर्व परवस्तूंच्या आश्रयाने रागद्वेषाला प्राप्त होतो. कारण परवस्तूचा ही यथार्थ निर्णय नाही. परवस्तूला सुद्धा पर्यायरूपाने पाहतो. द्रव्यरूपाने त्याकडे पाहत नाही. आपल्या इच्छेनुसार परिणमनाऱ्या जीवांवर राग करतो व इच्छेविरूद्ध परिणमनाऱ्या जीवांवर द्वेष करतो. त्या दोन्हीप्रकारच्या जीवांचा जीवरूपाने निश्चय करीत नाही. त्यांच्या अनुकूल वा प्रतिकूल परिणमनाकडे पाहून रागद्वेषाला प्राप्त होतो. परंतु ज्ञानी जाणतो की कुटुम्बीजनांवर काय राग करायचा ? कारण हे सुद्धा तसेच जीव आहेत जसे

जगातील अन्य जीव आहेत, जगातील अन्य जीव जसे माझे नाहीत तसे हे सुद्धा माझे नाहीत. यांचा माझा क्षणिक संयोगसंबंध आहे. दोन दिवसानंतर हे कुठे असतील व मी कुठे असेन ? काही पत्ता लागणार नाही. मी स्वतः सुखरूप परिणमतो. कोणी दूसरा मला सुखरूप परिणमवित नाही. मग मी कुणावर राग करू ? जगातील कोणत्या पदार्थावर द्वेष करू ? कोणी मला शिवी दिली, माझी निंदा केली, माझ्याशी प्रतिकूल व्यवहार केला तर त्यांनी माझे काय केले ? मी तर सर्वाहून भिन्न विशुद्ध चैतन्यस्वरूप आहे. मला दूसरा कोणी जीव ओळखतच नाही. मी एक विशुद्ध ज्ञानपुंज आहे, मला कोणी मारू शकत नाही, छेडू शकत नाही, छेदू शकत नाही. या ज्ञानपुंज आत्म्याला कोणी जाणू शकतच नाही तर ते मला शिवी कशी देणार ? किंवा अज्ञानी जीवांनी शिवी दिली, दुर्वचन बोलले तर त्यामध्ये माझे काय नुकसान आहे ? त्याने अज्ञानाने प्रेरित होऊन अज्ञानपूर्ण चेष्टा केली आहे त्यामध्ये त्याचेच अज्ञान व्यक्त झाले आहे. ज्याप्रमाणे रस्त्याने जाणाऱ्या एका वेड्या माणसाने काही म्हटले तर त्याचे कुणाला वाईट वाटते काय ? हा वेडा आहे असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करतो, त्याचे मनावर घेतो का ? त्याप्रमाणे ज्ञानी जीव अज्ञानीला वेडा समजून त्याच्या वचनाचा स्वतःवर प्रभाव करून घेत नाही. तो समजतो की अज्ञानी दुःखी आहे, दयेला पात्र आहे. तो स्वयं स्वतःचे नुकसान करून घेत आहे, त्यावर मी काय द्वेष करू ?

ज्ञानीच्या उपयोग विशुद्धीचा परिणाम –

ज्यांनी या शरीराला व त्याच्या आश्रित असणाऱ्या पाच इंद्रियांवर व त्या इंद्रियासंबंधी पदार्थांना व त्यापासून होणाऱ्या सुखाला आकुलतेचे कारण, संसाराचे बी व त्यागण्यायोग्य जाणले आहे आणि शरीररहित आत्म्याला, व त्यापासून होणाऱ्या वीतराग आनन्दाला ग्रहण करण्यायोग्य जाणले आहे तोच पदार्थांच्या स्वरूपाला यथार्थ जाणणारा ज्ञानी आहे.

ज्ञानी पुरुष यथार्थ वस्तुस्वरूपाला जाणतो त्यामुळे कुणावरही राग करीत नाही व द्वेषही करीत नाही. रागद्वेषाचा अभाव झाल्यामुळे उपयोग विशुद्ध झाला आहे. पूर्वी परद्रव्याच्या अवलंबनाने उपयोग मलिन होत होता आता परद्रव्याच्या अवलंबनाचा त्याग केला आहे. त्यामुळे कोणत्याही

परपदार्थावर उपयोग टिकत नाही त्यामुळे उपयोगाची नियमाने विशुद्धी झाली आहे. म्हणून हा जीव सांसारिक दुःखांना प्राप्त होत नाही.

जर अग्नी लोखंडाची संगती करते तर तिला घनाचे घाव सोसावे लागतात. जर ती अग्नी लोखंडामध्ये प्रवेश करीत नाही, स्वतंत्र राहते तर तिच्यावर घनाचे घाव बसत नाहीत. त्याचप्रमाणे ही चैतन्य अग्नी रागद्वेषरूपी लोखंडामध्ये प्रवेश करते तर तिला शारीरिक दुःखाचे घाव सहन करावे लागतात परन्तु जर चैतन्य अग्नी रागद्वेषरूपी लोखंडामध्ये प्रवेश करीत नाही, एकटी शुद्ध राहते तर तिला दुःख सहन करावे लागत नाही.

जर लोखंडाबरोबर अग्नीला मार बसला तर त्यामध्ये लोखंडाचा काय दोष ? अग्नीने लोखंडाची संगती केली, तिने लोखंडाच्या गोळ्यामध्ये प्रवेश केला हा अग्नीचा दोष आहे त्यामुळे तिला लोखंडाबरोबर घनाचे प्रहार सोसावे लागतात. जर अग्नीने लोखंडाची संगती केली नाही तर तिला घनाचे प्रहार सहन करावे लागणार नाहीत. त्याप्रमाणे आत्मा परद्रव्याची संगती करून रागद्वेषरूप परिणमतो त्यामुळे त्याला अनेक प्रकारचे दुःख सहन करावे लागते. जर पराची संगती न करता अज्ञानी आत्मा एकटा राहिला तर रागद्वेषरूप होत नाही त्यामुळे दुःख प्राप्त होत नाही. हा अज्ञानी जीव नेहमी दुसऱ्याला दोष देतो.

एक माकड होते. त्याने फुटाणे घेण्याकरिता एक लहान तोंड असलेल्या घागरीमध्ये हात घातला आणि फुटाणे मुठीत भरून घेतले. आता त्या छोट्या तोंडाच्या घागरीतून बांधलेली मूठ बाहेर कशी निघणार ? तो समजतो मला घागरीने पकडले आहे म्हणून मूठ उघडण्याचा प्रयत्न करीत नाही. तो हे समजत नाही की घागरीने मला पकडले नाही, मीच मूठ बांधली आहे त्यामुळे अडकलो आहे. जर मूठ उघडली तर मी सुटलेलोच आहे. जोपर्यंत वास्तविक वस्तुस्थिती समजत नाही तोपर्यंत आत्मा बंधनात आहे. आम्ही आमचा दोष न पाहता दुसऱ्याचाच दोष पाहतो. वास्तविक हे आहे की जर मी कषायरूप परिणमन करीत नाही तर मी बंधमुक्तच आहे. जोपर्यंत आम्ही आमचा दोष न समजता पराचा दोष समजून बसू तर आपला दोष दूर करण्याचा पुरुषार्थ आमच्यामध्ये जागृत होणार नाही.

हा जीव शरीरादी परद्रव्यांमध्ये स्वयं आपलेपणा करतो आणि दोष कर्माला देतो. स्वयं स्वतःच्या स्वरूपाला यथार्थ जाणण्याचा पुरुषार्थ केला तर कर्म आपोआप सैल पडते. जर हा जीव आपल्या स्वभावाचे अवलंबन घेईल तर चारित्रमोह कर्म उदयामध्ये येण्याऐवजी उदयाभावी क्षय होऊन जाईल. जर आपण स्वतःच कषायरूप परिणमलो तर कर्म काय करील ? पाण्यामधून कोणी तरून गेले तर पानी नाकारत नाही आणि कोणी बुडाला तर त्याचा विरोध करीत नाही.

दुसऱ्याला बदलण्याचा प्रयत्न न करता स्वतःला ठीक करण्याचा उपाय करणे हा दुःखातून सुटण्याचा खरा उपाय आहे.

परमशरण शुद्धोपयोग –

तत्त्वज्ञानी जीव निज आत्म्याशिवाय दुसऱ्या पर पदार्थाचा आश्रय करून राग किंवा द्वेष करीत नाहीत, परन्तु त्यांना त्यांच्या स्वभावरूप समताभावाने जाणतो तो निर्मल शुद्धभावस्वरूप होऊन शुद्धोपयोगामध्ये लीन होतो. या आत्मध्यानरूपी अग्नीने दुःखाच्या बीज स्वरूप सर्व कर्मांना भिन्न करतो. संसाराच्या पराधीनतेतून मुक्त होऊन स्वाधीन होण्याचा हा श्रेष्ठ उपाय आहे की निजशुद्ध आत्म्याचे ज्ञान श्रद्धान करून त्यामध्येच लीन व्हावे.लोखंडाच्या पिंडाने रहित अग्नी ज्याप्रमाणे स्वाधीनरूपाने जळत लाकडांना जाळते त्याप्रमाणे आत्म्याचा शुद्ध उपयोग रागद्वेष रहित होऊन आठ कर्मरूपी लाकडांना जाळून टाकतो आणि निज आनंद सागरामध्ये मग्न होऊन स्वाभाविक स्वाधीनतेला प्राप्त करतो. आपणसुद्धा संपूर्ण दुःखाचा नाश करण्यासाठी शुद्धोपयोगाचा आश्रय घ्यावा.

शुद्ध आत्म्याचा आश्रय घेतला असता उपयोग द्वेषरहित होऊन शुद्ध होतो. जेवढ्या अंशाने रागद्वेषाचा अभाव होतो तेवढ्या अंशाने उपयोग विशुद्ध होतो. पूर्ण रागद्वेषाचा जेव्हा अभाव होतो तेव्हा उपयोग पूर्ण शुद्ध होऊन वीतराग अवस्था प्रकट होते. शुद्धोपयोगरूपी शस्त्राच्या द्वारेच मोहशत्रूचा व त्याच्या सेनेचा नाश होतो. म्हणून दुःखातून सुटण्यासाठी एक शुद्धोपयोगच शरणभूत आहे. ज्ञानी शुभ व अशुभ भावांशी रागद्वेष सोडून दोघांना समान जाणून एक शुद्धोपयोगमय साम्यभावामध्ये रमतो. ज्ञानी निश्चय

करतो की एक शुद्धोपयोगच मला शरण आहे म्हणून त्या शुद्धोपयोगामध्ये राहण्याचा पुरुषार्थ करतो. संसारातील सर्व पदार्थ माझ्या जाणण्यात आले तर येऊ देत; परन्तु कोणत्याही पदार्थासंबंधी रागद्वेषाची कल्पना माझ्यामध्ये जागृत होऊ नये. सर्व पदार्थ माझ्यापासून भिन्न आहेत. मी सर्वापासून भिन्न केवळ आपल्या स्वरूपामध्ये स्थित आहे.

ज्याप्रमाणे रस्त्यावरून जात असता ठिकठिकाणी सिग्नल असतात. तेथे हिरवा दिवा लागला की पुढे मार्गावर चालण्यास हरकत नाही, परंतु तेथे लाल दिवा लागला की धोक्याची सूचना आहे असे समजावे. लाल दिवा लागला की गाडी थांबवली पाहिजे. जर या धोक्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले व न थांबता पुढे गाडी तशीच मारली तर निश्चितपणे संकटात सापडणार अर्थात् अपघात होण्याची दाट शक्यता आहे त्याप्रमाणे मोक्षमार्गावरून गमन करणाऱ्या जीवांसाठी आचार्यांनी ठिकठिकाणी सिग्नल दाखवले आहेत. जेथे मार्गावर धोका नाही तेथे निःशंकपणे प्रवृत्ती करण्यासाठी होकारात्मक हिरवा दिवा दाखवला आहे व जेथे मोक्षमार्गावर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे, तेथून निवृत्त होण्यासाठी निषेधात्मक लाल दिवा दाखवला आहे.

या गाथेमध्ये आचार्यांनी धोक्याची सूचना देण्यासाठी लाल दिवा दाखवला आहे. आचार्य स्वतःलाच संबोधित करतात की मी मुनी होऊन सर्व पापाचा त्याग करून व चारित्राचा अंगीकार करून सुद्धा जर शुभोपयोग परिणतीच्या वश होऊन मोहादिकांना मूळासकट उखडून काढणार नाही तर मला शुद्धात्म्याचा लाभ कसा होईल? अर्थात् होणार नाही म्हणून मी मोहादिकांचे उन्मूलन करण्यासाठी सर्व प्रकारच्या प्रयत्नांनी तयारी करतो–

चत्ता पावारंभं समुट्ठिदो वा सुहम्मि चरियम्हि।
ण जहदि जदि मोहादी ण लहदि सो अप्पगं सुद्धं ।।७९।।

अन्वयार्थ– (**पावारंभं**) पापाच्या आरंभाला (**चत्ता**) सोडून (**सुहम्मि चरियम्हि**) शुभ चारित्रामध्ये (**समुट्ठिदो**) उपस्थित झालेला जीव (**जदि**) जर (**मोहादी**) मोहादिकाला (**ण जहदि**) सोडत नाही तर (**सो**) तो (**सुद्धं अप्पगं**) शुद्ध आत्म्याला (**ण लहदि**) प्राप्त होत नाही.

तात्पर्य हे आहे की पापारंभाचा त्याग करून चारित्र मार्गामध्ये लागून सुद्धा जर शुभोपयोगाच्या वश होऊन मोहादिकांचा त्याग करीत नाही तर तो शुद्ध आत्मस्वरूपाला प्राप्त करू शकत नाही.

सामायिकाची प्रतिज्ञा –

ज्यावेळी कोणी जीव उदास होऊन गृहस्थ अवस्थेचा त्याग करून मुनिदीक्षा अंगीकार करतो तेव्हा तो जीव सर्व सावद्ययोगाचा त्याग करतो व मी परम सामायिक चारित्राला ग्रहण करतो, अशी प्रतिज्ञा करतो. मुनी झाल्यावर हिंसा, असत्य, चोरी, अब्रह्म व परिग्रह या पाच पापांचा पूर्णपणे त्याग करतो म्हणून तो महाव्रती म्हटला जातो. शुद्ध आत्मस्वरूपामध्ये लीनतास्वरूप निर्विकल्प समाधिस्वरूप सामायिक चारित्राची प्रतिज्ञा करतो. त्या सामायिक संयमाबरोबर छेदोपस्थापना संयमाला ही ग्रहण करतो. अशाप्रकारे परम सामायिकाची प्रतिज्ञा करून सुद्धा विषयसुखाच्या साधनस्वरूप शुभोपयोग परिणतीच्या अधीन होऊन निर्विकल्प समाधीचा त्याग करतो. अर्थात् बाह्य व्यवहार चारित्राचे पालन करण्यामध्ये तत्पर राहतो. शुभक्रियेचे व्यवस्थित पालन करून शुभोपयोग परिणतीमध्ये लीन होतो. शुद्धोपयोगाला प्राप्त होत नाही. त्याला धूर्त अभिसारिकेच्या अधीन पुरुषाची उपमा देतात. अभिसारिका ही एक नायिका आहे. जी आपल्या पतीला न सांगता पूर्व निश्चित संकेतानुसार लपून आपल्या प्रियकराला भेटायला जाते तिला अभिसारिका म्हणतात. ती पुन्हा धूर्त असेल तर पुरुष तिच्या अधीन होऊन आपले सर्वस्व गमावतो.

येथे शुभोपयोग परिणतीला धूर्त अभिसारिका म्हटले आहे. ज्याप्रमाणे कोणी पुरुष लग्नामध्ये सात फेऱ्या मारताना आपल्या धर्मपत्नीचा जीवनभर त्याग करणार नाही असे वचन देतो व नंतर तिची उपेक्षा करून धूर्त अभिसारिकेच्या अधीन होतो. अशा पुरुषाला महादुःख, संकट जवळ आहे. त्याचप्रमाणे ज्या मुनिराजांनी दीक्षा घेताना सर्व पापयोगांचा त्याग केला, हे सर्व विकल्प औपाधिक आहेत, विनाशिक व दुःखरूप आहेत, माझ्यापासून भिन्न आहेत असा निर्णय करून परद्रव्यामध्ये प्रवृत्तिस्वरूप सर्व प्रकारच्या पापांचा परित्याग केला व परम समताभावाची प्रतिज्ञा केली, मी रागद्वेषांना

सोडून एक शुद्ध ज्ञायकस्वभावाच्या अनुभवामध्ये लीन राहीन अशाप्रकारे शुद्धोपयोग सामायिकामध्ये स्थित होण्याचा संकल्प केला होता. तरीसुद्धा पुढे ज्याप्रमाणे धूर्त अभिसारिका आपल्या कटाक्षबाणांनी व स्नेहपूर्ण संभाषणाने पुरुषांना आकर्षित करते त्याप्रमाणे मुनी शुभोपयोग परिणतीद्वारे आकर्षित झाले तर त्या मुनींना महादुःख संकट जवळ आहे अर्थात् पुढे नरक निगोदादी अनंत संसारामध्ये परिभ्रमण हेच मोठे संकट आहे. आम्हाला थोडा शुभभाव झाला की असे वाटायला लागते की मी धर्मात्मा झालो. येथे तर मुनिराजांच्या होणाऱ्या शुभभावामध्ये संतुष्ट राहणाऱ्यालासुद्धा महादुःखसंकट निकट आहे असे म्हणतात.

शुभभाव तेवढा नुकसानकारक नाही जेवढा शुभभावालाच धर्म मानणे व शुभभावनेमुळे स्वतःला धर्मात्मा मानणे महान नुकसानकारक आहे.

व्यवहार चारित्राचे पालन केल्यामुळे दोन-चार भव स्वर्गादी सुगतीमध्ये गमन होईल, परंतु पुढे त्याची दुर्गती निश्चित होणार.

सर्व दुःखसंकटाचे मूळ : मोह-

शांती प्राप्त करण्यासाठी मनुष्य अनेक उपाय करतो, धन मिळवितो, यश-ख्याती मिळवितो, पदप्रतिष्ठा प्राप्त करतो; परंतु तरीही शांतीची सावली सुद्धा याच्यावर पडत नाही. कारण अशांतीचे, दुःखाचे कारणच याने जाणले नाही. पैशाचा अभाव, पदप्रतिष्ठेचा अभाव, अयशप्राप्ती ही दुःखाची कारणे समजून बसला आहे म्हणून त्याची पूर्ती झाली की शांती मिळेल या कल्पनेने सर्व प्रयत्न सुरू आहेत. परंतु सर्व दुःखाचे मूळ मोह-रागद्वेष आहेत याचा विचारच केला नाही. त्यामुळे मोह-रागद्वेषाला नष्ट करण्याचा उपाय कधीही करीत नाही.

मोह रागद्वेषामुळे मी दुःखी आहे याची जाणीव झाली तर मोह-रागद्वेष नष्ट करण्याचा उपाय करेल. सर्व साधनांच्या कमतरतेचा विचार करीत व त्यांची पूर्ती करीत सर्व जीवन निघून गेले, परंतु आपल्यामध्ये मोह, राग, द्वेष किती कमी झाले याचा विचार केला नाही. जैनशासन प्राप्त करण्याचे फळ मोह-रागद्वेषाचा अभाव हे आहे. रागद्वेष-मोह कमी झाले नाहीत तर हे जीवन व्यर्थ आहे. म्हणून या भवात करण्यायोग्य कार्य मोहाचा नाश हे आहे म्हणून

मोहावर विजय मिळविण्याचा संकल्प करावा.

३) मोहसेनेवर विजयाचा उत्साह –

हा आत्मा मोहवश चारित्रापासून शिथिल होतो. म्हणून जोपर्यंत मोहाचा पूर्णतः नाश होणार नाही तोपर्यंत असे होत राहणार. म्हणून आचार्यदेव संकल्प करतात की '**अहो मया मोहवाहिनीविजयाय बद्धा कक्षेयम्**' 'मी मोहसेनेवर विजय मिळविण्यासाठी कंबर कसली आहे.'

ज्याप्रमाणे दोन पुरुष परस्पर लढत असतात. त्यावेळी ते धोतर पूर्ण कंबरेभोवती घट्ट बांधून लढतात. जर धोतर सैल झाले तर लढता येत नाही. लढता लढता सैल झाले तर पुन्हा कंबरेला घट्ट बांधून पुन्हा लढायला तयार होतात. त्याप्रमाणे जर या चारित्राला प्राप्त करून मी जर शिथिल झालो तर पुन्हा खाली पडेन. चारित्रापासून च्युत होईन. आता असे मी करणार नाही. या मोहरूपी सेनेवर विजय मिळविण्यासाठी मी आता तयार झालो आहे. अशाप्रकारे सर्व पुरुषार्थपूर्वक ज्ञानी पुरुष रागद्वेषमोहाचा क्षय करतो.

ज्याप्रमाणे संसारामध्ये एखादे काम पार पाडण्यासाठी आपण कटिबद्ध होतो की मी हे काम करून दाखवणारच. त्याप्रमाणे आचार्य येथे मोहशत्रूवर विजय मिळविण्यासाठी कटिबद्ध झाले आहेत.

स्वरूपापासून च्युत न होण्याची भावना –

आत्मिक विशुद्ध आनंद प्राप्त केल्यानंतर हा ज्ञानी जीव त्या आनंदस्वरूप आपल्या आत्म्यापासून च्युत होण्यामध्ये मोठा खेद मानतो. मला अन्य विषयसाधन नको अथवा सांसारिक सुख नको, मला तर हाच आनंद पाहिजे. आपल्या स्वरूपामध्ये राहण्याचा एक अलौकिक आनन्द प्राप्त झाला आहे. त्या आनन्दाचा एक अनन्तवा भागसुद्धा संपूर्ण संसारातील इन्द्रादिकांचे सुख नाही. ज्या आत्मदृष्टीने स्वतःमध्ये ज्ञानप्रकाश झाला व त्या ज्ञानप्रकाशाचा निर्विकल्प अनुभव करून जो आनन्द प्राप्त झाला त्या आनन्दासाठी हा सतत प्रयत्नशील राहतो. सर्व आरंभपूर्वक आत्मानुभवासाठी उद्यम करतो. जो भव्य जीव सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीमुळे केवळ शुद्ध आत्म्याचा व त्यापासून उत्पन्न अतींद्रिय सुखाचा प्रेमी होतो, संसाराच्या विषयभोगापासून मोहरागद्वेष सोडतो, इन्द्रचक्रवर्ती पदाची अभिलाषा करीत नाही तोच जीव

शुद्ध आत्मस्वभावाशिवाय कशाचीही इच्छा करीत नाही. केवळ आत्मिक अनुभवाचा स्वाद घेत गृहवासाला आकुलतेचे कारण जाणून त्याचा त्याग करतो व मुनी अवस्थेला निश्चय शुद्धात्म्यामध्ये रमणेरूप चारित्राचे कारण जाणून धारण करतो. व्यवहार चारित्रामध्ये मोहीत न होता निर्विकल्प समाधिरूप परम सामायिक भावामध्ये स्थित होतो. या शुद्धभावाचा निरन्तर अभ्यास करतो तो एक दिवस सिद्ध परमात्मा होतो.

यापुढे जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये दोन गाथा आहेत. त्या दोन गाथा अमृतचन्द्र आचार्यांच्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये नाहीत. शुद्धोपयोगाच्या अभावामध्ये ज्याप्रकारच्या अरिहंत व सिद्धांच्या स्वरूपाला हा जीव प्राप्त होत नाही त्या अरिहंत व सिद्ध स्वरूपाचे वर्णन या दोन गाथांमध्ये केले आहे.

तवसंजमप्पसिद्धो सुद्धो सग्गापवग्गमग्गकरो ।
अमरासुरिंदमहिदो देवो सो लोयसिहरत्थो ।।७९-१।।

अन्वयार्थ- (**सो देवो**) वह देव (**तवसंजमप्पसिद्धो**) तप व संयमाने सिद्ध झाला आहे, (**सुद्धो**) शुद्ध आहे, (**सग्गापवग्गमग्गकरो**) स्वर्ग व मोक्षाचा मार्ग दाखविणारा आहे, (**अमरासुरिंदमहिदो**) देवेन्द्र व असुरेन्द्राकडून पूजित आहे व (**लोयसिहरत्थो**) लोकाच्या शिखरावर स्थित आहे.

तप व संयमाने सिद्ध-

अरिहंत व सिद्ध परमात्मा कोणी भिन्न पदार्थ नाहीत. अरिहंत-सिद्ध ही जीवाचीच अवस्था आहे. आमच्यासारखा संसारी जीवच निश्चय तप व निश्चय संयमाच्या सामर्थ्याने कर्मांचा नाश करून अरिहंत व सिद्ध बनतो. सर्व परपदार्थांच्या इच्छेचा त्याग करून निज शुद्ध स्वरूपामध्ये लीन होऊन ध्यानरूपी अग्नीमध्ये तपणे हे निश्चय तप आहे. अर्थात् आपल्या स्वरूपामध्ये प्रतापवंत होणे हे निश्चयतप होय. या निश्चय तपासाठी बहिरंग व अंतरंग बारा प्रकारचे तप सहकारी कारण आहे. कारण मुनी आपल्या स्वरूपामध्ये राहण्यासाठीच उपवास करतात. पोट भरून जेवले असता ध्यानामध्ये प्रमाद उत्पन्न होतो म्हणून अवमौदर्य तप करतात. गरिष्ठ पदार्थांचे सेवन केले असता प्रमाद होतो म्हणून रस परित्याग करतात. एकान्त स्थानामध्ये आपल्या

आत्मस्वरूपामध्ये लीनता येते म्हणून विविक्तशय्यासन तप करतात. शरीराला सुखामध्ये राहायची सवय लागली की दुःखद प्रसंगामध्ये उपयोग स्थिर राहू शकत नाही म्हणून दुःख सहन करण्याची सवय लावण्यासाठी कायक्लेश तप करतात. प्रायश्चित्तादी अंतरंग तपसुद्धा निश्चय तपाच्या सिद्धीसाठी साहाय्यभूत आहेत. मुनिराज १२ प्रकारच्या तपाच्या अवलंबनाने ध्यानरूपी अग्नी पेटवून त्यामध्ये प्रतापवंत होऊन कर्मरूपी इंधनाला जाळून टाकतात. ज्याप्रमाणे सुवर्णपाषाण अग्नीने तापविले असता त्यातील कालिमा व किट्टिमा जळून जाते व सोने शुद्ध होऊन प्रखर तेजाने प्रकाशमान होते त्याप्रमाणे हा संसारी अशुद्ध आत्मा ध्यानरूपी अग्नीमध्ये तापविला असता त्यातील द्रव्यकर्म व नोकर्मरूपी कालिमा व भावकर्मरूपी किट्टिमा जळून जाते व जीव शुद्ध होऊन प्रकाशमान होतो.

सर्व इंद्रियांच्या विषयांना रोकून व मुनींच्या चारित्राद्वारा पृथ्वीकायिकादी षट्काय प्राण्यांचा रक्षक होऊन शुद्धात्म्यामध्ये संयमित होणे व रागद्वेषाचा त्याग करून समताभावरूपाने परिणमने निश्चय संयम आहे. या संयमाद्वारे रागद्वेषादी भावमल व ज्ञानावरणादी द्रव्यमल नष्ट होतो व जीव वीतराग बनतो.

अरिहंत–सिद्ध शुद्ध आहेत–

तप व संयमाने चार घातिकर्मांचा अभाव होऊन जीव क्षुधा, तृषा, इत्यादी अठरा दोषांनी रहित होऊन शुद्ध होतो. संसार अवस्थेमध्ये भूक, तहान, जन्म, जरा, मरण, राग, द्वेष, मोह इत्यादी अठरा दोषांनी सहित असल्यामुळे जीव अशुद्ध म्हटला जातो. परंतु या संसारी जीवाला ह्या अठरा दोषांमुळे माझ्यामध्ये अशुद्धता आहे, दुःख आहे हे भासित होत नाही म्हणून याला दोष समजत नाही. रात्रंदिवस दोषांचे पोषणच करतो. जेव्हा आगमाच्या अभ्यासाने हे अठरा दोष भासित होतात तेव्हा आत्मपुरुषार्थपूर्वक दोषांचा नाश करण्याचा उद्यम करतो. आत्मसाधनेद्वारे अशुद्धतेचा नाश करून शुद्ध होतो. ही शुद्ध अवस्था म्हणजेच निर्दोष अरिहंत व सिद्ध अवस्था होय.

स्वर्गापवर्गमार्गकर –

अरिहंत झाल्यावर दिव्यध्वनीद्वारे स्वर्गाचा व मोक्षाच्या मार्गाचा

उपदेश करतो. अरिहंत हितोपदेशी असतात. मोक्ष हेच जीवाचे हित आहे. त्या मोक्षाच्या मार्गाचा उपदेश करणे हितोपदेश आहे. दुसरा कोणताही उपदेश हितोपदेश नाही. मोक्षप्राप्तीचा उपाय करीत असताना जो शुभभाव होतो त्याचे फळ स्वर्ग आहे. त्यामुळे स्वर्गाच्या मार्गाचा उपदेश सहज होतो. अथवा एखादा जीव अत्यंत पापामध्ये लिप्त आहे त्याला पापापासून वाचविण्यासाठी प्रथम शुभभावाचा उपदेश केला जातो. जसे भिल्लाला मुनिराजांनी तो अन्य काही त्याग करू शकत नाही म्हणून त्यास कावळ्याचे मांस सोडायला सांगितले.

सिद्ध उपदेश करीत नाहीत त्यामुळे त्यांना हे विशेषण लागू होत नाही.

अमरासुरेंद्राकडून पूजित–

अरिहंत भगवान स्वर्गातील देवेंद्राकडून व भवनत्रिकाच्या इंद्रांकडून पूजिले जातात. अर्थात जिन त्रिलोकपूज्य आहेत हे या विशेषणावरून सिद्ध होते. स्वर्गातील इंद्र असंख्यात देवांबरोबर येऊन प्रभूंची सेवा करतो. पंचकल्याणिक साजरा करतो. यावरून भगवंतांची सर्वज्ञता सिद्ध होते.

धवला पुस्तक ९ पृ. ११३ वर ही गोष्ट शंका समाधानाद्वारे सिद्ध केली आहे. ती याप्रमाणे ''चौदह विद्यास्थानोंके बलसे समस्त भुवन को देखनेवाले, अवधिज्ञान से अपने अवधिक्षेत्र के भीतर स्थित जीवों के कर्मस्कन्धों को प्रत्यक्ष करनेवाले तथा चार घातिया कर्मोके नष्ट होने से उत्पन्न और अघातिया कर्मो के सम्बन्ध से मूर्तभाव को प्राप्त ऐसी, जिन भगवान में स्थित नौ केवललब्धियों को देखनेवाले सौधर्मेन्द्र द्वारा की गई उनकी पूजा चूंकि विना सर्वज्ञता के बनती नहीं है, अतः सिद्ध है कि वर्धमान भगवान् सर्वज्ञ थे ।''

लोकशिखरस्थ–

जेव्हा चार अघातिकर्मांचा अभाव होतो तेव्हा अयोगी जिन शरीररहित होऊन ऊर्ध्वगमन स्वभावाने वर जाऊन लोकाकाशाच्या अग्रभागावर स्थित होतात. सिद्ध सर्व लोकात श्रेष्ठ आहेत म्हणून जणू काय तीन लोकांनी त्यांना आपल्या मस्तकावर धारण केले आहे. हे विशेषण फक्त सिद्ध परमात्म्यालाच लागू होते.

सिद्ध अवस्थेमध्ये परमात्मा निरन्तर स्वात्मानुभूतीमध्ये रमण करतात. तेथे कोणतीही चिन्ता नाही, आकुलता नाही, बाधा नाही. ज्या जीवांना सांसारिक वासना आहे ते शुभोपयोगामध्येच रत होऊन संसाराच्या उच्चनीचपदामध्ये परिभ्रमण करतात. त्यांना आत्म्याच्या शुद्ध अविनाशी सिद्ध पदाची कधीही प्राप्ती होत नाही. म्हणून शुद्ध पदाच्या प्राप्तीसाठी शुद्धोपयोगाची भावना करावी.

पुढच्या गाथेमध्ये सूचित करतात की जे कोणी अशाप्रकारे निर्दोष परमात्म्याला मानतात, श्रद्धा करतात तेच अविनाशी आत्मिक सुखाला प्राप्त करतात.–

तं देवदेवदेवं जदिवरवसहं गुरुं तिलोयस्स ।

पणमंति जे मणुस्सा, ते सोक्खं अक्खयं जंति।।।७९–२।।

अन्वयार्थ– (**जे मणुस्सा**) जे मनुष्य (**जदिवरवसहं**) सर्व मुनिवरांच्या मध्ये श्रेष्ठ व (**तिलोयस्स गुरुं**) तीन लोकांचे गुरु अशा (**तं देवदेवदेवं**) त्या देवेन्द्रांच्या देवाला अर्थात अरिहंत परमात्म्याला (**पणमंति**) नमस्कार करतात (**ते**) ते जीव (**अक्खयं सोक्खं**) अक्षय सुखाला (**जंति**) प्राप्त होतात.

भावनानुरूप फल –

जो जशी भावना करतो तो तसा होतो. लौकिकामध्ये आपण पाहतो की जो डॉक्टर होण्याची भावना करतो तो तशाप्रकारच्या पुरुषार्थाने डॉक्टर होतो, जो वकील होण्याची भावना करतो तो तदनुकूल पुरुषार्थपूर्वक वकील होतो त्याप्रमाणे जो अनंत अविनाशी अतींद्रिय सुखस्वरूपी परमात्म्याची भावना करतो तो तशाप्रकारच्या अविनाशी अतींद्रिय सुखाला प्राप्त होतो अर्थात् स्वयं सिद्ध परमात्मा होतो. सिद्ध पद प्राप्तीचा उपाय यद्यपि साक्षात् शुद्धोपयोगामध्ये तन्मय होऊन निर्विकल्प समाधीमध्ये लीन होणे हा आहे तथापि त्याचा परम्परा उपाय अरिहंत व सिद्ध परमात्म्यामध्ये श्रद्धा उत्पन्न करून त्यांना नमस्कार करणे, पूजा करणे, स्तुती करणे हा आहे.

या गाथेमध्ये परमात्म्याची तीन विशेषणे देऊन तो परमात्मा उत्कृष्ट देव आहे हे सिद्ध केले आहे.

१) देवदेवदेव– देवांचा देव म्हणजे देवेन्द्र व देवेन्द्रसुद्धा ज्यांना आराध्य देव मानतात ते देवेदेवदेव म्हणजे जिनेन्द्र भगवान. भवनवासी, व्यंतर, ज्योतिषी व कल्पवासी देवांचे इन्द्रसुद्धा ह्यांची सेवा करतात म्हणून तेच खरे महादेव आहेत.

२) यतिवरवृषभ– जे साधुपद धारण करून मोक्षासाठी प्रयत्न करतात त्या साधूंना यती म्हणतात. त्या यतींच्या मध्ये श्रेष्ठ गणधर देव आहेत. म्हणून त्यांना यतिवर म्हणतात. व त्यांच्यापेक्षा सुद्धा वृषभ अर्थात् श्रेष्ठ अरिहंत सिद्ध परमात्मा आहेत म्हणून त्यांना यतिवरवृषभ म्हणतात. या विशेषणाने हे सांगितले आहे की ते परमात्मा केवळ स्वर्गातील असंयमी इन्द्रांकडूनच वंदनीय आहेत असे नाही तर त्यांची भक्ती संयमधारी गणधरादी परम ऋषीसुद्धा करतात.

३) त्रिलोकगुरु – त्यांच्यामध्येच तीन लोकातील प्राण्यांचा गुरु होण्याची योग्यता आहे. कारण तीन लोकातील संसारी जीव अल्पज्ञानी, तीव्रमंद कषाययुक्त आहेत व जन्ममरणादी दोषांनी सहित आहेत आणि परमात्मा अनंतज्ञानी, वीतरागी व जन्ममरणादी दोषांनी रहित निर्दोष आहेत. आत्मार्थी जीवांना संसारी, रागी, द्वेषी देवांची आराधना सोडून अशाच अरिहंत व सिद्ध परमात्म्याची आराधना करण्यायोग्य आहे. जसे आपल्याला बनायचे आहे तशा गुणयुक्त व्यक्तींची उपासना केल्याने त्या गुणांची प्राप्ती आपल्याला होऊ शकते. ज्याप्रमाणे निर्धन व्यक्तीची उपासना करून कोणी धनवान होऊ शकत नाही त्याप्रमाणे दुःखी जीवाची उपासना करून आपण सुखी होऊ शकणार नाही म्हणून निर्दोष, वीतराग, सर्वज्ञ परमात्मा हेच आपले आराध्य दैवत आहेत.

मागील गाथेमध्ये आचार्यांनी प्रतिज्ञा केली की मोहाला जिंकल्याशिवाय शुद्ध आत्म्याची प्राप्ती होऊ शकत नाही. म्हणून मी मोहावर विजय प्राप्त करण्यासाठी कमर कसली आहे. मोहावर विजय मिळविणे अर्थात मोहाचा नाश करणे, हे कार्य करण्याचे तर निश्चित केले. आता त्या मोहसेनेवर विजय प्राप्त करण्याचा उपाय काय आहे? याचा विचार करतात. ज्याप्रमाणे लौकिकामध्ये जीव एखादे कार्य करण्याचा प्रथम निश्चय करतो

आणि नंतर त्या कार्याच्या सिद्धीचा उपाय काय आहे अर्थात् हे कार्य कोणत्या उपायाने होईल याचा विचार करतो.

आचार्यांनी तर मोहाचा नाश करण्याचा निर्णय केला. कारण त्यांना आपल्या आत्मसिद्धीमध्ये मोह बाधक वाटला. मोह हा आत्मघातक शत्रू आहे असे त्यांना वाटले. परंतु अद्यापि आम्हाला मोह शत्रू वाटत नाही. सर्वात मोठा शत्रू मोह आहे आणि त्यालाच आम्ही आपला परम मित्र समजून त्याचे लालन पालन करीत आहोत. हा एवढा मोठा शत्रू आहे की तिन्ही लोकावर याचे एकछत्री राज्य आहे. मोठमोठ्या शूरवीर पुरुषांना ही याने आपल्या अधीन केले आहे. त्या मोहाला परममित्र मानून आम्ही कवटाळले आहे म्हणून अज्ञानी जीवाला मोहाच्या नाशाचा विकल्पसुद्धा येत नाही.

पूजा, स्वाध्याय, देवशास्त्रगुरूंची भक्ती सामायिक आदि क्रिया मी मोह नाशासाठी करीत आहे हे प्रयोजन कधीही या जीवाच्या लक्षात असत नाही. क्रिया तर रूढीनुसार संपन्न होत असतात, परंतु त्यामागचे प्रयोजन हा जीव विसरून जातो.

ज्याप्रमाणे व्यापारी व्यापार करताना आपले प्रयोजन कधीही विसरत नाही. त्याच्या सदैव लक्षात असते की धनलाभासाठी मी व्यापार करीत आहे. ग्राहकांशी बोलणे, माल देणे, माल बाहेरून विकत आणणे इत्यादी सर्व क्रिया करण्यापाठीमागचे प्रयोजन एक पैसा कमविणे आहे हे त्याच्या सदैव स्मरणात असते. क्रियेसाठी क्रिया नाहीत तर पैसा मिळविण्यासाठी क्रिया आहेत. त्या प्रत्येक क्रियेतून मला काही फायदा झाला की नाही हे तो तपासून पाहतो, माल विकत आणला त्याची किंमत जास्त तर दिली गेली नाही ना ? माल विकला त्यामध्ये आपल्याला किती फायदा झाला, याचे दररोज परीक्षण करतो. त्याप्रमाणे प्रत्येक धार्मिक क्रिया केल्यावर आपले प्रयोजन सिद्ध झाले की नाही याचा विचार करावा.

पूजा, भक्ती केली, स्वाध्याय केला, माझ्या मोहाचा किती नाश झाला? समता भावरूपी धन किती प्राप्त झाले? याची तपासणी करावी.

आचार्य या मोहनाशाचा एक उपाय प्रयोगात्मक पद्धतीने या गाथेमध्ये सांगत आहेत–

जो जाणदि अरहंतं दव्वत्तगुणत्तपज्जयत्तेहिं ।
सो जाणदि अप्पाणं मोहो खलु जादि तस्स लयं।।८०।।

अन्वयार्थ – (**जो**) जो (**अरहंतं**) अरिहंतांना (**दव्वत्तगुणत्त–पज्जयत्तेहिं**) द्रव्यत्व, गुणत्व आणि पर्यायत्वाने (**जाणदि**) जाणतो (**सो**) तो (**अप्पाणं**) आत्म्याला (**जाणदि**) जाणतो आणि (**तस्स मोहो**) त्याचा मोह (**खलु**) निश्चयाने (**लयं जादि**) विनाशाला प्राप्त होतो.

जो आप्त व आत्मा यामध्ये अंतर करीत नाही दोघांना समान जाणतो त्याचा मोह नष्ट होतो.

आप्त व आत्म्यासंबंधी मूढता –

जो वास्तविक अरिहंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने व पर्यायरूपाने जाणतो तो वास्तविक आपल्या आत्म्याला जाणतो. कारण दोघांमध्ये निश्चयाने अंतर नाही. जर असे आहे तर आम्ही दररोज अरिहंतप्रभूंचे दर्शन करतो तरी आत्म्याला जाणत नाही याचे कारण काय? एक तर हे शास्त्रवचन खोटे असायला पाहिजे, नाहीतर आमचे दर्शन तर खोटे असायला पाहिजे. शास्त्रवचन कधीही खोटे असू शकत नाही; कारण ते वीतराग सर्वज्ञ भगवंतांचे वचन आहे व काही जीवांना याचा सत्य अनुभव झाला आहे. भगवंतांचे दर्शन करूनही ज्याला आत्मज्ञान झाले नाही त्याच्या दर्शनामध्येच काहीतरी कमतरता आहे. ती कमतरता म्हणजे अरिहंतांचे दर्शन करताना अरिहंतांना व स्वतःला अत्यन्त भिन्न मानतो. ते एक वेगळ्या जातीचे आहेत व मी एक वेगळ्या जातीचाच आहे असे जाणतो. सर्व जीव एक समान आहेत हे शिकतो, बोलतो परन्तु अरिहंतांना जाणताना त्यांना भिन्न प्रकारचेच मानतो. त्यांचे द्रव्य गुण पर्याय भिन्न आहेत व माझे द्रव्यगुणपर्याय भिन्नच आहेत. त्यांच्यामध्ये व माझ्यामध्ये समानता कशी असू शकते असे या जीवाला वाटते.

ज्याप्रमाणे गरीब मनुष्य स्वतःला सेठ मानायला तयार होत नाही. जेव्हा गरीब मनुष्य मनुष्यरूपाने मी सुद्धा त्या श्रीमंत व्यक्तीप्रमाणे आहे, त्याला धन प्राप्त झाले तर मला का होऊ शकत नाही असे मानून पुरुषार्थ करेल

तर तो ही श्रीमंत होऊ शकतो. भक्तीमध्ये द्वैतातून अद्वैताकडे गेले पाहिजे. जोपर्यंत अद्वैतभावाला (एकरूपतेला) प्राप्त होत नाही तोपर्यंत पूजा–भक्ती पूर्ण होत नाही. परमात्मा व आपल्यामध्ये अंतर ठेवू इच्छितो म्हणूनच जीवाला आत्मज्ञान झाले नाही. जोपर्यंत अरिहंत व आपल्यामधील अंतर दूर करणार नाही तोपर्यंत स्वतःचे ज्ञान होऊ शकणार नाही व जोपर्यंत स्वतःला जाणणार नाही तोपर्यंत मोहाला दूर करू शकणार नाही.

अरिहंतांच्या स्वरूपाचा परिचय म्हणजे आत्मस्वरूपाचा परिचय–

अरिहंतांना जाणणे हा मोहनाशाचा उपाय आचार्यांनी येथे सांगितला आहे. परंतु अरिहंतांना कसे जाणायचे ? अरिहंतांचा रंग कोणता ? त्यांची अवगाहना किती? त्यांचा काळ किती ? ते कोठून मोक्षाला गेले हे जाणणे प्रयोजनभूत नाही. अशुभ विकल्पापासून वाचण्यासाठी हे विकल्प करायला सुद्धा काही हरकत नाहीत. हे ज्ञानाचे जास्तीचे खाद्य आहे. परंतु मूळ वस्तूला समजून घेण्यासाठी त्याच्या द्रव्यगुणपर्यायरूप स्वरूपाला जाणणे आवश्यक आहे.

अरिहंत ही वस्तू काय आहे हे समजून घेण्यासाठी त्यांचे द्रव्यगुणपर्याय जाणणे उपयुक्त आहे. अरिहंतरूप वस्तूचा निर्णय झाला तर आत्मवस्तूचा ही निर्णय होतो. कारण अरिहंतांचे स्वरूप अंतिम तापाला प्राप्त झालेल्या सोन्याच्या स्वरूपाप्रमाणे पूर्ण स्पष्ट आहे. निर्मल आहे. खाणीतून सुवर्णपाषाण आणले तर ते एका सामान्य दगडाप्रमाणेच दिसते. जर एखाद्याने विचारले याचे खरे स्वरूप कसे आहे तर त्याला शुद्ध सोन्याचा तुकडा आणून दाखवावा लागेल व सांगावे लागेल की जसे हे पिवळेधमक शंभर टंची सोने आहे, तसेच सोने या पाषाणामध्ये सुद्धा आहे, तेव्हा त्याला सुवर्णपाषाणामध्ये असणाऱ्या सुवर्णाची ओळख होईल.

तीच पद्धती आचार्य येथे वापरतात. या संसारी जीवरूपी पाषाणामध्ये कसा आत्मा वास करीत आहे याचे ज्ञान करून द्यायचे असेल तर त्याचा नमुना अरिहंत प्रभूच आहेत. सिद्धसुद्धा शुद्ध आत्म्याचा नमुना आहे. परंतु सिद्ध या संसारी जीवाला दिसत नाहीत. आगमाद्वारेच त्यांचे अस्तित्व जाणले जाते. समवशरणामध्ये स्थित अरिहंत प्रभू या संसारी जीवाला स्पष्ट प्रत्यक्ष

दिसत आहेत. त्यामुळे त्यांना पाहून आपल्या आत्म्याची प्रतीती होऊ शकते.

एखाद्या बीमध्ये काय शक्ती आहे हे जाणून घ्यायचे असेल तर त्या बीपासून उत्पन्न झालेले झाड व त्याला लागलेली फुले व फळे पाहूनच त्या बीचा निर्णय होतो. ज्याप्रमाणे व्यक्त झालेल्या फुलावरून किंवा फळावरून बी मधल्या शक्तीचे अनुमान होते. त्याप्रमाणे व्यक्त झालेल्या अरिहंत अवस्थेवरून संसारी जीवामधील शक्तीचे अनुमान होते. अरिहंतसुद्धा माझ्यासारखेच पूर्वी एक संसारी जीव होते. जर ते आपला विकास करून परिशुद्ध अनन्त ज्ञानदर्शन सुखवीर्यरूपाने परिणमले आहेत तर माझा आत्मासुद्धा विकास करून त्यांच्यासमान होऊ शकतो याची प्रतीती होते. त्यांच्या व माझ्या जातीमध्ये काहीही अंतर नाही हे लक्षात येते.

ज्याप्रमाणे सिंहाचा छावा मेंढ्यांच्या कळपात जाऊन आपल्या स्वरूपाला विसरून स्वतःला मेंढी समजून बसला होता. त्यावेळी दुसऱ्या सिंहाने त्याला म्हटले की तू तर माझ्यासारखा जंगलाचा राजा सिंह आहेस तर तू या मेंढ्यांच्या कळपामध्ये का राहतोस ? तू माझ्याबरोबर जंगलात चल ! तेव्हा तो म्हणतो मी तर लहानपणापासून या मेंढ्यातच राहिलो, यांच्यातच वाढलो, मी कसा काय सिंह असू शकतो ? तेव्हा त्याला प्रतीती येण्यासाठी सिंह त्याला तलावाच्या काठी घेऊन जातो व पाण्यात पहायला सांगतो. पहा, माझे रूप व तुझे रूप, दोघांमध्ये काय अंतर आहे ? दोघांचे रूप समान आहे. मी एक डरकाळी फोडतो. तू एक डरकाळी फोड. तुझा आवाज कुणासमान आहे पहा. प्रयोग केल्यानंतर त्या सिंहाच्या छाव्याला पटले की मी पण सिंह आहे. त्याप्रमाणे समवशरणात विराजमान अरिहंत भगवान आपल्याला सांगत आहेत की तू व मी समान आहे. मी ज्ञाता द्रष्टा जीव आहे, तू पण ज्ञाता द्रष्टा जीव आहेस. दोघांच्या स्वरूपामध्ये काहीही अंतर नाही. भगवंतांचे दर्शन घेताना त्यांचा हा मूक उपदेश आपण ऐकत नाही म्हणून त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये अंतर ठेवून दर्शन घेतो. जो त्यांच्या उपदेशाला अंतःकरणाने जाणून स्वीकारतो तो आपल्या वास्तविक स्वरूपाला ओळखतो.

द्रव्यगुणपर्यायरूपाने प्रभूंचा निर्णय–

अरिहंतांना द्रव्यगुणपर्यायरूपाने जाणण्यासाठी प्रथम सामान्य द्रव्य–

गुण-पर्यायाचे स्वरूप समजणे आवश्यक आहे. जे अन्वयरूप आहे ते द्रव्य होय. तिन्ही काळामध्ये प्रत्येक परिणमनामध्ये जो अखंड प्रवाह आहे तो अन्वय होय. अन्वय शब्द अनु उपसर्गपूर्वक अय् धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ आहे पाठीमागून जाणे. जो अंश प्रत्येक पर्यायामध्ये अनुस्यूत रूपाने आहे तो अन्वय. ज्याप्रमाणे हाराच्या सर्व मोत्यामध्ये दोरा अन्वयरूपाने स्थित आहे. दही, दूध, ताक, तूप यामध्ये गोरसत्व अन्वयरूपाने स्थित आहे. सोन्याच्या अंगठी, रिंगा, कुड्या इत्यादी क्रमाने होणाऱ्या पर्यायामध्ये सुवर्णत्व अन्वयरूप आहे ते द्रव्य होय. प्रत्येक पर्यायांमध्ये तोच तोचपणा जो आहे त्यास अन्वय म्हणतात. स्थायी राहून परिणमित होणे व परिणमन करीत स्थायी राहणे अन्वय आहे. हे द्रव्याचे द्रव्यत्व आहे. अन्वयाच्या अपेक्षेने पाहिले तर जीव-अजीव सर्वद्रव्यांचे स्वरूप समान आहे.

अन्वयाचे जे विशेषण आहेत ते गुण आहेत. गुणांच्या द्वारे दोन द्रव्यामध्ये भेद केला जातो. ज्याप्रमाणे सर्व नद्या उद्गम स्थानापासून ते समुद्रापर्यंत त्याच त्या असून सतत प्रवाहमान आहेत. तथापि आपापल्या विशेषतेमुळे त्या वेगवेगळ्या जाणल्या जातात. जसे प्रयागामध्ये गंगा, यमुना व सरस्वती या तीन नद्यांचा संगम होतो; परंतु त्यांच्या विशेषतेवरून त्या पृथक् पृथक लक्षात येतात. गंगानदीचे पाणी पांढरे शुभ्र आहे, यमुना नदीचे पाणी काळे आहे, सरस्वती नदीचे पाणी लालसर आहे. हे तीन प्रवाह आपापल्या विशेषणाने भिन्न केले जातात. त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्य तेच तेच असून आपल्या विशेषतेने सम्पन्न आहेत.

ज्याप्रमाणे पिवळेपणा व पांढरेपणा या विशेषतेच्या द्वारे सोने व चांदी भिन्न ओळखले जातात त्याप्रमाणे चेतनत्व व जडत्व विशेषतेद्वारे जीव व अजीव भिन्न ओळखले जातात. जीव सतत चेतना सम्पन्न आहे, अजीव सतत जडतासम्पन्न आहे. या गुणांमुळे द्रव्याच्या ६ जाती आहेत. त्या विशेषता सुद्धा द्रव्याप्रमाणे स्थायी असून परिणमनशील आहेत.

अन्वयाचे जे व्यतिरेक आहेत ते पर्याय होत. व्यतिरेक म्हणजे विशेष रूपाने भिन्नता. ज्यामुळे अन्वयामध्ये भेद होतो त्यास व्यतिरेक म्हणतात. पर्याय एक समयवर्ती व क्रमवर्ती भिन्न भिन्न असते. ज्याप्रमाणे गंगानदीमध्ये

हरिद्वारची गंगा, प्रयागची गंगा इत्यादी भेद होतो त्याप्रमाणे पर्यायांच्याद्वारे द्रव्य अन्य अन्य दिसते. जसे एकच जीव भील, मारिचि, त्रिपृष्ठनारायण, सिंह महावीर इत्यादी रूपाने अनेकप्रकारचा दिसतो. जी पूर्व पर्याय आहे ती उत्तर पर्याय नाही. म्हणून पूर्व पर्यायरूप द्रव्य भिन्न आहे. उत्तर पर्यायरूप द्रव्य भिन्न आहे. ज्यावेळी कोणत्याही जीवाला अन्वयग्राही द्रव्यार्थिक नयाने पाहतो तेव्हा समता भाव उत्पन्न होतो व पर्यायदृष्टीने पाहिल्यावर विषमभाव उत्पन्न होतो. जेव्हा महावीराच्या जीवाला मारीचिरूपाने पाहतो तेव्हा त्यासंबंधी द्वेष होतो, भीलपर्यायरूपाने पाहिले असता करुणाभाव उत्पन्न होतो. सिंहपर्यायरूपाने पाहिले असता प्रमोदभाव होतो. महावीरपर्याय रूपाने पाहिले असता शुभराग उत्पन्न होतो व एक जीवदृष्टीने पाहिले असता समताभाव येतो.

अरिहंतासमान निज आत्म्याचा निर्णय–

द्रव्यगुणपर्यायाचे स्वरूप समजावून सांगून ते अरिहंतामध्ये घटवतात. हे चेतन आहे, अशाप्रकारचा जो अन्वय तेच द्रव्य आहे. अन्वयाच्या आश्रित राहणारे चैतन्य विशेषण तो गुण आहे आणि एकसमयवर्ती परस्परामध्ये अप्रवृत्त अन्वयव्यतिरेकरूप चिद्विवर्तन ग्रन्थी आहेत ते पर्याय आहेत.

ज्याप्रमाणे मोत्याच्या हारामध्ये जो दोरा आहे तो अन्वय आहे. चमक, पांढरेपणा इत्यादी गुण आहेत व एक एक मोती म्हणजे पर्याय व तिन्ही मिळून एक माळ आहे. त्याप्रमाणे चैतन्य अन्वय म्हणजे द्रव्य, चैतन्य विशेषण म्हणजे गुण व चैतन्याचे ग्रन्थी अर्थात् भेद म्हणजे पर्याय व तिन्ही मिळून एक जीवपदार्थ आहे. जेव्हा कोणी जीव पूर्ण विशुद्ध अरिहंत भगवंतामध्ये पूर्वोक्त द्रव्य गुण पर्यायरूपतेचा विचार करतो, चिंतन मनन करून निर्णय करतो तेव्हा त्याला त्यासमान आपल्या आत्म्याचे ज्ञान होते. जो हा अनादि अनंत चेतन असा अन्वय प्रतीतीला येत आहे तोच मी द्रव्य आहे. या चैतन्याच्या आश्रित असणारे ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य आदी विशेषण माझे गुण आहेत. प्रत्येक समयासमयाला उत्पन्न होणारे चैतन्याचे विवर्तन ते पर्याय आहेत.

ज्याप्रमाणे अरिहंतांचे द्रव्य चेतनरूप, गुण चेतनरूप व पर्याय चेतनरूपच आहेत त्याचप्रमाणे माझे द्रव्य चेतनरूप, गुण चेतनरूप व माझे

पर्यायसुद्धा चेतनरूपच आहेत. त्यामुळे अरिहंतांच्या द्रव्यासमान माझे द्रव्य, अरिहंतांच्या गुणासमान माझे गुण व अरिहंतांच्या पर्यायसमान माझे पर्याय आहेत. द्रव्यगुणपर्याय अपेक्षेने माझ्यामध्ये व अरिहंतामध्ये समानता आहे. कर्मोपाधिनिरपेक्ष निश्चयनयाने अरिहंतामध्ये व माझ्यामध्ये पर्याय अपेक्षेने ही भेद नाही. त्यांचे पर्याय चेतनरूपच आहेत व माझे पर्यायसुद्धा चेतनरूपच आहेत.

अरिहंतांचे परिस्पष्ट स्वरूप जाणल्यावर आत्म्याचा स्पष्ट निर्णय होतो. ज्याप्रमाणे अरिहंतांचा आत्मा सर्व लोकालोकाला जाणूनसुद्धा लोकालोकापासून अत्यंत अलिप्त आहे त्याचप्रमाणे माझा आत्मा सुद्धा परपदार्थाला जाणूनसुद्धा परपदार्थापासून अत्यंत अलिप्त आहे. ज्याप्रमाणे अरिहंतांचे सुख स्वतःमधून प्रकट होते त्याचप्रमाणे माझे सुखसुद्धा स्वतःच्या सुखशक्तीतून प्रकट होते, अन्य कोणत्याही परपदार्थापासून नाही.

ज्याप्रमाणे अरिहंतप्रभूंचा आत्मा आपल्या परिणतीचाच कर्ता आहे, अन्य कोणाचाही कर्ता नाही त्याप्रमाणे माझा आत्मासुद्धा स्वपरिणतीचा कर्ता आहे. परद्रव्याच्या परिणतीचा कर्ता नाही. जसे अरिहंत देव परापासून भिन्न व स्वतःपासून अभिन्न सर्व शक्तींनी परिपूर्ण आहेत, तसाच माझा आत्मा परापासून भिन्न व स्वपासून अभिन्न सर्व शक्तींनी परिपूर्ण आहे. अशाप्रकारे अरिहंतासमान स्वतःला जाणले असता परोन्मुखी प्रवृत्ती दूर होऊन स्वभावोन्मुख प्रवृत्ती उत्पन्न होते. अन्य विकल्पांच्या महान् क्लेशापासून बचाव होतो.

त्यांच्यामध्ये वीतरागता आहे व माझ्यामध्ये राग आहे हा भेद कर्मोपाधिजनित आहे. मूळ वस्तुस्वरूपामध्ये भेद नाही. त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये भेद पाहिला तर त्यांना जाणून आपल्या आत्म्याचे ज्ञान होणारच नाही.

अशाप्रकारे द्रव्यगुणपर्यायाचे स्वरूप जाणल्यावर सर्व द्रव्यांची स्वतंत्र सत्ता भासित होते. सर्वद्रव्यांच्या संबंधी समानतेचा भाव उत्पन्न होतो. सर्वत्र समानता भासित झाल्यामुळे परपदार्थांचे आकर्षण दूर होऊन अनंतगुणनिधिस्वरूप चैतन्यमय स्वसत्तेमध्ये स्थित होण्याची प्रवृत्ती होते. परंतु

जोपर्यंत द्रव्य, गुण व पर्याय भेदरूपाने अनुभवाला येतात तोपर्यंत अभेद अनुभव होत नाही व अभेद अनुभव न झाल्यामुळे मोहाचा नाश होत नाही. म्हणून आचार्यदेव या तीन भेदांना एक अभेद अनुभवण्याची कला सांगतात.

त्रिस्वरूपात्मक द्रव्य–गुण–पर्यायामध्ये एकत्वानुभूतीची कला–

ज्याप्रमाणे पांढऱ्या धाग्यापासून बनविलेल्या १०८ मण्यांच्या माळेमध्ये तीन घटक आहेत. १) मणी २) दोरा ३) शुभ्रता. कोणी जीव माळा हातामध्ये घेऊन जप करीत आहे. त्या लटकणाऱ्या माळेमध्ये एक एक मणी पर्यायस्थानीय आहेत. अखंड दोरा द्रव्यस्थानीय आहे. शुभ्रता गुणस्थानीय आहे. जेव्हा या माळेतील मण्याकडे लक्ष जाते तेव्हा ते १०८ मणी भिन्नभिन्नरूपाने दिसत आहेत. परंतु जेव्हा त्यामध्ये अखंडरूपाने ओवलेल्या दोऱ्याकडे पाहिले तर तो एक अखंड शुभ्र दोराच प्रतीतीला येतो. मणी दिसत नाहीत. त्यामुळे मण्यांचे आकर्षण नष्ट होते. त्याचप्रमाणे क्रमशः व्यक्त होणारी प्रत्येक पर्याय द्रव्याचेच परिणमन आहे. द्रव्याला सोडून अन्य काही नाही. प्रत्येक पर्यायामध्ये एक अखंड द्रव्यच व्याप्त आहे. अशाप्रकारे प्रत्येक पर्यायामध्ये व्यापक एक अखंड द्रव्य प्रतीतीला आल्यावर पर्याय द्रव्यामध्ये विलीन होते. परंतु द्रव्य व गुण असा भेद शिल्लक राहतो. जेव्हा वस्तुस्वरूपाच्या अनुभवात खोल उतरतो तेव्हा लक्षात येते की द्रव्य व गुण पृथक् वस्तू नाहीत.

ज्याप्रमाणे शुभ्रता व माळा दोन वस्तू नाहीत. शुभ्रता माळास्वरूपच आहे व माळा शुभ्रच आहे. दोघांमध्ये भेद नाही, म्हणून शुभ्रतेला माळेमध्ये गर्भित करून अनुभवतो तेव्हा एक अखंड माळाच प्रतीतीला येते. त्याप्रमाणे द्रव्य व गुण पृथक् वस्तू नाहीत. द्रव्य गुणमय आहे व गुण द्रव्यमय आहे अशाप्रकारे गुणांना द्रव्यामध्ये अंतर्लीन करून एक अखंड द्रव्याचा अनुभव करतो, तेव्हा गुणगुणीभेद नष्ट होऊन द्रव्यगुणपर्यायात्मक एक वस्तूचा अनुभव होतो.

अभेद आत्म्याच्या अनुभवाने मोहसेनेचा विजय–

जोपर्यंत आपण भेदरूपाने द्रव्यगुणपर्यायाचा विचार करतो तोपर्यंत अखंड आत्म्याचा आस्वाद येत नाही. प्रथम सर्व विकल्पापासून निवृत्त होऊन

अरिहंतांच्या स्वरूपाचा विचार करावा. त्यानंतर अंतर्मुख होऊन आपल्या स्वरूपाचा विचार करावा. त्यानंतर स्वरूपाचा ही विचार सोडून त्याचा प्रत्यक्ष अनुभव केला तर अपूर्व परमानंद प्राप्त होतो.

ज्याप्रमाणे एखाद्याला गुलाबजामनाचा आस्वाद घ्यायचा असेल तर प्रथम गुलाबजामुन कसे बनवायचे याची सर्व विधी जाणून घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत गुलाबजामुन प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत तदनुकूल विकल्प उपयोगी आहेत. गुलाबजामुन प्राप्त झाल्यावर सुद्धा जर विकल्प करीत राहिलो तर गुलाबजामुनचा स्वाद घेऊन आनंद मिळवू शकणार नाही, त्याप्रमाणे जोपर्यंत आत्म्याचे स्वरूप प्राप्त झाले नाही तोपर्यंत आत्म्यासंबंधी शुद्ध आहे, बुद्ध आहे, एक आहे इत्यादी विकल्प कार्यकारी आहेत. आत्मा समजल्यावर त्याचा स्वसंवेदन प्रत्यक्षाने निर्विकल्प अनुभव घेतला तरच आत्मिक आनंद प्राप्त होणार आहे. म्हणून जयसेनाचार्यांनी आपल्या तात्पर्यवृत्तीमध्ये स्पष्ट लिहीले आहे की सर्वप्रथम द्रव्यगुणपर्यायस्वरूप अरिहंत परमात्म्याला जाणून त्यानंतर निश्चयाने त्याच द्रव्य-गुण-पर्यायाला आगमाच्या सारभूत अध्यात्मभाषेने शुद्धात्मभावनेच्या सन्मुख होऊन अर्थात् विकल्पसहित स्वसंवेदन ज्ञानामध्ये परिणमित होऊन 'त्यालाच आगमभाषेमध्ये अधःकरण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण परिणाम विशेष म्हणतात.' त्याच्या बलाने आपल्या आत्म्यामध्ये जोडतो. त्याला त्यानंतर तत्काल निर्विकल्प स्वरूपाची प्राप्ती होते. पूर्वी सांगितलेले द्रव्यगुणपर्याय भेदनयाने आत्माच आहे अशी भावना करता करता निष्क्रिय चैतन्याचा लख्ख प्रकाश पडतो की तेथे दर्शन मोहरूपी अंधाराला स्थानच मिळत नाही. येथे कर्ता, कर्म, ध्याता, ध्येय इत्यादी विकल्प राहत नाही यालाच स्वानुभव दशा म्हणतात. जेव्हा आत्मा मोह कर्माच्या उदयाला अनुसरून परिणमण सोडतो आणि स्वतःमध्ये स्थिर होतो तेव्हा आश्रयरहित मोह तेथे राहू शकत नाही. तो तेथून पळ काढतो.

यावरून असे स्पष्ट होते की निर्विकल्प स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाने शुद्धात्म्याचा अनुभव झाला असता दर्शनमोहाचा नाश होतो. अशाप्रकारे शुद्धात्मानुभूतीच्या प्रसादाने मोहाचा क्षय होतो. मोहाच्या उपशमनाची सुद्धा हीच विधी आहे. येथे फक्त क्षायिक सम्यक्त्वाचा उपाय सांगितला आहे असे

समजू नये. अनादिकालीन मोहशत्रूवर कसा विजय मिळवायचा याचा उपाय येथे सांगत आहेत.

प्रथम मोहशत्रूचा उपशम होतो, नंतर क्षयोपशम होतो व तत्पश्चात् क्षय होतो. प्रथम मोहशत्रूचा उपशम करणेच कठीण आहे. एकदा उपशम झाला की त्याचा नाश नक्की होणारच.

जर असे आहे तर मी मोहाच्या सेनेला जिंकण्याचा उपाय प्राप्त केला. येथे शंकेला स्थानच नाही. धर्माची सरळता, स्वाधीनता व सुकरता समजून शिष्याला असे वाटते जर एवढेच करायचे आहे अर्थात् स्वतःला स्वतःमध्ये जाणणे हाच जर मोहसेनेवर विजय मिळविण्याचा उपाय आहे तर हा उपाय माझ्या हातातच आहे. सोपाच आहे.

ज्याप्रमाणे व्यवहारात एखादे स्वाधीन सोपे काम कोणी सांगितले तर आपण म्हणतो, एवढेच होय ! मी ते काम केलेच म्हणून समजा. त्याप्रमाणे येथे शिष्य म्हणतो मोहावर विजय मिळविण्याचा स्वाधीन सोपा उपाय आहे तर तो मिळवलाच म्हणून समजा.

आजपर्यंत मोहाला नष्ट करण्यासाठी अनेक कठीण उपाय केले. उदाहरणार्थ अनेक उपवास केले, कायक्लेशादी कठोर तपश्चरण केले, शेकडो शास्त्रांचा स्वाध्याय केला, पूजाविधाने घातली, व्रतादिकांचे पालन केले. परंतु एक आत्मानुभव केला नाही म्हणून सर्व उपाय निरर्थक झाले. म्हणून भवाब्धि- नौका या गीतामध्ये पं. कल्लाप्पा निटवे म्हणतात.-

सम्मेदाची गिरनाराची सोपाने चढला
किंवा आबू कुंथलगिरीच्या यात्रेला गेला
व्याकरणादि शास्त्रे पढुनी, जरी निपुण झाला
आत्मानुभवावाचुनि मुक्ती कधी न मिळे त्याला।
अन्नसमर्पण अथवा औषधदानविधी केला
किंवा खडतर उपोषणांनी देह शुष्क झाला
विद्यादाने विद्यार्थ्यांचा समूह पढवीला
आत्मानुभवावाचुनी मुक्ती कधी न मिळे त्याला।

शुद्ध आत्मानुभव हा मोह शत्रूवर विजय मिळविण्याचा सरळ साधा सोपा रामबाण उपाय आहे. किती अजब उपाय आहे ? कोणी विचारले, की अमुक शत्रूवर विजय प्राप्त करण्याचा काय उपाय आहे? दुसऱ्याने त्याला सांगितले, तू आपल्या वडिलांना जाण, त्यावरून तू स्वतःला जाण की तुझ्या शत्रूचा नाश होईल. त्याला आपण म्हणतो तुम्ही किती मूर्ख आहात ? परंतु येथे सर्व अपूर्व आहे.

यद्यपि युद्ध नहीं कियो, नाहि रखे असि तीर

परम अहिंसक आचरण, तदपि बने महावीर ।।

बाहेर काहीही करायचे नाही. बाहेरची क्रिया शरीराची क्रिया आहे. शरीराची क्रिया करून आमच्या दुःखाचा नाश कसा होणार ? आमचे काम जाणणे आहे. आमचा शत्रूसुद्धा ज्ञानराज्यामध्येच गडबड करीत आहे म्हणून जे परिवर्तन करायचे आहे ते आत ज्ञान क्रियेमध्येच करायचे आहे.

किती सरळ उपाय आहे ! कुठे जायचे नाही, काही करायचे नाही, दुसऱ्याला बदलायचे नाही. फक्त स्वतःला जाणायचे आहे. येथे बसल्या बसल्या मोहाचा नाश होऊ शकतो. समवशरणामध्ये भगवंतांची दिव्यध्वनी ऐकत आहे त्याचवेळी ऐकणे सोडून अंतर्मुख होऊन स्वतःला जाणतो की सम्यग्दर्शनरूपी पारितोषिक प्राप्त करतो.

आजपर्यंत निमित्तांचा संग्रह केला; परन्तु सम्यग्दर्शनरूपी पीक येण्याकरिता बी पेरले नाही. आता या दुर्लभ मनुष्यभवामध्ये हे धर्माचे बी पेरण्याचे महत्त्वपूर्ण काम करूनच येथून जायचे आहे तोपर्यंत श्वास सोडायचा नाही असा ठाम निश्चय करावा.

अरिहंतांना द्रव्यगुणपर्यायरूपाने जाणून आपल्या आत्म्याला जाणले असता अनादिकाळापासून अप्राप्त दुर्लभ सम्यक्त्वरूपी चिन्तामणी रत्न या जीवाला प्राप्त झाले. चिन्तामणी रत्नाच्या बाबतीत अशी किंवदन्ती आहे की हे रत्न हस्तगत झाल्यावर आपण जे जे मनात इच्छितो ते ते प्राप्त होते. कोणत्या पाषाणरूपी चिन्तामणी रत्नामध्ये अशी शक्ती आहे किंवा नाही हे माहीत नाही; परंतु सम्यक्त्व हेच खरे चिन्तामणी रत्न आहे. ते प्राप्त झाल्यावर निश्चितपणे सर्व अर्थाची सिद्धी निश्चित होते.

धर्म ही वह चिन्तामणि है, नहीं जिसमें चाहना ।
धर्म ही वह कल्पतरू है, नहीं जिसमें याचना ।।

असे हे दुर्लभ सम्यक्त्वरूपी चिन्तामणी रत्न ज्याला प्राप्त झाले आहे तो त्याला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहतो. एखाद्याला मौल्यवान रत्नाची प्राप्ती झाली तर तो गफलतमध्ये निश्चिन्त झोपत नाही. जोपर्यंत रत्नाची स्थिर व्यवस्था होत नाही तोपर्यंत जागृत राहतो. ते रत्न असे कोठे ही रस्त्यावर फेकून देत नाही. कारण त्याला चोरांची भीती आहे. मी एवढे कष्टाने रत्न कमावले आहे याची चोरी झाली तर पुन्हा मी कंगाल होईन म्हणून त्या रत्नाला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्नपूर्वक उपाय करतो. थोडे बहुत पैसे खर्च करून बँकेत लॉकर घेऊन त्यामध्ये ठेऊन निश्चिन्त होतो. जी वस्तू स्वयं कमविली असेल तर त्याची आपण अधिक काळजी घेतो. जी वस्तू फुकट मिळते त्याची किंमत असत नाही. स्वतः कष्टाने कमावलेल्या वस्तूची जास्त किंमत असते.

सम्यक्त्व चिन्तामणी अनन्त भव गेल्यावर अनन्त पुरुषार्थ करून प्राप्त झाले आहे. त्यामुळे सम्यग्दृष्टीला त्याची अपूर्व महिमा येते. तो त्या रत्नाला जपण्यासाठी अधिक प्रयत्नशील असतो. कारण ज्याच्याजवळ करोडोंची संपत्ती आहे डाकू व चोरांचे लक्ष त्याच्याकडेच असते. केव्हा याचे धन लुटण्याची संधी मिळेल व यांचे धन प्राप्त होईल ? धनवानालाच चोर येऊन घेरतात. निर्धनाच्या मागे चोर नसतात. सम्यक्त्वरूपी रत्नाच्या प्राप्तीने सम्यग्दृष्टी धनवान झाला आहे. त्याच्याभोवती प्रमादरूपी लुटेरे घेरा घालत आहेत की हा मोहरूपी निद्रेमध्ये झोपी जाऊन असावधान झाला की याचे रत्न चोरून नेऊ. म्हणून बारा भावनेमध्ये म्हटले आहे–

मोह नींद के जोर, जगवासी घुमें सदा ।
कर्मचोर चहुँ ओर, सरवस लुटे सुध नहीं ।।

म्हणून सम्यग्दृष्टी आपले सम्यक्त्वरूपी रत्न या कषायरूपी प्रमाद चोरापासून सुरक्षित ठेवण्यासाठी जागरूक राहतो. अर्थात् आपल्या स्वभावाच्या सन्मुख होण्यासाठी प्रयत्नशील राहतो हीच गोष्ट आचार्य पुढील गाथेत सांगत आहेत.–

जीवो ववगदमोहो उवलद्धो तच्चमप्पणो सम्मं ।
जहदि जदि रागदोसे सो अप्पाणं लहदि सुद्धं ॥ ८१ ॥

अन्वयार्थ – (**ववगदमोहो**) ज्यांनी मोहाला दूर केले आहे व (**सम्मं तच्चं**) आत्म्याच्या खऱ्या तत्त्वाला (**उवलद्धो**) प्राप्त केले आहे असा (**जीवो)** जीव (**जदि**) जर (**रागदोसे**) राग व द्वेषाला (**जहदि**) सोडतो तर (**सो**) तो (**सुद्धं**) शुद्ध (**अप्पाणं)** आत्म्याला (**लहदि**) प्राप्त करतो.

या गाथेचे तात्पर्य हे आहे की आत्मतत्त्वाला जाणणारा ज्ञानी जर रागद्वेषाचा त्याग करतो तर तो शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो अर्थात तो परमात्मा होतो.

मोहविजयाने आत्मतत्त्वाची उपलब्धी–

पूर्वगाथेत सांगितल्याप्रमाणे अरिहंतांना द्रव्यगुणपर्यायरूपाने जाणून आपल्या आत्मतत्त्वाचा यथार्थ परिचय झाल्यामुळे मोह दूर होतो. आत्मतत्त्वाची अयथार्थ उपलब्धी हेच मोहाचे लक्षण आहे. उपाय नेहमी रोगाच्या विरोधी असतो. शरीरामध्ये उष्णता वाढली असेल तर थंड वस्तूंचे सेवन आवश्यक आहे. आत्मस्वरूपाचे अज्ञान मोहाचे कारण आहे म्हणून आत्मतत्त्वाचे समीचीन ज्ञान करून घेणे मोहाला जिंकण्याचा उपाय आहे. अरिहंतांचा परिचय झाल्याने सहज आत्मस्वरूपाचा परिचय प्राप्त होतो. आपली एखादी वस्तू विसरली असेल तर दुसऱ्याच्या हातात तशी वस्तू पाहून आपल्या वस्तूची आठवण होते.

हा जीव अनादि काळापासून स्वतःला विसरला आहे. अरिहंतांचा शुद्ध ज्ञानस्वभावी ज्ञाता द्रष्टा आत्मा पाहून विस्मृत आत्मस्वरूपाची याला ओळख होते. त्यासाठीच गृहस्थाला दररोज देवदर्शन करण्याचा नियम सांगितला आहे. देवदर्शनाचे प्रयोजन केवळ रूढीमात्र नसून आपल्या आत्मस्वभावाची या जीवाला माहिती व्हावी हे आहे. देवदर्शन करता करता कधीतरी हा जीव देवाचा विचार करून स्वतःचा विचार करेल हा देवदर्शनाच्या पाठीमागचा उद्देश आहे.

अरिहंतांच्या द्रव्यगुणपर्यायाला जाणल्यामुळे स्वतःच्या द्रव्यगुणपर्यायात्मक आत्म्याची जाणीव होते व पर्यायांना गुणामध्ये अंतर्लीन

करून व गुणांना द्रव्यामध्ये अंतर्लीन करून अखंड वस्तूला एकाग्रतेने जाणतो तेव्हा शुद्धात्म्याची प्रतीति होते अर्थात अनुभूती होते.

अशाप्रकारे ज्या जीवाने मोहाला दूर सारून आत्मतत्त्वाची उपलब्धी करून घेतली आहे त्याला ती आत्मवस्तू पूर्णरूपाने प्राप्त करण्यासाठी आणखीन काय केले पाहिजे ते या गाथेत सांगितले आहे.

रागद्वेषाच्या निर्मूलनाने परिस्पष्ट शुद्ध आत्म्याचा लाभ–

ज्याप्रमाणे एखाद्या जीवाला जेव्हा चक्ररत्न प्रकट झाले तेव्हा तो चक्रवर्ती होणार हे निश्चित आहे; परंतु त्याला ते चक्ररत्न निर्विघ्नपणे प्राप्त करण्यासाठी सहा खंड जिंकण्याचा पुरुषार्थ करावा लागतो. जेव्हा सहा खंडावर विजय प्राप्त करून अखंड साम्राज्याचा अधिपती होतो तेव्हा चक्रवर्ती पद प्राप्त करतो त्याप्रमाणे जेव्हा या जीवाला सम्यक्त्वरूपी चक्ररत्न प्रकट होते तेव्हा हा जीव स्वराज्याचा चक्रवर्ती होणार हे निश्चित आहे; परंतु त्याला त्यासाठी रागद्वेष विकारांवर विजय प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करावा लागतो. जो रागद्वेषादी विकारांना जिंकतो तो आपल्या अखंड साम्राज्याचा अधिपती होऊन परमात्मपद प्राप्त करतो. अर्थात् पूर्णपणे शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो.

ज्याप्रमाणे राजाला नेस्तनाबूत केले तरी जोपर्यंत सेनापती जिवंत आहे व तो लढाई करीत आहे तोपर्यंत विजय घोषित होऊ शकत नाही व ते राज्य पूर्णपणे हस्तगत होऊ शकत नाही त्याप्रमाणे मोहराजाला नष्ट केले तरी जोपर्यंत रागद्वेषरूपी सेनापती जिवंत आहे व जीवाशी लढाई करीत आहे तोपर्यंत विजय घोषित होत नाही व आत्मसाम्राज्य पूर्णपणे हस्तगत होऊ शकत नाही म्हणून सम्यग्दृष्टी रागद्वेषरूपी मोहसेनेवर विजय मिळविण्यासाठी विशेष जागरूक होतो. ज्या समयात दर्शनमोहाचा उपशम, क्षय अथवा क्षयोपशम होतो त्या समयात आत्मतत्त्वाचे ज्ञान, रूची व अनुभूती होते अर्थात् सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्राची प्राप्ती होते, परंतु अद्यापि परिपूर्ण वीतराग चारित्राची प्राप्ती होत नाही. त्यासाठी पुनः विशेष पुरुषार्थाची आवश्यकता आहे.

अन्तस्तत्त्वरूप चिन्तामणी लुटण्याचे कारण प्रमादाधीनता–

ज्याच्याजवळ करोडो रूपयांची संपत्ती आहे. चोर व डाकूंचे लक्ष त्याच्याकडे अधिक असते. केव्हा याचे धन लुटण्याची संधी मिळेल व याचे धन हस्तगत करू याची ते वाट पहात असतात. सतत त्यांच्याभोवती घिरट्या घालत असतात जेव्हा हा असावधान असेल तेव्हा याचे धन हरण करू. जेव्हा करोडपतीला जलक्रीडा, नाट्यसंगीत इत्यादी विषयभोगांमध्ये आसक्त होऊन संपत्तीचे विस्मरण होते त्यावेळी संधी साधून चोर त्यांची संपत्ती लुटतात. त्याप्रमाणे सम्यग्दर्शज्ञान-चारित्ररूपी लाखमोलाचे धन ज्याला प्राप्त झाले आहे, कषायरूपी डाकूंचे लक्ष त्याच्याकडे असते. केव्हा याचे आत्मधन लुटून हस्तगत करू याची ते वाट पाहत असतात.

सम्यग्दर्शन ज्ञानचरण का तेरे पास खजाना रे ।
विषय कषाय चोर सब मिलकर लूट रहे मन माना रे।

आमचे आत्मतत्त्वरूपी चिन्तारत्न लुटले जात आहे यामध्ये अंतरंग कारण आमचीच असावधानता आहे. आम्ही रागद्वेषादी प्रमादाच्या अधीन होतो त्यामुळे शुद्धात्मानुभवरूपी रत्न चोरीला जाते. सम्यग्दर्शनज्ञानचारित्राची प्राप्ती होऊन सुद्धा ज्याक्षणी रागद्वेषाचे अनुसरण करतो त्याक्षणी शुद्धात्म्याचा आस्वाद घेऊ शकत नाही व शेष राहिलेल्या रागद्वेषरूपी चारित्रमोहाचा जोयर्पंत नाश करीत नाही तोपर्यंत परिपूर्ण शुद्ध आत्म्याचा अनुभव करू शकत नाही म्हणून ज्याने दर्शनमोहावर विजय मिळवून आत्मतत्त्वाची उपलब्धी केली आहे तो सम्यग्दृष्टी ज्ञानी रागद्वेषाचा निर्मूल नाश करण्यासाठी प्रयत्नशील राहतो व सतत जागरूक राहतो. ज्याक्षणी ज्ञानी जीव रागद्वेषाचा त्याग करतो त्याक्षणी शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो व पुन्ह-पुन्हा रागद्वेषावर मात करून पूर्णपणे त्याचा निर्मूल नाश करतो तेव्हा तो सदैव परिपूर्ण शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो.

ज्याने एकदा खेळामध्ये डाव जिंकला असेल तर तो पुन्हा डाव जिंकण्यासाठी उत्साहित व प्रयत्नशील असतो. सम्यग्दृष्टीने एकदा मोहावर विजय मिळवून शुद्धात्म्याचा आस्वाद घेतला आहे म्हणून तो पुन्ह-पुन्हा त्याचा आस्वाद घेण्यासाठी उत्साहित व प्रयत्नशील असतो.

इस पथ का उद्देश्य नहीं है
श्रान्त भवन में सो जाना ।

किन्तु पहुँचना उस सीमा तक
जिसके आगे राह नहीं ।।

यात्रेला जात असता पथिक मध्यंतरी जेथे पडाव टाकला तेथेच जर रममाण होऊन राहू लागला तर तो इष्ट स्थानापर्यंत पोहचू शकणार नाही. त्याचप्रमाणे मोक्षमार्गामध्ये पुढे वाटचाल करीत राहिलो तर एक दिवस मोक्षस्थानाला प्राप्त होणार. मोक्षाची इच्छा करणाऱ्या जीवाने प्रथम सम्यग्दर्शनाची प्राप्ती करून घ्यावी. जेव्हा तत्त्वविचाराच्या अभ्यासाने आत्मोपलब्धी होऊन सम्यक्त्वरत्नाची प्राप्ती होते तेव्हा सम्यग्ज्ञान व सम्यग्चारित्राच्या पूर्णतेसाठी प्रमाद सोडून पुरुषार्थ करण्याची गरज आहे. मोक्षाचे साक्षात् साधनस्वरूप वीतराग चारित्र प्राप्त करण्यासाठी अर्थात रागद्वेषाचा समूल नाश करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

परपदार्थ हेय आहेत व निजस्वभाव उपादेय आहे असे जाणूनसुद्धा जोपर्यंत परपदार्थांसंबंधी रागद्वेष सोडणार नाही तोपर्यंत वीतराग भावाचा अनुभव होणार नाही व वीतराग भावाच्या ध्यानाशिवाय चारित्रमोहाचा नाश होणार नाही. चारित्रमोहाचा नाश झाला की यथाख्यात चारित्ररूपी राज्य प्राप्त होते. नंतर अन्य तीन घातिकर्मांचा नाश होऊन अनंतचतुष्टयरूपी लक्ष्मी प्राप्त होऊन अरिहंतपद रूपी अर्धचक्रवर्ती होतो. त्यानंतर चार अघाती कर्मावर विजय प्राप्त करून सिद्धपद रूपी सकलचक्रवर्ती होतो. अर्थात् शुद्ध परमात्मा होतो. जर हा जीव स्वरूपाच्या अभ्यासामध्ये प्रमाद करेल तर सम्यक्त्व रूपी रत्नसुद्धा लुटून मिथ्यादृष्टीरूपी कंगाल होऊन जाईल. म्हणून चतुर विवेकी पुरुषाला आपल्या हितामध्ये सदा सावधान राहिले पाहिजे.

जे जीव ज्ञान श्रद्धान झाल्यावर चारित्राचे पालन न करता शुद्ध होऊ इच्छितात त्यांना देवसेनाचार्य तत्त्वसार ग्रंथामध्ये सांगतात.–

चलणरहिओ मणुस्सो जह इच्छइ मेरूसिहरमारुहिंउ ।
तह झाणेण विहीणो इच्छइ कम्मखयं साहू ।।१३।।

भावार्थ – ज्याप्रमाणे कोणी मेरू पर्वताच्या शिखरावर चढू इच्छितो; परंतु चालत नाही बसून टाकतो, तो कधीही मेरूच्या शिखरावर पोहचू शकत नाही. त्याप्रमाणे जो आत्मध्यान करीत नाही व कर्मांचा क्षय करू इच्छितो तर तो साधू कधीही कर्मांचा नाश करून मोक्ष प्राप्त करू शकत नाही.

तात्पर्य हे आहे की, जोपर्यंत जीव वीतराग सर्वज्ञ अवस्थेला प्राप्त होत नाही तोपर्यंत त्याने निरन्तर आत्मस्वरूपाचे मनन करून शुद्धोपयोगाच्या भावनेमध्ये लीन रहावे. रत्नत्रयाची उपलब्धी व पूर्णतेसाठी अविकार सहजचित्स्वभावाची उपासना करून रागद्वेषापासून स्वतःची सुटका करून घ्यावी.

जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये शंकाकाराने एक शंका उपस्थित केली आहे की पूर्वीच्या ज्ञानकंठिकेमध्ये गा.७८ मध्ये 'जो उपयोगाने विशुद्ध होतो तो शारीरिक दुःखाचा क्षय करतो' असे सांगितले आहे.

येथे 'जो रागद्वेषाचा त्याग करतो तो शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो असे सांगितले. दोन्ही ठिकाणी मोक्षाचेच वर्णन आहे तर यामध्ये काय विशेष आहे ? या प्रश्नाचे उत्तर असे दिले आहे की तेथे शुभ व अशुभ उपयोगाला निश्चयाने समान जाणून शुभाने रहित शुद्धोपयोगरूप निज आत्मस्वरूपामध्ये स्थित होऊन मोक्ष प्राप्त करतो. त्यामुळे शुभाशुभासंबंधी मूढता दूर करण्यासाठी पूर्व ज्ञानकंठिका आहे. येथे द्रव्य गुण पर्यायांद्वारे आप्तस्वरूप अरिहंतांच्या स्वरूपाला जाणून नंतर आपल्या शुद्ध आत्मस्वरूपामध्ये स्थित होऊन मोक्ष प्राप्त करतो या कारणाने आप्त व आत्म्यासंबंधी मूढता दूर करण्यासाठी ही ज्ञानकंठिका सांगितली आहे.

व्यवहारात आपण पाहतो की आपले आई, वडील किंवा मोठे लोक आपल्याला उन्नतीचा मार्ग दाखवितात. आपल्या प्रगतीचा उपाय सांगतात व शेवटी म्हणतात,' आम्हीसुद्धा याच मार्गाने स्वतःची प्रगती केली आहे म्हणून तुला सांगत आहे.' त्याच पद्धतीने आचार्य येथे सांगत आहेत की आजपर्यंत जितके सिद्ध झाले ते याच विधीने झाले आहेत. मोक्षाचा हाच वास्तविक मार्ग भगवंतांनी स्वयं अनुभव करून दाखविला आहे.

८०-८१ गाथेमध्ये सांगितलेला हाच एक मोक्षमार्ग आहे, अन्य नाही अशी कुंदकुंद आचार्यांनी आपली मती व्यवस्थित केली आहे. आपणसुद्धा अशी आपली मती व्यवस्थित करूया-

सव्वे वि य अरहंता तेण विधाणेण खविदकम्मंसा।
किच्चा तधोवदेसं णिव्वादा ते णमो तेसिं ।।८२।।

अन्वयार्थ – (**सव्वेवि य**) सर्वच (**अरहंता**) अरिहन्त भगवंतांनी (**तेण विधाणेण**) पूर्वी सांगितलेल्या त्याच विधीने (**खविदकम्मंसा**) कर्माचा नाश केला (**तधोवदेसं**) त्याच प्रकाराने उपदेश (**किच्चा**) करून (**ते णिव्वादा**) ते निर्वाणास जे प्राप्त झाले (**तेसिं णमो**) त्या सर्वांना नमस्कार असो.

शुद्धोपयोगाद्वारे घाती कर्मांचा नाश करून अरिहंत होऊन मोक्षमार्गाचा उपदेश करून निर्वाणाला प्राप्त झाले त्या सर्वांना नमस्कार आहे.

मोक्षमार्गाची एकरूपता –

काल अनादि-अनन्त आहे. यद्यपि प्रत्येक सिद्ध आत्मा अशुद्ध अवस्थेचा त्याग करून सिद्ध झाले आहेत तथापि सिद्ध परमेष्ठी अनादि काळापासून आहेत. त्याला सुरवात नाही म्हणून आतापर्यंत तीर्थंकर अनन्त झाले आहेत. पाच भरत व पाच ऐरावत अशा दहा कर्मभूमींमध्ये उत्सर्पिणीच्या तृतीय व अवसर्पिणीच्या चतुर्थ काळामध्ये उत्पन्न झालेले भव्यात्मा अरिहंतांच्या द्रव्यगुणपर्यायांना जाणून स्वतःला ओळखून निज शुद्धात्मानुभूतीच्या उपायाने अरिहंत झाले. प्रत्येक चतुर्थकाळातील २४ तीर्थंकरांनी विशेषरूपाने दिव्यध्वनीद्वारे तसाच उपदेश केला. असे चतुर्थकाळ अनन्त झाले व पाच महाविदेहांमध्ये सर्वदा तीर्थंकर होतात व त्यांचा उपदेश चालू आहे. अशाप्रकारे अतीत काळामध्ये अनन्त अरिहंत झाले आहेत त्या सर्वांनी याच निज शुद्धात्मानुभूतीच्या उपायाने कर्मांशांचा नाश केला व सर्वांनी एकामुखाने हाच मार्ग सांगितला. अन्य नाही.

विनयमिथ्यात्वी लोक म्हणतात की कोणत्याही देवाचा आश्रय घ्या, सर्वजण एकाच ठिकाणी नेऊन पोहचवतात. परन्तु ही गोष्ट सत्य नाही कारण कोणी स्वतंत्र रूपाने धर्म मानतो, कोणी सर्व ईश्वराधीन मानतो, कोणी आपली सत्ताच स्वीकारत नाही, कोणी कूटस्थ नित्य मानतो, अशाप्रकारे परस्परविरुद्ध विचारांचे प्राप्तिस्थान एक कसे असेल ? म्हणून मोक्षाचे अनेक मार्ग नाहीत, एकच मार्ग आहे, निज आत्मस्वभावाची रूची, प्रतीती व स्थिती. अशी परिपूर्ण श्रद्धा झाल्याशिवाय मोक्षमार्गाचा प्रारंभ होत नाही. मोक्षाचा 'वनवे' मार्ग आहे, अनेक मार्ग नाहीत.

स्वयं मार्गद्रष्टाच मार्गदर्शक–

ज्यांनी स्वतः त्या मार्गावरून गमन केले आहे तोच यथार्थ मार्गदर्शन करू शकतो. ज्यांनी स्वयं मार्ग पाहिलेला नाही व त्या मार्गावरून जे गेले नाहीत ते काय मार्ग दाखविणार ? जो स्वयं तरून नदीच्या पैलतीराला गेला आहे तोच इकडच्या तीराला असणाऱ्या जीवांना हाताने खुणवून सांगतो की 'मी अशाप्रकारे हात पाय हालवून स्वयं तरून आलो आहे. तुम्ही पण पाण्यात उडी टाका व दोन्ही हाताने पोहत इकडच्या तीराला या.'

शांतिसागर महाराजांनी प्रथम स्वतः संयम धारण करून संयमाचे पालन केले नंतर सर्व भव्यजीवांना सांगितले, 'बाबानो ! भीऊ नका, संयम धारण करा.' 'आधी केले मग सांगितले' अशा व्यक्तीचे वचन दुसऱ्यांना प्रभावित करते.

सर्व तीर्थंकरांनी पूर्वोक्त विधीने सम्यक्त्व प्राप्त करून, नंतर शुद्धोपयोगाद्वारे रागद्वेषाचा समूल नाश करून, वीतराग होऊन घातिकर्मांचा क्षय करून, आप्त सर्वज्ञ होऊन, अन्य मोक्षार्थी जीवांना त्याच विधीचा उपदेश केला. नंतर अघाती कर्मांचा क्षय झाल्यावर सिद्धशीलेवर विराजमान झाले. भविष्यामध्ये सुद्धा अनन्त तीर्थंकर आत्मतत्त्वाची प्राप्ती व रागद्वेषाचा परिहार करून सकल परमात्मा होऊन याच विधीचा उपदेश करून अघाती कर्मांचा क्षय झाल्यानंतर मोक्ष प्राप्त करतील.

आता सुद्धा विदेहक्षेत्रामध्ये वर्तमान तीर्थंकर पूर्वोक्तविधीने सकलपरमात्मा होऊन या विधीचा उपदेश देऊन मोक्षाला जात आहेत. म्हणून निर्वाणप्राप्तीचा मार्ग आत्मतत्त्वाची उपलब्धी व रागद्वेषाचा त्याग सोडून अन्य काहीही नाही. असा आम्ही निश्चय करतो असे आचार्य म्हणतात. आता जास्त प्रलाप नको. आमची मती व्यवस्थित झाली आहे.

व्यवहारामध्ये आपण पाहतो. एखादा मार्ग निवडताना गोंधळ होत असतो. कारण अनेकजण अनेक मार्ग सांगत असतात. त्यातला नेमका कोणता मार्ग निवडावा हे लवकर कळत नाही. तेव्हा आपली सदसद्विवेक बुद्धी वापरून निर्णय करतो. ज्या मार्गावरून जाऊन अनेकांनी यश मिळविले आहे त्याची प्रत्यक्ष उदाहरणे पाहून त्या मार्गाचा निर्णय करतो तेव्हा आपल्या

बुद्धीतील गोंधळ संपतो त्याचप्रमाणे आचार्यांनी मार्गाचा निश्चय केला आहे म्हणून त्यांची बुद्धी व्यवस्थित झाली आहे, स्थिर झाली आहे. आपल्यासुद्धा जीवनामध्ये हे महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे. वाममार्गाकडे नेणाऱ्या ठगापासून सावध होऊन यथार्थ मार्गद्रष्ट्या मार्गदर्शकाचे अनुकरण करून मार्गावर वाटचाल करावी.

मार्गदर्शकाबद्दल कृतज्ञता –

ज्याप्रमाणे वाट चुकलेल्या वाटसरूला एखाद्याने यथार्थ मार्ग दाखवून जर त्याला संकटातून बाहेर काढले तर त्या वाटसरूला त्या मार्गदर्शकाबाबत कृतज्ञता व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. त्याला अनेकशः धन्यवाद देऊन किंवा त्याचे आभार मानून मानाप्रमाणे नमस्कार करून त्याचा विनय करतो. त्याप्रमाणे ज्यांच्या निमित्ताने दुर्गम संसार तरून जाण्याचा मार्ग सापडला अशा मोक्षमार्गदर्शकासंबंधी सहज विनयभाव उत्पन्न झाल्यामुळे आचार्य त्या अरिहंत भगवंतांना नमस्कार करतात, त्या मोक्षमार्गाच्या उपदेशक परमोपकारक अरिहंत देवांना आमचा भाव नमस्कार असो.

स्वयं निज शुद्धात्म्याचा अनुभव करणे हाच खरा भावनमस्कार आहे. अरिहंतासमान आत्मद्रव्याला जाणून आपल्या शुद्धस्वरूपाची भावना करावी. कारण जो जशी भावना करतो तो त्यारूप होतो. जो अरिहंत परमात्म्याचा खरा भक्त आहे व तत्त्वज्ञानी आहे तो अवश्य शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो. असे जाणून आपल्या ज्ञानोपयोगामध्ये शुद्ध आत्मस्वरूपाची सदा भावना करावी. याच उपायाने शुद्धात्मस्वरूपाचा लाभ होईल.

हितशत्रू मोहप्रकृती –

गाथा क्रमांक ८० मध्ये मोहावर विजय प्राप्त करण्याचा उपाय सांगितला. गाथा ८१मध्ये रागद्वेषरूपी डाकूपासून सावध राहण्यासाठी जागरूक रहायला सांगितले. मोह हा शुद्धात्मलाभाचा परिपंथी अर्थात् शुद्धात्म्याच्या प्राप्तीचा विरोधक आहे. वास्तविक द्रव्यदृष्टीने शुद्धात्म्याचा कोणीही विरोधक नाही; कारण सर्व द्रव्यापासून भिन्न शुद्ध आत्मद्रव्य अनादि अनन्त सर्व पर्यायांमध्ये व्यापक आहे. मोहपर्याय शुद्धात्मलाभाचा प्रतिरोधक शत्रू आहे. शुद्धात्मद्रव्य सदा प्रकाशमान असतानाही अज्ञानी जीवाला

मोहामुळे पर्यायामध्ये त्याची उपलब्धी नाही.

अज्ञानी जीव मोहामुळे 'मी शुद्धात्मद्रव्य आहे' हे जाणत नाही, म्हणून त्याला शुद्धात्मा असून नसल्यासारखा आहे. ज्याप्रमाणे एखाद्याजवळ करोड रूपयांची संपत्ती असून सुद्धा जर त्याला माहीत नसेल तर तो करोडपती असूनही स्वतःला रोडपती (भिकारी) अनुभवतो. त्याप्रमाणे हा अज्ञानी जीव अनंत गुणपती असतानाही मोहामुळे स्वतःला गुणरहित अनुभवतो, म्हणून जोपर्यंत मोहासंबंधी अज्ञान आहे तोपर्यंत मोहाला ओळखू शकणार नाही व मोहाची ओळख झाली नाही तर कोणाचा नाश करणार ? ज्याप्रमाणे एखादा पुरुष आमचा शत्रू आहे असे आम्हाला कळाले. परंतु जोपर्यंत त्या पुरुषाचे रंगरूप माहित नसेल तोपर्यंत त्याला ओळखू शकणार नाही व त्याला ओळखले नाही तर त्याचा नाश करू शकणार नाही. त्याला नाश करायला जाऊ आणि अज्ञानामुळे दुसऱ्याच कुणाचा तरी नाश करून येऊ, म्हणून शत्रूचे स्वरूप माहित असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मोह शत्रू आहे हे कळाले पण मोहाचे स्वरूप माहीत नसल्यामुळे हा जीव मोहाचा नाश न करता दुसऱ्याच कोणत्यातरी बाह्य वस्तूचा नाश करण्याचा उपाय करतो. म्हणून आचार्य पुढील गाथेमध्ये मोहाचा परिचय करून देण्यासाठी मोहाचा स्वभाव व त्याच्या भूमिका अर्थात् अवस्था प्रकट करतात.–

दव्वादिएसु मूढो भावो जीवस्स हवदि मोहो त्ति।
खुब्भदि तेणुच्छण्णो पप्पा रागं व दोसं वा।।८३।।

अन्वयार्थ – (**जीवस्स**) जीवाचा (**दव्वादिएसु**) द्रव्यादिका संबंधीचा (**मूढो भावो**) मूढ भाव अर्थात् अज्ञानरूप भाव (**मोहो त्ति हवदि**) मोह आहे (**तेणुच्छण्णो**) मोहाने आच्छादित झालेला जीव (**रागं व दोसं वा**) राग अथवा द्वेषाला (**पप्पा**) प्राप्त करून (**खुब्भदि**) क्षुब्ध होतो.

द्रव्यगुणपर्यायासंबंधी यथार्थ ज्ञान व समज नसणे म्हणजे मोह आहे. त्या मोहाने आक्रान्त प्राणी रागी द्वेषी होऊन दुःखी होतो.

मोहदारूची नशा (उन्मत्तता)–

ज्याप्रमाणे मादक पदार्थाचे सेवन केलेला जीव असावधान असतो,

उन्मत्त होतो. त्याला कोणत्याही पदार्थामध्ये विवेक राहत नाही, सर्व व्यवहार अविवेकपूर्ण करतो. तो स्वतःला विसरून कोठेही अपवित्र स्थानामध्ये लोळतो. त्याप्रमाणे मोहरूपी दारू प्राशन केलेल्या जीवाला सुद्धा स्वपरासंबंधी विवेक राहत नाही, सर्व व्यवहार अविवेकपूर्ण करतो. स्वतःच्या आत्मस्वरूपाला विसरून परामध्ये आसक्त होऊन तेथेच रममाण होतो.

एकदा एक राजा आपल्या मंत्र्याबरोबर हत्तीवर बसून जंगलामध्ये फिरत होता. तेथे दारू पिऊन उन्मत्त झालेल्या एका दारुड्याने राजाला विचारले, 'हे राजन्, हाथी विकणार काय ? केवढ्याला विकणार ?' ते ऐकून राजाला क्रोध आला. तेव्हा मंत्र्यानी राजाला समजावले, 'हे राजन्, आपण या गरीबावर क्रोध करू नका. हे हा बोलत नाही, दुसरेच कोणीतरी बोलत आहे.' राजा म्हणतो की 'हे स्पष्टच दिसत आहे की हाच बोलतो आहे.' तेव्हा मंत्री समजावतो 'राजन्, आपण चला, राजदरबारामध्ये याचे मर्म सांगतो. दुसऱ्या दिवशी राजदरबार भरला. मंत्र्याने त्या दारुड्याला बोलाविले, तेव्हा राजाने त्याला विचारले की ' काय माझा हत्ती विकत घेणार ?' तेव्हा तो गरीब व्यक्ती भीतीने कापू लागला व म्हणाला, ' हे राजन् या गरीबाची आपण चेष्टा करता काय ? आपण शुद्धीमध्ये तर बोलत आहात ना ? माझ्यासारख्या गरीबामध्ये हत्ती विकत घेण्याची काय ताकत ?' तेव्हा मंत्र्यानी समजावले ' राजन् हा तेथे बोलत नव्हता, दारूची नशा बोलत होती.' त्याप्रमाणे जीवद्रव्य स्वयं नाचत नाही, मोहाची नशा याला नाचवते आहे. जे आपले नाही त्याला आपले मानतो. द्रव्य, गुण, पर्याय या तिन्हींसंबंधी त्याचे अज्ञान आहे.

मोही जीव परद्रव्याला स्वद्रव्यरूपाने स्वीकारतो. शरीर पुद्गलद्रव्य आहे म्हणून ते परद्रव्य आहे. त्यालाच हा मोही प्राणी स्वरूपाने स्वीकारतो. मनुष्य शरीरामध्ये स्थित असणाऱ्या जीवाला मनुष्य, तिर्यंच शरीरामध्ये स्थित असणाऱ्या जीवाला तिर्यंच, नरक शरीरामध्ये असणाऱ्या जीवाला नारकी व देव शरीरामध्ये असणाऱ्या जीवाला देव मानतो, परंतु जीव तसा नाही. वरच्या पॅकिंगलाच माल मानतो, बाहेरचे पॅकींग वेगळे आहे व आतला माल वेगळा आहे. आतला मालच दिसत नसल्यामुळे अज्ञानी बाहेरच्या पॅकींगलाच वस्तू मानून बसला आहे. शरीर हे पॅकिंग आहे. याच्या आतमध्ये चैतन्यरूपी माल

वेगळा आहे याचे ज्ञान मोहामुळे या जीवाला होत नाही.

याचप्रमाणे अज्ञानी मोहीजीव परगुणांना आपले गुण मानतो. शरीरामध्ये असणाऱ्या स्पर्श, रस, गंध, वर्णांना आपलेच मानतो. शरीर काळे आहे तर मी काळा आहे, शरीर गोरे आहे तर मीच गोरा आहे, शरीर गरम झाले तर मी गरम झालो असे मानतो. शरीर उंच असेल तर मी उंच आहे, शरीर ठेंगणे असेल तर मी ठेंगणा आहे असे अनुभवतो. शरीराच्या अवस्थेस आपली अवस्था मानतो. बाल, तरूण, वृद्ध या शरीराच्या अवस्था आहेत. परंतु या मोही जीवाला त्या आपल्या अवस्था वाटतात. वृद्धावस्थेमध्ये सर्वजण स्वतःला वृद्ध अनुभवतात. त्यामुळे उठता-बसता दुःखाचा अनुभव करतात, मी वृद्ध झालो. आता माझे कसे काय होणार, माझी कोण सेवा करणार ? असे मानून स्वतः दुःखी होतो. शरीराचा नाश होऊ लागला की माझाच नाश होतो असे मानून दुःखी होतो. ज्ञानी पुरुष मात्र शरीरापासून स्वतःला भिन्न अनुभवतात.

सिंकदर जेव्हा भारतातून परत चालला होता तेव्हा तो देखील एखादी अद्‌भुत वस्तू युनान देशात नेऊ इच्छित होता. कोणी सांगितले की हिमालयात एक साधू मोठे अद्‌भुत आहेत. परंतु त्यांना घेऊन जाणे शक्य नाही. कारण ते कोणाचीही आज्ञा मानत नाहीत. ते आपल्या मनाचे मालक आहेत. सिंकदर गर्वाने म्हणाला, कसे ऐकत नाहीत. ही माझी तलवार कधी कामाला येणार? सिकंदराने आपल्या सेनापतीला साधूजवळ पाठविले. सेनापतींनी साधूला बादशहाची आज्ञा ऐकवली.

साधूंनी सांगतिले 'आम्ही कोणाच्या अधीन नाही. आम्ही केवळ स्वतःची आज्ञा मानतो' ते ऐकून सिकंदर स्वतः नंगी तलवार हातात घेऊन आला व म्हणाला,'आपल्याला आमच्या बरोबर यायचे आहे नाही तर आम्ही आपल्याला येथेच समाप्त करतो. ' साधू म्हणतात, 'ज्याला तुम्ही समाप्त करणार त्याला आम्हीसुद्धा समाप्त होताना पाहू, कारण ज्याला तुम्ही नष्ट करणार तो मी नाहीच. मी त्याहून वेगळा आहे. जो मी आहे त्याला तुम्ही कधीही नष्ट करू शकत नाही. ज्या शरीराला तुम्ही साधू समजत आहात तो मी नाही व जो मी आहे त्याचे मरण होऊ शकत नाही. त्याचे कोणी तुकडे करू

शकत नाही.'

सर्व दुःखाचे मूळ कारण आहे शरीरामध्ये आपलेपणा. राग-द्वेषाच्या उत्पत्तीचे कारण आहे शरीरामध्ये आपलेपणा. जितके शरीराला आपलेरूपाने पाहू तितके रागद्वेष वाढणार, जेवढे आम्ही स्वतःला शरीरापासून भिन्न पाहू तेवढा मोह गळून जाईल. स्वतःला ओळखल्याशिवाय शरीरातून आपलेपण नष्ट होत नाही. शरीरापासून आपलेपणा नष्ट झाल्याशिवाय रागद्वेषाचा अभाव होऊ शकत नाही.

आत्म्याला सोडून आत्म्याचे अन्य काहीही नाही. अन्य पदार्थामध्ये हे माझे आहे असे मानणे चोरी आहे. या चोरीच्या परिणामामुळेच कर्मरूपी न्यायाधीश ८४ लाख योनीमध्ये या जीवाला अडकवून ठेवत आहे. शरीराच्या कैदेत राहावे लागत आहे. सर्व आपत्तीचे मूळ मोहभाव आहे पराला आपले बनविण्याची बुद्धी डाकूखोरी आहे. सर्व शांतीचे मूळ मोहाहून विपरीत यथार्थ आत्मप्रतीती आहे. या आत्मतत्त्वाच्या उपलब्धीशिवाय स्वयं ज्ञानसुखाचा भांडार असूनसुद्धा अज्ञानवश बाह्य पदार्थापासून ज्ञान व सुख इच्छित आहे. त्यामुळेच हा जीव महाक्लेश सहन करतो.

बाह्य पदार्थापासून ज्ञान व सुख इच्छिणे म्हणजे बाह्य वस्तूला आपले मानणे आहे. बहिरात्मा इष्ट पदार्थांमध्ये राग व अनिष्ट पदार्थांमध्ये द्वेष करून क्षुब्ध होत आहे. त्या वस्तू इष्ट अथवा अनिष्ट नाहीत. परंतु दुष्ट इंद्रियांच्या अधीन झाल्यामुळे मोही जीवांनी त्यामध्ये दोन प्रकारचे भाव उत्पन्न केले आहेत. ज्याप्रमाणे पुलाचा बाँध एक आहे. जर तो वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या भाराने तुटला तर तो बांध दोन रूपाने दुभंगला जातो. त्याप्रमाणे पदार्थ अद्वैत आहे. त्यामध्ये दोनपणा नाही. पदार्थ जसा आहे तसा आहे. त्यामध्ये इष्ट अनिष्ट भावरूप द्वैत नाही. परन्तु जेव्हा पदार्थांमध्ये मोहाच्या वेगाचा प्रहार होतो तेव्हा मोहाचे विषयभूत पदार्थ दोन प्रकाराने अनुभवता येतात, कोणी इष्ट तर कोणी अनिष्ट अथवा हा आत्माच दोन प्रकाराने विभंगतो.-१) रागभावरूप व २) द्वेषभावरूप. कारण पदार्थ विभागला जात नाही. हा आत्माच दोन भावरूप होतो. म्हणून क्षोभाला प्राप्त होतो. त्याकरिता मोहाच्या स्वभावाला जाणून त्याच्या भूमिकांची ओळख करून घ्यावी. मोह,

राग व द्वेषाच्या भेदाने त्या मोहाच्या तीन भूमिका आहेत. यामध्ये मोह मूळ आहे त्याद्वारे रागद्वेषाची पुष्टी होते.

रागद्वेष भाव चार प्रकारचा आहे. १) पहिला अनन्तानुबन्धी सम्बन्धी- हा अत्यंत गाढ असतो. हा मिथ्यात्वाचा सहायक आहे व याची वासना अनन्तकाळापर्यंत राहू शकते. या रागद्वेषांना वश होऊन जीव रात्रंदिवस विषयांचा दास बनलेला आहे. याचा सर्व वेळ इष्ट पदार्थांना मिळविण्यामध्ये, अनिष्ट पदार्थांना दूर करण्यामध्ये व इष्ट पदार्थांचा वियोग झाल्यावर दुःख करण्यामध्ये व्यतीत होतो. संसाराचे मूळ कारण हेच मोह रागद्वेष आहेत.

२) दुसरा भेद अप्रत्याख्यानावरणीय सम्बन्धी आहे- हा श्रद्धेच्या अपेक्षेने विषयांमध्ये मूर्च्छित करीत नाही. पण रूची नसतानासुद्धा विषयांची इच्छा उत्पन्न करतो. विषयांमध्ये सुख नाही हे जाणत असतानासुद्धा इष्ट पदार्थामध्ये राग व अनिष्ट पदार्थामध्ये द्वेष भाव करतो. याची वासना सहा महिन्यापेक्षा अधिक राहू शकत नाही. या रागद्वेषामुळे हा जीव श्रावकांचे व्रत नियम धारण करू शकत नाही. म्हणून त्यास अविरत सम्यग्दृष्टी म्हणतात. अन्यायापासून वाचण्याचा व दुसऱ्याला पीडित करून स्वार्थ न साधण्याचा उद्यम करतो. प्रशम, संवेग, अनुकम्पा आस्तिक्याचे पालन करतो.

३) तीसरा भेद प्रत्याख्यानावरणीय सम्बन्धी आहे. संसारापासून सुटण्याचा भाव कार्यामध्ये परिणत होऊ लागतो. हा सम्यग्दृष्टी जीव मोठ्या उत्साहाने श्रावकाच्या व्रतांना धारण करीत, त्याग करीत जातो. याचा उदय मंद होत जाईल तसे दर्शन प्रतिमेपासून ते उद्दिष्ट त्याग प्रतिमेपर्यंत चढत जातो. परंतु मुनिव्रत धारण करीत नाही. या रागद्वेषाची वासना पंधरा दिवसांपेक्षा अधिक नाही.

४) चौथा भेद संज्वलनासंबंधी रागद्वेष आहे- हा कषाय संयमाचा घात करीत नाही. परन्तु वीतराग चारित्रामध्ये मलिनता उत्पन्न करतो. याची वासना अंतर्मुहूर्त मात्र आहे. जेथे पहिला भेद आहे तेथे अन्य तीन त्यासोबत आहेतच. पहिला भेद गेल्यावर तीन, दोन गेल्यावर दोन, तीन भेद गेल्यावर चौथा भेदच राहतो. चारी प्रकारच्या रागद्वेषांचा अभाव झाल्याशिवाय आत्मा पूर्ण अक्षुब्ध व निराकुल होत नाही. रागद्वेषामध्ये चार कषाय व नऊ नोकषाय

गर्भित आहेत.

क्रोध, मान, अरती, शोक, भय व जुगुप्सा या सहांच्या उदयाच्या निमित्ताने द्वेषभाव उत्पन्न होतो, लोभ माया, हास्य, रती व ३ वेद या ७ च्या उदयाच्या निमित्ताने रागभाव उत्पन्न होतो अशाप्रकारे मोहाच्या एकूण ६+७=१३ अवस्था आहेत.

प्रत्येकाचे अनन्तानुबन्धी आदी चार भेद केले असता एकूण १३×४=५२ भेद होतात. सिद्धांतामध्ये चारित्र मोहनीयाचे २५ भेद सांगितले आहेत. परंतु नऊ नोकषाय सुद्धा अनंतानुबंध्यादी कषायांच्या सहायतेने काम करतात म्हणून याचे सुद्धा ९×४=३६ भेद होतात. (१६+३६=५२)

दर्शन मोहाचे तीन भेद आहेत. १) मिथ्यात्व २)सम्यग्मिथ्यात्व ३) सम्यक्प्रकृती. जे सर्वथा श्रद्धान बिघडवते ते मिथ्याव, जे खऱ्या-खोट्या श्रद्धानाला मिश्ररूप करते ते मिश्र, जी खऱ्या श्रद्धानामध्ये दोष उत्पन्न करते ती सम्यक्प्रकृती होय. अशाप्रकारे हा सर्व मोहाचा परिवार आहे अर्थात् मोहाच्या अवस्था आहेत.

या मोहाला आत्म्याचा विरोधी, सुखशांतीचा नाशक, समतेचा घातक व संसार चक्रामध्ये भ्रमण करायला लावणारा असे जाणून मोक्षार्थी जीवांनी शुद्धोपयोग रूप साम्यभावाचा अभ्यास करावा. या सर्वांच्या नाशाचा उपाय भेदविज्ञान आहे.

मोह अनिष्ट कार्य करणारा आहे. लौकिकामध्ये जो आपले अनिष्ट करतो त्याला आपल्या जवळ आपण ठेवू इच्छित नाही. त्याला दूर हटविण्याचा प्रयत्न करतो. एवढेच नव्हे तर त्याची सत्ता नष्ट करू इच्छितो. येथे अनिष्ट कार्य आकुलता आहे. कारण जीवाची अन्य कोणतीही अवस्था होऊ देत, ज्ञान कमी असू देत अथवा इष्ट वस्तू कमी मिळू देत हे सर्व जीवाला अनिष्ट नाही, **एक आकुलताच अनिष्ट आहे व त्या आकुलतेचे कारण मोहभाव आहे.** म्हणून आचार्य मोहाच्या नाशाचा उपदेश करतात.

मोहेण व रागेण व दोसेण व परिणदस्स जीवस्स ।
जायदि विविहो बंधो तम्हा ते संखवइदव्वा ।।८४।।

अन्वयार्थ – (**मोहेणव**) मोहरूपाने अथवा (**रागेण व**) रागरूपाने

अथवा (**दोसेण व**) द्वेषरूपाने (**परिणदस्स जीवस्स**) परिणत जीवाला (**विविहो बंधो**) अनेक प्रकारचा बंध (**जायदि**) होतो. (**तम्हा**) म्हणून (**ते**) ते मोह, राग, द्वेष (**संखवइदव्वा**) सम्पूर्णरूपाने नष्ट करण्यायोग्य आहेत.

मागील गाथेत मोहाच्या भूमिका सांगून मोहशत्रूची ओळख करून दिली आहे, आता या शत्रूचा नायनाट करण्याची प्रेरणा दिली आहे.

अपराधीला बंधन–

वस्तुस्वरूपाच्या ज्ञानाने रहित जीव मोह- राग-द्वेषरूपाने परिणमित होऊन अनेक प्रकारच्या कर्मबंधनाने बद्ध होतो. जो जीव अपराध करतो तो बांधला जातो. परवस्तूला आपले मानणे हा सर्वात मोठा अपराध आहे, त्या परद्रव्याला प्राप्त करण्याची इच्छा करणे हा ही अपराध आहे व त्या परद्रव्याला दूर हटविण्याची इच्छा करणे हा ही अपराध आहे.

अशाप्रकारे परद्रव्यामध्ये अनधिकार चेष्टा केल्यामुळे कर्मरूपी पोलीस या जीवाला बंधनात अडकवून आपल्या अधीन करतात. वास्तविक जीवाला आपल्या विकारीभावांचेच मोठे बंधन आहे. त्यामुळेच क्लेश आहेत, जीवाच्या मोहादी भावांचा संपर्क झाल्यावर कार्माणवर्गणा स्वयं कर्मरूप परिणत होतात. हा जीव स्वतःच्या अपराधामुळे कर्मबंधनाने बद्ध झाला आहे.

बंधनाच्या कारणासंबंधी दृष्टान्त–

जंगली हत्तीला पकडण्यासाठी शिकारी लोक लांब रूंद खड्डा काढून त्याला जंगलातील पाला-पाचोळ्यांनी वरपर्यंत झाकून टाकतात. ज्याप्रमाणे त्या खड्ड्यासंबंधी बेखबर हत्ती त्याच्या अज्ञानामुळे त्या खड्ड्यामध्ये पडतो त्याप्रमाणे द्रव्यगुण पर्यायासंबंधी अज्ञानामुळे हा आत्मा कर्मबंधनाला प्राप्त होतो.

जंगली हत्तींना पकडण्यासाठी दूसरा प्रयोग केला जातो की तरूण हत्तीणींना अशाप्रकारे ट्रेण्ड करतात की त्या कामुक हत्तींना आकर्षित करीत त्या खड्ड्याजवळ घेऊन येतात, स्वतः जाणकार असल्यामुळे खड्ड्यापासून सावधानतेने जाऊन खड्ड्यात न पडता बाजूला जातात. परंतु अज्ञानी हत्ती अज्ञानामुळे व हत्तीणींच्या प्रति रागभावामुळे खड्ड्यात पडतात व बंधनात

अडकतात. त्याचप्रमाणे हा अज्ञानी जीव पंचेन्द्रियांच्या विषयांच्या रागवश कर्मबंधाला प्राप्त होतो.

तिसरा प्रयोग हा आहे की मन्दोन्मत्त हत्तींना अशाप्रकारे ट्रेण्ड केले जाते की ते जंगली हत्तींना युद्धासाठी ललकारतात. पूर्वोक्त हत्ती जंगली हत्तीला युद्धासाठी या खड्ड्याजवळ घेऊन येतो. लढताना त्याला माहित असल्यामुळे खड्ड्यापासून वाचतो, परन्तु त्या खड्ड्यासंबंधी अज्ञानी जंगली हत्ती त्या हत्तीबरोबर लढत त्या खड्ड्यात पडतो व द्वेषामुळे बंधनाला प्राप्त होतो त्याचप्रमाणे हा अज्ञानी जीवसुद्धा अनिष्ट वाटणाऱ्या पदार्थासंबंधी द्वेष करून कर्मबंधाला प्राप्त होतो.

अशाप्रकारे जंगली हत्तीप्रमाणे हा आत्मा सुद्धा तत्त्वासंबंधी अज्ञानस्वरूप मोहामुळे, रागामुळे आणि द्वेषामुळे बंधनाला प्राप्त होतो. म्हणून तत्त्वासंबंधी अज्ञान, राग व द्वेष सोडण्यायोग्य व मूळासकट नाश करण्यायोग्य आहेत.

कल्याणार्थी जीवाचे कर्तव्य –

आत्म्याचे हित इच्छिणाऱ्या पुरुषांचे हे कर्तव्य आहे की ज्यामुळे हा आत्मा चार गतीमध्ये भ्रमण करीत अनेक प्रकारच्या दुःखांना भोगतो आणि निराकुल होऊन सुख-शांती प्राप्त करू शकत नाही. अशा कर्मबंधनापासून आत्म्याला सोडवावे. कारण जीव मोह, राग, द्वेषरूप स्वतःच्या अशुद्ध भावांमुळे बंधाला प्राप्त होतो. म्हणून या भावांना कारणभूत पूर्वबद्ध दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय कर्म आहे. त्यांना मूळासकट आत्म्याच्या प्रदेशांपासून दूर उपटून टाकले पाहिजे. जर कारणच राहिले नाही तर कार्यसुद्धा राहणार नाही. आठ प्रकारच्या कर्मबंधनामुळेच मोह, राग, द्वेष आहेत. ज्या जीवांनी यांचा नाश केला त्या क्षीणमोही साधूंना कर्मांचा बंध होत नाही, केवळ योगामुळे ईर्यापथ आस्रव होतो. अर्थात् स्निग्धरहित शरीरावर धूळ पडल्याप्रमाणे कर्म आत्म्याशी चिकटत नाहीत.

सर्वप्रथम दर्शनमोह (मिथ्यात्व) व त्याचे सहकारी अनंतानुबंधी रागद्वेषांचा उपशम करून प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करावे. त्यानंतर क्षयोपशम सम्यक्त्वी होऊन दर्शनमोहांचा नाश करून क्षायिक सम्यग्दर्शन

करून घ्यावे. त्यानंतर श्रावकांचे आचरण करून साधुत्वाचा अभ्यास करावा. त्यानंतर मुनी होऊन शुद्धोपयोगाची भावना व त्याचे ध्यान करून सर्व रागद्वेषासंबंधी कर्मप्रकृतींचा नाश करावा. रागद्वेष मोहांचा क्षय करण्याचा उपाय आत्म्याचे ज्ञान व वीर्य आहे म्हणून मनसहित विचारवान जीवाचे कर्तव्य आहे की जिनवाणीचा अभ्यास करून आत्मा व अनात्मा यातील भेद समजून घ्यावा. आत्म्याचे द्रव्य-गुण-पर्याय आत्म्यामध्ये व पराचे द्रव्यगुणपर्याय परामध्ये जाणावेत.

जरी आपला आत्मा कर्मपुद्गलाबरोबर दूध व पाण्याप्रमाणे एकमेक झाला आहे तरीसुद्धा हंस ज्याप्रमाणे आपल्या चोचीच्या स्पर्शाने दूध व पाण्याला वेगळे करू शकतो त्याप्रमाणे तत्त्वज्ञानी जीवाने आत्मा व अनात्म्याचे लक्षण भिन्न जाणून ज्ञानचोचीने त्यांना वेगवेगळे करावे. यालाच भेदविज्ञान म्हणतात. या भेदविज्ञानाच्या बलाने आपली आत्मशक्ती मोहप्रपंचापासून हटवून शुद्ध आत्म्याच्या स्वरूपामध्ये मनन करण्यामध्ये लावावी. जसजशी आपली बुद्धी आत्म्याकडे लागेल तसतसे मोहाचे बंधन शिथिल होईल. वारंवार अभ्यास करीत राहिल्यावर सम्यग्दर्शनाच्या बाधक कर्मांचा उपशम होईल. पुन्हा याच शुद्धात्म्याच्या अनुभवाचा अभ्यास सातत्याने केल्यास २-४ भवामध्ये मोह मुळासकट क्षय होऊन क्षायिक सम्यग्दर्शन प्राप्त होईल. पुन्हा याच शुद्धात्म्याचे ध्यान-अनुभव करीत रहावे. याच्याच प्रतापाने गुणस्थान क्रमाने वर चढत हा जीव एक दिवस क्षपक श्रेणीवर आरूढ होऊन सर्व मोहनीय कर्मांचा क्षय करून वीतरागी निर्ग्रंथ साधू होईल. भावार्थ हा की, या रागद्वेष-मोहांचा नाश करण्याचा उपाय निज आत्म्याचे यथार्थ श्रद्धान व अनुभवन आहे. निश्चय रत्नत्रयच मुक्तीचे कारण आहे म्हणून मोक्षार्थी जीवांनी आत्मपुरुषार्थ करून संसाराच्या कारणभूत रागद्वेष मोहांचा नाश करावा.

मागील गाथेत हे स्पष्ट केले आहे, मोह-राग-द्वेषरूप परिणतीमुळे अनेक प्रकारचा बंध होतो म्हणून त्या मोहरागद्वेषाचा नाश करावा. ज्याचा नाश करायचा आहे व ज्याच्या पासून मुक्त व्हायचे आहे त्याची ओळख असणे आवश्यक आहे. प्रत्येक वस्तूला ओळखण्याचे काही ना काही चिन्ह

असते. मोह-राग-द्वेषाला ओळखण्याचे चिन्ह या गाथेत सांगतात त्या चिन्हाच्या द्वारे मोह-राग-द्वेषाला ओळखून उत्पन्न होताच त्याचा नाश करावा.

ज्याप्रमाणे मनुष्याला एखादा रोग झाला आणि जर त्याला ओळखता आला नाही तर रोगाचे पोषण होऊन तो रोग आपले घर करून बसतो. रोग उत्पन्न होताच जर त्याला ओळखता आले तर त्याचा तत्काल इलाज करून नाश करता येतो म्हणून अहितकारक वस्तूंची ओळख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मोह, राग, द्वेष उत्पन्न झाल्यानंतर त्याचा जर बुद्धीमध्ये निषेध केला नाही तर ते आपले मूळ दृढ करून घट्ट बसतात. उत्पन्न होताच त्याला अहितकारक जाणून त्याचा निषेध केला तर त्यांच्या संस्काराचा अभाव होऊन नाशाला प्राप्त होतात म्हणून आचार्य कुन्दकुन्ददेव मोह, राग, द्वेषाचा क्षय करण्यासाठी त्यांचे चिह्न सांगतात.

अट्ठे अजधागहणं करुणाभावो य तिरियमणुएसु ।
विसएसु यप्पसंगो मोहस्सेदाणि लिंगाणि ।।८५।।

अन्वयार्थ – (**अट्ठे**) पदार्थासंबंधी (**अजधागहणं**) अयथार्थग्रहण (**य**) आणि (**तिरियमणुएसु**) तिर्यंच मनुष्यासंबंधी (**करुणाभावो**) दयाभाव (**विसएसु**) पाच इन्द्रियांच्या विषयांमध्ये (**पसंगो**) प्रसंग (रागद्वेषभाव) (**एदाणि**) ही सर्व (**मोहस्स लिंगाणि**) मोहाची चिन्हे आहेत.

वस्तुस्वरूपाचे विपरीत ग्रहण, मनुष्य तिर्यंचासंबंधी विपरीत अभिप्रायपूर्वक करुणाबुद्धी, इन्द्रियविषयांमध्ये प्रीती व अप्रीती ही सर्व मोहाची चिन्हे आहेत.

दर्शनमोहाचे चिन्ह–

या जीवाचा सर्वात मोठा अहितकारी शत्रू दर्शनमोह अर्थात मिथ्यात्व आहे. कारण याला वश होऊनच जीव अन्य पाप करतो व अनादिकाळापासून संसारामध्ये परिभ्रमण करीत आहे म्हणून प्रथम याला ओळखून याचा नाश करावा. दर्शनमोहाची दोन चिन्हे गाथेमध्ये सांगितली आहेत.

१) पदार्थाचे अयथार्थग्रहण अर्थात् विपरीत ग्रहण. वस्तूचे जसे स्वरूप आहे तसे ग्रहण न करता त्याच्या विरुद्ध स्वरूपाचे ग्रहण करणे म्हणजे

मिथ्यात्व होय. वस्तू अनादि-अनंत, स्वतंत्र व अखण्ड आहे; परन्तु मिथ्यादृष्टी वस्तूला अनादि न स्वीकारता पर्यायदृष्टीने सादि मानतो. अनंत न मानता सान्त मानतो. स्वतंत्र न मानता संयोगाधीन परतंत्र मानतो. मनुष्य पर्यायाच्या उत्पत्तीला आपली उत्पत्ती व मनुष्यपर्यायाच्या नाशाला आपला नाश मानतो. चेतन व जड द्रव्यांच्या संयोगाने बनलेल्या मनुष्यादी द्रव्यपर्यायालाच आपले सर्वस्व मानतो. या मनुष्यादी पर्यायांमध्ये चेतन व जड दोन द्रव्यांचे भिन्न परिणमन न जाणता दोघांमध्ये एकत्व करतो. चेतनाला चेतनस्वरूप व जड द्रव्याला अचेतनरूप जाणत नाही. हे अज्ञानच मोहाचे चिन्ह आहे. जशी वस्तू आहे तशी न स्वीकारणे हेच मिथ्यात्व आहे. वीतराग सर्वज्ञ भगवंतांनी सांगितलेल्या आगमामध्ये वस्तूच्या यथार्थ स्वरूपाचे वर्णन केले आहे. त्यानुसार आपले श्रद्धान असेल तर ते खरे श्रद्धान आहे व त्याविरुद्ध श्रद्धान असेल तर समजावे की हे अयथार्थ श्रद्धान आहे. सर्वज्ञ भगवंतांनी जीवाचे स्वरूप ज्ञान-दर्शन उपयोगस्वरूप सांगितले आहे. अज्ञानी जर जीवाला उपयोगरूप न स्वीकारता, मोह-रागद्वेषरूप किंवा स्पर्श-रस-गंध वर्णरूप मानत असेल तर त्याचे ते अयथार्थ श्रद्धान आहे म्हणून आपली श्रद्धा आगम व युक्तीने पडताळून पहावी. जर त्यामध्ये विपरीतता दिसली तर हे मोहाचे चिन्ह आहे हे ओळखून त्याचा त्याग करावा.

दर्शनमोहाचे दुसरे चिन्ह आहे.- २) तिर्यंच व मनुष्य हे जाणण्यायोग्य असतानाही त्यांच्याविषयी करुणाबुद्धी करणे. वास्तविक जगातील सर्व पदार्थ जाणण्यायोग्य आहेत त्यांना फक्त ज्ञेय न जाणता मी त्यांच्यामध्ये बदल घडवितो. अर्थात जे दुःखी आहेत त्यांना मी सुखी करतो, त्यांना मी जगवितो. अशाप्रकारच्या मिथ्या अभिप्रायाने त्यांना सुखी करण्याचा किंवा जगविण्याचा दयाभाव करणे हे दर्शनमोहाचे चिन्ह आहे. ज्ञानीला विकल्पभूमिकेमध्ये दुःखी जीवाला पाहून अनुकम्पा उत्पन्न होते परंतु तेथे कर्तृत्वाचा अंहकार असत नाही की मी त्याला सुखी केले किंवा मी त्याला जगविले. प्रत्येक जीव आपापल्या कर्मोदयानुसार सुख-दुःख जीवन-मरण करतो याचे श्रद्धान त्याला असल्यामुळे ज्ञानीची करुणा दर्शनमोहाचे चिन्ह नाही. तो रागभाव असल्यामुळे चारित्रमोहाचे चिन्ह आहे. अज्ञानीची तन्मयतापूर्वक केलेली करुणा दर्शनमोहाचे चिन्ह आहे.

जयसेनाचार्यांनी करुणाभावाचा दुसरा अर्थ करुणेचा अभाव असा ही केला आहे. कर्तृत्वबुद्धिपूर्वक परजीवांना वाचविणे व सुखी करण्याचा भावरूप करुणा जसे दर्शनमोहाचे चिन्ह आहे तसे द्वेषभावाने कर्तृत्वबुद्धिपूर्वक दुसऱ्याला दुःखी करणे व मारण्याचे भाव रूप करुणेचा अभाव दर्शनमोहाचे चिन्ह आहे. मिथ्यामान्यतापूर्वक अनंतानुबंधी रागरूप करुणा व द्वेषरूप क्रूरता अर्थात करुणेचा अभाव दोन्ही दर्शनमोहाचे चिन्ह आहेत.

सम्यग्दृष्टीचे व्यवहारनयाने प्रशम, संवेग, अनुकम्पा व आस्तिक्य हे लक्षण सांगितले आहे. म्हणून सम्यग्दृष्टीला विकल्प भूमिकेमध्ये सहज अनुकम्पा भाव येतो. तो त्या जीवांना मदत सुद्धा करतो. परंतु त्याचा त्याला अंहकार असत नाही. त्याला आपली कमजोरी समजतो व मी दुसऱ्यावर उपकार करीत नाही तर मी आपले विकल्प शान्त करतो असे तो मानतो. सम्यग्दृष्टीला खरी अनुकम्पा असते की हे जीव मोक्षमार्गातून दूर भटकत आहेत त्यांना खरा मोक्षमार्ग प्राप्त होऊन या जीवांचे कल्याण व्हावे. अशा प्रकारची करुणा गणधरादी मुनिराजांना सुद्धा होते म्हणून ते मोक्षमार्गाचा उपदेश करतात.

चारित्रमोहाचे चिन्ह–

चारित्रमोहाचे दोन भेद आहेत –राग व द्वेष. इष्ट विषय आवडणे अर्थात् इष्टविषयासंबंधी प्रीती हे रागाचे चिन्ह आहे व अनिष्ट विषयासंबंधी अप्रीती हे द्वेषाचे चिन्ह आहे. रागाच्या वश होऊन प्राणी आपल्या प्रिय वस्तूंवर प्रेम करतो. अनेक प्रकाराने त्यांच्यावर उपकार करतो. स्त्री, पुत्र, मित्रादिकांचे भरण पोषण करतो, द्वेष भावनेमुळे अप्रिय वस्तूंचा तिरस्कार करतो, अपकार करतो. जेथे उपकारीवर प्रेम व अपकारीवर अप्रेम आहे तेथे राग–द्वेष आहे. दर्शनमोहाबरोबर ही राग–द्वेष असतात व दर्शनमोहाचा अभाव झाल्यावर ही काही काळ राग–द्वेष असतात. वस्तूस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाच्या अभावात होणारे रागद्वेष दर्शनमोहमूलक आहेत व वस्तूस्वरूपाचे ज्ञान, श्रद्धान झाल्यावर कर्मोदयजनित राग–द्वेष होतात ते फक्त चारित्रमोहवश आहेत. या सर्व मोहाच्या चिन्हांना जाणून त्या चिन्हांद्वारे त्यांना ओळखून त्यांचा नाश करावा.

ज्याप्रमाणे लोकामध्ये शत्रूपक्षाचा एक विरोधी व्यक्ती असला तरी तो खतरनाक आहे हे जाणून त्याचासुद्धा नाश करण्यायोग्य आहे. एक छोटा शत्रूसुद्धा प्रसंगी प्रबल होऊन कधी आपल्याला हाणून पाडेल सांगता येत नाही त्याप्रमाणे मोहाचा लेशसुद्धा या जीवाला घातक आहे. तो छोटा मोहसुद्धा कधी या जीवाला संसार गर्तामध्ये ढकलून या जीवाचा घात करेल सांगता येत नाही म्हणून जे जीव सुखशांती प्राप्त करू इच्छितात त्यांनी या तिन्हींना चिन्हाद्वारे जाणून सोडण्याचा उपाय करावा. ही चिन्हे सांगण्याचे हेच प्रयोजन आहे.

या मोहाला नाश करण्याचा उपाय रागद्वेष मोहापासून भिन्न ज्ञाताद्रष्टास्वरूप निज आत्म्याची भावना आहे. शुद्धोपयोगाच्या अभ्यासाने मोह ढीला पडत जातो व समताभाव वाढत जातो व एक क्षण असा येतो की पूर्ण मोहाचा नाश होऊन समतामय शुद्धात्मा प्रकट होतो, म्हणून निरन्तर शुद्धोपयोगाचा अभ्यास करावा.

पूर्वी ८० नंबरच्या गाथेमध्ये अरिहंतांना द्रव्यत्व-गुणत्व-पर्यायत्वरूपाने जाणून शुद्धात्म्याला जाणणे हा मोहनाशाचा उपाय सांगितला; परंतु हा उपायसुद्धा दुसऱ्या उपायाची अपेक्षा करतो. कारण अनादिकाळापासून या जीवाला द्रव्यगुणपर्यायाचे ज्ञान नाही. जर द्रव्यगुण पर्यायासंबंधी अज्ञान आहे तर अरिहंतांना द्रव्यगुणपर्यायरूपाने कसे जाणणे शक्य आहे ? त्यासाठी प्रथम आगमाचा अभ्यास आवश्यक आहे. सर्वज्ञप्रणीत आगमामध्ये द्रव्यगुणपर्यायाचे स्वरूप सांगितले आहे. म्हणून मुमुक्षू जीवांना सर्वप्रथम आगमाचा अभ्यास करण्याची आचार्य पुढील गाथेत प्रेरणा देत आहेत.-

जिणसत्थादो अट्ठे पच्चक्खादीहिं बुज्झदो णियमा ।
खीयदि मोहोवचयो तम्हा सत्थं समधिदव्वं ।।८६।।

अन्वयार्थ - (**जिणसत्थादो**) जिनेंद्र प्रणीत शास्त्राद्वारे (**पच्चक्खादीहिं**) प्रत्यक्षादी प्रमाणांनी (**अट्ठे**) पदार्थांना (**बुज्झदो**) जाणणाऱ्याचा (**णियमा**) नियमाने (**मोहोवचयो**) मोहसमूह (**खीयदि**) नष्ट होतो. (**तम्हा**) म्हणून (**सत्थं**) शास्त्राचे (**समधिदव्वं**) अध्ययन करावे.

जिनागमाने प्रत्यक्षादी प्रमाणांद्वारे वस्तूस्वरूपाला यथार्थ जाणणे हा मोहक्षयाचा उपाय आहे.

मोहक्षयाचा प्राथमिक उपाय शास्त्राभ्यास –

आपले कल्याण करण्यासाठी ज्या जीवांनी धर्ममार्गामध्ये नुकताच पाय ठेवला आहे अर्थात् प्रवेश केला आहे त्यांना सर्वप्रथम शास्त्राचा अभ्यास करणे प्रयोजनभूत आहे. कारण शास्त्र वाचल्याशिवाय अरिहंत कोण आहेत ? सिद्ध कोण आहेत ? साधूंचे स्वरूप काय आहे ? मी कोण आहे ? पर काय आहे ? या सर्वांसंबंधी अज्ञानच आहे. अनादिकाळापासून हा जीव वस्तूस्वरूपाचे अज्ञान असल्यामुळे आंधळाच आहे. सर्वज्ञप्रणीत आगम हाच खरा डोळा आहे. या आगमचक्षूने जो पाहतो त्याला सर्व जसे आहे तसे दिसते. ज्याप्रमाणे लौकिकामध्ये आपल्याला एखादी कला किंवा विद्या प्राप्त करायची असेल तर प्रथम आपण त्या विषयासंबंधी पुस्तके वाचतो. पुस्तके वाचल्यामुळे त्या विषयाचे अज्ञान दूर होऊन खरे ज्ञान होते. नंतर प्रायोगिक पद्धतीने त्याचा अभ्यास करतो. त्याप्रमाणे सम्यग्ज्ञान रूपी कला, स्वपरभेदविज्ञानरूपी कला प्राप्त करायची असेल तर प्रथम खऱ्या शास्त्रांचे वाचन करावे लागेल.

सर्वज्ञ भगवान पूर्ण वीतरागी व पूर्ण ज्ञानी असल्यामुळे त्यांनी दिव्यध्वनीद्वारे सांगितलेला उपदेशच खरा आगम आहे. त्यांचा उपदेशच पदार्थाचे खरे स्वरूप सांगणारा आहे. तोच उपदेश गणधरादी महाबुद्धिशाली आचार्य आपल्या धारणेत ठेवतात व नंतर १२ अंगांमध्ये श्रुताची रचना करतात. त्याच्याद्वारेच अन्य ऋषिगण जाणतात. त्यांच्याच परम्परेने आलेला तो यथार्थ उपदेश कुन्दकुन्द, उमास्वामी, समन्तभद्र, पूज्यपाद, अकलंक आदी आचार्यांनी रचित ग्रन्थांमध्ये अद्यापि विराजमान आहे. म्हणून मुमुक्षू जीवांनी या ग्रंथांचा जरूर अभ्यास करावा. जिनवाणी चार अनुयोगांमध्ये विभागलेली आहे त्या चारही अनुयोगांचा अभ्यास केल्याने जीवाचा सर्वांगीण विकास होतो. जितके अधिक शास्त्रज्ञान होते तितके अधिक स्पष्ट ज्ञान होते. जेवढे अधिक स्पष्ट ज्ञान होते तेवढे निर्मल मन होते. प्रथमानुयोगामध्ये पूज्य पुरुषांचे जीवनचरित्र आपल्याला उदाहरणरूपाने कर्माच्या विचित्र उदयांना व

संसार तसेच मोक्षमार्गाला दाखविते. करणानुयोगमय दीपक जीवांच्या विचित्र परिणामांच्याद्वारे होणाऱ्या कर्मरचनेला व लोकाच्या स्वरूपाला प्रकाशित करतो. चरणानुयोगामध्ये मुनी व श्रावकांच्या चारित्राचे भेद सांगून व्यवहार चारित्रावर आरूढ केले जाते. द्रव्यानुयोगरूपी दीपक सहा द्रव्यांचे स्वरूप दाखवून आत्मद्रव्याच्या मनन, चिंतन व ध्यानाचा उपाय सांगून निश्चयरत्नत्रयाचा मार्ग प्रकट करतो.

या चारही अनुयोगांचे शेकडो, हजारो ग्रन्थ ग्रन्थालयांमध्ये उपलब्ध आहेत, त्याचा सदैव अभ्यास करावा. या पंचम काळामध्ये तरी याचे अवलम्बन प्रत्येक मोक्षार्थी जीवाला आवश्यक आहे. कारण आज यथार्थ उपदेशकाचा संबंध होणे दुर्लभ झाले आहे. म्हणून **ग्रंथ हेच आपले खरे गुरु आहेत.** जिनवाणीचा अभ्यास करीत राहिल्याने मूर्ख मनुष्यसुद्धा ज्ञानी होतो.

आत्महिताकरिता अभ्यास परम उपयोगी आहे. पंडित टोडरमलजींनी शास्त्राभ्यासाचे तात्काल दहा फायदे सांगितले आहेत. १) क्रोधादी कषायांची मंदता होते. २) पाच इंद्रियांची विषयामध्ये प्रवृत्ती थांबते ३) अतिचंचल मन एकाग्र होते. ५) हिंसादी पाच पापांमध्ये प्रवृत्ती होत नाही. ५) थोड्याशा ज्ञानाने तीन लोक व तीन काळांतील सर्व पदार्थांचे ज्ञान होते. ६) हेय व उपादेयाची ओळख होते. ७) ज्ञान आत्मसन्मुख होते. ८) अधिक ज्ञान झाल्यामुळे अधिक आनंद मिळतो. ९) लोकामध्ये यश होते. १०) सातिशय पुण्याचा बंध होतो.

शास्त्राभ्यासामुळे परंपरेने आत्मानुभव दशा प्राप्त होऊन मोक्षरूप फलाची प्राप्ती होते.

जिनवाणीच्या अभ्यासाशिवाय जीवादी पदार्थांचे यथार्थ ज्ञान होत नाही, यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय मनन होत नाही, मननाशिवाय दृढ संस्कार होत नाहीत, दृढ संस्काराशिवाय स्वात्मानुभव होत नाही, स्वात्मानुभवाशिवाय सम्यक्त्व होऊ शकत नाही. सम्यक्त्वाशिवाय मोक्ष होऊ शकत नाही म्हणून मुमुक्षू जीवांनी सर्वप्रथम शास्त्राभ्यास करावा.

शास्त्राभ्यासाने विशिष्ट संवेदन संपदेचा लाभ–

जीवाची खरी संपत्ती संवेदन शक्तीची व्यक्तीच आहे; अन्य सम्पदा

परलक्ष्यी असल्यामुळे आकुलतारूपी विपदेचे कारण आहे. म्हणून ती खरी संपदा नसून विपदाच आहे. मोहामुळे हा जीव विपदेला सुद्धा संपदा मानून बसतो. अज्ञानीला खरी संपदा माहीत नाही. संवेदन म्हणजे ज्ञान. सर्व धनामध्ये ज्ञान सर्वश्रेष्ठ धन आहे. ज्याला धन मिळवायचे आहे किंवा धनाची वृद्धी करायची आहे तो आळशाप्रमाणे रिकामा बसून राहत नाही. सतत उद्योग करीत राहतो. कोणत्या मार्गाने धन मिळेल याचाच विचार करतो व विचार करूनही गप्प बसत नाही तर व्यापारादी कार्य करून प्रयत्नाने धन कमावतो त्याप्रमाणे ज्याला ज्ञानधन मिळवायचे आहे किंवा ज्ञानधनाची वृद्धी करायची आहे त्याला प्रमादामध्ये वेळ घालवणे योग्य नाही. कोणत्या मार्गाने ज्ञानधन मिळेल याचा विचार करून प्रयत्न करणे आवश्यक आहे. ज्ञानधन मिळविण्याचा उपाय शास्त्राभ्यास रूपी व्यापार आहे. जेवढा जास्त व्यापार करू तेवढे जास्त धन मिळते. त्याप्रमाणे जेवढा शास्त्राभ्यासाचा व्यापार अधिक करू तेवढे ज्ञानधन वाढत जाते. पुढे गाथा २३२ मध्ये आचार्यांनी स्वयं म्हटले आहे 'आगमचेट्ठा तदो जेट्ठा' आगमामध्ये चेष्टा(व्यापार) ज्येष्ठ उत्कृष्ट व्यापार आहे. ज्या जीवांना स्वसंवेदन संपदेचा विकास झाला आहे त्यांना प्रत्यक्ष अनुभवादी द्वारे पदार्थाचे यथार्थ ज्ञान होते. प्रत्यक्ष ज्ञान सहृदय जीवांना आनंद देणारे असते.

केवळ शास्त्रज्ञानाने मोहाचा क्षय होत नाही. शास्त्राच्या द्वारे ज्या पदार्थांचे ज्ञान झाले त्या पदार्थांना तर्क-अनुमान व प्रत्यक्षज्ञानाने जाणणे आवश्यक आहे. जी कला पुस्तकातून शिकतो त्याचे प्रात्यक्षिक केले तर खरा आनंद मिळत जातो व ती कला आत्मसात् करून पारंगत झालो तर अधिकाधिक आनंद मिळत जातो. त्याप्रमाणे जे पदार्थांचे स्वरूप शास्त्रात वाचले ते जर युक्तीने आपल्या बुद्धीमध्ये ग्रहण केले व त्याचा प्रत्यक्ष अनुभव केला तर खरा आनंद चाखायला मिळतो.

शास्त्राभ्यास हा मोहनाशाचा उपाय सांगितला आहे म्हणून केवळ आम्ही शास्त्राभ्यासाचा संग्रह करीत राहतो, शास्त्रीय ज्ञानाचे ओझे वाढवित राहतो. प्रत्येक ठिकाणी जीव प्रयोजन न समजल्यामुळे चूक करतो. कित्येक वर्षापासून स्वाध्याय करूनही मोहाचा नाश का होत नाही ? याचे संशोधन

करणे आवश्यक आहे. शास्त्र वाचून पंडिताई मिळविली व लोकांना तत्त्वज्ञानाचा कोरडा उपदेश देऊन संतुष्ट झालो. त्या ज्ञानदीपकाच्या प्रकाशाने स्वतःच्या जीवनातील अज्ञान अंधःकार दूर केला नाही. म्हणून म्हटले आहे 'दिया तले अंधेरा' शाब्दिक ज्ञानामध्ये तृप्त होऊन स्वतःला धन्य मानले, विशारद, शास्त्री, आचार्य पदव्या घेऊन आम्ही मानकषाय पुष्ट केला पण युक्तीने व तर्काने तत्त्वाचा निर्णय करून स्वसंवेदन ज्ञानाचा पुरुषार्थ केला नाही. म्हणून आचार्य येथे सांगतात की प्रत्यक्षादी प्रमाणाने वस्तूला जाणणाऱ्याच्या मोहाचा नाश होतो.

शास्त्रज्ञान हा प्राथमिक उपाय आहे. या उपायाने तत्त्वाविषयी माहिती मिळते. नंतर त्याला तर्क व अनुमान प्रमाणाने कसोटीवर घासून आपल्या बुद्धिमध्ये सत्यतेचा निर्णय करणे आवश्यक आहे व ज्या गोष्टींचा आपण प्रत्यक्षाने अनुभव करू शकतो त्यांचा अनुभव करणे आवश्यक आहे. **स्वानुभव हाच खरा मोह नाशाचा उपाय आहे.**

ज्याप्रमाणे आगमामध्ये वाचले किंवा गुरुंच्याकडून ऐकले की, 'एक शाश्वत आत्मा माझा आहे. तो आत्मा ज्ञान, दर्शन लक्षणवाला आहे, स्पर्श, रस, गंध, वर्णरहित अमूर्तिक आहे इत्यादी. त्यानंतर तर्क व अनुमानाने जाणावे 'माझा आत्मा आहे. कारण स्वसंवेदनप्रत्यक्ष आहे. ज्याप्रमाणे सुखादिकांचा अनुभव होतो तसा आत्म्याचा अनुभव होतो.' नंतर स्वानुभव प्रत्यक्षाने आत्म्याचा अनुभव झाला की मोहाचा क्षय होतोच. मोह हा विपरीताभिनिवेशाचा संस्कार करतो त्याच्या विरूद्ध स्वानुभव विपरीत अभिप्रायाचा अभाव करून सम्यग्दर्शन प्राप्त करून देतो.

अमृतचन्द्र आचार्यांनी टीकेच्या शेवटच्या ओळीमध्ये शास्त्राभ्यास कसा करावा हे सांगितले आहे 'मोहाचा क्षय करण्यामध्ये शब्दब्रह्माची उत्कृष्ट उपासना करणे अर्थात् भावज्ञानाच्या अवलंबनाने दृढ केलेल्या परिणामाने सम्यक् प्रकारे अभ्यास करणे हा उपायान्तर आहे.' भावज्ञान दृढ होईल अशा पद्धतीने शास्त्राचा अभ्यास केल्यास मोहाचा नाश होतो.

शास्त्रामध्ये जे जे शब्द वाचतो किंवा ऐकतो त्या शब्दाची वाच्यभूत वस्तू काय आहे हे जाणून त्या वाच्यभूत वस्तूला प्रत्यक्ष जाणले किंवा ज्याला

प्रत्यक्ष जाणणे शक्य नाही त्याला अनुमानाने जाणले तर ते भावज्ञान होय. ज्याप्रमाणे आंबा शब्द ऐकला किंवा वाचला तर आंबा नावाचे फळ आपल्या ज्ञानात येते त्याप्रमाणे आत्मा, जीव इत्यादी शब्द ऐकल्यावर आत्मा नावाचा पदार्थ आमच्या ज्ञानात आला तर ते भावज्ञान आहे. प्रत्येक शब्दाची भावभासना करीत शास्त्राचे अध्ययन केले तर मोहाचा नाश नक्की होतो. म्हणून भावभासना सहित शास्त्राध्ययन करावे.

मागील गाथेत मोहाचा नाश करण्यासाठी जिनेंद्र प्रणीत आगमाचा अभ्यास करण्याची प्रेरणा केली. कारण आगमाभ्यासाशिवाय वस्तूचे यथार्थ स्वरूप समजत नाही. यावरून ज्या जिज्ञासू शिष्याला आगमातील वस्तूस्वरूप जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. त्याला थोडक्यात आगमामध्ये कशाप्रकारे पदार्थाची व्यवस्था आहे ते दाखवितात. ज्याप्रमाणे कंपनीच्या मालाचा प्रचार करण्यासाठी प्रचारक आपल्याकडे येतात. कंपनीच्या मालाची ओळख व अनेक तऱ्हेने त्याची उत्कृष्टता समजावून देतात व वापर केल्यानंतर ग्राहक पुन्हा माल खरेदी करतील या आशेने नमुना म्हणून काही माल ही वापरण्यासाठी देऊन जातात.

त्याचप्रमाणे येथे कुन्दकुन्द आचार्यरूपी प्रचारक सर्वज्ञ भगवंतांच्या कंपनीच्या मालाचा नमूना आपल्यासमोर प्रस्तुत करत आहेत. कारण त्यांना खात्री आहे की पाठक या पदार्थव्यवस्थेच्या नमून्याचे सेवन करून पुन्हपुन्हा आगमातील उत्कृष्ट मालाची खरेदी करतील.–

दव्वाणि गुणा तेसिं पज्जाया अट्ठसण्णया भणिया ।
तेसु गुणपज्जयाणं अप्पा दव्वत्ति उवदेसो ।।८७।।

अन्वयार्थ – (**दव्वाणि**) द्रव्य (**गुणा**) गुण (**तेसिं पज्जाया**) आणि त्यांचे पर्याय (**अट्ठसण्णया**) 'अर्थ' या नावाने (**भणिया**) सांगितले आहेत. (**तेसु**) त्यांच्यामध्ये (**गुणपज्जयाणं**) गुण व पर्यायांचा (**अप्पा**) आत्मा (**दव्वत्ति**) द्रव्य आहे असा (**उवदेसो**) जिनागमामध्ये उपदेश आहे.

अर्थ शब्दाने द्रव्य, गुण, पर्याय तीन्हींचे ग्रहण होते कारण तिघांची अर्थ संज्ञा आहे. या तिन्हींमध्ये गुणपर्यायांचा आत्मा अर्थात सर्वस्व द्रव्य आहे.

अर्थशब्दाचे अर्थ –

द्रव्य गुण पर्याय या प्रत्येकांचे लक्षण भिन्न आहे. वाच्यभिन्न आहे तरीही जसा या तिघांमध्ये प्रदेश भेद नाही तसाच या तिघांच्या नावामध्येसुद्धा भेद नाही. तिघांचे नाव एकच आहे. ते नाव म्हणजे 'अर्थ' होय. ज्याप्रमाणे एक सत् भिन्न दृष्टीने पाहिले असता द्रव्य, गुण, पर्याय या तीन रूपाने प्रतीतीला येते तसे शब्दाच्या व्युत्पत्तिभेदाने अर्थाचे द्रव्य, गुण व पर्याय असे तीन अर्थ होतात. संस्कृतामध्ये तृतीय गणाते 'ऋ' धातू आहे. त्याचा अर्थ अर्यते निश्चीयते इति अर्थ असा आहे.

या निरुक्तिनुसार द्रव्य, गुण व पर्याय जाणले जातात म्हणून त्या तिघांनाही अर्थ म्हणतात. ऋ धातूचा दुसरा अर्थ प्राप्त करणे व आश्रय करणे असा आहे. त्याची कर्तरि प्रयोगामध्ये वर्तमानकाळ तृतीय पुरुषाच्या तीन वचनांमध्ये इयर्ति, इग्रतां, इग्रति अशी रूपे होतात व कर्मणि प्रयोगामध्ये अर्यते, अर्येते, अर्यन्ते अशी तीन रूपे होतात. वेगवेगळ्या रूपांना ग्रहण करून पुढे तिन्हींचे व्युत्पत्यर्थ सांगतात.

द्रव्याची अर्थसंज्ञा –

यानि गुणपर्यायान् इग्रति, अथवा गुणपर्यायैः अर्यन्ते तानि इति अर्था द्रव्याणि । जे गुणपर्यायांना प्राप्त करतात अथवा गुण व पर्यायांकडून प्राप्त केले जातात ते अर्थ म्हणजे द्रव्य होय. द्रव्य अनादि अनंत अखंड सत् आहे. ते प्रत्येक समयाला परिणमन करते. परिणमन करीत असता ते अन्य द्रव्यरूप किंवा अन्य द्रव्याच्या गुणरूप किंवा पर्यायरूप परिणमन करीत नाही तर आपापल्या गुण व पर्यायरूपाने परिणमते. आपल्या गुण पर्यायांना प्राप्त करणे हा द्रव्याचा नित्याचा कार्यक्रम आहे.

ज्याप्रमाणे सोने आपल्या पीततादी गुणांना व कुण्डलादी पर्यायांना सदैव प्राप्त होते. म्हणून त्यामध्ये पिवळेपणा, जडपणा, स्निग्धपणा कायम टिकून आहे व त्याची कोणती ना कोणती तरी अवस्था होत राहते. जर सुवर्ण पिवळेपणा इत्यादी गुणांना नित्य प्राप्त झाले नसते तर त्यातील गुण नष्ट झाले असते. द्रव्य गुणरहित झाले असते. जीवद्रव्य सदैव आपल्या ज्ञान, दर्शन, सुख, वीर्यादि विशेषगुणांना व अस्तित्व वस्तुत्वादी सामान्य गुणांना प्राप्त होते

अर्थात् धारण करते व त्याच्या मनुष्य, देव इत्यादी कोणत्या ना कोणत्या तरी पर्यायाला प्राप्त होते. द्रव्य रिकामे नाही. त्याला आपल्या गुणपर्यायांना धारण करण्याचे, त्यांना आश्रय देण्याचे काम निरंतर चालू आहे म्हणून द्रव्य टिकून आहे. ज्याप्रमाणे साखरेमध्ये निरंतर गोडरूपाने राहण्याचे काम चालू आहे. द्रव्य गुणपर्यायांना प्राप्त होते व गुणपर्यायाकडून ही अन्य काही प्राप्त केले जात नाही तर स्वद्रव्यच प्राप्त केले जाते. जीव शरीराच्या स्पर्शरस गंध वर्ण गुणांना धारण करीत नाही व शरीराच्या जाड-बारीक, ऊंच-बुटका, बालक-तरूण इत्यादी अवस्थांना ही धारण करू शकत नाही.

शरीर जीवाच्या ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य गुणांना प्राप्त होत नाही अथवा धारण करीत नाही किंवा जीवाच्या, बहिरात्म, अन्तरात्मादी अवस्थांना प्राप्त होत नाही. प्रत्येक द्रव्य आपापल्या गुण पर्यायांना धारण करीत असल्यामुळे त्यांच्यामध्ये संकर (मिश्रण) दोष येत नाही. एक अखण्ड सत्द्रव्य गुणपर्यायांद्वारे जाणले जाते, गुणपर्यायांद्वारे आश्रित आहे, प्राप्त आहे, म्हणून द्रव्याला अर्थ म्हणतात.

गुणाची अर्थसंज्ञा –

ये द्रव्याणि आश्रयत्वेन इय्रति अथवा आश्रयभूतैः द्रव्यैः अर्यन्ते ते अर्थाः गुणाः । जे द्रव्यांना आश्रयरूपाने प्राप्त करतात अथवा आश्रयभूत द्रव्याद्वारे प्राप्त केले जातात ते अर्थ अर्थात गुण होत. गुण म्हणजे द्रव्याच्या विशेषता, विशेषता विशेष्याच्या आधाराने राहतात म्हणून गुण नेहमी द्रव्याचा आश्रय घेतात. द्रव्य विशेष्य आहे व गुण विशेषण आहेत. विशेषण विशेष्याला आश्रय करून राहतात. गुण निरन्तर द्रव्याचा आधार घेतात. बिना आश्रय गुण राहू शकत नाहीत. ज्याप्रमाणे पिवळेपणा, स्निग्धपणा, जडपणा इत्यादी गुण सुवर्णाचा आश्रय घेऊन राहतात व आश्रयभूत सुवर्णाद्वारे पिवळेपणा इत्यादी गुण प्राप्त केले जातात म्हणून पिवळेपणा इत्यादिक गुणांना अर्थ ही संज्ञा आहे.

त्याचप्रमाणे प्रत्येक गुण आपापल्या द्रव्याचा आश्रय घेतात. प्रत्येक गुण आपल्या आधारभूत द्रव्याशी एकनिष्ठ असते. गुण आपल्या मूल आधारभूत द्रव्याचा आश्रय सोडून दुसऱ्या द्रव्याचा आश्रय कधीही घेत नाहीत. ते सदैव स्वद्रव्यामध्येच राहतात. ज्ञान, दर्शन, सुख इत्यादी विशेष

गुण, अस्तित्व, वस्तुत्व इत्यादी सामान्य गुण स्वजीवाला सोडून अन्य द्रव्याचा आश्रय घेत नाहीत. वस्तूस्वरूप असे आहे तर हे जाणून निश्चिन्तता, निर्भयता आली पाहिजे. ज्ञानी हे वस्तूस्वरूप जाणतो म्हणून तो निर्भय, निशंक व निश्चिन्त असतो. मी अनंत गुणांचा आश्रयभूत द्रव्य आहे व माझे हे गुण मला सोडून अन्य द्रव्यामध्ये जात नाहीत तर मला कसली चिन्ता, कसले भय ? 'निशंकः सततं स्वयं स सहजं ज्ञानं सदा विन्दति' ज्ञानी निशंक होऊन सतत सहज ज्ञानाचे वेदन करतो.

पर्यायाची अर्थसंज्ञा –

'ये द्रव्याणि क्रमपरिणामेन इग्रति अथवा द्रव्यैः क्रमपरिणामेन अर्यन्ते ते अर्थाः पर्यायाः ।' जे द्रव्यांना क्रमपरिणामाने प्राप्त करतात अथवा द्रव्यांद्वारे क्रमपरिणामाने प्राप्त केले जातात. पर्याय म्हणजे द्रव्याची अवस्था. सर्व अवस्था एकावेळी होत नाहीत. एकावेळी एक अवस्था होते. द्रव्य क्रमाक्रमाने एक-एक अवस्थेला प्राप्त करते. ज्याप्रमाणे रिंगा, अंगठी, बांगड्या इत्यादी अवस्था सुवर्णाला क्रमाक्रमाने प्राप्त करतात व सुवर्ण क्रमाक्रमाने रिंगा, आंगठी इत्यादी पर्यायांना धारण करते. ज्याप्रमाणे गुण सहभू असतात. सर्वगुण एकावेळी द्रव्याचा आश्रय घेतात. तसे सर्व पर्याय एकावेळी द्रव्याचा आश्रय घेऊ शकत नाहीत. सोन्यामध्ये एकावेळी एकच दागिना होतो. क्रमाक्रमाने सर्व दागिन्यांना सोने धारण करू शकते, एकावेळी नाही. परंतु प्रत्येक पर्याय आपल्याच द्रव्याला प्राप्त करते व प्रत्येक द्रव्य आपल्याच पर्यायाला आश्रय देते. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायाला आपल्यामध्ये थारा देत नाही.

चेतन जीवद्रव्य चेतन पर्यायाला सोडून आपल्यामध्ये अचेतन पर्यायाला जागा देऊ शकत नाही. जीवाची पर्याय जीवामध्ये व शरीराची पर्याय शरीरामध्येच आहे. जीवद्रव्य क्रमाने आपापल्या पर्यायरूपाने परिणमते व पुद्गलमय शरीर आपल्या पर्यायरूपाने परिणमते. एक द्रव्याची अवस्था दुसऱ्या द्रव्याची मानणे हा भ्रम आहे. रोगी, निरोगी, बालक, तरूण, वृद्ध अवस्थेला शरीर प्राप्त होते मी नाही. त्यामुळे शरीराची कोणतीही अवस्था झाली तर मला चिन्ता करण्याचे कारण नाही. कारण या अवस्था माझ्यामध्ये

नाहीत. मी सदैव ज्ञानरूपच आहे.

गुणपर्यायांचे सर्वस्व द्रव्य –

द्रव्य, गुण व पर्यायाचे वर सांगितलेले स्वरूप जाणल्यामुळे हे लक्षात येते की द्रव्य म्हणजे गुणपर्यायांचा आत्मा आहे. 'गुणपर्ययवद् द्रव्यम्' असे तत्त्वार्थसूत्रामध्ये सांगितले आहे. द्रव्य दुसरे तिसरे काही नसून गुणपर्यायांचा समूह आहे. गुण पर्यायाला बाजूला केल्यानंतर द्रव्य काही शिल्लक राहत नाही, ते मृतवत आहे. गुणपर्यायच द्रव्याचा आत्मा आहे व गुणपर्यायांचा आत्मा द्रव्य आहे. द्रव्याला सोडून गुण पर्याय नाहीत व गुणपर्यायांना सोडून द्रव्य नाही. प्रत्येक द्रव्य आपल्या गुणपर्यायांशी तन्मय आहे, अन्य द्रव्याच्या गुणपर्यायांशी तन्मय नाही. म्हणून मला अन्य द्रव्याच्या गुणपर्यायांशी काही देणे घेणे नाही. ज्याचे गुण त्याला लखलाभ, ज्याची पर्याय त्याला लखलाभ, मला काय करायचे ? दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायाचा विचार करूनच हा जीव आकुल व्याकुल होऊन दुःखी होतो.

आता हे समजले माझ्या गुणपर्यायाचे सर्वस्व मी स्वंय आहे व माझे गुणपर्याय माझे सर्वस्व आहे. हे जाणून यामध्ये स्थिर होण्यातच खरी शांती आहे आणि असे वस्तूस्वरूप जाणणे हाच मोहक्षयाचा उपाय आहे. जो अशाप्रकारे जिनेंद्रदेवांनी सांगितलेल्या वस्तूस्वरूपाला जाणतो त्याचा मोह नष्ट झाल्याशिवाय राहत नाही. वस्तूचे यथार्थस्वरूप जिनागमामध्ये सांगितले आहे म्हणून जिनागमाचे सम्यक् अध्ययन करणे प्रत्येक सुखार्थी जीवाचे कर्तव्य आहे. 'वाचाल तर वाचाल' या म्हणीनुसार आपण जर जिनशास्त्र वाचले तर आपण खरे जीवन जगू. आयुष्यात शांती समाधान व आनंद प्राप्त करून यशस्वी होऊ शकू. दुःखातून सुटण्याचा मार्ग जिनशास्त्राच्या अभ्यासाने प्राप्त होतो. म्हणून दररोज थोडा वेळ का होईना दुःखमोक्षार्थींनी शास्त्राचा अभ्यास करावा.

सर्वद्रव्यांना स्वतंत्र स्वतंत्र सत् जाणून सर्व अन्यद्रव्यांपासून भिन्न आत्मतत्त्वाची भावना करावी.

पूर्वी मोहक्षयाचे दोन उपाय सांगितले प्रथम उपाय अरिहन्ताना द्रव्यत्व गुणत्व व पर्यायत्वाद्वारे जाणून आपल्या आत्म्याला जाणणे व दुसरा उपाय

जिनशास्त्राचा अभ्यास करून पदार्थांना प्रत्यक्षादि प्रमाणांद्वारे जाणणे. आता हे सांगतात कि मोहक्षयाला कारणीभूत जिनेश्वरांचा उपदेश प्राप्त झाला तरी पुरुषार्थ अर्थक्रियाकारी आहे. ज्याप्रमाणे एखाद्या गरीब मनुष्याला उपजीविकेचे साधन नव्हते. त्याला एका दयाळू माणसाने पार्ट बनविण्याचे मशीन घेऊन दिले. या मशीनवर माल उत्पन्न करून तू तुझी गरीबी नष्ट कर व धनाची प्राप्ती करून घे. एवढे तर त्या दयाळू माणसाचे काम आहे. परंतु पुढचे काम याच्या पुरुषार्थाचे आहे. हा गरीब मनुष्य प्रयत्नपूर्वक त्या मशीनचा उपयोग करून माल उत्पादनाचे काम करेल तर याची गरीबी नष्ट होईल व धनलाभ होईल. जर त्यांनी पुरुषार्थ न करता नुसत्या त्या मशीनची पूजा करून ठेवली व दररोज त्या मशीनला वरून धुऊन पुसून ठेवले व उदबत्ती लावून पूजा केली तर त्याची गरीबी दूर होईल का ? नाही, तर त्याला स्वतः कष्ट करावे लागतील व मेहनत करून त्या साधनाचा जेवढा उपयोग करेल तेवढी त्याला धनसंपत्ती प्राप्त होईल म्हणून पुरुषार्थ कार्यकारी आहे.

रोगी माणूस रोग दूर करण्याकरिता वैद्याजवळ गेला. वैद्यांनी त्याला तपासून रोगाचे निदान करून औषधाची पुडी बांधून दिली. रोग्याने घरी जाऊन त्याला कपाटामध्ये व्यवस्थित सजवून ठेवून दिली तर त्याचा रोग दूर होईल का ? कदापि नाही. रोग बरा होण्यासाठी त्या औषधाचे सेवन करण्याचा पुरुषार्थ करावा लागेल तर त्याचा रोग दूर होईल. त्याप्रमाणे मोहशत्रूचा नाश करण्यासाठी जिनेंद्र देवांनी उपाय सांगितला. त्यांच्या उपदेशाची प्राप्ती झाली. परंतु त्यानुसार आम्ही पुरुषार्थ केला नाही तर आमचा मोहशत्रू नष्ट होऊन सुखाची प्राप्ती होईल का ? नाही म्हणून आचार्य आपल्याला येथे पुरुषार्थ करण्याची प्रेरणा करतात.-

जो मोहरागदोसे णिहणदि उवलब्भ जोण्हमुवदेसं ।
सो सव्वदुक्खमोक्खं पावदि अचिरेण कालेण ।।८८।।

अन्वयार्थ -(**जो**) जो जीव (**जोण्हमुवदेसं**) जिनेन्द्र भगवंतांचा उपदेश (**उवलब्भ**) प्राप्त करून (**मोहरागदोसे**) मोहरागद्वेषांचा (**णिहणदि**) घात करतो (**सो**) तो (**अचिरेण कालेण**) अल्प कालामध्ये (**सव्वदुक्खमोक्खं**) सर्व दुःखातून सुटकारा (**पावदि**) प्राप्त करतो.

जो जिनेंद्रांचा उपदेश प्राप्त करून मोहरागद्वेषाचा नाश करतो तो लवकरच मोक्ष प्राप्त करतो.

जिनोपदेशाची दुलर्भता –

हा जीव या संसारमार्गामध्ये अनादिकाळापासून प्रवास करीत आला आहे. संसाराचा मार्ग छोटा नाही, खूप लांब आहे. म्हणून संसाराला जंगलाची व सागराची उपमा दिली जाते. समुद्र इतका विशाल असतो त्याच्या मध्यभागी गेल्यानंतर किनाऱ्याला येणे फार कठीण आहे. म्हणून संसार खार अपार पारावार असे दौलतरामजी म्हणतात. जंगलात एकदा मनुष्य शिरला की तेथून बाहेर पडण्याचा मार्ग लवकर सापडत नाही. काहीवेळा तेथेच मरण प्राप्त होते. त्याप्रमाणे या संसाराचा मार्ग इतका विकट आहे की यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडणे महादुर्लभ आहे. जंगलात सापडलेल्या जीवाला त्या जंगलातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविणारा वाटाड्या सापडणे महादुर्लभ आहे. कारण ते स्थान निर्जन असते. कर्मधर्मसंयोगाने कोणी मार्ग दाखविणारा पथिक मिळाला तर त्या जंगलात वाट चुकलेल्या जीवाला किती हायसे वाटते, त्याला किती आनंद होतो त्याला असा विश्वास वाटतो की मी या जंगलातून आता बाहेर पडणार.

त्याप्रमाणे संसाररूपी जंगलामध्ये वाट चुकलेल्या या जीवाला मोक्षमार्गाचा उपदेश करणारा गुरू मिळाल्यानंतर असा विश्वास वाटतो की मला या संसारदुःखातून सुटण्याचा मार्ग मिळाला. त्याला परमानंद होतो. त्याप्रमाणे या संसाररूपी जंगलामध्ये वाट चुकलेल्या जीवाला यथार्थ मोक्षमार्गाचा उपदेश करणारा गुरु भेटणे अत्यंत दुर्लभ आहे. कारण अनादिकाळापासून हा जीव अनंत काळ निगोदात राहिला तेथे एक स्पर्शनेन्द्रियच होते. तेसुद्धा झोपलेल्या किंवा बेशुद्ध माणसाप्रमाणे अव्यक्त. तेथे सारखे जन्ममरणाचेच दुःख भोगले. एखाद्या अत्यंत कोमल सुकुमार बालकाला साखळदंडांनी बांधून घातले व त्याचे तोंड, नाक, डोळे, कान बंद करून आणि अनेक प्रकारचा त्रास दिला तर तेथे जेवढ्या दुःखाची आपण कल्पना करतो त्यापेक्षाही अनंतपट दुःख निगोदवासामध्ये आहे. तेथे जिनेंद्र उपदेशाचे श्रवण असंभवच आहे. तेथून कर्माच्या मंद उदयामुळे बाहेर पडून

पृथ्वी, पाणी, अग्नी, वायुकायिक झाला, पण ती सुद्धा एकेन्द्रियच अवस्था. तेथून दुर्लभ त्रस पर्याय धारण केला; परंतु तेथेही विकलत्रय व असंज्ञी पंचेन्द्रिय झाला. त्यामुळे उपदेश ग्रहण करू शकला नाही.

कर्माच्या विशेष क्षयोपशमाने संज्ञी पंचेन्द्रिय झाला पण क्रूर सिंहादिक पशु होऊन घोर पाप करून नरकामध्ये जाऊन पडला. तेथे जिनेन्द्रांचा उपदेश मिळणे अत्यंत कठीण. तिसऱ्या नरकाच्या पुढे तर उपदेश मिळतच नाही. तिसऱ्या नरकापर्यंतसुद्धा पूर्व भवातील कोणी मित्र, देव पर्यायात असेल आणि त्याला आठवण झाली व करुणा उत्पन्न झाली तर नरकात जाऊन उपदेश करतो. महा भाग्योदयाने आपल्याला मनुष्य पर्याय प्राप्त झाला आहे. परंतु त्या मनुष्य क्षेत्रामध्ये सुद्धा अत्यंत अल्प ठराविक क्षेत्रातच उपदेश प्राप्त होतो.

भरत, ऐरावत व विदेह क्षेत्रातील आर्यखण्डामध्येच, ते सुद्धा विशिष्ट क्षेत्रातच नग्न दिगम्बर गुरू असतात. चारणऋद्धिधारी मुनी विहार करून गेले तर भोगभूमीमध्ये सुद्धा उपदेश प्राप्त होतो. परंतु क्वचित् कदाचित्च. त्यामध्येही उपदेश देणारे खरे गुरु मिळणेसुद्धा महादुर्लभ आहे. अशा दुर्लभ परंपरेने जिनेन्द्र भगवंतांचा उपदेश प्राप्त झाला आहे म्हणून आचार्य म्हणतात 'कथमपि' अर्थात कसेतरी करून अर्थात महाभाग्याने जिनेश्वरांच्या उपदेशाचा लाभ झाला आहे.

जिनोपदेशाची सफलता व सार्थकता –

दुर्लभातिदुर्लभ जिनेश्वरांचा उपदेश प्राप्त करूनसुद्धा जे जीव त्याचा उपयोग करून आपल्या मोहाचा त्याग करतात ते लवकरच सर्व दुःखातून मुक्त होतात. २ऱ्याप्रमाणे वीर योद्ध्याच्या हातात विद्यादायक गुरुंनी लढण्याची कला शिकवून धारदार तलवार दिली व समोर शत्रूंची सेना उभी आहे. जर त्या योद्ध्याने पुरुषार्थ करून ती धारदार तलवार शत्रूच्या मस्तकावर टाकली तर शत्रूचा नाश होऊन याला स्वतंत्रता प्राप्त होणार आहे. जर नुसताच हातात तलवार घेऊन बसला व शत्रूवर प्रहार केला नाही तर तलवार मिळूनही काय उपयोग ? त्याप्रमाणे तलवारीच्या धारेप्रमाणे अमोघ असा जिनेश्वरांचा उपदेश प्राप्त होऊन जर मोह राग द्वेषरूपी शत्रूवर त्याचा प्रहार केला तर या

मोहशत्रूचा नाश होऊन याला मुक्तता (स्वतंत्रता) प्राप्त होणार आहे. नाहीतर उपदेश मिळाला व तो जर फक्त कानावाटे अथवा तोंडावाटे बाहेर सोडला तर त्या उपदेशाचा काय उपयोग ? निरर्थक आहे. तो उपदेश हृदयंगम करून त्याद्वारे कार्यसिद्धी करणे लाभदायक आहे.

ज्याप्रमाणे तलवारीच्या धारेला सावधान अभ्यस्त पुरुषच स्पर्श करू शकतात त्याप्रमाणे जिनदेवांच्या उपदेशाला सावधान पुरुषच स्पर्श करू शकतात अर्थात् ग्रहण करू शकतात. ज्याप्रमाणे तलवारीच्या धारेवर चालणे कुशल व्यक्तींचे काम आहे त्याप्रमाणे जिनेंद्रांच्या उपदेशावर चालणे कुशल निकट भव्यजीवांचे काम आहे. ज्याप्रमाणे तीक्ष्ण तलवारीच्या धारेचा ज्यावर आघात होतो त्याचा नियमित विनाश होतो त्याप्रमाणे जिनेंद्रांच्या उपदेशाचा मोह राग द्वेषरूपी शत्रूवर आघात झाला तर मोहादिकांचा नियमाने नाश होतो. मोहादि शत्रू टिकाव धरून राहू शकत नाहीत.

आचार्य महाराज संबोधन करीत आहेत, हे आत्मन् ! मोह राग द्वेष भाव तुझे शत्रू आहेत. तुझ्याजवळच आहेत. तुझ्या अनंत गुणरूपी राज्यावर ते आपला अधिकार गाजवत आहेत. तुझी संपत्ती त्यांनी लुटली आहे. त्या शत्रूंना नाश करण्यास समर्थ भावज्ञानरूपी शस्त्र पण तुझ्याजवळ आहे. त्याचा वापर करून या शत्रूच्या पराधीनतेच्या दुःखातून मुक्त हो. ज्ञान साधन तुझ्यापासून भिन्न नाही. पराश्रयदृष्टी सोडून निज आत्म्याचे यथार्थ श्रद्धान व ज्ञान करून त्यामध्येच लीन हो. मोह शत्रूंचा नाश करण्यासाठी समर्थ निश्चय रत्नत्रयरूप स्वात्मानुभव आहे. याद्वारेच रागद्वेष मोहाचा नाश होऊ शकतो. या ज्ञानधारेशिवाय दुसऱ्या कुणामध्येही सामर्थ्य नाही. तू उठ, जागा हो आणि कामाला लाग. प्रमादामध्ये वेळ घालविण्यात काही अर्थ नाही. पुरुषार्थ कर. जर कोणी हा उपदेश समजून सुद्धा पुरुषार्थ करून स्वात्मानुभव करणार नाही तर तो कधीही दुःखातून मुक्त होऊ शकणार नाही. हीच गोष्ट कुन्दकुन्द आचार्यांनी अन्यत्र सांगितली आहे.

जो आदभावणमिणं णिच्चुवजुत्तो मुणी समाचरदि ।
सो सव्वदुक्खमोक्खं पावदि अचिरेण कालेण ।।

जो कोणी मुनी नित्य उद्यमवंत होऊन निज आत्म्याच्या भावनेचे

आचरण करतो तो शीघ्र सर्व दुःखातून मुक्त होतो. सर्व दुःखातून सुटण्यासाठी शास्त्राभ्यास करून भावभासनसहित वस्तूचे स्वरूप जाणून स्वभावदृष्टीच्या बलाने मोह राग द्वेषाचा क्षय करावा. उपयोग निज आत्म्यामध्ये स्थिर करून भेदज्ञानाद्वारे पराला वेगळे करून निज आत्म्याला ग्रहण करावे.

मागील गाथेमध्ये आचार्यांनी पुरुषार्थ करण्याची प्रेरणा केली. पुरुषार्थाची प्रेरणा प्राप्त करून जीव पुरुषार्थ करण्यास प्रारंभ करतो. परंतु यथार्थ पुरुषार्थ माहीत नसल्यामुळे बाह्य क्रिया मात्र पुरुषार्थ करतो. द्रव्यलिंगी मुनी किती मोठा पुरुषार्थ करताना दिसतो. सर्व परिग्रहाचा त्याग करून, विषयभोगांचा त्याग करून, एकवेळा आहार करतो. बाह्य उपवासादि तप सुद्धा करतो. परंतु तरीही मोहक्षय होत नाही. याचे कारण काय? पंडित टोडरमलजींनी मोक्षमार्गप्रकाशकच्या नवव्या अध्यायामध्ये पुरुषार्थानेच मोक्षसिद्धी होते हे सिद्ध केले आहे तेथे त्यांनी एक वाक्य लिहिले आहे, ते येथे उपयोगी आहे–

'अन्यथा पुरुषार्थ से फल चाहे तो कैसे सिद्धि हो ? तपश्चरणादि व्यवहार साधन में अनुरागी होकर प्रवर्ते उसका फल शास्त्र में तो शुभबन्ध कहा है और यह उससे मोक्ष चाहता है, कैसे होगा? यह तो भ्रम है' काम करण्यासाठी उद्युक्त केले; परंतु काय काम करायचे हे माहीत नसेल तर काय काम करणार ? म्हणून आचार्य येथे काय काम करायचे ते सांगतात. मोहाचा नाश करण्याची प्रेरणा दिली होती. त्या मोहाचा क्षय ज्या उपायाने होतो तो उपाय येथे सांगतात. यापूर्वी दोन उपाय सांगितले आहेत.१) अरिहंतांचे द्रव्य गुण पर्याय जाणून निज आत्म्याला जाणणे.२) जिनशास्त्राच्या द्वारे पदार्थांना जाणून प्रत्यक्षादिप्रमाणाने त्यांना जाणणे.

आता तिसरा उपाय सांगतात की 'स्वपर विवेकसिद्धीनेच मोहाचा नाश होतो म्हणून स्वपरविवेकासाठी प्रयत्न करा.' विवेक शब्द 'विच् वेगळे करणे' या धातूपासून बनला आहे. विवेक करणे म्हणजे दोघांना वेगळे करणे. या विश्वामध्ये वास्तविक दोनच वस्तू आहेत. एक स्व व एक पर. आपला आत्मा तेवढा स्व आहे, शेष सर्व पर आहे. वास्तविक पूर्वोक्त तीन उपाय वेगळे नाहीत. वस्तू पर्यंत पोहचण्याच्या या तीन पायऱ्या आहेत. सर्वप्रथम जिनशास्त्राचा अभ्यास केला असता पदार्थांचे यथार्थ स्वरूप समजते.

अरिहंतांचे स्वरूप ही आगम वाचल्याने कळते. अरिहंतांचे स्वरूप समजले तर आत्म्याचे स्वरूप समजते. आत्म्याचे स्वरूप समजले तर स्व काय? व पर काय? याचे भेदविज्ञान होते. ज्याला स्वपरभेदविज्ञान झाले, त्याच्या मोहाचा नाश होतो म्हणून आचार्य स्वपरभेदविज्ञानासाठी प्रयत्न करतात अर्थात् भेदविज्ञानाचा अभ्यास करतात.

णाणप्पगमप्पाणं परं च दव्वत्तणाहिसंबद्धं ।
जाणदि जदि णिच्छयदो जो सो मोहक्खयं कुणदि ।।८९।।

अन्वयार्थ – (**जो**) जो जीव (**णिच्छयदो**) निश्चयाने (**णाणप्पगमप्पाणं**) ज्ञानात्मक स्वतःला (**च**) व (**परं**) दुसऱ्याला (**दव्वत्तणाहिसंबद्धं**) आपापल्या द्रव्यत्वाने सहित (**जदि जाणदि**) जर जाणतो तर (**सो**) तो (**मोहक्खयं**) मोहाचा क्षय (**कुणदि**) करतो.

जे सम्यक् प्रकारे स्वपरभेदविज्ञान करतात ते संपूर्ण मोहाचा क्षय करतात.

मोहनाशाचा अमोघ उपाय : स्वपरविवेक –

अनादिकाळापासून हा जीव परामध्ये एकत्वाचा अभ्यास करून प्रवृत्ती करीत आहे. त्यामुळे मोहभाव पुष्ट होत आहे. आम्ही रोग नाश करण्यासाठी उपाय करण्यास प्रारंभ करतो, परंतु रोगाचे कारण माहीत नसल्यामुळे अशा वस्तूंचे सेवन करतो की त्यामुळे रोगच पुष्ट होतो. म्हणून रोगाचे कारण समजून घेऊन रोगनाशावर यथार्थ उपाय काय आहे हे जाणून रोगनाशासाठी प्रयत्न केला तर रोगाचा समूळ नाश होतो. **जो स्वतःला व पराला जसे आहे तसे जाणतो तो स्वपरभेदविज्ञान करतो व जो स्वपर भेदविज्ञान करतो त्याच्या मोहाचा नाश होतो.** स्वतःला ज्ञानात्मकरूपाने व पराला जसे त्याचे स्वरूप आहे त्या रूपाने जाणणे आवश्यक आहे. मी एक ज्ञानात्मक वस्तू आहे. नेहमी वस्तू, पदार्थ म्हटले की आपल्याला अचेतन वस्तूच लक्षात येते. आत्मासुद्धा एक वस्तू आहे, पदार्थ आहे याची प्रतीती होत नाही. म्हणून आचार्यांनी गाथेमध्ये एक महत्त्वाचा शब्द ठेवला आहे की स्वतःला व पराला आपापल्या द्रव्यत्वाने युक्त जाणतो. आम्ही कित्येक वर्षे शास्त्र ऐकतो, स्वतः वाचतो तरी भेदविज्ञान का होत नाही ? याचा विचार करणे आवश्यक आहे.

याचे कारण एकच आहे की वस्तूला वस्तूरूपाने ग्रहण करीत नाही. मी जीव नावाची एक अमूर्तिक चैतन्यरूप वस्तू आहे. हे वाच्यरूपाने ग्रहण करीत नाही. आत्मा अमूर्तिक असला तरी त्याचे प्रदेशात्मक व भावात्मक अस्तित्व आहे याची प्रतीती करीत नाही. आत्मा असंख्यात प्रदेशी एक अखण्ड वस्तू आहे. संसार अवस्थेमध्ये याच शरीरामध्ये आपले अस्तित्व आहे. शरीरामध्ये असूनही शरीरापासून अत्यंत भिन्न आहे.

ज्याप्रमाणे दूध व पाणी एकत्र असले तरी त्या दोन्हींचे अस्तित्व भिन्न आहे. दूध स्वतंत्र वस्तू आहे व पाणी स्वतंत्र वस्तू आहे. दूध पांढरे, घट्ट व मधुर द्रव पदार्थ आहे, पाणी भिन्न रंगाचा पातळ पदार्थ आहे. दूधात पाणी मिसळले तरी पाणी दूधरूप होत नाही व दूध पाणीरूप होत नाही त्याप्रमाणे आत्मा व शरीर एकत्र असले तरी आत्मा शरीररूप होत नाही व शरीर आत्मारूप होत नाही. शरीराचे प्रदेश भिन्न आहेत व माझे प्रदेश भिन्न आहेत असे स्वानुभव प्रत्यक्षाने जाणणे म्हणजे स्वपरविभाग आहे.

भेदविज्ञानाचा महिमा–

या विश्वरूपी फॅक्टरीमध्ये सहा विभाग आहेत. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल. प्रत्येक विभागाचे काम वेगवेगळे आहे. काही विभागामध्ये काम करणारे अनेक व्यक्ती आहेत व काही विभागामध्ये कार्य करणारे एकेकटेच आहेत. चैतन्याच्या विभागामध्ये अनन्त व्यक्ती आहेत. परिणमनहेतुत्वरूप विभागात असंख्यात कालाणू काम करीत आहेत. गतिहेतुत्व, स्थितिहेतुत्व व अवगाहनहेतुत्वाच्या विभागात एकेकच जण काम करीत आहेत. धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य व आकाशद्रव्य ही त्यांची नावे आहेत. प्रत्येकजण आपापले काम करतात. एका विभागातील व्यक्ती दुसऱ्या विभागामध्ये ढवळाढवळ करीत नाही. एका विभागातील अनेक व्यक्तीसुद्धा स्वतःवर सोपविलेले काम करतात. दुसऱ्याला सोपवलेले काम करीत नाहीत. जीव इतर पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्याचे काम करीत नाही. परंतु अज्ञानी जीव स्वभावाचे ज्ञान नसल्यामुळे हे जाणत नाही व मी पुद्गलादिक परद्रव्याचे काम करतो असे मानतो.

उदा. मी स्वयंपाक करतो, घट वस्त्र इत्यादिकांना बनवतो असे

पुद्गलाचे कर्तृत्व घेतो. मी दुसऱ्यांना यात्रेला घेऊन जातो असे गमनाचे कर्तृत्व घेऊन धर्मद्रव्यामध्ये व आपल्यामध्ये भेद जाणत नाही. मी दुसऱ्याला थांबवले, मी दुसऱ्यांना रहायला जागा दिली, मी दुसऱ्याचे परिणमन घडविले इत्यादिक मान्यता करून अधर्म, आकाश व कालद्रव्यापासून स्वतःला भिन्न जाणत नाही. सहा द्रव्यांच्या अस्तित्वाची प्रतीती करीत नाही.

जेव्हा या जीवाला स्वतःची स्वतःच्या चैतन्यरूपाने व अन्य जीवांची त्यांच्या त्यांच्या चैतन्यरूपाने, पुद्गलाची स्पर्शरसगंधवर्ण अचेतनरूपाने, गतिहेतुत्वस्वरूप धर्मद्रव्याची, स्थितिहेतुरूप अधर्मद्रव्याची, अवगाहनहेतुत्वरूप आकाशद्रव्याची व परिणमनहेतुत्वरूप कालद्रव्याची स्वतन्त्र अमूर्तिक अचेतन अस्तित्वरूपाने प्रतीती होते तेव्हा खरी भेदविज्ञानाची सिद्धी होते.

आगमामध्ये सहा द्रव्ये आहेत हे आपण वाचतो, परंतु प्रत्यक्ष त्यांच्या अस्तित्वाला भिन्न-भिन्नरूपाने जाणत नाही, व सहा द्रव्य आहेत याची प्रतीती करीत नाही. जेव्हा आत्म्याला स्वचैतन्यस्वरूपामध्ये व शेष जीवांना त्यांच्या चैतन्यस्वरूपामध्ये, पुद्गलादी पाच द्रव्यांना त्यांच्या अचैतन्य स्वरूपामध्ये पाहण्याचा अभ्यास करतो तेव्हा द्रव्यदृष्टी मुख्य होते, पर्यायदृष्टी गौण होते. द्रव्यदृष्टीमध्ये पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल आपापल्या स्वभावरूपाने भासित होतात. अनंत जीवसुद्धा समान शुद्ध ज्ञानानन्दमय भासित होतात तेव्हा समताभाव उत्पन्न होतो. राग, द्वेष व मोह स्वतः पलायन करतात. अमृतचन्द्र आचार्यदेव समयसार कलशामध्ये भेदविज्ञानाचा महिमा सांगताना म्हणतात.-

सम्पद्यते संवर एष साक्षात्-
शुद्धात्मतत्त्वस्य किलोपलम्भात् ।
स भेदविज्ञानत एव तस्मात्
तद्भेदविज्ञानमतीव भाव्यम् ।।१२९।।

शुद्धात्मतत्त्वाच्या लाभाने हा संवर संपन्न होतो व तो शुद्धात्मलाभ भेदविज्ञानामुळेच होतो म्हणून भेदविज्ञानाची अत्यंत भावना करावी. पुढे भेद विज्ञानाची प्रेरणा करीत म्हणतात.-

भावयेद् भेदविज्ञान-मिदमच्छिन्नधारया ।
यावत्तावत् पराच्च्युत्वा ज्ञानं ज्ञाने प्रतिष्ठते ।।१३०।।

जोपर्यंत परापासून च्युत होऊन ज्ञानस्वरूप आत्मा ज्ञानस्वरूपामध्ये स्थित होत नाही तोपर्यंत अखंड धाराप्रवाह रूपाने या भेदविज्ञानाची भावना करावी. भेदविज्ञानरूपी मंत्राच्या प्रभावानेच मोहविष उतरते म्हणून साधकांनी भेदविज्ञानाची साधना करावी.

आचार्य येथे तुम्ही भेदविज्ञान करा असे म्हणत नाहीत तर मी भेदविज्ञानाचा प्रयत्न करतो असे म्हणतात. मोठ्या पुरुषांची ही रीती असते की, दुसऱ्याला काम न सांगता स्वतः ते काम करू लागतात. मोठ्या पुरुषांना काम करताना पाहून छोटे लोक आपोआप काम करू लागतात. आचार्यांनी स्वतः भेदविज्ञान केलेले आहे व सदैव पुनः पुनः भावना करतात; परंतु दुसऱ्या भव्यजीवांना प्रेरित करण्यासाठी म्हणतात की आम्ही भेदविज्ञान करतो.

ध्यान हे स्वपरविवेकाचे साधन –

आ. नेमिचंद्र द्रव्यसंग्रह ग्रंथामध्ये म्हणतात.-

दुविहं पि मोक्खहेउं झाणे पाउणदि जं मुणी णियमा।
तम्हा पयत्तचित्ता जूयं झाणं समब्भसह ।।

ज्याअर्थी मुनी ध्यानामध्ये दोन्ही (निश्चय व व्यवहार दोन्ही) प्रकारच्या मोक्षमार्गाला नियमाने प्राप्त करतात म्हणून तुम्ही प्रयत्नशील होऊन ध्यानाचा सम्यक् रीतीने अभ्यास करा.

ध्यान म्हणजे रिकामे बसणे नव्हे. तेथे खूप मोठे काम करायचे असते. ज्याप्रमाणे महिला धान्य नीट करताना त्यात मिसळलेल्या धान्याव्यतिरिक्त केर, कचरा, खडे इत्यादी निरुपयोगी वस्तूंना टाकून देतात व धान्य ग्रहण करतात. घर स्वच्छ करताना बाहेरून आलेला आगन्तुक कचरा झाडून बाहेर टाकतात व घरातील वस्तू घरातच ठेऊन घेतात. त्याप्रमाणे ध्यानामध्ये ज्ञानी अनेक मिसळलेल्या पदार्थातून पराला बाजूला करतात व स्वतःला बाजूला करतात. त्यापैकी पराला सोडून देतात अर्थात् भिन्न जाणतात व चैतन्यरूपी आत्म्याला ग्रहण करतात.

स्वला स्वरूपाने जाणणे व पराला पररूपाने जाणणे हाच मोहक्षयाचा

उपाय आहे. समाधिशतक ग्रंथाच्या मंगलाचरणामध्ये आचार्य पूज्यपाद स्वामींनी तेच सांगितले आहे.-

येनात्माऽबुद्ध्यतात्मैव परत्वेनैव चापरम् ।
अक्षयानन्तबोधाय तस्मै सिद्धात्मने नमः ।।१।।

ज्यांनी आत्म्याला आत्माच जाणले व पराला पररूपाने जाणले त्या अक्षय अनन्त ज्ञानस्वरूप सिद्धात्म्याला नमस्कार असो. ध्यान म्हणजे उपयोगाची एकाग्रता. उपयोगाच्या एकाग्रतेशिवाय स्वतःचा अनुभव होऊ शकत नाही. म्हणून दररोज थोडा वेळ का होईना धर्मध्यानाचा अभ्यास करावा.

ज्याप्रमाणे फोटो काढत असताना ज्याचा फोटो काढायचा त्यावर कॅमेरा स्थिर ठेवायला पाहिजे. कॅमेरा हलला तर फोटो व्यवस्थित येत नाही म्हणून फोटो काढणारा काही काळ स्थिर उभा राहून कॅमेरा स्थिर धरतो नंतर फोटो काढतो तेव्हा व्यवस्थित फोटो येतो. ज्ञान हा स्वतःचा फोटो काढण्याचा कॅमेरा आहे. ज्ञानरूपी कॅमेरा स्वतःवर स्थिर धरून स्वतःचा फोटो काढला तर ज्ञानामध्ये स्वतःचा यथार्थ फोटो निघतो.

ज्ञानाची स्थिरता म्हणजेच ध्यान आहे. ज्ञानी ध्यानामध्ये स्वतःचा फोटो काढत असतो. म्हणून त्याला ध्यानामध्ये अत्यानंद मिळतो. स्वतःचा फोटो पाहून कुणाला आनंद होत नाही ? ध्यानामध्ये स्वपराचा विभाग करून स्वतःला स्वानुभवप्रत्यक्षाने ग्रहण केले तर अतीन्द्रिय आनंदाची प्राप्ती होते.

स्वपरविवेकसिद्धीनेच मोहाचा क्षय होतो म्हणून स्वपरविवेक सिद्धीसाठी प्रयत्न करावा अशी प्रेरणा मागील गाथेत दिली. आता स्वपरविवेकसिद्धी सर्वथा जिनागमाच्या आधाराने करावी असे सांगतात कारण जगामध्ये अनेक दार्शनिक झाले व अद्यापिही अनेक नवनवीन दार्शनिक होत आहेत. ते आपल्या बुद्धीने वस्तूची संकल्पना करून अध्यात्माचा उपदेश करतात. अनेक ध्यानकेन्द्रे ही निर्माण झाली आहेत. तेथे जाऊन लोक तात्कालिक शान्तीचा अनुभव करून आनंद प्राप्त करतात. परंतु ती शान्ती शाश्वत व खरी नाही. तो मंदकषायामुळे होणारा प्रशमभावाने उत्पन्न झालेला आनन्द आहे. वस्तूस्वरूपाच्या यथार्थ बैठकीशिवाय केवळ अध्यात्माचा

उपदेश कार्यकारी नाही.

अल्पज्ञ व इन्द्रियज्ञानी जीव अमूर्तिक अतीन्द्रिय वस्तूला प्रत्यक्ष व स्पष्ट जाणू शकत नाही म्हणून त्याने कल्पिलेले वस्तूचे स्वरूप यथार्थ असू शकत नाही. वीतराग सर्वज्ञ भगवान अतीन्द्रिय केवलज्ञानाच्या द्वारे संपूर्ण विश्वातील मूर्तामूर्त पदार्थांना स्पष्ट जाणतात त्यामुळे त्यांच्या वचनामध्ये प्रामाणिकता आहे व त्यांनी जसे सांगितले तसे वस्तूचे खरे स्वरूप आहे. म्हणून प्रथम जिनागमाचा अभ्यास करून वस्तूचे सत्य स्वरूप काय आहे हे जाणून नंतर स्व व पराचा निर्णय केला असता खरी स्वपरविवेकसिद्धी होते. अमृतचंद्र आचार्यांनी उत्थानिकेमध्ये सर्वथा शब्द ठेवला आहे अर्थात् हा एकच स्वपरविवेकसिद्धीचा मार्ग आहे, दुसरा मार्ग नाही.

तम्हा जिणमग्गादो गुणेहि आदं परं च दव्वेसु ।
अभिगच्छदु णिम्मोहं इच्छदि जदि अप्पणो अप्पा ।।९०।।

अन्वयार्थ– (**तम्हा**) म्हणून (**जदि**) जर (**अप्पा**) आत्मा (**अप्पणो**) आपल्या स्वतःच्या (**णिम्मोहं**) निर्मोहाची (**इच्छदि**) इच्छा करतो तर (**जिणमग्गादो**) जिनमार्गाने (**गुणेहि**) गुणांच्याद्वारे (**दव्वेसु**) द्रव्यांमध्ये (**आदं परं च**) स्वतःला व पराला (**अभिगच्छदु**) जाणावे.

ज्याला निर्मोही होण्याची इच्छा असेल त्याने जिनागमामध्ये सांगितलेल्या पद्धतीने तत्त्वज्ञान प्राप्त करून भेदविज्ञान करावे.

आचार्य प्रथम येथे अट घालतात की ज्याला निर्मोह होण्याची इच्छा असेल त्याने स्वपरभेदविज्ञान करावे. निर्मोह म्हणजे दुःखरहित व्हायचे असेल तर, कारण मोह म्हणजे दुःख. या जीवाला जेवढे काही दुःख आहे ते मोहामुळेच आहे. जीवाला दुःख नको आहे परंतु संसारी जीव मोह सोडू; इच्छित नाही, कारण मोहाला सुखाचे कारण मानले आहे. मी मोहामुळे दुःखी आहे हेच त्याला लक्षात येत नाही. असाता वेदनीयाच्या उदयाने प्राप्त झालेल्या प्रतिकूलतेलाच दुःखाचे कारण मानतो. वास्तविक पुत्राचा वियोग दुःखाला कारण नाही. पुत्रासंबंधीचा मोह दुःखाला कारण आहे. शेजाऱ्याच्या पुत्राचा वियोग झाल्यानंतर या जीवाला दुःख होत नाही, स्वतःच्या मुलाचा वियोग झाल्यावरच का दुःख होते ? कारण आपल्या मुलासंबंधी मोह आहे.

शरीरामध्ये वेदना होऊ लागल्यावर दुःख होते. तेथे शरीर दुःखाला कारण नाही. शरीरासंबंधी मोह दुःखाला कारण आहे. घर जळाले, धन चोरीला गेले तर हा जीव दुःखी होतो. तेथे घरासंबंधी व धनासंबंधी मोह दुःखाला कारण आहे. कारण शेजाऱ्याचे घर जळाल्यावर किंवा दुसऱ्याचे धन चोरीला गेल्यावर या जीवाला दुःख होत नाही. म्हणून येथे आचार्य म्हणतात, 'तुम्हाला निर्मोही होण्याची इच्छा असेल अर्थात् दुःखरहित सुखी होण्याची इच्छा असेल तर हे काम करा.'

दौलतरामजींच्या भाषेत 'जो चाहो अपनो कल्याण' म्हणून प्रथम निर्णय करावा की मोह दुःखाला कारण आहे. त्यासाठी मला मोहरहित झाले पाहिजे, मोहशत्रूचा नाश करणे माझे कर्तव्य आहे.

स्वपरविभागसिद्धीचे साधन असाधारण गुण –

अनेक मिसळलेल्या वस्तूंमधून एक एका वस्तूला भिन्न करण्याचे माध्यम त्या वस्तूचे गुणधर्म आहेत. जसे सोने आणि तांबे दोन्ही मिळून एक पात्र बनविले आहे. त्यामध्ये सोन्याचे कण व तांब्याचे कण एकत्र मिसळलेले आहेत. सामान्य लोकांना ते पात्र एक सोन्याचेच वाटते. परंतु जर ते पात्र सोनाराजवळ नेऊन मोडीत घातले तर सोनार त्याच्या गुणधर्माद्वारे दोघांना भिन्न जाणतो. सोन्याला कसोटीच्या दगडावर घासतो त्यावर ज्या रंगाची रेषा उमटते त्या रंगावरून त्यामध्ये शुद्ध सोने किती आहे व तांबे किती आहे हे ओळखतो. जेवढे सोने आहे तेवढीच सोन्याची किंमत देतो व जेवढे तांबे आहे तेवढी तांब्याची किंमत देतो. त्याप्रमाणे या विश्वामध्ये जाती अपेक्षेने सहा द्रव्ये व संख्या अपेक्षेने अनंत द्रव्ये एका क्षेत्रात राहतात. त्या द्रव्यांमध्ये दोन प्रकारचे गुण आहेत. १) सामान्य व २) विशेष.

सामान्यगुण सर्वद्रव्यांमध्ये सामान्यरूपाने आढळतात. जसे अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व इत्यादी. या गुणांद्वारे त्यामध्ये हे एक द्रव्य आहे, वस्तू आहे, पदार्थ आहे हे जाणले जाऊ शकते. परंतु त्यांना वेगवेगळे जाणता येत नाही. त्या गुणांपैकी जे गुण त्या वस्तूला अन्य वस्तूंपासून वेगळे करतात त्यांनाच विशेष गुण म्हणतात. आपापल्या विशिष्ट द्रव्यामध्ये जे असतात ते विशेष गुण होत. विशेष गुण अन्ययोगव्यवच्छेदक असतात अर्थात या

गुणांद्वारे दुसऱ्या द्रव्यांच्या संयोगापासून विवक्षित द्रव्याला वेगळे जाणता येते. त्या विशेष गुणांनाच असाधारण गुण म्हणतात. कारण ते सर्व द्रव्यात न राहता विशिष्ट द्रव्यातच आढळतात. जे साधारण नाहीत ते असाधारण होत. जसे जीवाचे चैतन्य, ज्ञान, दर्शन, सुख इत्यादी गुण, पुद्गलाचे स्पर्शरसगंधवर्ण, धर्मद्रव्याचे गतिहेतुत्व, अधर्मद्रव्याचे स्थितिहेतुत्व, आकाशद्रव्याचे अवगाहनहेतुत्व व कालद्रव्याचे परिणमहेतुत्व हे असाधारण गुण आहेत. या विशेष गुणांच्याद्वारे सहा द्रव्ये एकत्र राहत असली तरी त्यांना भिन्नभिन्न जाणता येते.

जीव अनंतानंत आहेत, त्या सर्वांचेच लक्षण चैतन्य आहे. **ज्ञान ज्ञानाला जाणते तो अन्तर्मुख चित् प्रकाश व ज्ञानामध्ये ज्ञेय पदार्थ जाणले जातात तो बहिर्मुख चित्प्रकाश होय.** ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश स्वतःला ही प्रकाशित करतो व इतर पदार्थांना ही प्रकाशित करतो. त्याप्रमाणे ज्ञान स्वतःलाही प्रकाशित करते व दुसऱ्यांनाही प्रकाशित करते. अनेक जीवांमधून आपल्या जीवाला भिन्न जाणण्याचे साधन काय ? सर्व जीवांच्या अपेक्षेने चैतन्याला सामान्य गुणसुद्धा म्हटले आहे.

निजचैतन्य हा आपला विशेष गुण आहे. निजचैतन्य लक्षणाने स्वतःच्या जीवाला अन्य जीवांहून वेगळे जाणावे. निजचैतन्य सत् अकारण आहे म्हणून स्वतः सिद्ध आहे. माझे चैतन्य कोणीही निर्माण केलेले नाही. माता, पिता किंवा ईश्वर माझ्या चैतन्याचे निर्माता नाहीत म्हणून ते अकारण आहेत. हे माझे चैतन्य अनादिकाळापासून आहे व अनंतकाळ राहणार आहे. त्यामुळे ते स्वतः सिद्ध आहे. चैतन्याचा स्वभाव प्रकाशित करणे. चैतन्य अमूर्तिक असल्यामुळे इन्द्रियाने दिसत नाही. परंतु प्रतिभासावरून त्याचे अस्तिव भासित होते. येथे परद्रव्य प्रतिभासित होत आहे यावरून येथे प्रतिभास आहे हे लक्षात येते. जसे येथे उजेड पडला आहे, वस्तू दिसत आहेत यावरून सूर्याचा उदय झाला आहे हे लक्षात येते. प्रतिबिंब झळकत आहे यावरून येथे आरसा आहे हे लक्षात येते. तसे पदार्थ जाणला जात आहे म्हणजे येथे ज्ञान आहे हे लक्षात येते. कारण ज्ञानाशिवाय जाणण्याचे काम अन्य कोणीही करू शकत नाही. ज्ञेयपदार्थ ज्ञायकाची प्रसिद्धी करतात. अज्ञानी

जीव प्रतिभासित होणाऱ्या ज्ञेयांचे अस्तित्व जाणतो व त्या ज्ञेयालाच स्व मानतो. परंतु ज्ञेय ज्यामध्ये झळकले आहेत त्या ज्ञायक आत्म्याचे अस्तित्व मात्र जाणत नाही. ज्ञानी ज्ञेयावरून ज्ञायकाची प्रसिद्धी करतो हे पुस्तक आहे, हा टेबल आहे इत्यादी मला समजत आहे म्हणजे मी ज्ञानस्वरूप आहे हे लक्षात येते.

चैतन्य अन्तर्मुख व बहिर्मुख प्रकाशस्वरूप असल्यामुळे स्वपरपरिच्छेदक अर्थात् स्व व पराला जाणणारे आहे. जसे माझ्यासंबंधी माझे चैतन्य अन्य समानजातीय व असमानजातीय अन्य द्रव्यांना सोडून माझ्या आत्म्यामध्येच राहते त्या माझ्या चैतन्याच्या द्वारे मी माझ्या आत्म्याला तिन्ही काळामध्ये ध्रुवत्वाला धारण करणारे द्रव्य जाणतो. तसेच पुद्गलाला सोडून अन्य द्रव्यामध्ये न राहणाऱ्या स्पर्शरसगंधवर्णरूप लक्षणाने पुद्गल द्रव्याचा मी निश्चय करतो. धर्मद्रव्याहून इतरत्र न आढळणाऱ्या गतिहेतुत्व लक्षणाने धर्मद्रव्याचा, अधर्मद्रव्याशिवाय अन्यत्र नसणाऱ्या स्थितिहेतुत्व लक्षणाने अधर्मद्रव्याचा, आकाशद्रव्याला सोडून दुसऱ्यामध्ये न सापडणाऱ्या अवगाहनहेतुत्व लक्षणावरून आकाशद्रव्याचा आणि कालद्रव्याहून इतरत्र न राहणाऱ्या परिणमन हेतुत्वावरून कालद्रव्याचा मी निश्चय करतो. म्हणून मी पुद्गल द्रव्य नाही, धर्मद्रव्य नाही, अधर्मद्रव्य नाही, आकाशद्रव्य नाही, कालद्रव्य नाही. त्यांचा माझ्यामध्ये व माझा त्यांच्यामध्ये अत्यंत अभाव आहे.

द्रव्यांमध्ये परस्पर पार्थक्यव्यवस्था –

ज्याप्रमाणे एका खोलीमध्ये अनेक दिवे लागले तर त्या सर्व दिव्यांचा प्रकाश एकमेकांमध्ये मिसळून राहतो. एकत्र राहूनसुद्धा प्रत्येक दिव्याचा प्रकाश स्वतंत्र आहे. एकमेकरूप झालेला नाही. एक दिवा बाजूला नेला किंवा विझवला तर त्याचा तेवढाच प्रकाश त्या दिव्याबरोबर बाजूला होतो. शेष दिव्यांचा प्रकाश विझत नाही. यावरून प्रत्येक प्रकाशाचे स्वतन्त्र अस्तित्व लक्षात येते. त्याप्रमाणे या विश्वरूपी एका भवनामध्ये सहा द्रव्ये एकमेक प्रदेशावगाहरूपाने एकत्र राहतात. परंतु प्रत्येक द्रव्य आपापल्या प्रदेशांमध्येच राहते. प्रत्येक द्रव्याची आपापली सत्ता भिन्नच आहे. कुणाची ही सत्ता कधीही

कोणत्याही अन्य द्रव्याच्या सत्तेमध्ये मिसळू शकत नाही. जीव एका ठिकाणाहून दुसरीकडे गेला तर तेथील पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्य त्याच्याबरोबर जात नाहीत. एकटा जीवच निघून जातो. संसार अवस्थेमध्ये शरीरसहित जीव बाजूला होतो, कारण संसार अवस्थेमध्ये जीव व शरीराचा संश्लेष संबंध आहे. एका गतीमधून दुसऱ्या गतीत जाताना मात्र जीवाबरोबर हे दिसणारे शरीरसुद्धा जात नाही. पण तैजस व कार्मणशरीराबरोबर जाते. मुक्त अवस्थेमध्ये मात्र जीव एकटाच निघून जातो.

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की सहा द्रव्ये एकत्र आहेत; परंतु प्रत्येकाचे अस्तित्व भिन्न भिन्न आहे. विश्वात जेथे कोठे आपण जाऊ तेथे सहा द्रव्ये असणारच. त्यांना भिन्न आपापल्यामध्ये असणाऱ्या व दुसऱ्यामध्ये नसणाऱ्या भिन्नभिन्न लक्षणाद्वारे भिन्न भिन्न जाणता येते. निजचैतन्याद्वारे स्वतःला चैतन्यात्मक अन्य जीवांपासून आणि अचेतन द्रव्यांपासून भिन्न जाणावे व आपल्या जीवाला सर्वांपासून भिन्न अनुभवावे.

स्वपरविभागसिद्धीने निर्मोहता –

भेदविज्ञानाद्वारे जेव्हा आत्मानुभवाचा अभ्यास केला जातो तेव्हा मोहग्रंथी नष्ट होते. ही मोहग्रंथी अनादिकाळापासून दृढरीतीने बद्ध आहे. सामान्य घाव घातल्याने ही मोहग्रंथी तुटत नाही. ज्याप्रमाणे छोटीशी गाठ असेल तर ती थोड्या औषधाद्वारे विरघळून जाते, परंतु कॅन्सरची गाठ असेल तर ती मोठ्या ऑपरेशनशिवाय (शस्त्रक्रियेशिवाय) नष्ट होत नाही. तिला मुळासकट उखडून काढले नाही व त्याचा एक जरी जंतू राहिला तरी तो जंतू पुन्हा ती गाठ निर्माण करू शकतो. म्हणून ऑपरेशनद्वारे गाठ काढून टाकल्यानंतर पुन्हा त्या रोग्याला किमोथेरपी देतात अर्थात ते जंतू पुन्हा उत्पन्न होऊ नयेत म्हणून शेक देऊन ते जंतू जाळून टाकतात. त्याप्रमाणे मोहाची गाठ त्या कॅन्सर रोगापेक्षासुद्धा महाभयंकर आहे. ही सामान्य पुरुषार्थाने नष्ट होत नाही. त्याला भेदविज्ञानाच्या प्रचण्ड उग्र पुरुषार्थाची गरज आहे. भेदविज्ञान व आत्मानुभवाद्वारे याचा मूळासकट नाश करणे योग्य आहे. व पुन्हा मोहांकुर उत्पन्न होऊ नये म्हणून पुन्हा पुन्हा भेदविज्ञानाची भावना करणे आवश्यक आहे. मोहग्रंथीचा नाश झाल्यावर हा आत्मा परम निर्मोही वीतरागी व शुद्ध

होतो.

आत्मानुशासनामध्ये गुणभद्राचार्य सांगतात.–

मोहबीजाद्रतिद्वेषौ बीजान् मुलांकराविव ।
तस्माज्ज्ञानाग्निना दाह्यं तदेतौ निर्दिधिक्षुणा ।।

ज्याप्रमाणे बीजापासून अंकुर फुटते त्याप्रमाणे मोहापासून रागद्वेष उत्पन्न होतात म्हणून रागद्वेषाला जाळण्याची इच्छा असणाऱ्यांनी ज्ञानरूपी अग्नीद्वारे मोहबीजाला जाळून टाकावे.

जिनागमाच्या अभ्यासाने वस्तूचे खरे स्वरूप जाणून स्वपरभेदविज्ञानाचा सतत अभ्यास करावा.

जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेल्या पदार्थाचे श्रद्धान केल्याशिवाय धर्माची प्राप्ती होत नाही. मोठ्या लोकांची सांगण्याची एक पद्धती असते. ते प्रथम खूप समजावून सांगतात. प्रेमाने सांगतात. एवढे सांगूनही कोणी ऐकत नाही तर चिडून कडक पण सभ्य भाषेत सांगतात. अनेक तर्क दृष्टान्त देऊन सांगतात. 'तुम्ही असे करणार नाही तर तुमचे भले होणार नाही.' तीच पद्धती आचार्य येथे वापरतात. आचार्यांनी वस्तूचे स्वरूप प्रथम खूप विस्ताराने स्पष्ट केले आहे. अनेक प्रकाराने मोहनाशाचा उपाय अर्थात धर्मप्राप्तीचा उपाय सांगितला; परंतु एवढे सांगूनही जे हट्टी जीव बदलत नाहीत व या उपायाचा अवलंब करीत नाहीत त्यांना आचार्य कडक पण सभ्य भाषेत सांगतात की जर तुम्ही जिनशास्त्राद्वारे पदार्थाचे स्वरूप जाणून जर त्याचे श्रद्धान करणार नाही तर तुम्हाला धर्म प्राप्त होणार नाही. मुनिव्रत धारण करूनही तो खरा श्रमण नाही.–

सत्ता संबद्धेदे सविसेसे जो हि णेव सामण्णे ।
सद्दहदि ण सो सवणो तत्तो धम्मो ण संभवदि ।।९१।।

अन्वयार्थ – (जो हि) जो जीव **(सामण्णे)** मुनी अवस्थेमध्ये **(एदे सत्तासंबद्धे सविसेसे)** या सत्ता संयुक्त विशेषसहित पदार्थांची **(ण सद्दहदि)** श्रद्धा करीत नाही **(सो)** तो **(सवणो ण)** श्रमण नाही **(तत्तो)** त्यापासून **(धम्मो)** धर्म **(ण संभवदि)** संभवत नाही.

तात्पर्य, जो मुनी प्रत्येक पदार्थांची सत्ता स्वतन्त्र मानत नाही तो मुनी

नाही व त्याला धर्म होत नाही. केवलिप्रणीत अर्थश्रद्धानाशिवाय धर्मलाभ होत नाही.

श्रद्धानाचे मूल कारण सामान्यविशेष अस्तित्वाचा निर्णय–

धर्म भावप्रधान आहे यथायोग्य भावाशिवाय केवळ बाह्यवेष धारण केल्याने धर्म संभवत नाही. धर्मासाठी प्रथम सम्यग्दर्शन आवश्यक आहे. सम्यग्दर्शनाशिवाय ज्ञान सम्यग्ज्ञान व चारित्र सम्यक्चारित्र होऊ शकत नाही.

सम्यग्दर्शन होण्यासाठी जिनेन्द्र भगवंतांनी सांगितलेल्या सहा द्रव्यांचे यथार्थ श्रद्धान आवश्यक आहे. यथार्थ श्रद्धान होण्यासाठी प्रत्येक द्रव्यांचे सादृश्यास्तित्व व स्वरूपास्तित्व जाणले पाहिजे. प्रत्येक पदार्थांची सत्ता सामान्य व विशेषरूप आहे. ज्याप्रमाणे मनुष्य शब्दाने सामान्यरूपाने सर्व मनुष्यांचे ज्ञान होते. परंतु प्रत्येक मनुष्यांची विशेषता भिन्न भिन्न आहे. मनुष्यपणा हा सर्वांचा सामान्य गुण आहे. मनुष्यपणाच्या अपेक्षेने सर्वांमध्ये सदृशता आहे. परंतु प्रत्येकाचा विशेष गुण भिन्न आहे. आकार, रंग, रूप, स्वभाव या अपेक्षेने प्रत्येकांचे अस्तित्व वेगळे आहे.

झाड म्हटल्यावर सर्व झाडांना ग्रहण केले जाते. कारण वृक्षपणाच्या अपेक्षेने सर्वांमध्ये समानता आहे, परंतु प्रत्येक झाडाचे भिन्न भिन्न अस्तित्व आहे. प्रत्येकाची विशेषता भिन्न भिन्न आहे. एक आंब्याचे झाड आहे. तर एक निंबाचे तर एक पेरूचे इत्यादी भिन्नता आहे. आंब्याची अनेक झाडे सुद्धा आम्रत्व अपेक्षेने समान आहेत; परंतु प्रत्येक आंब्याच्या झाडाची विशेषता भिन्न भिन्न आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक द्रव्यामध्ये सामान्यपणा व विशेषपणा असे दोन्ही प्रकारचे अस्तित्व आहे. अस्तित्व, वस्तुत्व, प्रमेयत्व या सामान्य गुण अपेक्षेने सर्व द्रव्य समान आहेत, सादृश्यास्तित्वाने सहित आहेत. त्याचबरोबर विशेष गुण अपेक्षेने प्रत्येकाचे अस्तित्व भिन्न भिन्न आहे. यालाच महासत्ता व अवान्तर सत्ता म्हणतात.

महासत्ता एक आहे, अवान्तर सत्ता अनेक आहे. महासत्ता एक असली तरी प्रत्येक द्रव्याची महासत्ता आपापल्यामध्ये आहे. सर्व द्रव्यामध्ये व्यापक असल्यामुळे तिला एक म्हटले आहे. सजातीय अनेक द्रव्यांमध्ये सुद्धा प्रत्येकाची सत्ता भिन्न आहे. प्रत्येक जीव स्वभावाच्या अपेक्षेने समान आहे;

परंतु प्रत्येक जीव आपापल्या विशेषतेने सहित आहे. जीव संसारी असो अथवा मुक्त, प्रत्येकामध्ये सामान्य व विशेष अस्तित्व आहे. अनेक पुद्गल परमाणू मिळून एक स्कंध होतो, परंतु प्रत्येक परमाणू आपापल्या भिन्न भिन्न सत्तेने युक्त आहे. अशाप्रकारे प्रत्येक वस्तूच्या सामान्य विशेष अस्तित्वाचा यथायोग्य निर्णय करून स्वतःचे अस्तित्व भिन्न जाणतो तो सम्यग्दृष्टी आहे, श्रद्धावान आहे.

सत्श्रद्धानाशिवाय धर्मलाभ असंभव–

ज्याला स्वपराच्या अस्तित्वाचे ज्ञान नाही त्याला स्वपराचे भिन्न श्रद्धान उत्पन्न होऊ शकत नाही. ज्याला श्रद्धान नाही तो सम्यग्दृष्टी नाही. जो सम्यग्दृष्टी नाही तो श्रमण नाही. जो स्वपराचे भेदविज्ञान न करता मुनिवेष धारण करून स्वतःला मुनी मानतो तो स्वतः स्वतःला धोक्यात ठेवतो. मुनींचे कठोर आचरण करून विनाकारण स्वतःला कष्ट देत आहे.

ज्याप्रमाणे तांदळाने रहित केवळ फोलपट कुठल्याने तांदळाची प्राप्ती होत नाही त्याप्रमाणे केवळ बाह्य वेष घेऊन धर्माची प्राप्ती होत नाही. एकवेळ आहार करणे, चार घास घेतल्यावर अन्तराय आला तरी आहार सोडून देणे, जमिनीवर झोपणे, २२ परीषह सहन करणे, केशलोच करणे इत्यादी कष्ट देऊन आत्म्याला का त्रास देत आहात असे आचार्य म्हणतात. अर्थात् आचार्य द्रव्यलिंग धारण करण्याचा निषेध करीत नाहीत. उलट त्यांना हे सांगायचे आहे की मुनी बनून जी धर्माची प्राप्ती व्हायला पाहिजे ती करून घ्या. त्या धर्माशिवाय केवळ बाह्यवेष कार्यकारी नाही. वस्तूच्या सत्यश्रद्धानाशिवाय धर्माचे बाह्य काम करणे म्हणजे स्वतःच स्वतःला फसवल्यासारखे आहे. कारण धर्माचे बाह्य काम करून स्वतःला तर तो धर्मात्मा मानून बसला आहे व अज्ञानी लोकही त्याला धर्मात्मा म्हणतात; परंतु तेथे धर्म तर नाही. कारण धर्म अंतरंग ज्ञान व श्रद्धानाश्रित आहे. धर्म आत्माश्रित आहे, शरीराश्रित नाही.

ज्या साधूच्या परिणामामध्ये निश्चय धर्म नाही तो द्रव्यलिंगी आहे, भावलिंगी नाही. भावलिंगाशिवाय परम सामायिक संयम प्राप्त होऊ शकत नाही. जेथे सामायिक संयम नाही तेथे मुनिपणा कथनमात्र आहे.

ज्याप्रमाणे जेथे सोने तयार करण्याचे कार्य केले जाते तेथे काही

धूलिधावक असतात. सोने तयार करून कचरा बाहेर फेकला जातो त्या कचऱ्यामध्ये काही सोन्याचे कण मिसळलेले असतात. धूलिधावक ती धूळ घेऊन धुतात व त्यातून सोन्याचे कण वेगळे काढतात व धूळ वेगळी करून फेकून देतात. परंतु जर त्याला धूळीच्या कणाचे व सुवर्णकणांचे अंतरच माहीत नसेल तर धूळ धुऊनसुद्धा त्यातून सोन्याची प्राप्ती होऊ शकत नाही. ज्याला धूळीचे लक्षण व सोन्याचे लक्षण जाणून त्यामध्ये भेद करता येतो. तो धूळीतून सोन्याचे कण वेगळे करून सोन्याचा लाभ करू शकतो. त्याप्रमाणे ज्याला स्वतःची व पराची ओळख नाही त्याला निज आत्म्याची उपलब्धी होत नाही, त्यामुळे त्याला धर्म संभवत नाही. जो सर्व पदार्थामधून स्वतःचा आत्मा वेगळा जाणून त्या आत्मस्वरूपाचा अनुभव करतो त्याला निरुपराग आत्मस्वरूपाची प्राप्ती होते व त्यालाच धर्म उपलब्धी होते.

पंडित दौलतरामजी आपल्या पद्यामध्ये म्हणतात.–

आपा नही जाना तूने कैसा ज्ञानधारी रे ।
देहाश्रित करि क्रिया आपको मानत शिवमग चारी रे ।
निजनिवेद बिन घोर परीषह विफल कही जिन सारी रे ।।

सहजस्वभावाच्या अवलम्बनामध्ये धर्मलाभ–

मी आत्मा अनादि अनंत अहेतुक ध्रुव एक ज्ञानस्वभावी आहे अशाप्रकारे भावनापूर्वक आत्मस्वभावाचे अवलम्बन घेऊन स्वतःची प्रतीती केली तर धर्म संभवतो. स्वतन्त्रतेचा उपाय स्वावलंबन आहे. धर्म म्हणजे आत्म्याला पारतन्त्र्यातून सोडवून स्वतःच्या घरामध्ये ठेवणे आहे अर्थात स्वतन्त्रतेची प्राप्ती म्हणजेच धर्म होय. ती स्वतन्त्रता पराच्या आश्रयाने प्राप्त होत नाही तर ती स्वावलंबनानेच प्राप्त होते. म्हणून या मनुष्यभवातील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे स्वचा निर्णय करणे. जर स्वचाच निर्णय नसेल तर त्याचे अवलंबन तर कसे घेणार?

हा प्रवचनसार ग्रन्थ आपल्याला स्ववस्तूचा निर्णय करवितो म्हणून प्रवचनसार जीवन स्वातन्त्र्याची कला शिकविणारा ग्रन्थ आहे. स्वचा सम्यक् निर्णय करून त्याचे श्रद्धान झाले असता धर्माचा लाभ होतो. म्हणून आगमात सांगितलेल्या पद्धतीने तत्त्वश्रद्धान करून सहजनिज स्वभावदृष्टीने अविकार

धर्ममय आत्म्याची उपलब्धी करावी.

ज्ञानाधिकारातील विषयांचे संक्षिप्त क्रमिक वर्णन–

सर्वप्रथम 'मी समताभावाला प्राप्त होतो की ज्यामुळे निर्वाणाची प्राप्ती होते' अशी आचार्यांनी प्रतिज्ञा केली होती. समताभाव मोक्षाचा मार्ग आहे समताभावाशिवाय मोक्षाचा मार्ग नाही. रागद्वेषापासून दूर होण्यासाठीच सर्व धर्मसाधना केली जाते. अरिहंत सिद्ध समतेने परिपूर्ण आहेत व समताभाव परिपूर्ण प्राप्त करण्यासाठी आचार्य, उपाध्याय, साधू प्रयत्नशील असतात. म्हणून मंगलाचरणामध्ये पंच परमेष्ठींना नमस्कार करून समताभाव प्राप्त करण्याची प्रतिज्ञा केली आहे.

ज्या समतेचा संकल्प केला ती समता काय वस्तू आहे याचा निर्णय करण्यासाठी त्यानंतर सांगितले की चारित्र धर्म आहे. धर्म म्हणजे समताभाव आहे. जो मोहक्षोभाने रहित परिणाम आहे त्यालाच समताभाव म्हणतात. अस्तिरूपाने समताभावाचे स्वरूप आपल्या आत्मस्वरूपामध्ये लीन होणे हे आहे. '**स्वस्वरूपे चरणं चारित्रं**' स्वस्वरूपामध्ये आचरण करणे चारित्र आहे व चारित्र, धर्म, समताभाव हे सर्व एकार्थवाची आहेत. छद्मस्थ जीवाला आत्मस्वरूपाला जाणतानाच समताभाव प्राप्त होऊ शकतो. पराला जाणताना रागद्वेष उत्पन्न होतात. अशाप्रकारे समताभावाला धर्मरूपाने निश्चित केले. अशाप्रकारे धर्म करणे म्हणजे समताभाव प्राप्त करणे होय हे सिद्ध होते. त्यानंतर हा धर्म कोठे आहे, कुणाच्या आश्रयाने होतो हे सिद्ध करण्यासाठी सिद्धांत सांगितला की 'ज्यावेळी द्रव्य ज्या परिणामरूपाने परिणमते त्यावेळी ते त्या परिणामाशी तन्मय असते. म्हणून धर्मरूपाने परिणमलेला आत्माच स्वयं धर्मरूप होतो. अर्थात आत्म्यामध्येच धर्मपणा आहे ही गोष्ट निश्चित होते.'

धर्मपरिणत आत्मा कधी शुद्धोपयोगरूपाने परिणमतो तर कधी शुभोपयोगरूपाने. त्यापैकी शुद्धोपयोगाने युक्त आत्मा निर्वाणसुखाला प्राप्त करतो. शुभोपयोग मोक्षमार्गामध्ये होत असला तरी तो मोक्षमार्गाचा घातकच आहे. कारण शुभोपयोग हा अशुद्धोपयोग आहे. साक्षात् कर्मबंधाला कारण आहे म्हणून आत्मसिद्धीच्या विरोधी आहे. म्हणून या प्रसंगानुसार निर्वाणसुखाला कारणभूत शुद्धोपयोग अधिकाराचा प्रारंभ केला व विरोधी शुभ

व अशुभोपयोग, त्याचे फळ पुण्य पाप व सुख दुःखाला समान निश्चित करून त्याला दूर केले. शुद्धोपयोगाचे विशेष स्वरूप सांगून त्याच्या प्रसादाने प्रकट झालेल्या सहज ज्ञान व सहज आनंदाचे उद्योतन करून श्री कुंदकुंद देवांनी ज्ञान आणि आनंदाच्या स्वरूपाचे विस्ताराने वर्णन केले. अशाप्रकारे ज्ञानाधिकारामध्ये आचार्यदेवांनी आपल्या अविनाभावी सहजसुखाला घेऊनच ज्ञानाच्या स्वरूपाचे स्पष्ट वर्णन केले. या ज्ञानस्वभावाच्या दृष्टीमध्ये आपले सर्व हित सामावलेले आहे.

आता आचार्य ही पूर्ण धारणा करतात की मीच साक्षात धर्मस्वरूप आहे, धर्ममूर्ती आहे. आजपर्यंत संसारी जीवाने जे काही दुःख सोसले ती पराची आशा करूनच. आपल्यापासून भिन्न असणाऱ्या स्त्रीपुत्रादि चेतन व धनधान्यादी अचेतन पदार्थासंबंधीची तृष्णा दुःखाचे कारण आहे व ती तृष्णासुद्धा स्वतःचे स्वरूप न जाणल्यामुळे होत होती. आता कसे कसे तरी करून अर्थात महापुरुषार्थाने शुद्धोपयोग प्राप्त झाला आहे. त्या शुद्धोपयोगाच्या प्रसादाने स्वपराचे यथार्थ भेदविज्ञान झाले, त्यामुळे परासंबंधीची सर्व स्पृहा नष्ट झाली. तेव्हा परमनिःस्पृह होऊन हा आत्मा आपल्यामध्ये तृप्त झाला आहे. आत्मतृप्तीमुळे आता उपयोग बाहेर भटकत नाही. त्यामुळे पारमेश्वरी प्रवृत्तीला प्राप्त झालो अर्थात आपल्या आत्मस्वरूपामध्येच स्थिर झालो. ज्ञाता द्रष्टारूप होऊन आता करण्यायोग्य कार्य शिल्लक राहिले नाही. कृतकृत्यतेला प्राप्त करून नितान्त अनाकुल होऊन सर्व भेदवासनेचा उन्मेष नष्ट झाला आहे असा मी स्वयं साक्षात् धर्म आहे अशा भावनेमध्ये आचार्य स्थित होतात. अर्थात जे धर्मस्वरूप आहे तेच साक्षात् मी आहे; कारण मी धर्म अर्थात स्वभावाहून भिन्न वस्तू नाही. निश्चय रत्नत्रयामध्ये परिणमन करणारा आत्माच धर्म आहे. हे आठव्या गाथेत सांगायला सुरवात केली होती त्याची पूर्ण धर्मस्वरूपता येथे व्यक्त केली की 'जो निश्चय सम्यग्दर्शन-ज्ञानचारित्र स्वरूपाने परिणत आहे तो आत्माच धर्मस्वरूप आहे.'

जो णिहदमोहदिट्ठी आगमकुसलो विरागचरियम्हि ।
अब्भुट्ठिदो महप्पा धम्मो त्ति विसेसिदो समणो ।।९२।।

अन्वयार्थ– (जो) जो **(आगमकुसलो)** आगमामध्ये कुशल आहे **(णिहदमोहदिट्ठी)** ज्याची मोहदृष्टी नष्ट झाली आहे व जो **(विरागचरियम्हि अब्भुट्ठिदो)** वीतराग चारित्रामध्ये उपस्थित आहे **(महप्पा समणो)** तो महात्मा श्रमण **(धम्मो त्ति)** धर्म आहे असे **(विसेसिदो)** विशेषित केले आहे अर्थात सांगितले आहे.

तात्पर्य – अभेदरत्नत्रय परिणत श्रमणच धर्मात्मा आहे.

कल्याणमार्गामध्ये बाधक बाह्य मोहदृष्टी–

हा आत्मा स्वयं धर्मरूप होतो हे तर वास्तविक आपले मनोरथच आहे. कारण धर्ममार्गामध्ये येणाऱ्या प्रत्येक जीवाची हीच मनीषा असते की मला धर्म प्राप्त होवो. परंतु सर्वांचे हे मनोरथ सफल होत नाही, परिपूर्ण होत नाही. कारण या मनोरथामध्ये अडथळा उत्पन्न करणारी बाह्य मोहदृष्टी या जीवाच्या ठिकाणी ठाण मांडून बसली आहे.ती मोहदृष्टी त्याला आपले मनोरथ पूर्ण करू देत नाही.

व्यवहारात आपल्या आत्मविकासामध्ये कोणी बाधा करीत आहे हे लक्षात आले तर आपण सर्वप्रथम त्या बाधकाला दूर हटविण्याचा प्रयत्न करतो. कारण आपल्याला पक्के माहीत आहे जोपर्यंत आपल्या वाटेतील अडथळा दूर करणार नाही तोपर्यंत इच्छित गोष्ट आपल्याला प्राप्त होणार नाही. धर्ममार्गामध्ये मात्र हा जीव गाफील राहतो. आपल्या धर्मप्राप्तीमध्ये कोण विघ्न करीत आहे, कोण आम्हाला पुढे जाऊ देत नाही याचा शोध घेत नाही व तसेच पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु पुढे जाऊ शकत नाही. कारण वाटेत मोहदृष्टी ठाम उभी आहे. वस्तूस्वरूपासंबंधी अज्ञानच मोहदृष्टी आहे.

मोहनाशाचा उपाय –

जेव्हा हा जीव सर्वज्ञप्रणीत आगमाचा अभ्यास करतो तेव्हा त्याला तत्त्वाची ओळख होते. तत्त्वामध्ये स्वतत्त्व कोणते, परतत्त्व कोणते याचा भेद लक्षात येतो. आगमामध्ये जसे वस्तूचे स्वरूप सांगितले आहे तसेच जाणणे हीच आगमकुशलता आहे. आगमाचा यथार्थ अर्थ जाणण्यामध्ये तो कुशल होतो. आगमज्ञानाच्या अवलंबनाने आत्मज्ञान प्रकट होते तेव्हा ती बाह्य मोहदृष्टी नष्ट होते. आत्मज्ञानाने ती मोहदृष्टी अशी नष्ट झाली की पुन्हा

कधी डोके वर काढणार नाही. शूर वीर योद्धा, शत्रूचा असा नायनाट करतो की तो शत्रू पुन्हा कधी डोके वर काढणार नाही व कधी आपल्या वाटेत अडथळा उत्पन्न करणार नाही. ज्ञानी साधक पुरुषसुद्धा मोहशत्रूचा असा नाश करतात की पुन्हा हा मोह आपल्या मोक्षमार्गामध्ये बाधक होणार नाही. पुन्हा त्याची उत्पत्तीच होऊ नये असे मूळासकट त्याचा नाश करणे योग्य आहे.

आचार्यांना आपल्या सम्यक्त्वासंबंधी किती दृढता आहे. भले ही या काळात क्षायोपशायिक सम्यक्त्व आहे. परंतु आचार्यांना एवढा विश्वास आहे की हे माझे क्षायोपशमिक सम्यक्त्व क्षायिक-सम्यक्त्वामध्येच परिणत होणार आहे. माझे सम्यक्त्व आता नष्ट होणार नाही. ही खात्री आहे. ज्ञानीला असा संशय असत नाही की मी माझ्या आत्म्याला जाणले की नाही, मला सम्यक्त्व आहे की नाही. वरचे गुणस्थान मला प्राप्त झाले की नाही हे दुसऱ्याला विचारण्याची गरज नाही. आपले परिणाम आपण ओळखू शकतो. मला मूल झाले की नाही, हे गर्भवती स्त्रीला अन्य कुणाला विचारण्याची गरज नाही. तिला स्वयंच प्रसवजनित वेदना उत्पन्न होतात व मला पुत्रप्राप्ती झाली हे ती ओळखते.

त्याप्रमाणे सम्यग्दृष्टी आपल्या आत्मस्वभावाला जाणतो त्यावेळी त्याला स्वाभाविक विलक्षण आनंद होतो. दृष्टी स्वच्छ निर्मल होते. त्यामुळे तो स्वयंच जाणतो की मला सम्यक्त्व झाले. सम्यक्त्वाची प्राप्ती केवळ केवलज्ञानगम्य नाही. तर स्वानुभवगम्यसुद्धा आहे. अल्पकाळासाठी संयमापासून, सम्यक्त्वापासून सुटून मिथ्यात्वात आला व पुन्हा सम्यक्त्वाला व संयमाला प्राप्त झाला तर ती गोष्ट कदाचित् श्रुतज्ञानामध्ये लक्षात येणार नाही. ती गोष्ट केवलज्ञानाचा किंवा अवधि-मनःपर्ययज्ञानाचा विषय आहे.

मोहदृष्टीचा नाश झाल्यामुळे वीतराग चारित्रामध्ये माझा आत्मा आरूढ झाला आहे. असा हा माझा आत्मा स्वयं धर्ममय होऊन संपूर्ण विघ्नांचा नाश झाल्यामुळे सदा निष्कंपच राहतो. कोठेही विघ्न असतील तर मार्गापासून चलायमान होतो. परंतु जेथे कोणतेही विघ्न नाही तेथे निश्चलता येते. मोक्षमार्गामध्ये विघ्न उत्पन्न करणाऱ्या मोहाला दूर सारल्यामुळे आता मार्ग निर्विघ्न झाला आहे. त्यामुळे तेथे निष्कंप राहण्यामध्ये कोणतीही बाधा

नाही.

आत्मलाभाचा स्वस्तिवाद–

सज्जन पुरुष एखाद्या व्यक्तीला खूप समजावून सांगतात, शेवटी म्हणतात, बस आता जास्त बोलायला नको. आचार्यांनी मोहनाशाचा उपाय अनेक तऱ्हेने समजावून सांगितला. आता म्हणतात, अति विस्तार बस होओ. स्याद्वादाची मुद्रा ज्यावर आहे अशा जिनेन्द्रप्रणीत शब्दब्रह्माच्या उपासनेने आत्मतत्त्वाची उपलब्धी झाली अर्थात आत्मदर्शन झाले. त्या आगम सेवा मूलक आत्मतत्त्वाची उपलब्धी जयवंत असो की ज्याच्या प्रसादाने अनादिकालापासून बद्ध मोहदृष्टी तत्काल नष्ट झाली. ही मोहदृष्टीच सर्व संकटांचे मूल होती. ते द्रव्य धन्य आहे. तो प्रदेश धन्य आहे. ती परिणती धन्य आहे, तो भाव धन्य आहे जेथे मोहाचा अभाव झाला. पूर्वी परपदार्थाच्या संबंधामुळे व परामध्ये काहीतरी करण्याची जी बुद्धी होती त्यामुळे मी माझ्यासमोर संकटांचा डोंगर उभा केला होता. आत्मज्ञानाच्या प्रसादाने ती मोहमूर्च्छा विलयाला गेली.

आता हे लक्षात आले की मी परामध्ये काही करू शकत नाही. पुढेही करू शकणार नाही. मला परामध्ये करण्यासारखे काही नाहीच. आता मला आत्मदर्शन झाले आहे. याच्या प्रसादाने शुद्धोपयोगाचा उदय झाला. अहो ! हा शुद्धोपयोग स्वयं वीतराग चारित्रात्मक आहे. आता मला काहीही करणे शिल्लक नाही. माझा ज्ञानस्वभाव स्वयं रागादिकांच्या अभावस्वरूप आहे. या ज्ञानस्वभावाला दृढतेने उपयोगामध्ये स्थिर करणे एवढेच काम शिल्लक आहे. हीच स्थिती वीतराग चारित्राची आहे. परमवीतरागस्वरूप शुद्धोपयोग जयवंत असो की ज्याच्या प्रसादाने हा आत्मा स्वयमेव धर्मरूप झाला.

यातून आचार्यांनी ही प्रेरणा दिली आहे की, ज्यांना स्वाधीन होऊन आपल्या आत्मवैभवाचा निराबाधरीतीने सदैव भोग घ्यायचा आहे त्यांनी प्रथम शास्त्रज्ञानाने तत्त्वाचे यथार्थ स्वरूप समजून श्रद्धान करावे व त्या श्रद्धानाने निश्चय सम्यक्त्व प्राप्त करावे. पुन्हा आगमाच्या अधिक अभ्यासाने ज्ञान वैराग्य वाढवीत व्यवहार चारित्र द्वारा वीतराग चारित्र प्राप्त करावे. हाच साक्षात् मोक्षमार्ग आहे. हीच रत्नत्रयाची एकता आहे, हाच स्वानुभव आहे व

हेच निर्विकल्प ध्यान आहे. हाच परिणाम कर्मरूपी इन्धनाला जाळण्यासाठी अग्निसमान आहे. शान्त धर्ममय होण्यासाठी आगमाच्या अभ्यासाने आत्मतत्त्वाची उपलब्धी करून स्वभावदृष्टीच्या बलाने स्वतःला अविकाररूपाने अनुभवावे. स्वभावदृष्टीने स्वभावाचा विकास होतो.

प्रथम अधिकाराचा उपसंहार करीत संपूर्ण अधिकाराचा सार अमृतचन्द्र आचार्य कलशामध्ये भरतात. अमृतचंद्र आचार्यांचे कलश म्हणजे अध्यात्म अमृतरसाने भरलेले कुंभच आहेत. ज्या शाश्वत आनन्द व ज्ञानाच्या प्राप्तीसाठी जीव सर्व खटाटोप करतो त्या ज्ञान व आनन्दाची प्राप्ती कशाप्रकारे होते हे या श्लोकामध्ये सांगत आहेत.

आत्मा धर्मः स्वयमिति भवन् प्राप्य शुद्धोपयोगं
नित्यानन्द प्रसरसरसे ज्ञानतत्त्वे निलीय ।
प्राप्स्यत्युच्चैरविचलतया निःप्रकम्पप्रकाशां
स्फूर्जज्ज्योतिः सहजविलसद्रत्नदीपस्य लक्ष्मीम् ।।५।।

अन्वयार्थ– (**इति**) अशाप्रकारे (**शुद्धोपयोगं**) शुद्धोपयोगाला (**प्राप्य**) प्राप्त करून (आत्मा) (**स्वयं धर्मः भवन्**) स्वयं धर्मरूप होऊन (**नित्यानन्दप्रसरसरसे**) नित्य आनन्दाच्या प्रसाराने सरस अशा (**ज्ञानतत्त्वे**) ज्ञानतत्त्वामध्ये (**निलीय**) लीन होऊन (**उच्चैः अविचलतया**) अत्यन्त अविचल रूपाने **(स्फूर्जज्ज्योतिः**) दैदीप्यमान ज्योतिस्वरूप (**सहज–विलसद्रत्नदीपस्य**) सहजरूपाने विलसित रत्नदीपाच्या (**निप्रकम्पप्रकाशां**) निष्कंप प्रकाशमय (**लक्ष्मीं**) शोभेला (**प्राप्स्यति**) प्राप्त करतो.

धर्ममार्गामध्ये आलेल्या जीवाला धर्मप्राप्तीची अभिलाषा असते. ती अभिलाषा शुद्धोपयोगाशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. कारण शुद्धोपयोग वास्तविक धर्म आहे. शुद्धोपयोगाशिवाय संवर निर्जरारूप मोक्षमार्गाची सुरवातच होत नाही. ज्या जीवाने स्वसंवेदन ज्ञानाने निज शुद्ध आत्म्याला जाणले त्याला शुद्धोपयोग प्राप्त झाला. त्यामुळे आत्मा स्वयं धर्मरूप परिणमला. ज्यावेळी ज्या पर्यायरूपाने परिणमतो त्यावेळी द्रव्य त्या पर्यायाशी तन्मय होते. आत्मा जेव्हा धर्मपर्यायरूपाने (शुद्धोपयोगरूपाने) परिणमतो

त्यावेळी आत्मा धर्मरूप होतो. ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

जो आत्मा धर्मरूप परिणमला त्याला आता आत्म्याची चव कळाली त्याला परम आनन्दाची प्राप्ती झाली म्हणून तो पुन्हपुन्हा त्या नित्य आनन्दाने सरस असणाऱ्या ज्ञानस्वरूपामध्ये लीन होतो. ज्याप्रमाणे उन्हाळ्यामध्ये सूर्याच्या आतापाने संतप्त झालेल्या पथिकाला थंड पाण्याचा सरोवर मिळाला तर तो त्या सरोवरामध्येच मग्न होऊन शांतीचा अनुभव करू इच्छितो त्याप्रमाणे राग द्वेष मोहाने संतप्त झालेल्या संसारी जीवाला जर शांतरस ज्यामध्ये लबालब भरलेला आहे असे आत्मतत्त्व प्राप्त झाले तर आता तो त्या आत्म्यामध्येच लीन होऊ इच्छितो. ज्याप्रमाणे लहान बालकाला एकदा थंड आईस्क्रीम चाखायला मिळाले तर तो त्या आईस्क्रीमचा पुन्हपुन्हा स्वाद घेऊ इच्छितो त्याप्रमाणे ज्याने आनन्दाने सरस अशी आत्मतत्त्वाची गोडी चाखली तो ज्ञानी जीव पुन्ह पुन्हा आत्मतत्त्वाचा स्वाद घेऊ इच्छितो. अशाप्रकारे आत्मतत्त्वामध्ये लीन झाल्यामुळे त्याला दैदीप्यमान ज्योतिःस्वरूप केवलज्ञानाची प्राप्ती होते.

जो ज्यामध्ये लीन होतो त्याला तशाप्रकारचे फळ प्राप्त होते. ज्याप्रमाणे शीतल स्वच्छ जलाच्या सरोवरामध्ये डुबकी मारतो त्याला शीतलता प्राप्त होते. जो उष्ण जलाच्या सरोवरामध्ये डुबकी मारतो त्याला संताप प्राप्त होतो. जो अमृताच्या डोहामध्ये डुबकी मारतो त्याला अमृताचा आस्वाद मिळतो. त्याप्रमाणे जो रागादिभावसहित अशुद्ध आत्म्यामध्ये लीन होतो त्याला अशुद्धताच प्राप्त होते व जो रागद्वेष रहित शुद्ध ज्ञानतत्त्वामध्ये लीन होतो त्याला शुद्ध केवलज्ञानाची लक्ष्मी प्राप्त होते म्हणून जर आपल्याला केवलज्ञानाची अभिलाषा असेल तर ज्ञान व आनन्दमय अशा आत्मतत्त्वामध्ये लीन झाले पाहिजे.

फळाची इच्छा तर सर्वांना असते; परंतु जो तदनुकूल पुरुषार्थ करतो त्याला त्या फळाची प्राप्ती होते. मोक्षफळाची सर्वांना इच्छा आहे; परंतु जो निश्चय रत्नत्रयस्वरूप मोक्षपुरुषार्थ करतो त्यालाच मोक्षफळ प्राप्त होते.

यानंतर पुढील श्लोकात अमृतचन्द्र आचार्य प्रथम अधिकाराची समाप्ती व पुढच्या अधिकाराचा प्रारंभ या दोघांची संधी साधतात.–

निश्चित्यात्मन्यधिकृतमिति ज्ञानतत्त्वं यथावत्
तत्सिद्ध्यर्थं प्रशमविषयं ज्ञेयतत्त्वं बुभुत्सुः।
सर्वानर्थान् कलयति गुणद्रव्यपर्याययुक्त्या
प्रादुर्भूतिर्न भवति यथा जातु मोहांकुरस्य ॥६॥

अन्वयार्थ – (**इति**) अशाप्रकारे (**आत्मनि अधिकृतं**) आत्म्याच्या आश्रयाने राहणाऱ्या (**ज्ञानतत्त्वं**) ज्ञानतत्त्वाला (**यथावत्**) यथार्थरूपाने (**निश्चित्य**) निश्चित करून (**तत्सिद्ध्यर्थं**) त्या ज्ञानतत्त्वाच्या सिद्धीसाठी (**प्रशमविषयं**) प्रशमाच्या लक्ष्याने (**ज्ञेयतत्त्वं**) ज्ञेयतत्त्वाला (**बुभुत्सुः**) जाणण्याचा इच्छुक जीव (**गुणद्रव्यपर्याययुक्त्या**) द्रव्यगुणपर्यायाच्या युक्तीने (**सर्वान् अर्थान्**)सर्व पदार्थांना असे (**कलयति**) जाणतो की (**यथा**) जशाप्रकारे (**जातु**) कधी ही (**मोहांकुरस्य**) मोहरूपी अंकुराची (**प्रादुर्भूतिः**) उत्पत्ती (**न भवति**) होणार नाही.

प्रथम अधिकारामध्ये ज्ञानतत्त्वाची सिद्धी केली आहे. कारण सर्व पदार्थांचा निर्णय करण्याचे साधन ज्ञानच आहे. साधनच माहीत नसेल तर त्या अज्ञात साधनाच्या द्वारे साध्याची सिद्धी होऊ शकणार नाही म्हणून प्रथम आचार्यांनी ज्ञानतत्त्वाची प्रसिद्धी केली. ज्ञानाचा आधार आत्माच आहे. आत्म्याच्या आश्रयाने ज्ञान राहते. अर्थात आत्माच ज्ञानमय आहे. ज्याप्रमाणे गोडी साखरेच्या आश्रयाने राहते अर्थात साखर गोड आहे. त्याप्रमाणे ज्ञान आत्म्यामध्येच आहे. या विश्वामध्ये अन्य कोणत्याही पदार्थामध्ये ज्ञान नाही. म्हणून जेथे ज्ञान आहे तेथे आत्मा आहे. ज्ञान स्वतःला व पराला जाणण्यामध्ये साधन आहे. ज्ञान स्वयं स्वतःलाही जाणते व त्या ज्ञानामध्ये आलेल्या विषयाला ही जाणते. त्या ज्ञानात आलेल्या विषयालाच ज्ञेयतत्त्व म्हणतात.

ज्याने ज्ञानतत्त्वाचा यथार्थ निर्णय केला तो आता ज्ञेयतत्त्वाला जाणण्याची इच्छा करतो. आपल्याला कोणतेही कार्य करण्याचे साधन मिळाले तर त्या साधनाद्वारे साध्य सिद्ध करण्याची आपण इच्छा करतो. उदा. सिलाई मशीन मिळाले तर त्याद्वारे कपडे शिवण्याची इच्छा करतो. ज्ञान हे जाणण्याचे साधन आहे हे लक्षात आले. आता त्या ज्ञानाद्वारे जगामध्ये

ज्ञेयतत्त्व किती आहेत? त्यांचे स्वरूप काय आहे ? हे जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. म्हणून आता दुसऱ्या अध्यायामध्ये ज्ञेयतत्त्वाचे वर्णन करतात. ज्ञेय म्हणजेच पदार्थ. सर्व पदार्थ द्रव्यगुणपर्यायमय आहेत म्हणून सर्व पदार्थांना द्रव्यगुण पर्यायसहित जाणतो. द्रव्यगुण पर्यायाचे यथार्थ स्वरूप कळाले तर खरे पदार्थाचे स्वरूप कळते.

जो द्रव्यगुणपर्यायसहित पदार्थांना जाणतो त्याला पुन्हा मोहांकुर उत्पन्न होत नाही. कारण द्रव्यगुणपर्यायाचे अज्ञानच मोहाच्या उत्पत्तीचे कारण आहे. पूर्वी ८३ नंबरच्या गाथेमध्ये आचार्यांनी स्वयं मोहाचे स्वरूप सांगितले आहे की द्रव्य आदिकासंबंधी मूढभाव हाच मोह आहे. द्रव्यगुणपर्याय तिन्ही मिळून पूर्ण वस्तु आहे. त्याचे भावभासन नसल्यामुळे व्यक्त पर्यायामध्येच हा जीव आत्मबुद्धी करतो. ही वर्तमान अवस्था म्हणजेच मी आहे अर्थात मी मनुष्य आहे, स्त्री आहे, पुरुष आहे इत्यादी स्वतःसंबंधी मान्यता करतो. सर्व पर्यायामध्ये व्यापून असणाऱ्या द्रव्याला, व द्रव्यामध्ये असणाऱ्या सामान्य विशेष गुणांना जाणत नाही म्हणून पर्यायामध्येच अहंकार करतो आणि दुःखाला प्राप्त होतो. त्या द्रव्यगुणपर्यायात्मक वस्तूचे स्वरूप आचार्य दुसऱ्या अध्यायामध्ये विस्ताराने सांगतात. तेथेच आपण विस्ताराने समजून घेऊया व अनादिकालीन मोहाला उखडून काढूया.

अमृतचंद्र आचार्यांच्या टीकेमध्ये येथेच प्रथम अधिकाराची समाप्ती झाली आहे. परंतु जयसेन आचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये दोन गाथा अधिक आहेत. त्या दोन गाथांपैकी पहिल्या गाथेत श्रमणांच्या भक्तीचे फळ सांगतात. मागच्या गाथेमध्ये निश्चय रत्नत्रय परिणत श्रमणांना साक्षात् धर्मरूप सांगितले आहे. त्या निश्चय रत्नत्रयाने परिणत महामुनींची जो जीव अंतःकरणपूर्वक भक्ती करतो त्याला धर्माची प्राप्ती होते हे आता या गाथेत सांगतात–

जो तं दिट्ठा तुट्ठो अब्भुट्ठित्ता करेदि सक्कारं ।
वंदणणमंसणादिहिं तत्तो सो धम्ममादियदि ।।९२–१।।

अन्वयार्थ– (**जो**) जो जीव (**तं**) मागच्या गाथेत सांगितलेल्या श्रमणाला (**दिट्ठा**) पाहून (**तुट्ठो**) संतुष्ट होतो व (**अब्भुट्ठित्ता**) उठून (**वदंणणमंसणादिहिं**) वंदन, नमस्कार इत्यादिद्वारे (**सक्कारं**) सत्कार

(**करेदि**) करतो (**तत्तो**) त्यापासून (**सो**) तो जीव (**धम्ममादियदि**) धर्माला ग्रहण करतो.

द्रव्य आणि भाव लिंगधारी साधूच खरी भक्ती करण्यासाठी पात्र आहेत. पात्र जीवामध्ये केलेली भक्ती विशेष फलदायी असते. देवशास्त्रगुरु या जगामध्ये सर्वोत्कृष्ट पदार्थ आहेत. देव साक्षात् मोक्षस्वरूप आहेत. अनंतचतुष्टय संपन्न आहेत. त्या वीतरागतेला प्राप्त करण्यासाठी ज्यांनी वीतराग मार्गाचा अवलंब घेतला आहे अर्थात ज्यांनी वीतरागचरित्र प्राप्त केले आहे व जे शुद्ध आत्म्याच्या अनुभवामध्ये लीन असतात ते साधू गुरु आहेत. त्यांच्यामध्ये असणाऱ्या गुणांमध्ये अनुराग असल्यामुळे त्यांना पाहून भव्य जीवाला अंतरंगामध्ये अतिशय आनंद होतो. त्यांच्यासंबंधी सहज भक्ती उत्पन्न होते.

ते आले असता उठून त्यांच्या सामोरे जातो. वचनाने त्यांची स्तुती करतो. शरीराच्याद्वारे अष्टांग नमस्कार करतो. त्यांना वसतिका दान करतो अर्थात राहण्यासाठी जागेची व्यवस्था करून देतो. मार्गातील श्रमजनित खेद दूर करण्यासाठी वैय्यावृत्य करतो व निर्दोष शुद्ध सात्त्विक आहार देऊन त्यांच्या रत्नत्रयाच्या आराधनेमध्ये सहायक होतो त्याला त्या शुभभावाच्या निमित्ताने महान पुण्याचा लाभ होतो.

शुद्धोपयोगी आत्मानुभवी मुनींच्या मुखातून उपदेशामृताचे सेवन केल्यामुळे निश्चयधर्माची ही प्राप्ती होते. त्यांची शांत मुद्रा त्याच शुद्धोपयोगरूप धर्माला प्रकट करते.

साधूंना आहारदान करणे म्हणजे त्यांना रत्नत्रयाचे दान केल्यासारखे आहे. कारण साधू श्रावकाद्वारे दिलेला चार घास आहार घेऊन निर्विकल्प होऊन आपल्या आत्मसाधनेमध्ये लीन होतात. जर साधूंना आहार मिळाला नाही तर कदाचित् भुकेच्या वेदनेमुळे त्यांचा उपयोग ज्ञान व ध्यानामध्ये स्थिर होऊ शकणार नाही. म्हणून मुनींना आहारदान करणे श्रावकाचे परम कर्तव्य आहे. त्यामुळे श्रावक वास्तविक स्वतःचाच उपकार करतो. त्याला त्यामुळे साक्षात् व्यवहार धर्म व परम्परेने निश्चयधर्माची प्राप्ती होते. कारण आहारदान करण्याचा भाव शुभभाव आहे त्यामुळे तो पुण्य बांधतो. त्या पुण्यामुळे

परभवामध्ये त्याला काय फळ मिळते हे पुढील गाथेत सांगतात.-

तेण णरा व तिरिच्छा देविं वा माणुसि गदिं पप्पा।
विस्सरियेहिं सया संपुण्णमणोरहा होंति ।।९२-२ ।।

अन्वयार्थ – (**तेण**) त्या पुण्यामुळे (**णरा व तिरिच्छा**) मनुष्य किंवा तिर्यंच (**देविं वा माणुसि**) देव किंवा मनुष्यगतीला (**पप्पा**) प्राप्त करून (**विस्सरियेहिं**) वैभव व ऐश्वर्याद्वारे (**सया**) सदैव (**संपुण्णमणोरहा**) संपूर्ण मनोरथ वाले (**होंति**) होतात.

निश्चय रत्नत्रयसंपन्न मुनींची भक्ती व वैय्यावृत्य केल्यामुळे महान् पुण्याचा बन्ध होतो. मुनींचे वैय्यावृत्य करण्याचे सौभाग्य मनुष्य व तिर्यंचांना प्राप्त होते. मनुष्य मुनिराजांना प्रत्यक्ष आहारदान व औषधदान करतो. तिर्यंच स्वतः आहार देऊ शकत नाही. परंतु त्या आहारदानाची अनुमोदना करून मनुष्यासारखे पुण्य बांधतो. प्रथमानुयोगामध्ये अशा अनेक कथा प्रसिद्ध आहेत. जेव्हा राजा वज्रजंघ व श्रीमती राणीने मुनिराजांना जंगलामध्ये आहारदान दिला तेव्हा माकडाच्या जीवाने त्यांना अनुमोदना देऊन अत्यंत हर्ष मानला व वज्रजंघ राजा व श्रीमती राणी समान पुण्याचा बंध करून उत्तम भोगभूमीमध्ये जन्म घेतला व जेव्हा राजा वज्रजंघ आदिनाथ तीर्थंकर झाले व राणी श्रीमतीचा जीव श्रेयांस राजारूपाने जन्माला आला तेव्हा हा जीव आदिनाथांचा पुत्र होऊन गुणसेन या नावाने प्रसिद्ध झाला.

राम, लक्ष्मण व सीता वनवासात असताना एकदा दण्डक वनामध्ये पोहचले. तेथे सर्व भोजनाची तयारी करून भोजनापूर्वी सीता, राम, लक्ष्मण मुनिराजांच्या आगमनाची प्रतीक्षा करत होते तेव्हा त्यांच्या भाग्याने गुप्ती आणि सुगुप्ती नावाच्या दोन चारण ऋद्धिधारी मुनिराजांचे तेथे आगमन झाले. त्यांना पाहताच तिघांनी ही नवधाभक्तिपूर्वक पडगाहन केले. अत्यंत भक्ती व श्रद्धापूर्वक त्यांना आहार दिला. आहाराच्यावेळी पंचाश्चर्य झाले. त्यावेळी जवळच एका झाडावर गृध्र (गिधाड) पक्षी बसला होता. मुनिराजांच्या दर्शनाने अतिप्रसन्न होऊन झाडावरून खाली जमीनीवर पडला. मुनिराजांच्या पाय धुतलेल्या पाण्यावर तो पडला त्या चरणोदकाच्या प्रभावाने त्याचे शरीर रत्नराशिप्रमाणे अत्यंत तेजस्वी झाले. त्याने मुनिराजांच्या पुढे प्रसन्न होऊन

अत्यन्त भक्तीने सुन्दर नृत्य केले.

मुनिराजांच्या मुखातून धर्मोपदेश ऐकून श्रावकाची पाच अणुव्रते, रात्रीभोजनत्याग, अभक्ष्यभक्षण त्याग इत्यादी व्रते अंगिकारली. राम, सीता, लक्ष्मणाने उत्तम श्रावक जाणून त्याच्यावर खूप प्रेम केले. त्यांनी त्याचे नाव जटायू ठेवले. जटायू दररोज तिन्ही वेळ सीतेबरोबर भक्तीने नम्र होऊन अरिहंत, सिद्ध व साधूंची वन्दना करीत होता. जेव्हा सीता भक्तीने धर्मगीत गात होती, राम लक्ष्मण तिला साथ देत होते तेव्हा जटायू हर्षित होऊन नृत्य करीत होता. पुढे तो रावणाबरोबर युद्ध करीत मरण पावला व स्वर्गात देव झाला.

असे अनेक प्रसंग पुराणग्रंथामध्ये प्रसिद्ध आहेत. मुनिराज जेव्हा जंगलामध्ये तपश्चरण करतात तेव्हा तिर्यंच त्यांना राहण्यासाठी गुंफा वगैरे वसतिका दान करून त्यांना अभयदान देतात. स्वर्गातील देव मुनींची भक्ती करतात, त्यांचा उपसर्ग दूर करतात. परंतु त्यांना आहारदान किंवा औषधदान करू शकत नाहीत. नारकींना तर मुनींचे दर्शनच घडत नाही म्हणून गाथेमध्ये मनुष्य व तिर्यंच मुनिभक्तीच्या पुण्याचे भागी सांगितले आहेत.

त्या पुण्याच्या उदयामध्ये त्यांना वैभव व ऐश्चर्यांची प्राप्ती होते. जयसेनाचार्यांनी विभूती शब्दाचा अर्थ राजाधिराज संबंधी रूप, सुन्दरता, सौभाग्य, स्त्री पुत्र इत्यादी ग्रहण केला आहे व ऐश्वर्य शब्दाचा अर्थ आज्ञा ग्रहण केला आहे. मुनींच्या भक्तीने प्राप्त पुण्याच्या उदयाने मनुष्य व तिर्यंच देवगती किंवा मनुष्यगतीला प्राप्त होऊन विभूती व ऐश्वर्याने संपन्न होऊन संपूर्ण मनोरथवाले होतात अर्थात त्यांचे सर्व मनोवांछित पूर्ण होते. जर ते पुण्य निदान बंधयुक्त असेल तर तो जीव केवळ पुण्याचा भोग भोगून पुन्हा संसारामध्ये भ्रमण करतो. परंतु जर ते पुण्य भोगांच्या निदानाशिवाय सम्यग्दर्शनपूर्वक असेल तर परम्परा मोक्षाची प्राप्ती होते. अर्थात त्या पुण्याच्या उदयाने तो स्वर्गात जातो तेथेही तो आपली धर्मभावना सोडत नाही. चतुर्थ गुणस्थानयोग्य आत्मसाधना करतो व पुन्हा विशेष पुण्याचा बंध करून मनुष्यगतीमध्ये उच्चकुल, निरोगता, राजाधिराज पद, जिनधर्माची त्याला प्राप्ती होते. व तेथे सम्यक्त्वाला दृढ करून द्रव्यभाव संयमाचा अंगीकार करून भावलिंगी मुनी

होऊन निश्चय रत्नत्रयसंपन्न होऊन मोक्षाला जातो म्हणून सम्क्त्वसहित पुण्याला परम्परेने मोक्षाचे कारण सांगितले आहे. म्हणून श्रावक धर्म परम्परा मोक्षसाधक आहे व साधुधर्म साक्षात् मोक्षसाधक आहे.

याचा अभिप्राय असा नाही की सर्वच साधू त्याच भवातून मोक्षाला जातात, परन्तु हा अभिप्राय आहे की जर मोक्ष झाला तर मुनिपदामध्येच परमशुक्लध्यानाद्वारेच होईल, वास्तविक शुद्धोपयोगाची भक्तीसुद्धा परम कार्यकारी आहे. वीतरागचारित्राशिवाय कर्माचे दहन होऊ शकत नाही.

श्रीमद् भगवत् कुंदकुंदाचार्यप्रणीत प्रवचनसार ह्या ग्रंथावरील आचार्य अमृतचंद्रसूरी यांच्या तत्त्वप्रदीपिका व आचार्य जयसेन यांच्या तात्पर्यवृत्ती ह्या टीकांच्या आधारे केलेल्या विश्लेषणाचा प्रथम अध्याय समाप्त.

*****